# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ इतिहास

सत्र–५ : पेपर–११ DSE-E65

# इतिहासाचे सिद्धांत

**(History : Its Theory)**

सत्र–६ : पेपर–१६ DSE-E190

# इतिहासाच्या पद्धती आणि उपयोजन

**(Methods and Applications of History)**

(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-65-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनीश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. सन २०२०-२०२१ पासून बी. ए. ३ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-३ इतिहास पेपर क्र. ११ व १६ (सत्र ५ व ६) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र ५ साठी इतिहासाचे सिद्धांत व सत्र ६ साठी इतिहासाच्या पद्धती आणि उपयोजन या पेपरच्या स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक उपघटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे घटकाच्या शेवटी दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये इतिहासाचे सिद्धांत या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र ५ व ६ साठी प्रत्येकी ४ घटकांचा समावेश केलेला आहे. सत्र ५ मध्ये इतिहास : व्याख्या व व्याप्ती, इतिहासाच्या साधनांचे संकलन, इतिहास लेखन प्रक्रिया व सादरीकरण, इतिहास लेखनाच्या पद्धती आणि सत्र ६ मध्ये पुराभिलेखीय साधने, इतिहासातील नवीन प्रवाह, संग्रहालयशास्त्र, वारसा पर्यटनाचा अर्थबोध इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. इतिहासचे सिद्धांत व इतिहासाच्या पद्धती आणि उपयोजन यांचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे असल्याने सदर पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

पुस्तकामध्ये विविध घटकांच्या अनुषंगाने विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित अद्यावत करण्यासाठी याचा उपयोग होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. सदरच्या पुस्तकातील विविध घटक लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. अवनीश पाटील**
इतिहास अधिविभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**इतिहासाचे सिद्धांत/इतिहासाच्या पद्धती आणि उपयोजन**
**बी. ए. भाग–३ इतिहास सत्र ५ व ६**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे**<br>श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, हातकणंगले | १ | – |
| **डॉ. रणजित माने**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव | २ | – |
| **डॉ. अजितकुमार दादासो जाधव**<br>आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा | ३ | – |
| **डॉ. धीरज शिंदे**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी | ४ | – |
| **डॉ. अर्चना जाधव**<br>शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज<br>**डॉ. मुफिद मुजावर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | – | २, ३ |
| **डॉ. संजय नवले**<br>श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी, ता. शाहूवाडी | – | ३ |
| **डॉ. शिवाजी जाधव**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | – | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. अवनीश पाटील**
इतिहास अधिविभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–११**<br>**इतिहासाचे सिद्धांत** | |
| १. | इतिहास : व्याख्या व व्याप्ती | १ |
| २. | इतिहासाच्या साधनांचे संकलन | ३० |
| ३. | इतिहास लेखन प्रक्रिया व सादरीकरण | ५९ |
| ४. | इतिहास लेखनाच्या पद्धती | ८० |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१६**<br>**इतिहासाच्या पद्धती आणि उपयोजन** | |
| १. | पुराभिलेखीय साधने | १११ |
| २. | इतिहासातील नवीन प्रवाह | १३३ |
| ३. | संग्रहालयशास्त्र | १७० |
| ४. | वारसा पर्यटनाचा अर्थबोध | २१५ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरे घटकाच्या शेवटी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक – १

# इतिहास : व्याख्या व व्याप्ती

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ इतिहास – व्याख्या, व्याप्ती आणि स्वरूप

१.२.२ इतिहासाचे प्रकार

१.२.३ आंतरशाखीय दृष्टिकोन

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ

### १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- इतिहास म्हणजे काय? याचा अर्थ सांगता येईल.
- विविध इतिहासकारांनी केलेल्या इतिहासाच्या व्याख्यांचे चिकित्सक परिक्षण करता येईल.
- या व्याख्याद्वारे मानव इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन विविध कालखंडात कसा विकसित होत गेला हे सांगता येईल.
- इतिहास या ज्ञानशाखेचे स्वरूप समजावून घेता येईल.
- इतिहासाची व्याप्ती व प्रकार समजावून घेता येतील.
- इतिहासाचा सहाय्यकारी ज्ञानशाखा व इतिहास यांच्यातील परस्पर संबंध व महत्त्व अधोरेखित करता येईल.

- इतिहासाच्या सहाय्यकारी ज्ञान शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरशाखीय दृष्टिकोनाचे महत्त्व विशद करता येईल.
- इतिहासाच्या आकलनामध्ये कलानुरुप झालेली स्थित्यंतरे लक्षात येईल.

### ४.१ प्रास्ताविक :

इतिहास या ज्ञान शाखेने मानवाच्या कल्याणाच्या व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास हा विषय मानवाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. मानवी जीवन, मानवी मन व त्याचे बरे वाईट कार्य हा इतिहासाचा केंद्रबिंदु आहे. मानवाच्या भाव-भावना, त्याच्या जीवनातील चढ उतार, खाचखळगे, चमत्कृतीपूर्ण घटना याचा विचार इतिहासामध्ये केला जातो. थोडक्यात मानवाच्या प्रगतीची गोष्ट इतिहासात सांगितली जाते. मानव समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा विचार केला जातो. घटना का घडली तिचे समाजजीवनावर पडलेल्या परिणामाचा विचारही केला जातो. म्हणूनच इतिहास भूतकाळ व वर्तमान काळ यातील अखंड संवाद आहे असे म्हटले जाते. एकंदरीत इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्यामागील तत्व, विचार व व्यक्तीची वृत्ती यांचा विचार केला जातो. राजकीय घटनाबरोबरच मानवी संस्कृती, सामाजिक चालीरीती, रूढी, सामाजिक संस्था, आर्थिक स्थिती, धर्म इत्यादींचा विचार इतिहासात केला जाऊ लागला. आजच्या आधुनिक काळात तर इतिहासातील जुन्या त्रुटी टाळून वैज्ञानिक पद्धतीने इतिहासाचे लेखन केले जात आहे. त्यामुळे इतिहासात मानवी संस्कृतीच्या सर्व अंगाने विचार केला जात आहे.

मानवाला आपल्या भूतकाळाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता असते. आपल्या भूतकाळाबद्दल कुतुहल असते. आपल्या अस्तित्वाची माहिति पुढील पिढीला करून देण्याची धडपड तो त्याच्या अस्तित्वापासूनच करत आलेला आहे. त्याच्या या स्वभाव वृत्ती मधून इतिहासाची सुरूवात झाली आहे.त्याची जशी-जशी बौद्धिक प्रगती झाली तसे त्याचे इतिहाससंबंधित आकलन बदलत गेले आहे. मानवी विकासाच्या विविध टप्प्यावर इतिहासा संबंधित त्याच्या धारणा आकलन वेगळे असल्याचे दिसून येते. तसेच वेगवेगळ्या देशातही इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही भिन्न आहे.

म्हणून इतिहास या ज्ञान शाखेचे योग्य आकलन करून घेण्यासाठी त्या विषयाचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. इतिहासाच्या स्वरुपावरून त्याचे प्रकारही सामावून घेता येतील. इतिहासाच्या प्रकाराबरोबरच त्याचा इतर ज्ञान शाखांशी असलेला संबंधही समजावून घेता येईल. त्यामुळे इतिहासाचे एकंदरीत सम्यक आकलन होईल.

### १.२ विषय विवेचन :

#### १.२.१ इतिहासाचा अर्थ, व्याख्या व्याप्ती व स्वरूप :

#### अ) इतिहसाचा अर्थ :

इतिहास म्हणजे काय? हे जाणून घेण्यापूर्वी इतिहास (History) या शब्दाची व्युत्पत्ती अथवा अर्थ पाहू.

इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ असे घडले, अशा प्रकारे घडले (इति + ह + आस) असा होतो. म्हणजे भूतकाळात जे घडले ते सर्व इतिहास विषयाच्या कक्षेत समावते. इंग्रजी भाषेतील History या शब्दाचे मुळ Istoria या ग्रीक शब्दात सापडते. या शब्दाचा अर्थ जिज्ञासेने केले जाणारे संशोधन व त्या द्वारा नव्या माहितीचा शोध असा आहे. तर जर्मन भाषेत इतिहासासाठी 'Geschichte' हा शब्द असून त्याचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशूद्ध व अर्थ पूर्ण विवेचन असा आहे. इतिहासासाठी वापरलेल्या विविध भाषेतील शब्दाच्या अर्थावरून इतिहासाची व्याख्या स्थुलमानाने भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन जे घडले त्याचे जसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्ण रित्या करणे अशी केली जाऊ शकते. History या शब्दाचा सर्वप्रथम वापर ग्रीक इतिहासकार हेरोडोटस याने केला. याला इतिहासाचा जनक मानले जाते. त्याच्या मते इतिहासाचा अर्थ जाणून घेणे अथवा ज्ञात होणे होय.

इतिहास लेखनाची सुरूवात इ.स. पूर्व सहाव्या शतकात ग्रीकमध्ये झाली. हे लिखाण इ. स. च्या दुसऱ्या शतकापर्यंत चालू होते. हिकाटिअस, डायोनियस, हेरोडोटस, थ्युसिडाईडस या ग्रीस इतिहासकारांनी इतिहास लेखनाची सुरूवात केली. हिकाटिअस म्हणतो इतिहास लेखनात परंपरागत मिथकांचा अंतर्भाव नसावा. जे प्रत्यक्षात घडले त्याचेच वर्णन इतिहासकारांनी करावे. डायोनियस यांच्या मते, इतिहास प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे पुढे मांडून धडे शिकवितो. म्हणजे इतिहास हे मौल्यवान ज्ञानभांडार आहे. त्यातून माणसाला अनेक महत्त्वाच्या बाबी शिकता येतील. (History is Philosophy Teaching by Examples.) तर थ्युसिडाईडस् इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनाचे निवेदन होय असे मानतो. ("History is Story of things Worthy to be Remembered.") ॲरीस्टॉटल हा ग्रीक तत्त्वज्ञ इतिहास न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे असे मानतो.

इतिहास लेखनाच्या दुसऱ्या टप्पाचे (मध्ययुगीन समाजाचे) वैशिष्ट्य म्हणजे मानवी विकासाच्या या टप्प्यावर हा ख्रिस्ती धर्माचा व पुढे सहाव्या शतकात इस्लाम धर्माचा झालेला उदय व संबंधीत धर्माचा समाजावर पडलेला प्रभाव. या प्रभावातून युरोपात झालेले इतिहास लेखन धार्मिक तत्त्वज्ञाने प्रभावित झाले होते. अशा इतिहास लेखनाची सुरूवात इ. स. च्या तिसऱ्या शतकापासून झाली. इस्लाम धर्मतत्त्वाचा प्रभाव अरब इतिहास लेखनावरतीही झालेला दिसतो. परमेश्वर सर्व व्यापी आहे, तो करता करविता आहे, विश्व निर्माता व विश्वचालक तोच आहे. ह्या पृथ्वीतलावरील जीव हे त्याच्या हातातील बाहुले आहेत तोच सूत्र संचालक असल्यामुळे मानवाला स्वतंत्र इच्छा शक्ती अगर कार्य कर्तृत्व नाही अशी वैचारिक धारणा काही अपवाद वगळता त्या काळातील इतिहास लेखनात प्रतिबिंबीत झाली आहे. थोडक्यात इतिहासाचा हेतू विश्व नियंत्याचे हेतू आणि कर्तृत्व कथेद्वारा लोकांना समजावून सांगणे हा होता. मध्ययुगीन समाजाची इतिहासा संबंधित अशी धारणा १५ व्या शतकापर्यंत प्रभावी होती.

१५ व्या शतकाच्या उत्तरार्धात जगाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या तीन घटना घडल्या. त्या म्हणजे वैचारिक प्रबोधन, धर्म सुधारणा व अज्ञात जगाचा शोध. कॉन्स्टॅन्टिनोपल हे शहर तुर्कांनी जिंकून घेतले तेथे वसलेले ग्रीक पंडित युरोपात स्थलांतरित झाले. ग्रीक वाङ्मयाचा आणि तत्त्वज्ञानाचा तेथे प्रसार केला. युरोपात

विद्येच्या पुनरूज्जीवनाची लाट पसरली. प्राचीन ग्रीक विद्येच्या पुनरूज्जीवनामुळे ज्ञानाची नवी दालने खुली झाली. धर्माचा प्रभाव कमी होऊन नवे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, स्वतंत्र विचार शक्ती जागृत झाली. मानव हा सर्व विचाराचा केंद्रबिंदु बनला यातून मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण झाल्याने त्याचा परिणाम इतिहासावर परिणाम झाला. मानवी कर्तृत्वाचे महत्त्व ध्यानात घेतले जाऊ लागले. इतिहासात मानवी कर्तृत्वाला स्थान मिळाले आणि इतिहास हे मानवाला उपयुक्त ठरणारे, शहाणपण शिकवणारे ज्ञानभांडार आहे असा विचार व्यक्त होऊ लागला. पुढे इतिहासाचा विचार हा मानवकेंद्रित होऊ लागला व त्या पद्धतीने इतिहासाच्या व्याख्याही पुढे येऊ लागल्या. १७ व्या शतकातील फ्रान्सिस बेकन याने 'इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे' अशी इतिहासाची व्याख्या केली. सर वॉल्टर रेले याने गतकाळातील उदाहरणे देऊन माणसाला शहाणपण शिकविणे व मार्गदर्शन करणे हे इतिहासाचे उद्दिष्ट्ये असल्याचे मत मांडले.

१८ व्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश साहित्याच्या क्षेत्रामध्ये केला जाई. या शतकात युरोपात बुद्धिप्रामाण्यवाद शिगेला पोहचला होता. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या निकषावर तपासून पाहण्याची वृत्ती या काळात प्रचलित झाली होती त्यातूनच बुद्धिवादी विचारवंत इतिहासातील सत्याविषयी शंका व्यक्त करू लागले. त्यातून इतिहासाविषयी नकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला की इतिहासातून शिकण्यासारखे काहीही नाही.

- व्होल्टेअर या फ्रेंच तत्त्ववेत्ताला आपला सर्व इतिहास हा केवळ काल्पनिक आहे असे इतिहासासंबंधी नकारात्मक दृष्टिकोन मांडू लागला.

- अनेक असत्य गोष्टीतून सत्याशी सादृश्य असलेल्या बाबींची निवड करण्याची कला म्हणजे इतिहास अशी इतिहासाची व्याख्या रूसोने केली.

- गिबन हा ब्रिटीश तत्त्ववेत्ता इतिहासासंबंधी म्हणतो इतिहास म्हणजे मानव जातीने केलेले गंभीर गुन्हे, मूर्खपणा आणि दुर्दैव यांच्याकथे शिवाय काही नाही.

- हेगेल हा जर्मन तत्त्ववेत्ता इतिहासापासून कोणी काही धडे घेतल्याचे आढळत नाही असे विधान करून इतिहासाची निरूपयोगीता सिध्द करतो.

१८ व्या शतकात इतिहासातील घटनाकडे बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. इतिहासातील त्रुटी दूर करून शास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहास लिहिला जाऊ शकतो अशी भूमिका घेऊन १९ व्या शतकात इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला. त्याच बरोबर या शतकात मात्र युरोपियन जगतात अनेक विचार प्रवाह प्रचलित झाले. त्याचा परिणाम इतिहासाच्या आकलनावर होऊ लागला. अठराव्या शतकातील निखळ बुद्धिवादा विरूद्धची प्रतिक्रिया म्हणून इतिहास लेखनात कल्पना शक्तीला स्थान मिळाले. साहित्य क्षेत्रातील रोमांटिसिझमचा प्रभाव इतिहास लेखनावर झाला. विज्ञानाच्या विकासाबरोबर इतिहासाचे शास्त्रीय लेखन व्हावे असा आग्रह धरणारे इतिहास तज्ज्ञ पुढे आले. लोकशाहीच्या विकासाबरोबरच मानवी प्रगतीचा व स्वातंत्र्याचा विचार प्रभावी ठरू लागला. वसाहतवाद, साम्राज्यवाद, राष्ट्रवाद, अशा नव्या राजकीय विचारप्रणाली प्रचारात आल्याने राजकारणाचे महत्त्व इतिहासाच्या क्षेत्रात मांडले गेले आणि औद्योगिक व

श्रमिक वर्गाचे शोषण यामुळे इतिहासाच्या मांडणीत आर्थिक हेतुमूलकतेच्या सिद्धांताला व सामाजिक संघर्षाला स्थान मिळाले. आज मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी राजकीय इतिहासाबरोबरच आर्थिक सामाजिक सांस्कृतिक घटकांचा विचार ही इतिहासात केला जात आहे. आज इतिहासाच्या व्याप्ती व स्वरुपातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत.

**ब) इतिहासाच्या व्याख्या :**

समाजाच्या घडणीमध्ये काळाच्या ओघात नवे विचार, नव्या चळवळी निर्माण होत असतात व त्याचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. आपण अडीच हजार वर्षाच्या इतिहासात मानवाच्या वैचारिक जडण घडणी मध्ये बदल होऊन काळाच्या ओघात इतिहासाविषयी विविध मते जाणून घेतली. मानवाच्या वैचारिक बौद्धिक विकास प्रक्रियेचा इतिहासाच्या आकलनावर पडलेला प्रभाव हा आपणाला त्याने केलेल्या इतिहासाच्या व्याख्या मधून समजावून घेता येईल. इतिहासाच्या व्याख्या मधेही व स्वरुपामध्येही काळानुरूप झालेले बदल लक्षात येतील.

- **इंग्रज इतिहासकारांनी केलेल्या इतिहासाच्या व्याख्या :**

१) **फ्रान्सिस बेकन :** मानवाला शहाणी बनवणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास

२) **हेन्री जॉन्सन :** ज्या घटनांचा मानवी मनावर खोल ठसा उमटतो त्याला इतिहास म्हणतात.

३) **प्रो. फिंडले :** अनेक घटनामध्ये सुसंगती लावून त्यांचा परस्पर संबंध पाहतो.

४) **प्रो. एच. डब्ल्यू. गेटलँड :** मानवाने जे कार्य केले किंवा ज्याच्या संबंधाने त्याने विचार व्यक्त केले, त्या पेक्षा त्याने एकंदर परिस्थितीसंबंधी जे विचार व्यक्त केले त्याला इतिहास म्हणतात.

५) **प्रो. मेटलँड :** इतिहास ही एक वैचारिक प्रक्रिया आहे अशा प्रक्रियेमध्ये माणसाला स्वत:च्या मनाचे प्रतिबिंब दिसत असते. विविध घटना मध्ये असणारे संबंध इतिहासकार ज्ञानाच्या आधारे प्रस्थापित करीत असतो.

६) **प्रो. जी. आर. एलटन :** मानवाने जी आपली भावना व्यक्त केली, विचार व्यक्त केला किंवा जे कार्य केले अथवा त्याने जे आघात सहन केले ते सर्व म्हणजे इतिहास होय.

७) **एडमंड बर्क :** इतिहासात सतत घडणाऱ्या बदलांचा संबंध मानवी जीवनाशी असतो. इतिहासाचा संबंध वस्तूशी नसतो. एखाद्या घटनेचा परिणाम हा व्यक्तिसापेक्ष, स्थलसापेक्ष असतो. असा बदल कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसविता येत नाही. ऐतिहासिक व्यक्तीने तत्वानुसार हालचाली केलेल्या नसतात तर प्रत्येक बदल हा गरजेतून निर्माण झालेला असतो. त्यामुळे इतिहास हा तत्त्वाचा मार्गदर्शक नसतो तर दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक असतो.

८) **ॲक्टन :** इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा आहे. साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवणे हा इतिहासातील श्रेष्ठ क्षण नव्हे तर ज्या वेळी मानवी स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो तो क्षण श्रेष्ठ

होय. प्रत्येक मानवाच्या ठिकाणी ही सुप्त शक्ती असते आणि अशा शक्तीचा विकास स्वातंत्र्यातच होत असतो. म्हणून इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा होय.

९) **प्रो. ए. एल. राऊस :** इतिहास म्हणजे विशिष्ट अशा भौगोलिक व प्राकृतिक परिस्थितीमध्ये समाज करून राहणाऱ्या मानवी जीवनाची कथा आहे. त्या मानवी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाची निर्मिती त्याच्या परस्परांतील आंतरप्रक्रियेतून आणि सामाजिक व भौगोलिक परिस्थितीच्या देवाण-घेवाणीतून होत असते.

१०) **प्रो. एडवर्ड कार :** इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे.

● **जर्मन इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) **इमॅन्युल कांट :** निसर्गाने मानवामध्ये काही शक्ती दिल्या आहेत. त्या शक्ती जरूर भासेल त्या प्रमाणे दृगोचर होत असतात. इतिहासाची कारक मानवामधील विवेक शक्ती आहे. म्हणून मानवाच्या विवेक शक्तीला आवाहन करणारा विषय म्हणजे इतिहास होय.

२) **फॉन हार्डर :** निसर्गाच्या उत्क्रांतीमधून इतिहास निर्माण होतो. इतिहासात घटनांची मालिका असते.

३) **फेडरिच हेगेल :** इतिहास म्हणजे मानवी समाज एका विशिष्ट ध्येयाप्रत जात असताना चढत्या क्रमाने प्रगती होते यालाच इतिहास प्रक्रिया म्हणतात.

४) **लिओपोल्ड रँके :** ऐतिहासिक घटना परमेश्वराच्या प्रेरणेने घडत असतात व्यक्ती व राष्ट्रे परमेश्वरी इच्छांचेप्रकटीकरण करीत असतात. जगात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे अदृश्य शक्तीचा हात असतो.

५) **कार्ल मार्क्स :** इतिहास म्हणजे वर्ग कलह होय.

● **फ्रेंच इतिहासकारांनी केलेल्या व्याख्या :**

१) **डी. व्हॉल्टेर :** मृत व्यक्तीवर जिवंत व्यक्तीने केलेली किमया म्हणजे इतिहास. इतिहासामध्ये कल्पना शक्तीला जास्त वाव आहे. मानव कसा आहे हे आपणास शिकविले तो विषय म्हणजे इतिहास होय.

२) **कॉन्डरसेट :** इतिहास म्हणजे मानवाची बौद्धिक व कल्पनात्मक प्रगती नसून जागतिक मताधिकार व शिक्षण, भाषण व विचार स्वातंत्र्य, घटनात्मक ऐक्य व संपत्तीचे समान विभाजन करणारा विषय होय.

३) **ऑगस्त कॉम्त :** ख्रिश्चन धर्माचा त्याग करावा व त्या ठिकाणी विवेक शक्तीचा उदय व्हावा. कोणत्याही एका धर्मापेक्षा जगात सर्वधर्मसमभाव असावा. मानव जातीची प्रगती तीन टप्प्यामधून होते.

● **इतर देशातील इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) **व्हिको :** मानवाची सामाजिक प्रगती म्हणजे इतिहास होय.

२) **क्रोचे :** सर्व इतिहास समकालीन असतो. इतिहासामध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ एका विशिष्ट घटनाक्रमाने जोडलेले असतात अशा साखळीमुळे गतकाळातील घटना समकालीन वाटतात.

३) **डॉ. आर .सी. मुजुमदार :** इतिहास म्हणजे पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र होय.

**क) इतिहासाचे स्वरूप :**

गतकालीन मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास अशी साधी सोपी व्याख्या करता येते. इतिहासाच्या व्याख्येवरून इतिहासाचे स्वरूपही स्पष्ट होते. मानवाच्या प्रगती बरोबरच इतिहासासंबंधी अनेक कल्पना अस्तित्वात आल्या व त्यामध्ये बदलही होत गेले. मानव व राष्ट्र यांचे परस्पर संबंध काळानुरूप सतत बदलत राहतात त्यानुसार इतिहासाच्या स्वरुपामध्ये बदल होत राहतात.

मानवी जीवनाशी संबंधित भूतकाळात घडलेल्या घटना हा इतिहासाचा वर्ण विषय असल्याने इतिहास ही मानव्यशास्त्राची अविभाज्य शाखा आहे. गतकालीन मानवी जीवनाची रूपरेखांचा आलेख म्हणजे इतिहास होय हे इतिहासाचे पहिले वैशिष्ट्य होय.

इतिहासामध्ये मानवाच्या लौकिक बाजूचा विचार केला जातो. पारलौकिकतेला इतिहासात स्थान नाही. स्थळ व काळ हे इतिहासाचे दोन आयाम आहेत या मर्यादेतच इतिहासाचे कार्य चालते. स्थळ व काळानुरूप इतिहासाचे स्वरूप ठरत असते.

मानवी जीवन हे परिवर्तनशील आहे. या मानवी जीवनाच्या परिवर्तनाचे स्थायी व गतिमान स्वरूप उलगडून दाखविणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. निसर्गातील विविध बाबींचा मानवी जीवनावर होणारा परिणामाचा अभ्यास इतिहासकार करतो परंतु त्या बाबीचा स्वतंत्र अभ्यास इतिहासाच्या कक्षेत येत नाही.

इतिहासामध्ये मानवी जीवनातील लक्षवेधी - संस्मरणीय घटनांचा अभ्यास केला जातो. सर्वसामान्य घटनाला इतिहासात स्थान नाही कारण अशा घटनापासून काही शिकवण मिळत नाही. म्हणजे इतिहासकार गतकाळात घडलेल्या घटनामधील महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांचे वर्णन करतो. म्हणून निवड हे इतिहासाचे स्वरूप आहे. परंतु विसाव्या शतकात मानवी जीवनात सर्वसामान्य वाटणाऱ्या घटनांची वर्णने करू लागला आहे, त्यातून सर्व सामान्यांचे जीवन दर्शन घडवू लागल्याचे आढळून येत आहे.

घटनांचा अन्वयार्थ लावणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासाचे स्वरूप केवळ वर्णनात्मक अगर निवेदनात्मक नाही. इतिहासात वर्णन केलेल्या घटनांचे स्पष्टीकरण करणे, त्यावर भाष्य करणे, त्याचे मर्म उलगडून दाखविणे थोडक्यात त्या घटनांचा अन्वयार्थ इतिहासकाराला लावावा लागतो. म्हणूनच ई. एच. कार म्हणतात, घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो. घटनांच्या वास्तव स्वरुपाचे वर्णन हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात वास्तव घटनांचे वर्णन पुराव्याच्या आधारे करावे लागते. ऐकीव काल्पनिक गोष्टींना, मिथकांना इतिहासात स्थान नाही. ज्या साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन करावयाचे त्याची सत्या

सत्यता पडताळून पाहून हाती आलेल्या सत्यच इतिहासात मांडावे लागते. म्हणजे सत्य-शोधन व सत्य कथन हा इतिहासाच्या स्वरुपाचा आत्मा आहे.

वस्तुनिष्ठता हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात गतकालीन घटना वास्तवदर्शी मांडण्यासाठी इतिहासकारांमध्ये वस्तुनिष्ठता असणे महत्त्वाचे आहे. पण अशी वस्तुनिष्ठता प्रत्यक्षात शक्य होत नाही. कारण इतिहास म्हणजे गतकाळ व वर्तमान काळ यात अखंड चालणारा संवाद आहे. म्हणून इतिहास विषयाचा अर्थ लावत असताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे. हा विचार इ.एच.कार यांनी मांडला. इतिहासाचे स्वरूप ठरवित असताना आपल्याला इतिहासा संबंधित पुढील संकल्पना समजावून घेतल्यास इतिहासाचा स्वरुपाची विविधता समजू शकेल.

**१) इतिहासाची पुनरावृत्ती होते :**

इतिहासाची पुनरावृत्ती होते या विचाराचे काही इतिहासकारांनी जोरदार समर्थन केले आहे, तर काही इतिहासकार हे अर्धसत्य मानतात. इतिहासाची पुनरावृत्ती होते याचा साधा अर्थ म्हणजे ऐतिहासिक घटनात साम्य दिसते. मात्र त्या घटना घडण्याचे मार्ग भिन्न असतात. तसेच एखादी घटना जगाच्या पाठीवर घडत असताना मानवी कृतीमध्ये एकवाक्यता असते. कारण कोणत्याही देशातील व्यक्ती ठराविक परिस्थितीमध्ये तशीच वागत असते.

**२) इतिहासामध्ये मूल्यमापन असावे की नसावे ? :**

इतिहास लेखन करताना इतिहासकार घडून गेलेल्या घटनाचे वर्णन करत असतो. पण त्या घटनेचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे की नाही या संदर्भात मतभिन्नता आढळते. लॉर्ड ॲक्टन यांच्या मते, इतिहासामध्ये मूल्यमापन, चर्चा, निर्णय घेणे अनिवार्य असते कारण त्याचा त्या विषयाचा अभ्यास असल्याने तो त्या विषयाचा भाष्यकार असतो. ॲक्टन म्हणातो, इतिहासाची सर्वात मोठी कामगिरी कोणती असेल तर त्याने माणसाची सद्सद्विवेकबुद्धी ही सतेज केली पाहिजे. म्हणजेच प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे जेणे करून लोकांना योग्य मार्गदर्शन होईल. मात्र रँके आणि ब्यूटी या इतिहासकारांना इतिहासामधील मूल्यमापनाचा विचार मान्य नाही. संशोधकाने फक्त घटना मांडव्यात, त्यावर भाष्य करू नये त्यामुळे एखादे वेळी गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. आधुनिक काळात मात्र इतिहासामध्ये मूल्यमापन असावे असा विचार पुढे आला आहे.

**३) सर्व इतिहास समकालीन असतो :**

इटालियन तत्त्ववेत्ता बेनोटो क्रोचे म्हणातो की, सर्व इतिहास समकालीन असतो. भूतकाळ व वर्तमान काळ विशिष्ट क्रमाने जोडलेले असतात अशा या साखळीमुळे गतकाळातील घटनासुद्धा समकालीन वाटतात. क्रोचे पुढे म्हणतो की, इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसते तर गतकाळातील घटना नव्याने सांगितलेल्या असतात. थोडक्यात याचा अर्थ असा की भूतकाळात घडलेल्या घटना या कालौघात घडत असल्या तरी त्याचे कारणे व परिणाम यामध्ये सारखेपणा दिसतो. इतिहासकार हा वर्तमान काळात राहून भविष्यकाळातील घटनाचे

मूल्यमापन साधनांच्या सहाय्याने करत असतो या घटनांचा अन्वयार्थ लावताना समकालीन विचारांचा प्रभाव पडत असतो.

**४) इतिहासात भवितव्य वर्तविण्याची क्षमता :**

इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असला तरी ती वर्तमान काळाची गरज असते. त्यामुळे भूतकाळाचा नवा अर्थ वेळोवेळी लावला जातो. इतिहासकाराला भूतकाळात जाऊन भूत व वर्तमान यांच्यात सुसंवाद साधायचा असतो. हा सुसंवाद साधत असताना त्याला भूतकाळात घडलेल्या घटना का घडल्या कशा घडल्या हे शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या घटनांचे विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागतो. २० व्या शतकात इतिहास हे एक शास्त्र आहे हा विचार सर्वश्रुत झाला आहे. अन्य शास्त्रे जशी नियम तयार करून भविष्य वर्तवितात तसे इतिहासात ही शक्य आहे हा विचार पुढे येत आहे. पण मानवी प्रवृत्ती गुंतागुंतीच्या असतात त्यामुळे त्याच्या मनाचा अंत आपणास लावता येत नाही परिणामी भूतकाळाचा मागोवा घेऊन भवितव्य वर्तविणे अवघड होणार आहे. असाही एक विचार मांडला जातो.

**५) इतिहासाची गती सरळ की चक्राकार ?**

इतिहासाची गती सरळ आहे की चक्राकार आहे हे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. इतिहासाची गती सरळ आहे या संदर्भात असे म्हणतात की, अज्ञात भूतकाळात इतिहासाची गती सुरू होते. ती वर्तमान काळातून भविष्यकाळात जात असते याला प्रगती असे म्हणतात. म्हणजेच असे म्हणता येईल की मानवाची बौद्धिक व भौतिक प्रगतीची दिशा ही चढत्या क्रमाने होत असते. दुसऱ्या चक्राकार विचार प्रवाहा प्रमाणे असे म्हटले जाते की, ज्या ठिकाणाहून गती प्राप्त होते तेथे ती पुन्हा येऊन मिळते. पण मानवी प्रगतीचा आलेख पाहिला तर इतिहासाची गती सरळ रेषेत आहे हे विधान अधिक योग्य वाटते.

**६) इतिहास अनन्यसाधारण आहे :**

गार्डीनर यांनी इतिहास स्वयंपूर्ण शास्त्र आहे असा विचार मांडला. आज इतिहासात शास्त्राचे निकष आणण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणजेच इतिहासात शास्त्रशुद्ध सिद्धांत मांडणे, विषयाच्या दृष्टीने साधने जमा करणे, त्याचे अंतरंग व बहिरंग परिक्षण करून त्या घटनांचा अन्वयार्थ लावणे व नंतर भवितव्यता वर्तविण्याचा प्रयत्न केला जातो हे इतिहासाचे स्वरूप आज निश्चित झाले आहे. आज इतिहासाला शास्त्राचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी इतिहास स्वयंपूर्ण आहे. कारण त्याचा मुख्य आधार मानवी मन व मानवी चेतना आहे. शास्त्रा प्रमाणे इतिहासाला ठोकळबाज चौकट नसते. इतिहासातील विविधतेमुळे तो अनन्य आहे.

**७) इतिहास स्वायत्त आहे :**

इतिहासाचे स्वरूप खूप व्यापक आहे. त्यात विविधता आहे. इतिहासाचे सर्व व्यवहार मनुष्यनिर्मित, मनुष्यप्रेरित, मनुष्यपुरस्कृत असल्याने मानव समाज हाच इतिहासाचा केंद्रबिंदू राहिला आहे. इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असतो इतिहास हा विचारांचा असतो. इतिहास हा संस्कृतीचा असतो. इतिहास हा मानवी जीवनाच्या वाटचालीचा असतो. इतिहास हा भूतकाळ व वर्तमान काळ यांना जोडणारा दुवा आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिस्ट्री या शब्दांचा सर्वप्रथम वापर कोणी केला?

२) इतिहासाचा जनक कोणास म्हटले जाते?

३) इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे ही इतिहासाची व्याख्या कोणी केली?

४) घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो असे कोणी म्हटले आहे?

५) इतिहासाची पुनरावृत्ती होते याचा अर्थ म्हणजे

**ब) रिकाम्या योग्य शब्द लिहा जागी.**

१) इतिहासात मिथकांचा अंतर्भाव नसावा असे ............. यांनी म्हटले आहे.

अ) हिकाटिअस ब) थ्युसिडाईडस क) हिरोडोटस ड) डायोनीयस

२) मध्ययुगीन इतिहास लेखनाचा हेतू ............. हा होता.

अ) विश्वनियत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारे सांगणे ब) मानवाचे कर्तुत्व सांगणे
क) सत्य घटनेचे वर्णन करणे ड) मनोरंजन करणे

३) अठराव्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश ............. क्षेत्रांमध्ये केला जाई.

अ) कला ब) विज्ञान क) पुराण ड) साहित्य

४) इतिहासाचा अर्थ लावताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे असा विचार ............. यांनी मांडला.

अ) फ्रान्सिस बेकन ब) हेगेल क) प्रो. ई.एच.कार ड) कार्ल मार्क्स

५) इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे असे ............. यांनी म्हटले आहे.

अ) प्रो. ई.एच. कार ब) हेगेल क) हिरोडोटस् ड) यापैकी नाही.

**१.२.२ इतिहासाचे प्रकार :**

इतिहास या विषयात मानवाच्या जीवनासंबंधित सर्व बाबींचा विचार केला जातो. त्यामुळे मानवाच्या प्रत्येक पैलू विषयीचा अभ्यास करण्यासाठी गरजेनुसार इतिहासाचे प्रकार पाडले जातात. पूर्वी राज्यशास्त्र व इतिहासाच्या प्रकाराविषयी प्रो. रेनियर म्हणतात, इतिहासाच्या वर्ण विषयात विभाजन अतिशय आवश्यक आहे. कारण त्यामुळे मानवी जीवनाचे नवे पैलू डोळ्यासमोर येऊ शकतात. ज्या वेळी एखाद्या विषयाचे सर्वसाधारण

ज्ञान मिळविले जाते, तेव्हा त्या ठिकाणी तंतोतंतपणा किंवा टिकात्मक प्रवृत्ती यांचा अभाव असतो. जर विभाजन केले तर एखाद्या बाबीवर विशेष भर दिला जातो. असे विभाजन अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. म्हणजेच इतिहास तज्ज्ञ आपल्या सोईनुसार व गरजेनुसार इतिहासाचे विभाजन करत असतात. मात्र बॉअन या इतिहासकाराने मानवी जीवनाची वस्तुनिष्ठता लक्षात घेऊन इतिहासाचे दोन प्रकार सांगितले आहेत; वर्णनात्मक व तत्वाधिष्ठित. काही इतिहासकारांनी इतिहासाचे विभाजन काळाला महत्त्व देऊन प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक असे केले आहे. तर काहींनी इतिहासाचे विभाजन आशिया, अफ्रिका, अमेरिका, युरोप खंड असे केले आहे. पण एवढ्या मोठ्या कालखंडाला ठराविक काळामध्ये विभाजन करणे व त्याचा इतिहास मांडणे अवघड आहे. थोडक्यात, इतिहासाचे प्रकार हे अभ्यासकाच्या गरजेनुसार व सोयीनुसार केले जातात. वेगवेगळ्या कसोट्यांवर केले जातात. मात्र ते काटेकोर नसतात. इतिहासाचे प्रकार खालील प्रमाणे :

**१) राजकीय इतिहास (Political History) :**

राजकीय इतिहास हा इतिहासाचा अतिशय लोकप्रिय प्रकार आहे. प्राचीन काळापासून राजकीय घडामोडी, राजकीय संस्था व युद्ध हा इतिहासाचा केंद्रबिंदू राहिला आहे. पण अलीकडच्या काळात सामान्य माणूस हा केंद्रबिंदू बनत आहे. या इतिहास प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्रनिर्माण करण्याची ताकद असते. अशा प्रकारच्या इतिहासातून देशाचे भवितव्य घडविले जाते. तरूणांना देश उभारणीच्या कार्यामध्ये सामावून घेऊन त्यांच्या जीवनाला दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. हा इतिहास लिहिण्यासाठी राजकीय दस्तऐवज उपलब्ध असतात. हा इतिहास अधिकृत कागदपत्रावर लिहिलेला असल्यामुळे त्याला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राजकीय इतिहासा संदर्भात प्रो. बॉर्नस म्हणतात, राजकीय इतिहास दोन कारणांसाठी महत्त्वाचा आहे, ती म्हणजे हेगेलच्या राज्य विषयी सिद्धांतांमुळे राष्ट्रवाद निर्माण होतो. हेगेलने राज्य म्हणजे दैवी देणगी आहे, असे विचार मांडले. त्यामुळे राजकीय इतिहासाचे महत्त्व फार वाढले. या इतिहास प्रकाराची उणीव म्हणजे संकुचित व प्रादेशिक वृत्ती निर्माण होण्याचा शक्यता असते.

**२) घटनात्मक इतिहास :**

घटनात्मक इतिहास हा राजकीय इतिहासाचा भाग आहे. राजकीय इतिहासापासून घटनात्मक इतिहास हा सोईसाठी निर्माण केला आहे. या इतिहास प्रकारात वेगवेगळ्या राजकीय संस्थांचा उगम, विकासाचा अभ्यास केला जातो. यात त्या देशाच्या घटनेचा अभ्यास, त्या देशाचे नागरिकत्त्व कसे मिळते, जनतेची मुलभूत हक्क व कर्तव्य कोणती, मालमत्तेचा हक्क, प्रांत व केंद्र सरकारच्या निर्मितीची रचना, संसदेची रचना, कार्यपद्धती, न्यायदान पद्धती, सार्वत्रिक निवडणूका आदि बाबींविषयी कायदेशीर माहिती मिळते. इंग्लंडच्या संसदेचा इतिहास हा जगातील कुठल्याही देशाला जर त्यांच्या देशात संसदीय शासनपद्धती सुरू करावयाची असल्यास मार्गदर्शक ठरतो.

**३) संसदीय पद्धतीचा इतिहास :**

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात संसदीय पद्धतीच्या राज्यव्यवस्थेचा विचार

केला जातो. संसदेला वेगवेगळ्या देशात वेगवेगळी नावे आहेत. इंग्लंड मध्ये कनिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ कॉमन्स' व वरिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ लॉर्ड' असे म्हणतात. भारतात वरिष्ठ सभागृहाला 'राजसभा' व कनिष्ठ सभागृहाला 'लोकसभा' म्हणतात. याला द्विगृहीय संसदीय पद्धती असे म्हणतात. जगातील कोणत्याही देशात संसदीय पद्धती सुरू करावयाची असेल तर त्याला इंग्लंडच्या संसदेचा इतिहास मार्गदर्शक ठरतो.

**४) कायद्याचा इतिहास :**

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात कायद्याचे मूळ शोधून त्याचा विकास कसा झाला याची माहिती असते. कायदे राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक स्वरुपाचे असतात. प्रत्येक समाजाला व राष्ट्राला अशा कायद्याचा वारसा असतो. कायद्याच्या अभ्यासातून त्या देशातील लोकांची मन:स्थिती काय होती हे समजू शकते. त्या देशाची सामाजिक, आर्थिक स्थितीही स्पष्ट होऊ शकते. या प्रकारच्या इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान तसेच कायद्याचा अर्थ लावण्याची क्षमता असावे लागते. त्याचे भाषेवर प्रभुत्व असावे लागते. कायद्याच्या इतिहासाची आज अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत.

**५) राजनैतिक इतिहास :**

राजनैतिक इतिहास ही राजकीय इतिहासाची शाखा आहे. यात आंतरराष्ट्रीय संबंधामधील राजकीय तत्त्वे शोधली जातात. राजकीय पुढाऱ्यांची मुत्सद्देगिरी यातून लक्षात येते. दोन देशामधील राजकीय संबंध प्रस्थापित करीत असताना किंवा आहे ते संबंध टिकवत असताना त्या देशाच्या नेत्यांसमोर आलेल्या अडचणी व त्यांनी त्यावर मुत्सदेगिरीने केलेली मात याची माहिती मिळते. या प्रकारच्या इतिहास लेखनातून सत्ता संतूलन, शीतयुद्ध, आंतरराष्ट्रीय करार, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादींवर प्रकाश टाकला जातो.

**६) लष्करी इतिहास :**

या प्रकारच्या इतिहासात लष्करी हालचाली, लष्करी डावपेच, भूप्रदेशाची वैशिष्ट्ये, युद्ध भूमी, युद्ध तंत्र, युद्धात वापरली जाणारी शस्त्रे, सैन्य व्यवस्था, सेनापतीची भूमिका त्याची कामगिरी याचा अभ्यास केला जातो. लष्करातील हेर खाते अत्यंत महत्त्वपूर्ण असते. हे खाते वेगवेगळ्या मार्गांनी शत्रू पक्षाची माहिती जमा करत असते या माहितीच्या आधारावरच लष्करी हालचाली होत असतात. या प्रकारच्या इतिहासामुळे युद्ध तंत्राचा विकासाचा इतिहास समजतो.

**७) वसाहतीचा इतिहास :**

वसाहतीचा इतिहास हा राजकीय इतिहासाचाच भाग आहे. सागरी मार्गाचा शोध व औद्योगिक क्रांती यामुळे युरोपियन राष्ट्रात वसाहती मिळवण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यातून वसाहतवादाला चालना मिळाली. राजकारण, धर्मप्रसार, अतिरिक्त लोकसंख्या, कच्च्या मालाचा पुरवठा, पक्क्यामालाची हमखास बाजारपेठ इ. बाबीच्या पूर्ततेसाठी वसाहती मिळवल्या जाऊ लागल्या. व्यापार, प्रशासकीय व राजकीय गरजेसाठी वसाहतवादी राष्ट्रांनी वसाहतीचे इतिहास लिहिले. वसाहतीची संस्कृती चालीरीती, लोकांची मानसिकता, धर्म,

वसाहतीची आर्थिक स्थिती, यांचा अभ्यास करून वसाहतीचे इतिहास लिहिले. अशा प्रकारच्या इतिहासातून अनेक प्रश्न ही निर्माण झाले आहेत ते सोडवण्याचा प्रयत्न ही केला गेला. या इतिहासातून इतर लोकांना प्रेरणा मिळाली त्यातून अनेक धाडशी प्रयोग केले गेले. अनेक दर्यावर्दींना नवीन भूप्रदेश शोधण्याची प्रेरणा मिळाली.

**८) वैचारिक इतिहास :**

वैचारिक इतिहास हा समाजाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा इतिहासाचा विषय आहे. हा इतिहास तत्त्वज्ञान या विषयाला अतिशय जवळचा आहे. या इतिहासाच्या महत्वा संबंधात सॅम्युअल जॉन्सन म्हणतात, बौद्धिक इतिहासाशिवाय मानवी मनाची झालेली प्रगती, त्याच्या विचारसरणीमधील सुधारणा, मानवाची विद्वत्ता, शास्त्रांची प्रगती समजणे शक्य नसते. थोडक्यात, प्रत्येक काळात एखादी विचारसरणी किंवा एखादा विचार पुढे येत असतो त्यामुळे संपूर्ण समाजाच्या धारणा बदलत असतात. त्यामुळे समाज जीवन सुसह्य होत असते. इतिहास प्रक्रियेबाबत जे विचार मांडले जातात त्यातून इतिहासाचे तत्त्वज्ञान तयार होते.

**९) धार्मिक इतिहास :**

ज्या युगात जी धर्म भावना प्रबळ असते त्याचाच विचार धार्मिक इतिहासात केला जातो. धार्मिक इतिहास म्हणजे धर्माचा इतिहास नव्हे असे प्रो. जी. रेनियर म्हणतात. हा इतिहास प्रकार हा सामाजिक इतिहासापेक्षा राज्यशास्त्राच्या जवळचा आहे. उदा. रोमच्या धर्म संस्थेचा इतिहास हा राजनैतिक किंवा लष्करी इतिहासापासून वेगळा करता येणार नाही, मात्र आपल्या देशाच्या दृष्टीने विचार केल्यास धर्मशास्त्राचा इतिहास हा समाजशास्त्रास जास्त जवळ वाटतो. पां. वा. काणे यांच्या 'धर्मशास्त्राचा इतिहास' हा ग्रंथ भारताच्या समाजजीवनाशी निगडीत असल्याचे दिसून आले आहे. मात्र १९४५ नंतर जगामध्ये विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला. निधर्मी तत्त्वज्ञानाचा प्रसार झाला तरी अधून मधून धर्म ही संकल्पना डोके वर काढत असते.

**१०) सामाजिक इतिहास :**

या इतिहास प्रकाराची व्याप्ती फार मोठी आहे. मानवाची प्रगती रानटी अवस्थेपासून आज पर्यंत कशी होत गेली याचे चित्रण सामाजिक इतिहासात केले जाते. या इतिहासात मानवाचे विचार त्याचे कार्य, त्याचे दैनंदिन जीवन, त्यांच्या श्रद्धा, अन्न, वस्त्र, पोशाख, करमणूकीची साधने, खाजगी जीवन, उत्सव, विविध सामाजिक संस्था, यांचा संबंध असतो. तसेच समाज प्रबोधनाचा अभ्यासही या इतिहास प्रकारात केला जाते. थोडक्यात या इतिहास प्रकारात समाजाचे यथार्थ चित्रण येते.

**११) सांस्कृतिक इतिहास :**

ज्या विचारांमुळे व संस्थांमुळे मानवाच्या चारित्र्याला व श्रद्धेला वळण लागते त्याला सांस्कृतिक इतिहास म्हणतात. हा मानवी मनाचा व स्वभावाचा इतिहास होय. ज्या काळात जो विचार प्रभावशाली असतो त्या विचाराभोवती संस्कृतीची गुंफण होत असते. त्यामुळे या इतिहासात तत्कालीन समाज जीवन, आर्थिक जीवन, कला, साहित्य, तत्त्वज्ञान, अन्न, वेषभूषा, केशभूषा, करमणूक, न्याय, कायदा, मानवी चारित्र्य, त्यांच्या श्रद्धा,

स्थापत्य व जीवन जगण्याच्या पद्धती यांचा अंतर्भाव होतो. मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेख यात मांडला जातो. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक साधनांची निर्मिती केली त्याचा एकत्रित प्रभाव म्हणजे संस्कृती होय. सांस्कृतिक इतिहासात घटनेपेक्षा विचार, संकल्पना यावर भर दिला जातो.

**१२) आर्थिक इतिहास :**

इतिहासाच्या या प्रकारास आज जागतिकीकरणामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या इतिहास प्रकारात प्रथम कोणत्या-कोणत्या कालखंडाचा विचार करावयाचा हे प्रथम ठरवावे लागते. त्या नंतर शेती, व्यापार, उत्पादनाची साधने, तंत्रज्ञान, वितरण व्यवस्था, आयात-निर्यात, सागरी व्यापार, वस्तू निर्मितीची ठिकाणे इत्यादींचा सखोल अभ्यास केला जातो. या इतिहास प्रकारातून तत्कालीन समाजाचे आर्थिक जीवनाचे चित्र उभे करता येते. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांचा खरा इतिहास आर्थिक प्रगतीतून होतो.

**१३) भौगोलिक इतिहास :**

नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवन पद्धती यांचा जवळचा संबंध असतो. माणसाच्या शरीराची ठेवण, त्याच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्याच्या सामर्थ्याच्या मर्यादा, स्वभाव वैशिष्ट्ये भूगोलावर अवलंबून असतात. भुमी व हवामान यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो. काल व प्रदेश यांच्या संदर्भातील मानवाच्या गरजा पुर्ण करण्याचे कार्य इतिहास व भूगोल करीत असतात. भूगोलाचा इतिहासावर मोठा प्रभाव पडत असतो. इतिहासावर परिणाम करणारे भौगोलिक घटक म्हणजे समुद्र, बंदरे, व्यापार, आक्रमणांचे मार्ग, व्यापारी ठिकाणे, युद्धभूमी इत्यादींच्या विचार इतिहासात करावा लागतो. स्थल व काल याच्या संबंधानेच इतिहास लेखन करावे लागते. भौगोलिक वर्णनाशिवाय इतिहास म्हणजे निव्वळ कथाकथन ठरते. म्हणजेच स्थळ म्हणजे भूगोल व काल म्हणजे इतिहास असे सोपे समीकरण आपणाला जोडता येते.

**१४) समकालीन इतिहास :**

हा इतिहास प्रकार प्रचलित राजकारणाशी निगडीत आहे. या प्रकारच्या इतिहासाचे लेखनही कागदपत्राच्या आधारेच करावे लागते मात्र हे लेखन करताना प्रचलित साधने चिकित्सा करूनच वापरावी लागतात. या साधनामध्ये मुलाखती, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट, संसदीय कागदपत्रे, समकालिन ग्रंथ, नियतकालिके, सर्वेक्षण, सार्वजनिक कागदपत्रे, नव्याने सापडलेली कागदपत्रे व नवा विचार याचा विचार करावा लागतो. कारण ही साधने वादग्रस्त असू शकतात. तेव्हा समकालीन कागदपत्राचा बारकाईने विचार करून त्यामधून विश्वसनीय विचार मांडणे ही इतिहासकारांवर फार मोठी जबाबदारी असते.

**१५) जगाचा इतिहास :**

या इतिहास प्रकारात जगाचा इतिहास मांडला जातो. पण जगाचा इतिहासाचा आवाका फार मोठा होतो. तेव्हा जगावर परिणाम करणाऱ्या निवडक घटनांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न या इतिहास प्रकारात केला जातो. आज अनेक कारणांनी जग जवळ येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे कोणत्याही एका देशाचा, प्रदेशाचा किंवा खंडाचा एकाकी विचार करणे अशक्य होत आहे. कारण या देशांचे हितसंबंध एकमेकांशी जोडलेले

असतात एखाद्या देशामध्ये एखादी घटना घडली तर तिचा परिणाम संबंधित विविध देशावर होत असतो. जगाच्या इतिहासात मानववंशाच्या विचारांचे व भावनांचे प्रतिबिंब असेल.

**१६) स्थानिक इतिहास :**

स्थानिक इतिहासात प्रामुख्याने गाव, शहर, किंवा संस्थानांचा विचार केला जातो. संबंधित स्थानाविषयी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादीची सूक्ष्म सखोल माहिती या इतिहास प्रकारातून मिळते. स्थानिक माहिती मिळवण्यासाठी या प्रकारचा इतिहास फार उपयोग होतो.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की इतिहासाचे प्रकार कोणत्याही ताठर तत्त्वरचनेवर केले नाहीत त्यामागे अभ्यासकाची गरज व सोय हे तत्व आहे हे लक्षात येते.

- **स्वंय अध्ययन प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बॉअन यांनी इतिहासाचे विभाजन कोणत्या दोन प्रकारात केले आहे ?

२) कोणत्या इतिहास प्रकारात समकालीन कागदपत्राचा बारकाईने अभ्यास करावा लागतो ?

३) राजकीय घडामोडीचा व संस्थांचा अभ्यास कोणत्या इतिहास प्रकारात केला जातो ?

४) कोणत्या इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण लागते?

५) कोणत्याही देशात संसदीय शासनपद्धती सुरू करावयाची असल्यास कोणत्या देशाचा घटनात्मक इतिहास मार्गदर्शक ठरू शकतो?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) इतिहासाचे अभ्यासक हे इतिहासाचे प्रकार त्यांच्या ............... नुसार करतात.

अ) गरज व सोय ब) महत्त्वानुसार क) वरिष्ठांच्या आदेशानुसार ड) आवडीनुसार

२) इतिहासाच्या .......... प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्र निर्माण करण्याची ताकद आहे.

अ) राजकीय ब) सामाजिक क) आर्थिक ड) स्थानिक

३) .................. इतिहास लिहित असताना इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे.

अ) राजकीय ब) सामाजिक क) आर्थिक ड) कायद्याचा

४) ................. इतिहास प्रकार तत्त्वज्ञानाला जवळच आहे.

अ) राजकीय ब) वैचारिक क) भौगोलिक ड) सामाजिक

५) समाजाचे यथार्थ चित्रण इतिहास............. प्रकारात केले जाते.

अ) राजकीय ब) कायद्याचा क) सामाजिक ड) सांस्कृतिक

६) ........ इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण मिळते.

अ) सामाजिक ब) राजकीय क) सांस्कृतिक ड) भौगोलिक

७) मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचे रेखाटन ............... इतिहास प्रकारात केले जाते.

अ) सांस्कृतिक ब) स्थानिक क) राजकीय ड) भौगोलिक

८) स्थानिक माहिती मिळवण्यासाठी ................. इतिहास प्रकार उपयोगी आहे.

अ) स्थानिक इतिहास ब) भौगोलिक

क) सांस्कृतिक इतिहास ड) आर्थिक इतिहास

### १.२.३ आंतरशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Approach) :

सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासात अनेक शास्त्रांचा व त्यांच्या उपशास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. उदा. इतिहासशास्त्राचा अभ्यास करताना त्यास समाजशास्त्र, अर्थशास्त्र, पुराणवस्तूशास्त्र, राज्यशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान व कायदा इत्यादींचा अभ्यास करावा लागतो. फ्रीमन "The Method of Historical Study' 'द मेथड ऑफ हिस्टॉरिकल स्टडी' या ग्रंथात म्हणतो, इतिहासकाराला तत्त्वज्ञान, कायदा, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, भूगोल, नैसर्गिकशास्त्र माहीत असणे आवश्यक आहे. या शास्त्राच्या मदतीशिवाय बिनचूक व अर्थपूर्ण इतिहास लिहिणे दुरापास्त होते. जगभरातील मानवी संस्कृतीमध्ये मुर्ती, शिल्प आणि स्थापत्य निर्माण झाले आहे. हे तीनही शास्त्रे इतिहासाची भौतिक साधने आहेत. इतिहास लेखनामध्ये या शास्त्रांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आज पुराव्याचा अन्वयार्थ लावून इतिहास लेखन करण्यासाठी प्रत्येकाची स्वतंत्र अभ्यास शाखा निर्माण झालेली आहे. मुर्तीशास्त्र, स्थापत्य, शिल्पशास्त्राचा अभ्यास विविध शाखेद्वारे शास्त्रशुद्ध अभ्यास होऊ लागले आहे. मुर्तीशास्त्राच्या अभ्यासामुळे तत्कालीन वेशभुषा, केशभुषा, अलंकार, सौंदर्य कल्पना व धर्म इत्यादी गोष्टींची माहिती मिळते. मुर्तीशास्त्र मधून आपणास समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक स्थितीची कल्पना येते. समाजामधील स्थित्यांतराची प्रगती लक्षात येते. प्राचीन भारतीय शिल्प, स्थापत्य व मुर्ती अवशेषांचा शोध घेऊन मुर्तीशास्त्र, शिल्पशास्त्र व स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासाला गती देण्याचे कार्य पाश्चिमात्य अभ्यासक फर्ग्युसन, बर्जेस, एल्फिन्स्टन, कझिन्स यांनी केले. या अभ्यासकांनी या अवशेषांना इतिहासाचे साधन म्हणून त्यांचा अभ्यास करण्याची एक परंपरा निर्माण केली.

अशा अनेक शास्त्राच्या मदतीशिवाय इतिहासाचे लेखन करणे अशक्य आहे. इतिहासाचे शास्त्रीय पद्धतीने लेखन करताना अनेक शास्त्राचा उपयोग करून घ्यावा लागतो. इतिहास लेखन प्रक्रियेत अनेक सामाजिक शास्त्राचे सहाय्य घ्यावे लागते त्याला इतिहासाची सहाय्यकारी शास्त्रे असे म्हणतात. या संबंधाने प्रो. मॅबले म्हणतात, असे काही सहाय्यकारी विषय आहेत की, जे इतिहासकाराला इतिहासलेखन करताना टाळता येणे

शक्य नाही. थोडक्यात, मानवाने आपले जीवन सुसह्य करण्यासाठी ज्या ज्या कृती केल्या त्यांचा अभ्यास स्वतंत्र शाखेत केला. त्यातून समाजशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सारख्या शाखा विकसित होत गेल्या आज त्यात आणखिन भर पडत आहे. या वेगवेगळ्या शास्त्राच्या मदतीशिवाय बिनचूक व अर्थपूर्ण इतिहास लिहिणे दुरापास्त होते. म्हणून आपणाला इतिहास लिखाणासाठी आवश्यक अशा विविध सहाय्यकारी शास्त्राची माहिती असणे गरजेचे आहे.

**१) कालगणनाशास्त्र (Chronology) :**

इतिहासकाराला भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची कालानुक्रमे क्रमवारी व सुसंगती लावावी लागते. तरच त्या घटनांचा अर्थबोध होतो. तसेच घटनाचा परस्पर संबंध व त्यातील कार्यकारणभाव स्पष्ट होतो. कालानुक्रम नसेल तर घटनांचा अर्थबोध होणार नाही म्हणून इतिहास लेखनात कालानुक्रमाला महत्त्वाचे स्थान आहे. इतिहास संशोधक निळकंठशास्त्री कालगणना शास्त्राचे महत्त्व कथन करताना म्हणतात, कालगणना शास्त्र हे इतिहासाचा डोळा आहे. याशास्त्राच्या सहाय्याशिवाय भूतकाळातील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार करणे शक्य होणार नाही. भूतकाळात घडलेल्या घटनांना कालानुक्रम नसेल तर त्या घटनांना काहीच अर्थ राहणार नाही. इतिहासाची मांडणी करत असताना साधनाची कालनिश्चिती नसेल तर अशा साधनांची वस्तुनिष्ठता व मूल्य कमी होते. परिणामी इतिहासकारांत मतभेद निर्माण होतात. अशा प्रकारे कालगणनाशास्त्राच्या मदतीशिवाय घडलेल्या घटनेचा परस्पर संबंध त्यातील कार्यकारणभाव व त्या घटनाचा अर्थबोध स्पष्ट करता येत नाही. काळाच्या चौकटीच इतिहासाची मांडणी करावी लागते व अशी मांडणी करण्यासाठी कालगणनाशास्त्र इतिहासाला मदत करते.

**२) हस्ताक्षरशास्त्र (Palaeography) :**

हस्ताक्षराचा अभ्यास करणाऱ्या या शास्त्रात विविध भाषेतील विविध लिप्यांमध्ये व त्यातील हस्ताक्षरा मध्ये कसा बदल होत गेला, अक्षरे कसकशी विकसित होत गेली यांचा अभ्यास केला जातो. हस्ताक्षर तज्ञ हे जुने कागदपत्र व शिलालेख यांचा अभ्यास करून त्यांचे वाचन करतात. त्यावरून त्या शिलालेखाचा व कागदपत्राचा काळ निश्चित करता येतो. उदा. मराठी भाषेतील देवनागरी लिपी त्यातील अक्षरे त्यांचे वळण व शब्द यांचा काळाच्या ओघात झालेला बदल हस्ताक्षर तज्ञ अभ्यासतात. तो दस्तऐवज, शिलालेख, ताम्रपट, सालपत्र, चर्मपत्र किंवा कागद कोणत्या काळात तयार झाला ते ठरवतात व त्याचा अर्थ किंवा त्यातील मजकूर व आज्ञा याचे स्पष्टीकरण देतात. त्याचा सुयोग्य अर्थ लावतात.

**३) आलेखशास्त्र (Graphology) :**

या शास्त्रानुसार हस्ताक्षरावरून दस्तऐवज लिहिलेल्या व्यक्तीचा स्वभाव ओळखला जाऊ शकतो त्या व्यक्तीचे हस्ताक्षर लिहिण्याचे वळण भाषा शैली यावरून ढोबळ मानाने निष्कर्ष काढले जातात. अक्षराच्या वळणावरून ती व्यक्ती अस्थिर व गोंधळलेली होती किंवा स्थिर व शांत होती हेही समजण्यास मदत होते. तसेच ऐतिहासिक कागदपत्रांवरील सह्यांचा अभ्यास करून त्या व्यक्तीचा स्वभाव व त्याचा हेतू यासाठी अंदाज

बांधला जाऊ शकतो. अशा प्रकारे या शास्त्राचा इतिहास संशोधनात साहाय्य होऊ शकते.

**४) मुद्राशास्त्र (Sigillography) :**

Sigillography हा शब्द Sigil म्हणजेच Seal या शब्दापासून आला आहे. सील शब्दाचा अर्थ शिक्का किंवा मुद्रा असा आहे. प्राचीन काळापासून आज अखेरपर्यंत राज्यकर्ते, राजे त्यांचे प्रधान, त्यांच्या प्रशासनातील विविध अधिकारी यांच्या प्रत्येकाच्या स्वतंत्र मुद्रा व शिक्के होते. वरील सर्व लोक हे आपल्या सरकारी व खाजगी पत्रव्यवहार, आज्ञा, सरकारी कागद पत्र यावर आपली मुद्रा उमटवत असत. या मुद्रांना राजमुद्रा असेही म्हटले जाते. या मुद्रांवरून संबंधित कागदपत्रांची सत्यता स्पष्ट होते. संबंधित मुद्रावरून त्या राजाचा त्याच्या राज्या संबंधीचा दृष्टिकोन, त्याची दूरदृष्टी, त्याच्या राज्याची उद्दिष्टे स्पष्ट होतात. तसेच त्याचा सांस्कृतिक व वैचारिक दृष्टिकोन ही स्पष्ट होतो. या मुद्रांचा अभ्यास इतिहास संशोधकास साहाय्य करतो. छत्रपती शिवाजी महाराजाची राजमुद्रा अशी होती.

'प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णु विश्ववंदिता ।
शहासुनोःशिवस्यैषा मुद्रा भ्रदायराजते ।।'

**५) भाषाशास्त्र (Philology) :**

भाषाशास्त्रात अनेक भाषांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. भाषांच्या निर्मितीचा इतिहास अभ्यासला जातो. ऐतिहासिक घटनांची माहिती त्या काळाच्या अनेक समकालीन भाषांमध्ये लिहिली जाते. म्हणून इतिहास संशोधकास अनेक भाषांचे ज्ञान असणे आवश्यक असते. इतिहास लेखकाची भाषा समृद्ध पाहिजे. त्याला भाषेतील शब्दांच्या अर्थ छटा, शब्दांचे संदर्भ, केलेला भाषा प्रयोग, त्यात वापरलेल्या म्हणी व वाक्प्रचार याचे सूक्ष्म ज्ञान आवश्यक असते. अनेक भाषांतील अनेक कागदपत्राचा तौलनिक अभ्यास इतिहासकाराला करावा लागतो. त्याला भाषा स्तोत्राचे ही ज्ञान असावे लागते. दोन भाषांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. मराठी भाषेतील अण्णा, अप्पा, अक्का हे शब्द कानडीतून आलेली आहेत. इंग्रजी व संस्कृत भाषेतील मदर, मातृ, फादर, पितृ, ब्रदर, भातृ किंवा बंधू या शब्दाचे उच्चार व अर्थ समान दिसतात. यावरून या दोन भिन्न भाषा बोलणाऱ्या लोक समूहात एकमेकांवर प्रभाव पडलेला दिसतो किंवा मूळ एकच लोकसमूहातून दोन लोक समूहाची निर्मिती झाली याचे तर्कसंगत उत्तर शोधावे लागते. अशा प्रकारे भाषाशास्त्राची मदत इतिहास लेखनाला होते.

**८) नाणकशास्त्र (Numismatic) :**

मानवी समाजात वस्तू विनिमयाची पद्धत बंद होऊन आर्थिक व्यवहारात चलनाचा उपयोग सुरू झाला. नाणे हे इतिहासाचे अत्यंत वस्तुनिष्ठ विश्वसनीय व समकालीन साधन आहे. या नाण्यांचा अभ्यास केल्यास आपणास त्या काळाची माहिती मिळते. प्राचीन व मध्ययुगीन काळातील अनेक राज्यकर्त्यांची नाणी आपणास विविध ठिकाणी सापडतात. या नावावरून राजा त्याचे घराणे, त्याचा कालखंड, कोणत्या प्रदेशात राज्य केले तो भूप्रदेश इत्यादी माहिती मिळते. तसेच राजाचा राज्याभिषेक, त्याचा मृत्यू त्याने केलेला अश्वमेध यज्ञ इत्यादी

गोष्टीची माहितीही समजते. नाण्याचा धातू, त्याचा आकार व सुबकता यावरून त्या राज्याची आर्थिक स्थिती व भौगोलिक प्रगती कळते. नाण्यावरील विविध चित्रे व शिक्के यावरून त्या काळाच्या सामाजिक, धार्मिक परिस्थितीचे ज्ञान मिळते अशा प्रकारे इतिहास लेखनासाठी नाणी उपयुक्त ठरतात. भारतात रोमन व ग्रीक लोकांची नाणी मिळाली यावरून प्राचीन काळात त्या देशाशी आपला व्यापार सुरू होता हे स्पष्ट होते. तर महाराष्ट्रात प्रतिष्ठान (पैठण), भोगवर्धन (भोकरदन, औरंगाबाद) तगरपुर (तेर, उस्मानाबाद) या शहरात प्राचीन व मध्ययुगीन व्यापाराची भरभराट झाली होती. तेथील उत्खननात सापडलेल्या नाण्यांवरून हे स्पष्ट झाले आहे.

**७) पुरातत्त्वशास्त्र (Archeology) :**

पुरातत्त्वशास्त्र म्हणजे पुराणवस्तू संशोधनशास्त्र होय. या शास्त्राच्या संबंधात डॉ. ढवळीकर म्हणतात, पुरातत्त्वशास्त्र हा स्वतंत्र विषय नसून इतिहासाचा एक भाग आहे. या शास्त्राचा प्रमुख उद्देश प्राचीन मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हा आहे. इतिहासाच्या अलिखित संदर्भ साधनातील सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे पुरातत्त्वविद्या होय. पुरातत्त्वशास्त्र हे व्यापक शास्त्र आहे. या शास्त्रात प्राचीन संस्कृतीच्या प्रदेशाचा शोध घेणे, तेथे उत्खनन करून पुराण वस्तूंचे अवशेष गोळा करणे, शास्त्रीय पद्धतीने त्याच्यावर प्रक्रिया करून त्यांचा काळ ठरवणे या कार्य क्षेत्रात पुरातत्त्वशास्त्राचे काम चालते. भारतात ब्रिटिश काळात लॉर्ड कर्झनच्या कालखंडात पुरातत्त्व खात्याची निर्मिती झाली. प्राचीन कालखंडातील संस्कृतीच्या अवशेषांचा अभ्यास करून इतिहास लेखन या शास्त्राच्या आधारे केले जाते. निसर्गाच्या घडामोडीतून शिल्लक राहिलेली दगड-मातीचे शिल्पे, लाकडी इमारती, मंदिरे, जमिनीखाली गाडली गेलेली गावे यांचा अभ्यास पुरातत्त्वांमध्ये केला जातो. उत्खननातून सापडलेल्या अवशेषांचा कालखंड निश्चित करण्यासाठी कार्बन-१४ व पोटॅश ऑरगन या पद्धतीचा वापर केला जातो. सर हेन्री लायर्ड हे या शास्त्राचे प्रणेते समजले जातात. सर मार्टिन व्हीलर यांनी या शास्त्राला शास्त्रीय तंत्राचा वापर करणारी कला असे म्हटले आहे. लिपी व लिखाण अस्तित्वात येण्यापूर्वी जो इतिहास घडून गेला त्याचे लेखन करण्यासाठी आपणास पुरातत्त्वीय साधनावर अवलंबून राहावे लागते. उत्खननात सापडलेले मानवी व इतर प्राण्यांच्या हाडांचे अवशेष, मानवाने बनवलेली हत्यारे, भांडी, घरे, त्यांचे स्थापत्य, शिल्प, शिक्के, नाणी, खेळणी, पुतळे, शेतीची अवजारे, शिलालेख, प्रस्तर लेख, ताम्रपट इत्यादी साधनावरून तर्कसंगत व वस्तुनिष्ठ इतिहास लेखन केले जाते. थोडक्यात इतिहासाच्या अलिखित संदर्भ साधनातील सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे पुरातत्त्वविद्या होय. उदा. सिंधू संस्कृतीची ओळख पुरातत्त्वशास्त्र यामुळेच आपणास झाली.

**८) शिलालेखशास्त्र (Epigraph) :**

शिलालेखशास्त्र म्हणजे ऐतिहासिक घटनेचा समकालीन वस्तुनिष्ठ पुरावा होय. या शास्त्राच्या आधारे अनेक शिलालेख, स्तंभालेख, प्रस्तर लेख, ताम्रपट यावरील प्राचीन व मध्ययुगीन काळात लिहिलेले मजकूर वाचून इतिहासाचे संशोधन केले जाते. शिलालेखाचे वाचन करून योग्य अर्थ लावणे हे काम अवघड असते. कारण भाषांच्या लिपीत होत असलेले बदल, पुसट झालेली त्यांची अक्षरे, त्यांची भाषा, भाषेची संक्षिप्त रूपे,

शिलालेखाचा काही भाग फुटणे इत्यादी अडचणीमुळे शिलालेखांचे वाचन अवघड बनते. ब्रिटिश काळात जेम्स प्रिन्सेप यांनी प्राचीन ब्राह्मी लिपीच्या लेखाचे वाचन केले. भारतातील सर्वात जास्त अभिलेखाचा संग्रह म्हैसूर येथे आहे. शिलालेख विशेषतः प्राचीन मंदिरे, देवालये, पवित्र स्थळे व घाट, राजवाडे, किल्लयाची तटबंदी यावर तसेच स्वतंत्र शिळा स्तंभावर, लहान-मोठ्या शिळांवर कोरलेले असतात. प्राचीन भारताचा अभ्यास करताना मौर्य, गुप्त, कुशाण, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, मुस्लिम कालखंड, वर्धन व पल्लव इ. घराण्यांच्या राजवटीच्या काळातील अनेक शिलालेख उपलब्ध आहेत. या कालखंडाची विश्वसनीय माहिती या लेखाद्वारे मिळते. अलाहाबादच्या शिलालेखामुळे गुप्त वंशाचा इतिहास आपल्याला कळतो. सम्राट अशोकाचे शिलालेख स्तंभलेख त्यामुळे अशोकाच्या व मौर्य घराण्याच्या इतिहासामध्ये भर घातलेली आहे. अशोकाचे धार्मिक धोरण त्याच्या शिलालेखामुळे आपणाला समजलेले आहे. कोरीव लेख म्हणजे इतिहासातील अनमोल ठेवा आहे. लेखाची लिपी, भाषा, काव्य, व्यक्तींनामे, ग्रामनामे, भौगोलिक रचना, तात्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन इत्यादी गोष्टी माहिती या लेखांमधून आढळते. त्या काळाचा इतिहास उभा करण्यासाठी शिलालेखाचा उपयोग होतो. नेपाळमधील रूम्मिनदेई येथील सम्राट अशोकाच्या स्तंभलेखावर शाक्यमुनी बुद्धाचा जन्म येथे झाला म्हणून त्या गावातील लोकांना कराची माफी देण्यात आली असा उल्लेख त्यामध्ये आहे. त्यामुळे रूम्मिन्देई म्हणजे लुंबिनी हे बुद्धाचे जन्मस्थान इतिहासकारांना निश्चित करता आले.

**९) शिल्पशास्त्र (Sculpture) :**

शिल्पशास्त्र पाषाण किंवा शाळा कोरीव काम करून शिल्पाची निर्मिती केली जाते. या कोरीव कामांचा व शिल्पांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे शिल्पशास्त्र होय. या कोरीव शिल्प कृतीतून त्या काळातील काही ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक प्रसंग करून ठेवले आहेत. या कलाकृतीचा अभ्यास करून त्या काळातील धार्मिक सामाजिक व राजकीय परिस्थितीचे ज्ञान होते. या शिल्पकृतीचा अभ्यास इतिहास संशोधनात मोलाची भर घालतो. उदा. गौतम बुद्धाच्या जीवनावर आधारलेल्या कोरीव कामातून आपणास ऐतिहासिक माहिती मिळते. उदा. स्तूप, बोधिवृक्ष, पादुका, धर्मचक्र, शिल्पकृतीमागील शुभचिन्हे इत्यादी वरून बौद्ध जीवन पद्धती समजते. अजिंठा वेरूळ या गुफांमधून जैन, बौद्ध व हिंदू धर्मियांच्या अनेक शिल्पकृती आहे. त्याचा उपयोग इतिहास लेखनासाठी निश्चित करता येतो.

**१०) मुर्तीशास्त्र (Iconography) :**

आपल्या देशात प्राचीन काळापासून मुर्तीची पूजा केली जाते. प्रथमतः वास्तुकलेचा एक भाग म्हणून प्रारंभी मुर्तीशास्त्राच्या विकासाला गती मिळाली. प्राचीन भारतात काष्ट, मृत्तिका, पाषाण, लोह, तांबे, सुवर्ण व रत्ने यांच्या मुर्ती बनवल्या जात. पुराण ग्रंथांमधूनही मुर्तीकलेची माहिती मिळते. बृहत-संहिता या ग्रंथामधून मुर्तीकलेची माहिती मिळते. आपल्या देशात निरनिराळ्या प्रदेशात विविध मुर्ती कला विकसित पावल्या आहेत. उदा. गंधार शैली, मथुरा शैली, चालुक्य शैली या मुर्तीकलेचा परंपरा विकास भारतात झाला. विविध देवदेवतांची महात्मे व राजांच्या मुर्ती विविध कालखंडात विविध प्रदेशात निर्माण झाल्या मुर्ती ज्या काळात कोरलेल्या गेल्या आहेत त्या काळातील धार्मिक परंपरा भक्तीचे स्वरूप व कलाकारांचे अभिव्यक्ती याचे दर्शन

मुर्तीकलेचा अभ्यासातून स्पष्ट होते महाराष्ट्रात भाजे, अजिंठा, वेरूळ, कार्ले इत्यादी ठिकाणी महत्त्वपूर्ण आहेत. या मुर्तींच्या अभ्यासातून त्या समाजातील धार्मिक भावना, आराधना पद्धती, व संस्कृती इत्यादींवर प्रकाश पडतो. मुर्तीशास्त्र हे भारतातील विविध धर्मातील विशिष्ट परंपरा व विचार या अनुषंगाने विकसित झाले आहे. प्राचीन भारतीय कलेचा विकास राजसत्तेच्या विकासाबरोबरच तसेच विविध धर्म व पंथाच्या अनुरोधाने झाला आहे.

### ११) पुराभिलेखशास्त्र (Archives) :

प्राचीन काळापासून आपल्या देशात लेखन कला अस्तित्वात होती. शिळा, वृक्षाच्या साली, पाने, कातडे, तांबे इत्यादिंवर कोरीव लेख लिहिलेले आहे ते आज इतिहासाची महत्त्वपूर्ण साधने बनली आहे. छापखान्याची सुरुवात होऊन आपल्याकडे लेखन कलेला गती मिळाली ती अठराव्या शतकात पण तत्पूर्वी प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील सर्व साहित्य हस्तलिखित स्वरुपात आहे. यामध्ये संत ज्ञानेश्वर तुकाराम महाराज व एकनाथ महाराज यांचे सर्व साहित्य हे लिखित स्वरुपात हस्तलिखित स्वरुपात मिळते. कागदावर जी हस्तलिखित तयार झाली त्यांनाच पुराभिलेख असे म्हणतात. हस्तलिखितांचा व जुन्या सर्व प्रकारच्या कागदपत्रांचा साठा जिथे सुरक्षित एकत्रित करून ठेवला जातो, संग्रहित केला जातो त्याला पुराभिलेखागार असे म्हटले जाते. जुनी हस्तलिखिते, पोथ्या पुराणे, कथासंग्रह विशिष्ट देवता व पवित्र स्थानाचे महत्त्व सांगणारी दुर्मिळ ग्रंथ, तसेच राजेरजवाडे आणि त्यांचा राज्यकारभार व प्रशासनातील सर्व कागदपत्रे यांचा अभ्यास हा पुराभिलेखागारशास्त्रामध्ये केला जातो. अशा हस्तलिखित साहित्याचा संग्रह पुराभिलेखागारामध्ये केला जातो. इतिहासाच्या संशोधनात वस्तुनिष्ठ व अस्सल साधन म्हणून या पुराभिलेख याचा अत्यंत महत्त्वाचा उपयोग होतो म्हणून इतिहासात सहाय्य करणारे हे एक महत्त्वाचे सहाय्यकारी शास्त्र आहे.

### १२) मानवंशशास्त्र (Anthropology) :

जर्मन तत्त्वज्ञ इमॅन्युएल कान्ट यांनी 'आंथ्रोपोलॉजी' हा ग्रंथ लिहिला. मानववंशशास्त्र हे मानवाचा संपूर्ण अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानवी उत्क्रांती होत असताना सर्व स्थित्यंतराचा अभ्यास मानववंशामध्ये केला जातो. उत्खननात सापडलेल्या मृत माणसांच्या हाडांचा व अस्थीच्या अवशेषांचा अभ्यास करून मानवी वंश कसा विकसित होत गेला याचा अभ्यास मानववंशशास्त्रांमध्ये केला जातो. मानवाची डोक्याची कवटी तिचा आकार त्याच्या कपाळाची हनुवटीची ठेवण, इत्यादी गोष्टींवरून शास्त्रज्ञांनी मानववंश निश्चित केले. तसेच प्राचीन विविध संस्कृतीमध्ये कोणत्या वंशाचे लोक राहत होते, त्यांची उंची, आकार कसा होता, इत्यादी गोष्टी मानववंशाचा अभ्यासाने शक्य झाल्या आहेत. हडप्पा व मोहेंजोदडो संस्कृतीमध्ये कोणत्या मानवी वंशाचे लोक राहात होते हे या शास्त्रामुळे स्पष्ट झाले आहे. म्हणून हे शास्त्र इतिहासाला सहाय्यभूत ठरत आहे.

### १३) स्थापत्यशास्त्र (Architecture) :

मानव जातीच्या इतिहासात मानवाच्या जडण घडणीमध्ये कला व स्थापत्य यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारतीय जीवन पद्धतीचा आधार अध्यात्म आहे. याचे प्रतिबिंब आपल्याला स्थापत्यशास्त्रात

दिसते. आपणाला नागरी व मुलकी स्थापत्य, लष्करी स्थापत्य व धार्मिक स्थापत्य असे स्थापत्याचे प्रकार करता येतात. नागरी व मुलकी स्थापत्यामध्ये नगर अथवा ग्राम रचना, रस्ते, पुल, घाट, मार्ग, वाडे, घरे, पाणी पुरवठा योजना, सांडपाणी निचरा व्यवस्था, बगीचे व कारंजे इत्यादी गोष्टी येतात. लष्करी स्थापत्यामध्ये गडकिल्ले व गढ़ी यांचा समावेश होतो. धार्मिक स्थापत्यामध्ये प्राचीन मंदिरे यांच्यामध्ये जैन-बौद्ध मंदिरे, मुस्लिम दर्गे, ईदगाह, मशिदी, चर्च यांचा समावेश होतो. त्याच बरोबर छत्री समाधी यांचाही समावेश धार्मिक स्थापत्यामध्ये होतो. स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासातून त्या काळातील राज्यकर्ते त्यांचे विचार, ध्येय धोरणे त्यांचे कार्य आणि त्याच बरोबर त्या काळातील लोकांची जीवन शैली त्यांचे अध्यात्मिक दृष्टिकोन त्यांच्या रूढी, परंपरा, श्रद्धा यांचेही प्रतिबिंब पहावयास मिळते. तसेच स्थापत्यामध्ये तंत्रज्ञानाचा विकास ही लक्षात येतो. कला व स्थापत्य हे त्या भागातील संस्कृतीचे लोकजीवनाचे प्रतिनिधित्व करत असतात.

उदा. मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननात सापडलेल्या शहरांमधून आपणाला त्या समाजाची कल्पना येते. त्याकाळाचे स्थापत्य रस्ते, गटारी, सांडपाण्याची व्यवस्था, स्नानगृहे, धान्याची कोठारे या सर्वांचे स्थापत्य हे पाच हजार वर्षापूर्वीचे आहे. या काळामध्ये मानवाने केलेली प्रगती या स्थापत्याच्या अवशेषावरून लक्षात येते. यावरून सिंधू संस्कृतीच्या इतिहासावर प्रकाश पडतो. तसेच प्राचीन भारतातील भव्य मंदिरे उदा. कोणार्क सूर्यमंदिर, मदुराईचे मिनाक्षी मंदिर तसेच महाराष्ट्रातील शिवपूर्वकालीन व शिवकालीन किल्ल्यांचे स्थापत्यशास्त्र, नद्यांचे घाट व तेथील मंदिरे इत्यादींमुळे त्या ठिकाणचे आर्थिक सामाजिक, राजकीय स्थितीवर प्रकाश पडतो. स्थापत्यशास्त्र हे इतिहास संशोधनाला साहाय्य होते म्हणून हे इतिहासाचे साह्यकारी शास्त्र आहे.

### १४) भूगोल (Geography) :

इतिहास व भूगोल या दोन सामाजिक शास्त्रांचा एकमेकाशी अत्यंत जवळचा संबंध आहे. इतर कोणत्याही सामाजिक शास्त्रापेक्षा इतिहासाला सर्वात जवळचा विषय भूगोल आहे. प्रत्येक देशाच्या भूगोलाचा परिणाम या देशाच्या इतिहासावर होत असतो. मानव समाजावर भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. प्रत्येक देशातील नद्या, पर्वत, जंगले व सकस काळी जमीन या बाबीचा प्रभाव त्या भागातील समाज जीवनावर होत असतो. हवामानानुसार त्या भागातील लोकांचे रहाणीमान वेषभूषा, कृषी व्यवस्था, उद्योगांचा विकास ठरत असतो. भौगोलिक परिस्थितीनुसार त्या भागातील मानवी संस्कृती निर्माण झालेली असते. जमीन, जल, जंगल हे भूगोलाची तीन घटक इतिहास निर्मितीच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे आहेत. उदा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयास भौगोलिक परिस्थिती हे प्रमुख कारण मानले जाते. इतिहासा शिवाय भूगोल म्हणजे मानव रहित उपेक्षित भू-प्रदेश होय. भूगोलाच्या वृक्षाला इतिहासाची फळे येत असे सर्वार्थाने म्हटले जाते ते या अर्थानेच.

### १५) समाजशास्त्र (Sociology) :

मानव हा समाजशील प्राणी आहे अशी मानवाची व्याख्या केली जाते. इतिहास व समाजशास्त्र दोन्ही विषयांचा मानवी समाज हा अभ्यासाचा विषय आहे. मानवाच्या सर्व व्यवहारांचा अभ्यास या दोन्ही विषयात केला जातो म्हणून ही दोन्ही शास्त्र एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजशास्त्रीय सिद्धांत हे इतिहासाचे

स्पष्टीकरण आणि व ऐतिहासिक गोष्टींचा अन्वयार्थ लावण्यास उपयुक्त ठरतात. विसाव्या शतकापूर्वी समाजशास्त्र हा विषय इतिहासात समाविष्ट होता पण नंतर तो स्वतंत्र शाखा म्हणून विकसित झाला. भूतकालीन घटनांचे क्रमवार अध्ययन म्हणजे इतिहास होय, तर समाजशास्त्र हे वर्तमान समाजाचे क्रमबद्ध अध्ययन होय, म्हणून इतिहासाला भूतकाळाचे समाजशास्त्र व समाजशास्त्राला समाजाचा वर्तमान इतिहास असे म्हटले आहे. या दोन विषयाचे नातेसंबंध रेनियरच्या मते, समाजात राहणाऱ्या लोकांची कथा म्हणजे इतिहास होय. तसेच ई. एच. कार इतिहास ही समाजशास्त्राची प्रयोगशाळा आहे असे म्हणतात. मानवी जीवनाच्या विविध अंगांचा क्रमशः विकासाचे वर्तन इतिहास करत असल्याने समाजशास्त्राला त्याचा उपयोग निश्चित प्रयोगशाळा सारखा होत आहे, असे म्हणतात.

**१६) राज्यशास्त्र (Political science) :**

इतिहास व राज्यशास्त्र या दोन शास्त्रांच्या अत्यंत निकटचा संबंध आहे. फ्रीमन म्हणतो, इतिहास म्हणजे गत राजकारण व राजकारण म्हणजे वर्तमान इतिहास होय. फ्रीमनच्या या मतात राज्यशास्त्र व इतिहासाचा संबंध आपल्या लक्षात येतो. इतिहासाला राज्यशास्त्राची प्रयोगशाळा मानली जाते. राज्यसंस्थेच्या उदयापासूनचा अभ्यास इतिहासाच्या मदतीशिवाय करता येत नाही. भूतकाळात घडून गेलेल्या राजवटी व त्यांची प्रशासन प्रणाली, राज्यव्यवस्था सत्तेचे विभाजन विकेंद्रीकरण अथवा केंद्रीकरण या सर्वांचा अभ्यास इतिहास करतो म्हणून इतिहास व राज्यशास्त्र ही शास्त्रे परस्परांना पूरक आहेत. शिवाय ती परस्परांच्या ज्ञानात भर घालतात. राज्यशास्त्राच्या अभ्यासाशिवाय इतिहासाला केवळ काल्पनिक कथांचे स्वरूप प्राप्त होईल. तर इतिहासाच्या आधाराशिवाय राज्यशास्त्र पोकळ ठरेल या संदर्भात प्रो. सिली म्हणतात, राज्यशास्त्र हे इतिहासाचे फळ आहे तर इतिहास हा राज्यशास्त्राचे मूळ आहे. होणाऱ्या परिवर्तन क्रांतीची कारणे व परिणाम, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद इत्यादीचा अभ्यास इतिहासाला राज्यशास्त्राच्या साह्यानेच करावा लागतो. लॉर्ड ॲक्टन म्हणतो, नदीच्या वाळूत जसे सुवर्ण कण संचित होत जातात त्याचप्रमाणे इतिहासाच्या प्रवाहातून राज्यशास्त्राचा संचय होत जातो. इतिहासाच्या उजेडात भूतकाळातील वाटचाल राज्यशास्त्र यशस्वीपणे करू शकते. राज्यशास्त्रात प्रत्येक सिद्धांतासाठी इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. अशा वेळी राज्यशास्त्र इतिहासातील राजकीय घटनांची निवड करून त्याच्या आधारावर राज्याच्या स्वरुपाविषयीचे सिद्धांत शोधून काढतो. त्यामुळे या दोन शास्त्राचा परस्परांशी निकटचा संबंध आहे.

**१७) अर्थशास्त्र (Economics) :**

अर्थशास्त्र हे मानवी समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शास्त्र आहे. माणसाच्या जीवनाला आर्थिक बाजू असते. ऐतिहासिक घटनांच्या मुळाशी काही अंशी आर्थिक घटक कारणीभूत असतात. आर्थिक व्यवहारांचा मानवी जीवनावर परिणाम पडत असतो. त्यामुळे इतिहासकाराला प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक इतिहासातील आर्थिक परिस्थिती व त्याचा मानवी जीवनावर झालेला परिणाम याचा अभ्यास करावा लागतो. म्हणून अर्थशास्त्र हे स्वतंत्र सामाजिक शास्त्र असले तरी इतिहास अभ्यासकाला त्याचे ज्ञान आवश्यक असते. आर्थिक घडामोडी इतिहासावर आपला प्रभाव टाकत असतात. इतिहास संशोधकांना तत्कालीन अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार

परंपरा माहित असणे आवश्यक आहे. उदा. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या उदयाची कारणे शोधण्यासाठी इतिहासकाराला अर्थशास्त्राची मदत घ्यावी लागते. इतिहासात होऊन गेलेला वर्ग संघर्ष व विविध क्रांत्या यांचे मूळ आपणास अर्थशास्त्रात दिसते. अर्थशास्त्राला इतिहासाच्या पाठीचा कणा मानला जातो. इतिहासाचा कणा बळकट असेल तर तो ताठपणे उभा राहू शकतो. अन्यथा त्यालाच पोक येतो आणि कालांतराने त्याचे अस्तित्व लुळेपांगळे होते. आर्थिक अध:पतनावरच ऐतिहासिक अध:पतन अवलंबून असते. सोप्या शब्दात असे म्हणता येईल की राज्यांचे आर्थिक अध:पतन झाले की त्याचे अस्तित्व नष्ट होते. इंग्रजांनी केवळ आर्थिक बळावर सर्व जगावर साम्राज्य गाजवले तर आर्थिक समृद्ध नसल्यामुळे परकीय आक्रमकांचा बंदोबस्त भारतीय राज्य करू शकले नाहीत. कोणत्याही देशाच्या राजवटीचा सुवर्ण काळ मोजण्याचे परिणाम म्हणून अर्थशास्त्र आकडे पाहीले जाते. कोणत्याही शासन व्यवस्थेच्या आर्थिक धोरणाचा परिणाम समाजजीवनावर होत असतो. तसेच आर्थिक घडामोडींचा परिणाम ही इतिहासावर होत असतो. कार्ल मार्क्स, एंगल्स यासारख्या विचारवंतांनी आर्थिक व्यवहारावर विशेष भर देऊन गतकालीन मानवी जीवनाचा अर्थ लावला आहे. मार्क्सच्या मते 'आहे रे व नाही रे' गटातील संघर्ष म्हणजे इतिहास होय. व्यापारवाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद यामागे अर्थकारण असते ही शास्त्रीय पद्धती सिद्ध केलेली आहे. दैनंदिन मानवी जीवनातील शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, वाहतूक, उत्पादन, वितरण, व्यवस्था व महत्त्वपूर्ण बाजार बँका, कर व्यवस्थापन, इत्यादी सर्व महत्त्वपूर्ण व्यवहार अर्थकारणाशी निगडित असतात. त्यामुळे इतिहासकाराला ही सर्व टाळून इतिहास लेखन करणे अशक्य आहे त्यामुळे अर्थशास्त्र हे इतिहासाचे जवळचे शास्त्र आहे.

### १८) मानसशास्त्र (Psychology) :

मानसशास्त्र हे माणसाच्या वर्तनाचा भाव भावनांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, तर इतिहासलेखनात भूतकाळात होऊन गेलेल्या इतिहास घडवलेल्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा अभ्यास केला जातो. भूतकालीन घटनेचा अभ्यास करत असताना त्या घटनेतील व्यक्तीच्या मानसिकतेचा अभ्यास मानसशास्त्राच्या अभ्यासाशिवाय शक्य होत नाही. भूतकाळातील मानवाच्या कृतीचे जसे वास्तववादी विश्लेषण करता येते तसेच त्या कृतीचे मानस शास्त्रीय विश्लेषण सुद्धा करावे लागते. त्या व्यक्तीच्या प्रेरणा त्यांच्या श्रद्धा व उद्देश यांचा अभ्यास मानसशास्त्र मुळे शक्य झाला आहे. आणि म्हणून मानसशास्त्र हे इतिहासाला पूरक असे शास्त्र ठरत आहे. मानसशास्त्रासही मानवी समूहा संबंधीचे काही सिद्धांत मांडावयाचे असल्यास गतकालीन सामाजिक मानसिकतेचा अभ्यास मानसशास्त्राला इतिहासाच्याद्वारे करावा लागतो. इतिहास आणि समाजशास्त्र, इतिहास आणि मानसशास्त्र या दोन्ही शाखा मानवाच्या वर्तनाचा अभ्यास करतात. मानसशास्त्र हे मानवी मनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानवाच्या प्रत्येक कृतीचे जसे भौतिक पातळीवर विश्लेषण करता येते तसेच मानसिक पातळीवरही विश्लेषण करता येते.उदा. अग्रा भेटीच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांची दिवाण-इ-खास मधील मानसिक स्थिती तसेच अनेक युद्धातील सेनापतीचे व सैन्याची मानसिक स्थिती त्यांचे मनोधैर्य, विजय किंवा पराजय कारणीभूत ठरू शकते इत्यादी बाबींचा अभ्यास इतिहासकाराला मानसशास्त्राच्या दृष्टीने उपयोगी पडतो. इतिहास हा माणूस घडवतो त्यामुळे त्याच्या नैसर्गिक भावना, त्या व्यक्तीच्या प्रेरणा, त्याच्या श्रद्धा व उद्देश यांचा अभ्यास या शास्त्रामुळे संशोधक करू शकतो म्हणून हे एक महत्त्वाचे सहाय्यकारी शास्त्र आहे.

### १९) नीतिशास्त्र (Ethics) :

नीतिशास्त्राच्या नियमांच्या पालनामुळे मानवाचे जीवन आदर्श बनते. या आदर्श व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास करणे हा इतिहासाचा विषय आहे. कोणताही इतिहासकार नीतिशास्त्रा अभावी इतिहासाकडे पाहू शकत नाही. कारण मानवाच्या जगण्याला एक नैतिकमूल्य असते. ही वैश्विक असतात. या मूल्याच्या आधारे इतिहासाकडे पाहीले जाते. इतिहासाचे मूल्यमापन केले जाते. या अर्थाने इतिहासकाराला नीतिशास्त्राची ओळख असणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही समाजात मानवी जीवनाचा अर्थ सांगणारे तत्त्वज्ञान हे निर्माण झालेले असते या तत्त्वज्ञानातून चालिरीती, परंपरा, रूढी व संस्कृतीची निर्मिती होत असते. मानवी समूहाच्या विकासास जागतिक मानव जातीस योग्य-अयोग्य, नैतिक याचे स्पष्टीकरण इतिहासकाराला करणे अपरिहार्य असते. कारण मानव जातीच्या हिताची मूल्य ही सार्वत्रिक स्वरुपाची आणि महत्त्वाची असतात. इतिहासातून या मूल्यांचे उदात्तीकरण करणे म्हणजे भविष्य काळातील मानवी समूहास उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा असते आणि प्राचीन काळापासून काही लोकांनी ते केलेले आहे. पंचतंत्र असेल इसापनीती असेल या माध्यमातून नीतिमत्ता रुजवण्याचे कार्य केले गेलेले आहे. तर भोगवाद, चंगळवाद या गोष्टीचे तोटेही इतिहासात नमूद केलेली आहे आणि या अर्थाने नीतिशास्त्र हे इतिहासाला सहाय्यक ठरते.

- **स्वंय अध्ययन प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इतिहास लेखनात घटनांची कालक्रमानुसार सुसंगती लावण्यासाठी इतिहासकार कुठल्या शास्त्राची मदत घेतो ?

२. पुरातत्त्वशास्त्र हा स्वतंत्र विषय नसून इतिहासाचा एक भाग आहे असे कोणी म्हटले आहे ?

३. उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा कालखंड निश्चित करण्यासाठी कोणत्या दोन पद्धती वापरतात?

४. पुरातत्त्वशास्त्राला शास्त्रीय तंत्राचा वापर करणारी कला असे कोणी म्हटले आहे ?

५. लिपी व लिखाण अस्तित्वात येण्यापूर्वी घडून गेलेला इतिहास लिहिण्यासाठी कोणत्या सहाय्यकारी शास्त्राची मदत घ्यावी लागते ?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) भारतात ............. यांच्या कालखंडात पुरातत्त्वखात्याची निर्मिती झाली

अ) लॉर्ड कर्झन ब) लॉर्ड डलहौसी क) लॉर्ड कनिंगहॅम ड) एल्फिन्सटन

२) शिलालेखशास्त्र म्हणजे ऐतिहासिक घटनेचा ............. पुरावा होय.

अ) समकालीन वस्तुनिष्ठ ब) गतकालीन क) भविष्यकालीन ड) व्यक्तीनिष्ठ

३) ब्राह्मी लिपी चे वाचन ............ यांनी केले .

अ) जेम्स प्रिन्सेप ब) लॉर्ड कॅनिंग हॅम क) मेकॉले ड) रिलायबल रिलायन्स

४) भारतातील सर्वात जास्त अभिलेखाचा संग्रह ............ या ठिकाणी आहे.

अ) म्हैसूर ब) बंगलोर क) मुंबई ड) हैदराबाद

५) मानवी उत्क्रांती मधील सर्व स्थित्यंतरांचा अभ्यास ............ शास्त्रांमध्ये केला जातो.

अ) स्थापत्यशास्त्र ब) शिलालेख शास्त्र क) भाषाशास्त्र ड) मानववंशशास्त्र

६) मानसशास्त्र हे .......... चा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

अ) मानवी भावभावनांचा व मनाचा ब) युद्ध प्रसंगाचा

क) राजकारणाचा ड) समाजकारणाचा

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१) मिथक : पुराणकथा

२) आयाम : बाजू

३) परिवर्तनशील : बदल होऊ शकणारा

४) वस्तुनिष्ठता : जसे आहे तसे मांडणे

५) सद्सद्विवेकबुद्धी : तर्काच्या आधारावर एखाद्या गोष्टीचे मूल्यमापन करता येणे.

६) सर्वश्रुत : सर्वमान्य

७) प्रवृत्ती : सजीवाची सहज प्रवृत्ती (नैसर्गिक जाणीव) त्या जाणीवेने नुसार वागणे म्हणजे प्रवृत्ती.

## १.४ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वंय अध्ययन प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिरोडोटस

२) हिरोडोटस

३) फ्रान्सिस बेकन

४) प्रो. ई. एच कार

५) ऐतिहासिक घटनात साम्य दिसते

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) हिक्याटिअस २) विश्वनियत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारे सांगणे ३) साहित्य

४) इ. एच. कार ५) प्रो. ई. एच. कार

- **स्वंय अध्ययन प्रश्न – २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वर्णनात्मक व तत्वाधिष्ठित

२) समकालीन इतिहास

३) राजकीय इतिहास

४) सांस्कृतिक

५) इंग्लंड

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा**

१) गरज व सोय २) राजकीय ३) कायद्याचा ४) वैचारिक

५) सामाजिक ६) सांस्कृतिक ७) सांस्कृतिक ८) स्थानिक इतिहास

- **स्वंय अध्ययन प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कालगणनाशास्त्र

२) पुराण वस्तूचा

३) एम. के. ढवळीकर

४) कार्बन–१४ व पोटॅश ऑर्गन

५) पुरातत्त्वशास्त्र

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) लॉर्ड कर्झन २) समकालीन व वस्तुनिष्ठ ३) जेम्स प्रिन्सेप ४) म्हैसूर ५) मानवंशशास्त्र
६) मानवी भावभावनाचा व मनाचा

## १.५ सारांश :

इतिहास म्हणजे काय ? इतिहासाचे स्वरूप कसे आहे. इतिहासाच्या आकलनामध्ये काळानुरूप कसे बदल होत गेले, आधुनिक काळातील इतिहासाची बदलती संकल्पना कशी आहे, याची ओळख या प्रकरणात आपणास झाली आहे. मानवी प्रगतीमध्ये इतिहासाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास मानवाच्या सर्वांगीण बाबीचा त्याच्या विकासाचा विचार करतो. मानवनिर्मित सर्व गोष्टींचा अभ्यास या विषयात येत असल्यामुळे त्याची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे इतिहासाचे विविध प्रकार पडले आहेत. मानवाने हे प्रकार त्याच्या हेतुनुसार व गरजेनुसार केले आहेत. इतिहासाची व्याप्ती मोठी आहे. आधुनिक काळात इतिहासाचे शास्त्रीय पद्धतीने लेखन करताना अनेक सहाय्यकारी शास्त्रांचा उपयोग करून घ्यावा लागतो. कारण आज मानवाने आपले जीवन सुसह्य करण्यासाठी ज्या ज्या कृती केल्या त्याचा अभ्यास स्वतंत्र शाखेत केला जात आहे. त्यातूनच समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, अशा शाखा विकसित होत गेल्या आज त्यात आणखिन भर पडत आहे. संख्याशास्त्र, भूगर्भशास्त्र, जनगणना शास्त्र, इत्यादिंचा सुद्धा इतिहास संशोधकाला उपयोगी होतो. संशोधकाने निवडलेल्या विषयानुसार त्याला इतर शास्त्राची मदत घ्यावी लागते. अशी मदत घेतली तरच तो सत्याच्या जवळ जाऊ शकतो.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) इतिहासाच्या व्याख्या सांगून त्याची चर्चा करा.

२) इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) इतिहासाच्या विविध प्रकाराची चर्चा करा.

४) इतिहासाचे सहाय्यकारी शास्त्राची माहिती विशद करा.

**टिपा लिहा.**

१) पुरातत्त्वशास्त्र व इतिहास

२) नाणकशास्त्र व इतिहास

३) मुर्तीशास्त्र व इतिहास

४) अर्थशास्त्र व इतिहास

५) पुराभिलेखागार

६) मानवंशशास्त्र

## १.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. श्रीनिवास सातभाई, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) डॉ.एम.एस. गाठाळ, इतिहास लेखनशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४) डॉ. शोभना गोखले, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, प्रकाशक डॉ. उमेश केसकर कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५) डॉ. प्रभाकर गद्रे, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

❖❖❖

**घटक – २**

# इतिहासाच्या साधनांचे संकलन

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ साधने: अर्थ, स्वरूप व प्रकार

२.२.२ तथ्य संकलन पद्धती

२.२.३ संदर्भसाधनांचे चिकित्सक परीक्षण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ

**२.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- संदर्भसाधन म्हणजे काय याचे आकलन होईल.
- प्राथमिक संदर्भ साधने व दुय्यम संदर्भ साधने यामधील फरक समजेल.
- ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरणास सर्वेक्षण पद्धतीची उपयुक्तता समजेल.
- प्रश्नावली पद्धतीची तथ्य संकलनासाठी उपयुक्तता लक्षात येईल.
- मुलाखत तंत्र व त्याचा उपयोग कसा करावा हे सांगता येईल.
- अनुसूची या पद्धतीचा वापर कसा केला जातो हे समजेल.
- संदर्भ साधनांची चिकित्सा कशी करावी व खरे साधन कसे ओळखावे हे समजेल.

## २.१ प्रास्ताविक :

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची नोंद व अभ्यास. भूतकाळातील महत्त्वाच्या सर्व घटनांच्या सुसंगतपणे लिहिलेल्या माहितीला इतिहास म्हणतात. या भूतकाळाची माहिती देणारे पुरावे म्हणजेच इतिहासाची साधने. इतिहासाची माहिती मिळविण्यासाठी इतिहासाच्या साधनांचे संकलन करावे लागते. संशोधक या साधनांचे परीक्षण करतो व वस्तुस्थितीदर्शक इतिहास मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. इतिहासाला शास्त्रशुद्ध स्वरूप देण्यासाठी पुराव्यांची आवश्यकता असते. हा पुरावा आपल्याला उपलब्ध संदर्भ साधानातून मिळत असतो. आज इतिहास लेखनासाठी प्राथमिक, दुय्यम साधनांबरोबरच आधुनिक साधनांचाही वापर केला जात आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संदर्भसाधन म्हणजे काय? संदर्भ साधानांचे प्रकार, तथ्य संकलनाच्या विविध पद्धती व उपलब्ध झालेल्या साधनांचे परीक्षण कसे केले जाते हे अभ्यासणार आहोत.

## २.२. विषय विवेचन

### २.२.१ साधने: अर्थ, स्वरूप व प्रकार :

साधने म्हणजे काय? ज्या गोष्टी (वस्तु, ग्रंथ) गतकालीन मानवी जीवनाविषयी कोणत्या ना कोणत्या स्वरुपात माहिती देतात त्यांना साधने असे म्हणतात. म्हणजेच ज्यांच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ काढता येतो आणि इतिहास लेखनासाठी उपयुक्त माहिती मिळते अशा वस्तू किंवा वास्तू आणि लिखित ताम्रपट किंवा कागदपत्रे यांना इतिहासाची साधने असे म्हणतात.

इतिहास म्हणजे गतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडामोडी व बदल आणि त्यांचे दर्शन करणारे लिखाण म्हणजे इतिहास ग्रंथ होय. म्हणजे इतिहास लेखनात गतकालीन मानवी जीवनाचा आढावा व परिवर्तनाचा आलेख रेखाटलेला असतो. असा आलेख तयार करण्यासाठी साधन सामुग्रीची आवश्यकता असते. ही ऐतिहासिक साधनसामुग्री कागदपत्रे, इमारत, मंदिरे, कला, वस्तू इत्यादी स्वरूपात उपलब्ध असतात. गतकाळातील घडामोडी दृष्टीआड गेलेले असतात. त्या प्रत्यक्ष डोळ्यांनी बघता येत नाहीत अनुभवता येत नाहीत. त्यामुळे इतिहास लेखकाला त्याची माहिती प्रत्यक्ष स्वरूपात होत नाही. ती त्याला अप्रत्यक्ष प्रकारांनी करून घ्यावी लागते. गतकाळाची असे प्रत्यक्ष ज्ञान, माहिती आपल्याला तत्कालीन कागदपत्रे किंवा वस्तूंच्या रूपाने मिळू शकतात. या आधारावर इतिहासाचं पुर्नलेखन किंवा पुर्ननिर्मिती करावयाचे असते. त्यामुळेच इतिहास लेखनामध्ये या साधनसामग्रीचा कच्चा माल म्हटलं जातं. इतिहासाची संदर्भ साधने किंवा कागदपत्रे इतिहास लेखन प्रक्रियेत महत्त्वाचा भाग आहेत. संदर्भ साधनांचे प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम असे दोन मुख्य प्रकार आहेत. इतिहास संशोधकस ही दोन्ही साधने एकाच वेळी उपयोगी पडतील असे नाही. इतिहास लिहिण्यासाठी एखाद्यावेळी त्यास दुय्यम साधनांची ही गरज भासणार नाही. असे असले तरी दुय्यम साधनांचे महत्त्व कमी होत नाही. ज्या ठिकाणी प्राथमिक साधने अपुरी पडतात, तेथे एखादा मुद्दा किंवा संदर्भ हा दुय्यम साधनांमधून मिळू शकतो. तेव्हा दुय्यम साधने ही इतिहास लेखनासाठी तितकीच महत्त्वाची आहेत.

एकोणिसाव्या शतकापासून शास्त्रीयपद्धतीने इतिहासाचा अभ्यास होऊ लागला. त्या अनुषंगाने ऐतिहासिक साधनांची वर्गवारी केली. साधनांचा वापर कसा करायचा? त्यातील सत्याचा शोध कसा घ्यायचा? याविषयी स्थूलमानाने काही नियम, काही निकष ठरवून दिले आहेत. काळाच्या ओघात नवीन नवीन साधने उपलब्ध होऊ लागली. विशेषत: एकोणिसाव्या शतकापासून इतिहासाच्या पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र यासारख्या सहाय्यकारी शास्त्रांचा विकास होऊ लागला. त्याबरोबर साधनसामग्रीत भर पडत गेली.

**● संदर्भ साधनांचे वर्गीकरण :**

ऐतिहासिक साधने मुख्यतः दोन प्रकारचे असतात लिखित व अलिखित. लिखित साधने यांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम असे दोन भाग पडतात. इतिहासाचे साधन म्हणून प्राथमिक, दुय्यम व अलिखित साधने कमी अधिक प्रमाणात सारखेच महत्त्वाचे आहे. ऐतिहासिक साधनांचे आणखीन एक वैशिष्ट्य असे की सर्व साधने परिपूर्ण कधीच होऊ शकत नाहीत.

**अ) प्राथमिक संदर्भ साधने :**

ज्यावेळी घटना घडत असते, तेव्हा एखाद्या व्यक्तीने ती घटना जर स्वतःच्या डोळ्याने पाहिली असेल तर त्यापासून निर्माण होणाऱ्या साधनाला प्राथमिक साधन म्हणतात. प्राथमिक साधने ही मूलभूत स्वरूपात, कच्चा अवस्थेत व अपूर्ण अवस्थेत असतात. इतिहास लेखनप्रक्रियेत प्राथमिक साधने अतिशय महत्त्वाची असतात. अशी प्राथमिक साधने विविध ठिकाणी विखुरलेले असतात, तेव्हा त्यांना एकत्र करून त्यांमध्ये सुसंवाद साधण्याचे काम संशोधकाला करावे लागते. प्राथमिक साधने लिखित व अलिखित अशा दोन उपप्रकारात विभागली जातात. लिखित साधनामध्ये प्रामुख्याने कागदपत्रांचा किंवा हस्तलिखितांचा समावेश होतो. तर अलिखित साधनांमध्ये जुन्या इमारती, स्मारके शहरे, समाध्या, शिलालेख, नाणी, पुरातत्व संशोधनातून पुढे आलेली साधने यांचा यामध्ये समावेश होतो.

**● प्राथमिक लिखित साधने :**

**१. समकालीन कागदपत्रे :**

एखाद्या घटनेसंबंधी सूचना देण्याच्या उद्देशाने किंवा घटनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्ती स्मरण करून देण्याच्या हेतूने लिहिलेली कागदपत्रांना समकालीन कागदपत्र म्हणतात. या कागदपत्रांचा उपयोग त्या काळातील हालचाली समजण्यासाठी होतो. समकालीन कागदपत्र ही भारतीय इतिहास लेखनामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळानुसार बदलत असलेली दिसून येतात. उदाहरणात उत्खननातून मिळालेले खापराचे तुकडे, मूर्ती, अवजारे, मूर्तींचे भग्नावशेष, नाणी वगैरे अलिखित मूळ साधने आहेत. समकालीनत्वाच्या निकषानुसार वृत्तपत्र देखील मूळ साधन होय. अलिकडचे आकाशवाणीवरील व दूरदर्शन वरील येणारी बातमीपत्रे, छायाचित्रे, चलचित्रे, चित्रफिती, ध्वनीफिती ही सर्व अलीकडच्या काळातील प्राथमिक साधने आहेत. याचा थोडक्यात निष्कर्ष असा की अभ्यास विषयाशी संबंधित समकालीन साधने ही प्रामुख्याने मूळ साधने असतात.

मूळ साधनांची विश्वसनीयता ही त्यातील सत्यावर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे अव्वल दर्जाची मानली जाणारी काही समकालीन साधने पूर्णपणे विश्वासनीय असतीलच असं नाही. उदाहरणार्थ आत्मचरित्र हे सामान्यता अव्वल दर्जाचे मानले जाते. परंतु हयातीत आत्मचरित्र लिहिले असेल तर त्यातील बरेचसे लिखाण स्मृतीच्या आधारे केलेल्या असल्यामुळे आणि उतरत्या वयात विस्मृती होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यातील सर्व तपशील सत्य म्हणून स्वीकारणे धोक्याचे ठरते. अशावेळी इतर पुराव्यांच्या आधारे त्यातील सत्याची शहानिशा करून घेणे आवश्यक ठरते. या समकालीन कागदपत्रांमध्ये रणांगणावर सेनाधिकाऱ्याने इतरांना पाठविलेली पत्रे, कोर्टामधील कागदपत्रे, कायदेमंडळातील कागदपत्रे, यांचाही समावेश होतो.

**२. गुप्त पत्रव्यवहार :**

प्राथमिक साधन म्हणून गुप्त पत्रव्यवहाराला खूप महत्व आहे. ते समकालीन कागपत्राइतके विश्वसनीय नसतात, कारण ते घटना घडून गेल्यानंतर तयार केलेली असतात. पण त्यातील माहिती विश्वसनीय व महत्त्वाची ठरते. ही कागदपत्र प्रकाशित केली जात नाहीत. गुप्त पत्रव्यवहार अधिकारीवर्ग सरकार यांच्यामध्ये असू शकतो. गुप्त पत्रव्यवहारामध्ये रोजनिशांचा समावेश होतो. उदा. मराठा इतिहासामध्ये 'वाड डायरीज' यांना महत्त्व आहे.

**३. सार्वजनिक कागदपत्रे :**

या कागदपत्रांमध्ये सर्वांसाठी दिलेले आदेश असतात. ही कागदपत्रे पुढीलप्रमाणे असतात. वृत्तपत्रे एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला लिहून पाठवलेली बातमी म्हणजे वृत्तपत्र, आठवणी व आत्मवृत्त. प्रतिष्ठित व्यक्ती आपल्या आठवणी किंवा आत्मचरित्र. यामुळे एका विशिष्ट कालखंडाची माहिती मिळते.

**४. सरकारी कागदपत्रे :**

यांचे तीन भाग पडतात अ) राज्यकारभाराची कागदपत्रे, या कागदपत्रांमध्ये तत्कालीन राज्यकारभार विषयक परिस्थितीचा उल्लेख असतो. ब) परराज्यातील अधिकाऱ्यांनी पाठविलेली पत्रे, राजकीय पत्रव्यवहार, सरकारी व्यवहाराची पत्रे, सनदा, खंडणी पत्रे, रोखे मुलकी अधिकाऱ्यांची हुकूमनामे, सनदी नोकरांच्या संरक्षणासाठी काढलेली हुकूमनामे इत्यादी क) खाजगी पत्रे, इनाम पत्रे, सनदा, दानपत्रे, अनुदान पत्रे, महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींची खाजगी पत्र व्यवहार इत्यादी.

**५. जमाखर्चाच्या नोंदी :**

राज्यकारभारतील जमाखर्च हा पुरावा म्हणून अत्यंत महत्वाचा मानला जातो. मुलकी सेवा, लष्करी सेवा, रेल्वे सेवा, खाजगी किंवा स्वयंसेवी संस्थेचे जमाखर्चाचे हिशोब हे इतिहासाच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. मराठा कालखंडमध्ये प्रत्येक ऐतिहासिक घराणी जमाखर्चाचे हिशोब लिहून ठेवत असत. अशा घराण्याचा इतिहास लिहीत असताना हे साधन प्राथमिक साधन म्हणून उपयोगी ठरते.

**६. धार्मिक संस्थांचे पत्रव्यवहार :**

यामध्ये आर्थिक व्यवहार, आध्यात्मिक मार्गदर्शन, धार्मिक स्थळांचे जतन इत्यादीची माहिती मिळते. या पत्रव्यवहारातून तत्कालीन स्वरूपाचे सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक माहिती मिळते. तसेच तत्कालिन समाजाचे सांस्कृतिक प्रगती लक्षात येते. अशा धार्मिक संस्थामधून चालत आलेल्या विविध उपक्रमांची माहिती मिळण्यास मदत होत

**७. तह किंवा करार :**

दोन राज्यात किंवा देशात होणारे तह किंवा करार हे ही इतिहासाचे प्राथमिक साधन आहे. या तहातून आपल्याला युद्धापूर्वीची आणि युद्धांनंतरची राजकीय परिस्थिति कशी होती याची जाणीव होते. अशा कागदपत्रांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास अनेक घटनांची माहिती मिळते. आज जगातील अनेक देशांमध्ये आर्थिक, तांत्रिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्वरूपाचे करार होत असतात. हे करार व त्यासंबंधीची मूळ कागदपत्रे ही इतिहास संशोधनाच्या दृष्टीने अस्सल प्राथमिक साधनेच असतात.

**८. वैयक्तिक रोजनिशा व खाजगी पत्रव्यवहार :**

एखाद्या देशाच्या राजकीय किंवा सामाजिक इतिहासवार प्रभाव टाकणारी व्यक्ति ही स्वत: रोजनिशी लिहीत असते. त्यामुळे इतिहासाचे साधन म्हणून रोजनिशीला महत्व आहे. या रोजनिंशीतील नोंदी तत्कालीन सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकत असतात. पण रोजनिशीतील माहिती अतिशयोक्तिपूर्ण व खोटीही असू शकते. दोन राजकीय, लष्करी, सामाजिक, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमधील खासगी पत्रव्यवहार हे ही इतिहास लेखनातील महत्त्वपूर्ण प्राथमिक साधन आहे. अशा पत्रातूनही तत्कालीन सामाजिक, राजकीय बाबींवर प्रकाश टाकता येतो. पण ही पत्रे एकांगी, पक्षपाती व पूर्वग्रहदूषित असू शकतात.

**९. आत्मचरित्रे व आठवणी :**

आत्मचरित्रे ही साधारणपणे आयुष्याच्या शेवटी लिहिली जातात. थोर व्यक्तींची आत्मचरित्रे आपल्याला तत्कालीन कालखंडाच्या अभ्यासासाठी महत्वाचे साधन ठरतात. उदा. पं. नेहरू 'भारताचा शोध', हिटलर– 'माझा संघर्ष', महात्मा गांधी– 'माझे सत्याचे प्रयोग' इ. आत्मचरित्रे व आठवणी यांचा इतिहासलेखनात वापर करीत असताना काळजी घ्यावी लागते.

**● प्राथमिक अलिखित साधने :**

प्राथमिक साधनांमध्ये अलिखित साधनेही अत्यंत महत्त्वाची आहेत. कारण ही साधने त्या त्या काळाची साक्षीदार असतात. ही साधने शतकानुशतके टिकून असतात. या साधंनामध्ये फेरफार करता येत नाही.

**१. प्राचीन वस्तूंचे अवशेष :**

उत्खननात सापडलेल्या वस्तू वा वास्तू म्हणजेच मातीची भांडी, हत्यारे, शस्त्रास्त्रे, खेळणी, शिक्के, सौंदर्य

प्रसाधनांच्या वस्तू आदि आवशेष सापडतात. या आवशेषवरून आपल्याला तत्कालीन संस्कृतीचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनाची माहिती मिळते. अशा वस्तूंच्या कालमापणासाठी कार्बन १४ कालमापन पद्धतीचा उपयोग केला जातो. या प्राचीन वस्तू म्हणजे त्या त्या काळातील माहिती देणारी इतिहासाची अस्सल प्राथमिक साधनेच असतात.

**२. शिलालेख :**

शिलालेख हे इतिहासाचे एक अविनाशी साधन आहे. या साधनाचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे यामध्ये कोणताही बदल करता येत नाही. सार्वजनिक इमारती, मंदिरे, राजवाडे, किल्ले अशा अनेक ठिकाणी दगडावर कोरलेले शिलालेख आठळतात. प्राचीन काळातील पराक्रमी राजे, सरदार, आपले विजय धार्मिक कार्य लोकांच्या स्मरणात राहावेत म्हणून ते लेण्यांमध्ये किंवा स्तंभ उभारून कोरून ठेवत असत. अशा शिलालेखातून तत्कालीन धार्मिक, आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक बाबांची माहिती मिळते.

**३. ताम्रपट :**

हा तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला मजकूर असतो. यावर प्रामुख्याने दानपत्रे आणि राजाज्ञा तसेच इतर दूरगामी आज्ञा कोरुन ठेवण्याची प्रथा दिसून येते. दानधर्म करण्यासाठी या ताम्रपटांचा वापर केला जात होता. एखाद्या व्यक्तीने राज्यासाठी महत्वाची कामगिरी पार पाडल्यास अथवा तो करीत असलेल्या राज्याच्या सेवेबद्दल त्याला राजाकडून वतन दिले जात असे. दान देणाऱ्यांची व स्वीकारणाऱ्यांची वंशावळीसह संपूर्ण माहिती यामध्ये असे. गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट व चालुक्यांचे अनेक ताम्रपट सापडले आहेत.

**४. स्मृतीशीला :**

ताम्रपटाशिवाय विशिष्ट स्त्री-पुरुषाच्या मृत्युसंबंधी माहिती देणाऱ्या स्मृतिशीला हेही एक महत्त्वाचे प्राथमिक साधन आहे. वीरगती पावलेल्या विराच्या कृतीचे कालनिर्देशासह त्यामध्ये वर्णन आढळते. महाराष्ट्रात अशा सतीशीला आढळतात.

**५. नाणी :**

नाणी ही कोणत्याही राजवटीचा समकालीन पुरावा होय. नाणी ही कोणत्या ना कोणत्या राजवटीचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास समजून घेण्यास मदत करतात. नाण्यांवर राजा, देवदेवता, प्रतिके इत्यादी अंकित केलेली असतात. त्यावरून आपल्याला तत्कालीन राजा, तत्कालीन सामाजिक, आर्थिक व धार्मिक माहिती समजून येते. तसेच समकालीन भाषा, लिपी, धातू क्षेत्रातील प्रगती इत्यादीची माहिती मिळते. नाण्यांवरील प्रतिकावरुन कलेच्या क्षेत्रातील प्रगतीही लक्षात येते. उदा. समुद्रगुप्ताची वीणावदन करतानाची मुद्रा, राजाची कला-संगीतविषयक दृष्टी दर्शविते. नाण्यांचा धातू कोणता? यावरून राज्याची आर्थिक स्थिति समजून येते. याचबरोबर परकीय राजवट व त्यांच्याशी असलेल्या व्यापाराचीही माहिती मिळते. नाण्यांवर देवदेवतांची चित्रे असतात. त्यावरून त्या काळातील धार्मिक स्थितीवर प्रकाश पडतो. एखाद्या राजाची नाणी ज्या प्रदेशात सापडतात त्यावरून त्या राजाच्या साम्राज्य विस्ताराबाबत माहिती मिळते. अशा सर्वच दृष्टीने नाणी हे एक महत्वाचे साधन ठरते.

**६. चित्र व नकाशे :**

मानवास प्राचीन काळापासून चित्रकला आवगत आहे. प्राचीन मानवापासून गुहेतील चित्रकला आढळते. लेण्यामधून कोरलेली चित्रे तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब असतात. त्यामधून तत्कालीन समाजात प्रचलित असलेले सण, उत्सव, प्रथा परंपरा यांची माहिती मिळते. याशिवाय या गुहा कोरण्याच्या कालखंडातील राजवटीचीही माहिती मिळते. अजिंठ्यातील लेणी चित्रकला हे त्याच उत्तम उदाहरण आहे. यावरून आपल्याला तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. आदिलशाही, कुतुबशाही, मोगलकालीन व राजपूत राजे व सरदार यांची चित्रे आज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. याशिवाय नाकाश्यांच्या अभ्यासावरून इतिहासकाळात झालेल्या लढायांची व भौगोलिक परिस्थितीची पूर्ण माहिती होऊ शकते.

**७. लेण्या, चैत्यगृहे व स्तूप :**

सांची, भारहुत, अमरावती, कार्ले, भाजे, नागर्जुंकोंडा इ. ठिकाणी स्तूप व चैत्य बांधले गेले आहेत. हे स्तूप बुद्धांच्या अस्थि अवशेषावर बांधले गेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील भाजे, कोंडणे, जुन्नर, बेडसे व नाशिक, कार्ले, कान्हेरी याठिकाणी बौद्ध लेणी कोरली आहेत. या सर्वच स्तूपावर बुद्धाच्या जीवनातील कथा, हिंदू देवदेवता, यक्ष यक्षिणी, वृक्षवल्ली, पशुपक्षी, राजे, सामन्य स्त्री पुरुष यांची चित्रे कोरली आहेत. यावरून त्या काळातील वेशभूषा, केशभूषा, अलंकार, धार्मिक व सांस्कृतिक जीवन याची माहिती मिळते. ही माहिती समकालीन असल्याने त्याची गणना प्राथमिक साधनात करावी लागते.

**८. भौगोलिक माहिती :**

भूगोल व इतिहास हे दोन्ही परस्पर पूरक आहेत. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास करताना भूगोलाची मदत होते. कारण इतिहास हा भूगोलाच्या साहाय्याने घडत असतो. जी घटिते घडतात, प्रसंग घडतात त्याचा उल्लेख समकालीन लिखित कागदपत्रातून येत असतो. भौगोलिक परिस्थिती शेकडो वर्षे फारसा बदल होत नसतो. त्यामुळे घटनास्थळी जाऊन इतिहासाचे अवलोकन करता येते.

याशिवाय मूर्ती, हत्यारे व अवजारे, शस्त्रास्त्रे स्मारके ही इतिहासाची अलिखित प्राथमिक साधने आहेत. ही सर्व अलिखित प्राथमिक साधने इतिहासलेखन प्रक्रियेत महत्त्वाची आहेत. कारण एक ती सहजासहजी नष्ट होत नाहीत. दोन ती त्या त्या काळात तयार झालेली म्हणजेच समकालीन असतात. तीन त्यात सहजा सहजी फेरफार करता येतील अशी नसतात.

**ब) दुय्यम साधने :**

ज्या साधनात घटनांचे लेखन करणारा घटक घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार नसतो. परंतु प्रत्यक्ष साक्षीदाराच्या सांगण्यावरुन घटनेची माहिती देतो. अशा साधनास  दुय्यम साधनाचे म्हणतात. एखाद्या व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली तरी केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पुर्णपणे सत्य येण्याची

शक्यता कमी असते. यामुळे अशा साधनांना दुय्यम म्हणतात. एखादी घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी केवळ स्मरण शक्तीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ. गतकालीन घटनेबाबत केवळ माहितीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ, प्राथमिक स्वरूपाच्या साधनांची चिकित्सा करून विश्वासाने ठरलेल्या पुराव्यांच्या आधाराने विषयाची तर्कसंगत मांडणी करून लिहिलेले ग्रंथ यांचा समावेश यामध्ये होतो. प्राथमिक साधनांवरच दुय्यम साधने अवलंबून असतात. या साधनांना दुय्यम म्हणण्याची कारणे म्हणजे अशा साधनांमधून संबंधित लेखकाचे स्वत:चे मत डोकावण्याची शक्यता असते. इतिहासाच्या मूळ साधनाचा अर्थ आपल्या मतानुसार लावण्याची शक्यता असते. दुय्यम साधनांमधील वस्तूनिष्ठता तपासताना काळजी घ्यावी लागते. काही महत्त्वाची दुय्यम साधने खलीलप्रमाणे

**१. बखर :**

'बखर' या शब्दाचा कोशातला अर्थ हकीकत, बातमी, इतिहास, कथानक, चरित्र असा आहे. हा शब्द 'खबर' या फारशी शब्दापासून वर्णव्यत्यासाने आला असावा. बखरी ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मराठी भाषेवर फारशी भाषेचे असलेले वर्चस्व लक्षात घेता वरील व्युत्पत्ती बरोबर असावी असे वाटते. वि. का. राजवाडे यांच्या मते 'बख=बकणे, बोलणें' या शब्दापासून बखर शब्द मराठीत आला असावा. बखरी म्हणजे चरित्रग्रंथ होय. बखरीचे लेखन विशेषत: उत्तरकालीन झालेले आहे. बखरीमध्ये परंपरेने आलेली माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केलेला असतो. बखर ही साधारणपणे राजाच्या आज्ञेप्रमाणे लिहिली जात असे. त्यामुळे बखरीचा विषय हा राजा व राजकीय घटना यांची माहिती सांगणे हा असतो. बखरकारांनी काळ, व्यक्ती व स्थळ यांचा विपर्यास केला आहे. बखरकार आपल्या व्यक्तीरेखेला जिवंतपणा आणण्यासाठी स्वरचित व काल्पनिक संभाषणे घालत असे. बखरीमध्ये जरी अनेक दोष असले तरी एक ऐतिहासिक साधन या दृष्टीने त्याचे महत्त्व नाकारता येत नाही. बखरींचे ऐतिहासिक कालखंडाच्या दृष्टीने शिवपूर्वकलीन बखर, शिवकालीन बखर व पेशवेकालीन बखर अशी वर्गवारी केली जाते.

**२. कुळकटी / कुळांचा इतिहास :**

कुळांच्या इतिहासासंबंधी टिप्पणे म्हणजे कुळकटी. इतिहासप्रसिद्ध कुळांच्या कुळकटी लिहिण्याची पद्धत होती. यामध्ये एखाद्या कुळाचा उदय विस्तार व ऱ्हास कसा झाला याची माहिती असते. कुळकटीमध्ये एकाच घराण्याची माहिती असल्याने त्यामध्ये सरमिसळ नसते. कुळकटी तयार करताना परंपरेची व दप्तरातील माहितीची मदत घेतली जात असे. प्रत्येक घटना केव्हा व कशी झाली यासंबंधी स्पष्ट उल्लेख केलेला असतो. एखाद्या घराण्याचे विभाजन झाले तर स्वतंत्रपणे कुळकटी लिहीत असत. अपवादात्मक परिस्थितीत या कुळकटी राजाच्या किंवा सरदारच्या कानावर तक्रारी घालण्यासाठी लिहीलेल्या असतात. बखर साहित्यापेक्षा याची विश्वसनीयता अधिक असते.

**३. वंशवेल व बाडे :**

वंशवेल एखाद्या घराण्याची वंशावळ सांगणारी असते. कुळाचा इतिहास सांगण्याच्या हेतूने वंशवेल तयार केलेली असते. वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याची पद्धत आहे. पण शिवकलीन वंशवेली

उजवीकडून डावीकडे लिहीलेल्या आढळतात. वंशवेलीतील नावे तीच तीच येत राहिल्याने काही वेळा अडचण येते. वंशवेलीची सुरवात ब्रम्हदेवाच्या नावाने होत असते. इतिहासकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने मोठमोठे ग्रंथ नक्कल करून संग्रही ठेवण्याची पद्धत होती. अशा ग्रंथांना 'बाड' म्हणत या बाडांमध्ये काही निवडक ऐतिहासिक प्रसंग, राजे, पादशाह यांच्या कारकिर्दीच्या कालगणती, मंत्रतंत्र, शक-सन याबाबतची माहिती असते.

**४. महजर व करिने :**

महजर, करिने ही कागदपत्रे न्याय मिळविण्याच्या व देण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. यामध्ये प्रत्येक्ष पुरावा असतोच असे नाही. पण त्यामधील मजकूर साधार लिहिलेला असतो. महजर म्हणजे महालाना किंवा कसब्यात पंचाईत किंवा मनसुबी झाली. करिने म्हणजे वादी यांच्याकडून हकिगत लिहून घेणे. महजर व करीने याच्यातून इतिहासाची अव्वल माहिती मिळू शकेलच असे नाही. महजर हे न्यायनिवाड्याचे कागदपत्र असे. महजरात दोन्ही बाजूंची मते नोंदवून करून सादर केलेल्या कागदपत्रांची नक्कल असे. करिने हे साधारणता एखाद्या घराण्याच्या जमिनीच्या मालकीबद्दल किंवा वतनाबद्दल माहिती देतात. करिना सादर केल्यानंतर कामदार किंवा गोत पंचायत एकत्र बसून चौकशी करीत व मग करिन्यात लिहिलेली माहिती सुधारून लिहीत असत. गोत सभेत चर्चा झाल्यानंतर महजर करीत व महजर झाले म्हणजे वाद संपला असे समजण्यास हरकत नाही. एकंदरीत महजर व करिने यांच्यातील माहिती गुन्हे व न्यायदानाचे स्वरूप याची माहिती देतात.

**५. शकावल्या :**

पाश्चात्य देशातील 'ॲनल्स' सारखी घटनांची संगतवार, कालक्रमानुसार नोंद करण्याची परंपरा म्हणजे शकवल्या होय. मध्ययुगीन कालखंडात दोन प्रकारच्या शकावल्या आढळतात. एक म्हणजे पौराणिक परंपरा असलेली व दुसरा प्रकार म्हणजे ज्यात संबधित घराण्याच्या राजकीय घडामोडींचा तपशील दिलेला असतो. शकवल्या म्हणजे एकादे घराणे किंवा व्यक्ती यांचे चरित्र देणारे साधन होय. उदा. जेधे शकवली. शकावल्याचे वैशिष्ठ्य म्हणजे मध्ययुगीन कालखंडात काही महत्त्वाच्या राजकीय घडलेल्या घडामोडींची तिथी वार यानुसार नोंद करून ठेवलेली असते. त्यामुळे इतिहास लेखनात शकावल्याना महत्त्व आहे.

**६. तवारीखा :**

तवारीखा म्हणजे विजयगाथा होय. इतिहास म्हणजे प्रभावी व्यक्तींचे कार्यकर्तुत्व अशी भूमिका घेऊन राजाचे स्तुतीपर लेखन केले गेले. स्वत: सुलतानांनाही काही तवारीखा लिहीलेल्या आहेत. राजाश्रायाने या तवारीखा लिहिल्यामुळे त्यात दैवी वरदान, राजाचे शौर्य, कर्तुत्व, पराक्रम असे व्यक्तिनिष्ठ वर्णन येते. इ.स. १२ व्या शतकानंतर अरेबिक व पर्शियन भाषेत तवारीखा लिहिण्याची प्रथा रूढ झाली.

**७. पोवाडे व काव्ये :**

पोवाडे व काव्ये यांचा इतिहासाच्या दुय्यम साधनांमध्ये समावेश होतो. कारण यांची रचना वैयक्तिक पातळीवर केली जाते. कवी व शाहीर यांची ज्या व्यक्तीवर व घटनेवर भावना असते अशाच घटना व व्यक्तीबद्दल

ते प्रेम व आदर भावनेने काव्य करतात, त्याला पोवाडे म्हणतात. पेशव्यांच्या काळात राम जोशी, अनंत फंदी, होणाजी बाळा इ. शाहीर होऊन गेले. त्याचे काव्य व पोवाडे इतिहासलेखनासाठी महत्त्वाचे असले तरी त्यांना दुय्यम साधन मानल जाते.

**८. ऐतिहासिक म्हणी :**

एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा जनमाणसावर प्रभाव पडत असतो. ऐतिहासिक प्रसंगावरून म्हणी तयार होत असतात. शिवकालीन काही प्रसंगाच्या म्हणी या आजपर्यंत टिकून आहेत. उदा. 'होता जिवा म्हणून वाचला शिवा', 'आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे', 'गड आला पण सिंह गेला', 'बचेंगे तो और भी लडेंगे' या म्हणी ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचे साधन नाही पण यावरून एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा परिणाम लक्षात येतो.

**९. खंडकाव्ये :**

हा काव्याचाच एक प्रकार आहे. अशा खंडकाव्यात एखाद्या राजाबद्दल त्याच्या जन्मापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंतच्या जीवनाचा आढावा काव्यात्मक पद्धतीने घेतला जातो. खंडकाव्यात एखाद्या दीर्घकाळ चाललेल्या युद्धाबद्दल माहिती दिली जाते. राजे लोक कवींना राजाश्रय देत व त्यांच्याकडून खंडकाव्ये लिहून घेत. पण याचा समावेश दुय्यम साधनात होतो. कारण त्यांच्या रचनेत वास्तवापेक्षा कल्पनेचा भाग अधिक असतो.

**१०. चरित्रग्रंथ :**

इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे लिहिलेले चरित्र हे ही इतिहासाचे दुय्यम साधन आहे. कारण ज्या लेखकाने हे चरित्र लिहिलेले असते त्या लेखकाने त्या व्यक्तीस पाहिलेले नसते. पण उपलब्ध पुरावे किंवा कागदपत्रांच्या आधारे चरित्र लिहिले जाते. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडमध्येही अनेक चरित्रग्रंथ लिहिले गेले. उदा. बाणभट्टाचे 'हर्षचरित्र' कवी परमानंदचे 'शिवचरित्र', अबुल फजल याचे 'अकबरनामा' इत्यादी. पण हे सर्व चरित्रग्रंथ व्यक्तिनिष्ठ व स्तुतीपर आहेत. त्यामुळे या चरित्रग्रंथाचा समावेश दुय्यम साधनांमध्ये केला जातो.

**११. ऐतिहासिक नाटके व कादंबरी :**

ऐतिहासिक घटनांवर आधारित नाटके व कादंबऱ्या लिहिण्याची पद्धत आहे. उदा. विशाखा दत्त यांनी लिहिलेले 'मुद्राराक्षस' याशिवाय कालिदास, भास यांची नाटके प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक नाटके व कादंबऱ्या या प्रामुख्याने ऐतिहासिक व्यक्ती, घटना यांच्यावर अवलंबून असतात. परंतु ऐतिहासिक नाटके यांना दुय्यम साधनांचा दर्जा आहे. कारण नाटक म्हणजे इतिहासग्रंथ नव्हे. नाटकातील प्रसंग, पात्र, घटना व संवाद या काल्पनिक असतात. कादंबरीकार आपल्या सामर्थ्यानुसार पात्रे प्रसंग रंगवीत असतो. मूळ ऐतिहासिक साधनांचा आधार घेऊन कादंबरी लिहिली जाते.

**१२. वर्तमानपत्रे :**

इतिहासलेखनामध्ये वृत्तपत्र या संदर्भ साधनाचा दुय्यम साधनामध्ये समावेश होतो. पुरावा किंवा आधार म्हणून वृत्तपत्रीय लेखांचा संदर्भ घेणे म्हणजे वरवरपणा आहे असे म्हटले जाते. पण वृत्तपत्रीय लेखनाचा कसा उपयोग होतो याचा मोठा आदर्श म्हणजे डॉ. य.दी. फडके होय. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर अनेकवेळा एकतर्फी किंवा आतिशयोक्तीवर आधारलेला असतो. त्यामुळे इतिहासलेखन करत असताना एकाच वृत्तपत्रावर किंवा एकाच विचारसरणीच्या अनेक वृत्तपत्रांवर अवलंबून राहून चालत नाही. वृत्तपत्रातील माहिती तपासून संदर्भ लक्षात घेऊन इतिहासलेखन करावे. पण तरीही त्या त्या कालखंडाचे समाजजीवन, आर्थिक जीवन, एकादी चळवळ किंवा व्यक्ती यांचा अभ्यास करण्यासाठी वृत्तपत्रे निश्चित उपयोगाची संदर्भ साधने आहेत. पण वृत्तपत्र हे अव्वल दर्जाचे साधन नसून दुय्यम साधन असते. ते सामान्यता विश्वसनीय नसते म्हणून या साधनाचा सावध व काळजीपूर्वक उपयोग करावा लागतो.

**१३. दंतकथा आख्यायिका :**

दंतकथा, आख्यायिका यांचा प्रभाव जनमानसावर कायम असतो. या दंतकथा व आख्यायिका यात सत्य व कल्पित यांची सरमिसळ झालेली असते. उदा. देवी भवानीने भवानी तलवार शिवरायांना दिल्याची कथा काल्पनिक आहे. पण जनमानसात ती घटना सत्य असल्याची दंतकथा सत्य म्हणून रूढ आहे. आजपर्यंत इतिहाससंशोधकांनी हे सबळ पुराव्याअभावी मान्य केले नाही.

थोडक्यात इतिहासाच्या अभ्यासाची दुय्यम साधने ही इतिहासलेखनात कमी महत्त्वाची असतात. त्यांचा इतिहासलेखनात वापर करताना काळजी घ्यावी लागते. दुय्यम साधनातील माहिती प्राथमिक साधनाशी पडताळून पहावी लागते.

**क) आधुनिक साधने :**

२१ व्या शतकामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आधुनिक कालखंडात संदर्भ साधनांचे स्वरूप बदलेले आहे. त्यामुळे अनेक इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमेही साधन म्हणून वापरतात येत आहेत. यामध्ये आकाशवाणी (रेडिओ), दूरचित्रवाणी (टेलिव्हीजन), लघुपट तसेच संगणक व इंटरनेट माध्यमातून प्रसारीत होणारी वेबजरनल्स यांचाही साधन म्हणून उपयोग केला जातो.

**१. आकाशवाणी (रेडिओ) :**

आकाशवाणी हे श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीवरून प्रसारीत होणारे कार्यक्रम, बातम्या या ही तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असतात. भारतात आकाशवाणीची सुरवात २३ जुलै १९२७ रोजी झाली आहे. रेडिओवरून बातमीपत्रे, परिसंवाद, प्रबोधनपर कार्यक्रम प्रसारित केले जातात. थोर राष्ट्रपुरुष महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस तसेच महान शास्त्रज्ञ, गायक, संगीतकार यांच्या मूळ आवाजातील ध्वनिमुद्रितसहित आकाशवाणी केंद्राकडे संग्रहित केलेलं असते. त्यामुळे तत्कालीन इतिहासासाठी आकाशवाणी हे एक महत्वाचे आधुनिक साधन ठरते.

### २. दूरचित्रवाणी :

हे माध्यम दृकश्रीव्य स्वरूपाचे आहे. त्यामुळे घडलेल्या घटनांची माहिती आपण स्वत: डोळयाने पाहू शकतो. दूरचित्रवाणीमुळे समकालीन ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडींचे प्रत्यक्ष दर्शन आपल्याला होत असते. यातून बातम्या, शिक्षण, कला, क्रीडा आरोग्य, कृषी, अशा विविध क्षेत्रातील माहिती दिली जाते. दूरचित्रवाणीवरून प्रसारित होणारी ऐतिहासिक नाटके, चित्रपट यातून तत्कालीन लोकजीवनाचे दर्शन घडते त्यामुळे याचाही वापर साधन म्हणून करण्यास मदत होऊ शकते.

### ३. लघुपट :

१९६० साली फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इस्टीटयूट ऑफ इंडिया (FTII) ची स्थापना भारत सरकारने पुणे येथे केली. या संस्थेने राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट तयार केले. समाजसेवक, समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती, देशकार्य करणाऱ्या व्यक्ती आणि महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारे अनुबोधपट (डॉक्यूमेंटरीज) या विभागाने तयार केली आहेत. हे वृत्तपट व अनुबोधपट (डॉक्यूमेंटरीज) आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासण्यासाठी उपयोगी आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत सर्व विषयांना स्पर्श करण्याची ताकद बाळगणारे लघुपट हे एक प्रभावी माध्यम आहे. एखादा विषय कमीतकमी वेळात प्रेक्षकांसमोर मांडण्याचे कसब ह्या लघुपटातून करता येते. ३ ते ४ लघुपटांची एकत्र सांगड घालून एखादा सिनेमा होऊ शकतो. छ. शिवाजी महाराज, सम्राट अशोक, सम्राट, अकबर, म. गांधी यासारख्या अनेक महान व्यक्तींवर लघुपट निर्माण केलेले आहेत. हे करत असताना दिग्दर्शक इतिहास संशोधकांची मदत घेत असतो. त्यामुळे या लघुपटातून आपल्याला तत्कालीन वेशभूषा, केशभूषा, समाजजीवन याची माहिती मिळत असते. त्यामुळे ही लघुपट इतिहासासाठी एक साधनच ठरत असतात.

### ४. महाजाल (इंटरनेट) व वेब जर्नल्स :

इंटरनेट हे संगणकांच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्कचे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क आहे. यामुळे जगभरातील माहिती आपल्याला घरबसल्या उपलब्ध होते. तर इंटरनेटच्या माध्यमातून जी पत्रकारिता केली जाते त्यास वेब जर्नालिझम असे म्हणतात. या सर्वांचा ही अलीकडे इतिहासाचे साधन म्हणून उपयोग केला जातो.

**● स्वयं अध्ययानासाठी प्रश्न – १**

**खालील विधाने योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

१. ............ शतकापासून शास्त्रीय पद्धतीने इतिहासाचा अभ्यास होऊ लागला.

अ) एकोणिसाव्या  ब) विसाव्या  क) आठराव्या  क) एकविसाव्या

२. एखाद्या व्यक्तीने घटना जर स्वतःच्या डोळ्याने पाहिली असेल व त्यातून जे साधन निर्माण झाले असेल त्या साधनाला ............ म्हणतात.

अ) लिखित ब) प्राथमिक क) दुय्यम क) अलिखित

३. आकाशवाणीला पूर्वी ............ असे म्हटले जाई.

अ) दूरध्वनी ब) नभोवाणी क) प्रसारभारती क) युवावाणी

४. ............ माध्यमातून संपूर्ण जग एकत्र जोडले गेले आहे.

अ) रेडिओ ब)इंटरनेट क) वृत्तपत्र क) लघुपट

५. ............ हे प्रभावी दृकश्राव्य प्रसारमाध्यम आहे.

अ) रेडिओ ब) फक्स क) टी.व्ही. क) छायाचित्र

६. प्राचीन वस्तूंच्या कालमापणासाठी ............ पद्धतीचा अवलंब केला जातो.

अ) कार्बन १५ पद्धत ब) कार्बन १४ पद्धत क) सर्वेक्षण पद्धत ड) मुलाखत पद्धत

७) शिलालेख हे इतिहासाचे ............ साधन आहे.

अ) विनाशी ब) अविनाशी क) आदुनिक ड) मौखिक

८) ताम्रपटामध्ये ............ धातूचा उपयोग केला जात असे.

अ) सोने ब) चांदी क) लोखंड ड) तांबे

९) ............ व ............ परस्पर पूरक आहेत.

अ) राज्यशास्त्र व इतिहास ब) भूगोल व इतिहास

क) इंग्रजी व इतिहास ड) समाजशास्त्र व इतिहास

१०) घटनाची संगतवार, कलाक्रमानुसार नोंद करण्याची परंपरा म्हणजे ............ होय.

अ) शकावल्या ब) बखर क) तवारीखा ड) महजर

११) चरित्रग्रंथाचा समावेश ............ प्रकारात केला जातो.

अ) प्राथमिक ब) दुय्यम क) आधुनिक ड) अलिखित

## २.२.२ तथ्य संकलन पद्धती :

इतिहास लेखनाचा मुख्य आधार ही ऐतिहासिक संदर्भ साधने असतात. या साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन केले जातात ही संदर्भ साधने अनेक प्रकारच्या असतात त्यात नेमके किती माहिती आपल्याला आवश्यक असणारे गोळा करणे अपेक्षित आहे. ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठी कोणत्या साधन स्त्रोतांचा वापर संशोधकांनी करावयाचा आहे आणि कोणत्या पद्धतीने करावयाचा आहे याची पूर्ण कल्पना त्याला असावी

लागते. संशोधकाने आपल्या सोयीनुसार आपल्याला आवश्यक असणारे संशोधन पद्धती संकलन पद्धतीचा पुरस्कार करावा. या पद्धतींचा गुणदोषांची कल्पना संशोधकाला असल्या त्याला माहिती गोळा करणं सोपं जाते. ऐतिहासिक साधनसामग्रीच्या संकलन पद्धतीचा विचार करताना पहिल्यांदा आपल्याला कोणती पद्धत आवश्यक आहे हे संशोधकांनी ठरविले पाहिजे. प्रत्येक ज्ञानशाखेची सामग्री संकलन पद्धती वेगळी असते, तरीही सामाजिक अभ्यासकांच्या काही समान पद्धती आहेत आणि काही भिन्न आहेत. इतिहासच देखील असंच आहे, इतिहासिक सामग्री गोळा करण्यासाठी साधारणपणे चार पद्धतींचा वापर केला जातो.

**अ) निरीक्षण किंवा सर्वेक्षण पद्धती :**

ऐतिहासिक माहिती संकलनाची सर्वात महत्त्वाची व संशोधकांना जास्त उपयुक्त ठरणारी पद्धत म्हणजे निरीक्षण किंवा सर्वेक्षण पद्धत होय. निसर्गात घटना घडत असताना त्या जाणीवपूर्वक व पद्धतशीर पाहणे म्हणजे निरीक्षण. निरीक्षण पद्धती मध्ये ज्या ज्या स्थळी आपल्या संशोधन विषयाला संबंधित माहिती मिळेल त्या स्थळांना भेट देऊन तेथे सूक्ष्म निरीक्षण करून आवश्यक माहिती संशोधक गोळा करतो. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासाठी ही पद्धत विशेष महत्त्वाची ठरते. आधुनिक काळासाठी देखील याचा उपयोग करता येतो. एखाद्या प्रदेशातील सामाजिक-आर्थिक अगर राजकीय घडामोडींच्या परिवर्तनाची माहिती प्रत्यक्ष त्या स्थळांना भेट देऊन मिळू शकते. या दृष्टीने प्रादेशिक इतिहास लेखनासाठी सर्वेक्षणाचा उपयोग होतो. सर्वेक्षणाद्वारे माहिती केवळ संकलित करून संशोधकाला थांबता येत नाही तर संकलित माहितीचे चिकित्सक विश्लेषण करणे हा दुसरा टप्पा असतो. विश्लेषण नंतरच विचार करूनच सामान्य निष्कर्ष काढता येतात अशा विश्लेषणासाठी संख्याशास्त्राची ही मदत घेता येते. या पद्धतीमध्ये सर्वेक्षण कोठे व किती करायचे या मर्यादा संशोधकांनी ठरवायच्या असतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील किल्ल्यांचा अभ्यास करावयाचा असल्यास प्राचीन काळात बांधलेल्या किल्ल्यांचा कि मध्ययुगीन किल्ल्यांचा हे निश्चित करणे आवश्यक आहे. यामुळे निष्कर्ष काढणे अडचणीचे ठरत नाही.

**१) निरीक्षणाचे प्रकार (Types of Observation) :**

सामाजिक संशोधन क्षेत्रामध्ये अभ्यासाच्या अंनुषंगाने निरीक्षणाचे तंत्र वापरले जाते. संशोधनात काय आवश्यक व अभिप्रेत आहे या आधारावरच निरीक्षणाचे काही प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील

**१. सहभागी निरीक्षण** (Participant Observation) **:**

सहभागी निरीक्षणात संशोधक घटनेत भाग घेत असतो. प्रत्यक्ष सहभागी होऊन एखाद्या समस्येचा अभ्यास करणे कठीण काम आहे. अशाप्रकारे निरीक्षण करुन अभ्यास करणारा संशोधक अतिशय बुद्धिमान व व्यवहार चतुर असावा अन्यथा निरीक्षणात काही अर्थ राहत नाही. काही विषय असे असतात की त्यांचे निरीक्षण अप्रत्यक्षपणे करता येत नाही. त्यासाठी निरीक्षकाला स्वतःलाच त्या गटाचा एक भाग बनून जाणे आवश्यक ठरते. ज्या समाजाचा किंवा गटाचा अभ्यास करावयाचा असतो त्यांच्यात जाऊन राहणे, त्यांच्या प्रथा-परंपरा वर्तन, व्यवहार यांचा अभ्यास करणे. प्रसंगी त्यांचा एक घटक होणे व त्या अभ्यास विषयातील लोकांचा विश्वास संपादन करून माहिती गोळा करण्याच्या प्रकाराला सहभागी निरीक्षण पद्धती असे म्हणतात.

सहभागी निरीक्षणाने माहिती गोळा करताना संशोधकांनी कोणतीही विश्वासार्हता धोक्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. गटातील लोकांना संशोधकाच्या वैज्ञानिक हेतूची कल्पना नसते. त्यामुळे त्यांच्या मनात संशोधनाबद्दल संशय निर्माण होण्याची दाट शक्यता असते. तसा संशय निर्माण झाल्यास तातडीने दूर करण्याचा प्रयत्न संशोधकांनी करणे गरजेचे आहे. या पद्धतीची मर्यादा म्हणजे सहभागी निरीक्षण पद्धतीत संशोधन त्या समाजाचा एक घटक बनून माहिती मिळतो. तो त्या समाजाशी पूर्णपणे एकरूप झाल्यामुळे तो तटस्थवृत्ती गमावून बसण्याचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे वस्तुनिष्ठ माहिती मिळवणे अवघड जाते.

**२. असहभागी निरीक्षण पद्धती (Non-Participant Observation Method) :**

सहभागी निरीक्षण पद्धत संशोधक त्या अभ्यासाविषयाचाच एक भाग बनून माहिती गोळा करतो. तर असहभागी निरीक्षणात तटस्थवृत्तीने काठावर राहून संशोधन अभ्यासात गटात न मिसळता संशोधक केवळ हालचालींची नोंद घेतो. असहभागी निरीक्षणात निरीक्षक संशोधन विषयाशी एकरूप न होता घडणाऱ्या घटनांचे निरीक्षण करत असतो. त्यामुळे त्याला त्या विषयातील कोणाबद्दल राग किंवा लोभ वाटण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे संशोधक नि:पक्षपातीपणे निरीक्षण करू शकतो. संशोधक तटस्थ व असहभागी असल्यामुळे समाजात गट असतील तर तो कोणत्या गटात जोडला जात नाही. त्यामुळे माहिती मिळवण्यासाठी सर्व गटाचे त्याला सहकार्य मिळते. पण या मधील दोष म्हणजे संशोधक पूर्वग्रह मनात ठेवून घटना पाहतो. परिणामी प्रत्येक गोष्ट जशी घडली, तशी सांगण्यापेक्षा स्वतःच्या मताने सांगितले जाते. म्हणजेच व्यक्तिमत्वाचा प्रभाव वाढण्याची शक्यता असते. दुसरं संशोधक दूर वरून घटना बघत असतो, त्यामुळे घटनेतील कार्यकारणभाव त्याच्या लक्षात येईलच असं नाही.

**३. संरचित निरीक्षण पद्धत (Structured Observation Method) :**

संरचना म्हणजेच विशिष्ट आराखडा किंवा योजना. जेव्हा एखाद्या घटनेचे काळजीपूर्वक तयार केलेला एखादे विशिष्ट योजनेप्रमाणे, विशिष्ट क्रमाने, विशिष्ट पद्धतीने, विशिष्ट तत्त्वानुसार निरीक्षण केले जाते. तेव्हा त्या पद्धतीलासंरचित निरीक्षण पद्धती असे म्हणतात.

**४. असंरचित निरीक्षण पद्धती (Unstructured Observation Method) :**

संरचित म्हणजे नियंत्रित व असंरचित म्हणजे अनियंत्रित निरीक्षण नव्हे. तर नियंत्रणात काही योजना किंवा संरचना असू शकेल. पण संरचनेत नियंत्रण असतेच असे नाही. नैसर्गिक शाखेतील प्रयोगशाळेत काम करणाऱ्या संशोधकांने पडताळा पाहण्यासाठी केलेले प्रयोग नियंत्रित व संरचित असतो. तर प्रयोगात काय घडणार आहे हे माहीत नसताना प्रथमच केलेला प्रयोग नियंत्रित असला तरी असंरचित असतो

**२) निरीक्षण पद्धतीचे गुण :**

निरीक्षण पद्धतीचे गुण खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. माहिती गोळा करण्याची सोपी पद्धत.

२. सामाजिक संशोधनात अभ्यासाला सुरुवातीस सिद्धांत कल्पनेतून करावी लागते त्यामुळे सिद्धांत कल्पनेला पूरक पद्धत आहे.

३. या पद्धतीत संशोधक स्वतः सगळ्या घटना बघत असल्यामुळे, डोळ्यासमोर घडलेल्या घटनांबद्दल अविश्वास निर्माण होण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे ही एक विश्वसनीय पद्धत आहे.

४. निरीक्षण हे सर्वात अधिक प्रचलित अशी अभ्यासपद्धत आहे.

५. निरीक्षण पद्धतीत निरीक्षण केलेली एकादी घटना पुन्हा घडल्यानंतर त्याचा पडताळा करता येतो.

६. आधुनिक काळात सामाजिक संशोधनाने व्यापक प्रमाण वाढले आहे. त्यासाठी अनेक संस्था अनुदान देते त्यामुळे अनेक संशोधक निरीक्षण पद्धतीचा अवलंब करून माहिती मिळवतात.

**३) निरीक्षण पद्धतीचे दोष :**

१. निरीक्षणाचे तंत्र वापरता येईल अशी अनेक क्षेत्रे आहेत, तरी देखील काही ठिकाणी या तंत्राचा वापर करता येत नाही. काही घटना अशा असतात की त्यांचे निरीक्षण करणे शक्य नसते. उदाहरणार्थ घटस्फोट

२. ज्या घटना क्वचितच घडतात त्यांचा अभ्यास करण्यासाठी निरीक्षण पद्धतीचा उपयोग होत नाही.

३. घटना घडत असताना निरीक्षण करावयाचे असल्याने घटनेच्या कालावधीच्या मर्यादा निरीक्षणावर पडतात.

४. आपल्या निरीक्षणावर आपले पूर्वग्रह यांचा परिणाम होऊ शकतो.

५. घटना ज्या नैसर्गिक परिस्थितीत जशा घडतात तशा त्या पाहणे हा निरीक्षणाचा उद्देश असतो. पण नेहमी हे होईल असे शक्य नाही.

६. निरीक्षण ही प्रत्यक्ष क्रिया असल्यामुळे संशोधकास घटनास्थळी जावे लागते. अनेक घटनांचा अभ्यास करावयाचा असल्यास विखुरलेल्या ठिकाणी घडत असतील त्या प्रत्येक ठिकाणी जावे लागेल ही बाब खर्चिक आहे.

७. ज्या घटना संशोधनात महत्त्वाच्या आहेत. त्याऐवजी ज्या घटना संशोधकास नाट्यमय व मनोवेधक वाटतील त्याच घटनेकडे त्यांचे अधिक लक्ष जाईल. त्यामुळे निरीक्षणात व्यक्तिनिष्ठ येईल.

**ब) प्रश्नावली पद्धत (Questionnaire Method) :**

विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधितांकडून त्या समस्येबाबत माहिती मिळवण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात. प्रश्नावली पद्धत म्हणजे माहिती संकलित करण्याची अप्रत्यक्ष पद्धत होय. प्रश्नावली पद्धतीचा वापर प्रामुख्याने आधुनिक काळातील विशेषता समकालीन माहितीच्या संकलनासाठी होतो. प्रश्नावलीच्या माध्यमातून केवळ प्रश्नांची उत्तरे अपेक्षित जात नाही तर एखाद्या प्रश्नाविषयी

उत्तरदात्यांची भूमिका, अभिवृत्ती, आवडीनिवडी हे सर्व समजण्यासाठी प्रश्नावली सारखे प्रभावी माध्यम वापरले जाते.

**१) प्रश्नावली पद्धतीचे प्रकार :**

प्रश्नावलीचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात एक संरचित प्रश्नावली आणि दोन असंरचित प्रश्नावली.

**१. संरचित प्रश्नावली (Structured Questionnaire) :**

या पद्धतीत संशोधक आपला विषय हेतू संशोधनाची व्याप्ती व खोली अशा सर्व अंगाचा विचार करून कोणते प्रश्न विचारायचे, कोणत्या क्रमाने विचारायचे ते निश्चित करतो. प्रश्नावली छापून तयार करून ती पोस्टाने अथवा मुलाखतकारा बरोबर पाठवली जाते. या प्रश्नांची पर्यायी उत्तर दिलेले असतात. त्या प्रश्नांना बंदिस्त प्रश्न असे म्हणतात. परंतु काही प्रश्नांची उत्तरे संशोधकासच स्पष्ट नसतात किंवा उत्तरदात्याकडून त्याबाबत मते हवी असतात. अशा वेळी प्रश्नांची उत्तरे उत्तरदात्याने आपल्या शब्दात द्यावी अशी संशोधकाची अपेक्षा असते.

संरचित प्रश्नावलीमध्ये बंदिस्त व खुली असे दोन प्रकारचे प्रश्न समाविष्ट केलेले असतात. प्रश्नाचे स्वरूप खुले असावे की बंदिस्त असावे हे संशोधक ठरवीत असतो. बंदिस्त प्रश्नांमुळे संशोधकाचे वर्गीकरणाची काम बऱ्याच प्रमाणात सोपे होते. परिणामी निष्कर्ष त्वरित काढता येतात. खुल्या प्रश्नांमुळे प्रत्येकाने वेगळी उत्तरे दिलेली असतात. त्यामुळे अशा प्रश्नांच्या उत्तराचे वर्गीकरण करताना संशोधकाची कसोटी लागते. त्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो.

**२. असंरचित प्रश्नावली (Unstructured Questionnaire) :**

ज्या समस्येवर फारशी माहिती उपलब्ध नाही. निश्चित प्रश्न व पर्यायी उत्तर देता येत नाहीत. अशा वेळी असंरचित प्रश्नावलीचा उपयोग केला जातो. असंरक्षित प्रश्नावलीतील उत्तरे भिन्न भिन्न असण्याची शक्यता असते. त्यामुळे निरनिराळ्या उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरांची तुलना करणे कठीण असते. सामान्यपणे समस्येबाबत प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी अशा प्रश्नावलीचा उपयोग केला जातो.

**२) प्रश्नावली कशी तयार करावी :**

प्रश्नावली तयार करत असताना प्रश्नावलीची लांबी, प्रत्येक प्रश्नांची लांबी, पर्यायी उत्तरे, प्रश्नांचा क्रम यासंबंधी काळजी घेणे आवश्यक आहे. चांगली प्रश्नावली तयार करण्यासाठी कौशल्य व अनुभव लागतो. प्रश्नावली खालील स्वरूपाची असावी

१. प्रश्नावलीतील प्रश्न सोपे व सुटसुटीत असावेत.

२. प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध असू नयेत.

३. प्रश्नावली फार मोठी असू नये.

४. पर्यायी उत्तरे द्यावीत.

५. सूचक प्रश्न विचारू नयेत.

६. प्रश्नांचा क्रम तर्कशुद्ध असावा.

७. उत्तर देताना आकडेमोड करावी लागू नये.

८. उत्तरदात्याच्या बाबत काही गृहीत धरून प्रश्न विचारू नये.

९. खाजगी स्वरूपाचे प्रश्न विचारू नयेत.

१०. सर्वच प्रश्न एकमेकांशी सुसंगत असावेत.

११. गृहितकावर आधारित प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

प्रश्नावली दिलेल्या सर्वांकडून माहिती भरून येईल अशी शक्यता क्वचित असते. त्याचा पाठपुरावा करावा लागतो अनेकदा निम्म्या प्रश्नावली भरून येत नाहीत. कधी प्रश्नांची उत्तरे संदिग्ध असतात, मुद्याला धरून नसतात. त्यामुळे माहिती मिळवण्याच्या दृष्टीने ती निरुपयोगी ठरतात. काही वेगळी तर काही अनपेक्षित माहिती मिळते त्या माहितीच्या मुद्याला धरून वापर करण्यासाठी मिळालेल्या माहितीचे पृथक्करण, वर्गीकरण व विश्लेषण या प्रक्रिया संशोधकाला कराव्या लागतात. त्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण केल्यानंतरच त्यातून विश्वासाने निष्कर्ष काढून त्यांचा वापर करू शकतो.

**३) प्रश्नावलीचे गुण :**

१. प्रश्नावली पोष्टाने पाठवू शकत असल्याने वेळ, पैसा, श्रम यांची बचत होते.

२. प्रश्नावलीमुळे दूरवरच्या व्यक्तीकडून ही माहिती घेता येते.

३. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करणं सोपं असतं.

४. उत्तरदाता अनामिक राहू शकतो म्हणजेच नावाची गुप्तता राहता येते. त्यामुळे उत्तरदात्यावर दडपण नसते.

**४) प्रश्नावलीचे दोष :**

१. उत्तरदाता साक्षर व सुशिक्षित असावा लागतो. म्हणजे अर्थ समजून उत्तर देणे सोपे जाते.

२. साधारणता उत्तरदात्याकडून कमी प्रतिसाद मिळत असल्यामुळे अधिक व्यक्तींकडे प्रश्नावली पाठवावे लागतात.

३. प्रश्न स्पष्ट, सोपे व सुटसुटीत असावे लागतात. कारण उत्तरदात्याला लांबलचक उत्तर लिहिण्यासाठी अधिक श्रम घ्यावे लागतात.

४. धर्माविषयी, जातीविषयी, गटाविषयी वर्गाविषयी काही पूर्वग्रह समज प्रचलित असतात त्याचा परिणाम उत्तरावर पडत असतो.

### क) मुलाखत पद्धती (Interview Method) :

सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन करण्यासाठी किंवा एखाद्या घटनेमागील परस्पर संबंध जाणून घेण्यासाठी मुलाखत तंत्र वापरले जाते. मुलाखत तंत्रामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा हे दोन मुख्य भाग असतात. या दोघांच्या परस्परातील संवादातून ही प्रक्रिया पुढे जात असते. मुलाखत पद्धतीचा अंगीकार करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप व व्याप्ती याचा विचार संशोधकांनी करणे आवश्यक असते. मुलाखत पद्धती ही प्रश्नावलीचा दृश्य प्रकार आहे. प्रश्नावली मध्ये प्रश्नकर्ता व उत्तरदाता यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होत नाही. पण मुलाखत पद्धती मध्ये हा संबंध प्रस्थापित होत असतो. या दृष्टीने मुलाखत पद्धती अधिक फायदेशीर ठरते. परंतु मुलाखत पद्धतीमध्ये काही मर्यादा आहेत. मुलाखत ही हयात असलेल्या व्यक्तीच्या घेता येतात. त्यामुळे त्यांच्या स्मृतीतील बाबींचीच माहिती फक्त त्यांच्याकडून मिळू शकते.

#### १) मुलाखत पद्धतीचे प्रकार (Types of Interview) :

मुलाखतीचे स्वरूप नेमके कसे आहे यावर मुलाखत पद्धतीचे प्रकार पडतात. सर्वसाधारणपणे मुलाखत पद्धतीचे नियंत्रित किंवा संरचित / बंदिस्त मुलाखत व अनियंत्रित किंवा खुली मुलाखत / मुक्त मुलाखत पद्धत असे दोन प्रकार पडतात.

#### २) नियंत्रित /संरचित/बंदिस्त मुलाखत पद्धत (Structured Interview Method) :

या प्रकारच्या मुलाखत पद्धतीमध्ये कोणते प्रश्न विचारायचे ते प्रथम ठरवले जाते. त्यामुळे मुलाखतकाराचे काम सोपे असते. जे प्रश्न विचारायचे त्याची यादी आगोदरच केली जाते. त्या यादीस प्रश्नावली असे म्हणतात. या प्रकारामध्ये प्रश्नांच्या बरोबरच पर्यायी उत्तरे दिलेली असतात. उत्तरदात्याला फक्त होय किंवा नाही किंवा बरोबर किंवा चुक स्वरूपाची उत्तर द्यायचे असतात. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी सहमत होत नसेल तर निवेदकाच्या उत्तराशी अधिकाधिक समान असणाऱ्या उत्तरा समोर तो वरील प्रमाणे खून करतो. जर यापेक्षा संपूर्णपणे वेगळी उत्तर द्यायचा असेल तर मुलाखतकार ते उत्तर पूर्णपणे लिहून घेतो. नियंत्रित मुलाखतीमुळे तुलना करणे सोपे असते. सामान्यीकरण करणेही सोपे होते. माहिती मिळविण्यासही वेळ कमी लागतो.

#### ३) अनियंत्रित / खुली / मुक्त मुलाखत पद्धत (Unstructured Interview Method) :

नियंत्रित मुलाखतीप्रमाणे या पद्धतीत छापील प्रश्नावली तयार केलेले नसतात. मुलाखतकाराने विषयाचा अभ्यास केलेला असतो. कोणते प्रश्न विचारायचे याचा विचार केलेला असतो. पण अमुकच प्रश्न, अमुक शब्द प्रमाण विचारले पाहिजेत असे बंधन या पद्धतीमध्ये नसते. उत्तरदात्याच्या उत्तर देण्याच्या स्वरूपानुसार प्रश्न विचारले जातात. या पद्धतीमध्ये मुलाखतीत मुलाखतकार ठराविक प्रश्न विचारण्याचे बंधन नसल्यामुळे या मुलाखतीत खूपच लवचिकता असते. ही मुलाखत अनौपचारिक असल्याने निवेदक आपली स्पष्ट व स्वतःची मते मांडू शकतो.

### ड) अनुसूची पद्धती (The Schedule Method) :

अनुसूची ही एक प्रकारची प्रश्नावलीच असते. प्रश्नावलीमध्ये प्रश्नांची यादी असते व उत्तरदात्याने स्वतः कोणाच्याही मदतीशिवाय त्यातील प्रश्नांची उत्तरे भरायचे असतात. परंतु अनुसूचीमध्ये प्रश्नांची यादी ही संशोधकाकडे असते. त्या आधारे संशोधक उत्तरदात्यांना प्रश्न विचारतो व त्यांनी दिलेली उत्तरे लिहून घेतो. काही प्रश्नांबाबत जेव्हा सविस्तर माहिती गोळा करायची असते. तेव्हा सर्वसामान्यपणे अनुसूचित तंत्राचा वापर केला जातो. अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन करीत असताना संशोधकाला उत्तरदात्याची निवड मात्र काळजीपूर्वक करावी लागते.

#### १) अनुसूचीचे प्रकार (Types of Schedule) :

**१. वर्गीकृत अनुसूची :**

एखाद्या घटनेचे वर्गीकरण करून केवळ त्या घटनेसंबंधीचे प्रश्न असणाऱ्या अनुसूचीला वर्गीकृत अनुसूची असे म्हणतात. सूक्ष्म पद्धतीच्या अभ्यासासाठी अशा प्रकारची अनुसूची वापरली जाते.

**२. आत्मचरित्रपर अनुसूची :**

एखाद्या क्षेत्रात विशेष कामगिरी बजावलेल्या व समाजात सन्मानाचे स्थान असणाऱ्या व्यक्तीची माहिती जाणून घेण्यासाठी, त्या व्यक्तीने यश कसे मिळवले याबद्दल त्या व्यक्तीच्या जीवनाबाबत वैयक्तिक प्रश्न तयार केले जातात. त्याला आत्मचरित्रपर अनुसूची असे म्हणतात.

**३. लिखित साहित्याचा वापर करून तयार केलेले अनुसूची :**

एखाद्या घटनेविषयी व्यापक प्रमाणात माहिती अगोदर संकलित झालेली असते. ती अनेकांनी लिहून ठेवलेले असते अशा लेखी माहितीतून संशोधक एखाद्या मुद्यासंबंधी प्रश्नावली तयार करतो. त्याला लिखित साहित्याचा वापर करून तयार केलेली अनुसूची असे म्हणतात.

**४. मुलाखत अनुसूची :**

सामाजिक संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रश्न तयार करून त्या आधारे उत्तरदात्याची मुलाखत घेणे, याला मुलाखत अनुसूची असे म्हणतात.

**५. संस्थात्मक सर्वेक्षण अनुसूची :**

एखाद्या संस्थेविषयी सविस्तर माहिती मिळवण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून जेव्हा एखादी अनुसूची तयार केली जाते तेव्हा तिला संस्थात्मक सर्वेक्षण अनुसूची असे म्हणतात.

**६. घटनाप्रधान अनुसूची :**

जेव्हा एखाद्या घटनेविषयी इतर बघणाऱ्याचे व न बघणाऱ्यांचे विविध दृष्टिकोन, मते समजून घ्यावयाची असतात. तेव्हा घटनाप्रधान अनुसूची तयार केली जाते.

**२) अनुसूचीचे गुणदोष :**

एखाद्या घटनेसंबंधी सर्व पैलू व त्या संबंधित तथ्ये अनुसूचीच्या माध्यमातून जमा होतात. प्रश्नावलीच्या तुलनेत अनुसूचीत अधिक प्रतिसाद मिळतो. प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण ही सर्व तंत्रे अनुसूचीत सामावली आहेत. अनुसूची पद्धतीत  सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे संशोधक व उत्तरदाता यांचे परस्पर संबंध प्रस्थापित होतात. परिणामी मिळणारी माहिती विश्वसनीय व सविस्तर मिळते.

या पद्धतीचा दोष म्हणजे पूर्वग्रहाचा प्रभाव, खर्चिक बाब. या मर्यादा असल्या तरी इतिहासामध्ये अनुसूची तंत्राचा प्रभावीपणे वापर केला जातो.

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. आपण कोणती पद्धत वापरायची हे संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**खालील विधाने योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

१. एखाद्या समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण म्हणजे ................होय.

अ) सर्वेक्षण  ब) प्रश्नावली  क) अनुसूची  ड) यापैकी नाही

२. मुलाखत घेण्याचे ठिकाण...........सोईचे असावे.

अ) मुलाखत घेणाऱ्याच्या  ब) मुलाखत देणाऱ्याच्या

क) मुलाखत ऐकणाऱ्याच्या  ड) यापैकी नाही

३. ..................इतिहास संशोधनात प्रश्नावलीस महत्वपूर्ण स्थान आहे.

अ) प्राचीन  ब) मध्ययुगीन  क) अर्वाचीन  ड) समकालीन

४. आकारिक मुलाखतीत मिळणारी उत्तरे ............. असतात.

अ) अनपेक्षित  ब) मुक्त  क) साचेबंद  ड) अपेक्षित

५. एखाद्या संस्थेविषयी सविस्तर माहिती मिळवण्याच्या उद्देश डोळ्यासमोर ठेवून जेव्हा एखादी अनुसूची तयार केली जाते तेव्हा तिला ............. असे म्हणतात.

अ) संस्थात्मक सर्वेक्षण अनुसूची  ब) घटनाप्रधान अनुसूची

क) मुलाखत अनुसूची  ड) वर्गीकृत अनुसूची

६. एखाद्या विशिष्ट योजनेप्रमाणे, विशिष्ट क्रमाने, विशिष्ट पद्धतीने, विशिष्ट तत्वानुसार निरीक्षण करण्याच्या पद्धतीला ............. असे म्हणतात.

अ) संरचित निरीक्षण पद्धत  ब) असंरचित निरीक्षण पद्धत

क) सहभागी निरीक्षर पद्धत  ड) असहभागी निरीक्षण पद्धत

७. मुलाखत तंत्रामध्ये मुलाखत घेणारा व ............ हे दोन मुख्य भाग असतात.

अ) मुलाखत लिहिणारा ब) मुलाखत देणारा

क) मुलाखत ऐकणारा ड) मुलाखत प्रसारित करणारा

८. चांगली प्रश्नावली तयार करण्यासाठी ............ व ............ लागतो.

अ) वेळ व पैसा ब) कौशल्य व अनुभव क) आवड व अनुभव ड) कौशल्य व पैसा

९. प्रश्नावलीचे प्रामुख्याने ............ प्रकार पडतात.

अ) चार ब) दोन क) तीन ड) सहा

१०. ............ संशोधन क्षेत्रामध्ये अभ्यासाच्या अनुषंघाने निरीक्षणाचे तंत्र वापरले जाते.

अ) सामाजिक संशोधन ब) मूलभूत संशोधन क) वैज्ञानिक संशोधन ड) कला संशोधन

## २.२.३ संदर्भसाधंनांचे चिकित्सक परीक्षण :

संशोधांनासाठी आवश्यक संदर्भसाधंनांचे संकलन केल्यानंतर संशोधन प्रक्रियेतील दूसरा महत्वाचा टप्पा म्हणजे उपलब्ध कागदपत्रांचे परीक्षण करणे होय. इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांची जंत्री असते. गतकाळात काय घडले, कसे घडले याची माहिती ही संदर्भ साधने देत असतात. परंतु त्यातून मिळणाऱ्या माहितीचे परीक्षण आवश्यक असते. कारण अशा कागदपत्रांमध्ये फेरफार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ती मूळ साधने तत्कालीन आहेत की नाही हे ठरविणे आवश्यक असते. शिवाय त्यातून उपलब्ध होणारी माहिती विश्‍वसनीय आहे की नाही याची खात्री होण्यास मदत होते. ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा टप्पा चिकित्सक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा असतो. संकलित कागदपत्रातील माहिती पुरावा म्हणून वापरता येईल किंवा हे ठरविण्यासाठी संशोधकाला कागपत्रांचे परीक्षण करावे लागते.

कागदपत्रांचे परीक्षण दोन प्रकारे केले जाते. एक म्हणजे अंतरंग परीक्षण व दुसरे म्हणजे बहिरंग परीक्षण होय. अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागपत्रांतील मजकुराची विश्वसनीयता तपासली जाते. तर बहिरंग परीक्षणामध्ये कागदपत्राचा लेखक, काळ व स्थळ याबद्दल खात्री केली जाते. अंतरंग परीक्षणामध्ये सकारात्मक व नकारात्मक परीक्षणाचा समावेश होते.

### अ) बहीरंग परीक्षण :

हा ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा पहिला टप्पा आहे. या परीक्षणामध्ये कागदपत्रांची विश्वसनीयता सिद्ध केली जाते. या परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्राचा लेखक, काळ व स्थळ याबद्दल खात्री केली जाते.

### १. कागदपत्रातील विषय :

संशोधकाने जो विषय संशोधनासाठी निवडला आहे त्याच विषयाची कागदपत्रे आहेत का हे पाहिले जाते. संशोधन विषय पेशवेकालीन असेल आणि कागदपत्र शिवकालीन असेल तर तो प्रथम दर्शनीच आपल्या संशोधनास उपयोगी नाही हे निश्चित होईल.

**२. कागदपत्रांचा अस्सलपणा :**

कागदपत्राच्या परीक्षणातील दुसरी बाब म्हणजे कागदपत्रांचा अस्सलपणा ठरविणे. म्हणजे संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे, हस्तलिखिते मूळ स्वरूपाची आहेत की नक्कल केलेली आहेत हे तपासणे. प्रत्येक कालखंडात लिखाणाची पद्धती वेगळी असते, अक्षर वळण वेगळे असते, काही शब्द त्या त्या काळात प्रचलित असतात. यावरूनही उपलब्ध कागदपत्राची शहानिशा करता येते. याचबरोबर कागदपत्रावरील शिक्क्यावरूनही काळ ठरविण्यास मदत होते. हस्तलिखिताची एक प्रत हाती सापडल्यानंतर त्याच्या इतर काही प्रती उपलब्ध आहेत का याचा शोध घ्यावा लागतो. उदा. बखरीच्या दोन प्रती सापडल्या तर कागदपत्राचा पोत, अक्षराचे वळण यावरून मूळ प्रत ओळखता येते. याशिवाय नक्कलकार खऱ्या प्रतीतील काही चुका सुधारण्याचा प्रयत्न करतो व त्यावरूनही सत्यता समजून येते.

**३. लेखकाची सत्यता :**

बऱ्याच जुन्या कागदपत्रातील सुरवातीचा भाग नष्ट झालेला असतो. त्यामुळे लेखकाची ओळख नष्ट झालेली असते. काही वेळा हे जाणीवपूर्वक केलेले असते. कागदपत्राचा लेखक हा समकालीन असणे आवश्यक असते. आपल्या लेखनाला महत्व मिळावे यासाठी प्रसिद्ध व्यक्तीच्या नावाचा वापर करून लेख लिहितात. आशावेळी मजकूरातील आशय, वापरलेले शब्द पाहून कागदपत्राची सत्यता पडताळावी.

**४. शिक्का मारण्याची पद्धत :**

शासकीय पत्रव्यवहारावर ठराविक ठिकाणी शिक्का मारण्याची पद्धत असते. असा शिक्का न दिसल्यास त्या कागदपत्राच्या खरेपणाबद्दल शंका निर्माण होते. किंवा हा शिक्का इतरत्र असल्यासही त्या कागदपत्राच्या बाबत शंका उपस्थित होते.

**५. लेखनकाळ :**

कालगणनाशास्त्र, भाषा शास्त्र, लिपिशास्त्र, हस्तालेखाशास्त्र, यासारख्या सहाय्यकरी शस्त्रांच्या मदतीने आपल्याला लेखकाचा लेखनकाळ समजण्यास मदत होते. ज्या कालखंडाचा अभ्यास करीत आहोत त्याच कालखंडातील कागद असेल तर लेखकही त्याच कालखंडातील असणे अपेक्षित असते. काहीवेळी घटना घडल्यानंतर म्हणजे उत्तरकालीन कागदपत्रे असतात. त्यामुळे लेखनकाळ कोणता आहे हे ठरवल्याने कागदपत्राची सत्यता समजू शकते.

**६. स्थळ :**

या परीक्षणातील शेवटचा महत्वाचा भाग म्हणजे कागदपत्राचे स्थळ निश्चित करणे. कधी कधी स्थळांचे स्पष्ट उल्लेख नसतात. अशावेळी ज्या ठिकाणी इतिहास घडला आहे अशा मुख्य ठिकाणाच्या जवळील भौगोलिक बाबी म्हणजे नद्या, पर्वत, गाव याचा उपयोग होतो. तसेच प्रदेशानुसार शब्द ही वेगवेगळे असतात. त्यामुळे भाषिक बदलाच्या आधारेही आपल्याला स्थळ निश्चित करता येते.

थोडक्यात, संशोधक बहिरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्राची सत्यता तपासत असतो. या परीक्षणामध्ये कागदपत्राचा काळ, स्थळ व लेखक जुळतात किंवा नाही याची खात्री केली जाते.

**ब. अंतरंग परीक्षण :**

अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रातील मजकूराची सत्यता तपासण्यात येते. मिळालेले संदर्भसाधन संशोधनासाठी उपयोगी आहे का? हे पाहिले जाते. या परीक्षणामध्ये कागदपत्रातील मजकूराची चिकित्सा केली जाते. म्हणजे लेखकाने आपल्या पत्रात/ लेखात काय म्हटले आहे, ते म्हणण्यामागची त्याची भूमिका काय? त्याचे कोणाविषयी काय मत आहे, लेखकाची वैचारिक भूमिका, मजकूरातील शब्दार्थ व गर्भितार्थ अशा बाबींचे परीक्षण केले जाते. या अंतरंग परीक्षणाचे दोन भाग पडतात. एक सकारात्मक परीक्षण व दुसरा भाग म्हणजे नकारात्मक परीक्षण होय.

- **सकारात्मक परीक्षण:**

सकारात्मक परीक्षणामध्ये कागदपत्रातील आशय समजावून घेण्याचा प्रयत्न असतो. लेखकाने लिहीलेल्या वाक्यांचा अर्थ पाहण्याचा प्रयत्न यामध्ये केला जातो. म्हणजेच शब्दांचा लौकिक अर्थ व खरा अर्थ समजावून घेतला जातो. लेखकाने कागदपत्रामध्ये मांडलेली सर्वच मते खोटी असतीलच असे नाही. यातील काही भाग खरा असू शकतो हा सकारात्मक विचार यामध्ये असतो.

**वाच्यार्थ व गर्भितार्थ :** कागद ज्या काळातील आहेत त्या काळातील भाषेचे ज्ञान संशोधकाला असणे आवश्यक आहे. कारण काळानुसार व प्रदेशानुसार भाषा बदलत असते. त्यामुळे शब्दांचे वाच्यार्थ व गर्भितार्थ समजणे आवश्यक असते. एखाद्या काळामध्ये प्रचलित असलेला शब्द नंतरच्या काळात लुप्त झालेला असतो. किंवा एखाद्या प्रदेशात वापरत असलेल्या शब्दाला दुसऱ्या प्रदेशात दुसरा शब्द प्रचलित असतो. याशिवाय शहरी व ग्रामीण भागानुसारही शब्दांचे अर्थ वेगवेगळे असतात. त्यामुळे बाबींचे ज्ञान संशोधकाला असणे आवश्यक असते.

याशिवाय लेखकाने वापरलेले काही शब्द व लेखातील इतर माहिती ही विसंगत वाटत असते. जेव्हा असा फरक जाणवतो तेव्हा संशोधकाच्या विधानाचा संदर्भ लक्षात घेऊन शब्दाचा गर्भित अर्थ काय असेल हे संशोधकाने समजून घेतले पाहिजे. थोडक्यात सकारात्मक परीक्षणात लेखामधील विधानांचा खरा अर्थ समजावून घेतला जातो.

- **नकारात्मक परीक्षण :**

लेखातील मजकूराची विश्वसनीयता ठरविण्यासाठी नकारात्मक परीक्षण महत्वाचे असते. लेखातील विधाने लेखकाने कोणत्या हेतूने केलेली आहेत, अशा विधांनांचा संदर्भ, त्यावेळीची परिस्थिती या घटकांची तपासणी या परीक्षणात केली जाते. नकारात्मक परीक्षणात लेखकाच्या हेतूची, प्रामाणिकपणाची तपासणी केली जाते. याचबरोबर केलेली विधाने अचूक आहेत का? नसल्यास त्याची करणे कोणती याही बाबी तपासल्या जातात.

**१) लेखकाचा प्रामाणिकपणा :** ज्या साधनाचे संशोधक परीक्षण करणार असतो, त्या साधनाच्या

लेखकाच्या व्यक्तिमत्वाची, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीची, त्याची वैचारिक व बौद्धिक पातळी, त्याची मानसिकता या बाबींची माहिती करून घेणे आवश्यक असते. या माहितीच्या आधारे संशोधकाला संदर्भ साधनांची विश्वसनीयता ठरविण्याचे काम सोपे होते.

**२) लेखकाचा आश्रय :** एखाद्या लेखकास राजाश्रय असल्यास, लेखक शासकीय सेवेत असल्यास किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य असल्यास अशा लेखकाची विधाने व्यक्तिनिष्ठ असण्याची शक्यता असते. कारण त्याच्यावर असलेल्या राजाश्रयामुळे त्याला आपली मते मोकळेपणांनी मांडता येत नाहीत.

**३) धार्मिक प्रभाव :** व्यक्तीवर असलेला धार्मिक प्रभाव त्याच्या लिखाणावरही पडू शकतो. त्यामुळे त्याच्यावर कोणत्या धार्मिक विचाराचा प्रभाव आहे याची माहिती असणे आवश्यक असते. अशा व्यक्तीकडून विनाकारण दुसऱ्या धर्माबद्दल अनुदार धोरण असण्याची शक्यता असते.

**४) लेखकाची सामाजिक पार्श्वभूमी :** लेखक समाजातील कोणत्या वर्गाचा किंवा त्याचा आर्थिक स्तर त्याचा कोणता आहे, किंवा तो कोणत्या सामाजिक गटाचे प्रतिनिधित्व करतो याचाही प्रभाव लिखानावर असू शकतो.

**५) विचारसारणी :** राष्ट्रवादी, बुद्धिवादी, कल्पनावादी, अतिरेकी अशा कोणत्या विचाराचा प्रभाव लेखाकावर आहे हे माहीत असणे आवश्यक असते. कारण या विचारसरणीचे प्रतिबंब लिखानामध्ये उमटत असते.

**६) लेखकाचा हेतू :** एखादे विधान करण्यामागे लेखकाचा कोणता हेतू आहे हे ही समजून घेणे अपेक्षित असते. अतिशयोक्तीपूर्ण विधान करण्यामागे, प्रौढी मिरविण्यासाठी किंवा आपण ज्याच्या आश्रयास आहे त्याची वाह वाह मिळविण्यासाठी अशी विधाने केलेली आहेत का? यामागे लेखकाचा हेतू काय आहे हे ही तपासवे लागते.

**७) लेखकाची पात्रता :** ज्या लेखकाने कागदपत्रे लिहिली आहेत त्याची पात्रता कोणती? ज्या घटनेचे वर्णन लेखामध्ये केलेले आहे ती घटना त्याने स्वत: जवळून पाहिली, आहे अनुभूवली आहे का? हे तपासवे. यावरून संशोधकाला लेखकाची पात्रता समजून येऊ शकते.

**८) सत्य सांगण्याची क्षमता :** एखादी घटना लेखकाने पाहिली असल्यास त्याचे वर्णन कागदपत्रांमध्ये जशी घडली तसेच असण्याची खात्री देता येत नाही. आपल्या सोयीनुसार त्यातील काही भाग लेखक आपल्या लिखाणातून वगळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही वेळा लेखकाने घटना प्रत्यक्ष पाहिली नसेल, परंतु उत्तम प्रतिभाशक्ती असेल तर त्या घटनेचे वर्णन हुबेहूब करेल, घटना प्रत्यक्ष पाहिल्यासारखे वर्णन करू शकेल. परंतु, असा लेखक सत्याबरोबर असल्या बाबी सुद्धा घुसडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**९) घटनेचा साक्षीदार :** लेखक घटनेचा प्रत्यक्षदर्शी (Eye Witness) असेल तर घटनेचे वर्णन अचूक होण्याची अशक्यता असते. त्यामध्ये चुका कमी राहतात. त्यामुळे लेखक घटनेचा प्रत्यक्षदर्शी आहे की ऐकीव माहितीच्या आधारे लिखाण केले आहे हे पाहणे आवश्यक ठरते.

**१०) लेखनकाळ :** घटनेचे वर्णन लेखकाने केव्हा केले आहे यावरही कागदपत्राचे महत्व ठरते. घटना घडून गेल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर घटनेचे लेखन केले गेले असेल तर, लेखकाला घटनेचे विस्मरण होऊ शकेल. यामुळे घटना, स्थळ, काळ, वेळ, व्यक्ती याबाबत गफलत होऊ शकते. लिखाणकाळ हा घटना घडल्यानंतर लगेचच असेल तर लिखाणाची विश्वासार्हता अधिक असते.

**११) लेखकाची अभिरुची :** लेखकाची अभिरुची एखाद्या घटनेत नसेल आणि त्या घटनेचे लिखाण त्याने केले असेल तर त्याचे वर्णन तो मनापासून करणार नाही. याच्या बरोबर उलट जर लेखकाला संबंधित विषयाची आवड असेल तर त्या घटनेचे वर्णन तो हुबेहूब करेल.

**१२) बौद्धिक क्षमता :** एखाद्या घटनेची सत्य माहिती देण्यासाठी लेखकाकडे बौद्धिक क्षमता असावी लागते. कारण विषयाचे ज्ञान नसेल तसा अनुभव नसेल बौद्धिक पात्रता नसेल. तर अशा लेखकांकडून घटनेचे वर्णन चुकीचे होण्याची शक्यता असते.

**१३) सत्य सांगण्याची इच्छा :** लेखकाकडे सत्य सांगण्याची क्षमता व पात्रता असते पण तरीही तो सांगू शकत नाही. त्याची कारणे म्हणजे सत्य सांगितल्यास हितसंबंधास बाधा पोहचेल, घटनेबद्दल लेखकाच्या मनामध्ये पक्षपात असणे, भाषाशैलीच्या ओघात.

अशाप्रकारे लेखक प्रामाणिक असला तरी त्याच्या कळत नकळत त्याच्या लिखाणात चुका होण्याची शक्यता असते. त्या चुका लक्षात घेऊन संशोधकांनी कागदपात्राचे परीक्षण करावे. मूळ कागदपत्रांचे परीक्षण करताना बर्हिरंग परीक्षणाद्वारे लेखाचे स्थळ, काळ, लेखक याची निश्चिती करण्यात येते. तर अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून सकारात्मक परीक्षणामध्ये लेखाचा वाच्यार्थ व मूळ अर्थ समजून घेतला जातो. नकारात्मक परीक्षणामध्ये लेखकाची लेख लिहिण्यामागची भूमिका तपासली जाते म्हणजे लेखकाचा प्रामाणिकपणा तपासला जातो.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

**खालील विधाने योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

१. कागदपत्रांचे परीक्षण ............. प्रकारे केले जाते.

अ) दोन  ब) तीन  क) चार  ड) पाच

२. बखरी ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मराठी भाषेवर ............ भाषेचा प्रभाव होता.

अ) उर्दू  ब) फारशी  क) इंग्रजी  क)हिंदी

३. इतिहासलेखनामध्ये वृत्तपत्र या संदर्भ साधनाचा ............. साधनामध्ये समावेश होतो.

अ) प्राथमिक  ब) दुय्यम  क) समकालीन  क) अस्सल

४. संशोधन प्रक्रियेमध्ये ............. ही प्रथम पायरी आहे.

अ) पुराव्यांचे संकलन　　　　ब) विषयाची निवड

क) साधनाची क्रमवारी　　　　क) मांडणी

५. .............. मध्ये लेखकाची सत्यता तपासून पाहिली जाते.

अ) कालनिर्णय　　ब) सूची　　क) बहिरंग परीक्षण　　क) अंतरंग परीक्षण

६. लेखातील मजकूराची विश्वसनीयता ठरविण्यासाठी .............. परीक्षण महत्त्वाचे आहे.

अ) सकारात्मक　　ब) नकारात्मक　　क) टिकात्मक　　ड) यापैकी नाही.

७. कागद ज्या काळातील आहे त्या काळातील .............. ज्ञान संशोधकाला असणे आवश्यक आहे.

अ) भाषेचे　　ब) लोकांचे　　क) परिस्थितीचे　　ड) भूगोलाचे

८. ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा .............. हा पहिला टप्पा आहे.

अ) बहिर्रंग　　ब) अंतरंग　　क) सकारात्मक　　ड) नकारात्मक

९. इतिहासकाराला वैयक्तिक पूर्वग्रह असल्यास इतिहासलेखन .............. बनते.

अ) वस्तुनिष्ठ　　ब) व्यक्तिनिष्ठ　　क) एकांगी　　ड) तर्कसंगत

१०. संशोधन प्रक्रियेमध्ये .............. ही प्रथम पायरी आहे.

अ) कागदपत्रांचे संकलन　ब) विषयाची निवड　क) मांडणी　　ड) कालनिर्णय

## २.३. सारांश :

इतिहास म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास होय. हा भूतकाळ समजण्यासाठी साधनरूपी पुरावा आवश्यक असतो. या इतिहासाच्या पुराव्यांचे म्हणजेच साधनांचे प्राथमिक साधने व दुय्यम साधने असे विभाजन केले जाते. प्राथमिक साधने हि लिखित व अलिखित अशा दोन्ही स्वरुपाची असतात. या प्राथमिक साधनांना संशोधनामध्ये अव्वल दर्जाची व विश्वसनीय साधने मानली जातात. २१ व्या शतकामध्ये साधनांच्या स्वरूपामध्ये बदल झाला आहे. त्यामुळे इंटरनेट, टेलिव्हिजन, रेडिओ, लघुपट यांचाही वापर साधन म्हणून केला जातो. ऐतिहासिक साधनसामग्रीच्या संकलन पद्धतीचा विचार करताना पहिल्यांदा आपल्याला कोणती पद्धत आवश्यक आहे हे संशोधकांनी ठरविले पाहिजे. प्रत्येक ज्ञानशाखेची सामग्री संकलन पद्धती वेगळी असते. ऐतिहासिक सामग्री गोळा करण्यासाठी साधारणपणे चार पद्धतींचा वापर केला जातो. यामध्ये निरीक्षण किवा सर्वेक्षण पद्धत, प्रश्नावली, मुलाखत पद्धत व अनुसूची पद्धत यांचा समावेश होतो. या प्रत्येक पद्धतीमध्ये गुणदोष आहेत. त्यामुळे संशोधकाने यापैकी कोणती पद्धत संशोधनासाठी वापरायची हे त्याने निवडलेल्या संशोधन विषयावर अवलंबून असते. संदर्भ साधनांची जमवाजमव झाल्यानंतर महत्वाचा भाग म्हणजे त्या साधनांचे

परीक्षण होय. हे दोन पद्धतीने केले जाते पहिली पद्धत म्हणजे बर्हिरंग पद्धत होय. यामध्ये कागदपत्राची विश्वासनीयता तपासण्यात येते तर दुसरी पद्धत म्हणजे अंतरंग पद्धत होय. यामध्ये कागदपत्रातील मजकूरातील सत्यता तपासण्यात येते. एकंदरीत ऐतिहासिक संशोधन प्रक्रियेमध्ये संदर्भ साधनांचे संकलन हा भाग महत्वपूर्ण आहे.

## २.४. पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण.

प्रश्नावली : विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधितांकडून त्या समस्येबाबत माहिती मिळवण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात.

मुलाखत : तोंडी पद्धतीने संदर्भासाधन जमविण्याची पद्धत.

## २.५. स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**● स्वयं अध्ययान प्रश्न : १**

१. अ) एकोणिसाव्या
२. ब) प्राथमिक
३. ब) नभोवाणी
४. ब) इंटरनेट
५. क) टी.व्ही.
६. ब) कार्बन १४ पद्धत
७. ब) अविनाशी
८. ड) तांबे
९. ब) भूगोल व इतिहास
१०. ब) दुय्यम

**● स्वयं अध्ययान प्रश्न : २**

१. अ) सर्वेक्षण
२. ब) मुलाखत देणाऱ्याच्या
३. क) अर्वाचीन
४. क) साचेबंद
५. अ) संस्थात्मक सर्वेक्षण अनुसूची
६. अ) संरचित निरीक्षण पद्धत
७. ब) मुलाखत देणारा
८. ब) कौशल्य व अनुभव
९. ब) दोन
१०. अ) सामाजिक संशोधन

**● स्वयं अध्ययान प्रश्न : ३**

१. अ) दोन
२. ब) फारशी
३. ब) दुय्यम
४. ब) विषयाची निवड
५. क) बर्हिरंग परीक्षण
६. ब) नकारात्मक
७. अ) भाषेचे
८. अ) बहिरंग
९. ब) व्यक्तिनिष्ठ
१०. ब) विषयाची निवड

## २.६. सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. संदर्भ साधन म्हणजे काय? त्याचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२. प्राथमिक संदर्भ साधनांची माहिती द्या.

३. दुय्यम संदर्भ साधन म्हणजे काय? त्याची माहिती द्या.

४. आधुनिक संदर्भ साधनांचे वर्गीकरण करा.

५. सर्वेक्षण पद्धत म्हणजे काय त्याची माहिती द्या.

६. मुलाखत पद्धत म्हणजे काय? व त्याचे प्रकार स्पष्ट करा.

७. संदर्भ साधनांचे चिकित्सक परीक्षण करा.

**ब) टिपा लिहा.**

१. समकालीन कागदपत्रे

२. बखर

३. आकाशवाणी

४. निरीक्षण/सर्व्हेक्षण पद्धत

५. प्रश्नावली

६. मुलाखत पद्धत

७. अनुसूची

८. नकारात्मक परीक्षण

## २.७ संदर्भ ग्रंथ :


१. कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, २००४

२. सरदेसाई, बी.एन., इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५

३. शिंदे, सुखदेव, मासाळ धनाजी, देशमुख राजेंद्र, इतिहासलेखनशास्त्राची तोंडओळख व इतिहासाची उपयोगिता, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद २०१५

४. सातभाई, श्रीनिवास, इतिहासलेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद २०११

५. गाठाळ, एस.एस., कैलाश पब्लिशर्स, औरंगाबाद २०११.


❖❖❖

घटक – ३

# इतिहासाचे लेखन प्रक्रिया व सादरीकरण

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या (Steps of Historical Research)

 ३.२.२ साधनांचे विश्लेषण आणि अर्थ (Data Analysis and Interpretation)

 ३.२.३ सादरीकरण (Presentation)

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला खालील बाबी समजून येतील.

१. ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्यांची माहिती मिळेल.

२. संशोधनामध्ये साधनांचे विश्लेषण आणि त्याचा अन्वयार्थ कसा लावतात हे समजेल.

३. इतिहास संशोधनामध्ये सादरीकरण कसे करतात हे सांगता येईल.

## ३.१ प्रस्तावना :

इतिहास म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येतो तो म्हणजे भूतकाळ. भूतकाळात घडून गेलेल्या घटना या इतिहासलेखन प्रक्रियेचा आत्मा असतो. एकोणिसाव्या शतकात इतिहास लेखनाला गती प्राप्त झाली. केंब्रिज

विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक जे. बी. ब्युरी यांनी १९०३ साली आपल्या भाषणात प्रथमच इतिहास हे शास्त्र आहे, याखेरीज दुसरे काही नाही (History is a science ; no less no more) असे धाडसी विधान केले. शास्त्राला जे नियम असतात तेच नियम इतिहासाला असतात. त्यामुळे इतिहास या विषयाला शास्त्र मानले पाहिजे असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यानंतर यावर अनुकूल- प्रतिकूल अशा प्रतिक्रिया उमटल्या. इतिहास हे शास्त्र मानले तर शास्त्रीय ज्ञान हे पूर्णपणे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असते, म्हणून एकोणिसाव्या शतकापासून इतिहासात वस्तुनिष्ठतेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

इतिहास लेखनाची व्याख्या करताना कॉलिन्स या विद्वानाने म्हटले आहे की, इतिहासाचे लिखाण, इतिहासलेखन पद्धतीचा विकास, इतिहासातील संशोधन व विकास आणि संदर्भ साहित्य म्हणजेच इतिहासलेखन होय. इतिहास लेखक पुराव्यांच्या आधारे इतिहासाची मांडणी करत असतो. इतिहासलेखन करीत असताना गतकाळ जाणून घेणे आवश्यक असते. इतिहास जाणून घेताना त्यास पद्धतीशास्त्राचा निकष लावावा लागतो व त्याप्रमाणे इतिहासलेखन प्रक्रिया राबवावी लागते.

**● इतिहास संशोधन म्हणजे काय? :**

गतकालीन घटनांची पद्धतशीरपणे तपासणी करण्याची प्रक्रिया म्हणजे इतिहास संशोधन होय. इतिहास विषयाला सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर 'इतिहास संशोधन' ही संकल्पना रूढ झाली. इतिहासामध्ये कागदपत्रे व पुराव्यांच्या आधारे प्रचलित ज्ञानामध्ये भर टाकून एखाद्या प्रश्नावर नवीन प्रकाश टाकला जातो. बऱ्याच वेळा संशोधकाला जुन्या कागदपत्रांचा शोध घेऊन इतिहासातील बदलत्या काळासंदर्भातील संदर्भ शोधून त्याचा नवा अर्थ लावावा लागतो. म्हणून बर्ग व ल्यूरे यांनी इतिहास संशोधनाचा अर्थ सांगताना म्हटले आहे की, 'इतिहास लेखनातील जटिल बारकावे, अर्थ, घटना आणि भूतकाळातील कल्पना ज्यामुळे वर्तमानकाळाला प्रभावित केले जाते. त्यादृष्टीने कल्पनापूर्वक, पद्धतशीरपणे मांडणी करण्याचा केलेला प्रयत्न होय.' इतिहास संशोधन ही एक सतत चालत राहणारी प्रक्रिया आहे. जोपर्यंत मानवाला संपूर्ण भूतकाळ स्पष्टपणे पुराव्याच्या आधारे लिहिता येणार नाही. तोपर्यंत संशोधन प्रक्रिया चालूच राहणार आहे. काळ हा थांबलेला नाही. त्यामुळे आजचा वर्तमान हा उद्याचा भूतकाळ असतो आणि तो भूतकाळ इतिहास संशोधकाला अभ्यासावा लागतो. संशोधन कार्याला सुरुवात करताना संशोधकाला स्वतःलाच अनेक प्रश्न विचारावे लागतात. त्यामध्ये संशोधन विषयाची निवड कशी व कोणत्या दृष्टिकोनातून करावयाची? त्यासाठी कोणती संदर्भ साधने वापरावी? ती कोठून उपलब्ध होतील? साधनांचे संकलन कसे करावे? संशोधनासाठी कोणत्या पद्धतीचा वापर करावा? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधल्यानंतर इतिहासलेखन प्रक्रियेची माहिती घ्यावी लागते. संशोधन प्रक्रियेची माहिती घेतल्यामुळे इतिहास कसा लिहावा? हे आपणाला समजते. या ऐतिहासिक संशोधन प्रक्रियेच्या पायऱ्या (टप्पे) पुढीलप्रमाणे आहेत. तत्पुर्वी इतिहास संशोधकाकडे संशोधन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांची माहिती घ्यावी लागेल.

**● संशोधकाचे गुण :**

संशोधन ही एक दिर्घकालीन प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये संशोधकाला महत्वाची जबाबदारी पार पाडावी

लागते. संशोधन करीत असताना संशोधकाच्या अंगी काही उपजत गुण असणे अपेक्षित असते. त्यास कष्ट करण्याची मानसिकता ठेवावी लागते. संशोधनासाठी निवडलेल्या विषयात संशोधकाला रुची असली पाहिजे. निवडलेल्या विषयावर संशोधन करीत असताना कितीही कष्ट पडले तरी ते आनंदाने सहन करण्याची क्षमता त्याच्याकडे असली पाहिजे. बऱ्याच वेळा संदर्भ साधने मिळवण्यासाठी अडचणी येत असतात. दुर्मिळ संदर्भ साधने उपलब्ध होत नाहीत अशावेळी निराश न होता ती साधने मिळविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. संशोधन ही प्रक्रिया समाजासाठी हितकारक असल्याने संशोधकाने आपल्या अंगी नम्रता, शालीनता, धीरगंभीरपणा, संयम व शांतता बाळगणे अत्यावश्यक असते. तरच संशोधनाचे निश्चित ध्येय पूर्णत्वास जाते. नवीन ज्ञान मिळवण्याची तीव्र इच्छाशक्ती व जिज्ञासा संशोधकाकडे असायला हवी. विषयासंबंधीची नवनवीन संदर्भ साधने शोधणे जिज्ञासेमुळेच शक्य होते.

संशोधन ही प्रक्रिया वेळखाऊ असल्याने संशोधकाला शारीरिक व बौद्धिक परिश्रम करण्याची तयारी ठेवावी लागते. कोणत्याही घटनेचा सूक्ष्म अभ्यास करून त्या घटनेचे तर्कसुसंगत विवेचन करता आले पाहिजे. पुरावे निवडत असताना नेमके आणि आवश्यक तेवढेच पुरावे निवडण्याचा निर्णय संशोधकास घ्यावा लागतो, तो निर्णय घेण्याची क्षमता त्याच्याकडे असली पाहिजे. संकलित केलेल्या संदर्भ साधनांची सुसंगतवार अशी मांडणी केली तरच लेखन प्रभावी ठरते. संशोधकाच्या अंगी असणारा सत्यनिष्ठा हा एक महत्त्वाचा गुण मानला जातो. घटनेतील सत्य शोधत असताना त्या घटनाकडे भावनाविवश अथवा आपुलकीच्या दृष्टीने पाहू नये तर त्या घटनाकडे तटस्थपणे पाहून सत्यता पडताळली पाहिजे. या गुणांशिवाय इतरही काही गुण संशोधकाकडे असणे आवश्यक आहे ते पुढीलप्रमाणे–

१. लिखाणात व्यक्तिनिष्ठता आणू नये.

२. लिखाणात वस्तुनिष्ठता आणावी.

३. लिखाण वाचकांपुढे प्रभावीपणे मांडण्यासाठी कल्पनाशक्ती, सृजनशीलता व प्रतिभेचा वापर करावा.

४. संशोधनाची भाषा सरळ, साधी व सोपी असावी.

५. लिखाणामध्ये वाक्य छोटी–छोटी असावीत व त्यामध्ये अर्थपूर्ण शब्दांचा समावेश असावा.

६. लिखाणामध्ये टोकाची टीका करू नये.

७. लिखाण तर्कशुद्ध पातळीवर टिकाव धरणारे असावे.

वर दिलेल्या या सर्व गुणांनी संशोधक जर परिपूर्ण असेल तर हे संशोधन पूर्णत्वास जाऊ शकते. अशा संशोधनाचा समाजासाठी उपयोग होतो.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या (टप्पे) (Steps of Historical Research) :

इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये इतिहास लिहिण्यासाठी ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या/टप्पे माहीत असणे

आवश्यक आहे. यामुळे आपणाला इतिहास कसा लिहावा? हे समजते. ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या/टप्पे खालीलप्रमाणे –

**१. विषयाची निवड** (Selection of Topic) **:**

इतिहास संशोधनातील पहिली पायरी म्हणजे विषयाची निवड होय. संशोधनासाठी विषयाची निवड करीत असताना संशोधकाला विषयाच्या अनुषंगाने संदर्भ साधनांचे वाचन करावे लागते. बऱ्याच वेळा एखादा विषय आवडला म्हणून त्याची लगेच(गडबडीने) विषयाची निवड करणे हे संशोधनामध्ये अविवेकीपणाचे ठरू शकते. कारण आवडलेल्या विषयावर पुर्वी संशोधन झालेले असू शकतो किंवा त्याची संदर्भ साधने मिळणे कठीण असते. त्यामुळे विषयाची निवड करीत असताना आपणाला काही मूलभूत गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे असते.

**अ)** संशोधनाला प्रारंभ करण्यापूर्वी इतिहासातील संदर्भ साधनांचे अध्ययन करता – करता संशोधकाच्या मनामध्ये काही विषय घोळत असतात. त्या विषयातील कोणता विषय संशोधनासाठी योग्य ठरेल? याचा विचार संशोधकाने केला पाहिजे. त्या विषयावर पूर्वी संशोधन झालेले आहे काय? त्या विषयाचा अभ्यास आपणाला परिपूर्णरित्या करता येईल काय? त्यासाठी आवश्यक कागदपत्रे आपणास उपलब्ध होतील का? याचा साकल्याने विचार करून विषयाची निवड करणे शहाणपणाचे ठरते. जर संशोधकाला आपला विषय योग्य प्रकारे निवडता आला नाही तर त्या विषयास संशोधक परिपूर्ण न्याय देऊ शकत नाही. याचा परिणाम म्हणून संशोधकाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**ब)** संशोधकाने विषय निवडताना चार मुद्दे हे लक्षात ठेवले पाहिजेत. १) निवडलेल्या विषयात आपणाला रुची आहे का? २) त्या विषयाशी संबंधित कागदपत्रांची उपलब्धता होईल काय? ३) मुद्दा उपलब्ध असणारी कागदपत्रे मिळवणे आपल्या आवाक्यातील गोष्ट आहे का? आणि ४) जर आपण या विषयावर संशोधन पूर्ण केले तर ते नाविन्यपूर्ण असेल का? या प्रश्नांची उत्तरे आपणास समाधानकारक मिळाली तरच आपणास संशोधन करण्यामध्ये काही अडचण भासणार नाही.

**क)** संशोधकाने जो विषय संशोधनासाठी निवडलेला असेल. त्या विषयाशी संबंधित कागदपत्रे ज्या भाषेत उपलब्ध आहेत, ती भाषा संशोधकाला अवगत असणे आवश्यक ठरते. उदा. मराठा कालखंडातील बहुतांशी कागदपत्रे उर्दू, फारशी, मोडी आणि मराठी भाषेत आहेत. जर मराठा कालखंडातील विषय निवडायचा असेल तर किमान या भाषा अथवा लिप्यांचे ज्ञान असल्याशिवाय आपणाला संशोधन पूर्ण करता येत नाही. त्यासाठी संशोधन विषयाची निवड अतिशय काळजीपूर्वक करावी.

**ड)** आपण निवडलेल्या संशोधन विषयातून नाविन्यपूर्ण, मूलभूत आणि ज्ञानात भर टाकणारे संशोधन होणार आहे का? याचाही विचार विषयाची निवड करताना केला पाहिजे.

एकूणच संशोधन विषयाची निवड करीत असताना वरील बाबी आपण लक्षात घेतल्यास संशोधनाची वाटचाल सुकर होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संशोधन करीत असताना शक्यतो स्थानिक विषय निवडीवर

भर दिला पाहिजे. जेणेकरून सभोवतालच्या परिसराचे सूक्ष्म निरीक्षण करून परिसरातील ऐतिहासिक वास्तू, किल्ले, वाडे, मंदिरे, मशिदी, चर्च इत्यादींचा अभ्यास करता येईल.

२. **पूर्व संशोधनाचा (साहित्य) आढावा** (Review of Literature) **:**

संशोधन विषय निवडत असताना संशोधकाला विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती असणे गरजेचे असते. त्यासाठी संशोधनपर प्रबंध, संदर्भग्रंथ, संशोधन पत्रिका यांचे वाचन करावे लागते. संशोधन विषय निश्चित करत असताना संशोधक जेवढे जास्त पूर्व वाचन करेल तेवढे त्याचे संशोधन उत्तम दर्जाचे होण्यास मदत होते. आपल्या संशोधन विषयाची निवड निश्चिती झाल्यानंतर आत्तापर्यंत त्यासंदर्भात जे संशोधन झालेले आहे ते तपासणे व त्याचा आढावा घेणे नितांत आवश्यक असते. सदर विषयासंदर्भात विविध विद्यापीठांमधून कोणते संशोधन झालेले आहे अथवा चालू आहे याची माहिती घेणेही आवश्यक ठरते. अलीकडे शोधगंगासारख्या (Shodhganga) वेबसाईटवर बहुतांश विद्यापीठामधील आपल्या विषयाचे शोधप्रबंध मिळतात त्याचाही उपयोग होतो. यामुळे आपणाला आपण निवडलेल्या संशोधन विषयाचा आवाका ठरविणे फायद्याचे होते. शिवाय आपणाला कोणत्या दृष्टिकोनातून संशोधन करावयाचे आहे हेही समजते.

३. **गृहीतकांची मांडणी** (Hypothesis) **:**

गृहीतके म्हणजे संशोधनाविषयी केलेले तात्पुरते पूर्वानुमान होय. गृहीतके या शब्दाला इंग्रजीमध्ये Hypothesis असेही म्हणतात. संशोधनाच्या सुरुवातीलाच इतर सामाजिकशास्त्रांप्रमाणे इतिहास संशोधनातही गृहीतकांची मांडणी करून त्याला अनुसरून विचार करावा लागतो. विषय निवडीच्या वेळी संशोधकाकडे असणाऱ्या ज्ञानावरच आधारित गृहीतकाची मांडणी केली जाते. त्यामुळे संशोधनाअंती अशी गृहितके खरी किंवा खोटी ठरु शकतात. गुड अँड हॅट हे आपल्या 'मेथड इन सोशल रिसर्च' या ग्रंथात म्हणतात, गृहीतकृत्याच्या मांडणीशिवाय होणारे सामाजिकशास्त्रातील संशोधन दिशाहीन ठरते. गृहीतकांमुळे संशोधनाला दिशा मिळते. संशोधनामध्ये निष्कर्ष काढण्यास मदत होते. म्हणून गृहीतकांना संशोधनाचा मुख्य आधार मानले जाते. संशोधकांनी संशोधनापूर्वी ठरवलेली, गृहीत धरलेली मते अथवा गृहीतके संशोधनांती खोटी ठरली तर त्यांची मांडणी इतिहासात होत नसते. कारण इतिहासाला सत्यांचा अंश असणे अभिप्रेत असते. गृहितके गृहीत धरली तरी संशोधकाने त्याविषयी पुर्वग्रह धरणे संयुक्तीक नाही.

४. **संशोधन आराखडा** (Degine of Research) **:**

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर व निवडलेल्या विषयाच्या संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर संशोधनाचा आराखडा तयार केला जातो. निवडलेल्या संशोधन विषयाची आपण कशी मांडणी करणार आहोत ही सांगणारी रूपरेषा म्हणजेच संशोधन आराखडा होय अशी ढोबळपणे संशोधन आराखड्याची व्याख्या करता येते. या आराखड्यामुळे संशोधनाची पुढची दिशा स्पष्ट होते. संशोधन विषय निश्चित झाल्यानंतर त्या विषयाच्या अनुषंगाने अनेक संदर्भ ग्रंथांचे वाचन करावे लागते. हे वाचन करीत असतानाच विषयाशी संबंधित असणाऱ्या ग्रंथाची यादी बनवली जाते. अशा संदर्भ ग्रंथांमधून टिपणही काढली जातात. या सर्व

प्रक्रियेतून संशोधक चिंतन, मनन करून संशोधनाची रूपरेषा तयार करतो. ही रूपरेषा संशोधन कोणत्या स्वरूपाचे आहे? यावर अवलंबून असते. संशोधनाचा विषय कोणत्या कालखंडातील आहे? तसेच तो राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अथवा अन्य प्रकारचा आहे. त्यानुसार माहिती संकलित करण्यासाठी आपण प्रश्नावली, सर्वेक्षण, मुलाखती किंवा इतर कोणत्या पद्धतीचा वापर करणार आहोत याची स्पष्ट कल्पना आराखड्यातून यावी लागते. संशोधन करण्यापूर्वी संशोधन विषयाच्या प्रकरणाची रूपरेषा तयार करावी लागते. तसेच प्रकरणांची संख्या मर्यादित असणे ही आवश्यक असते. संशोधन आराखड्यात मुख्यशीर्षक व उपशीर्षक यांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. परंतु अशी शीर्षके ही संक्षिप्त स्वरूपात दिलेली असावीत. ती लांबलचक अथवा मोठी नसावीत.

संशोधन आराखड्यामुळे संशोधनामध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांची कल्पना येते. त्यावर मार्ग काढणे ही सोपे जाते. म्हणूनच संशोधन आराखड्याला संशोधन विषयाची 'ब्लू प्रिंट' असे म्हटले जाते. संशोधन आराखडा पूर्ण केल्यानंतर संशोधकाने तो आराखडा तपासून पाहून तो बरोबर असल्याची खात्री केली पाहिजे. यामुळे आराखड्यातील असंदिग्धता निघून जाऊन अचूक अशाप्रकारचा आराखडा तयार होईल.

**५. कागदपत्रांचे संघटन व व्यवस्थापन :**

संशोधन विषय निश्चिती नंतर त्या विषयासंबंधी विस्ताराने वाचन केले जाते. संशोधनासाठी आवश्यक पुरावे गोळा करण्यासाठी पुरावे कोणत्या ठिकाणी उपलब्ध आहेत याची माहिती घ्यावी लागते. पुराव्यांची (साधनांची) उपलब्धता निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. काळाच्या ओघात काही पुरावे नष्ट होतात किंवा अनेक ठिकाणी विस्कळीत व विखुरलेल्या स्वरूपात असतात. बऱ्याच वेळेला जे पुरावे हाती लागतात त्याची विश्वासार्हता तपासणे आवश्यक असते. कागदपत्राचे संघटन हे विषयाची मांडणी कशा पद्धतीने व कोणत्या दृष्टिकोनातून करावयाची आहे यावर अवलंबून असते. कागदपत्राची जुळणी करताना मिळालेल्या कागदपत्रांमध्ये ऐतिहासिक वस्तुनिष्ठता शोधावी लागते. अशा वस्तुनिष्ठ पुराव्याच्या आधारे संशोधकाने विषयाची मांडणी करणे गरजेचे असते.

कागदपत्रांचे संघटन करीत असताना जर निवडलेला संशोधन विषय ऐतिहासिक वास्तूविषयी असेल तर त्या वास्तुसंबंधी असलेल्या लिखित पुराव्यांचा अथवा प्रकाशीत साहित्याचा आधार घ्यावा लागतो. प्रत्यक्ष वास्तू पाहून तिची मोजमापे घेणे, सूक्ष्म निरीक्षण करणे, आवश्यक त्या ठिकाणी रेखाटणे, फोटोग्राफ व छायाचित्रण घेणे या घटकांनाही प्राधान्य द्यावे लागते. संशोधन विषय जर अलीकडील असेल तर संशोधन विषयासंबंधी तज्ञ व्यक्तींच्या मुलाखती, सर्वेक्षण, प्रश्नावली याचाही वापर करावा लागतो. हे सर्व केल्यानंतर संकलित झालेल्या माहितीचे योग्य व्यवस्थापन करून ती माहिती आपल्या शब्दांत संशोधनामध्ये उतरविणे अतिशय महत्त्वाचे असते. तसेच एखाद्या अभ्यासकाचा तर्कशुद्ध विवेचन असणारा उतारा आपणाला संशोधनामध्ये घ्यावयाचा असेल तर तो उतारा अवतरण चिन्हामध्ये टाकून त्याचा संदर्भ पान क्रमांकासहीत नोंदवणे गरजेचे असते, अशा नोंदी प्रबंधामध्ये तळटिपेच्या स्वरूपात द्याव्या लागतात.

### ६. साधनांचे वर्गीकरण :

इतिहासलेखनामध्ये साधन अथवा पुराव्यांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. साधनांना इतिहास लेखनाचा आत्मा ही मानले जाते. कारण साधनांशिवाय इतिहास लेखन पूर्णत्वाला जाऊ शकत नाही. मानवाच्या हजारो वर्षांच्या वाटचालीत विविध कालखंडात प्रचंड मोठ्या प्रमाणात साधनांची निर्मिती झाली. त्यामध्ये वस्तू, घटना, कागदपत्रे अशा स्वरूपात साधने उपलब्ध होऊ लागली. इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये घटना आणि पुरावा यांना महत्त्वाचे स्थान आहे. भूतकाळात घडून गेलेल्या घटनेचे वर्णन करण्यासाठी इतिहास व घटना या दोन्हींचा सहसंबंध असावा लागतो. इतिहासाच्या साधनांची अभ्यासकांच्या सोयीसाठी स्थूलरूपाने वर्गवारी केली जाते. त्यास साधनांचे वर्गीकरण असेही म्हटले जाते. असे वर्गीकरण केल्यामुळे इतिहासाचा अभ्यास करणे, त्याचबरोबर साधनांचा उपयोग करून त्याआधारे वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करणे शक्य होते. साधनांचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन प्रकारात केले जाते.

**● प्राथमिक साधने :**

प्रत्यक्ष घटना घडत असताना अथवा घटना घडून गेल्यानंतर लगेच जी कागदपत्रे तयार होतात त्यास 'प्राथमिक साधने' असे म्हणतात. अशा प्राथमिक साधनांना 'मूळ साधने' म्हणूनही ओळखले जाते. प्राथमिक साधनाबाबत प्रा. कार्ल गुस्तावन म्हणतात, फक्त एकाच ठिकाणी सापडणारी, त्याशिवाय कुठेही न सापडणारी, मूळ स्वरूपातील, ज्यामध्ये कोणताही बदल झालेला नसतो व त्यावर कोणतीही प्रक्रिया झालेली नसते. अशी समकालीन कागदपत्रे म्हणजेच प्राथमिक साधने होय. या प्राथमिक साधनांचे लिखित व अलिखित असे दोन प्रकार पडतात. प्राथमिक साधनांमुळे इतिहासलेखनाला विश्वसनीय अशी माहिती मिळते. त्याचबरोबर घटना घडत असताना ती साधने निर्माण झाल्यामुळे त्यांची विश्वसनीयता वाढलेली असते. साधनांमध्ये काल्पनिक कथा व विपर्यास याला फाटा मिळालेला असतो. अशा प्राथमिक साधनांमध्ये शिलालेख व ताम्रपट येतात. ज्यांच्यामध्ये एकदा लिहिल्यानंतर खाडाखोड अथवा दुरुस्ती करता येत नाही. यामुळे त्यास प्राथमिक साधन म्हणून महत्त्वपूर्ण स्थान आहे. धार्मिक, लौकिक, ललित, प्रवासवर्णने अशा साधनांचा लिखित साधनांमध्ये समावेश होतो. तसेच मध्ययुगातील तह, करार, कैफियती, खाजगी पत्रे, धार्मिक संस्था, जमाखर्च, राजांचे आदेश इत्यादी साधने लिखित साधनांमध्ये येतात. आधुनिक कालखंडात ध्वनीफिती, छायाचित्रे, चित्रफिती यांच्या आधारे घडून गेलेल्या घटनांची माहिती घेता येते.

**● दुय्यम साधने :**

इतिहास संशोधनामध्ये प्राथमिक साधनाइतकेच दुय्यम साधनांना महत्त्वाचे स्थान आहे. मुख्यत्वेकरुन दुय्यम साधने ही प्राथमिक साधनांच्या आधारावर लिहिलेली असतात. ही साधने छापील स्वरूपात प्रकाशित झालेली असतात. इ. एच. कार दुय्यम साधनांची व्याख्या करताना म्हणतात, साधनकर्त्याने घटना पाहिलेली नसते, पण घटना घडून गेल्यानंतर कधीतरी प्राथमिक साधनांच्या आधारे त्या घटनेविषयी लिहिलेले असते. ती साधने म्हणजे दुय्यम साधने होय. दुय्यम साधने प्रामुख्याने लिखित स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे धार्मिक ग्रंथ, सरकारी कागदपत्रे, प्रवासवर्णने, प्रकाशित ग्रंथ, बखरी, तवारिखा, चरित्र ग्रंथ, व्यक्तिगत केलेले व्यवहार अशी

अनेक प्रकारची कागदपत्रे आपणाला संशोधनासाठी उपलब्ध होत असतात. कित्येकदा प्राथमिक दर्जाची साधने संशोधनासाठी उपलब्ध झाली नाहीत तर दुय्यम दर्जाची नोंदही महत्त्वपूर्ण ठरते. परंतु अशा नोंदी घेत असताना दुय्यम साधनांमधील वस्तुनिष्ठता तपासणे महत्त्वाचे असते. कारण घटना घडून गेल्यानंतर ऐकीव माहितीवर दुय्यम साधने लिहिलेली असतात.

वरील प्राथमिक व दुय्यम साधनांशिवाय संशोधकाला आधुनिक साधनांचाही आधार घ्यावा लागतो. आधुनिक काळात इतिहास लेखनाचे विविध प्रकार करण्यात आले. या अनुषंगाने कागदपत्र गोळा करण्याचे स्वरूपही बदलले. आधुनिक काळाची वाटचाल शोधताना पुराभिलेखागारातील कागदपत्रे, शासकीय दस्ताऐवज, ऐतिहासिक व्यक्तीचे खाजगी पत्रव्यवहार, आत्मचरित्रे, चरित्रे, समित्यांचे अहवाल, भाषणसंग्रह, जनगणना अहवाल, आर्थिक व्यवहारासंबंधीची कागदपत्रे, रोजनिशी, वृत्तपत्रे, नियतकालिके, गॅजेट्स, संशोधन पत्रिका, सर्वेक्षणाचे अहवाल, इंटरनेट, वेबसाईट, ध्वनिफिती, व्हिडीओ कॅसेट, प्रत्यक्ष मुलाखती इत्यादींचा समावेश होतो. आधुनिक काळात साधनांचे स्वरूप हे वेगळे असल्याकारणाने त्याची वर्गवारी ही वेगळीच करावी लागते.

**७. कागदपत्राचे परिक्षण :**

मूळ साधनांची सत्यता पडताळून पाहणे म्हणजेच कागदपत्रांचे परीक्षण करणे होय. संशोधनासाठी आवश्यक असणारी साधने संकलित केल्यानंतर अशा साधनांचे परीक्षण करणे म्हणजेच साधनांची सत्यता शोधणे आवश्यक असते. साधनांचे परीक्षण करीत असताना प्रत्यक्ष निरीक्षणाला वाव नसतो. कारण इतिहासकार हा वर्तमान काळात संशोधन करीत असतो तर संशोधनाचा विषय आणि त्या विषयातील घटना या कित्येक वर्ष अगोदर म्हणजे भूतकाळात घडलेल्या असतात. त्यामुळे ती घटना पुन्हा घडविता येत नाही. म्हणून इतिहासकाराला साधनांची यथार्थ माहिती मिळवण्यासाठी साधनांचे परीक्षण किंवा चिकित्सा करावी लागते. साधनांच्या सत्यतेवरच मिळणाऱ्या माहितीची सत्यता अवलंबून असते. म्हणून साधने काळजीपूर्वक तपासली पाहिजेत. परीक्षण प्रक्रियेशिवाय मिळालेल्या माहितीला साधन म्हणता येत नाही. याबाबत प्रोफेसर बी. शेख अली आपल्या 'History it's Theory and Method' या ग्रंथात म्हणतात की, संशोधन ही एक प्रक्रिया आहे. यामध्ये कागदपत्रांचे परीक्षण केले जाते. ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर मानवी शरीराची चिरफाड करून त्यातील असाधारण असा भाग काढून टाकतो. त्याप्रमाणे इतिहासकार परीक्षणाच्या आधारे पुराव्यातील दोष काढून टाकतो. परीक्षणाचा मुख्य हेतू हाच असतो की आपल्या लेखनातील चुका टाळणे व सत्य जाणून घेणे. प्रोफेसर शेख अली यांच्या वरील मतानुसार इतिहासकार अथवा संशोधकाला परीक्षणामुळे उपलब्ध पुराव्यामधील दोष टाळून राहिलेल्या सत्य माहितीचा वापर संशोधनामध्ये करता येईल. कागदपत्रांचे परीक्षण अथवा चिकित्साचे चे दोन प्रकार पडतात–

**अ) बाह्य अथवा बहिरंग परीक्षण** (External Criticism) **:**

परीक्षण प्रक्रियेतील बाह्य अथवा बहिरंग परीक्षण हा पहिला टप्पा समजला जातो. प्राप्त माहितीच्या प्रामाण्याचा (सत्याचा) शोध घेण्याच्या चिकित्सेला बाह्य परीक्षण असे म्हणतात. मिळालेली कागदपत्रे, अवशेष

अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत? अस्सल आहेत की नकली आहेत? कागदपत्रांचा लेखक, त्याचा कालखंड, कागदपत्र लिहिलेली लिपी, भाषाशैली, हस्ताक्षर या आधारे बाह्य परीक्षण केले जाते. तसेच लिहीण्यासाठी वापरलेली शाही, कागदाचा रंग, धातु, इतर वस्तू यांचा विविध शास्त्रांचा आधार घेऊन शोध घ्यावा लागतो. बाह्य परीक्षणाचा हेतू सत्याची प्रस्थापना करणे हा आहे. निव्वळ खोटेपणा शोधणे हा नाही. अशा परीक्षणामुळे माहितीतील फसवेपणा दूर होतो. उदाहरणार्थ, एखाद्या बखरीचे परीक्षण करावयाचे झाल्यास इतिहासकाराला निश्चित अशा कोणत्या गोष्टी पाहाव्या लागतील? तर त्यामध्ये असे सांगता येईल की, बखर अस्सल आहे काय? बखरीचा लेखक तोच आहे काय? बखरीचा कालखंड व निश्चित ठिकाण तेच आहे का? तसेच इतर सहाय्यकारी शास्त्रांची मदत घेऊन बखरीसाठी वापरण्यात आलेला कागद, लिखाणाची शाई, लिपी इत्यादी गोष्टी अचूक तपासाव्या लागतील. त्यानंतरच इतिहासकाराला बखरीचा वापर साधन म्हणून करता येईल.

**ब) अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षण** (Internal Criticism) **:**

अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षणाला परीक्षण प्रक्रियेतील दुसरा टप्पा मानले जाते. बाह्य परीक्षणापेक्षा अंतर्गत परीक्षणाला संशोधनामध्ये अधिक महत्त्वाचे स्थान आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे कागदपत्रांचा लेखक, काळ व स्थळ या बाह्य परीक्षणाची माहिती घेतल्यानंतर सदर कागदपत्राच्या आतील आशय खरा आहे का? हे अंतर्गत परीक्षणामध्ये तपासावे लागते, यावरच संशोधनाचा पाया आधारलेला असतो. मिळालेली माहिती अथवा कागदपत्राची गुणवत्ता तपासणे हाच या परीक्षणाचा मुख्य हेतू असतो. याबाबत डॉ. के. एन. चिटणीस म्हणतात, आंतरिक परीक्षणाचा हेतू कागदपत्रांमध्ये आत शिरून त्यांचे विश्लेषण करणे व शेवटी सत्य घटना जगापुढे आणणे हाच असतो. अंतर्गत परीक्षणाचे सकारात्मक (वास्तववादी) परीक्षण (Positive Criticism) आणि नकारात्मक परीक्षण (Negative Criticism) असे दोन भाग पडतात.

सकारात्मक (वास्तववादी) परीक्षणामध्ये लेखकाचे म्हणणे काय आहे हे समजून घेतले जाते. पण त्यासाठी इतिहासकाराला भाषेचे चांगले ज्ञान असणे आवश्यक असते. कागदपत्राचा लेखक जे काही म्हणत असतो त्यामागची त्यांची भूमिका काय आहे, हे इतिहासकाराने जाणून घेतले पाहिजे. यासाठी त्याने कागदपत्राच्या भाषेची चिकित्सा केली पाहिजे. त्यासाठी गरज भासल्यास शब्दकोशाचा ही वापर केला पाहिजे. उदाहरणार्थ भाषेच्या उत्क्रांती अवस्थेतील प्रारंभीचे शब्द, समाजाची बोलीभाषा, लेखकाची भाषाशैली इत्यादी बाबी इतिहासकाराने जाणून घेतल्या तर त्याचा अर्थ कळेल.

नकारात्मक परीक्षणाला इतिहासलेखन शास्त्रात उच्च प्रकारचे परीक्षण (Higher Criticism) असेही म्हणतात. नकारात्मक परीक्षणामध्ये संकलित कागदपत्रांमधील प्रत्येक कागदपत्र हे खोटे आहे असे मानून त्यावर पद्धतशीर संशय घेऊनच सत्याचा शोध घेतला जातो. इतिहासकाराने शक्य असणाऱ्या प्रत्येक ठिकाणी संशय व्यक्त केला पाहिजे. जोपर्यंत योग्य पुरावा मिळत नाही तोपर्यंत प्रत्येक विधानाबाबत शंका घेतली पाहिजे हा नकारात्मक परीक्षणाचा मुख्य हेतू असतो. त्यासाठी इतिहासकाराने लेखकाची पात्रता, लेखकांमध्ये सत्य सांगण्याची पात्रता आहे का? त्याने केलेल्या निवेदनात तंतोतंतपणा आणि खरेपणा आहे काय? त्याची

वैचारिक पार्श्वभूमी कोणती आहे? त्याने कोणत्या परिस्थितीमध्ये विधाने केली आहेत? याचा विचार या ठिकाणी करणे आवश्यक असते.

अशाप्रकारे अंतर्गत आणि बहिर्गत परीक्षण जर संशोधकाने बारकाईने केले तर त्याला कागदपत्रातील माहिती बरोबर आहे की चूक आहे? हे निश्चितपणे समजते म्हणून इतिहासकार अथवा संशोधकाने संकलित झालेल्या कागदपत्रांचे परीक्षण करणे अत्यावश्यक ठरते.

**८. गृहीतकांची पडताळणी :**

संशोधकाने संशोधन विषय निवडल्यानंतर विषयासंबंधी त्याने काही गृहीतके निश्चित केलेली असतात. अशा गृहीतकामध्ये त्यांनी जी विधाने केलेली असतात त्या विधानांची खातरजमा करणे म्हणजेच गृहीतकांची पडताळणी होय. ठरवलेली गृहीतके संशोधनाअंती कागदपत्रांच्या उपलब्धतेनुसार खरी किंवा खोटी हि ठरु शकतात. तसेच हाती आलेल्या किंवा खऱ्या असलेल्या गृहीतकांमधून संशोधकाला काही सिद्धांतही मांडता येतात. संशोधनासाठी संकलित केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गृहीतकांची पडताळणी करावी लागते.

**९. तथ्य विश्लेषण :**

तथ्य विश्लेषणाला इतिहास संशोधनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. इतिहासलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचे परीक्षण केल्यावर त्या साधनांची विश्वसनीयता आपणास समजते. त्यानुसार ते साधन प्राथमिक किंवा दुय्यम आहे हे आपणाला ओळखता येते. भूतकाळात घडून गेलेल्या सर्वच घटना इतिहासलेखनासाठी वापरल्या जातात असे नाही. कारण बऱ्याच वेळा अशा भूतकालीन घटना शास्त्रीय पद्धतीने तपासून पाहाव्या लागतात. त्याचा तर्कशुद्ध अर्थ लावून अन्वयार्थ काढावा लागतो. त्यानंतरच तो तपशील इतिहासलेखनासाठी उपयोगी ठरतो. तथ्य विश्लेषणामध्ये अशा परिपूर्ण तथ्यांची अथवा घटितांची निवड संशोधकाला करावी लागते. तथ्ये यास घटिते असेही म्हटले जाते. तथ्य विश्लेषणामध्ये तथ्ये अथवा घटितांना बोलते करण्याचे काम इतिहासकाराला करावे लागते. ऐतिहासिक घटनेविषयी कोणतेही साधन मिळाले की त्याआधारे लगेचच इतिहासलेखन करता येत नाही तर त्या साधनांमधील वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करावे लागते. त्याचा उपयोग करून हाती आलेल्या तथ्यांचे विश्लेषण करता येते.

**१०. संशोधन अहवाल :**

इतिहास संशोधन प्रक्रियेतील सर्व सोपस्कार पार पाडल्यानंतर प्रत्यक्ष संशोधन अहवाल लेखनाला (प्रबंध लेखन) सुरुवात करावी लागते. हा अहवाल म्हणजेच संपूर्ण संशोधन प्रक्रियेचे यश असते. त्यामुळे अहवाल लेखन करीत असताना अहवाल लेखनातील आपली भाषा ही साधी, सोपी, सुटसुटीत आणि तर्कसुसंगत असावी लागते. तसेच आपण केलेले विवेचन हे वस्तुनिष्ठ आहे का? त्याचबरोबर मांडलेल्या घटना या क्रमबद्ध आणि एकमेकांशी संबंधित व सुसंगत आहेत का? याची पूर्णपणे काळजी घ्यावी लागते. अहवाल लेखनामध्ये शुद्धलेखनालाही महत्त्व द्यावे लागते. आपली लेखणी ही प्रभावी आणि सर्वसामान्य वाचकांना समजणारी अशी असावी. सर्वसामान्य वाचकांच्या मनावर आपल्या लिखाणाचा प्रभाव पडला पाहिजे. आपल्या

लिखाणाला तज्ञ व्यक्तींचा पाठिंबा मिळावा म्हणून संशोधकाने संदर्भ ग्रंथ दिले पाहिजेत. जोपर्यंत आपण संदर्भ देत नाही तोपर्यंत आपले लिखाण सत्याच्या कसोटीवर उतरू शकत नाही. प्रबंधामध्ये आवश्यक त्या ठिकाणी नकाशे, छायाचित्रे इत्यादी घटकांचा समावेश करावा लागतो. याचबरोबर संशोधकाने आपल्या प्रबंधाची बांधणी ही आकर्षक पद्धतीने केली पाहिजे. प्रबंधासाठी आवश्यक असणाऱ्या पद्धतीचाही वापर केला पाहिजे. त्यामध्ये-

१. संशोधन विषयाचे नाव,

२. संशोधकाचे मनोगत,

३. आभार व ऋणनिर्देश,

४. प्रमाणपत्र (मार्गदर्शक, संशोधक विद्यार्थी इत्यादी)

५. संक्षिप्त रूपे नकाशे यासंबंधीची अचूक माहिती,

६. अनुक्रमणिका

७. प्रकरणनिहाय लेखनाला प्रारंभ करावा.

८. अखेरच्या म्हणजे उपसंहार/निष्कर्ष/ मूल्यमापन या प्रकरणानंतर संदर्भग्रंथांची यादी, परिशिष्टे द्यावीत.

वरील प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र पानाचा वापर करावा. अशा रीतीने आपल्या प्रबंधाची अथवा संशोधन अहवालाची आकर्षकपणे मांडणी करावी.

**११. संदर्भ ग्रंथाची यादी :**

प्रबंध लिहून पूर्ण झाल्यानंतर शेवटी प्रबंधासाठी आपण वापरलेल्या सर्व संदर्भ साधनांची माहिती एकत्रितपणे देतो त्यास संदर्भ ग्रंथाची यादी असे म्हणतात. ही यादी तयार करणे हे एक स्वतंत्र तंत्र आहे. प्रबंधाच्या शेवटी आपण ही संदर्भग्रंथाची यादी दिल्यामुळे संशोधनासाठी किती ग्रंथांचा अभ्यास केला आहे हे वाचकाला समजते व त्यावरून त्या ग्रंथाची विश्वसनीयता आणि दर्जेदारपणा ठरत असतो. संदर्भ ग्रंथाची यादी देत असताना आपण संदर्भ ग्रंथांच्या यादीचा क्रम ठरवावा लागतो. तो पुढीलप्रमाणे-

१. सुरुवातीला प्राथमिक साधन म्हणून वापरलेले ग्रंथ :

(उदा. राजनैतिक दस्तऐवज, सरकारी पत्रव्यवहार, आत्मचरित्रे, हस्तलिखिते, गोपनीय नोंदी इ.)

२. त्यानंतर दुय्यम साधन म्हणून वापरलेले ग्रंथ

(उदा. प्रवाशांचे वृत्तान्त, प्रवासवर्णने, विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, वार्तापत्रे इत्यादी)

३. गॅझेटिअर्स, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी

४. परिशिष्टे, नकाशे, आलेख, कोष्टके, चित्रे इत्यादी

वरील चार गटांमध्ये संदर्भ ग्रंथांच्या यादीचा क्रम ठरवून यादी तयार करावी लागते. यादी तयार करीत असताना यामध्ये आपण भाषेवरून त्याचे उपविभाग तयार करू शकतो. उदाहरणार्थ – इंग्रजी ग्रंथ, मराठी ग्रंथ, उर्दू ग्रंथ, फारशी ग्रंथ, कानडी ग्रंथ इत्यादी अशी स्वतंत्र वर्गवारी करता येते. वाचकांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी. त्यांना संदर्भ ग्रंथ मिळवता यावेत, त्यातील काही संदर्भ पाहता यावेत या उद्देशाने संशोधकाने आपली संदर्भ यादी तयार केली पाहिजे. ही संदर्भ यादी तयार करीत असताना संशोधकाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्यामध्ये ग्रंथाचा संदर्भ देत असताना संशोधकांनी प्रारंभी लेखकाचे आडनाव, नंतर नाव जर लेखक अनुवादक असेल तर तेथे अनुवादक असे लिहिले पाहिजे किंवा जर लेखक संपादक असेल तर संपादक असे लिहिले पाहिजे. त्यानंतर ग्रंथाचे नाव, आवृत्ती क्रमांक, खंड क्रमांक, प्रकाशनाचे वर्ष, ठिकाण, प्रकाशनाचे नाव, तारीख – वर्ष लिहावे. प्रत्येक ठिकाणी स्वल्पविराम व शेवटी पूर्णविराम देऊन संदर्भ ग्रंथाची मांडणी करावी. संशोधकाने वरील सर्व बाबी लक्षात घेऊन संदर्भ ग्रंथांची यादी तयार केली तर निश्चितच प्रबंध दर्जेदार होईल.

**● स्वयं –अध्ययनासाठी प्रश्न – १**

**योग्य पर्याय निवडा.**

१. इतिहास हे शास्त्र आहे याखेरीज दुसरे काही नाही हे विधान ................. यांनी केले.

अ) ई. एच. कार  ब) जे. बी. ब्युरी  क) प्रोफेसर मेटलँड  ड)कार्ल मार्क्स

२. संशोधन ही एक ................. कालीन प्रक्रिया आहे.

अ) दीर्घ  ब) लघु  क) मध्यम  ड) अल्प

३. संशोधकाने आपल्या लिखाणात ................. आणावी.

अ) पूर्वग्रह  ब) व्यक्तिनिष्ठता  क) वस्तुनिष्ठता  ड) आपुलकी

४. ................. इतिहास संशोधनातील पहिली पायरी होय.

अ) कागदपत्रांचे संघटन ब) विषयाची निवड  क) संशोधन अहवाल  ड) साधनांचे वर्गीकरण

५. संशोधकाच्या अंगी.................हा गुण महत्त्वाचा मानला जातो.

अ) सत्यनिष्ठा  ब) भावनाविवशता  क) आपुलकी  ड) माणुसकी

६. संशोधनाविषयी केलेले तात्पुरते पूर्वानुमान म्हणजे ................. होय.

अ) तर्कशुद्धता  ब) गृहितके  क) कागदपत्रे  ड) ब्लू प्रिंट

७. संशोधन आराखड्याला संशोधन विषयाची ................. असे म्हटले जाते.

अ) ब्लॅक प्रिंट  ब) रेड प्रिंट  क) ब्लू प्रिंट  ड) ग्रे प्रिंट

८. प्रत्यक्ष घटना घडत असताना अथवा घटना घडून गेल्यानंतर लगेच जी कागदपत्रे तयार होतात त्यास ................ असे म्हणतात.

अ) प्राथमिक साधने  ब) लौकिक साधने  क) दुय्यम साधने  ड) ललित साधने

९. संशोधनाअंती कागदपत्रांच्या उपलब्धतेनुसार .......... खरी किंवा खोटी ठरू शकतात.

अ) तथ्य विश्लेषण  ब) गृहितके  क) परीक्षण  ड) साधने

### ३.२.२ तथ्यविश्लेषण आणि कागदपत्रांचा अन्वयार्थ (Data Analysis and Interpretation) :

इतिहास म्हणजे केवळ भूतकालीन घटना एवढीच बाब इतिहास संशोधनाला पूरक नाही. तर त्या घटना घडण्यापाठीमागील कारणमीमांसा, त्या घटनेचे सर्वव्यापी परिणाम आणि त्यातून निघालेला घटनेचा अन्वयार्थ याचा सविस्तर विचार करणारे शास्त्र आहे. तथ्य विश्लेषण करीत असताना आपणाला या बाबींचा विचार करावा लागतो.

● **तथ्य विश्लेषण** (Data Analysis) **:**

कागदपत्रांच्या परीक्षणानंतर जी माहिती संशोधकांच्या हाती येते. त्या माहितीला ऐतिहासिक घटिते असे म्हटले जाते. याच ऐतिहासिक घटितांना 'तथ्य विश्लेषण' असे म्हणतात. ऐतिहासिक घटिते संशोधकांच्या हाती आल्याने लगेचच संशोधन पूर्ण होत नाही तर हाती आलेल्या घटितावर प्रक्रिया करावी लागते. त्यामध्ये घटीतांची तर्कशुद्ध व सुसंगतवार जुळवाजुळव करून त्याचा अन्वयार्थ काढावा लागतो. त्यानंतरच त्यास आपल्या शब्दांमध्ये शब्दबद्ध करावे लागते. यासाठी संशोधकाकडे आकलन, कल्पनाशक्ती, बौद्धिक पात्रता असावी लागते. इतिहासलेखनासाठी उपयुक्त असणारी घटीते ही आपण एकत्रित करून त्यांचा वापर आपल्या विचारशैलीनुसार कसा करावा याची सर्वस्वी जबाबदारी संशोधकावर राहते. याबाबत इ.एच.कार यांनी केलेले विधान अतिशय बोलके आहे. ते म्हणतात, 'घटीते स्वतः बोलत नाहीत, इतिहासकार त्यांना बोलते करतो.' घटीते अथवा तथ्ये ही इतिहासातील संशोधनाचा मूळ आधार मानली जातात. संशोधक ऐतिहासिक घटितांची निवड करून त्याची क्रमवारी ठरवत असतो. त्यानंतर त्यांना ऐतिहासिक तथ्यांचा दर्जा देतो. बऱ्याच वेळा इतिहासलेखन चालू असताना अशा तथ्यांच्या निवड व क्रमवारीमध्ये गरजेनुरूप काही बदलही करावे लागतात. 'वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन' म्हणजेच इतिहास होय. यास अनुसरून संशोधकाला तथ्यांचे संकलन करीत असताना उपलब्ध संकलित कागदपत्रांवरून जी तथ्ये हाती आलेली आहेत. त्यांचा उपयोग विश्लेषणात करावा लागतो.

● **विश्लेषण कसे करावे ? :**

मानवी जीवनाच्या वाटचालीतील घडून गेलेल्या घटना, संदर्भ यांची साध्या, सरळ, सोप्या आणि तर्कशुद्ध भाषेत मांडणी करणे म्हणजेच विश्लेषण होय. मानवी जीवनाचा अभ्यास करत असताना मानवाने घडवलेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक घडामोडींचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करून

त्याचे काटेकोरपणे विश्लेषण करावे लागते. बऱ्याच वेळा घटना आणि घटनेचा कालखंड कोणता आहे? यावर विश्लेषण कसे करावे हे ठरविता येते. उदा. प्राचीन कालखंडातील घडून गेलेल्या घटनांचे आपणाला विश्लेषण करावयाचे असेल तर त्या कालखंडातील नाणी, शिल्पे, शिलालेख, ताम्रपट, स्थापत्य, विविध प्रकारचे अवशेष यांचा अभ्यास करावा लागेल. याउलट आपणाला स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासाचा अभ्यास करायचा असेल तर मागील पन्नास-साठ वर्षातील वृत्तपत्रे, मासिके, सरकारी दस्तऐवज, स्वातंत्र्योत्तर काळातील ज्यांनी घटना पाहिलेल्या आहेत अशा समकालीन व्यक्तींच्या मुलाखती, प्रश्नावली भरून घेणे या माध्यमातून आपण माहिती घेऊन आपणाला विश्लेषण करता येणे शक्य होते. संशोधनाचा विषय मध्ययुगीन कालखंडातील असेल तर आपणाला त्या कालखंडातील घटनांचे विश्लेषण हे वेगळ्या पद्धतीने करण्यासाठी त्यावेळी कोणती साधने उपलब्ध होती? त्याचा शोध घ्यावा लागतो. मध्ययुगातील सल्तनतकालीन दस्तऐवज, मोगलकालीन दस्तऐवज, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज, डच या युरोपियन लोकांचे दप्तरखाने, मराठा कालखंडातील कागदपत्रे यांचा अभ्यास करून आपणाला माहिती संकलित करता येते आणि त्यांचे विश्लेषण करता येते. एकूणच विश्लेषण करीत असताना निवडलेल्या संशोधन विषयाशी संबंधित ज्या घटना, घडामोडी घडल्या आहेत. त्या घटनांविषयी जास्तीत जास्त माहिती संकलित करणे, त्या संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करणे, त्याचा कार्यकारणभाव तपासणे आणि त्या घटनेचा परिणाम शोधणे अशा विविध टप्प्यांना महत्व द्यावे लागते. या टप्प्यांच्या आधारे आपणाला माहितीचे साधार विश्लेषण करता येते. असे विश्लेषण करीत असताना त्याचे विविध प्रकार ही पाडले जातात. डॉ. शांता कोठेकर यांनी आपल्या 'इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान' या ग्रंथात विश्लेषणाचे एकूण तीन प्रकार केले आहेत. त्यामध्ये-

१. कालक्रमानुसार विश्लेषण

२. स्थळानुसार विश्लेषण

३. विषयानुसार विश्लेषण

या तिन्ही प्रकारांचा आधार घेऊन आपणाला इतिहासातील घटनांचे विश्लेषण करता येईल.

ढोबळमानाने विश्लेषणाचे आणखी काही प्रकार सांगता येतील. त्याच्यामध्ये सांख्यिकी विश्लेषण की ज्याच्यामध्ये आपणाला सांख्यिकी माहिती नोंदवता येईल. तसेच समाजशास्त्रीय विश्लेषणामध्ये निरीक्षण पद्धतीला वाव देऊन प्रश्नावली पद्धत आणि सर्वेक्षण पध्दतीचा आधार घेऊन विश्लेषण करता येईल. अर्थशास्त्रीय विश्लेषण प्रकारामध्ये इतिहासकालीन वेगवेगळ्या सत्ताधीशांच्या काळात ज्या सत्ताधीशांची आर्थिक अधोगती वा उन्नती झाली. त्याचे विश्लेषण आपणाला या प्रकारात करता येईल. याचबरोबर इतिहासलेखनामध्ये नीतीशास्त्रीय विश्लेषण या प्रकारालाही महत्त्वाचे स्थान आहे. इतिहासकालीन घटनांचे स्थल-कालसापेक्ष नैतिकतेच्या कल्पना संशोधन करताना लक्षात ठेवाव्या लागतात. इतिहासकालीन घटनांमध्ये नैतिक मूल्यांची जपणूक, तिच्यामध्ये झालेले बदल याचाही अभ्यास करून आपणाला विश्लेषण करता येऊ शकते. एकूणच विश्लेषण विविध प्रकारांच्या माध्यमातून करून आपले संशोधन पूर्ण करता येते.

● **कागदपत्रांचा अन्वयार्थ** (Data Interpretation) **:**

इतिहास संशोधन प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे कागदपत्रांचा अन्वयार्थ लावणे होय. इतिहासकार पुराव्यांच्या आधारावर आणि स्वतःच्या वैचारिक दृष्टिकोनातून निष्कर्षरूपाने जी काही विधाने करतो त्यास अन्वयार्थ असेही म्हटले जाते. थोडक्यात अन्वयार्थ म्हणजे ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करणे. गतकालीन मानवी घटना समजून घेताना मानवाने जगण्यासाठी केलेली धडपड यासाठी त्याने निसर्गावर केलेली मात या गोष्टी लक्षात घेतल्या तर मानवी वाटचाल आणि निसर्ग यांच्यामध्ये संघर्षाचा इतिहास होऊ शकतो. मानवी जीवनाचा अभ्यास करत असताना मानव आणि निसर्ग यांच्यातील संघर्ष हा अन्वयार्थ आपणाला काढता येऊ शकतो. कागदपत्रांचा अन्वयार्थ लावण्याच्या प्रयत्नवादी दृष्टिकोनातूनच अनेक इतिहासकार व तत्त्वचिंतकांनी आपली मते विशद केली आहेत. फ्रेंच विचारवंत व्हॉल्टेअर याने ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी घडून गेलेल्या घटनांमध्ये विशिष्ट अशा प्रकारची सुसूत्रता असते असे म्हटले आहे. यासाठी त्याने इतिहासाचे तत्वज्ञान असा शब्दप्रयोग केला आहे. तर अर्नाल्ड टॉयन्बी व कार्ल मार्क्स या तत्वचिंतकांनी गतकालीन वाटचालीकडे आपल्या दृष्टिकोनातून पाहिले आहे. कार्ल मार्क्स यांनी मानवी जीवनातील वर्गकलह असा इतिहासाचा अन्वयार्थ सांगितला आहे. याचाच अर्थ प्रत्येक तत्त्वचिंतक इतिहासाचा अन्वयार्थ लावत असताना त्यांच्या वैचारिक दृष्टिकोनातून त्यांना जे काही सुचले त्याचा अन्वयार्थ ते लावत गेले.

इतिहासकाराला साधनांचे परीक्षण केल्यानंतर त्यातील सत्य आणि मूळ साधनांच्या आधारे घटनांचा अन्वयार्थ लावावा लागतो. अन्वयार्थ हा इतिहासकाराचा श्वास आहे. त्यामुळे इतिहासकाराला विचार शक्तीचा वापर करावा लागतो. हे करत असताना त्यामधील कार्यकारणभाव स्पष्ट करून त्या घटना अर्थपूर्ण कराव्या लागतात. अन्वयार्थ याचाच अर्थ  घटना बोलक्या करणे असा होतो. उदाहरणार्थ छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५६ साली जावळीचा प्रदेश जिंकून घेतला. येथे संशोधकाला अन्वयार्थ किंवा स्पष्टीकरण करावे लागते ते असे की, तो प्रदेश छत्रपती शिवाजी महाराजांना का ताब्यात घ्यावा लागला? तो प्रदेश कसा ताब्यात घेतला?  त्याचे परिणाम काय झाले? हे सांगावे लागते. त्यासाठी मूळ किंवा सत्य अशा साधनांचा उपयोग करावा लागतो. अन्वयार्थाचे स्पष्टीकरण देत असताना संशोधकाला सामान्यीकरणाचा उपयोग करावा लागतो. त्यामध्ये संशोधकाने घटनांचा सखोल अभ्यास करून काही विधानेही करावी लागतात. उदा. मुघल सम्राट अकबर कालखंडामध्ये अकबर हा रजपूत सरदारांना चांगली वागणूक देत होता. याचा अन्वयार्थ काढताना रजपूत सरदाराने सम्राट अकबराबाबत वरील विधान केलेले असले पाहिजे. संशोधकाला माहीत असणाऱ्या एका घटनेची दुसऱ्या माहीत असणाऱ्या घटनेनेबरोबर तुलना करावी लागते. उदा. ग्रँड डफने 'मराठ्यांचा उदय सह्याद्रीच्या अरण्यात अचानक लागलेल्या वणव्यासारखा होता' असे म्हटले आहे. तर न्यायमूर्ती रानडे यांनी 'मराठ्यांच्या उदयाला सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व भौगोलिक परिस्थिती कारणीभूत झाली' हे मत मांडले आहे. या दोन्ही विधानांचा तुलनात्मक अभ्यास करून संशोधकाला त्याचे स्पष्टीकरण देता आले पाहिजे. तरच संशोधक आपले लिखाण हे अतिशय प्रभावी आणि बोलके करू शकतो.

● **स्वयं -अध्ययनासाठी प्रश्न -२.**

**योग्य पर्याय निवडा.**

१. कागदपत्राच्या परीक्षणानंतर जी माहिती संशोधकांच्या हाती येते त्यास ......... असे म्हणतात.

अ) घटिते ब) साधने क) गृहितके ड) अर्थशोधन

२. मानवी जीवनाच्या वाटचालीतील घडून गेलेल्या घटना व संदर्भ यांची साध्या, सरळ, सोप्या आणि तर्कशुद्ध भाषेत मांडणी करणे म्हणजेच ......... होय.

अ) वस्तुनिष्ठता ब) विश्लेषण क) मुलाखती ड) गृहितक

३. फ्रेंच विचारवंत ......... यांनी ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी घडून गेलेल्या घटनांमध्ये विशिष्ट अशा प्रकारची सुसूत्रता असते असे म्हटले आहे.

अ) व्हॉल्टेअर ब) रुसो क) कार्ल मार्क्स ड) अर्नाल्ड टॉयंबी

४. अन्वयार्थ हा इतिहासकाराचा ......... आहे.

अ) श्वास ब) डोळा क) मेंदू ड) यापैकी नाही.

५. मराठ्यांचा उदय सह्याद्रीच्या अरण्यात अचानक लागलेल्या वणव्यासारखा होता असे ......... यांनी म्हटले आहे.

अ) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ब) थॉमस मन्रो
क) जेम्स ग्रँड डफ ड) लॉर्ड मेयो

६. ......... यांनी मानवी जीवनातील वर्गकलह असा इतिहासाचा अन्वयार्थ सांगितला आहे.

अ) रुसो ब) कार्ल मार्क्स क) गो.स.सरदेसाई ड) थॉमस मन्रो

७. घटीते स्वत: बोलत नाहीत, इतिहासकार त्यांना बोलते करतो असे ......... यांनी म्हटले आहे.

अ) ई. एच. कार ब) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन
क) कार्ल मार्क्स ड) गो. स. सरदेसाई

८. डॉ. शांता कोठेकर यांनी आपल्या 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' या ग्रंथात विश्लेषणाचे एकूण ......... प्रकार पाडले आहेत.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

### **३.२.३ सादरीकरण** (Presentation) :

इतिहास संशोधन प्रक्रियेतील अंतिम टप्पा म्हणजे सादरीकरण. गतकाळात घडलेल्या मानवी जीवनातील घडामोडींवर निसर्गातील काही घटनांचा परिणाम होतो. याचा अभ्यास करताना संशोधकाला आपल्याजवळील बौद्धिकता, ज्ञान, अनुभव संपन्नता, चिकित्सा, भाषेवरील प्रभुत्वाचा कौशल्याने वापर करावा लागतो. कारण यातून जो अन्वयार्थ निघेल तोच पुढे आपल्या शब्दात संशोधन रूपाने सादर केला जातो. संशोधकाने विषयाची

निवड केल्यानंतर विषयाशी संबंधित जे काही उद्देश आणि गृहितके मांडलेली असतात. ते संशोधनाअंती सिद्ध झाले का? याची तपासणी करून सदरचे संशोधन पूर्ण करावे लागते. संशोधकाने प्रारंभी जी गृहीतके मांडलेली असतात. त्यातील काही गृहीतकांचे रूपांतर सिद्धांतामध्ये होते तर काही गृहितके ही निष्फळ ठरू शकतात. या सर्व गोष्टी संशोधकाने अतिशय प्रभावीपणे सादर करणे अत्यावश्यक असते.

संशोधकाने संशोधन पूर्ण करण्यासाठी अपरिमित कष्ट घेतलेले असते. त्यामध्ये संशोधकाने विषयाशी निगडित पुरावे गोळा करण्यापासून ते त्या पुराव्यांचे वर्गीकरण करुन परीक्षण करणे, परीक्षणानंतर योग्य पुरावे यांचा वापर करून त्यांचे विश्लेषण करणे. पुढे ही सर्व माहिती आपल्या भाषेमध्ये प्रबंध रुपाने जगासमोर आणणे हे सर्व सोपस्कार पूर्ण केलेले असतात. एवढे सगळे करूनही संशोधकाचे सर्व काम हे सादरीकरण न केल्यामुळे पडद्याआड असते. त्यामुळे सादरीकरण प्रभावीपणे करण्याचे काम संशोधकाला करावे लागते. संशोधकाला आपल्या प्रबंधाची लेखनशैली प्रभावी ठेवावी लागते. प्रबंधाला आकर्षक शीर्षक, समर्पक प्रस्तावना द्यावी लागते. संशोधकाला आपण निवडलेल्या विषयांमध्ये रस असला पाहिजे. त्यामुळे संशोधन विषय वाचकाने वाचल्यानंतर संशोधकाच्या प्रामाणिकपणाबद्दल वाचकांना खात्री झाली पाहिजे. तसेच प्रबंधामध्ये मांडलेल्या प्रत्येक मताला संशोधकाने पुरावा दिलेला असला पाहिजे.

संशोधकाने निवडलेला विषय विश्लेषणात्मक, वैचारिक, अर्थबोधनात्मक, वर्णनात्मक किंवा इतर कोणत्या प्रकारात मोडतो हे पाहून विषयाचे सादरीकरण करावे लागते. संशोधकाची प्रबंध लेखनातील निवेदनाची शैली ही साधी, सरळ आणि ओघवती असावी. वाचकाला वाचनामध्ये रस निर्माण करणारी असावी. तसेच संशोधकाने मांडलेल्या विचारांना पुष्टी मिळण्यासाठी तळटीपा देणेही आवश्यक असते. अशा तळटीपा दिल्यामुळे संशोधनाच्या सादरीकरणामध्ये अचूकता येते आणि आपण केलेल्या संशोधनाला जबाबदार व्यक्तींचा पाठिंबा मिळतो हे वाचकांना दाखविता येते. त्याचबरोबर वाचकांना अधिक माहिती मिळविण्यासाठी तळटीपांचा उपयोग होतो. सादरीकरणासाठी उपयुक्त असणाऱ्या पुढील घटकांचीही माहिती घेणे गरजेचे आहे.

- **सामान्यीकरण** (Generalization) **:**

गतकाळात घडलेल्या घटना, प्रसंग यांच्या अभ्यासावरून काही तर्क करून त्यासंबंधी अंदाज केले जातात. यावरून असे - असे घडले आणि या प्रकारची घटना पुढेही घडेल असा निष्कर्ष काढला जातो त्यास सामान्यीकरण असे म्हटले जाते. सामान्यीकरण हे तर्कावर आधारित करावे लागते. ते प्रयोगावर आधारित नसते. गतकाळात घडलेल्या घटना या एका विशिष्ट कालखंडाच्या संदर्भात घडलेल्या असतात. त्यामुळे सामान्यीकरण करताना मर्यादा पडते. आपणाला दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या अमेरिका आणि रशिया संघर्षाचे उदाहरण येथे घेता येईल. रशिया आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाला शीतयुद्ध असे म्हटले गेले. या शीतयुद्धावेळची परिस्थिती, वाटचाल आणि परिणाम या अभ्यासावरून सामान्यीकरण करता येते. जागतिक वर्चस्वासाठी अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये झालेला संघर्ष, तसेच त्याचे जगावर घडून आलेले परिणाम, रशियाचे विघटन अशा घटना या संघर्षामध्ये घडून आल्या. असे असले तरी अशा प्रकारच्या घटना पुढेही घडून येतील अशी खात्री देता येत नाही. सामान्यीकरण करत असताना संशोधकाने घाई-गडबड व उतावळेपणा करू नये. तर त्या घटनांचा सखोल अभ्यास करून त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्या घटनांचा

कार्यकारणभावही स्पष्ट करता आला पाहिजे. सामान्यीकरणासाठी घटनांमधील विविध मतप्रवाहाचा बारकाईने अभ्यास करून सदर घटनांसंबंधी वस्तुनिष्ठ आणि तर्कसंगत मतांची मांडणी करावी लागते.

गतकालीन घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी दोन घटनांमधील साम्य अथवा समानता शोधणे म्हणजे साम्यानुमान करणे होय. संशोधकाने घटनांची मांडणी करत असताना फक्त अर्थ न देता त्या घटना ज्या ठिकाणी घडल्या, त्यातील समान दुवे देणे आवश्यक असते. एकुणच सादरीकरण करत असताना वरील सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक असते.

**● स्वयं -अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**योग्य पर्याय निवडा.**

१. सादरीकरण इतिहास संशोधन प्रक्रियेतील ............. टप्पा आहे.

अ) प्रारंभीचा ब) मधला क) अंतिम ड) महत्वाचा

२. संशोधकाने मांडलेल्या विचारांना पुष्टी मिळवण्यासाठी ........... देणे आवश्यक असते.

अ) सूची ब) तळटीपा क) टिपणे ड) परिशिष्ट

३. गतकालीन घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी दोन घटनांमधील साम्य अथवा समानता शोधणे म्हणजेच ............होय.

अ) साम्यानुमान ब)तर्क क) विश्लेषण ड) सिद्धांत

४. रशिया व अमेरिका यांच्यातील संघर्षाला ......... म्हणतात.

अ) महायुद्ध ब) वाक्‌युद्ध क) युरोपियन युद्ध ड) शीतयुद्ध

५. सामान्यीकरण करत असताना संशोधकाने ......... करू नये.

अ) घाई-गडबड ब) चौकशी क) विश्लेषण ड) घटीते

६. सामान्यकरण हे ......... आधारित करावे लागते.

अ) विचारावर ब) विश्लेषणावर क) तर्कावर ड) घटीतांवर

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१. इतिहास संशोधन : गतकालीन घटनांची पद्धतशीरपणे तपासणी करण्याची प्रक्रिया.

२. गृहीतके : संशोधनाविषयी केलेले तात्पुरते पूर्वानुमान.

३. कागदपत्रांचे परीक्षण : मूळ साधनांची सत्यता पडताळून पाहणे.

४. घटिते : कागदपत्रांच्या परिक्षणानंतर जी माहिती हाती येते त्यास घटिते म्हणतात.

५. अन्वयार्थ : इतिहासकार पुराव्यांच्या आधारावर आणि स्वतःच्या वैचारिक दृष्टिकोनातून निष्कर्षरूपाने जी काही विधाने करतो त्यास अन्वयार्थ म्हणतात.

६. साम्यानुमान : गतकालीन घटनांचा अन्वयार्थ लावण्यासाठी दोन घटनांमधील साम्य अथवा समानता शोधणे.

## ३.४ स्वयं – अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं –अध्ययनासाठी प्रश्न –१ ची उत्तरे

| | |
|---|---|
| १. ब) जे. बी. ब्युरी | २. अ) दीर्घ |
| ३. क) वस्तुनिष्ठता | ४. ब) विषयाची निवड |
| ५. अ) सत्यनिष्ठा | ६. ब) गृहितके |
| ७. क) ब्लू प्रिंट | ८. अ) प्राथमिक साधने |
| ९. ब) गृहितक | |

### स्वयं –अध्ययनासाठी प्रश्न –२ ची उत्तरे

| | |
|---|---|
| १. अ) घटिते | २. ब) विश्लेषण |
| ३. अ) व्हॉल्टेअर | ४. अ) श्वास |
| ५. क) जेम्स ग्रँड डफ | ६. ब) कार्ल मार्क्स |
| ७. अ) ई. एच. कार | ८. ब) तीन |

### स्वयं –अध्ययनासाठी प्रश्न –३ ची उत्तरे

| | |
|---|---|
| १. क) अंतिम | २. ब) तळटीप |
| ३. अ) साम्यानुमान | ४. ड) शीतयुद्ध |
| ५. अ) घाई–गडबड | ६. क) तर्कावर |

## ३.५ सारांश :

इतिहास संशोधन एक अविरत चालणारी प्रक्रिया आहे. एकोणिसाव्या शतकात इतिहासलेखनाला गती प्राप्त झाली. इतिहासलेखन प्रक्रियेची माहिती करून घेत असताना आपणाला त्याच्या पायऱ्या अभ्यासाव्या लागतात. त्यानंतरच आपणाला इतिहासलेखन कसे करावे हे समजते. इतिहासलेखन प्रक्रिया समजून घेत असताना इतिहास म्हणजे काय?, इतिहास संशोधकाकडे कोणते गुण असावेत? हे प्रथम जाणून घ्यावे लागते. संशोधन हे शास्त्रशुद्ध होण्यासाठी संशोधनाच्या पायऱ्या अभ्यासणेही तितकेच गरजेचे असते. त्यामध्ये विषयाची निवड, गृहीतकांची मांडणी, पूर्व संशोधनाचा आढावा, संशोधन आराखडा, कागदपत्रांचे

संघटन आणि व्यवस्थापन, साधनांचे पृथक्करण, कागदपत्रांचे परीक्षण, तथ्य विश्लेषण, संशोधन अहवाल, संदर्भ ग्रंथांची यादी अशा अनेक टप्प्यांची माहिती घेतल्यानंतर आपणाला संशोधन करण्यासंबंधीची संपूर्ण माहिती मिळते.

इतिहास हे शास्त्र की कला या वादविवादात संशोधकाने न घुसता इतिहास हे एक शास्त्र आहे हे लक्षात घेऊन संशोधन करणे महत्त्वाचे आहे. संशोधन करीत असताना संशोधकाला अनेक प्रक्रियांमधून जावे लागते. उदाहरणार्थ विषय निवडीपासून कागदपत्रे संकलित करणे त्याचबरोबर त्याचे परीक्षण करणे, त्या कागदपत्रांचा अन्वयार्थ काढणे आणि त्यानंतर त्या अन्वयार्थाचे रूपांतर आपल्या प्रभावी भाषेमध्ये करून त्याचे लेखन संशोधकाला करावे लागते.

एकूणच संशोधकाने इतिहासलेखन प्रक्रियेच्या सर्व पायऱ्या समजून घेतल्यानंतर संशोधनाला सुरुवात केली तर त्याचे संशोधन हे उत्तम दर्जाचे होऊ शकते. या संशोधनाच्या पायऱ्या पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांना समजाव्यात. त्यांना इतिहासाचे सादरीकरण करता यावे. या उद्देशाने सदर प्रकरणाची मांडणी केली आहे. या प्रकरणामुळे नक्कीच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन करण्याची लालसा निर्माण होऊन नवसंशोधन निर्मितीला चालना मिळेल.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. इतिहासलेखन प्रक्रियेतील विविध पायऱ्या विशद करा.

२. तथ्य विश्लेषण म्हणजे काय सांगून विश्लेषण कसे करावे हे स्पष्ट करा.

३. कागदपत्राचा अन्वयार्थ व सादरीकरण यांची माहिती सांगा.

**ब) टिपा लिहा.**

१. इतिहास संशोधन म्हणजे काय?

२. संशोधकाचे गुण

३. विषयाची निवड

४. संशोधन आराखडा

५. तथ्य विश्लेषण

६. कागदपत्रांचा अन्वयार्थ

७. सादरीकरण

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. Carr, E.H., What is History, Continental Publisher, 1954.

२. Chitins, K. N., Research Methodology in History, Pune, 1979.

३. सातभाई, श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.

४. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्र - लेखन, परंपरा,संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, २००७.

५. कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, पाचवी आवृत्ती, नागपूर, २०१६.

६. आठवले, सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

७. बेंद्रे, वा.सी., साधन चिकित्सा.

८. गाठाळ, साहेबराव, इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१५.

९. राजदरेकर, सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २०१२.

❖ ❖ ❖

**घटक – ४**

# इतिहास लेखनाच्या पद्धती

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्टे

४.१. प्रास्ताविक

४.२. विषय विवेचन

४.२.१ नोटस् काढणे (टिपणी/टिपणे)

४.२.२ तळटीपा आणि अंत टीपा

४.२.३ सूची

४.२.४ परिशिष्टे

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**४.०. उद्दीष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- संशोधनासाठी नोटस् कशा काढतात याची माहिती समजेल.
- संशोधनाच्या पूर्णत्वानंतर तळटीपा आणि अंत टीपा कशा पद्धतीने द्यावयाच्या असतात याची माहिती होईल.
- प्रकरणाच्या अखेरीस सूची (यादी) कशा पद्धतीने द्यावी याची माहिती मिळेल.
- पुरवणी स्वरूपात संशोधनाच्या अखेरीस परिशिष्टांची नोंद कशी करावी हे सांगता येईल.
- संशोधनास वापरलेल्या संदर्भ ग्रंथाच्या यादीची रचना कशी असते ते स्पष्ट करता येईल.

## ४.१. प्रास्ताविक :

इतिहासलेखन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. कारण नव्याने प्राप्त होणाऱ्या संदर्भ साधनांमुळे इतिहासाच्या व्यापकतेत भर पडत असते. इतिहास लेखनाचे विशिष्ट तंत्र असल्याने इतिहास संशोधकास काही साधनांचा सातत्याने वापर करावा लागतो. या साधनांच्या वापरामुळे इतिहास लेखनास शास्त्राचा दर्जा प्राप्त होण्यास मदत होते. संशोधनासाठी आवश्यक कागदपत्रे जमा झाल्यानंतर टिपणे किंवा नोटस् काढण्याचे तंत्र सरावातून आत्मसात करावे लागते. या नोटस् काढण्याच्या परंपरागत तसेच आधुनिक पद्धती विकसित झाल्या आहेत. या नोटस्च्या सहाय्याने लिखाण करताना लिखाणाच्या दर्जेदारपणासाठी तळटीपा द्याव्या लागतात. तळटीपेचे तंत्र अभ्यासातून, अनुभवातून विकसित होते. संशोधनाचे लिखाण पूर्ण झाल्यानंतर शेवटी सूची उपलब्ध करून दिल्यास नवीन संशोधन आणि जिज्ञासू वाचकांना याचा फायदा होतो. संशोधनासाठी वापरलेली संदर्भ साधने, ग्रंथ यांची समग्र नोंद शेवटी दिली जाते. अशा संदर्भ ग्रंथाची यादी तयार करण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा वापर केला जातो. संशोधन कार्याच्या शेवटी परिशिष्टे जोडली जातात. ज्याद्वारे जादा लिखानाचा, संशोधनाचा भाग यात अंतर्भूत होतो.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ टिपणे/नोटस् काढणे :

इतिहास संशोधनातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे संदर्भ साधने गोळा करणे होय. संदर्भ साधनांमध्ये अनेक विषयांची विस्तृत मांडणी असते. त्यामुळे त्या संदर्भ साधनांमधून आपल्या विषयाशी संबंधित टिपणे काढावी लागतात. त्यामुळे संदर्भ साधनाचे वाचन करताना संशोधनास उपयुक्त माहिती लिहून घेण्याच्या पद्धतीस टिपणी घेणे असे म्हणतात. टिपणे काढणे हा संशोधनातील लिखाणाचा प्राथमिक व महत्त्वपूर्ण टप्पा आहे. कारण आरंभी टिपणे घेतानाच चूक झाली तर पुढे संशोधनकार्य सदोष होऊ शकते. त्यामुळे उपलब्ध संदर्भ साधनांचे विस्तृत काळजीपूर्वक वाचनानंतर अचूक टिपणे घेण्याचा प्रयत्न करावा. कारण संदर्भ साधनातील माहिती जशीच्या तशी वापरता येत नाही. त्यामुळे विषयास अनुसरून टिपण घ्यावी लागतात. संदर्भ टिपणे घेण्याच्या विविध परंपरागत पद्धती प्रचलित आहेत. याव्यतिरिक्त संगणक, इंटरनेट, मोबाईल याद्वारेही टिपणे घेण्याच्या आधुनिक पद्धती प्रचलित होत आहेत. भविष्यात यात नाविण्यपूर्ण बदल होत जाईल. यावरून परंपरागत आणि आधुनिक पद्धतीची माहिती पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**अ) परंपरागत टिपणे घेण्याच्या पद्धती :**

**१) नोटबुक पद्धत :**

टिपणे घेण्याची ही प्राथमिक पद्धत असून नुकतेच संशोधन कार्यास सुरूवात केलेल्या संशोधकाकडून नोटबुक पद्धतीचा वापर केला जातो. संशोधनाच्या आरंभीच्या अवस्थेमध्ये एक नोटबुक (वही) मध्ये आपल्या विषयास अनुसरून टिपणे एकत्रित काढत असतो. त्यातून संशोधनाशी निगडीत बाबी सलगपणे एकाच

वहीत येतात किंवा माहितीच्या विविधतेनुसार अनेक वह्या वापरल्या जातात. मात्र ही पद्धत फारशी सोईस्कर, व्यावहारिक नाही. कारण एकाच वहीत सर्व माहिती नोंदवल्याने जेव्हा संशोधनास पुढे गती येते तेव्हा मुबलक माहिती, अनेक मुद्दे जमा होतात. त्यामुळे केवळ एकाच वहीत माहिती असल्याने त्या संशोधकाचा अंतिम लिखाण करताना गोंधळ निर्माण होतो आणि कोणता मुद्दा कुठे आहे हे शोधण्यास वेळ लागतो. परिणामी त्याच्या संशोधन कार्यावर, संशोधनाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. काही अनुभवी संशोधक प्रत्येक घटक, प्रकरणासाठी स्वतंत्र नोटबुकचा वापर करतात. तरीही एकाच वहीत एकत्रित मुद्दे असल्याने आणि मुद्दे नजरेसमोर नसल्याने काही मुद्दे विसरले जाण्याचे तर काही मुद्यांचा घटनाक्रमही बिघडण्याची शक्यता असते. थोडक्यात नोटबुक पद्धती टिपणे काढण्यास फारशी योग्य नाही म्हणून संशोधनासाठी या पद्धतीस एकदम नाकारताही येत नाही.

**२) फाईल पद्धत :**

टिपणे घेण्यासाठी फाईलची पद्धत प्रचलित आहे. यामध्ये विषय, घटक, प्रकरणानुसार फाईलचा वापर करून विषय, उपविषय किंवा प्रकरणे यानुसार स्वतंत्र फाईल्स घातल्या जातात. ही पद्धत नोटबुक पद्धतीपेक्षा सोईस्कर ठरते. कारण संशोधकाकडे जसजसे संदर्भ साधने, माहिती गोळा होत जाईल त्याप्रमाणे फाईलमध्ये आवश्यकतेनुसार नोंदी घेऊन सुसंगतवार कागद लावता येतात आणि फाईलमध्ये ठेवल्यामुळे केव्हाही काढून घेता येतो. तसेच नवीन मुद्दा नवीन पानावरती नोंदवून त्याठिकाणी ठेऊ शकतो.

फाईल पद्धतीचा महत्त्वाचा फायदा म्हणजे एकाच विषयावरती अनेक ठिकाणाहून काढलेली टिपणे एकत्रितपणे उपलब्ध होतात. गरजेनुसार फाईल मधील काही नोंदी केलेले कागद इतरत्र घेऊन जाणे सोपे ठरते. या पद्धतीमध्ये काही दोष आहेत. एकाच कागदावरती अनेक प्रकारची माहिती येऊ शकते. किंवा एकाच प्रकारची माहिती अनेक प्रकरणांमध्ये किंवा उपप्रकारणांमध्ये गरजेची असते. अशावेळी एखाद्या कागदावरती नोंदी लिहून तो फाईलमध्ये ठेवला तर त्याचा इतर ठिकाणी वापर करता येत नाही व वापर करण्याचे ठरविले तर नोंदी केलेल्या टिपणाच्या फाईल्स्, त्यातील मुद्दे, उपमुद्दे सतत शोधावे लागतात. प्रत्येक कागद हाताळणे सोपे नसल्याने कागद गहाळ होण्याची शक्यता असते. संशोधकास लिखाणाच्या वेळी माहिती मिळाली नाही तर काही वेळेस महत्त्वाची माहिती विश्लेषणामध्ये मागे राहण्याची शक्यता असते. या दोन प्रकरणात सुधारणा करून संशोधनात निर्माण झालेला महत्त्वाचा प्रकार म्हणजे कार्ड किंवा स्लीप पद्धत होय.

**३) स्लीप/कार्ड पद्धत :**

नोटबुक आणि फाईल पद्धतीतील प्राथमिक त्रुटी दूर करून सुधारित पद्धत म्हणजे स्लीप किंवा कार्ड पद्धत मानली जाते. कारण वरील दोन पद्धतीमध्ये आपणास संशोधनास आवश्यक मुद्यासोबत इतरही अनेक मुद्दे असतात. या पद्धतीनुसार संदर्भाच्या वाचनानंतर नोंदी करण्यासाठी एका स्वतंत्र स्लीपचा वापर केला जातो. कार्डचा आकार लहान सुटसुटीत, हाताळण्यास योग्य असल्याने प्रत्येक मुद्यासाठी स्वतंत्र कार्ड असते. प्रत्येक कार्डवर प्रकरण, उपप्रकरणाच्या नोंदी ठेवता येत असल्याने गुंतागुंत होत नाही. कार्डची प्रसंग, घटना, स्वरूप,

सणावळीनुसार विभागणी करता येते. कार्डची हाताळणी सोपी असते. एका कार्डवरील नोंदी अनेक प्रकरणासाठी उपयुक्त ठरणार असतील तर त्या कार्डवर अशा नोंदी करता येतात व त्याचा विश्लेषणासाठीही चांगला उपयोग होतो. कार्ड विषय-संदर्भानुसार एकत्रित करणे किंवा स्वतंत्र करणे सोपे जाते. प्रकरणानुसार त्यांची मांडणी केली जाते. त्यामुळे संशोधकाचे प्रत्येक प्रकरण तळटीपेसह तयार होते.

**अ) कार्डचे सर्वसाधारण स्वरूप :**

अनेक प्रकारची कार्ड संशोधक सोयीनुसार वापरू शकतो. संशोधक कार्ड स्वतंत्रपणे आपल्या सोयीनुसार छापून घेऊ शकतो किंवा अशी कार्डस् स्टेशनरीमध्ये उपलब्ध होऊ शकतात. कार्डचा आकार साधारण आयताकृती असतो. त्या कार्डवर लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, प्रकाशन स्थळ, वर्ष अशा नोंदी करण्यासाठी जागा असते. याशिवाय कार्ड स्वतंत्र ठेवण्यासाठी प्रकरण, उपप्रकरण, विषय, उपविषय यांच्याही नोंदी करता येतात. कार्डच्या एका बाजूस सविस्तर नोंदी ठेवून त्याच्या पाठीमागे नोंदी घेता येतात. सर्वसाधारण कार्डचा आकार ४ x ६ किंवा ८ x ६ इंच असावा.

**ब) कार्डवरील टिपणी घेण्याची पद्धत आणि मुद्दे :**

**टिपणी लेखनाची पद्धत**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरणाचे नांव | | उपप्रकरण | दिनांक |
| | मुद्दा / संदर्भ टिपण नोंदी | | |
| लेखकाचे नाव | पुस्तकाचे नाव | प्रकाशक | पान नं. |

नमुना

| | | |
|---|---|---|
| छ. शिवाजी महाराजांचे लष्करी प्रशासन | छ. शिवाजी महाराजांचे पायदळ | १६७२ |
| | महत्त्वाचे मुद्दे / घटनाक्रम | |
| जदुनाथ सरकार | कलकत्ता | १९५८ |

- कार्डच्या शीर्षस्थानी, डाव्या बाजूस मुख्य प्रकरणाच्या नावाची नोंद, त्याशेजारी मध्यभागी उपप्रकरण आणि उपलब्ध असल्यास उजव्या बाजूस दिनांकाचा उल्लेख करावा.
- कार्डच्या मध्यभागी आणि पाठीमागील बाजूस असलेल्या कोऱ्या जागेवर महत्त्वाचा मुद्दा मोजक्या शब्दात मांडावा.
- कार्डच्या खाली डाव्या कोपऱ्यात लेखकाचे नाव, त्याशेजारी पुस्तकाचे नाव, प्रकाशक आणि उजव्या बाजूच्या कोपऱ्यामध्ये त्या संदर्भ ग्रंथामधील पानाचा क्रमांक नोंदवावा.

**क) कार्ड पद्धती वापरातील दक्षता :**

- कार्ड पद्धत वपरताना प्रत्येक नोंदी स्वतंत्र स्लीप/कार्डवर घ्याव्यात.
- घेतलेल्या नोंदी बिनचूक घ्याव्यात.
- नोंदी घेतानाच अतिरिक्त माहिती त्या ठिकाणी नोंदवून ठेवावी.
- एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती आधीच्या संशोधकास असेल तर अशा माहितीसाठी नोंदी कार्डवर घेणे शक्यतो टाळावे.
- संदर्भासाठी एखादे पूर्ण अवतरण (Quotation) असेल तर ते जसेच्या तसे नोंद करावे.

**ड) कार्ड पद्धतीची उपयुक्तता :**

संशोधन कार्यातील टिपणे घेण्यासाठी कार्ड पद्धत ही सोयीस्कर पद्धत ठरते. टिपणाची नोंद घेत असताना विषयानुरूप नोंदी घ्याव्या लागतात. त्यावेळी संबंधित ग्रंथ किंवा कागदपत्रांमधील मजकूर आहे तसा नोंद करून घेण्याऐवजी संशोधकाच्या संशोधनाला अनुरूप घटनांची मांडणी किंवा स्पष्टीकरण करताना समजेल अशा पद्धतीने लिहावा. जसाचा तसा नोंदवला जाणारा मजकूर अवतरण चिन्हामध्ये लिहला जातो. एकूणच स्लीप पद्धतीमुळे अंतिम संशोधनाचे लिखाण करणे सोपे जाते. त्यामुळे ही पद्धत व्यवहारी उपयुक्त ठरते.

**४) टिपणे काढण्याच्या इतर पद्धती :**

**अ) लघु टिपणे :**

टिपणे घेण्याचा हा प्रकार फारसा प्रचलित नाही. परंतु संशोधक फार कुशल असेल तर त्याचा चांगला वापर होऊ शकतो. संशोधनात असे काही मुद्दे असतात की ज्याचा वापर अवतरण म्हणून करावयाचा नसतो. तर सदर संदर्भ माहिती कोणत्या ग्रंथात कोठे नोंद आहे, याची नोंद आपणास आठवण्यासाठी एका कागदावरती लेखक, ग्रंथाचे नाव, पृष्ठ क्र. इतके लिहतात. ही पद्धत ऐनवेळी अचानक वाचनात संदर्भ सापडला तरच वापरावी.

**ब) फोटो, झेरॉक्स, मायक्रोफिल्म इ. :**

काही वेळेला ज्या संशोधन विषयाची टिपणे काढावयाची असतात. तो विषय आणि त्यावरील माहिती व्यापक असते. अशावेळी सर्वच नोंदी एकत्रित लिहून घेणे शक्य होत नाही. म्हणून अशा वेळी टिपणे न घेता त्या संदर्भ साधनांची झेरॉक्स, फोटो, मायक्रोफिल्म काढली जाते. जेणेकरून संशोधकाचा वेळ, श्रम याची बचत होते. याअगोदर अशी आधुनिक साधने उपलब्ध नसल्याने संपूर्ण टिपणे घेणे कंटाळवाणे होई. त्याचा परिणाम संशोधनावरतीही होत असे. त्यामुळे साधनांद्वारे संशोधन सुलभ होते.

**५) आधुनिक टिपणे घेण्याच्या पद्धती :**

इतिहासाच्या संशोधनामध्ये नोटबुक, फाईल, स्लीप या परंपरागत पद्धतीप्रमाणे आजच्या आधुनिक काळामध्ये कम्प्युटर, इंटरनेटच्या वापरामुळे विविध नाविण्यपूर्ण नोटस् काढण्याच्या पद्धती विकसित झाल्या आहेत. उत्तरोत्तर यातही अनेक बदल होत जातील. मुख्यत्वे मोबाईल आणि कम्प्यूटर किंवा लॅपटॉप यांचा संशोधन कार्यात वापर सुरू झाल्याने टीपणे/नोटस् घेण्यासाठी त्याचा वापर आपण सहजपणे करू शकतो.

२१ व्या शतकात 'अँडरॉईड मोबाईल' ही गरजेची वस्तू झाली असून त्यात असलेल्या कॅमेऱ्याद्वारे उपलब्ध संदर्भ पुस्तकांचे फोटो घेऊन ते जतन करून ठेऊ शकतो. त्याचप्रमाणे मोबाईलमध्ये अनेक नोटस् लिहून घेण्यासाठी ॲप उपलब्ध असतात. मोबाईलच्या 'प्ले स्टोअर' मधून असे शेकडो नोटस् घेण्यासाठी ॲप आहेत. त्यामध्ये 'कीप माय नोटस्', 'नोटपॅड', 'माय नोटस्', 'इझी नोटस्', 'वन नोट' असे सातत्याने अपडेड होणारे ॲप मोबाईलमध्ये घेऊन वही, पेन, फाईल, स्लीप नसतानाही आपल्या हातामध्ये असणाऱ्या मोबाईलमध्ये नोटस् लिहू शकतो. कम्प्यूटरवरती सेव्ह ठेवून आपल्या गरजेनुसार त्याचा वापर करू शकतो.

कम्प्यूटर आणि त्यामध्ये गतिमान इंटरनेटच्या उपयुक्ततेमुळे नोटस् घेण्याचे काम सुलभ होते. कम्प्यूटरमध्ये वर्ल्डमध्ये नोटस् टाईप करून ठेऊ शकतो किंवा गुगल या सर्च इंनिनमुळे नोटस् घेण्यात आणखी सुलभता येते. त्यामुळे पैसा, वेळ, श्रम याचीही बचत होते. गुगल सर्च इंजिनमध्ये 'ईमेल' (विपत्र) ही एक डिजिटल स्वरूपामध्ये संदेशाची देवाण घेवाण असते. आजचे आधुनिक ईमेल हे स्टोअर (साठा) व फॉरवर्ड (पुढे पाठवणे) या स्वरूपामध्ये विकसित केले आहेत. स्टोअरमधील बहुतांश ॲप आपणास नोटस् काढावयास उपयुक्त ठरतात. सर्वसाधारण ईमेल ओपन केल्यानंतर उजव्या बाजूस शीर्षस्थानी ९ डॉट ओपन केल्यानंतर नोटस् काढण्यासाठी किंवा जतन करून ठेवण्यास उपयुक्त ॲप असतात. त्यामध्ये ड्राईव्ह, गुगल कीप, डॉक, प्ले बुक, ट्रान्सलेट या ॲपचा वापर करू शकतो.

सर्वप्रथम ड्राईव्ह या ॲपमध्ये अनेक प्रकारच्या नोटस् टाईप करून जतन करून ठेऊ शकतो किंवा ड्राईव्हमध्ये लिंक (link) देऊन ती कोठेही ओपन करून त्याचा वापर करू शकतो. त्यानंतर गुगल प्ले बुक (Google Play Book) याद्वारे जगभरातील संदर्भासाठी पुस्तके आपण डाऊनलोड करून ठेऊ शकतो. त्यामध्ये काही पुस्तके मोफत तर काही नाममात्र किंमतीस उपलब्ध असतात. त्यामुळे नोटस् काढण्याऐवजी संपूर्ण पुस्तकच उपलब्ध हाते. परंतु बहुतांश इंग्रजी भाषेतील पुस्तके यात उपलब्ध होतात. यानंतर गुगल कीप (Google keep)

यामध्ये आपल्या संशोधनाशी संबंधित घटक, उपघटक अशी विभागणी करून त्यामध्ये गुगल सर्च (Google Search) मधील माहिती कॉपी करून घेऊ शकते आणि प्रकरणानुसार एकत्र करून संशोधनात वापरू शकतो. त्यामुळे नोटस् काढण्याची गरज राहत नाही. यामधील अत्यंत महत्त्वाचे अॅप म्हणजे गुगल डॉक्स द्वारे (Google Docs) आपण टाईप करण्याऐवजी बोलून नोटस् लिहू शकतो. त्यामुळे नोटस् काढण्याचे काम गतीने होऊ शकते. तसेच गुगल ट्रान्सलेटद्वारे (Google Translate) जगभरातील कोणत्याही भाषेतील पुस्तके, माहिती आपल्या मायबोलीत भाषांतरीत करून त्याच्या नोटस् काढू शकतो. किंडल इ बुक्स द्वारे संशोधनास उपयुक्त पुस्तके डाऊनलोड करून वापरू शकतो. मात्र याच्या माध्यमातून अनुवादीत झालेली माहिती जशीच्या तशी घेणे धोक्याचे असू शकते, कारण याद्वारे होणारे अनुवादन खात्रीशीर नसते. एकंदरीत नोटस् काढण्याच्या या आधुनिक पद्धती असून उत्तरोत्तर यामध्ये बदल होत जाणार आहेत, आणि नोटस् काढण्याच्या पद्धतीही विकसित होत जातील. संशोधकांनी परंपरागत पद्धतीप्रमाणे या आधुनिक नोटस् काढण्याच्या पद्धतीचा संशोधनात वापर केल्यास गतीने संशोधन पूर्णत्वास येण्यास मदत होते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) टिपण घेणे म्हणजे काय?

२) नोटबुक पद्धतीचा तोटा कोणता आहे?

३) कार्ड पद्धतीमध्ये लेखकाचे, पुस्तकाचे नाव याचे स्थान कोठे असेल?

४) गुगल सर्च इंजिन अंतर्गत ईमेलचा वापर कशासाठी केला जातो?

५) संगणकावर टाईप करण्याऐवजी बोलून नोटस् लिखानासाठी कोणते अॅप वापरतात?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) टिपण घेण्यामधील स्लीप पद्धतीमध्ये कार्डचा सर्वसाधारण आकार ४ x ६ किंवा ......... असावा.

२) नोटबुक, फाईल पद्धतीपेक्षा ............. ही पारंपारिक पद्धत नोटस् काढण्यासाठी उपयुक्त ठरते.

३) नोटस् काढण्यासाठी ............. अॅपद्वारे जगभरातील पुस्तके डाऊनलोड करून ठेऊ शकतो.

४) वाक्य, पुस्तके भाषांतरित करण्यासाठी Google .............. या अॅपचा वापर करतात.

५) अँडरॉईड मोबाईलचा वापर .............. काढण्यासाठीही केला जातो.

**४.२.२ तळटीपा आणि अंत टीपा :**

संशोधन प्रक्रियेतील महत्त्वाचे तंत्र म्हणून तळटिपेस ओळखले जाते. संशोधकाने मांडलेल्या मुद्यांना पुष्टी देण्यासाठी तळटिपेचा वापर करतात. इतिहास लेखनाशास्त्रामधील एक महत्त्वाचा घटक म्हणून तळटीपेकडे पाहिले जाते. संशोधकाने केलेल्या संशोधनास भक्कम आधार केलेल्या मांडणीस पुरावा स्वरूपात तळटीपेचे

महत्त्व आहे. 'तळटीपा' आणि 'शेवटी दिलेल्या टीपा' या दोन्ही पद्धतीने मांडणी करण्याची पद्धत संशोधनामध्ये रूढ आहे. सर्वसाधारणपणे 'तळटीपा' या संदर्भग्रंथामध्ये पृष्ठाच्या तळाशी दिल्या जातात. तर 'शेवटी दिलेल्या टीपा' मध्ये प्रकरणाच्या किंवा संपूर्ण पुस्तकाच्या शेवटी एकत्रित दिल्या जातात. आधुनिक पद्धतीने संशोधनानुसार तळटीपा दोन पद्धतीने देतात. त्यामध्ये Content Footnote (सामग्री तळटीप) आणि Copyright Permission Footnote) (कॉपीराईट परवानगी तळटीप) म्हणजे काही संदर्भ साधने संशोधनानंतर आपण आपल्या प्रबंध, संशोधन प्रकल्पामध्ये त्याची नोंद करू शकतो. तर काही संदर्भ साधने संशोधनानंतर मांडणी करताना 'कॉपीराईट' असतात. अशावेळी त्याची रितसर परवानगी घेऊन त्याच्या नोंदी तळटीपेत केल्या जातात.

संशोधनाच्या प्रक्रियेदरम्यान संशोधकास अनेक ग्रंथ, संदर्भ साधनांचा अभ्यास करावा लागतो. संशोधकाकडून जेव्हा प्रत्यक्ष लेखनाची सुरूवात होते तेव्हा मांडणी विश्लेषणाचे कार्य सुरू होते. मांडणी करत असताना घेतलेल्या पुस्तक, ग्रंथ संदर्भाच्या नोंदीवरून तळटीपा दिल्या जातात. इतिहास लेखनामध्ये तळटीपांचे अनन्यसाधारण महत्त्व असून याशिवाय संशोधनास पूर्णत्व येत नाही. त्यामुळे तळटीपांची मांडणी हा संशोधनाचा गाभा ठरतो.

**१) संशोधनामध्ये तळटीपा देण्यामागील हेतू :**

**अ) संशोधनास सहाय्यक ग्रंथाचे वाचकांना ज्ञान :**

संशोधकाने अनेक संशोधन ग्रंथांचा अभ्यास केलेला असतो व त्या ग्रंथातील संदर्भ, माहिती स्वत:च्या संशोनामध्ये वापरलेली असते. त्यामुळे संशोधकाने प्राप्त केलेली माहिती कोणत्या संदर्भ साधनांमधून घेतलेली आहे हे जिज्ञासू वाचकांना माहित व्हावे हा तळटीप देण्याचा एक उद्देश असतो. त्यामुळे प्राथमिक, अव्वल साधनांवर आपले संशोधन आधारित आहे हे वाचकांना ज्ञात होण्यासाठी तळटीप दिली जाते. तळटीपेचा दुसरा मुख्य हेतू म्हणजे ज्या संदर्भ ग्रंथातून माहिती घेतली आहे. त्या लेखकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तळटीप दिली जाते. संशोधकाने प्रामाणिकपणे वापरलेल्या संदर्भ साधनांची नोंद यातून घेतली जाते. तसेच वाचकाने नव्याने केलेल्या संशोधनास भक्कम पुरावा म्हणून तळटीप दिली जाते.

**ब) वाचकांना जादा माहिती प्राप्तीसाठी सहाय्य :**

संशोधकाने आपल्या अभ्यासाविषयीच्या अनुषंगाने मांडणी केलेली असते. सदर संशोधनकार्यात वेळावेळी पुरावे देऊन आपली मांडणी केलेली असते. परंतु संशोधकास आपल्या विषयापुरतेच लिखाण करावे लागते. अशावेळी संशोधनामध्ये दिलेल्या तळटीपांमुळे वाचकांना संबंधित विषयासंबंधीची ज्यादा माहिती कोणत्या ग्रंथामधून उपलब्ध होईल अशा हेतूने जिज्ञासू वाचकांसाठी तळटीप दिल्या जातात. थोडक्यात मूळ संशोधनाबरोबरच ज्यादाच्या संशोधनाचे ज्ञान तळटीपेतून वाचकांना मिळते.

**क) विरोधी संदर्भ साधनांची मांडणी :**

संशोधकास आपल्या मांडणीमधील मते अचूक आहेत अशी खात्री असते. परंतु, प्रत्येक वेळेस त्याचे मत योग्य असेलच असे नाही. त्यामुळे ज्यावेळी संशोधनात अनेक संदर्भाची मांडणी तळटीपेतून होत असते. त्यावेळी संशोधकासही एकाच विषयासंबंधी किती प्रकारचे विचार, मते आहेत याची माहिती होते म्हणून अशा विरोधी संदर्भाच्या मांडणीमुळे संशोधकाच्या विरोधी लिखानाचीही माहिती होते.

**ड) लिखाणातील सातत्यासाठी तळटीप :**

बहुतांश वेळेस संशोधक लिखाणामध्ये वारंवार संदर्भ साधनांची मांडणी करतात. त्यामुळे त्या संशोधकाच्या सखोल ज्ञानाची माहिती होते. परंतु वाचकांच्या वाचनाचा आणि लिहणाऱ्या संशोधकाचाही लिखाणाचा ओघ खंडित होतो. ज्यावेळी सर्वसामान्य वाचक असा ग्रंथ वाचतो त्यावेळी त्याच्या वाचनाची लय सतत थांबण्याचा धोका असतो. कारण सततच्या टिपांमुळे असे घडू शकते. तळटीपा लिखाणामध्ये देण्याऐवजी शेवटी घालाव्यात. जिज्ञासू वाचकास संदर्भ हवे असल्यास तो शेवटी पाहू शकतो आणि सामान्य वाचकांच्या वाचनात खंड पडत नाही. एकूणच लिखाणातील सातत्यासाठी तळटीपांची मांडणी केली जाते.

**२) तळटीपांचे प्रकार :**

तळटीपांच्या मुख्य हेतुसोबत तळटीपांचे प्रकार पडतात. वाचकांना ज्यादा माहिती उपलब्ध करून देणे, सबळ पुरावा, लिखाणातील सातत्य, इतर महत्त्वाच्या संदर्भाची मांडणी याबरोबर सर्वसाधारण दोन प्रकार पडतात.

१) संशोधक आपला मुद्दा स्पष्ट करताना लिखाणामध्ये तळटीप देऊन स्पष्टीकरण देतो. अशी तळटीप देण्याचा त्याचा उद्देश आपल्या मताचे स्पष्टीकरण करणे असतो. साधारणत: अशा प्रकारातील टीपा प्रत्येक पानावर दिल्या जातात. त्यामुळे वाचकासही त्याच पृष्ठावर त्या विषया संबंधीची ज्यादा माहिती मिळते.

२) या दुसऱ्या प्रकारानुसार प्राथमिक दर्जाचा पुरावा आपल्या विधानाच्या समर्थनार्थ मांडत असतो. यामुळेही वाचकांच्या ज्ञानामध्ये नव्याने भर पडते. संशोधकाने दोन्ही प्रकारच्या तळटीपा या समयसुचकतेने देणे आवश्यक असते.

**३) तळटीपांचे संशोधनातील स्थान :**

संशोधनास बळकटी देण्यासाठी तळटीपा दिल्या जातात. परंतु तळटीपांसाठी लिखित स्वरूपाचे नियम नाहीत. प्रचलित परंपरा, रूढी, संकेतांनुसार संशोधक तळटीपा देत असतो. तळटीपांचे निश्चित संशोधनातील स्थानाबाबत नियम नाहीत. परंतु मॉडर्न लँग्वेज असोसिएशन अमेरिका आणि शिकागो युनिव्हर्सिटी मॅन्युअल यांनी तळटीपांसाठीची जी पद्धत सांगितली आहे ती जगभरामध्ये प्रचलित आहे. त्या संकेतानुसार पुढीलप्रमाणे तळटीपांची मांडणी केली जाते.

१. संशोधनामध्ये छापील रेषेवरती उजव्या बाजूस निदर्शनाचे/संदर्भाचे आकडे लिहावेत.

२. ज्या ठिकाणी आकड्याची नोंद केलेली आहे तेथील शब्द आणि आकड्यांमध्ये अंतर असू नये. हे आकडे छापिलमध्ये १, २, ३ अशा स्वरुपात मांडावे.

३. तळटीपा या प्रत्येक पानावर घ्याव्यात किंवा प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्याच्या नोंदी कराव्यात किंवा संशोधनाच्या शेवटी प्रत्येक प्रकरणानुसार घ्याव्यात. संशोधकाच्या सोयीने मांडणी करावी.

४. तळटीपांना द्यावयाचे आकडे विशिष्ट पद्धतीने दिले जावेत व ही पद्धत संपूर्ण ग्रंथामध्ये एकसारखी वापरावी त्यात बदल करू नये. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्रपणे आकडे द्यावेत.

५. एखाद्या ग्रंथामधील अवतरण घेतले असल्यास त्या अवताणाच्या शेवटी तळटीपेचा आकडा द्यावा. प्रारंभी आकडे देऊ नयेत तसेच कोणत्याही शीर्षकासाठी तळटीप देऊ नये.

६. ज्यावेळेस एका सलग वाक्यात एकापेक्षा जादा संदर्भाची मांडणी केलेली असते त्यावेळेस जेथे पहिला संदर्भ असेल त्या अक्षरावरती किंवा शब्दावर आकड्याची नोंद करावी. नंतरच्या संदर्भासाठी पुढील आकड्यांची नोंद करावी. दोन्ही आकड्याची नोंद करताना स्वल्पविराम द्यावा.

**४) तळटीपा देण्याची पद्धत :**

तळटीपांच्या स्थानाबरोबरच त्या कशा पद्धतीने घ्यायच्या याचे काही संकेत, रूढी, परंपरा प्रचलित आहेत यासाठी पुढील पद्धत अवलंबली जाते.

१. तळटीपा देताना आरंभी लेखक/संपादक/भाषांतरकाराचे नाव, यानंतर स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे नाव त्याच्या नंतर ठिकाण, प्रकाशन, वर्ष आणि सर्वात शेवटी ज्या पानावरून तो संदर्भ घेतला आहे त्याचा नंबर द्यावा.

उदा. कुलकर्णी, अ. रा. शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९३, पृष्ठ क्र. ३८.

२. तळटीपेत लेखक/संपादक/भाषांतरकाराचे नाव देताना प्रथम आडनाव आणि त्यानंतर त्याच्या नावाची अद्याक्षरे लिहावित.

उदा. चव्हाण, ना. रा., आणि अद्याक्षरांऐवजी पूर्ण नाव असल्यास ते घ्यावे. उदा. मोरे, विजय.

३. तळटीप देताना जर एकापेक्षा अधिक खंड असल्यास त्या खंडाचा क्रमांक रोमन लिपीमध्ये द्यावा. खंडाचे नाव इटॅलीक्स आणि पानांचा क्रमांक अरेबिकमध्ये द्यावा.

४. जर एखाद्या संदर्भ साधनांची सविस्तर माहिती दिली असेल तर तीच माहिती पुन्हा देण्याची आवश्यकता नसते. तसेच संदर्भ क्रमाने लगेच येत असेल तर फक्त ''कित्ता'' (Ibid) असे लिहावे आणि त्यानंतर पान क्र. लिहावा.

उदा. १. टिळक लक्ष्मीबाई, स्मृतिचित्रे, समन्वय प्रकाशन, कोल्हापूर. मे २०१२, पा.क्र. ११८

२. कित्ता / Ibid १२१.

५. ग्रंथाच्या संदर्भ नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी 'कित्ता' या शब्दाबरोबरच 'उपरोक्त' या शब्दाचाही वापर केला जातो. क्रमाने एका अंकाखाली दुसरा अंक लिहताना 'कित्ता' शब्द तर काही क्रमांकानंतर तोच ग्रंथ पुन्हा वापरावयाचा असेल तर लेखकाच्या नावाचा उल्लेख करून त्यानंतर उपरोक्त हा शब्द वापरून त्यानंतर क्रमांक लिहावा.

उदा. १. शिंदे, खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास १८३८ ते १८९४, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००९, पृष्ठ क्र. ७२.

२. जाधव, रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे १९९७, पृष्ठ क्र. ३८.

३. शिंदे, खंडेराव, उपरोक्त, पृष्ट क्र. ७६.

● **तळटीपांमधील संक्षिप्त रूपांचा वापर :**

तळटीप लिखाणामध्ये 'कित्ता', 'उपरोक्त' अश्या संक्षिप्त रूपाच्या वापराबरोबर आवश्यकतेनुसार इतर अनेक संक्षिप्तांचा वापर करावा लागतो. ज्याप्रमाणे मराठीमध्ये 'कित्ता', 'उपरोक्त', 'तत्रैव', 'पूर्वोक्त', 'उपरिनिर्दिष्ट' हे शब्द वापरतात त्याप्रमाणे इंग्रजीमध्ये 'Ibid', 'opcit' हे शब्द वापरतात.

तळटीपा देत असताना हे शब्द निश्चित कोठे वापरावयाचे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. यापैकी 'Ibid' लॅटिन शब्दापासून आलेला असून लॅटिनमधील 'Ibidem' म्हणजे Meaning the same' असा अर्थ होतो. एकदा 'Ibid' शब्दाच्या वापरानंतर काही पानानंतर 'Ibid' वापरू नये. साधारणत: त्याच पानावर सलग संदर्भासाठी वापरतात. तसेच 'OPcit' हा शब्द लॅटिनमधील 'Opera Citato' असा असून त्याचा अर्थ 'in the work cited' असा होतो. याशिवाय इतरही महत्त्वाची संक्षिप्तरुपे वापरली जातात.

उदा. Art=article, arts=articles, bk=book, chap=chapter, col-column

● **तळटीपांचे उपयोग आणि दुरुपयोग :**

तळटीपांमुळे संशोधक आणि वाचक दोघांनाही अनेक फायदे होतात. तळटीप प्रत्येक पृष्ठाच्या शेवटी दिल्याने वाचकांना संदर्भ समजतात. त्यामुळे वाचक आणि नवीन संशोधकाच्या ज्ञानात भर पडते. तसेच प्रकरणाच्या शेवटी तळटीप दिल्याने सामान्य वाचकास वाचन करणे सोपे जाते. त्याच्या वाचनामध्येही खंड पडत नाही. एकूणच प्राथमिक दर्जाच्या तळटीपांमुळे संशोधनासही दर्जा प्राप्त होतो.

तळटीपांचे संशोधन क्षेत्रात महत्त्व आहे. परंतु सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीने या तळटीपा फारश्या फायदेशीर नसतात. उलट वाचकाचा गोंधळ होण्याची शक्यता असते. एम.फिल, पीएच.डी संशोधन किंवा लघु, दीर्घ प्रकल्प यामध्ये तळटीपा देताना दक्ष रहावे लागते. कारण तळटीपा या हस्तलिखित लिहताना दिल्या जात असल्यामुळे काही वेळेस संशोधकाचे विधान आणि त्याची तळटीप यांच्यामध्ये ताळमेळ न राहिल्यास गोंधळ निर्माण होऊ शकतो. म्हणून लेखन झाल्यानंतर क्रमाने तळटीप दिल्यास असा धोका कमी राहतो. त्यामुळे कुशल संशोधक असेल तर फारशी अडचण राहत नाही. तळटीप देण्याची प्रक्रिया समजावून घेऊन सरावातून यात नैपुण्य प्राप्त करता येते.

● **विविध सॉफ्टवेअरद्वारे तळटीपा देण्याची पद्धती :**

तळटीपा देण्याच्या विविध पद्धतीप्रमाणे नव्याने संशोधनामध्ये संगणक/लॅपटॉपचा सर्रासपणे वापर सुरू झाला आहे. त्यामुळे संशोधकामध्ये जास्तीत जास्त अचूकता येते. त्यासाठी विविध संदर्भ व्यवस्थापन साधने (Reference Management Tool) चा वापर होतो. त्यासाठी विविध ॲपचा वापर करता येतो. सर्व ॲपची नावे इंग्रजीमध्ये असल्याने त्याचे शब्दश: मराठीत भाषांतर करण्यापेक्षा त्यांचा इंग्रजी नावाप्रमाणे वापर करणे सोईस्कर ठरते. संशोधनामध्ये Mendeley, Zotero, Endnote अशा ॲपचा तळटीपा देण्यासाठी वापर करतात. वरील ॲपव्यतिरिक्त शेकडो ॲप तळटीपा देण्यासाठी वापरतात. त्याचा सर्वसाधारण वापर असा होतो की, 'Google Scholar' द्वारे सर्च करून किंवा आपण आपल्या संशोधनाशी निगडीत घटकांचे टायपिंग झाले असेल तर त्यामध्ये 'तळटीपा' किंवा 'अंत टीपा' ची नोंद करण्यासाठी सदर ॲपचा वापर होतो. या ॲपचा वापर कसा करावा याची विस्तृत माहिती देणारे यु ट्यूबवर इंग्रजीमध्ये किंवा हिंदीमध्ये व्हिडीओ उपलब्ध आहेत. ते पाहून आपण सदर ॲपचा वापर करू शकतो. आपण निवडलेल्या तळटीपा देण्याच्या पद्धतीनुसार उदा. शिकागो युनिव्हर्सिटी मॅन्युअल, मॉडर्न लँग्वेज असोसिएशन अशा शेकडो पद्धतीपैकी आपल्या संशोधनास योग्य तळटीप देण्याची पद्धती या सॉफ्टवेअरमध्ये निवडल्यास त्या पद्धतीने तळटीपा तयार होतात. उदा. नाव बोल्ड, खंड क्रमांक रोमन लिपीत, खंडाचे नाव इटॅलिक्समध्ये, पानांचा क्रमांक अरेबिकमध्ये असे आपोआप तयार होतात. त्यामुळे त्या पद्धतीने प्रत्येकवेळी तळटीप टाईप करण्याऐवजी या ॲपच्या वापरामुळे तळटीपा तयार होतात.

इंग्रजी पुस्तक लिखाण, विज्ञानाच्या पुस्तक लिखानासाठी 'Latex' या ॲपचा वापर करतात. कारण विज्ञान मधील गुणसूत्रे, परिणामे, आकडेवारी लिखाणासाठी या ॲपचा वापर होतो. या 'Latex' ॲपच्या तळटीपा किंवा शेवटी दिलेल्या टीपांच्या नोंदीसाठी 'KiBibTex' या ॲपचा उपयोग होतो. एकूणच पारंपारिक हस्तलिखित तळटीपा देण्याच्या पद्धतीप्रमाणे संगणकावर विविध ॲपच्या वापरामुळे संशोधकाचा वेळ, श्रम याची बचत होते. संशोधनातही अचूकता येते. त्यामुळे या संदर्भ तळटीपांसाठी ॲपचा वापर फायदेशीर ठरतो. भविष्यात या ॲपपेक्षाही विकसित, अचूक ॲप विकसित होत जाऊन संशोधन कार्यही उत्तरोत्तर सुलभ होत जाईल.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. तळटीपांचे संशोधनामध्ये कोठे स्थान असते?

२. तळटीपा देताना लेखकाचे / संपादकाचे नाव कशा पद्धतीने देतात?

३. इंग्रजी/विज्ञानाचे पुस्तक टाईप करण्यासाठी कोणते ॲप वापरतात?

४. संशोधनामध्ये तळटीपा देण्यासाठी कोणते ॲप वापरतात?

५. तळटीपा देण्यासाठी कोणत्या पद्धतींचा जास्त प्रमाणात वापर होतो.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. तळटीपांमध्ये एकाहून अधिक खंड असल्यास खंडाचा क्रमांक ............. लिपीमध्ये द्यावा.

२. ग्रंथांच्या संदर्भ नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ................ शब्दाचा वापर करतात.

३. तळटीपांमध्ये संक्षिप्तरूपांचा वापर करताना 'art' या शब्दाचे पूर्णरूप ........... आहे.

४. संशोधनामध्ये google ................ चा उपयोग इंटरनेट वरील संदर्भ तपासणीसाठी होतो.

५. संशोधनात विविध ॲपच्या वापरामुळे ................ ची बचत होते.

### ४.२.३ सूची :

इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये तळटीपेप्रमाणे सूची हा घटकही महत्त्वाचा असतो. ऐतिहासिक संशोधनात सूची शिवाय पूर्णत्व येत नाही. सूची म्हणजे थोडक्यात संशोधक ज्या विषयामध्ये संशोधन करणार आहे किंवा जे संशोधन पूर्ण झाले आहे अशा सर्व विषयांची माहिती एकत्रित स्वरूपामध्ये दिलेली असते. संशोधनासाठीची ऐतिहासिक संदर्भ साधने मुबलक प्रमाणात असतात. त्या सर्व संदर्भ साधनांमधून आपल्या विषयास अनुसरून संदर्भ साधने आणि माहिती एकत्रित करणे अतिशय कष्टदायक आणि क्लिष्ट काम असते. अशावेळी सूचीचा फायदा होतो.

आधुनिक संशोधन पद्धतीने संशोधनामध्ये अंतरविद्याशाखीय दृष्टीकोण (Interdisciplinary approach) आलेला असून ऐतिहासिक संशोधनास जोडलेली सूची ही इतर समाजशास्त्रे, विज्ञान, भाषा अशा विषयांच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते. त्यातून आंतरविद्याशाखीय संशोधनासही चालना मिळते. इतिहास संशोधनामध्ये सूचीचे परंपरागत ४ प्रकार पडतात. स्थळ, व्यक्ती, ग्रंथ, काल या चार प्रकारांचा वाचक, अभ्यासकांना फायदा होत असतो.

**१. स्थळ सूची : भौगोलिक स्थानांशी निगडीत :**

इतिहासाच्या अध्यापनामधील अत्यंत जवळचे शास्त्र म्हणजे भूगोलशास्त्र होय. ऐतिहासिक घटना, घडामोडी भूपृष्ठावर घडत असल्याने भूगोलाचा इतिहासाशी अत्यंत जवळचा संबंध असतो. म्हणून इतिहास संशोधकास ज्या परिसराच्या इतिहसाची मांडणी करायची आहे तेथील भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान आवश्यक आहे. राज्ये, राज्यांच्या राजधानीची ठिकाणे, रणभूमी, दळणवळणाची साधने, प्रवास, वाहतुकीचे मार्ग, विविध व्यापारी केंद्र इ. ची माहिती संशोधकास असणे गरजेचे असते. अशा भौगोलिक माहितीचा वापर संशोधक आपल्या सोयीनुसार संशोधनामध्ये करत असतो. त्याअनुषंगाने स्थळ सूचीमध्ये गावांची भौगोलिक माहिती दिलेली असते. ग्रंथात अशा विविध स्थळांचा उल्लेख आणि त्याविषयीची विस्तृत माहिती कोण कोणत्या ग्रंथामध्ये कोणत्या पृष्ठावर देण्यात आलेली आहे याचा पृष्ठ क्रमांकासहित उल्लेख स्थळ सूचीमध्ये केलेला असतो.

उदा. डॉ. रमेश जाधव, संपादीत 'राजश्री शाहू गौरव ग्रंथ' या खंडात्मक ग्रंथामध्ये जुना राजवाड्याचा उल्लेख

पा. क्र. २८०, २८१, ३५९, ३७३, ५४२ या पान क्रमांकावरती आहे. त्यामुळे कोल्हापुरातील जुना राजवाड्या संबंधीची माहिती एकत्रितपणे सहज मिळते.

**२. व्यक्ती सूची : व्यक्तीशी संबंधित सूची :**

स्थळ सूचीप्रमाणे इतिहास संशोधनामध्ये व्यक्ती महत्त्वाची आहे. आपणास एखाद्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा अभ्यास करावयाचा आहे. त्या व्यक्तीचे एखाद्या ग्रंथामध्ये कोठे उल्लेख आलेले आहेत ते जाणून घेण्यासाठी व्यक्ती सूचीचा उपयोग होतो. इतिहास संशोधकाने सूची तयार करताना इतिहास लेखनामध्ये ज्या अनेक व्यक्तींचा उल्लेख केला आहे त्यातील व्यक्तींच्या नावाची सूची तयार करावी. अशा सूचीची निर्मिती करत असताना व्यक्तीच्या आडनावाच्या अद्याक्षरानुसार करावी. संबंधित ग्रंथामध्ये ज्या पृष्ठांवरती त्या व्यक्तींच्या नावाचा उल्लेख आलेला असतो अशा सर्व पान क्रमांकाचा उल्लेख व्यक्ती सूची तयार करताना करावा. त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या समग्र कार्याची नोंद एकत्रित मिळते. उदा. बादशहा अकबराचे धार्मिक धोरण - पान क्र. ८०, १०३, १३८, १५२ इ. यामुळे बादशहा अकबराच्या धार्मिक धोरणाची माहिती एकत्रितरीत्या समजते व व्यक्तीविषयक प्रबंध, शोधनिबंध लिहिताना अशा यादीचा उपयोग होतो.

**३. ग्रंथसूची : एकत्रित ग्रंथाची यादी :**

स्थळ आणि व्यक्ती सूचीहून ग्रंथसूची हा भिन्न प्रकार आहे. नव्याने विषय निवडताना किंवा संशोधनासाठी आवश्यक संदर्भ साधनाचा शोध घेत असताना संशोधनास अशा ग्रंथसूचीचा उपयोग होतो. इतिहासकार संशोधन कार्यामध्ये वापरलेल्या संदर्भ ग्रंथाची यादी एकत्रितपणे देत असतो. इतिहासकाराने ज्या विषयाशी संबंधित लेखन केलेले असते त्याला अनुसरून संबंधित जादा माहिती वाचकांना आणि भावी संशोधकांनाही प्राप्त होत असते. अशा भावी संशोधकांच्यापुढे पुढील प्रश्नांची उत्तरे मिळण्यास सदरची ग्रंथसूची उपयुक्त ठरते. त्यामध्ये निवडलेल्या विषयावर यापूर्वी संशोधन कार्य झाले आहे काय? या विषयाच्या अभ्यासासाठी कोणती पुस्तके आवश्यक आहेत? अशी पुस्तके, ग्रंथ कोठे शोधावेत? ग्रंथ कशा पद्धतीने शोधावे? या प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी ग्रंथसूची उपयुक्त ठरते. ग्रंथासोबतच पूरक संदर्भ उदा. मासिके, पाक्षिके, वृत्तपत्रे, गॅझेटीअर अहवाल, वृत्तांत इ. ची माहिती ग्रंथसूचित उपलब्ध असते.

**४. कालसूची : कालसुसंगत घटनाक्रमांची मांडणी :**

खंडात्मक ग्रंथ किंवा महापुरुषांच्या चरित्रात्मक ग्रंथात मोठ्या खंडांमध्ये कालसूचीचा जाणीवपूर्वक वापर केला जातो. निष्णात संशोधक वाचकांना अल्पावधित संबंधीत व्यक्ती विषयी माहिती उपलब्ध होण्यासाठी कालसूचीची मांडणी करतो. त्यामुळे खंडात्मक ग्रंथ किंवा महापुरुषाच्या चरित्रात्मक मोठ्या खंडामध्ये संशोधक, वाचक यांना अत्यल्प कालखंडात सबंधित व्यक्तीविषयीची माहिती उपलब्ध होण्यासाठी निष्णात संशोधक कालसूची जाणीवपूर्वक आपल्या संशोधन प्रबंधामध्ये त्याची मांडणी करतात. एका दृष्टीक्षेपामध्ये व्यक्तीचे जीवनचरित्र समजण्यासाठी या कालसूचीचा वापर होतो.

उदा. - **राजश्री शाहू महाराज : कालसूची.**

| **वर्ष** | **घटना** |
|---|---|
| १८७४ | यशवंतराव उर्फ बाबासाहेब (शाहू) यांचा जन्म |
| १८७६ | शाहू छत्रपतींचे धाकटे बंधू बापूसाहेब यांचा जन्म |
| १८८२ | जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब यांची कोल्हापूर संस्थानच्या रिजन्सी पदावरती नियुक्ती. |
| १८८४ | जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब यांचे थोरले पुत्र यशवंतराव ऊर्फ आबासाहेबांना कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यात दत्तक |

**५. विषयास अनुरसून इतर सूचीचे प्रकार :**

स्थळ, काल, व्यक्ती, ग्रंथ सूची प्रमाणे संशोधकास विषयाला अनुसरून आणखी सूची तयार करता येतात. संशोधनाचा विषय कला क्षेत्राशी संबंधित असेल तर संबंधित कालखंडातील विविध कलाकार, कलामंच, नाट्यगृहे यांचीही सूची तयार करता येते. तसेच विविध उत्पादन, व्यापारातील वस्तूंची माहितीही सूचीच्या माध्यमातून दिली जाते.

● **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सूची म्हणजे काय?

२. व्यक्ती सूची म्हणजे काय?

३. कालसूचीमध्ये कोणत्या घटकाचा समावेश होतो?

४. सूचीचे सर्वसाधारण किती प्रकार आहेत?

५. ग्रंथ सूचीमध्ये कोणत्या संदर्भाचा समावेश होतो?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. आधुनिक काळात नियमांच्या बंधनात न राहता केलेल्या सूचीस ........... म्हणतात.

२. इतिहास अध्यापनासाठी अत्यंत जवळचे शास्त्र ............ आहे.

३. एका दृष्टीक्षेपामध्ये व्यक्तीचे जीवनचरित्र समजण्यासाठी .............. या सूचीचा वापर होतो.

४. संदर्भ ग्रंथाच्या एकत्रित शास्त्रशुद्ध यादीस .............. सूची म्हणतात.

५. आधुनिक काळामध्ये मुक्तपणे ............. देण्याची पद्धत रूढ होत आहे.

### ४.२.४ परिशिष्टे :

परिशिष्टे ही संशोधनामध्ये पुरवणी स्वरूपात कार्य करतात. सर्वसाधारणपणे परिशिष्टांची ग्रंथाच्या अखेरच्या भागामध्ये नोंद केली जाते. परिशिष्ट म्हणजे पुरवणी, जोडपत्रे, विशेष टीपण, यादी, पूरक स्वरूपातील मजकूर, समर्थनार्थ आणि विरोधी लेखन याचा समावेश होतो. अभ्यासक संशोधकांना ग्रंथाविषयीची ज्यादा माहिती यामध्ये समाविष्ट होते.

**१) परिशिष्टाचे सर्वसाधारण स्वरूप :**

संशोधनाविषयीची ज्यादा माहिती परिशिष्टामध्ये समाविष्ट असते. मुख्य संशोधनाच्या मांडणी नंतर संशोधनाच्या शेवटी त्याविषयीची अतिरिक्त स्वरूपातील माहिती यात अंतर्भूत असते. परिशिष्टाचे स्थान हे मुख्य संशोधन, संदर्भ साधनाच्या यादीनंतर याचा समावेश होतो. कारण परिशिष्टामधील माहिती सर्वच वाचकांसाठी फारशी उपयुक्त नसते. केवळ जिज्ञासू वाचकांना त्या संशोधनाविषयीची मांडणी यात असते. त्याचप्रमाणे मुख्य संशोधनाच्या लिखाणामध्ये तळटीपेप्रमाणे परिशिष्टांना जागा देणे शक्य नसते. त्यामुळे परिशिष्टे संशोधनाच्या शेवटी त्याच्या नोंदी असतात.

**२) परिशिष्टांच्या नोंदण्याची पद्धत :**

परिशिष्टाची रचना ही शोधमय किंवा संदर्भ ग्रंथाच्या शेवटी केली जाते. या परिशिष्टाच्या नोंदी करताना स्वतंत्रपणे नवीन पृष्ठाच्या शीर्षकस्थानी परिशिष्टाचे शीर्षक स्पष्टपणे नोंदविलेले असते. इंग्रजीमध्ये परिशिष्टाच्या नोंदी करताना कॅपिटल शब्द वापरले जातात. तसेच एकापेक्षा ज्यादा परिशिष्टांची नोंद करताना सलगपणे घ्यावी लागते. उदा. इंग्रजीमध्ये APPENDIX A, APPENDIX B नंबर मध्ये लिखाण करावयाचे असल्यास APPENDIX 1, APPENDIX 2, असे नोंदवले जाते. मराठीमध्ये परिशिष्ट 'अ' आणि परिशिष्ट 'ब' आणि नंबर मध्ये लिखाण करावयाचे असल्यास परिशिष्ट १, परिशिष्ट २ अशा पद्धतीने पृष्ठाच्या मध्यभागी नोंदवून सलगपणे लिहिली जातात. तसेच एकापेक्षा ज्यादा परीशिष्टे असल्यास त्याची नोंद नवीन पृष्ठांवर केली जाते.

संशोधनामध्ये ज्या क्रमाने संदर्भाचे लिखाण केले जाते त्याच क्रमाने परिशिष्टांची रचना केली जाते. त्यामुळे परिशिष्टातील नोंदी सुटसुटीत वाचक आणि नवसंशोधकाना समजण्यास सोप्या असतात. उदा. संशोधन लिखाणात ज्या संदर्भाआधारे लिखाण केलेले असते तो संदर्भ परिशिष्टात पहिल्यांदा येतो. आणि जर प्रश्नावली संशोधनाच्या अखेरीस असल्यास परिशिष्टामध्येही त्याची नोंद अखेरीस येते. संदर्भ ग्रंथाचे लिखाण पूर्ण झाल्यानंतर क्रमांक त्यानंतर लगेच परिशिष्टांना दिला जातो. संदर्भ ग्रंथाचे लिखाण जर पृष्ट क्र. २६८ ला संपले तर २६९ नंबर पासून परिशिष्टे त्या ग्रंथामध्ये समाविष्ट केली जातात.

**३) परिशिष्टामध्ये समाविष्ट घटक :**

परिशिष्टामध्ये संदर्भ ग्रंथ, शोधग्रंथांमध्ये ज्यादाची माहिती दिली जाते. अशी माहिती जरी मुळ संशोधनामध्ये समाविष्ट नसली तरी भविष्यात त्या संशोधकास रिसर्च पेपर तयार करायचे असतील तर, रिसर्च

पेपरची मांडणी करून निष्कर्षाप्रत पोहचायचे असेल तर परिशिष्टाचा उपयोग होतो. परिशिष्टामध्ये सांख्यिकी माहितीही दिली जाते. तसेच संशोधनाशी संबंधित आलेख, चार्ट, प्रतिमा, नकाशे, रेखांकणे, छायाचित्रण व्हिज्युअल याच्या नोंदीही परिशिष्टामध्ये केल्या जातात. तसेच संशोधनाच्या कामासाठी घेतलेल्या मुलाखती, प्रश्नावली, संशोधकाने माहिती प्राप्तीसाठी केलेला पत्रव्यवहार, पत्रे, टिपणे, इमेल, आलेले मेसेज यांच्याही नोंदी घेतल्या जात असल्याने परिशिष्टामध्ये कोणते घटक समाविष्ट करावेत याची मर्यादा नाही. परंतु परिशिष्टात घेतलेल्या नोंदी संदर्भ ग्रंथातील माहितीशी निगडीत असतात. परिशिष्टांची व्याप्ती वाढविण्यासाठी संदर्भहीन नोंदी किंवा मुळ संशोधनाशी विसंगत नोंदी घेवू नयेत.

**४) परिशिष्टामध्ये नोंदी घेण्याच्या पद्धती :**

**अ) आलेख, कोष्टके :** परिशिष्टाच्या नोंदी देण्यासाठी विविध प्रकारच्या आलेखाचा वापर केला जातो. त्यामध्ये स्तंभलेख, जोडलेख, विभाजित आलेख याद्वारे नोंदी घेतल्या जातात. आलेखाचा वापर मुबलक स्वरूपातील आकडेवारी किंवा दोन-तीन प्रकारच्या आकडेवारीतील सहसंबंध स्पष्ट करण्यासाठी केला जातो. तसेच विविध प्रकारची वृत्तपत्रे, हस्तलिखित टिपणे, संगणकामध्ये कोष्टकांचा मुबलक वापर केला जातो.

**ब) आकृत्या, फोटो :** प्राचीन काळापासून आकृत्यांचा वापर केला जातो. आधुनिक काळामध्ये त्याचा वापर संशोधनात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मुख्य माहिती, संदर्भ प्रभावीपणे मांडण्यासाठी याचा वापर होतो. त्याचप्रमाणे प्रासंगिक, वेळोवेळी घेतलेल्या फोटोंचाही वापर संशोधनामध्ये केला जातो.

**क) नकाशे :** ऐतहासिक साधने प्राप्तीमधील प्राथमिक, महत्त्वाचे साधन म्हणून नकाशे मानले जातात. मुख्य राज्याची राजधानी, युद्धभूमी, स्थळे, विविध व्यापारी मार्ग, मुख्य केंद्र अशा ठिकाणांचे नकाशे परिशिष्टामध्ये समाविष्ट केल्यास संदर्भ ग्रंथाची उपयोगिता वाढते.

**ड) स्पष्टीकरणकोष :** स्पष्टीकरणकोष किंवा विशिष्ट अर्थांचा शब्दांचा कोश म्हणजे एक प्रकारे 'शब्दकोश' (Dictionary) असतो. परंपरागत पद्धतीने संशोधनाच्या शेवटी नव्याने पुढे आलेले, माहित नसलेले, फारसे व्यवहारामध्ये प्रचलित नसलेले विशेष शब्द आणि त्याचे स्पष्टीकरण असते.

परिशिष्टामध्ये वरील घटकांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त गरजेनुसार संशोधनाच्या परिशिष्टमध्ये मजकूर, परिच्छेद, स्पष्टीकरण, ज्यादा माहितीसाठी वाचावयाच्या पुस्तकांची यादी, विविध वेबसाईट, लिंक्स या सर्व नोंदी ज्या संशोधनामध्ये समाविष्ट आहेत त्या परिशिष्टात येतात.

**५) परिशिष्टाच्या नोंदी देण्यामागील उद्देश :**

अनुभवी संशोधक आपल्या लिखाणामध्ये परिशिष्टाचा समावेश करत असतात. त्यामागे काही उद्देश असतात त्यात -

१. संबंधित संशोधनातील मुळ कागदपत्रे, पूरक कागदपत्रे यांची माहिती वाचक, नवसंशोधकांना दिली जाते. तसेच संदर्भ ग्रंथाविषयीच्या महत्त्वाच्या लेखांची माहितीही दिली जाते.

२. संशोधनांमध्ये लिखाणात आलेला पत्रव्यवहार, संस्था, सरकारकडील निवेदनांचा समावेशही परिशिष्टामध्ये होतो.

३. संदर्भ ग्रंथात उल्लेख केलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींचा जीवनपट, कालसुचीची मांडणी केली जाते. त्याचप्रमाणे ग्रंथाबाबतच्या समर्थनार्थ आणि विरोधी टिपांची माहिती दिली जाते.

४. संशोधनात अंतर्भूत नव्याने शब्दकोश, संदर्भसूची आणि गरजेनुसार पुस्तकांची परीक्षणे यात मांडली जातात.

५. संशोधन विषयाशी संदर्भित वृत्तपत्रातील लेख, अभ्यासकांची व्याख्याने याची माहिती परिशिष्टात नोंद केली जाते.

एकूणच परिशिष्टाच्या नोंदीमध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. त्याशिवाय PPT द्वारे सादरीकरण करत असताना प्रश्नोत्तरावेळी ज्यादाची माहिती परिशिष्टात समाविष्ट करून ती गरजेनुसार सादर केली जाते. जेणेकरून सादरीकरण प्रभावी होते. तसेच विविध ब्लॉग, लघु-दिर्घलेखांच्या मांडणीवेळीही परिशिष्टे उपयुक्त ठरतात. खाली उदाहरण म्हणून प्राचार्य रा.तू. भगत संपादित 'संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ' मधील परिशिष्टे खालीलप्रमाणे-

**परिशिष्ट १**

**श्री गाडगेबाबा : जीवन-कार्यपट**

| | |
|---|---|
| जन्म | महाशिवरात्र, बुधवार दि. २३-२-१९७६ |
| वडील झिंगराजीचे कोतेगावी येथे निधन | इ.स. १८८४ |
| दापुरे येथे मामाच्या घरी आगमन | सन १८८४ |
| कुंताबाईंशी विवाह | इ.स. १८९२ |
| दापुरे येथे प्रथम कन्या अलोकाचा जन्म | इ.स. १८९९ |
| द्वितीय कन्या कलावतीचा जन्म | इ.स. १९०० |
| तृतीय पुत्र मुमद्गलचा जन्म | इ.स. १९०२ |
| श्री सद्गुरुंची भेट | इ.स. १९०४ |
| चतुर्थ पुत्र गोविंदाचा जन्म, गृहत्याग | इ.स. १९०५ |
| ऋणमोचनचा नाम सप्ताह प्रारंभ | इ.स. १९०६ |
| पूर्णा नदीघाट | इ.स. १९०८ |
| चोखामेळा धर्मशाळा, पंढरपूर (खर्च १ लाख) | इ.स. १९१७ |
| चि. गोविंदाचा मुंबई येथे विवाह | इ.स. १९१९ |

| | |
|---|---|
| मराठा धर्मशाळा, पंढरपूर (खर्च २ लाख) | इ.स. १९२० |
| सदावर्त पंढरपूर प्रारंभ | इ.स. १९२१ |
| मातोश्री सखुबाई वैकुंठ्वासी (१ मे) | इ.स. १९२३ |
| चि. गोविंदाचा पिसाळलेले कुत्रे चावून पुणे येथे मृत्यू (५ मे) | इ.स. १९२३ |
| परिट धर्मशाळा, पंढरपूर (खर्च २५ हजार) | इ.स. १९२५ |
| मुर्तीजापुर धर्मशाळा व गोरक्षण (खर्च १ लाख) | इ.स. १९२५ |
| नाशिक धर्मशाळा (खर्च ३ लाख) | इ.स. १९३० |
| आळंदी धर्मशाळा (खर्च १ लाख) | इ.स. १९३० |
| परिट धर्मशाळा (खर्च १ लाख) | इ.स. १९३० |
| देहू धर्मशाळा (खर्च २५ हजार) | इ.स. १९३० |
| सदावर्त नाशिक प्रारंभ | इ.स. १९३२ |
| सालबर्डी यज्ञावेळी राष्ट्रसंत तुकडोजींची भेट | इ.स. १९३५ |
| पंढरपुरातील मराठा धर्मशाळेस मुख्यमंत्री बाळासाहेब खेरांची भेट | इ.स. १९३८ |
| आकुल धर्मशाळा पुणे (खर्च दीड लाख) | इ.स. १९४० |
| त्र्यंबकेश्वर परिट धर्मशाळा (खर्च १० हजार) | इ.स. १९४५ |
| बाबांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सत्कार | इ.स. १९४८ |
| डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे चोखामेळा धर्मशाळा पंढरपूर | इ.स. १९४९ |
| नागरवाडी गोरक्षणइ.स. १९५२ | |
| राहुरी गोरक्षण | इ.स. १९५३ |
| जे.जे. हॉस्पिटल धर्मशाळा | इ.स. १९५४ |
| वलगांव पेढी नदीवर निर्वाण (२० डिसेंबर) | सन १९५६ |
| अग्निसंस्कार अमरावती (२१ डिसेंबर) | इ.स. १९५६ |

## परिशिष्ट २

## गाडगेबाबांच्या सामाजिक कार्याचा विस्तार

| | |
|---|---|
| ऋणमोचन येथील घाटावर ओल्या मातीवर सुकी माती टाकण्याचे काम | इ.स. १९०६ |
| ऋणमोचन येथे परीट समाजाचा भंडारा (सहभोजन) | इ.स. १९०७ |
| पूर्णा नदीचा घाट व लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधून तयार केले | इ.स. १९०८ |
| ऋणमोचनला पहिली पत्र्यांची परीट धर्मशाळा | इ.स. १९१४ |

| | |
|---|---|
| पंढरपूर येथे चोखामेळा कार्यशाळा | इ.स. १९१७ |
| मराठा धर्मशाळा, पंढरपूर | इ.स. १९२० |
| अंध पंगु सदावर्त, पंढरपूर | इ.स. १९२१ |
| परीट धर्मशाळा, पंढरपूर | इ.स. १९२५ |
| गोरक्ष विद्यालय धर्मशाळा, मुर्तीजापूर | इ.स. १९२५ |
| श्री गाडगेबाबा प्रकाशन समिती | इ.स. १९२५ |
| नाशिक धर्मशाळा ट्रस्ट स्थापना | इ.स. १९३० |
| भागेश्वर धर्मशाळा आळंदी | इ.स. १९३० |
| देहू धर्मशाळा | इ.स. १९३० |
| ऋणमोचन येथे दोन घाट, हिंसा बंदी कार्यक्रमास सुरूवात | इ.स. १९३१ |
| अंध पंगु सदावर्त, नाशिक | इ.स. १९३२ |
| कोटपूर्णा नदीवर दोन घाट बांधणी | इ.स. १९३७ |
| पुणे आकुल धर्मशाळा, त्र्यंकेश्वर परिट धर्मशाळा, नाशिक | इ.स. १९४० |
| त्र्यंबकेश्वर कल्हईवाले धर्मशाळा, नाशिक | इ.स. १९४८ |
| श्री गाडगेबाबा महाराज मिशन मुंबई, नागरवाडी गोरक्षण स्थापना | इ.स. १९५२ |
| श्री गाडगे महाराज गोरक्षण, राहुरी | इ.स. १९५३ |
| धर्मशाळा, अचलपूर | इ.स. १९५३ |
| धर्मशाळा कुर्ला, मुंबई | इ.स. १९५३ |
| आश्रमशाळा, राहुरी | इ.स. १९५४ |
| मुंबई धर्मशाळा जे. जे. हॉस्पिटलजवळ | इ.स. १९५४ |
| मार्गशीर्ष वद्य चतुर्थी श्री बाबांचे वलगांव पेढी नदीवर निर्वाण | इ.स. १९५६ |

## परिशिष्ट ३

## शाखा व स्थापना काळ

| शाखा | सन |
|---|---|
| श्री गाडगे महाराज मिशन मुंबई -४ | इ.स. १९५२ |
| श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, राहुरी, जि.नगर | इ.स. १९५४ |
| श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, कुर्ला, मुंबई | इ.स. १९५६ |

| | |
|---|---|
| श्री गाडगे महाराज परधाम वृद्धाश्रम, वलगाव, जि. अमरावती | इ.स. १९५७ |
| श्री गाडगे महाराज विमोचीत जाती आश्रमशाळा, गोंदवले, जि. सातारा | इ.स. १९५८ |
| श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, गोंदवले, जि. सातारा | इ.स. १९५८ |
| श्री गाडगे महाराज वसतिगृह, भुसावळ, जि. जळगांव | इ.स. १९५८ |
| श्री गाडगे महाराज कन्या छात्रालय, मिरज, जि. सांगली | इ.स. १९५९ |
| श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, भिवाळी, ठाणे | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, ओतूर, पुणे | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज वसतिगृह, ओतूर, पुणे | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज कन्या छात्रालय, ओतूर, पुणे | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज जनता विकास विद्यार्थी वसतिगृह, ओतूर, पुणे | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज वसतिगृह, चौसाळा, बीड | इ.स. १९६० |
| श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, सातारा | इ.स. १९६१ |
| श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, चालतवाड, ठाणे | इ.स. १९६२ |
| श्री मातोश्री कन्या छात्रालय, जुन्नर, पुणे | इ.स. १९६२ |

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–४**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. परिशिष्टाचे ग्रंथामध्ये स्थान कोठे असते?

२. परिशिष्टाअंतर्गत कोणत्या बाबींचा समावेश होतो?

३. स्पष्टीकरणकोश म्हणजे काय?

४. परिशिष्टांचा वापर कोणत्या घटकांकडून सर्वाधिक केला जातो?

५. पी. पी. टी. द्वारे सादरीकरण करतेवेळी परिशिष्टाचा उपयोग कशा पद्धतीने होतो?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. परिशिष्टे ही संशोधनामध्ये ................ स्वरूपात कार्य करतात.

२. इंग्रजी परिशिष्टांच्या नोंदीसाठी .............. शब्दाचा वापर करतात.

३. प्राचीन काळापासून संशोधनामध्ये ............ चा वापर केला जातो.

४. संदर्भ ग्रंथाच्या लिखाणानंतर लगेच ............ चा क्रमांक दिला जातो.

५. परिशिष्टांमध्ये इंटरनेटद्वारे ............. च्या नोंदी केल्या जातात.

### ४.२.५ संदर्भ ग्रंथाची यादी :

संशोधनाच्या पद्धतीप्रमाणे संदर्भग्रंथाची यादी तयार करणे हे स्वतंत्र तंत्र आहे. संशोधकास संशोधन प्रक्रियेमध्ये अनेक ग्रंथाचे वाचन करावे लागते. आपल्या अभ्यास विषयाशी थेट संबंधित नसलेली परंतु काही संशोधनाशी निगडीत पूरक माहिती मिळण्याची शक्यता असलेल्या संदर्भ ग्रंथाचे वाचन केल्यास संशोधन विषयाचे चांगल्या पद्धतीने आकलन होते. अशा संदर्भ ग्रंथाचे वाचन करताना त्यांच्या नोंदी ठेवाव्यात. थोडक्यात संदर्भ ग्रंथाची यादी म्हणजे संशोधकाने कोणते ग्रंथ संशोधन कार्यासाठी वापरले याची एक यादी होय.

**१) संदर्भग्रंथाच्या यादीचे हेतू :**

संशोधक संदर्भ ग्रंथाची यादी देण्यामागे मुख्य उद्देश हा असतो की, शोधग्रंथ, शोधप्रबंध लिहिताना संशोधकाने कोणते ग्रंथ, कोणती संदर्भ साधने उपयोगात आणली? कोणत्या संदर्भ ग्रंथावरून त्यांचे संशोधन पूर्ण झाले? हे अभ्यासक. वाचकांना समजणे हा मुख्य हेतू असतो. तसेच वाचकांना काही शंका उपस्थितीत होण्यासारख्या असतील तर त्याच्या निराकरणासाठी कोणती संदर्भ साधने वापरणे आवश्यक आहे याचेही मार्गदर्शन संदर्भ सूचीद्वारे होते. त्याचप्रमाणे संशोधकासही आपण वापरलेली साधने क्रमबद्धरितीने त्याची मांडणी संदर्भ ग्रंथाच्या यादीमुळे शक्य होते. त्यामुळे संशोधक विषयाशी निगडीत बाबींचा जेवढा शोध घेईल तेवढी संदर्भ ग्रंथाची यादी समृद्ध होत जाते.

**२) संदर्भग्रंथाच्या यादीची वर्गवारी :**

संशोधनाच्या पूर्णत्वानंतर प्रबंधाच्या शेवटी यादी जोडली जाते. अशाप्रकारे संदर्भ ग्रंथाची यादी तयार करत असताना ती २ प्रकारात करावी लागते. एक म्हणजे प्रत्यक्ष संशोधन करत असताना ज्या ग्रंथाचा प्रत्यक्षपणे संशोधनासाठी वापर केलेला आहे व त्याचा प्रबंधामध्ये संदर्भ दिला असेल, अशा सर्व संदर्भ ग्रंथाची यादी तयार करून शेवटी जोडावी लागते. दुसऱ्या पद्धतीने यादी तयार करत असताना संशोधन कार्यामध्ये वापरलेल्या परंतु प्रत्यक्ष संदर्भ म्हणून न वापरलेल्या ग्रंथाची यादी तयार करणे, अशा पद्धतीने यादी तयार करण्याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे संशोधनासाठी किती संदर्भ ग्रंथ अभ्यासले याचे वाचकांना ज्ञान होते. एम्. फिल. पीएच. डी. प्रबंध, प्रकल्पांमध्ये प्रबंधाच्या शेवटी जोडावयाच्या यादीमध्ये वर्गवारी करावी लागते.

**३) संदर्भ साधने, ग्रंथाची विभागणी :**

संशोधनासाठी वापरलेले ग्रंथ एकाच प्रकारचे नसतात. प्राथमिक संदर्भ साधने, दुय्यम संदर्भ साधने अशी परंपरागत पद्धतीने विभागणी केली जाते. त्यात नव्याने संशोधनामध्ये इंटरनेट साधनांची भर पडली आहे. त्याची

विभागणी ग्रंथ, प्रबंध यामधील साधनावरून निश्चित होत असते. त्यामध्ये खालील प्रमाणे सर्वसाधारणपणे विभागणी होते.

**अ) प्राथमिक संदर्भ साधने**

१) प्राथमिक प्रकाशित संदर्भ साधने

२) प्राथमिक अप्रकाशित संदर्भ साधने

**ब) दुय्यम संदर्भ साधने**

१) दुय्यम प्रकाशित संदर्भ साधने

२) दुय्यम अप्रकाशित संदर्भ साधने

**क) इंटरनेट साधन**

१) विविध वेबसाईटस्

2) ऑनलाईन प्रकाशित लेख इ.

वरीलप्रमाणे वर्गवारी केल्यानंतर विषयास अनुसरून पुन्हा त्याची वर्गवारी करणे आवश्यक आहे.

उदा. वृत्तपत्रविषयक संशोधन प्रबंधाचे कार्य करावयाचे असेल तर प्राथमिक संदर्भ साधना अंतर्गत दैनिक, साप्ताहिकांचे मूळ अंक, कार्यालयीन कागदपत्रे, वृत्तपत्रांमधील घटना, मुलाखती, प्रश्नावली, गॅझेटीअर यांचा समावेश होतो. तर दुय्यम संदर्भ साधनांमध्ये संदर्भ ग्रंथ (अभ्यासानुसार मराठी, हिंदी, इंग्लिश इतर भाषेतील), अप्रकाशित पीएच.डी., एम्.फील चे शोधप्रबंध यांचा समावेश होतो.

**४) संदर्भ ग्रंथ यादीच्या विश्लेषणाचे घटक :**

प्राथमिक संदर्भ साधने प्रत्यक्ष संशोधनाशी संबंधित अव्वल दर्जाची साधने असतात. दुय्यम संदर्भ साधनांतील ग्रंथ हे टीकात्मक, स्पष्टीकरणात्मक, विश्लेषणात्मक आणि संबंधित घटनेबद्दल नेमकी माहिती न देता त्यात सर्वसाधारणपणे माहिती दिलेली असते. त्याव्यतिरिक्त संदर्भ साधनांची वर्गवारी आणि वर्गीकरण केल्यानंतर एकाहून ज्यादा भाषेतील संदर्भ साधने वापरली असतील तर प्रत्येक साधनांची वर्गवारी स्वतंत्रपणे करावी. तसेच इतर कागदपत्रांचा वापर केला असल्यास त्याचीही यादी स्वतंत्रपणे देणे गरजेचे असते. अशा विश्लेषणात्मक यादीमुळे संशोधक आणि वाचकांमध्ये संशोधनाबद्दल जिज्ञासा निर्माण होते. तसेच अशा यादीमुळे संशोधकांच्या संशोधनाचा दर्जा स्पष्ट होतो.

**५) संदर्भ ग्रंथ यादी तयार करण्याची पद्धत :**

संशोधनासाठी संदर्भ ग्रंथाचे वाचन करताना संशोधकास याची जाणीस असावी की, संशोधनाच्या शेवटी ग्रंथ यादी द्यावयाची आहे. त्यानुसार वाचनानंतर त्या पुस्तकाच्या नोंदी ठेवाव्या लागतात. वाचनावेळीच ग्रंथाच्या

स्वरूपानुसार त्याची प्राथमिक आणि दुय्यम अशी विभागणी केल्यास शेवटी यादी तयार करताना सुलभ होते. त्याची सर्वसाधारण पद्धत पुढीलप्रमाणे -

१. संदर्भ ग्रंथाची यादी तयार करताना सर्वप्रथम पुस्तक/ग्रंथाच्या लेखकाचे/संपादकाचे/भाषांतरकाराचे नाव लिहावे. लेखकाचे नाव लिहिताना सुरवातीस आडनाव व त्यानंतर त्याचे नाव किंवा नावाची अद्याक्षरे लिहावीत. एखाद्या ग्रंथास दोन लेखक असल्यास दोघांचीही नावे लिहावीत. दोनपेक्षा अधिक लेखक असल्यास केवळ पहिल्या लेखकाचे नाव लिहावे. जर लेखक अनुवादक असेल तर अनुवादक (Tr.) आणि संपादक असेल तर संपादक (Ed) असे लिहावे.

२. लेखकाच्या नावानंतर स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे नाव लिहावे व स्वल्पविराम द्यावा. त्यानंतर ग्रंथ अनेक खंडात असेल तर त्याचा खंड क्रमांक लिहावा व स्वल्पविराम द्यावा. ग्रंथाचा खंड क्रमांक रोमन लिपीत असावा.

३. ग्रंथाच्या एकाहून अधिक आवृत्ती असतील तर तो आवृत्ती क्रमांक लिहावा. त्यानंतर प्रकाशकाचे नाव, प्रकाशन ठिकाण आणि शेवटी प्रकाशन वर्ष लिहून पूर्णविराम द्यावा.

**६) संदर्भ ग्रंथ तयार करताना घ्यावयाची दक्षता :**

संदर्भ ग्रंथाची यादी तयार करताना काही गोंधळ, अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे संदर्भ ग्रंथाची यादी तयार करताना काही वेळेस दक्षता घ्यावी लागते. लेखकाचे नाव लिहिताना येणारी अडचण म्हणजे आडनाव आणि नाव लिहिण्याची वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळी परंपरा असते. महाराष्ट्रातील परंपरेनुसार स्वत:चे नाव, वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव लिहतात. परंतु देशाच्या इतर प्रांतातील परंपरा वेगवेगळ्या असल्याचे दिसते. दक्षिण भारतात सुरूवातीस गावाचे नाव, त्यानंतर आजोबांचे नाव, नंतर वडीलांचे आणि शेवटी स्वत:चे नाव लिहिण्याची प्रद्धत आहे.

उदा. व्ही, व्ही.एस. लक्ष्मण या प्रसिद्ध क्रिकेटपटूचे मुळ नाव वांगीपुरम वेंकटा साई लक्ष्मण असून नावामधील 'वांगीपुरम' हे त्याच्या गावाचे नाव, 'वेंकटा' हे आजोबांचे, 'साई' हे वडिलांचे आणि शेवटी 'लक्ष्मण हे त्याचे स्वत:चे नाव आहे. अशा दक्षिण भारतातील नावांचा यादीत समावेश करताना विशेष काळजी घ्यावी लागते. याउलट उत्तर भारतात केवळ नाव आणि आडनाव लिहिण्याचा प्रघात प्रचलित आहे. उदा. पंकज कुमार अशा वेळी यादी तयार करताना काळजी घ्यावी लागते.

संदर्भ ग्रंथाची यादी तयार करण्याचे तंत्र भारतात आणि जगभरामधेही वरीलप्रमाणे आहे. तरी काही सूक्ष्म बदल आढळून येतात. काही ठिकाणी प्रकाशनाचे ठिकाण. लिहण्याचा प्रघात असतो. तर काही ठिकाणी प्रकाशकाचे नावही लिहिण्याची पद्धत रुढ आहे. थोडक्यात, संशोधकाची संदर्भ ग्रंथाची यादी ही सतत वाढत असते आणि ज्यावेळी त्या संशोधकापुरते संशोधनाचे कार्य पूर्ण होईल त्यावेळी ही यादी पूर्ण होते. ती त्या संशोधकापुरती असते. कारण 'संशोधन' ही सतत चालणारी प्रक्रिया असल्याने नव्याने संशोधन करणारा संशोधक त्या यादीत नव्याने भरच घालत असतो.

**७) संदर्भ ग्रंथ यादीची 'आधुनिक मुक्त पद्धत' :**

सर्वसाधारणपणे आपल्या एम्.फिल., पीएच.डी संशोधनात लघु किंवा दीर्घ संशोधन प्रकल्पासाठी संदर्भ ग्रंथाची यादी विभागवार केली जाते. आधुनिक काळामध्येही संशोधनाव्यतिरिक्त संशोधन पेपर, ऑनलाईन लिहलेले लेख, ब्लॉक यामध्ये मुक्तपणे फारसे नियमाच्या बंधनामध्ये न राहता संदर्भ ग्रंथाची यादी दिली जाते. ही यादी सुत्रबद्धपणे, विभागवार असेलच असे नाही. त्याचे कारण म्हणजे ब्लॉक लिहिणारा, मुक्तपणे लिखाण करणारा हा संशोधक असेलच असे नाही. त्यामुळे तो नियमानुसार वर्गवारीनुसार संदर्भ ग्रंथाची यादी तयार करेलच असे नाही. नव्याने मुक्तपणे विविध विषयावर रोखठोक लिखान करणारे लेखक नियमाने अशी यादी तयार करण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे आधुनिक काळात मुक्तपणे संदर्भाची यादी देण्याची पद्धत रूढ होत आहे.

अलिकडे संदर्भ ग्रंथाची यादी देताना पुस्तकाच्या नावासमोर 'क्यू.आर.कोड' देण्याची पद्धत रूढ होत आहे. क्यू.आर.कोड म्हणजे 'Quick Response Code' (QR Code) कोड स्कॅन केल्यानंतर कोडींगचे डीकोडींग होऊन क्षणात आपणासमोर पुस्तक, लेख, विविध सूचना, वेबसाईट लिंक, यु.ट्यूब लिंक, व्हीडीओ, ऑडीओ येतात. संशोधनातही अशी पुस्तकांची यादी क्यू.आर.कोड द्वारे देऊन नवसंशोधकांना सहजपणे संदर्भ उपलब्ध होऊ शकतात. नुकतेच यु.नो. (UNO) मार्फत ग्लोबल टीचर ॲवॉर्ड २०२० भारतातील महाराष्ट्रातील रणजीत डिसले यांना मिळाला. हा ॲवॉर्ड त्यांना पाठ्यपुस्तकातील क्यू.आर. कोडच्या नाविण्यपूर्ण वापरासाठी मिळाला. एकूणच संशोधनाच्या सुत्रबद्धतेमध्ये परंपरागत संदर्भ ग्रंथ यादी देण्याच्या प्रकाराबरोबर मुक्तपणे यादी देण्यात येते.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संदर्भ ग्रंथाची यादी म्हणजे काय?

२. संदर्भ ग्रंथाच्या यादीचे सर्वसाधारण किती प्रकार पडतात?

३. इंटरनेट संदर्भ साधनांतर्गत कोणत्या बाबींचा समावेश होतो?

४. संदर्भ ग्रंथाची यादी करताना आरंभी कोणत्या घटकाची नोंद करावी?

५. संदर्भ ग्रंथाची यादी करताना दक्षिण भारतीय नावाबाबत कोणती अडचण येते?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. संदर्भ ग्रंथाच्या यादीच्या निर्मितीसाठी .............. चा वापर करतात.

२. संदर्भ ग्रंथ यादीत दोनहून ज्यादा नावे असल्यास .............. नाव समाविष्ट करावे.

३. संदर्भ ग्रंथ यादी तयार करण्याच्या जगभरात ............ पद्धती आहेत.

४. संदर्भासाठी उपयुक्त यादीमुळे ............ ला प्रेरणा मिळते.

५. ............ ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

**४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :**

१. **टिपणे :** संशोधनासाठी आवश्यक, महत्त्वाच्या मुद्यांच्या नोंदी.

२. **पूर्ण अवतरण :** संदर्भ ग्रंथ/पुस्तकातील जसाच्या तसा परिच्छेद, ओळ.

३. **अँडरॉईड मोबाईल :** अनेक ॲप/सुविधा असलेला भ्रमणध्वनी.

४. **लिंक :** संक्षिप्त/संकेताची ओळख (जी क्लिक करताच त्यासंदर्भातील माहिती, व्हीडिओ उपलब्ध होतो.)

५. **तळटीपा/अंत टीपा :** संशोधन पूर्णत्वानंतर त्याच्या समर्थनासाठी पुस्तक, ग्रंथाविषयी विस्तृत विवेचन करणारी १-२ ओळीतील माहिती.

६. **सूची :** संशोधनामध्ये वापरलेली यादी (व्यक्ती, स्थळ, ग्रंथ, काल इ.)

७. **परिशिष्टे :** ग्रंथाच्या अखेरीस पुरवणी स्वरुपातील माहिती.

८. **संदर्भ ग्रंथाची यादी :** संशोधनासाठी वापरलेला उपयुक्त पुस्तके, ग्रंथांची यादी.

**४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संदर्भ ग्रंथांचे वाचन करताना संशोधनास उपयुक्त माहिती लिहून घेण्याच्या पद्धतीस टिपणी घेणे असे म्हणतात.

२. एकाच वहीत एकत्रित मुद्दे असल्याने, मुद्दे नजरेसमोर नसल्याने महत्त्वाचे मुद्दे विसरले जाण्याची शक्यता असते. हा महत्त्वाचा नोटबुक पद्धतीचा तोटा आहे.

३. कार्ड पद्धतीमध्ये लेखक, पुस्तकाचे नाव शीर्षकस्थानी असते.

४. डिजिटल स्वरूपामध्ये संदेशाची देवाण-घेवाण करण्यासाठी ईमेलचा वापर केला जातो.

५. गुगल डॉक द्वारे आपण टाईप करण्याऐवजी बोलून नोटस् लिहू शकतो.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. ८ X ६ २. स्लीप / कार्ड ३. गुगल प्ले बुक

४. ट्रान्सलेट ५. फोटो

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. तळटीपा प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस किंवा झाल्यानंतर दिल्या जातात.

२. तळटीपा देताना आरंभी आडनाव, नंतर लेखकाच्या नावाचे आणि वडीलांच्या नावाचे अद्याक्षर देतात.

३. इंग्रजी पुस्तक लिखाण, विज्ञानाच्या पुस्तक लिखाणासाठी 'latex' या ॲपचा वापर केला जातो.

४. संशोधनात तळटीपा देण्यासाठी Mender, Zotero, Endnote अशा ॲपचा वापर करतात.

५. तळटीपा देण्यासाठी शिकागो युनिवर्सिटी मॅन्युअल, मॉडर्न लँग्वेज असोसिएशन पद्धतीचा जास्त प्रमाणात वापर होतो.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. रोमन २. कित्ता ३) आर्टिकल
४. स्कॉलर ५. वेळ, श्रम, पैसा

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संशोधक ज्या विषयामध्ये संशोधन करणार आहे किंवा जे संशोधन पूर्ण झाले आहे अशा सर्व विषयांची माहिती एकत्रित स्वरूपामध्ये दिलेली असते.

२. एखाद्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा अभ्यास करावयाचा आहे, त्याव्यक्तिचा एखाद्या ग्रंथामध्ये कोठे उल्लेख आलेले आहेत हे जाणून घेण्यासाठी व्यक्ती सूचीचा उपयोग होतो.

३. एका दृष्टीक्षेपात व्यक्तीचे जीवनचरित्र समजण्यासाठी कालसूचीचा वापर होतो.

४. सूचीचे सर्वसाधारण चार प्रकार पडतात.

५. ग्रंथ सूचीत पूरक ग्रंथांसोबत इतर संदर्भ उदा. मासिके, पाक्षिके, वृत्तपत्रे, गॅझेटीयर, अहवाल, वृत्तांत इ. ची माहिती ग्रंथसूचीमध्ये उपलब्ध असते.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. मुक्तसूची २. भूगोलशास्त्र ३. कालसूची
४. ग्रंथसूची ५. संदर्भ

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – ४**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. परिशिष्टाचे स्थान हे मुख्य संशोधन, संदर्भ साधनांच्या यादीनंतर येते.

२. परिशिष्टाअंतर्गत शोधग्रंथामध्ये अधिक माहिती दिली जाते.

३. विशिष्ट अर्थांच्या शब्दांचा कोश म्हणजे स्पष्टीकरण कोष होय. यामध्ये मजकूर, परिच्छेद, स्पष्टीकरण, ज्यादाची माहिती, पुस्तकांची यादी, विविध वेबसाईट, लिंक्स याचा समावेश होतो.

४. अनुभवी संशोधक आपल्या लिखाणामध्ये परिशिष्टांचा वापर करतात.

५. पी. पी. टी. द्वारे सादरीकरण करत असताना प्रश्नोत्तरावेळी अधिक माहिती परिशिष्टामध्ये समाविष्ट करून ती गरजेनुसार सादर केली जाते.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. पुरवणी २. अपेंडिक्स ३. आकृत्यांचा

४. परीशिष्टांचा ५. लिंक्स

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – ५**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संदर्भ ग्रंथांची यादी म्हणजे संशोधकाने कोणते ग्रंथ संशोधन कार्यासाठी वापरले आहेत याची एक यादी होय.

२. संदर्भ ग्रंथ यादीचे सर्वसाधारण दोन प्रकार पडतात.

३. इंटरनेट संदर्भ साधनांतर्गत विविध वेबसाईट, ऑनलाईन प्रकाशित लेख यांचा समावेश होतो.

४. संदर्भ ग्रंथांची यादी तयार करताना आरंभी लेखकाचे नाव, त्यातही आडनाव आधी लिहण्याची पद्धत आहे.

५. दक्षिण भारतीय नावांमध्ये सुरवातीला गावाचे नाव, त्यानंतर आजोबा, वडीलांचे आणि शेवटी स्वत:चे नाव लिहिण्याचा प्रघात आहे.

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. विविध संदर्भाचा २. पहिले ३. विविध

४. नवसंशोधकांना ५. संशोधन

## ४.५ सारांश :

इतिहास लेखन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. काही साधनांच्या वापरामुळे इतिहासास शास्त्राचा दर्जा प्राप्त होतो. संशोधनासाठी आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर टिपणे काढण्याचे तंत्र सरावातून आत्मसात करता येते. टिपणे घेण्याच्या परंपरागत आणि आधुनिक पद्धती विकसित झाल्या आहेत. संशोधन पूर्ण झाल्यानंतर तळटीपा द्याव्या लागतात किंवा संपूर्ण संशोधनाच्या शेवटी टीपा द्याव्या लागतात. तसेच शेवटी सूची उपलब्ध करून दिल्यास नवीन संशोधक, जिज्ञासुंना याचा फायदा होतो. संदर्भ साधने, ग्रंथ यांच्या नोंदी शेवटी दिल्या जातात. अशी संदर्भ साधनांची यादी तयार करण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा वापर केला जातो. तसेच पुरवणी स्वरूपात ज्यादा माहितीसाठी परिशिष्टे जोडली जातात. एकूणच या विविध तंत्राचा वापर करून संशोधन प्रक्रिया पूर्णत्वास येते.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय.

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. संशोधनातील टिपणी देण्याच्या पद्धतीची चर्चा करा.

२. तळटीपा आणि शेवटी दिलेल्या टीपा याविषयी माहिती द्या.

३. संशोधन प्रक्रियेमधील सूचीचे महत्त्व स्पष्ट करा.

४. परिशिष्टाचे संशोधनातील स्थान याविषयी विश्लेषण करा.

५. संदर्भ ग्रंथाची यादी तयार करण्याची पद्धत सांगा.

**ब) टिपा लिहा.**

१. टिपणे घेण्याच्या आधुनिक पद्धती.

२. तळटीपांचे उपयोग आणि दुरुपयोग

३. सूचीचे महत्त्व

४. परिशिष्टातील नोंदी घेण्याच्या पद्धती.

५. संदर्भ ग्रंथाची विभागणी.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. देव, प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२

२. सरदेसाई, बी.एन्., इतिहास लेखन परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१२

३. आगलावे, प्रदीप, सामाजिक संशोधन: पद्धती शास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन नागपूर, २०१२

४. इंटरनेटसाधन (वेबसाईट, लिंक्स)

i) www.bibligoraphy.com

ii) workspace.google.com

iii) www.acronymfinder.com

iv) www.searchmetrics.com

❖ ❖ ❖

## घटक – १

# पुराभिलेखीय साधने

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ पुराभिलेखागाराचा अर्थ, प्रकार आणि महत्त्व

  १.२.२ पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे प्रकार

  १.२.३ डिजिटल पुराभिलेखागाराची संकल्पना

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ व अधिक वाचनासाठी पुस्तके.

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- पुराभिलेखागाराचा अर्थ सांगता येईल.
- विविध ठिकाणच्या पुराभिलेखागाराचा परिचय होईल.
- पुराभिलेखागाराच्या प्रकारांची माहिती स्पष्ट करता येईल.
- इतिहास संशोधनामध्ये पुराभिलेखागाराचे व तेथील साधनांचे महत्त्व समजून घेता येईल.
- पुराभिलेखागारामधील साधनांचे किंवा कागदपत्रांचे प्रकार जाणून घेता येतील.
- डिजीटल पुराभिलेखागाराची संकल्पना समजून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये संदर्भ साधने अत्यंत महत्त्वाची असतात. संशोधकाला आपल्या संशोधन विषयाशीसंबंधित प्राथमिक व दुय्यम, लिखित–अलिखित, प्रकाशित–अप्रकाशित संदर्भ साधनांचा शोध घेऊन, त्या साधनांचे संकलन करून त्याच्या आधारे इतिहासलेखन करावे लागते. शास्त्रशुद्ध इतिहासलेखनासाठी प्राथमिक व अव्वल दर्जाची संदर्भ साधने मिळण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय. पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वहया, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे व्यवस्थित जतन करून ठेवलेले असते. या साधनांचा उपयोग करूनच इतिहासलेखन करावे लागते, असे लेखन विश्‍वसनीय, दर्जेदार ठरते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ पुराभिलेखागाराचा अर्थ :

अभिलेख (Record) म्हणजे मानवाच्या प्रगतीचा आलेख दर्शविणारी कागदपत्रे होय. मो. वि. भाटवडेकर यांच्या मराठी पर्यायी शब्दकोशामध्ये अभिलेख शब्दाचा अर्थ ‘इतिहासाचे लिखित साधन, ऐतिहासिक कागदपत्र, ऐतिहासिक महत्वाचा आलेख, ताम्रपट, शिलालेख, सनद’ असा दिला आहे.

जी कागदपत्रे अंगीकृत कार्याच्या संदर्भात आणि कार्याचाच एक भाग म्हणून निर्माण होतात व ती काही काळ किंवा कायम स्वरूपात जपून ठेवावी लागतात, त्यांना शासकीय परिभाषेत ‘अभिलेख’ म्हणतात. इतिहासोपयोगी जुन्या कागदपत्रांना ‘पुराभिलेख’ असे म्हणतात. हे अभिलेख कोणत्याही शासनाने किंवा संस्थेने आपल्या कामाच्या संदर्भात निर्माण केलेले असतात. तसेच काही अभिलेख हे खाजगीही असतात.

पुराभिलेखागार म्हणजे पुरातन–जुने असे उपयुक्त अभिलेख म्हणजेच दस्तऐवज किंवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण होय. ऐतिहासिक दस्तऐवज, राज्यकारभाराची कागदपत्रे, हिशेबाची कागदपत्रे ज्या ठिकाणी जतन करून ठेवली जातात त्या ठिकाणास दप्तरखाना (Record office) किंवा पुराभिलेखागार असे म्हणतात. ‘पुराभिलेखागारास’ इंग्रजीमध्ये 'Archives' म्हणतात. पुराभिलेखागारामध्ये मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकणारे जे पुरावे म्हणजेच साधने असतात त्यांना ‘पुराभिलेखीय साधने (Archival Sources)' असे म्हणतात. ही साधने प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपाची असतात. या साधनांच्या आधारे अज्ञात इतिहासावर प्रकाश टाकतो येतो, ज्ञात इतिहासामध्ये नव्याने भर टाकता येते. पुराभिलेखागारामधील साधने ही अस्सल, प्राथमिक, अव्वल दर्जाची असतात, त्यामुळे या साधानांच्या आधारे केलेले संशोधन, लेखन हे अत्यंत विश्‍वसनीय आणि दर्जेदार ठरते.

पुराभिलेख म्हणजे हाताने लिहिलेले लिखाण. कागदाचा शोध लागण्यापूर्वी झाडाच्या सालीपासून विशेषत: शालवृक्षाच्या सालीपासून बनलेल्या ताडपत्रावर लेखन केले जात असे. तथापि तेव्हा लिहीणे ही अत्यंत दुर्मिळ गोष्ट होती. कागदाचा शोध लागल्यानंतर लिहिणे सोपे झाले, तरीही हस्तलिखित एकच प्रत असे. ती पिढ्यांनपिढ्या जतन करून ठेवली जात असे. कालांतराने त्या प्रतीवरून कोणीतरी दुसरी प्रत म्हणजेच

नक्कल करून ठेवत असे. त्यामुळे या हस्तलिखित ग्रंथांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पुराभिलेखीय साधने म्हणून अशी हस्तलिखिते जतन करून ठेवली जाऊ लागली. भारतात प्राचीन काळापासून अठराव्या शतकापर्यंत लिहिण्यात आलेले धार्मिक ग्रंथ, आत्मचरित्रे, परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने, बखरी यासारखी साधने पुराभिलेखागारांमध्ये जतन करून ठेवण्यात आलेली दिसतात. उदा. कौटिल्याचे अर्थशास्त्र, वैदिक वाङ्मय, जैन व बौद्ध वाङ्मय, ज्ञानेश्वरी इत्यादी.

कागदाचा शोध लागल्यानंतर व पुढे छापखान्याचा शोध लागल्यानंतर हस्तलिखिते छापील ग्रंथ स्वरूपात तयार होऊन त्याच्या अनेक प्रति काढल्या जाऊ लागल्या. अशा दुर्मिळ ग्रंथाचे जतनही पुराभिलेखागारांमध्ये केले जाते. पुराभिलेखागारातील कागदपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद केलेली असते व विशिष्ठ क्रमाने ती रूमालात बांधून ठेवलेली असतात. त्या रूमालांना, विविध खात्याच्या फाईल्सना, दुर्मिळ ग्रंथांना क्रमांक दिलेले असतात. त्यामुळे संशोधकांना रजिस्टर पाहून आपल्या संशोधन विषयाशी संबंधित कागदपत्रे अभ्यासणे सोयीचे होते.

**● पुराभिलेखगारांची स्थापना :**

**अ) युरोपातील पुराभिलेखागार :**

युरोपमध्ये कागदावर लेखन करण्याचा इतिहास ग्रीस आणि रोमन राज्याच्या अस्तित्त्वापासून सापडतो. युरोपमधील दप्तरखान्याची सुरूवात फ्रेंच राज्यक्रांतीपासून झाली. फ्रान्सने आपल्या राष्ट्रीय अभिलेखागाराची स्थापना सन १७८९ मध्ये केली. इंग्लंडमध्ये सन १८३८ मध्ये झालेल्या 'पब्लिक रेकॉर्ड ॲक्ट' नंतर शासकीय अभिलेखागार स्थापन करण्यात आले. इंग्लंडप्रमाणेच युरोपमधील इतर देशातही पुराभिलेखागांराची स्थापना झाली. प्रत्येक देशाच्या सरकारने अभिलेखांचे शास्त्रशुद्ध जतन करून ठेवण्यासाठी शासकीय पुराभिलेखागारांची निर्मिती केली आहे. देशांच्या राजधानीच्या ठिकाणी एक मध्यवर्ती पुराभिलेखागार व अन्य पुराभिलेखागारे देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये स्थापन केलेली दिसून येतात. भारतातही अशा स्वरूपाची पुराभिलेखागारे सुरू करण्यात आली आहेत.

**ब) भारतातील पुराभिलेखागार :**

भारतात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करून ठेवण्याची जाणीव युरोपियन देशांप्रमाणे नव्हती. मध्ययुगीन कालखंडात मोठ्या राजघराण्यांनी शासकीय कागदपत्रांचे जतन केल्याचे आढळते. शासकीय दप्तरखाने मध्ययुगापासून तयार झाले होते. मात्र त्याचे स्वरूप आजच्या सारखे नव्हते. मुघलांनी आपला दप्तरखाना बगदादच्या खलिफाच्या धर्तीवर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तत्कालीन इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणात आढळतात.

भारतामध्ये ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यानंतर त्यांनी दप्तरखान्याकडे विशेष लक्ष देण्यास सुरूवात केली. राज्यकारभाराच्या सोयीसाठी भारताची प्रांतवार विभागणी केली. बंगाल, मद्रास, मुंबई असे प्रांत निर्माण केले. प्रांताचा कारभार मुख्य शहरातून म्हणजेच राजधानीच्या ठिकाणाहून केला जाऊ लागला व तेथेच प्रांतांचे दप्तरखाने सुरू केले. सर्वप्रथम ब्रिटिशांनी मद्रास येथे सन १८१८ मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची निर्मिती केली.

त्यानंतर लगेचच पुढील वर्षी कलकत्ता येथे दुसरे पुराभिलेखागार सुरू केले. १५ सप्टेंबर, १८२१ रोजी मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना झाली. ब्रिटिशांची सत्ता भारतात अबाधित राहावी, इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या अधिकाऱ्यास भारताबाबतची माहिती व्हावी आणि राज्यकारभार करणे सोयीचे व्हावे यासाठी या पुराभिलेखागारांची निर्मिती केली होती.

भारताची राजधानी ब्रिटिशांनी सुरूवातीस कलकत्ता ही केली. तेथे सन १८९१ मध्ये 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस'ची स्थापना केली. या दप्तरखान्याचे प्रमुख म्हणून डॉ. जी. डब्ल्यू. फॉरेस्ट यांची नेमणूक केली. पुढील काळात अशा स्वरूपाचे दप्तरखाने नागपूर, लाहोर, पाटणा, अलाहाबाद, गोहत्ती, कटक, श्रीनगर याठिकाणी सुरू केले.

भारतात काही नवीन अस्तित्त्वात आलेल्या राज्यांमध्ये अद्याप पुराभिलेखागारांची स्थापना झालेली नाही. तर काही राज्यामध्ये अभिलेखागारांच्या एकापेक्षा जास्त शाखा आहेत. भारतात केंद्र शासनाच्या पुराभिलेखागाराशिवाय उत्तर प्रदेश २, केरळ २, गुजरात २, महाराष्ट्र ५, मध्यप्रदेश ५, राजस्थान २१ आणि बाकीच्या राज्यात प्रत्येकी एक अभिलेखागार आहे. पत्रसंख्येच्या दृष्टीने राजस्थानचे बिकानेर येथील अभिलेखागार सर्वात मोठे असून याचा क्रमांक लागतो.

**क) महाराष्ट्रातील पुराभिलेखागारे :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील राज्यकारभाराच्या कागदपत्रांचे व्यवस्थित जतन करून ठेवले होते. तथापि, सन १६८९ मध्ये रायगड मुघलांच्या ताब्यात गेल्यानंतर त्यांनी रायगडावरील दप्तरखाना जाळून टाकला. जिंजी येथील राजाराम महाराजांच्या दप्तरखान्याची अवस्थाही तशीच झाली (१६९८). शाहू महाराजांच्या सुटकेनंतर राज्याभिषेकानंतर त्यांनी १७०८ मध्ये सातारा येथे राजधानी करून नवीन सनदा देण्यास सुरूवात केली. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीपासूनची सर्व कागदपत्रे पेशवे दप्तरात किंवा एलिनेशन ऑफिसमध्ये मिळतात. पहिल्या बाजीराव पेशव्याने सन १७२९ मध्ये पुण्यास शनिवारवाडा बांधला तेव्हा दप्तर पुण्यास आणले. तेव्हापासूनची मराठ्यांची कागदपत्रे सुसंगतवार सापडतात. सन १७६४ ते १७९६ या काळात हे दप्तर नाना फडणवीस यांच्या ताब्यात होते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात हे दप्तर पुन्हा शनिवारवाड्यात आणले. सन १८०८ मध्ये शनिवारवाड्यास आग लागल्यानंतर हे दप्तर गोविंदराव काळे व बाजी नाईक बारामतीकर यांच्या घरी ठेवण्यात आले. मराठा सत्तेच्या ऱ्हासानंतर ब्रिटिशांनी हे दप्तर व नाना फडणवीस यांच्याकडील काही दप्तर, इतर ऐतिहासिक घराण्यातील काही कागदपत्रे व रूमाल यांचे एकत्रीकरण केले.

संपूर्ण भारतात ब्रिटिशांचे वर्चस्व निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्रात पुराभिलेखागारांची निर्मिती झाली. १७ व्या शतकापासून मुंबई ब्रिटिशांच्या कारभाराचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराची कागदपत्रे मुंबई येथील पुराभिलेखागारामध्ये ठेवलेली आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात महत्वाच्या शहरांमध्ये पुराभिलेखागारे निर्माण करण्यात आली. त्यामध्ये त्या-त्या भागातील महत्त्वाची कागदपत्रे ठेवण्यात आलेली आहेत. महाराष्ट्रात अनेक पुराभिलेखागारे आहेत. त्यापैकी काही सरकारी, तर काही खाजगी आहेत. महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागारांमध्ये मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद आणि नागपूर येथील

पुराभिलेखागारांचा समावेश होतो.

याशिवाय भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर यासारख्या खाजगी सरकारमान्य संस्थांची पुराभिलेखागारे महाराष्ट्रात आहेत.

**ड) पुराभिलेखागाराचे प्रकार :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात शासकीय, निमशासकीय आणि खाजगी पुराभिलेखागारे किंवा दप्तरखाने निर्माण झाले. या सर्व पुराभिलेखागारांच्या मार्गदर्शनासाठी व विकासासाठी एक वेगळा आयोग स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाला. पुराभिलेखागारांचे प्रामुख्याने पुढील प्रकार आहेत.

**१. शासकीय पुराभिलेखागार :**

शासकीय पुराभिलेखागारामध्ये मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारच्या अखत्यारीतील पुराभिलेखागारांचा समावेश होतो. यामध्ये दिल्ली येथील भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार, मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील पुराभिलेखागारे व विविध प्रांतामधील महत्वाच्या शहरांमध्ये असणारी शासकीय पुराभिलेखागारे इत्यादींचा समावेश होतो. शासकीय पुराभिलेखागारांमधून प्राचीन काळापासूनची, विविध राजघराण्यांची, ब्रिटिशकालीन, स्वातंत्र्योत्तर काळातील तसेच सरकारच्या विविध खात्यांची महत्वाची कागदपत्रे व्यवस्थित जतन करून ठेवलेली असतात. या कागदपत्रांचा उपयोग संशोधनाशिवाय शासनाची धोरणे ठरविण्यासाठी होतो.

**अ) राष्ट्रीय पुराभिलेखागार, दिल्ली :**

दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारात १८५७ च्या उठावापूर्वीची कागदपत्रे व उठावानंतरची कागदपत्रे असे दोन विभाग आहेत. या पुराभिलेखागारात ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकार या दोघांचीही कागदपत्रे आहेत. ती कागदपत्रे मुख्यत: फार्सी, उर्दू, हिंदी, मराठी, संस्कृत, बंगाली इत्यादी भाषांमध्ये आहेत. यापैकी फार्सी भाषेतील काही कागदपत्रांची बृहतसूची 'कॅलेंडर ऑफ पर्शियन कॉरेस्पाँडन्स्' या नावाने ११ खंडात प्रकाशित झाले आहेत. याशिवाय फोर्ट विल्यम कॉरेस्पाँडन्स, काही युरोपीय प्रवासवृत्ते, काही भारतीय भाषांतील कागदपत्रांच्या सूची प्रकाशित झाल्या आहेत. जगातील अनेक दप्तरखान्यातून मिळविलेले भारतविषयक सूक्ष्मपट (सुमारे २५०) या पुराभिलेखागारात आहेत. या राष्ट्रीय अभिलेखागाराची एक शाखा भोपाळ येथे असून त्यामध्ये पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागद आहेत. याशिवाय जयपूर, पाँडेचरी येथेही राष्ट्रीय अभिलेखागाराची शाखा आहे.

**ब) मुंबईचे शासकीय पुराभिलेखागार :**

मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेने सन १८२१ मध्ये झाली असून ते एल्फिन्स्टन कॉलेज इमारतीच्या पश्चिम भागात आहे. अत्यंत संपन्न व व्यवस्थित असणाऱ्या या दप्तरखान्यात ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीपासून स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंतच्या वसाहत कालखंडातील, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्व महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आहेत. येथील कागदपत्रांचे रेसिडेंटचे दप्तर, सचिवालयातील विविध विभागांचे दप्तर, किरकोळ दप्तर, खाजगी दप्तर, छापील दप्तर असे पाच

भागात विभाजन करण्यात आलेले आहे. या पुराभिलेखागारातील सर्वात जुना अभिलेख १६३० चा आहे. मराठयांचा, ब्रिटिश कालखंडाचा आणि अन्य विषयाचा इतिहास अभ्यासण्यासाठी मुंबईचे पुराभिलेखागार अत्यंत महत्त्वाचे आहे.

**(२) पुणे येथील शासकीय पुराभिलेखागार :**

या पुराभिलेखागाराचा उल्लेख पेशवे दप्तर किंवा एलिनेशन ऑफिस असाही केला जातो. मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रांनी समृद्ध असा हा दप्तरखाना आहे. हा दप्तरखाना पुण्याची किंबहुना महाराष्ट्राची शान आहे. या पुराभिलेखागाराची स्थापना १ सप्टेंबर १८९१ रोजी झाली. या दप्तरातील कागदपत्रांचे महत्त्व ओळखून न्या. म. गो. रानडे यांनी ही कागदपत्रे अभ्यासकांसाठी खुली करावीत यासाठी अनेकदा आंदोलन केले होते. त्यास यश येऊन पुढे जदुनाथ सरकार व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रसिद्ध केले. सरकारांनी पुण्याच्या रेसिडेन्सीची कागदपत्रे जमवून त्याचे १५ खंड प्रसिद्ध केले. त्यानंतर डॉ. पी. एम. जोशी व डॉ. व्ही. जी. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरातील इतर कागदपत्रे प्रसिद्ध केली.

पेशवे दप्तरातील कागदपत्रे मोठ्या प्रमाणात मोडी लिपीत आहेत. मोडी कागदांची दप्तरे ३९ हजार असून त्यातील सर्व कागद तीन कोटींच्यावर आहेत. पेशवे दप्तरात कागदपत्रांचे ३६ विभाग आहेत. त्यामध्ये शाहू दप्तर, रोजकीर्द (रोजच्या खर्चाच्या नोंदी), घडणी (आर्थिक व्यवहाराचे दप्तर), प्रांत अजमास (प्रांताच्या हिशेबाचे कागद), पागा, आंग्रे दप्तर यासारख्या विभागांचा समावेश होतो. पेशवे दप्तरात मराठ्यांच्या पराक्रमाच्या इतिहासाची कागदपत्रे आहेत.

**(३) कोल्हापूर पुराभिलेखागार :**

या पुराभिलेखागारात मराठेकालीन मराठी व फारसी कागदपत्रांचा समावेश अधिक आहे. याचे पारसनिशी, निवडी, चिटणीशी, जमेनिशी, हुजूर खाजगी इत्यादी विभाग आहेत. ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीत असून ती सुमारे तीन हजार रूमालात बांधून ठेवली आहेत. यात कोल्हापूर छत्रपतींचा पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीकर, निजाम, पोर्तुगीज, इंग्रज, कर्नाटकचे पाळेगार यांच्याशी झालेला पत्रव्यवहार आहे. गगनबावडा, विशाळगड, इचलकरंजी, तोरगल, कागल इत्यादी संस्थाने विलीन झाल्यावर त्यांच्याकडील कागदपत्रे या दप्तरखान्यात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. १८४४ ते १९४९ पर्यंतचे अभिलेख या पुराभिलेखागारात आहेत. शिवाजी महाराजांची १० पत्रे येथे आहेत. या पुराभिलेखागारात विविध खातेनिहाय ४० हजार बस्ते आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील सर्व कागदपत्रे येथे उपलब्ध आहेत. कोल्हापूर संस्थानच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कलाविषयक इत्यादी अभ्यासासाठी हे पुराभिलेखागार संशोधकांसाठी खूप मोलाचे आहे.

**२. खाजगी संशोधन संस्थांचे दप्तरखाने :**

शासकीय पुराभिलेखागारांशिवाय काही खाजगी संशोधन संस्थांकडे महत्त्वाची कागदपत्रे व वस्तूंचा संग्रह आहे. उदा. तंजावरचा सरस्वती महाल संग्रह अत्यंत समृद्ध आहे. मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधीत हजारो मोडी कागदपत्रे या संग्रहात आहेत. मद्रास, कलकत्ता, त्रिवेंद्रम येथेही असे संग्रह आहेत.

महाराष्ट्रात भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर यासारख्या खाजगी सरकारमान्य संस्थांची पुराभिलेखागारे आहेत.

**(१) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे :**

भारतात अत्यंत नामवंत असलेल्या पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केली. त्यांनी व अन्य संशोधकांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर फिरून, अनेक ठिकाणची दप्तरे शोधून अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे जमा केली. अनेक कागदपत्रांच्या हाताने नकला बनविल्या. या मंडळात काम करणाऱ्या विविध संशोधकांनी जी कागदपत्रे जमा केली ती त्या त्या संशोधकाच्या नावाने ओळखली जातात. उदा. सिकंदरलाल अत्तार संग्रह, श्री. द. वि. आपटे, प्रा. रा. वि. ओतुरकर, प्रा. ग. ह. खरे संग्रह, चंद्रचूड दप्तर इत्यादी.

भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची शिवकालीन व पेशवेकालीन, तसेच विविध घराण्यांची, विविध विषयावरील कागदपत्रे आहेत. उदा. चिंचवड संस्थानची कागदपत्रे, चिपळूणकर घराण्याची कागदपत्रे, इचलकरंजीच्या घोरपडे घराण्याची कागदपत्रे, जेजुरी देवस्थानची कागदपत्रे, ज्योतिषविषयक कागदपत्रे, साधारण ५० बखरी, मंडळाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेली त्रैमासिके, इतिवृत्त, स्वीय ग्रंथमाला, पुरस्कृत ग्रंथमाला इत्यादीचा मोठा संग्रह मंडळाकडे आहे. खाजगी दप्तरखान्याचा विचार करता मंडळाकडील कागदपत्रे, रूमाल व ऐतिहासिक वस्तू यांचा संग्रह इतिहासलेखनासाठी महत्त्वाचा आहे.

**(२) राजवाडे संशोधन मंदिर, धुळे :**

पुण्यातील भारत इतिहास संशोधन मंडळातून बाहेर पडल्यानंतर राजवाडे धुळे येथे गेले व तेथे त्यांनी आपले संशोधनाचे कार्य चालू ठेवले. राजवाड्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ धुळ्यामध्ये 'राजवाडे संशोधन मंदिरा'ची स्थापना करण्यात आली. येथे कागदपत्रांच्या संग्रहाबरोबरच दुर्मिळ नाणी, मूर्ती यांचाही चांगला संग्रह आहे. राजवाडे यांनी गोळा केलेली कागदपत्रे पुढे 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या नावाने प्रसिद्ध करण्यात आली. या मंडळातर्फे 'संशोधक' नावाचे त्रैमासिक प्रसिद्ध करण्यात येते. राजवाडे यांचे सर्व प्रकारचे साहित्य प्रसिद्ध करण्याचा मंडळाचा संकल्प असून त्याचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. दरवर्षी अनेक कागदपत्रांची भर या मंडळात पडते. खानदेशचा सूक्ष्म इतिहास मिळण्याची त्यामुळे शक्यता निर्माण झाली आहे.

**(३) समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे :**

या संग्रहालयात समर्थ रामदासांच्या संदर्भातील अनेक कागदपत्रे आहेत. संत महंतांच्या संदर्भातील काही जुने ग्रंथ येथे आहेत. रामदासांच्या संदर्भातील कागदपत्रांचे चार खंड प्रसिद्ध झाले आहेत.

याबरोबरच औरंगाबाद (एकनाथ संशोधन मंडळ), नागपूर (गोदातीर संशोधन मंडळ), नांदेड आणि नगर येथील खाजगी संस्थांचे दप्तरखाने छोटे असले तरी मोलाचे आहेत. या दप्तरखान्यातून त्या त्या भागातील इतिहासाची माहिती मिळते.

## ३. महाविद्यालयीन स्तरावरील पुराभिलेखागारे :

काही महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये त्यांची अशी स्वत:ची पुराभिलेखागारे आहेत. उदा. ब्रिटिशकाळात स्थापन झालेल्या पुण्याच्या डेक्कन कॉलेजचा ऐतिहासिक संग्रह व अभिलेखागारही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ही संस्था प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती यांचे प्रगत अध्ययन केंद्र म्हणून ओळखली जाते. येथे मराठयांच्या इतिहासाचे एक मोठे संग्रहालय व दप्तरखाना आहे. या संग्रहालयात १०१ मोडी कागदपत्रांचे रूमाल आहेत. त्यामध्ये १७५० ते १८५० या काळातील कागदपत्रे आहेत. शिवाय विविध भाषातील भूर्जपत्रे, हस्तलिखिते, दानपट, ताम्रपट, दुर्मिळ ग्रंथ, नकाशे, चित्रे, मायक्रोफिल्मस् आहेत. नाना फडणवीसाचा मेणवली येथील दप्तराचा काही भाग आहे. धावडशी व ग्वाल्हेर येथील पत्रसंग्रह, बाळाजीपंत नातू याची ११ पत्रे, खर्ड्याच्या लढाईची ६८२ पत्रे, हरिपंत फडके यांची अस्सल ६८४ पत्रे, नागपूरकर भोसले यांच्या संदर्भातील ५७ कागदपत्रांच्या फाईल्स, दौलतराव शिंदे यांच्या संदर्भातील १७९४ ते १७९८ या काळातील ४४३ पत्रे, पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाची ८१५ कागदपत्रे या दप्तरखान्यात आहेत. त्याचबरोबर परराष्ट्र व्यवहारासंबंधी काही कागदपत्रे आहेत. त्यामध्ये पोर्तुगीजांची १०, फ्रेंचांची ६०, इंग्रजांची ७७५ कागदपत्रे आहेत.

डेक्कन कॉलेजमधील कागदपत्रांवरून १८ व्या शतकातील शेवटच्या व १९ व्या शतकातील सुरूवातीच्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक घडामोडींची माहिती मिळते. तसेच केतकर, मोहिते, घाटगे, निंबाळकर, खेमसावंत, महाडिक, प्रतिनिधी, चिकुर्डेकर, देशमुख, होळकर इत्यादी राजघराण्यातील कागदपत्रे या संग्रहालयात आहेत. बखरी, प्रवास वर्णने, भूगोलविषयक पुस्तके, १४ व्या व १५ व्या शतकातील दुर्मिळ अशी ४० पुस्तके आहेत. रंगीत चित्रे व छायाचित्रे १२५ आहेत. नाण्यांचा संग्रह, ताम्रपट, सनदा आहेत. अशाप्रकारे डेक्कन कॉलेजचा दप्तरखाना व संग्रहालय अत्यंत संपन्न असून इतिहास संशोधकांना त्याचा संशोधनासाठी खूप उपयोग होतो.

## ४. विद्यापीठ स्तरावरील पुराभिलेखागारे :

काही विद्यापीठांमध्ये 'पुराभिलेख विभाग' कार्यरत आहेत. विद्यापीठ स्तरावरील पुराभिलेखागारामध्ये कोल्हापूरातील शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभाग (Archival Cell) संशोधकांसाठी महत्त्वाचा आहे. सन १९८८ मध्ये या विभागाची स्थापना झाली असून महाराष्ट्रात केवळ शिवाजी विद्यापीठातच हा विभाग कार्यरत आहे. या विभागास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता आहे. या विभागामध्ये ५०,००० दुर्मिळ ग्रंथ, १०,००० हस्तलिखिते, अन्य ऐतिहासिक कागदपत्रे, मोडी कागदपत्रे, वस्तू, नाणी, नियतकालिके यांचा संग्रह असून संशोधकांसाठी तो खूपच उपयुक्त आहे. हंटर, राष्ट्रवीर, अखंड भारत, दिनमित्र, दिनबंधू, समता, जनता, बहिष्कृत भारत इत्यादी वृत्तपत्राच्या फाईल्स येथे आहेत. या विभागास विविध मान्यवर व्यक्तींनी आपल्याकडील दुर्मिळ ग्रंथांचा, कागदपत्रांचा संग्रह देणगी दिलेला आहे. त्या-त्या देणगीदारांची नावे त्या संग्रहांना दिलेली आहेत. उदा. धनंजय कीर संग्रह, माधवराव

बागल संग्रह, खासेराव सावंत संग्रह, इतिहासभूषण बाबासाहेब देशपांडे संग्रह, बॅ. पी. जी. पाटील संग्रह, डॉ. ए. सी. टिकेकर संग्रह, राजवैद्य जगताप संग्रह (कोल्हापूरच्या राजघराण्याचे राजवैद्य यांचा आयुर्वेदावरील ग्रंथांचा संग्रह), वाकसकर संग्रह (बडोदयाचे इतिहासकार), कॉम्रेड गोविंदराव पानसरे संग्रह. येथील कागदपत्रांवरून कोल्हापूरच्या इतिहासाची, ब्राह्मणेतर चळवळीची माहिती मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या संग्रहातदेखील काही हस्तलिखिते आहेत.

**५. देवस्थानची दप्तरे :**

मठ, मंदिर किंवा विहारांतील संग्रहातून मिळणाऱ्या कागदपत्रांतून धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. एखाद्या गावातील देवस्थानचा किंवा गावाचा धार्मिक इतिहास अभ्यासताना त्या देवस्थानची व्यवस्था पाहणाऱ्या समितीची सर्व कागदपत्रे, किंवा त्यांना राजदरबारकडून मिळालेल्या देणग्या, जमिनी याची माहिती देवस्थानच्या दप्तरातून मिळते. उदा. कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराचा इतिहास अभ्यासायचा असेल तर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचा दप्तरखाना उपयुक्त ठरू शकतो.

**६. व्यवसाय किंवा औद्योगिक पुराभिलेखागार (Business Archives) :**

इंग्लंड, अमेरिका, स्पेन यासारख्या देशात व्यवसायिक किंवा औद्योगिक पुराभिलेखागारे आहेत. इंग्लंडमध्ये सन १९३४ पासून 'बिझिनेस अर्काइव्हज' चे कार्यालय औद्योगिक इतिहासविषयक संशोधकांना मार्गदर्शन करते. तसेच औद्योगिक कार्यालयांना संशोधनाला प्रवृत्त करून अभिलेखांचे जतन कसे करावे याचे मार्गदर्शन करते.

अमेरिकेच्या राष्ट्रीय पुराभिलेखागाराचे तीन विभाग आहेत. त्यापैकी पहिला विभाग औद्योगिक अभिलेख विभाग आहे. यामध्ये वाहतूक, मजूर यांच्याबाबतचे नियम-कायदे, औद्योगिक कलह, उत्पादनाशी संबंधित असलेले प्रश्न, वितरण यासंबंधीचा पत्रव्यवहार आहे. तसेच अमेरिकेत 'युनियन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' या औद्योगिक संस्थेने अद्यावत पद्धतीने औद्योगिक कागदपत्रांचे जतन केले आहे. तर व्हर्जिनिआ विद्यापीठाने लोखंड-उद्योगाचा दप्तरखाना उभा केला आहे, मिशीगन विद्यापीठाने लाकूड उद्योग, लुसिआना विद्यापीठाने बागायत उद्योग, न्यू बारी ग्रंथालयाने रेल्वे दप्तर आणि बोस्टन विद्यापीठाने 'बिझिनेस हिस्टॉरिकल रेकॉर्ड' गोळा केली आहेत.

**७. फिल्म संग्रहालय (Film Archives) :**

चित्रपट, माहितीपट, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे संकलन व जतन करणे यासारख्या बाबी फिल्म संग्रहालयामार्फत केल्या जातात. 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म अर्काइव्हज' मध्ये ७७ देशातील १५० पेक्षा जास्त संस्था समाविष्ट आहेत. भारताच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला ५ डिसेंबर २०१८ रोजी देश-विदेशातील विविध विषयांवरील ७० वर्षापूर्वीच्या २२०० लघुपटाचा दुर्मीळ ठेवा मिळाला आहे.

● **पुराभिलेखागाराचे महत्त्व :**

२१ व्या शतकामध्ये कोणत्याही विषयाशी संबंधित माहिती महाजालाद्वारा (इंटरनेटद्वारा) उपलब्ध होत असली तरी जुन्या कागदपत्रांचे जतन करणारी पुराभिलेखागारे व त्यातील विविध स्वरूपाची साधने आजही तितकीच महत्त्वाची आहेत. अभिलेखागार किंवा दप्तरखाना हा केवळ जुने दप्तर संग्रहित करणारा किंवा जपून ठेवणारा विभाग राहिलेला नाही. तर, अभिलेखागारात संग्रहित केलेल्या साधानांचा अभ्यास केल्याशिवाय प्रशासनाची पुढील वाटचाल करणे अशक्य आहे. शासकीय अधिकारी, संशोधक, सामान्य व्यक्ती यांच्या दृष्टीने पुराभिलेखीय साधने अत्यंत महत्त्वाची ठरतात.

**१. इतिहास संशोधनासाठी प्रथम दर्जाचे स्त्रोत :**

इतिहास संशोधक आणि विद्यार्थी यांना त्यांच्या संशोधन विषयाशीसंबंधीत अभिलेख पुराभिलेखागारात मिळतात. संस्थानकालीन किंवा ब्रिटिशकालीन आणि आधुनिक महाराष्ट्र, आधुनिक भारतासंबंधी कोणत्याही विषयाची माहिती अभिलेखागारात मिळते. ब्रिटिशांनी केलेले सत्ता संपादन किंवा संस्थानातील राज्यकर्ते, त्यांच्या लष्करी हालचाली, दळणवळण, शेती, पाणीपुरवठा, नागरी सुविधा, उद्योगधंदे, बंदरांचा विकासू, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रस्ते, धरणे इत्यादी विषयांची माहिती पुराभिलेखागारात मिळते. येथील माहितीच्या आधाराशिवाय संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. अनेक संशोधकांनी आपली संशोधन पुस्तके अभिलेखागारातील रेकॉर्डचा अभ्यास करून लिहिली आहेत. शास्त्रशुद्ध इतिहासाची मांडणी करण्याकरिता पुराभिलेखीय साधने महत्त्वाची आहेत.

**२. प्राथमिक संदर्भ साधनांची उपलब्धता :**

पुराभिलेखागारांमुळे प्राथमिक, अव्वल दर्जाची साधने मिळतात. या साधनांच्या आधारावर केलेले संशोधन, लेखन दर्जेदार, विश्वसनीय ठरते.

**३. राष्ट्रीय वारशांचे जतन :**

कोणत्याही राष्ट्राचा इतिहास दप्तरखान्याच्या आधाराशिवाय लिहिला जाऊ शकत नाही. संस्कृतीचा अमूल्य ठेवा भावी पिढीसाठी जतन करण्याचे कार्य अभिलेखागारे करीत असतात. पुराभिलेखाद्वारा ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो. राष्ट्राचे ऐतिहासिक काळातील जीवन, समाजपद्धती, आर्थिक व्यवहार, शिक्षण, औद्योगिक प्रगती अशा अनेक विषयांची माहिती पुराभिलेखागारात मिळते.

**४. सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त :**

सामान्य माणसांनाही रेकॉर्डची वेळोवेळी गरज भासते. शासनाने घेतलेले विविध निर्णय, जुने कायदे किंवा नियम, शासकीय गॅझेटमधील उतारे, इनाम जमीनविषयक माहिती, वंशावळ यांची गरज काहीवेळा सामान्य माणसाला भासू शकते. अशा प्रती पुराभिलेख विभागाच्या संचालकांनी प्रमाणित करून दिल्यानंतर सदर प्रती

न्यायालयात मान्य केल्या जातात. उदा. लग्नानंतर एखाद्या स्त्रीचे बदललेले नाव गॅझेटमध्ये आले असेल तर गॅझेटची संचालकांनी प्रमाणित केलेली प्रतच न्यायालयामध्ये मान्य केली जाते. याप्रकारे सामान्य माणसाच्या हक्काचे साक्षीदार दप्तरखान्यात सुरक्षित असतात.

शासनामार्फत प्रकाशित झालेल्या कोणत्याही प्रकाशनाचे जतन करण्याचे काम पुराभिलेख विभागामध्ये केले जाते. त्यामध्ये केंद्र तसेच राज्य शासनाच्या राजपत्रांचा समावेश आहे. सर्वसामान्य नागरिकांना या राजपत्रांचा खाजगी कामासाठी किंवा त्यांचे हक्क शाबीत करण्यासाठी उपयोग होतो.

**५. प्रकाशने :**

काही पुराभिलेखागारे आपली नियतकालिके प्रसिद्ध करतात. त्यातून संशोधकांना आपल्या संशोधन विषयाशी संबंधित उपयुक्त माहिती मिळते. भारतातील राष्ट्रीय पुराभिलेखागार आपली वार्षिक नियमित प्रसिद्ध करीत असते. तसेच इतर प्रादेशिक लेखागारेही आपली नियतकालिके प्रसिद्ध करतात. याशिवाय आर्काइव्हज ऑफ इंडिया, ॲन्युअल रिपोर्टस् ऑफ नेशन, प्रोसिडिंग्ज ऑफ द इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् यांमधून अभिलेखागारातील कागदपत्रांची अभ्यासकांना माहिती मिळते. त्रिवेंद्रम येथून 'इंडियन हिस्ट्री जर्नल' नावाची संशोधन पत्रिका प्रकाशित होते. कलकत्त्याहून 'एन्शीयट इंडियन हिस्ट्री' व 'इंडियन हिस्टॉरिकल क्वाटर्ली' या संशोधन पत्रिका निघतात. मराठीमध्ये राजवाडे संशोधक मंडळाचे 'संशोधक' हे त्रैमासिक, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्यावतीने प्रसिद्ध होणारे 'इतिहास आणि संस्कृती' हे त्रैमासिक, विदर्भ संशोधन मंडळ व भारत इतिहास संशोधन मंडळाची संशोधन पत्रिका यामधून पुराभिलेखीय साधने प्रकाशित होत असतात, ती संशोधकांना उपयुक्त ठरतात. मुंबई पुराभिलेखागाराने १९८४ पासून प्रकाशन शाखा सुरू केली आहे. मुंबई पुराभिलेखागारात परदेशाविषयी असणाऱ्या अभिलेखांची माहिती संकलित करून 'रेकॉर्ड पर्टेनिंग टू फॉरिन कंट्रीज (आबुधाबी ते पर्शिया भाग-१ व भाग-२)' अशा प्रकारची प्रकाशने प्रकाशित करून परदेशातून येणा-या संशोधकांसाठी अल्पावधीत अभिलेख उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केलेली आहे. याप्रमाणे विविध पुराभिलेखांद्वारा प्रकाशित होणारी प्रकाशने संशोधकांसाठी खूप उपयुक्त ठरतात.

**६. अभिलेखांचे जतन आणि संवर्धन :**

पुराभिलेखांमध्ये कागदपत्रांचे शास्त्रीय पद्धतीने जतन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी प्रथम ती निर्जंतुक केली जातात. कागदपत्रांचा वाळवी, कीटक यापासून बचाव करण्यासाठी डीडीटी, गॅमेक्झिन नेप्थॉल, थायमॉल, पॅराडायक्लोरेट, बेंझीन इत्यादी किटकनाशके वापरली जातात. निर्वात पोकळीत अभिलेख ठेवून किंवा तीव्र जंतुनाशकाची वाफ देऊन अभिलेख निर्जंतुक केले जातात. कागदपत्रांचे आयुष्य वाढविण्यासाठी पुराभिलेखागारातील हवामान नियमित केलेले असते.

पुराभिलेखागारांमध्ये कागदपत्रे दुरूस्त करण्याचे कामही केले जाते. जीर्ण कागद टिश्यू पेपरच्या सहाय्याने लॅमिनेशन करून त्याचे जतन केले जाते. मोठया पुराभिलेखागारांमध्ये जीर्ण कागदपत्रांचे सूक्ष्मपटाच्या साहाय्याने जतन केले जाते. ज्या पुराभिलेखागारात सूक्ष्मपटवाचक यंत्र आहे तेथे जगातील कोणत्याही

लेखागारातील लेख त्यांचे सूक्ष्मपट घेतले असता वाचता येतात. यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. काही पुराभिलेखागारांमध्ये कागदपत्रांच्या झेरॉक्स किंवा फोटोस्टॅट प्रती पुरविल्या जातात.

**७. कार्यशाळा व विविध वर्गाचे आयोजन :**

मोठमोठ्या पुराभिलेखागारांच्या कामामध्ये तंत्रज्ञानाचा वापर जास्त केला जात असल्याने ते तंत्रज्ञान शिकविण्याचे वर्ग काढून तंत्रज्ञ तयार केले जातात, अभिलेख व्यवस्थापन शास्त्र कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच महाराष्ट्रातील अनेक पुराभिलेखांद्वारा मोडी लिपीचे वर्ग घेतले जातात, त्याद्वारे मोडी लिपीचा प्रसार व संवर्धन केले जाते.

**● स्वयंअध्ययन प्रश्न– १**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात ब्रिटिशांनी सन १८९१ मध्ये ............ येथे 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस'ची स्थापना केली.

अ) दिल्ली ब) मुंबई क) मद्रास ड) कलकत्ता

२. भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार ............... येथे आहे.

अ) दिल्ली ब) मुंबई क) मद्रास ड) कलकत्ता

३. भारतात पत्रसंख्येच्या दृष्टीने ............... येथील अभिलेखागार सर्वात मोठे आहे.

अ) दिल्ली ब) मुंबई क) बिकानेर ड) भोपाळ

४. धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातर्फे ................ हे त्रैमासिक प्रसिद्ध करण्यात येते.

अ) मराठ्यांच्या इतिहासाची साधने ब) संशोधक

क) इंडियन हिस्ट्री जर्नल ड) इतिहास आणि संस्कृती

५. शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभाग (Archival Cell)' ची स्थापना ............... मध्ये झाली.

अ) १९८७ ब) १९८८ क) १९८९ ड) १९९०

## १.२.२ पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे (रेकॉर्डचे) प्रकार:

पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वह्या, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे जतन करून ठेवलेले असते. ही साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**१. शासकीय कागदपत्रे :**

शासकीय कागदपत्रे इतिहासाच्या अभ्यासाची अस्सल साधने असतात. यामध्ये त्या त्या काळात सत्तेवर असलेल्या राजा, राजवंश, राष्ट्रपती, पंतप्रधान यांनी केलेला पत्रव्यवहार, राज्यकारभार यासंबंधी कागदपत्रे असतात.

ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात किंवा नंतर ब्रिटिश संसदेच्या काळात भारतात प्रशासन व्यवस्था निर्माण झाली. ब्रिटिशांनी सरकारी कागदपत्रे रेकॉर्डरूममध्ये सुरक्षित ठेवली, केंद्रीय पुराभिलेखागार उभारले, कागदपत्रांच्या गुप्ततेचा कायदा केला. या कायद्यानुसार सरकारी कागदपत्रे तीस वर्षेपर्यंत गुप्त व सरकारी मानली जातात. तीस वर्षानंतर या कागदपत्रांची छाननी होते. महत्वाची ऐतिहासिक कागदपत्रे प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय, कारागृहे, डी. एस. पी. कार्यालय, जिल्हा पातळीवरील शासकीय कार्यालयातून प्रांत सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या अभिलेखागारात पाठविली जातात. त्या कागदपत्रांचा इतिहासलेखनासाठी उपयोग होतो. १७ व्या शतकापासून शासकीय पुराभिलेखागारात ही कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील महत्त्वाची सरकारी कागदपत्रे, ब्रिटिशांच्या विविध योजना, निर्णय याविषयीच्या मूळ हस्तलिलिखत फाईल्स दिल्लीच्या राष्ट्रीय पुराभिलेखागारात व लंडन येथील इंडिया ऑफिस संग्रहालयात आहेत. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या फाईल्सही येथे आहेत. त्याबरोबरच १७ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंतच्या भारतातील वाटचालीची असंख्य कागदपत्रे येथे आहेत. वा. सी. बेंद्रे यांनी लंडनमधील कागदपत्रांच्या आधारेच छत्रपती संभाजी महाराजांच्या कागदपत्रांचे पुनर्मूल्यांकन केले.

याशिवाय भारतातील प्रत्येक राज्याच्या राजधानीत पुराभिलेखागार आहेत व 'पुराभिलेख संचालनालय' नावाचे स्वतंत्र खाते आहे. मुंबईचे राज्य पुराभिलेखागार, तसेच मद्रास व कलकत्ता येथील पुराभिलेखागारे आधुनिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. कोल्हापूर संस्थानचा किंवा संस्थानातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इतिहासाचा अभ्यास करताना, संस्थानातील एखाद्या गावाचा इतिहास अभ्यासताना कोल्हापूर पुराभिलेखागारातील कागदपत्रे उदा. जिल्हा गॅझेट, प्रशासकीय अहवाल, हुजूर ठराव बुक इत्यादी कागदपत्रे अत्यंत उपयुक्त ठरतात.

**२. राज्यकारभारविषयक पत्रे :**

कोणत्याही राज्य किंवा राष्ट्राचे प्रशासन चालवत असताना वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांना पत्रे पाठवित असतात, राज्यकारभारविषयक मार्गदर्शन करीत असतात. तसेच कनिष्ठ अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना राज्यकारभाराचे अहवाल पाठवित असतात. अशा कागदपत्रांतून मिळणारी माहिती राज्यकारभाराची दिशा स्पष्ट करते व ती अतिशय विश्वसनीय असते.

**३. खाजगी संस्था व संघटनांची कागदपत्रे :**

एखाद्या खाजगी संस्थेचा किंवा संघटनेचा, त्या संस्थेतील एखाद्या व्यक्तीच्या कार्याचा इतिहास अभ्यासताना त्या त्या संस्थेचा दप्तरखाना किंवा कार्यालयीन कामाकाजाचे दप्तर अत्यंत उपयुक्त ठरते. त्या-

त्या संस्थांचे वार्षिक अहवाल, जमाखर्चाच्या नोंदी, पत्रव्यवहार, चरित्रग्रंथ इत्यादी कागदपत्रे उपयुक्त ठरतात.

**४. धार्मिक सनदा, दानपत्रे :**

राज्यकर्त्यांकडून दिल्या जाणाऱ्या धार्मिक सनदांतून त्यांचे धार्मिक धोरण समजते. एखादा प्रदेश जिंकल्यानंतर तेथील जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अथवा एखादया आनंदाच्या प्रसंगी साधू, संत, मठ, मंदिरे, मशिदी यांना धार्मिक सनदा दिल्या जात होत्या. या सनदांमधून राज्यकर्त्यांच्या धार्मिक दृष्टीकोनाबरोबरच तत्कालीन सामाजिक-धार्मिक, सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. उदा. कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक देवस्थानच्या दिवाबत्तीची सोय करण्यासाठी दिलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून देवस्थानचा खर्च वजा जाता राहिलेले उत्पन्न शैक्षणिक कार्यासाठी वापरण्याचा आदेश दिलेला दिसतो. याची माहिती कोल्हापूर पुराभिलेखागारात मिळते. पेशवे काळातील काशी, मथुरा, त्र्यंबकेश्वर, नाशिक, वाशी, पंढरपूर इ. धार्मिक स्थळांचा पत्रव्यवहार पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. अशा पत्रव्यवहारातून त्या धार्मिक स्थळाचे महत्त्व, जतन, आर्थिक व्यवहार इत्यादीची माहिती मिळते. पेशव्यांनी मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण पुरोहितांना धार्मिक सनदा व दानपत्रे दिली आहेत, ती इतिहासाची अस्सल साधने म्हणून उपयोगी आहेत.

**५. जमाखर्चाच्या नोंदी :**

खाजगी किंवा स्वयंसेवी संस्था, विविध संस्थानिक, काही इतिहासप्रसिद्ध घराणी, राज्ये किंवा राष्ट्रे यांची जमाखर्चाची कागदपत्रे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्वाची ठरतात. विविध शैक्षणिक, सामाजिक संस्था, नगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांच्या जमाखर्चाच्या नोंदी त्या त्या संस्थांचा अभ्यास करताना प्राथमिक साधन म्हणून खूपच उपयुक्त ठरतात. जमाखर्चाची कागदपत्रे दररोज समकालीन पुराव्याच्या आधारे तयार होत असतात व त्यात बदल करता येत नाही. या कागदपत्रांतून सरकारचा सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक बाबीवर होणारा खर्च व त्यासंबंधी सरकारचे धोरण काय होते याची कल्पना येते.

**६. वृत्तपत्रे :**

पुराभिलेखागारांमध्ये काही वृत्तपत्रांच्या फाईल्स करून ठेवलेल्या असतात. संशोधकांना त्या उपयुक्त ठरतात. आधुनिक कालखंडाचा अभ्यास करीत असताना वृत्तपत्रे साधन म्हणून उपयोगी पडतात. वृत्तपत्रांतातून त्या त्या ठिकाणची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक जीवन यांची, तसेच एखादी व्यक्ती किंवा संस्था यांची माहिती मिळते. जेव्हा अन्य प्राथमिक साधने उपलब्ध होत नाहीत, तेव्हा वृत्तपत्रांतून मिळणारी माहिती उपयुक्त ठरते. परंतु वृत्तपत्रांतील माहिती ही काहीवेळेला एकांगी, अतिशयोक्तीपूर्ण असू शकते. त्यामुळे अनेक वृत्तपत्रांतील माहिती घेऊन, अन्य साधनांतून त्याची सत्यता तपासून इतिहासलेखन करावे लागते. उदा. कोल्हापूर संस्थानच्या उत्तरार्धाचा अभ्यास करताना हंटर, विजयी मराठा, गरूड, समाज, सत्यवादी, पुढारी यासारखी तत्कालीन वृत्तपत्रे अत्यंत उपयुक्त ठरतात. यापैकी काही वृत्तपत्रांच्या फाईल शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभागा'मध्ये आहेत, कोल्हापूर

पुराभिलेखागारात १९७० नंतरच्या दैनिक पुढारीच्या फाईल आहेत. मुंबई पुराभिलेखागारात अनेक दुर्मीळ मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रे आहेत. यामध्ये बॉम्बे समाचार (१८३१), दर्पण (१८३२), मॉर्निंग स्टार्ट (१८३६), बॉम्बे कुरिअर (१७९७-१८४६), हरिजन (१९४२) यासारख्या वृत्तपत्रांचा समावेश होतो.

**७. नकाशे :**

भारतात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ नकाशे काढण्याबाबत राज्यकर्ते गंभीर नव्हते. संपूर्ण देशाचा किंवा प्रांताचा नकाशा तयार न करता आवश्यक तेवढाच नकाशा तयार केला जात असे. त्यामध्ये नमूद केलेल्या ठिकाणांचे अंतर न लिहिता केवळ दिशा दर्शविण्याचा प्रयत्न केलेला असे. नकाशाच्या अभ्यासावरून गतकाळातील लढायांची व भौगोलिक स्थितीची माहिती मिळते. काही पुराभिलेखागारात लहान मोठे नकाशे असतात. त्यांचाही इतिहास संशोधनासाठी उपयोग होतो. मुंबई पुराभिलेखागारात सुमारे ६ हजार नकाशे आहेत. दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारात १५ हजार नकाशे आहेत.

**८. धार्मिक ग्रंथ :**

पुराभिलेख साधनांपैकी सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे धार्मिक ग्रंथ होत. 'ऋग्वेद' हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. वैदिक वाङ्मय, रामायण, महाभारत ही महाकाव्ये, उपनिषदे, ब्राह्मण्ये, आरण्यके हे ग्रंथ, दीपवंश व महावंश ही बौद्ध महाकाव्ये हे महत्त्वाचे पुराभिलेखीय पुरावे आहेत. यानंतरच्या काळातही अनेक धार्मिक ग्रंथांचे लेखन झाले. या सर्व ग्रंथातून विविध धर्म व पंथाची वाटचाल रेखाटली आहे. अजूनही हजारो ग्रंथ मठ-मंदिरांमध्ये दडलेले आहेत. त्या सर्वातून अज्ञात बाबींवर प्रकाश पडू शकतो. हे सर्व पुरावे पुराभिलेखागारात उपलब्ध होतात.

**९. व्यक्तिगत पत्रव्यवहार :**

दिल्लीचे सुलतान, मुघल बादशहा किंवा इतर राज्यकर्ते यांचा त्यांच्या जहागिरदार, वतनदारांशी झालेला पत्रव्यवहार हा हस्तलिखित स्वरूपातील सर्वात विश्वसनीय पुरावा होय. मराठा, रजपूत सरदारांच्या वाड्यात, सामान्य शिपायांकडे, किल्ल्यांमध्ये, गढ्यांमध्ये हा पत्रव्यवहार उपलब्ध झाला व अजूनही उपलब्ध होऊ शकतो. त्यातून तत्कालीन परिस्थिती, लढाया यांची माहिती मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे मराठ्यांच्या इतिहासाचा अनमोल असा पुराभिलेखीय पुरावा आहे.

ब्रिटिश कालखंडातील निरनिराळ्या गर्व्हनर जनरल व व्हॉईसरॉयचा पत्रव्यवहार लंडन येथील इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयात ठेवलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अनेक बाबींची माहिती लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. आंबेडकर यांच्या पत्रव्यवहारातून मिळते. मोठमोठ्या नेत्यांची पत्रे राष्ट्रीय पुराभिलेखागारात अभ्यासण्यास मिळतात. तथापि, सामान्य व्यक्तींचे चळवळीतील योगदान त्या व्यक्तीच्या संग्रही असणा-या कागदपत्रांतून मिळू शकते. हैद्राबादच्या कॉंग्रेस कार्यालयाने, औरंगाबादच्या स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेने अशा व्यक्तींची कागदपत्रे संकलीत केली आहेत. ती कागदपत्रे इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात.

याशिवाय प्राचीन काळापासून आजपर्यंत लिहिण्यात आलेले विविध चरित्रग्रंथ, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, बखर वाङ्मय, नाटक, कथा, कादंबरी, तवारिखा, करिने, शकावल्या, तह किंवा करार, ताम्रपट, चित्रे यासारखी साधने पुराभिलेखागारामध्ये आढळतात. ही सर्व साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

● **स्वयंअध्ययन प्रश्न– २**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. वा. सी. बेंद्रे यांनी ............ येथील कागदपत्रांच्या आधारे छत्रपती संभाजी महाराजांच्या कागदपत्रांचे पुनर्मूल्यांकन केले.

अ) दिल्ली ब) मुंबई क) लंडन ड) गोवा

२. मुंबई पुराभिलेखागारात सुमारे ............ हजार नकाशे आहेत.

अ) पाच ब) सहा क) दहा ड) पंधरा

३. भारतातील पुराभिलेख साधनांपैकी ............... हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे.

अ) ऋग्वेद ब) रामायण क) उपनिषदे ड) दीपवंश

४. स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था ................... येथे आहे.

अ) धुळे ब) विदर्भ क) हैद्राबाद ड) औरंगाबाद

५. ................ कागदपत्रे समकालीन पुराव्याच्या आधारे तयार होत असतात व त्यात बदल करता येत नाही.

अ) जमाखर्चाची ब) धार्मिक सनदांची क) व्यक्तिगत पत्रव्यवहाराची ड) दानपत्रांची

## १.३ डिजिटल ऑर्काइव्ह (Digital Archives) : प्रकार आणि स्वरूप

### १.३.१ डिजिटल ऑर्काइव्ह म्हणजे काय?

कोणत्याही प्रकारच्या इतिहास संशोधनासाठी ऐतिहासिक साधने ही संशोधकांना उपलब्ध असणे आवश्यक असते. इतिहास संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते. सबब, प्रत्येक इतिहास संशोधकास मूळ साधनांचा अभ्यास आवश्यक असतो. इतिहासाची मूळ साधने ही वर्षानुवर्षे संशोधकांच्या अनेक पिढ्यांना उपलब्ध रहावीत म्हणून त्याचे जतन करणे आवश्यक ठरते. सदर आवश्यकतेतून 'पुराभिलेखागार' ची संकल्पना विकसित झाली. इतिहास संशोधनासाठी लागणारी दुर्मिळ प्राथमिक साधने उदा. जुनी हस्तलिखिते, पत्रव्यवहार, ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी दफ्तर, पोथ्या, चोपड्या, वृतपत्रे, मासिके, दुर्मिळ ध्वनीमुद्रिते आणि फिल्म्स इत्यादींच्या संग्रह आणि मुख्यत: त्यांचे संरक्षण करण्याचे काम 'पुराभिलेखागार' करत असतात. ही पुराभिलेखागारे शासकीय अथवा खाजगी मालकीची असतात. पुराभिलेखागरांच्या मध्ये देखील

ग्रंथालयांच्या प्रमाणे दुर्मिळ ग्रंथ असतात. मात्र, ग्रंथालयाचे प्राथमिक कार्य हे उपयोगासाठी ग्रंथ उपलब्ध करून देणे हे असते. मात्र, पुराभिलेखागाराचे प्राथमिक कार्य त्या दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण करणे हे असते.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे. माहितीचा साठा करण्याच्या सर्व्हरच्या क्षमतेत प्रचंड वाढ झाली आहे. इंटरनेटमुळे जगभरातील सर्व्हर आणि संगणक हे एकमेकांशी जोडले गेले आहेत. त्याचप्रमाणे इंटरनेटद्वारे माहिती अपलोड आणि डाऊनलोड करण्याच्या वेग देखील वाढला आहे. त्यामुळे डिजिटल माहितीचे प्रमाण देखील वेगाने वाढत आहे. ज्याप्रमाणे पुराभिलेखागार आणि ग्रंथालय यांच्या ग्रंथांचे संरक्षणाला दिलेल्या प्राथमिकतेमुळे मोठा फरक असतो, तितका मोठा फरक डिजिटल ऑर्काइव्ह आणि डिजिटल लायब्ररी यांच्यात असत नाही. डिजिटल माहिती ही ग्रंथ अथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही, त्यामुळे त्यांच्या भौतिक संरक्षणाची गरज नसते.

डिजिटल लायब्ररी ही डिजिटल माहिती एकत्र करते आणि ती माहिती लोकांना उपलब्ध करून देते. डिजिटल लायब्ररीद्वारेही गोळा केलेल्या माहितीचा साठा आणि त्या माहितीची उपलब्धता दीर्घकाळासाठी अस्तित्वात राहील की नाही याची खात्री देता येत नाही. माहिती साठवण्याच्या व्यवस्था बंद पडूच नये अशी व्यवस्था डिजिटल लायब्ररीद्वारे केलेली असते किंवा नसते.

याउलट, डिजिटल ऑर्काइव्ह स्थापन करण्यामागे आणि त्यांची जपवणूक करण्यामागे दोन उद्देश असतात. पहिला उद्देश हा मौल्यवान डिजिटल माहितीचा कोणत्या ही प्रकारे ऱ्हास न होऊ देता भावी पिढ्यांसाठी संरक्षित करणे. तर दुसरा उद्देश हा सुव्यवस्थितरित्या निर्माण केलेल्या डिजिटल ऑर्काइव्हमध्ये कोणत्याही पद्धतीचा तांत्रिक दोष निर्माण होऊ नये याची उपाययोजना केलेली असते.

डिजिटल माहितीचा साठा करणे आणि त्यांचे संरक्षण या कामासोबतच कच्च्या स्वरूपातील अथवा प्राथमिक स्वरूपातील डिजिटल माहितीचा अन्वयार्थ लावण्याची सोय देखील डिजिटल ऑर्काइव्हमध्ये केली जाते. डिजिटल लायब्ररी या डिजिटल ऑर्काइव्हमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. कोणती माहिती गोळा करायची, कोणती माहिती साठवायची, कोणती माहिती दीर्घकाळासाठी संरक्षित करायची आणि कोणती माहिती सोडून द्यायची या गोष्टी ठरवताना डिजिटल लायब्ररी या डिजिटल ऑर्काइव्ह बनवताना मदत करू शकतात. कोणती माहिती निवडायची आणि कोणती सोडून द्यायची याचा निर्णय अतिशय कौशल्याने घ्यावा लागतो. डिजिटल ऑर्काइव्ह नेमके कोणत्या उद्देशासाठी बनवले आहे, त्यावरून कोणती माहिती तेथे साठवायची याचा निर्णय घेतला जातो.

डिजिटल ऑर्काइव्हमध्ये पुराभिलेखागाराप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रुपांतर केले जाते. याद्वारे त्या ऐतिहासिक कागदपत्रांचे आणि ऐतिहासिक वस्तूंचे डिजिटल माहितीच्या रुपात जतन करता येते. डिजिटल ऑर्काइव्हमध्ये जतन केलेली माहिती इतिहास संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध करून दिली जाते.

## १.३.२ डिजिटल ऑर्काइव्हचे प्रकार आणि स्वरूप :

- **डिजिटल ऑर्काइव्ह हे मुख्यत :**

तीन प्रकारच्या गटांमध्ये विभागले जातात. पहिल्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागारे, ग्रंथालये, विद्यापीठे, संग्रहालये, शासकीय संस्था (स्थानिक, प्रादेशिक अथवा राष्ट्रीय), इतिहास विषयक अथवा सांस्कृतिक मंडळ इत्यादींच्या द्वारे चालवले. या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह बहुतांश मोफत वापरासाठी उपलब्ध असतात किंवा नाममात्र शुल्क आकारले जाते. नवी दिल्ली येथील भारताच्या नॅशनल ऑर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी केलेला प्रकल्प या गटात मोडतो. 'अभिलेख पटल' या नावाने सुरु केलेल्या वेबसाईटवर नॅशनल ऑर्काइव्हद्वारा डिजिटलाईझ केलेले ऐतिहासिक दस्तावेज काही शुल्क भरून संशोधकांसाठी उपलब्ध केले जाते. अशाच प्रकारचे डिजिटल ऑर्काइव्ह पुणे येथील भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूटद्वारे देखील सुरु करण्यात आले आहे.

दुसऱ्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे कोणत्यातरी एका व्यक्तीद्वारे, लोकांच्या छोट्या समूहाद्वारे, स्वयंसेवी संस्थाद्वारे निर्माण केले जातात. या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे विशिष्ट आणि सामूहिक गरजेनुसार बनवले जातात. उदा. एखाद्या ऐतिहासिक घराण्याच्या किंवा एखाद्या संशोधकाच्या किंवा संशोधन संस्थेच्या संग्रहातील दस्तावेज हे डिजिटल ऑर्काइव्हच्या रुपात जतन केले जातात. महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातील ऐतिहासिक दस्तावेज डिजिटलाईझ करून मंडळाच्या वेबसाईटवर संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तिसऱ्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे प्रकाशक अथवा व्यवसायिक संस्थांच्याद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना आणि ग्रंथालयांना सशुल्क उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रकारचे छोट्या स्वरूपातील डिजिटल ऑर्काइव्ह हे व्यक्तिगत संशोधकांना उपलब्ध करून दिले जात असले तरी मोठ्या प्रमाणातील ऑर्काइव्ह हे फक्त विद्यापीठे, ग्रंथालये तत्सम संस्था यांनाच उपलब्ध करून दिले जातात. या परिस्थितीत संशोधक व्यक्ती विद्यापीठ, ग्रंथालय, तत्सम संस्थांच्या माध्यमातून ऑर्काइव्ह वापरू शकते.

डिजिटल ऑर्काइव्हमुळे दुर्मिळ ग्रंथ आणि दस्तावेजांचे खात्रीलायक रित्या जतन करता येते. सुव्यवस्थित पद्धतीने आयोजित डिजिटल ऑर्काइव्ह संशोधकाला अत्यंत उपयोगी ठरते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संशोधकाला होणाऱ्या फायद्याचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे डिजिटल ऑर्काइव्ह होय.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१) ...............च्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे.

२) ................ही ग्रंथ अथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही.

३) ................ मध्ये जतन केलेली माहिती इतिहास संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध करून दिली जाते.

४) पुणे येथील ................................या संस्थेने डिजिटल ऑर्काइव्ह सुरु केले आहे.

५) ................ या डिजिटल ऑर्काइव्ह बनवताना निवड करण्यासाठी मदत करू शकतात.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) डिजिटल ऑर्काइव्हमध्ये ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे कोणत्या पद्धतीने डिजिटल माहितीत रुपांतर केले जाते?

२) डिजिटल माहिती कोणत्या ही प्रकारे ऱ्हास न होऊ देता कोणासाठी संरक्षित केली जाते?

३) डिजिटल ऑर्काइव्हचे किती प्रकार आहेत?

४) भारताच्या नॅशनल ऑर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी सुरु केलेल्या प्रकल्पाचे नाव काय?

५) धुळे येथील कोणत्या संस्थेत डिजिटल ऑर्काइव्ह सुरु करण्यात आले आहे?

## १.३ सारांश :

शास्त्रशुद्ध इतिहासलेखनासाठी प्राथमिक व अव्वल दर्जाची संदर्भ साधने अत्यंत महत्त्वाची असतात व ती मिळण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय. पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वह्या, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे जतन करून ठेवलेले असते. ही साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

पुराभिलेखागाराचे शासकीय पुराभिलेखागारे, खाजगी संस्थांची पुराभिलेखागारे, विद्यापीठ किंवा महाविद्यालयांमधील पुराभिलेखागारे, मठ, मंदिर या ठिकाणी असणारी पुराभिलेखागारे, औद्योगिक पुराभिलेखागारे, डिजिटल पुराभिलेखागारे इत्यादी विविध प्रकार आहेत. राष्ट्राचे ऐतिहासिक काळातील जीवन, समाजपद्धती, आर्थिक व्यवहार, शिक्षण, धार्मिक स्थिती, औद्योगिक प्रगती अशा अनेक विषयांची माहिती या विविध पुराभिलेखागारांतून मिळते.

सध्याच्या काळात कोणत्याही विषयाशी संबंधित माहिती महाजालाद्वारा (इंटरनेटद्वारा) उपलब्ध होत असली तरी जुन्या कागदपत्रांचे जतन करणारी पुराभिलेखागारे व त्यातील विविध स्वरूपाची साधने आजही तितकीच महत्त्वाची आहेत. अभिलेखागारात संग्रहीत केलेल्या साधानांचा अभ्यास केल्याशिवाय प्रशासनाची पुढील वाटचाल करणे अशक्य आहे. शासकीय अधिकारी, संशोधक, सामान्य व्यक्ती यांच्या दृष्टीने पुराभिलेखीय साधने अत्यंत महत्त्वाची ठरतात.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

पुराभिलेखागार : जुने दस्तऐवज किंवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण

अभिलेख : दस्तऐवज किंवा कागदपत्रे

पेशवे दप्तर : पुणे येथील शासकीय पुराभिलेखागारास पेशवे दप्तर संबोधले जाते.

रेसिडेंट : ब्रिटिश प्रतिनिधी

मोडी लिपी : मराठी भाषेतील मजकूर जलद गतीने लिहिण्यासाठी १२ व्या शतकापासून २० व्या शतकापर्यंत वापरात असलेली लिपी.

भूर्जपत्रे : 'भूर्ज' या वृक्षाच्या सालीवर केलेले लिखाण.

सूक्ष्मपट : ३५ मिमी. फिल्मवर पाहिजे असलेल्या कागदपत्रांची छायाचित्रे घेतली जातात व सूक्ष्मपटवाचक यंत्राच्या साहाय्याने ती वाचली जातात. अन्य पुराभिलेखागारातील पाहिजे असलेली कागदपत्रे सूक्ष्मपटाच्या सहाय्याने आणली जातात.

डिजीटल पुराभिलेखागार : मौल्यवान डिजिटल माहितीचे भावी पिढ्यांकरिता जतन करणारी व्यवस्था

मायक्रोफिल्मस् : छोट्या फिल्मच्या स्वरूपात संरक्षित कागदपत्रे

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न- १:**

| | | |
|---|---|---|
| १. ड) कलकत्ता | २. अ) दिल्ली | ३. क) बिकानेर |
| ४. ब) संशोधक | ५. ब) १९८८ | |

**स्वयंअध्ययन प्रश्न- २**

| | | |
|---|---|---|
| १. क) लंडन | २. ब) सहा | ३. अ) ऋग्वेद |
| ४. ड) औरंगाबाद | ५. अ) जमाखर्चाची | |

**स्वयंअध्ययन प्रश्न- ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

| | | |
|---|---|---|
| १. छायाचित्रण अथवा स्कॅनिंग | २. भावी पिढ्यांसाठी | ३. तीन |
| ४. अभिलेख पटल | ५. राजवाडे संशोधन मंडळ | |

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

| | | |
|---|---|---|
| १. माहिती तंत्रज्ञान | २. डिजीटल माहिती | ३. डिजिटल ऑर्काइव्ह |
| ३. भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्टिट्यूट | | ५) डिजिटल लायब्ररी |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) लघुत्तरी प्रश्न :**

१. पुराभिलेखागार

२. भारतातील पुराभिलेखागारे

३. महाराष्ट्रातील पुराभिलेखागारे

४. शासकीय पुराभिलेखागारे

५. खाजगी संशोधन संस्थांचे दप्तरखाने

६. पुराभिलेखागाराचे प्रकार

७. पुराभिलेखागाराचे महत्त्व

८. पुराभिलेखीय कागदपत्रांचे प्रकार

९. डिजिटल पुराभिलेखागार

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. पुराभिलेखागाराचा अर्थ सांगून पुराभिलेखागाराचे प्रकार विशद करा.

२. पुराभिलेखागाराचा अर्थ सांगून भारतातील पुराभिलेखागारांची माहिती द्या.

३. पुराभिलेखागार म्हणजे काय ते सांगून पुराभिलेखागाराचे महत्त्व विशद करा.

४. पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे प्रकार सांगा.

५. डिजिटल पुराभिलेखाराची माहिती द्या.

## १.७ संदर्भ :


१. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्रः लेखनपरंपरा, संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, पहिली आवृत्ती, २००६.

२. पेडणेकर, रामचंद्र, महाराष्ट्र पुरालेखागार अभिलेखाची मार्गदर्शिका, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२.

३. खोबरेकर, वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८८.

४. डॉ. उज्ज्वला भिरूड (नेहेते) आणि डॉ. पंकजकुमार प्रेमसागर, पुराभिलेखागार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१९.

५. धाटावकर, भास्कर, महाराष्ट्रातील शासकीय पुरालेखागारांची निर्मिती आणि कार्य, चेतन प्रकाशन, मुंबई, २०१०.

६. राजदेरकर, सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.

७. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील शफीक देसाई यांच्याकडून दि. ०८.०६.२०२१ रोजी मिळालेली माहिती.

८. https:/vishwakosh.marathi.gov.in

९. शिंदे, सुखदेव व इतर, इतिहासलेखनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५.

१०. गाठाळ साहेबराव, इतिहासलेखनशास्त्र व इतिहासकार, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९९.

११. मुल्ला, जुबेदा व खोत नमिता, ''अभिलेखांचे वर्गीकरण'', नवज्योत इंटरनॅशनल इंटरडिसीप्लीनरी रिसर्च जर्नल, (सं.) रवींद्र भणगे, हौसा पब्लिकेशन, कोल्हापूर

(https://www.researchgate.net/publication/343182265)

❖ ❖ ❖

घटक – २

# इतिहासातील नवीन प्रवाह

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ स्थानिक इतिहास (Local History)

२.२.२ मौखिक इतिहास (Oral History)

२.२.३ स्थानिक इतिहासाची साधने (सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली)

(Tools of Local History (Survey, Interview, Questionnaire)

२.२.४ मुलाखत तंत्र (Interview Technique)

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- स्थानिक इतिहास म्हणजे काय? ते स्पष्ट करता येईल.
- स्थानिक इतिहासाचे व स्थानिक संदर्भ साधनांचे महत्व स्पष्ट करता येईल.
- स्थानिक इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करता येईल.
- मौखिक इतिहास म्हणजे काय? ते स्पष्ट करता येईल.
- इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी मौखिक इतिहासाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

- स्थानिक इतिहासाची साधने सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली या पद्धती काय आहे. ते समजून घेता येईल.
- इतिहास लेखांनाचे एक माध्यम म्हणून मुलाखत तंत्राचे आकलन होईल.

**२.१ प्रस्तावना :**

२० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जे-जे घडले ते-ते लिहणे अथवा पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या सहाय्याने कागदपत्रात ज्या घटनांचे प्रतिबिंब उमटले आहे त्याची मांडणी करण्याची संकल्पना रूढ होती. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे-राजवाडे, युद्ध, घटना व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा हा प्रकार रूढ आहे. पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्यामध्ये जतन करून ठेवलेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगतो हा प्रश्न त्याकाळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोण आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्याबरोबर इतिहासाची आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) मांडणी होवू पाहत आहे. ॲनाल्स परंपरा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाखीय मांडणी अधिक बळकट झाली. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी (Macro History) इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी (Micro History) इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. यातून 'स्थानिक इतिहासलेखन' परंपरा अथवा पद्धती विकसित झाली. स्थानिक इतिहास लेखन हे ॲनाल्स परंपरेचे फलित आहे. सद्य स्थितीत जगभरात स्थानिक इतिहासलेखन परंपरेला चालना मिळालेली आहे.

इतिहास म्हणजे राजा, लढाया, स्वातंत्र्य-आंदोलनाचे वृत्तांत इथपर्यंतच मर्यादित राहिलेला नाही. तर मानवी समाजाची सर्वागीण कहाणी बनू पाहत आहे. माणूस हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी असल्याकारणाने मानवी जीवन आणि समाजाशी निगडित सर्वच घटकांची चर्चा इतिहासलेखनाच्या वर्तुळात आणि कक्षेत होऊ लागली आहे. स्थानिक ते वैश्विक (Local to Global) आणि वैश्विक ते स्थानिक (Global to Local) असा सर्वस्पर्शी इतिहास आविष्कृत होत आहे. इतिहासविषयक नव-नवीन प्रवाह अथवा दृष्टीकोणामुळे (Resent trends or Approaches) इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. ऐतिहासिक संशोधनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून आलेला आहे. नव-नवीन प्रवाह अथवा दृष्टीकोनामुळे आलेला बदल इतका विलक्षण आहे की, इतिहास या विद्याशाखेचा आणि इतिहासलेखनाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. आपण प्रस्तुत घटकात स्थानिक व मौखिक इतिहास, स्थानिक इतिहासाची साधने आणि मुलाखत तंत्र याविषयी माहिती घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### १.२.१ स्थानिक इतिहास (Local History) :

स्थानिक इतिहासलेखन ही संकल्पना भारतामध्ये नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहीलेला आहे. प्राचीन काळी आपल्याकडे जी स्थलमहात्म्य होती त्याचाच हा आधुनिक व शास्त्रीय अवतार आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणाऱ्या व्यक्तीला स्थानिक अथवा गावकरी म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ठ नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय असे बहुविध पैलू स्थानिक इतिहासात लक्षात घेतले जातात. या प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे विचार केला गेला असला तरीही हे सारे घटक आतून एकमेकांशी जोडलेले असतात. एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. स्थानिक इतिहासाच्या संदर्भात केवळ घटनांची जंत्री नसून ती एक चिकित्सक, अन्वयार्थी, सैद्धान्तिक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देणारी स्वतंत्र शाखा आहे.

सांस्कृतिक केंद्र असलेल्या नगराचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वैचारिक असे आलेख काढले गेले आणि अशा अनेक सांस्कृतिक केंद्रांच्या व्यापक व सर्वांगिण इतिहासाच्या साह्यानं सर्व देशाचा इतिहास लिहिला गेला, तर तो निश्चितच समृद्ध व सर्व समाजघटकांना न्याय देणारा असणार, ही कल्पना पुढे आली आणि त्यातूनच स्थानीय इतिहासाची संकल्पना दृढ झाली. एखाद्या शहराचा स्थानीय इतिहास म्हणजे त्या शहराचा व्यापक अर्थाने लिहिलेला सामाजिक व सांस्कृतिक इतिहास. इतिहासरूपी अस्थींच्या सांगाड्याला ऐतिहासिक उदाहरणांच्या साह्यानं रक्त-मांस चढवून तो सजीव करण्याचा प्रयत्न स्थानीय इतिहास लेखनात असतो. सर्वांगीण इतिहास म्हणजे बहुशाखीय इतिहास हे स्थानीय इतिहासाचं लक्ष्य असल्यामुळे पारंपरिक ऐतिहासिक साधनांबरोबर चित्रं-छायाचित्रं; अशा अपारंपरिक साधनांचा उपयोगही स्थानीय इतिहासात केला जातो. म्हणून स्थानीय इतिहास लेखक, पुरातत्त्व संशोधक, भूगोलतज्ज्ञ, भूगर्भतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलाइतिहासतज्ज्ञ, वाङ्मय इतिहासतज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका करत असतो. स्थानीय इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नाही. अगदी पेहेरावातील फॅशन्सपासून आहारातील रूचीवैविध्या पर्यत सर्व विषयांचा यथायोग्य वापर स्थानीय इतिहासासाठी होऊ शकतो.' थोडक्यात एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रीत राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

### १) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना :

इतिहासलेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले दिसतात. यामध्ये अलिकडील काळात विशेष प्रसिध्दीत आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे 'स्थानिक इतिहास' अथवा 'स्थानीय इतिहास' होय. स्थान म्हणजे ठिकाण किंवा स्थानिक म्हणजे मूळचा म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास. डॉ. अरुण टिकेकर यांनी

'स्थानिक इतिहास' (Local History) ऐवजी 'स्थानीय इतिहास' (Localised History) असा मराठी शब्दप्रयोग केलेला आहे. वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. युरोपात उदयाला आलेल्या या शाखेने इतिहासात मोलाची भर घातली आहे. इतिहासाची भौगोलिक निकषांवर केली गेलेली विभागणी किंवा भूगोलाधारित इतिहास म्हणजे स्थानिक इतिहासलेखन. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. स्थानिक इतिहासात गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. भारतातील प्रत्येक गावाला स्वत:चा असा एक इतिहास, स्वत:ची अशी एक संस्कृती आहे.

**२) स्थानिक इतिहास लेखनाची सुरूवात :**

१६ व्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला. लंडन शहराचा सूक्ष्म पध्दतीने सर्वेक्षणकरून त्यावर आधारीत इ. स. १८९४ मध्ये ४४ खंड प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणार हे पहीले शहर. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातून पुढे लंडन विद्यापीठात "Institute of Historical Research' स्थापन झाले. त्यामुळेच लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. याच काळात फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादीचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी सन १८४० च्या दशकात आपपाल्या क्षेत्रातील उदयोग व्यवसायाचा इतिहास लिहीण्यास सुरूवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयांच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

**३) स्थानिक इतिहास लेखनाची भारतातील सुरूवात :**

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या दृष्टीकाणातून विचार केल्यास इ. स. १८३६ मध्ये प्रसिध्द झालेले गोविद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', इ.स. १९६८ मध्ये प्रसिध्द झालेले ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन', आर.व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर' या ग्रंथाद्वारे १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला असे म्हणू शकतो. विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृध्दींगत झाली. डी. बी. पारसणीस यांनी स्थानिक इतिहासलेखनाशी संबंधित महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले, यामध्ये 'दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ', 'नोट्स ऑन सातारा महाबळेश्वर', 'सांगली स्टेट', 'पन्हाळा', 'पूना इन बायगॉन डेज' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. ना. गो. चापेकरांचे 'बदलापूर', (१९३३) पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', (१९३५) दे. गो. लांडगे यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', (१९५४) राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', (१९५६) अरूण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादीत केलेले 'शहर पुणे: एका सास्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) डॉ. अवनिश सोवणी यांचे 'हरवलेले पुणे' यासारख्या अनेक ग्रंथाचा उल्लेख होतो. महाराष्ट्रामध्ये स्थानिक इतिहास लेखनाची अनेक उदाहरणे देता येतील मात्र अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी रोमिला थापर यांनी इ. स. १९७६ मधील

पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्ष पदावरून केलेल्या प्रादेशिक व स्थानिक इतिहास या विषयावर केलेल्या मांडणीपासून झाली असे मानले जाते. तेव्हापासून भारतात यानवीन विचार प्रवाहाचा खर्या अर्थाने अभ्यास सुरू झाला.

**४) प्रादेशिक इतिहासातून स्थानिक इतिहासाकडे :**

इतिहासाची व्याप्ती स्थल व काल सापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी याची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वि. का. राजवाडे यांनी देशिक प्रकार नमूद केलेला आहे. यामध्ये त्यांना विशिष्ट भूप्रदेशाचा म्हणजेच प्रादेशिक इतिहास अभिप्रेत होता, तर प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून स्थानिक इतिहासाची ओळख आहे. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीतून राष्ट्रीय इतिहास आकारास येतो. मात्र राष्ट्राचा परिपूर्ण व सुसंगत इतिहास साकारण्यासाठी प्रादेशिक व स्थानिक इतिहास महत्व पूर्ण ठरतो. यासंदर्भात डॉ. राजा दिक्षित यांनी प्रादेक्षिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे ते म्हणतात की, ''इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो, त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर, स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहीला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

**५) स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश :**

इतिहास संधोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. आपण त्या गावात लहानाचे मोठे झालो त्या गावाबद्दलची देखील माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्ती समूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तानी राज्य केलेले आहे, त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खाणाखुणा अनेक गावागावात विखुरलेल्या आहेत. बऱ्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैशिष्ट्यामुळे प्रसिध्दीस आलेले असते त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे.

**६) स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व :**

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता त्याचे विविध दृष्टीकोनातून महत्त्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्यविषय आहेत. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या

सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास हा सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोनातून लिहीलेला असतो. यामध्ये मुख्य वर्ण विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप उदर निर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ठ असतो.

स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषत: स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रीत करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. 'स्थल' इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे. कारण स्थानिक संदर्भ व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोणातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. थोडक्यात, आपण स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून आपण;

१) एखाद्या गावाची, घटनेची, स्थानाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो.

२) स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न करू शकतो.

३) समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो.

४) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो.

५) दुर्लक्षित घटक, प्रथा, रूढी, परंपरा, आचार, विचार, आहार, अलंकार, पोशाख, खाद्य, कथा, पुराणकथा, दंतकथा, म्हणी, वाक्य प्रचार याचा नव्याने विचार करू शकतो.

**७) स्थानिक इतिहास लेखन पध्दती :**

स्थानिक इतिहास लेखन ही नवीन संकल्पना आज झपाट्याने विकसित होत आहे. 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' हा प्रवाह महत्त्वाचा असला तरी याच्या व्यतिरीक्तही इतिहासलेखन केले जावू शकते हे आज सप्रमाण सिध्द होत आहे. यासाठी अनेक नवनवीन आधुनिक पध्दती वापरल्या जात आहेत जसे की, १) ऐतिहासिक संशोधन पध्दती (पारंपारिक), २) क्षेत्र भेट, ३) सर्वेक्षण, ४) मुलाखत, ५) प्रश्नावली, ६) मौखिक आणि ७) पुरातत्वीय पद्धती इत्यादी पध्दती अथवा माध्यमांचा आधार घेवून स्थानिक इतिहास लेखन केले जावू शकते. वरील प्रारूपाच्या अनुषंगाने स्थानिक इतिहासाचे लेखन केले जात आहे व केले जावू शकते. याशिवाय यामध्ये इतर अनेक अति विशिष्ट घटक समाविष्ठ होऊ शकतात.

## ८) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

स्थानिक इतिहासलेखन करताना खालील पैलूचा अथवा घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो ते प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे :-

| भौगोलिक पार्श्वभूमी | ऐतिहासिक पार्श्वभूमी | सामाजिक जीवन | सांस्कृतिक जीवन | आर्थिक जीवन |
|---|---|---|---|---|
| जमीन, जमिनीचे प्रकार | प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक | लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण | सांस्कृतिक संस्था | शेती, शेतीचे प्रकार, औजारे |
| भौगोलिक सीमा | ऐतिहासिक स्थळे | धर्म/ पंथ | जत्रा, यात्रा, उरूस | पीके, पीक पद्धती |
| नद्या, नाले ओढे, तलाव, विहिरी (पाण्याचे स्त्रोत) | ऐतिहासिक स्मारके | कुटुंब संस्था, सामाजिक स्थित्यंतरे | मनोरंजन, संगीत, गायन, वादन, लोकगीते, गाणी, ओव्या | जलसिंचन, जलसिंचनाचे प्रकार |
| पर्जन्य | घटना विशेष | प्रथा, परंपरा, रूढी, विवाह पद्धती | खेळ, क्रीडा प्रकार (लहान मुलांचे, स्त्रीयांचे व पुरुषांचे) | व्यापार, व्यापारी जमाती, व्यापारी माल |
| हवामान | व्यक्ति विशेष | जाती -पोतजाती | म्हणी, वाक्य प्रकार | पतपेढी (बँका) |
| जंगल संपदा, पशु पक्षी, वृक्ष संपदा | ऐतिहासिक दंथ कथा | आचार, विचार, निष्ठा, आहार, पोशाख, आभूषणे | भाषा, भाषा प्रकार, बोली, खाद्य संस्कृति | दळणवळण, दळणवळनाची साधने |

### अ) ऐतिहासिक घटक :

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची व्युत्पत्ती गावाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोकसमजूती इत्यादी महत्त्वाच्या असतात. बऱ्याचवेळी गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. कोल्हापूर या नावाचा व्युत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर आपणास त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक

असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, या इतिहास काळात त्या-त्या गावांचा विकास व जडण-घडण झालेली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्या कारणाने शेकडो, हजारो गावांचा इतिहास शब्दबध्द झालेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे आहे, यामध्ये नव संशोधकांना अधिक वाव आहे.

**ब) भौगोलिक घटक :**

जगातील प्रत्येक देशाला, त्या देशातील राज्य, प्रांत, जिल्हा, तालुका, गावांना विविध भौगोलिक परिस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदलही होत जातो, त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगलसंपदा, पशु-पक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्रोत इत्यादीचा अभ्यास केला जावू शकतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करतात, या भौगोलिक घटकाचा त्या-त्या गावावर काय परीणाम होतो किंवा झालेला आहे याचा आपण अभ्यास करू शकतो. कोणात्याही ऐतिहासक घटनेचा अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे आवश्यक असते अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. उदा. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरून कसे निसटले यामध्ये त्यांचे रणचातुर्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढीच तेथील भौगोलिक परीस्स्थितीही महत्त्वाची आहे.

**क) सामाजिक घटक :**

प्रत्येक गावाची एक विशिष्ठ सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समाविष्ट करू शकतो. गावातील लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंब संस्था, कुटुंब संस्थेत झालेला बदल, विविध जाती, पोट जाती, पंथ, रूढी-परंपरा, आचार-विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा. काही गावात व जातीत लग्न, प्रथा, विशिष्ट केल्या जातात. गावामध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकांवरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहीताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री-पुरुष समानता व प्रमाण, मुलींचे शिक्षण, हुंडाप्रथा, विवाह पध्दती इत्यादी संबंधी माहीती नव्याने मांडू शकतो.

**ड) सांस्कृतिक घटक :**

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा, महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, संकेत पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी-देवतांची मंदीरे, दर्गे मशिदी आहेत आणि त्या-त्या गावात विशिष्ठ पध्दतीने त्यांच्या जत्रा-यात्रा साजऱ्या केल्या जातात, त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ठ खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनांची माध्यमे व कला प्रकार

आहेत, त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जावू शकतो. उदा. शिराळा येथील नागपंचमी, कवठेएकंद येथील शोभेची दारू उडवण्याची प्रथा, काही गावात दीपावली, बैल पोळा, पाडवा विविध पध्दतीने साजरा केला जातो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या गावातील सामाजिक-धार्मिक आर्थिक अनुबंध समजावून घेवू शकतो. साहित्यिक-सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो. काही गावातील यात्रा-जत्रा विशिष्ठ संकेताच्या आधारावर संपन्न होतात. याचाही या माध्यमातून अभ्यास होवू शकतो. सांस्कृतिक जीवन हे ज्या कृषी घटकावर आधारीत आहे, ते अनेक सण-समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो.

**इ) आर्थिक घटक :**

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती अर्थात कृषी जीवनावर आधारीत आहे. त्या-त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेती आधारीत जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, जाती आधारीत व्यवसाय, व्यापारी जाती-जमाती इत्यादीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनांच्या माध्यमातून गावपातळीवर केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्रफळ, लागवडी खालील शेती, हंगाम, पिक पध्दती, शेतीची पध्दती, शेती उत्पादन बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरी, कोळपणी अशा कितीतरी अंगाने अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेवू शकतो. सांगोला, आटपाडी, मोडनिंब, पंढरपूर, अकलूज येथे पशु-पक्षांचा बाजार भरतो, कोटीच्या धर्तीवर आर्थिक उलाढाल होते, याचाही अभ्यास होवू शकतो. कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथे बिरदेव यात्रेत घोंगड्याचा बाजार भरतो असे आणि कितीतरी उदाहरणे आपणास सहज पहावयास मिळतात.

**ई) राजकीय व प्रशासकीय जीवन :**

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये एखाद्या गावाचे देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातील योगदान, प्रशासनातील योगदान, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था यांचाही अभ्यास केला जावू शकतो.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**रिकाम्या जागा भरा.**

१) .............. प्रथा इतिहासलेखनात रूढ झाल्यानंतर आंतरविद्याशाकीय मांडणी अधिक बळकट झाली.

२) स्थानिक इतिहास लेखन हे ............ परंपरेचे फलित आहे.

३) १८ व्या शतकापासून रांकेप्रणीत इतिहासलेखनपद्धतीची आणि ऑगस्त कॉम्तच्या ............ वादाची चिकित्सा सुरू झाली.

४) डॉ. अरुण टीकेकर यांनी स्थानिक इतिहास ऐवजी ............ हा मराठी शब्दप्रयोग वापरला आहे.

५) १६ व्या शतकात ............ मध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला.

६) इ. स. १८३६ मध्ये प्रसिध्द झालेले गोविद माडगावकरांचे ............ हे पुस्तक आहे.

७) अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी ............ यांनी केली आहे.

८) हरवलेले पुणे हे पुस्तक ............ यांचे आहे.

९) स्थानिक इतिहासलेखांनामध्ये ............ ची भूमिका महत्वाची ठरू शकते.

१०) कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथील बिरदेव यात्रेत ............ बाजार भरतो

## १.२.२ मौखिक इतिहास (Oral History) :

इतिहासलेखन व आधुनिक संदर्भ साधनांचे क्षेत्र अधिक विस्तारत आहे. इतिहासलेखनात नवनविन विचार प्रवाहांचा अंर्तभाव झालेला आहे. वंचितांचा इतिहास, ॲनल्स, संरचनावादी, स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक, खाद्य संस्कृतीचा इतिहास इत्यादी नवनवीन प्रकारचे इतिहासलेखन प्रवाह एकाच घटनेचे विविध अंगानी इतिहास लेखन करताना दिसतात. या नविन विचारप्रवाहांनी नव्याने ऐतिहासिक साधनांचे महत्व, चिकित्सा, विश्लेषण अथवा प्रचलित साधनांचा नव्या पध्दतीने वापर करण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये मौखीक परंपरा आणि साधनांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटुंबिक, समूहिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि दैनंदिन जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांसंबधी मौखिक स्वरूपातील माहितीचा संग्रह आणि अभ्यास होय. लिखित साधनांपेक्षा मौखिक साधनांची विश्वासार्हता कमी मानली जात असली, तरी जेथे लिखित साधनाचा अभाव असतो तेथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. मानवी समाजात काही समूहाकडे-जमातींकडे लिखित साधनांचा अभाव होता अथवा त्यांना लेखन कलेची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे लेखन कलेची माहिती असून देखील काही समूहांनी आपली माहिती मौखिक परंपरेनेच पिढ्यानपिढ्या संक्रमित केली आणि पाठांतराद्वारे पिढ्यानपिढ्या त्यांचे जतन देखील केले. अशा पद्धतीने ज्ञान, स्मृति, भूतकालीन घटना, पारंपारिक कथा-गाणी, पारंपारिक कायदे यांचे ग्रहण, संवर्धन आणि संक्रमण होत राहिले. पारंपारिक कथा, दंतकथा, मिथके, म्हणी, पोवाडे, ओव्या, गाणी इत्यादींचा अंतर्भाव मौखिक परंपरेत केला जातो. मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची लिखित अथवा पुरातत्त्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात. अशा पडताळणीमुळे माहितीच्या सत्यासत्यताची तपासणी करता येते.

### १) मौखिक इतिहासाचे महत्व :

ऐतिहासिक घटना किंवा घडलेले प्रसंग बऱ्याच वेळा लिहून ठेवलेले नसतात किंबहुना ते त्यांना शक्यही नव्हते. कारण प्राचीन काळापासून साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. त्यामुळे त्या घटना किंवा प्रसंगांची नोंद झाली

नाही. परंतु मौखिक साधनांच्या मधून ते प्रतिबिंबित झालेले दिसते. मौखिक परंपरेत प्रसंग किंवा घटना सारखीच असते परंतु सांगणारी व्यक्ती वेगळी असते, त्यामध्ये तो स्वत: ची भर घालून अधिक रंजकता आणण्याचा प्रयत्न करत असतो किंवा केलेला असतो. त्यामुळे घटना व प्रसंग सारखाच असतो परंतु त्यातील नावे वेगवेगळी असतात. तो प्रसंग किंवा घटना अनेक मौखिक साधनांच्या माध्यमातून वर्षानुवर्षे सांगण्याचे काम चालू असते. त्यामुळे प्रसंगातील वस्तूनिष्ठता लुप्त होते. परिणामी मौखिक साधनांचा इतिहास लेखनामध्ये फारसा उपयोग होत नाही, त्याचे महत्वही राहत नाही. हे जरी खरे असले तरी अशा मौखिक साधनांच्या माध्यमातून जी माहिती प्राप्त होते अथवा त्यामधुन जो अर्थबोध होतो त्या माहितीच्या आधारे पूर्वी घडलेल्या घटनांच्या ऐतिहासिक सत्यापर्यंत जाता येते. जेव्हा एखाद्या महत्वाच्या घटनेविषयी कोणताही लिखित अस्सल पुरावा किंवा साधन उपलब्ध होत नाही तेव्हा अशा मौखिक साधनांच्या आधाराने काही अंशी त्या घटनेवर प्रकाश टाकणे शक्य होते. मौखिक साधनांच्यामधून मिळालेल्या ऐतिहासिक माहितीची तर्क संगत दृष्टीकोनातून चिकित्सा किंवा अभ्यास करून त्या संबंधीत घटनेचा उचीत अन्वयार्थ काढता येतो. मौखिक साधनांच्या माध्यमातून परंपरागत चालत आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते. त्याचबरोबर तत्कालीन आचार-विचार, रुढी-परंपरा, आहार-विहार इत्यादी संबंधी माहितीही मिळते.

**२) मौखिक इतिहासाची संकल्पना :**

ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकपद्धतीने जात असते. असंरचित मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीकडून एखाद्या घटनेची, कार्यक्रमाची किंवा क्रियेची माहिती गोळा करण्याची ही पद्धती होय. मौखिक इतिहास हा व्यक्तिच्या आठवणींवरती आधारित असतो. भूतकाळात घडलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक या घटना व्यक्ती तिच्या आठवणींच्या आधारे एखाद्यास सांगतो व ऐकणारा त्या आठवणींच्या आधारावरून विश्लेषण करीत असतो. मौखिक इतिहासपद्धती ही ऐतिहासिक दस्तऐवजीकरणासाठी वापरात येणारी सर्वात जुनी पद्धती मानली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित-सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी केला गेला. पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

मौखिक इतिहास हे एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विधानांची, अनुभवांची आणि आठवणींची एक पद्धतशीर संकलन आहे, जे इतिहासकारांनी सादर केले आहे. एक मौखिक इतिहासकार प्राप्त केलेल्या मौखिक माहितीची तपासणी, परीक्षण आणि विश्लेषण करतो. कारण मौखिक इतिहास वैयक्तिक विधानांच्या स्मृतीवर आधारित असतात. त्यामुळे त्यात विचलन होण्याची शक्यता आहे. म्हणूनच कागदपत्रे आणि अभिलेखावर आधारित इतिहासकार त्यावर टीका करतात. त्यांच्या मते मौखिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे वैयक्तिक असते. म्हणून अशा प्रकारचा इतिहास बऱ्याच मर्यादित आणि अरुंद असू शकतो. मात्र हे हे पूर्ण सत्य नाही.

औद्योगिकीकरणाच्या अगोदर मौखिक परंपरा समाजांचे एक महत्त्वाचे अंग होते. जगभरात या काळात शिक्षण व तंत्रज्ञान प्रसार पाहिजे तेवढा झालेला नव्हता. इतिहासाच्या निर्मिती, संप्रेषण आणि संवर्धनात मौखिकतेची भूमिका महत्त्वपूर्ण होती. हेरोडोटस, कल्हन, इब्न बतुता, अल्बेरुनी, बर्नियर मध्यकालीन प्रवाशांचे लेखन आधुनिक इतिहासकारांच्या लेखनाचे प्रमुख साधन आहे, मात्र आपण हे लक्ष्यात ठेवले पाहिजे की यांचे लिखाण मौखिक माहितीवर आधारित आहे. आपण जर फाह्यान, हूनत्संग आणि मार्को पोलो यासारख्या प्रवाशांच्या लेखनाबद्दल बोललो तर त्यांनी त्यांच्या प्रवासात भेटलेल्या सर्वसामान्य लोक, शेतकरी, व्यापारी, कलाकार, राज्यकर्ते आणि अधिकारी इत्यादींचे अनुभव जाणून घेतल्यानंतरच ते लिपीबद्ध केले आहेत, या अर्थाने जर आपण याचा विचार केला तर एक प्रकारे हा मौखिक इतिहासच आहे. या दृष्टीकोणातून पहिले तर मौखिक इतिहास आणि लेखी इतिहास परस्परांना पूरक आहेत. त्या दोघांमध्ये एक समान धागा आढळतो. कधीकधी मौखिक इतिहास चुकीचा असू शकतो आणि लिहिलेला इतिहास चुकीचा अथवा विपरित देखील असू शकतो. उदा. प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी जर आपण वेदांचा साधन म्हणून उपयोग केला तर ते स्पष्टपणे मौखिक परंपरावर अवलंबून आहे. कारण वेद लिखित येण्याअगोदर ते मौखिक होते.

**३) मौखिक इतिहासाची सुरुवात :**

युरोपीय इतिहासकार मिशलेट आणि बर्कहार्ड सारख्या इतिहासकारांच्या मते १९ व्या शतकापर्यंत इतिहासलेखनात मौखिकता महत्त्वपूर्ण होती. परंतु संस्थात्मक व्यावसायिक इतिहासकारांनी या पद्धतीला धक्का दिला कारण त्यांना कागदपत्रे महत्वाची वाटत होती एका अर्थाने ते "No Documents, No History' या विधानावर काम करत होते त्यामुळे त्यांना असे वाटत होते की मौखिक इतिहासलेखन हे कागदपत्रे अथवा दस्तऐवजांवर आधारित नाही. १९४८ मध्ये डॅलन नेवील व पॉल थॉमसन यांनी मौखिक इतिहासाचा वापर सुरू केला. या पद्धतीवरती पॉल थॉमसन यांनी १९८७ मध्ये लिहिलेले 'द वॉइस ऑफ द पास्ट-ओरल हिस्ट्री' हे अतिशय मूलभूत पुस्तक आहे. १९७० च्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर मौखिक इतिहासाला प्रोत्साहन देण्याचे काम पोल थॉम्पसनने यांनी केले. ब्रिटीश ओरल हिस्ट्री सोसायटी च्या माध्यमातून मौखिक इतिहासाला प्रोत्साहन देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. १९७० च्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एक महत्वाची भूमिका मायकेल फ्रिसच यांनी बजावली. त्यांच्या अमेरिकन स्टडीज ऑफ हिस्ट्री मध्ये त्यांनी असा एक प्रश्न उभा केला की, खरोखरच मौखिक इतिहासाच्या माध्यमातून जो इतिहास पुढे आलेला आहे तो खरोखरच घडला आहे किवा काय? हा प्रश्न मौखिक इतिहास जगभरातील इतिहासकारांचा आणि संस्थांचा चर्चेचा विषय झाला होता

**४) मौखिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धती :**

इतिहासलेखन व पुनर्लेखनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घ्यावा लागतो. याशिवाय इतिहासलेखन परिपूर्ण होत नाही. प्राचीन व ऐतिहासिक घटना व व्यक्तीच्या संदर्भात संशोधन करताना काही घटना किंवा व्यक्तीच्या संबंधी-परिपूर्ण माहिती अथवा साधने उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अशा ऐतिहासिक घटना किंवा व्यक्तीचा इतिहास लिहिताना काही वेळा पोकळी राहिलेली दिसते. राजकीय,

सामाजिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक इतिहास संदर्भ साधनांच्या शिवाय परिपूर्ण होवू शकत नाही. संदर्भ साधनांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्याचे काम मौखिक साधने काही प्रमाणात पूर्ण करतात. मौखिक साधने म्हणजे पिढ्यान-पिढ्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात आलेले साहित्य होय. साहित्यामध्ये देखील मौखिक साहित्य नावाचा स्वतंत्र प्रकार आहे. असे साहित्य लिहिलेले नसते व त्याचा कर्ता बऱ्याच प्रसंगी अज्ञात असतो, परंतु ते पिढ्या-दर -पिढ्या मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेले असते. यामध्ये लोककथा, दंतकथा, पुराणकथा, पोवाडे, खंडकाव्य, वीरगीते, ओव्या, जात्यावरची गाणी, म्हणी व वाक्प्रचार इत्यादीचा समावेश होतो.

वास्तविक पाहता मौखिक इतिहास अथवा इतिहासलेखनाचा मुख्य उद्देश संभाषणाद्वारे एखादी घटना किंवा घटनाक्रमाचे विश्लेषण करणे किंवा त्यांचे वर्णन करणे हा आहे. यामध्ये मुख्यतः जे मुख्य प्रवाहात सामील होत नाहीत त्यांचा आवाज सामील करून घेण्याची प्रकिया आहे. त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो. ज्यामध्ये ते आपला मुद्दा मांडू शकतात. यामध्ये त्याचा आधार म्हणजे लोकांची थेट मुलाखत. मौखिक इतिहासाने लोकांच्या वृत्ती आणि अनुभवांचा इतिहासात समावेश करून इतिहासात बदल घडवून आणले. मौखिक साधनाचे ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीने, ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात, एक मौखिक परंपरा आणि दूसरा मुलाखत. मौखिक परंपरा म्हणजे, परंपरेने, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी विभिन्न स्वरूपातील मौखिक माहिती होय, याला आपण मौखिक वाङ्मय देखील म्हणू शकतो.

मौखिक इतिहासाचे आणखी एक अभ्यासक रीची डोनाल्ड यांनी आपल्या 'रेकॉर्डिंग ओरल हिस्ट्री' या ग्रंथात मौखिक इतिहासलेखांना संबंधी, 'सामाजिक शास्त्राच्या इतर क्षेत्रांप्रमाणे मौखिक इतिहासाची संशोधन पद्धत पद्धतशीर, सर्वसमावेशक आणि कथात्मक असावी लागते. मौखिक इतिहास लेखकांचा असा विश्वास आहे की इतिहासकारांनी दिलेल्या व्याख्या आणि कथनांपेक्षा त्यांचा इतिहासातील अनुभव अधिक जटिल आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेशी संबंधित मुलाखतीद्वारे क्वचितच ऐतिहासिक पुरावे मिळू शकतात. परंतु, कधीकधी अशा घटनेत इतिहासाच्या कोणत्याही शाखांविषयीच्या आपल्या कल्पनांमध्ये बदल घडण्याची क्षमता असते' असे रीची यांनी नमूद केले आहे.

**५) आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास :**

मौखिक इतिहासाचा वापर १९८० मध्ये 'इतिहास' व 'आठवणी' यांच्या सहसंबंधातील उदयामुळे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. आठवण ही मौखिक इतिहासाचा खूप मोठा आधार आहे. आठवण ही सामाजिक उत्पादनाचे प्रभावी साधन मानता येते; कारण आठवणीतून दैनंदिन जीवनातील भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडणारे ज्ञान तयार होत असते. मौखिक इतिहासपद्धतीमुळे दुर्लक्षित घटकांची जाणीव, संवेदना समजून घेण्यास मदत होते. मौखिक इतिहास हा सत्ताधारी घटकाकडून न येता, तो थेट भोगलेल्या व्यक्तिच्या तोंडून बाहेर येत असतो. ग्लक यांच्या मते, 'ज्या स्त्रियांनी औपचारिक शिक्षण घेतले नाही किंवा ज्या स्त्रियांना संवाद साधण्यास जमत नाही, अशा स्त्रियांची माहिती घेण्यासाठी व त्यांना सशक्त बनविण्यासाठी मौखिक इतिहास महत्त्वाचे साधन आहे.

इतिहास जेवढा ग्रंथांमध्ये आहे तेवढाच इतिहासाच्या बाहेर सुद्धा आहे? जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आठवणी जागतात आणि ज्या कोठेही नोंदवल्या गेलेल्या नसतात. एखाद्या व्यक्तीने एखाद्या घटनेची आठवण कशी जागावावी हे त्याचे स्वत:चेच वर्णन असते, की जे दुसऱ्यापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. विस्थापित, शोषित, पिडीत, बलात्कार अथवा पुनर्वसित यांचे स्वत:चे अनुभव असतात. सार्वजनिक आठवणींमध्ये नोंदलेल्या अशा घटनांकडे दुर्लक्ष करून कोणत्याही जाती, समाज किंवा राष्ट्राचा संपूर्ण इतिहास आपण जाणू शकतो का, यात मला शंका आहे. आठवणी कोण, काय, कोण आणि कसे संग्रहित करतात यावर बरेच काही अवलंबून आहे. असे असूनही, एखाद्या वांशिक गट किंवा व्यक्तीस एखाद्या घटनेची आठवण कशी होते, कोणाकडे, ज्याच्या समोर ती सांगितली जाते, मुख्य घटनेबद्दल किंवा तिच्या कोणत्याही उप-घटनेबद्दल त्याचा-त्याचा दृष्टिकोन काय आहे, हे ऐतिहासिक तथ्यांशी समांतर होते की नव्हते याचे उत्तम ज्ञात असले पाहिजे.

वैयक्तिक आठवण आणि स्मृती मौखिक इतिहासाची महत्त्वपूर्ण बाजू आहेत. मुलाखत घेणाऱ्याला तांत्रिक कौशल्य आणि अनुभव आवश्यक असतो. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीकडून काय शोधायचे आहे आणि काय काढायचे आहे याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. प्रश्नांचा संबंध परस्पर संबंधित क्षेत्रावर केंद्रीत असला पाहिजे. जेणे करून अधिक अंर्तदृष्टीने समश्येवर प्रकाश टाकता येईल. मौखिक इतिहासकार त्यासाठी व्यावसायिकदृष्ट्या सुसज्ज आणि अनुभवी असणे गरजेचे असते. ऐतिहासिक घटनेच्या कोणत्याही पैलूवर त्यांचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. या संबधी बर्खहार्ड, आपल्या 'जजमेंट्स इन हिस्ट्री अँड हिस्टोरीन्स' या ग्रंथात म्हणतो की, मौखिक इतिहास केवळ स्मृतीवर आधारित आहे. म्हणून मुलाखत घेणाऱ्याने घटनेची किंवा प्रथेची चांगली स्मरणशक्ती ठेवली पाहिजे. घटनेची तारीख किंवा तपशील कदाचित बरोबर असू शकत नाहीत आणि त्या तपासण्यासाठी किंवा अस्सल लिखित स्त्रोतांद्वारे तपासले जाणे आवश्यक आहे. मुलाखत किंवा त्याच्या आत्मचरित्राची कोणत्याही घटनेची नोंद अथवा डायरी देखील त्याच्या कथनात किंवा अनुभवासाठी पूरक म्हणून वापरली जाऊ शकते. अशा परिस्थितीत मुलाखतदारास मुलाखती घेणाऱ्या उपक्रम, योगदान आणि सहभागाची चांगली माहिती असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, संगीतकार आणि साहित्य यासारख्या क्षेत्रांवर सामाजिक कार्यकर्त्याकडून माहिती गोळा करण्याचा अर्थ नाही, जोपर्यंत तो त्या क्षेत्रांमध्ये काम करणारे आणि प्रत्यक्ष अनुभवी असत नाहीत तो पर्यन्त त्याला काही अर्थ उरत नाही. आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास यासंदर्भात आपण 'द सीन्स वुइ मेड-ॲन ओरल हिस्टरी ऑफ एक्स्पेरिमेंटल थिएटर इन मुंबई' हे शांता गोखले यांच्या ग्रंथाचे एक उत्तम उदाहरण म्हणून देवू शकतो. याशिवाय आपण नेहरू स्मारक संग्रहालयाने १९६६ मध्ये जो मौखिक इतिहासाचा प्रकल्प सुरू केला त्याचाही उल्लेख विशेषकरून करावा लागेल. यामध्ये त्यांनी १३५१ विविध महत्व पूर्ण व्यक्तीच्या मुलाखत घेवून त्याचे या पैकी ८८२ प्रतिलेख नेहरू स्मारक संग्रहालयाच्या वाचनालयात उपलब्ध आहेत.

मौखिक इतिहास अनुभवाच्या अधिक व्यक्तिपरक पैलू प्रकट करतो. आयुष्याचा दीर्घ अनुभव असलेला एखादा माणूस म्हणजे त्याच्या जीवनातील अनुभवांमधील एक महत्त्वाचा स्त्रोत सामग्री किंवा मौल्यवान दस्तऐवज. त्याचे जतन केवळ मौखिक इतिहासाद्वारे शक्य आहे. मौखिक इतिहासाच्या रूपातील असे अनुभव

मौखिक इतिहासाच्या योग्य संग्रहात जतन केले जाणे आवश्यक आहे. त्यांची सामग्री, नाव, व्यवसाय, कालावधी आणि महत्त्व यासारख्या तपशीलांसह दस्तऐवजीकरण केले जाऊ शकते. दुर्दैवाने, भारतीय आणि सरकारी संस्था अशा दोन्ही संस्थांना मौखिक इतिहास अभिलेखाचे किंवा अशा प्रकल्पांचे उपनगरीय गट किंवा उपेक्षित विभागांचा इतिहास नोंदविण्याचे महत्त्व कळले नाही. मौखिक इतिहास एखाद्या रस्त्याच्या इतिहासातील लोकांना मदत करतात.

**६) प्रादेशिक, स्थानिक इतिहास आणि मौखिकता :**

प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासामध्ये कुटुंबांची भूमिका प्रमुख आहे. कौटुंबिक इतिहासाचे लेखन ही प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासाच्या पुर्नचनेची एक परिपूर्ण आवश्यकता आहे. दुर्दैवाने आपल्या शैक्षणिक कामांमध्ये असा नवीन प्रवाह समोर आला नाही. मौखिक परंपरा आणि व्यक्तींच्या स्मृती अशा लिखाणांसाठी सिंहाचा वाटा पुरवतात. या दिशानिर्देशातील मुलाखती स्थलांतर, शेती, उद्योग, संस्कृती आणि कौटुंबिक प्रणालीशी संबंधित मुद्यांना उजाळा देऊ शकतात. सेटलमेंट पॅटर्न, परस्परावलंबन, सामाजिक संबंध, विवाह संबंध कौटुंबिक इतिहासात आढळू शकतात. येथे तथ्यात्मक कथन आणि स्मरणशक्तीच्या आधारे माहिती एकत्रित केली जाऊ शकते. महिला मुलाखतदारांना कौटुंबिक रीतिरिवाज, कौटुंबिक संसाधनांचा वापर, स्थानिक भांडणे आणि संघर्ष यासंबंधी अधिक तपशीलवार माहिती प्रदान करण्यात मदत होईल. स्थानिक कार्यक्रम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींशी कसे जोडले जातात हे सामान्य लोक शिकतात. ऐतिहासिक चौकशीच्या प्रकाराबद्दल लोकांशी संवाद साधण्याची ही संधी आहे. समाज किंवा आदिवासी गट किंवा उपेक्षित विभाग यांच्या एकत्रित स्मृती मौखिक इतिहासकारांनी त्यांचे प्रथा, शिष्टाचार, विधी आणि सामान्य अनुभव प्रकाशात आणण्यासाठी अथवा करण्यासाठी नोंदवल्या जाऊ शकतात. येथे, पुरुष किंवा स्त्रिया किंवा आदिवासी किंवा स्थलांतरितांचा विशिष्ट गट त्यांचे सामान्य अनुभव सार्वजनिक करू शकतात. कोणतीही अतिशयोक्ती किंवा अनुमानानुसार अथवा अतिअंदाजीत असल्यास त्या समुहा अथवा गटांकडूनच दुरुस्त होण्याची शक्यता आहे. समुदायाची स्मरणशक्ती किंवा सामूहिक स्मरणशक्ती निश्चित करण्यासाठी एकत्रित मुलाखतीचा किंवा समुदायाचा मुलाखत घेण्याचा दृष्टीकोन म्हणजे एखाद्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत त्यांच्या अनुभवांशी संबंधित असलेल्या एखाद्या समुदायाचा किंवा आदिवासींच्या मौखिक इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी योग्य पद्धत आहे. मौखिक इतिहासाद्वारे, भूतकाळाच्या तथ्यांचे संपूर्ण विश्लेषण करण्यासाठी, संस्कृतीचे मौखिक रूप आणि ज्ञान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो, अनेक अर्थाने मौखिक इतिहास अनेक समाजांच्या भूतकाळच्या पुनर्रचनेत अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो.

**७) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन :**

भारतीय मौखिक साहित्य आणि साधनांचा शोध घ्यायला इंग्रजानी सुरुवात केली. इंग्रजांनी वसाहतींवादासंबंधी जे धोरण स्वीकारले होते त्यानुसार ज्या ठिकाणी राज्य करावयाचे तेथील लोक, लोकजीवन, भूतकाळ, वाङ्मय, चालीरीती, प्रथा, परंपरा, आचार, विचार, समजूती यांचा बारकाईने अभ्यास करण्यास प्रारंभ केला,

त्यांच्या राजकीय धोरणाचा तो एक महत्त्वाचा भाग होता. येथील लोकसंस्कृतीचा परिचय करून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी येथील समाजजीवन, धर्मजीवन, सांस्कृतिक जीवन यांचे अवलोकन करण्यास सुरुवात केली.

मौखिक वाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास करण्यास सुरवात केली. विल्यम् जोन्स यांच्या प्रेरणेने आणि प्रयत्नाने 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संस्थेची कलकत्ता येथे सन १८७४ मध्ये स्थापना करण्यात आली. या संस्थेनेच प्रथम लोकसाहित्याच्या संशोधन आणि संकलनास सुरुवात केली. भारतातील इंग्रज अधिकारी आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक यांचे भारतीय लोकसंस्कृती विषयक कुतुहल जागे झाले आणि ते भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळले. कर्नल टॉड हे राजस्थानचे रेसिडेंट असताना राजस्थानी लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचा त्यांनी अभ्यास केला. राजस्थानी मौखिक वाङ्मयातील कथा-गीते आणि पोवाडे त्यांना मिळाले. सन १८२९ मध्ये कर्नल टॉड यांनी या अभ्यासाला प्रारंभ केला आणि 'एनल्स ॲण्ड एंटिक्विटिझ ऑफ राजस्थान' हा मौलिक ग्रंथ साकार केला. सन १८५४ मध्ये साली रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुखपत्रातून जे. एलट यांनी 'पंजाबची वीरगाथा' हा लेख लिहिला आणि पंजाबी लोकजीवनात प्रचलित असलेल्या पराक्रमाची गाथा शब्दरूप केली. प्रो. व्हीस डेव्हिड्स यांचे 'द बुद्धिस्ट स्टोरीज' हे देखील यातील उत्तम उदाहरण आहे.

मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज' (१८६८), चार्ल्स ग्रोवरने 'दक्षिण भारतातील लोकगीते' (१८७१), डॉल्टनचे 'डिस्क्रिप्टीव्ह एन्थोलॉजी ऑफ बंगाल' (१८७२), तारादत्त यांचे 'हिंदुस्थानातील पोवाडे आणि दंतकथा' (१८८२), लाल लालबिहारी डे यांनी लिहिलेले 'बंगालच्या लोककथा' (फोकटेल्स ऑफ बंगाल) (१८८३), सर रिचर्ड कारनॅक टेंपल यांचे 'पंजाबच्या लोककथा', (लीजंड ऑफ द पंजाब) (१८८४), इ. जे. रॉबिन्सन यांचे 'दक्षिण भारतातील लोकगीते व लोककथा' (१८८५), ग्रियर्सन यांनी लिहिलेला 'भोजपुरी गीते' (१८८६), कुक यांनी लिहिलेला 'पॉप्युलर रिलिजन ॲन्ड फोक लोअर ऑफ नॉर्दन इंडिया' (१८९६), थर्स्टन याचे 'ओमेन्स ॲण्ड सुपरस्टिशन्स ऑफ सदर्न इंडिया' आणि 'कास्टस् ॲण्ड ट्राइब्ज ऑफ सदर्न इंडिया' इत्यादी ग्रंथ भारतीय मौखिक आणि लोक साहित्याच्या दृष्टीकोणातून मौलिक स्वरूपाचे आहेत. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा जाणीवपूर्वक प्रयत्न वि. का. राजवाडे यांनी केला. १९२५ साली त्यांनी 'सज्जनगडावरील लोकगीत' आणि 'सूर्यनारायणची कहाणी व सूर्यव्रत' या शीर्षकाने 'आदित्य राणुबाईची कहाणी' हस्तलिखितवरून असे दोन लेख प्रकाशित केले. डी. डी. कोसंबी यांचे 'मिथ अँड रियलिटी' शं. गो. दाते यांनी 'लोककथा' (१९३०), दुर्गा भागवत यांनी 'सातपुड्यातील गोंड जमातीची लोकगीत' (१९५०), इत्यादी भारतीय अभ्यासकांनी या संबंधी महत्वपूर्ण काम केले आहे. याच बरोबर भारतीय हिन्दी लेखकांनी भारतीय मौखिक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ केला. डॉ. दिनेशचंद्र सेन, रायबहादूर शरचंद्रराय, रामन त्रिपाठी, देवेंद्र सत्यार्थी वगैरेंचा प्रामुख्याने उल्लेख होतो.

### ८) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधने :

#### अ) पोवाडे :

पोवाडा म्हणजे एखाद्या घटनेवर अथवा व्यक्तीवर आधारीत काव्य स्वरुपात आवेशयुक्त भाषेत निवेदन करणारे कवन. गायनाद्वारे मनोरंजनात्मकदृष्ट्या पोवाडा सादर करणाऱ्या व्यक्तीस 'शाहीर' असे म्हणतात. बहामनी राज्याच्या अमलापासून 'शाहीर' हे नाव अरबी-फारसी भाषेतून मराठीत रुढ झाले. पोवाडा हा विरांच्या पराक्रमाचे, विद्ववानांच्या, बुध्दिमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन अथवा स्तुती स्वरुपात असते. पोवाड्यामधील अनेक वर्णन ऐतिहासिक सत्याला धरून असल्यामुळे त्याचा एक मौखिक साधन म्हणून वापर केला जातो. बखरीपेक्षा पोवाड्यास वरचे स्थान असावे असे मत वि. का. राजवाडे यांनी व्यक्त कलेले आहे. पोवाड्याचे छत्तिसगडी पोवाडे, कच्छमधील भाट व वादी यांचे पोवाडे, सिंधचे पोवाडे, मराठी पोवाडे इत्यादी प्रांतिक भाषेनुसार प्रकार आढळतात. मराठी भाषेतील ३०० ऐतिहासिक पोवाडे उपलब्ध असून त्यापैकी शिवकालीन ०४, शाहूकालीन ०३, पेशवेकालीन १५० व उर्वरित इंग्रजी कालखंडातील आहेत. मराठ्यांच्या इतिहासावरील पोवाड्यांचे संकलन इत्यादी संपादन शाळीग्राम, य. न. केळकर यांनी केलेले आहे, दिनेशचंद्र सेन यांनी "Ballads of Eastern Begal Maimansingha' या ग्रंथात बंगाल प्रांतातील पोवड्यांचे संकलन आहे.

इतिहासाचे साधन म्हणून पोवाड्यांचा मर्यादीत प्रमाणात उपयोग होतो. राजकीय इतिहासापेक्षा तत्कालीन सांस्कृतिक जीवनांचे प्रतिबिंब पोवाड्यातून ठळकपणे उमटलेले दिसते. अफझल खानाचा वध, सिंहगडाची स्वारी, सवाई माधवरावाचा मृत्यु, संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, तुळाजी आंग्रे, संताजी-धनाजी, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे व पहिला बाजीराव यांच्यावरील पोवाडे उपलब्ध आहेत. पेशव्यांच्या काळात अनंत फंदी (१७४४-१८५३), शाहीर परशराम (१७५४-१८४४), रामजोशी (१७५८-१८१३), प्रभाकर (१७६९-१८४३), सगनभाऊ (१७७४-१८४०) व होनाजी बाळा इत्यादी प्रसिद्ध शाहीर होवून गेले. पोवाड्यांची परंपरा मौखिक पध्दतीने एका-पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असल्याने बऱ्याच वेळा मूळ पोवाड्यातील काही कडवी विसरली जाऊन त्या ठिकाणी दुसरी कडवी आलेली दिसतात. शिवाय पोवाडे हे मनोरंजनाचे साधन असल्याने त्यामध्ये रंजकता आणण्यासाठी अतिशयोक्ती, पाल्हाळ, दंतकथा, विभूतीपूजा ज्याच्यावर पोवाडा रचावयाचा आहे त्याच्या विषयी वाटणारा आदर किंवा आकस यामुळे पोवाड्यातून त्याचा विपर्यास झालेला दिसतो. तरी ही पोवाडे हे एक ऐतिहासिक साधन म्हणून महत्वाचे आहे .

#### ब) म्हणी आणि वाक्प्रचार :

लौकिक अर्थाने अनेक म्हणी व वाक्यप्रचार बोली भाषेच्या रुपाने व्यवहारात प्रचलित असतात. त्यापैकी काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक घटना व प्रसंगावर आधारित असतात. वाक्प्रचार आणि म्हणी हा मौखिक वाङ्मयाचा अमोल ठेवा आहे. कणभर शब्दात मणभर आशय प्रकट करणे हे या म्हणींचे वैशिष्टय आहे. भाषिक इतिहासाच्या दृष्टीने वाक्प्रचार आणि म्हणींचे महत्व आहे. वाक्प्रचार व म्हणी हा जीवनातील अनुभवांचा अर्क असतो. तो एक भाषिक, अल्पाक्षरी जीवनानुभव असतो. एखादा विशिष्ट प्रसंग लोकांच्या मनावर चांगलाच

परिणाम घडवून आणतो. हा प्रसंग जितका संस्मरणीय असेल, त्या प्रमाणात त्यावर आधारीत एखादी म्हण अथवा वाक्यप्रचार अस्तित्वात येतो व बराच काळ अस्तित्वात राहतो. ऐतिहासिक प्रसंगावरून किंवा पुरुषांच्या नावावरून तयार झालेल्या म्हणी पुढे काही शतके जनमानसावर प्रभाव टाकतात. म्हणीला भाषा संप्रदाय यांचे मर्यादीत स्थान असते. एखादी म्हण अथवा वाक्यप्रचार एखाद्या गावापूरता किंवा भौगोलिक प्रदेशापुरता मर्यादीत असतो. म्हणी साधारणतः दंतकथा, पुराणकथा किंवा विशिष्ट ऐतिहासिक प्रसंगावर आधारीत असतात. काही म्हणींचा अर्थ सरळ असतो तर काहींचा अर्थ विरोधी, उपरोधी अथवा निषेधी स्वरूपाचा असतो.

शिवकालीन प्रसंगावर आधारीत काही म्हणी आजही टिकून आहेत. उदा. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा', 'गड आला पण सिंह गेला', 'आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे', 'बचेंगे तो और भी लढेंगे' इत्यादी याशिवाय काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक दंतकथेवर आधारीत असतात, उदाः 'हा सुर्य हा जयद्रथ', 'सतीचे वाण' (ही म्हण/वाक्प्रचार दासकन्या सतीच्या दंतकथेवर आधारीत आहे.) म्हणीप्रमाणे काही वाक्प्रचारही ऐतिहासिक घटनेवर आधारित असतात. उदा. 'लष्कराच्या भाकरी भाजणे', 'तोफेच्या तोंडी देणे', 'सुळावर देणे', 'सुळावरची पोळी', 'हुतात्मा होणे', 'इतश्री होणे' इत्यादी स्वरुपाच्या म्हणी व वाक्प्रचारातून काही ऐतिहासिक प्रसंग तत्कालीन न्यायनिवाडा, सामाजिक, सांस्कृतिक, प्रथा परंपरांच्यावर प्रकाश टाकतात. वाक्प्रचार आणि म्हणींतून जातिव्यवस्थेवरही प्रकाश पडतो.

म्हणी व वाक्प्रचार यांचेही संकलन करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून 'ज्ञानसिंधू' छापखान्याने सन १८४२ मध्ये केला. म्हणीचा पहिला संग्रह 'कुडूकवही' (फुर्डक वही) या नावाचा काढला. सदाशिव विश्वनाथ यांनी 'सर्व देशांतील निवडक म्हणी' या नावाने चार हजारांवर म्हणींचा संग्रह सन १८५८ मध्ये प्रसिद्ध केला 'सर्व देशांतील' असे म्हटले असले तरी मुख्यत्वे इंग्रजी व मराठी म्हणींचा संग्रह हेच त्याचे स्वरूप आहे. गंगाधर गोविंद सापकर ह्यांनी १८७२ मध्ये 'मराठी प्रचारातील म्हणी' चा एक संग्रह प्रकाशित केला. रेव्हरंड ए. मॅनवॉरिंग यांच्या 'मराठी प्रोव्हर्भ' (Marathi Proverbs) या मराठी म्हणींच्या संग्रहातून येथील जनसामान्यांची विचारपद्धती व स्वभावधर्म यांवर चांगला प्रकाश पडतो. गुणवत्तेच्या दृष्टीने मॅनवॉरिंगचे हे काम अधिक वाखाणण्याजोगे आहे. यानंतर सन १९०० मध्ये म्हणींचा पहिला कोश गणेश नारायण देशपांडे यांनी तयार केला.

**क) लोकपरंपरा : (लोककथा/ दंतकथा आणि प्रथा परंपरा) :**

पारंपारिक सांस्कृतिक आशय असलेली व मौखिक परंपरेने जतन केली जाणारी कथा म्हणजे 'लोककथा' होय. समग्र लोक साहित्याप्रमाणे लोककथा ही सुध्दा समूहनिर्मित व समूहरहित असते. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ती संक्रमित होत असते व पिढ्यान पिढ्या जतन केली जाते. लोक कथा या प्रवाही व परिवर्तनशील असतात आणि भौगोलिक प्रदेशानुसार त्यांची रूपेही बदलतात. वि. का. राजवाडे यांनी पारंपारिक कथासाठी सर्वप्रथम 'लोककथा' हा शब्द वापरला. लोककथांना विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व पारंपारिक रूढी परंपरांचे आशय असतात. उदा. ब्रह्मकथा, पंचतंत्र, जातककथा, वेताळ पंचविशी इत्यादी. मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज' (१८६८), मध्ये काही पारंपारिक लोककथाचे संकलन केलेले आहे. तर रिर्चड टेंपल यांनी राजपूताना व पंजाबमधील पारंपारीक मौखिक लोककथा 'लीजण्ड्स ऑफ पंजाब' या

ग्रंथात संकलित केलेल्या आहेत दंतकथा ही संज्ञा स्थानिक अथवा ऐतिहासिक आख्यायिकांना वापरली जाते. इंग्रजीतील "Legend" या शब्दाला मराठीत 'दंतकथा' हा समानार्थी शब्द जातो. दंतकथा म्हणजे असंबध्द व पुष्कळदा विस्मृत इतिहास असे लोकसाहित्याचे विशारद मानतात. हे जरी खरे असले तरी दंतकथेत इतिहासाचा अगदी सुक्ष्म का असेना भाग अथवा धागा असतो. श्रीधरांनी लिहिलेल्या 'पांडवप्रताप' या ग्रंथात प्रथम 'दंतकथा' हा शब्द वापरला. श्रीधरांनी दंतकथा हा शब्द 'तोंडो-तोंडी' सांगितलेल्या गोष्टी ज्यांना पुराव्याचा लेखी आधार नाही या अर्थाने वापरलेला आहे. दंतकथेचा प्रभाव जनमानसावर कायम राहतो. दंतकथेमध्ये सत्य व कल्पित यांची अशी सरमिसळ केलेली असते की, वस्तूस्थिती त्यापेक्षा वेगळी असते.

राघोबा मोरोबा यांनी सन १८५५ मध्ये केलेले 'Tales of King Vikrama of Ujjain' प्राकृत भाषेतील हरिदास यांच्या पुस्तकाचे इंग्रजीत केलेले भाषांतर हे मराठी माणसाने केलेले गोष्टींचे पहिले संकलन असले तरी, भारतातील मौखिक कथांच्या मौखिकता आणि लोकसाहित्य संकलनाचा पाया मेरी फ्रिअर हिने घातला. सन १८६८ मध्ये तिने 'ओल्ड डेक्कन डेज' या आपल्या पुस्तकास भारतातील कथांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे संकलन केले. त्यातून महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक दंतकथा आणि काही लोककथा हाती लागतात.

सेतूमाधवराव पगडी यांनी अशाच दंतकथेवर आधारीत 'इतिहास व कल्पित' हा ग्रंथ लिहिलेला आहे. ना. गो. चापेकरांनी 'बदलापूर' या पुस्तकामध्ये चंद्रहासाची कातोडी दंतकथा संकलित केलेली आहे. त्र्य. श. शेजवलकरांनी वि. ग. भिडे यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मोत्याच्या कणिसाची दंतकथा दिलेली आहे. भटक्या यहुद्याच्या मीडसच्या दंतकथेच्या धर्तीवर श्री शं. ग. दाते यांनी 'लोककथा व लोकगीते' या ग्रंथात 'राजा धिंग माया शिंग' ही दंतकथा संकलित केलेली आहे. याशिवाय राजपूतान्यामधील 'खेमरोजी आभलदे' राजा हुण व त्याची पत्नी पिंगला यांच्यावरील 'पिंगलेची कथा' इत्यादी प्रसिध्द ऐतिहासिक दंतकथा आहेत. दंतकथेचा उगम वस्तूस्थितीत असला तरी त्या वस्तूस्थितीला अधिक उठाव किंवा रंजकता यावी म्हणून त्या घटना अथवा व्यक्तीला दैवत्व किंवा देवतास्वरुप देण्याचा प्रयत्न केलेला असतो असे सरोजिनी बाबर यांचे मत आहे. दंतकथेच्या आधारे इतिहासलेखन करताना अधिक खबरदारी घेतली जाते. जरी दंतकथेतून काही ऐतिहासिक घटनांचा बोध होत असला तरी दंतकथा या विर्पस्त असतात. प्रत्येक भाग, जिल्हा, तालुका व त्या तालुक्यातील गावा-गावात अशा काही दंतकथा प्रचलित असतात, की त्यांचा संदर्भ काही ऐतिहासिक घटनेशी असतो. बऱ्याच दंतकथा वंशपरंपरेने चालत आलेल्या असतात. अशा दंतकथांचा शोध घेवून त्यांचा ऐतिहासिक अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास नवीन इतिहास समोर येण्याची शक्यता असते.

आर्थर क्रॉफर्डचे 'लीजंडस् ऑफ कोकण' (१९०९) हे पुस्तक दंतकथांचा सुरेख संग्रह आहे. यात अगदी जुन्या पुराणकथा व शिवाजीच्या, पेशव्यांच्या व इंग्रजांच्या सत्तेच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या नव्या दंतकथा यांचे गमतीदार मिश्रण आहे. भाषाविज्ञान, लोकसाहित्य व सामाजिक इतिहास या दृष्टींनी या संग्रहाचे महत्त्व विशेष आहे. जेम्स कॅम्पबेलचे 'स्पिरीट बेसिस ऑफ बेलीफ अँड कस्टम' (१८८५) हे पुस्तक 'इंडियन अँटिक्वरी' मधून क्रमशः टिपणांच्या स्वरूपात पहिल्यांदा प्रसिद्ध झाले. कॅम्पबेलचे हे काम म्हणजे तत्कालीन उच्चवर्णीय व कनिष्ठवर्णीय हिंदू प्रजेच्या मनात खोलवर रुजलेल्या समजुतींचा शोध आणि विश्लेषण आहे. कॅम्पबेलने

हिंदूमधील प्रथाप्रघातांचे निरीक्षण करताना विशेषतः जन्म, विवाह, स्त्रीत्व, गरोदरपण, अंत्यसंस्कार यांवर विशेष भर दिला आहे.

बी. ए. गुप्ते यांनी लिहिलेले 'हिंदू हॉलिडेज अँड सेरेमोनीज, विथ डेजरटेशन ऑन ओरिजन, फोल्क्लोरे अँड सिंबोल' (१९१०) 'Hindu Holidays and Ceremonies, with dissertations on origin, folklore and symbols' हे पुस्तक महाराष्ट्रातील हिंदू जातीजमातीत त्या काळी प्रचलित असणाऱ्या व्रतवैकल्यांची, उपवास तापासांची, सण उत्सवांची माहिती आहे. या अनुषंगाने लेखकाने अनेक कहाण्यांचे भाषांतर केले आहे. श्रावणी रविवार, आजेपाडवा, चैत्रगौरी, चंपाषष्ठी आणि आदित्यराणुबाईची कहाणी, खंडोबा आणि बनाईची कहाणी, गोपद्माची कहाणी व गोपाद्मपूजा, महालक्ष्मीची कथा आणि महालक्ष्मीचे व्रत, सोमवाराचे व्रत, नागपंचमीचे व्रत व नागपंचमीची कथा यांसारख्या अनेक तपशिलांनी युक्त असणारे हे पुस्तक सांस्कृतिकदृष्ट्या मौल्यवान माहिती पुरविते. ए. एम. टी. जॅक्सन आणि आर. ई. एन्थोवेन यांच्या Folklore of konkan (1915) for Folk-Lore of Bombay (1924) निर्देश येथेच करावयास हवा. जॅक्सनचा नाशिकला वध झाल्यावर लोकसाहित्याच्या संकलनाच्या कामाची जबाबदारी एन्थोवेन यांच्यावर येऊन पडली. जॅक्सन यांची टाचणे (Folklore notes on the Konkan and Gujarat) एन्थोवेन यांनी इंडियन अँटिक्वेरीत दोन लेखांत प्रसिद्ध केली.

सी. ए. किंकेड यांचे "Deccan Nursery Tales" (१९१४) हे पुस्तक पुराणातील, मध्ययुगीन व स्थानिक स्वरूपाच्या अनेक गोष्टींचा संग्रह आहे. मुलांना आकर्षक वाटतील अशा गोष्टींच्या या संग्रहातील कथानिवेदन व शैलीही वेधक आहे. रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार आणि गुरुवार, शुक्रवार, शनिवार अशा वारांच्या गोष्टी, महालक्ष्मी व दोन राण्या, बेटावरील राजवाडा, नागोबा-सापांचा राजा, सोनेरी मंदिर यांसारख्या एकंदर सतरा गोष्टी येथे आहेत.

**ड) लोकगीते :**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या अनेक विविध गीतप्रकारांचा समावेश 'लोकगीते' या संज्ञेत होतो. पारंपारिक गीतांना लोकगीते हा शब्द प्रयोग सर्व प्रथम वि. का. राजवाडे यानी वापरला. प्राचीन काळापासून प्रचलित असलेला 'गाथा' प्रकार हा लोकगीताचाच प्रकार मानला जातो लोकगीताचाच एक प्रकार मानला जातो. लोकगीत अथवा लोकगाथा हा मौखिक परंपरेने चालत आलेला प्रदीर्घ कथनपर गीत काव्याचा प्रकार वि. का. राजवाडे यांनी 'सज्जनगडचे एक लोकगीत' 'Flock Song of Sajjangad' हा लेख लिहून लोकगीतातून आलेली ऐतिहासिकता अथवा इतिहासाचे अंग शोधण्याचा प्रयत्न केला. यानंतर लोकगीताच्या माध्यमातून सामाजिक इतिहासाचे संशोधन ठरण्याच्या उद्देशाने सन १९१५-२५ या काळात भारत इतिहास संशोधन मंडळाने वार्षिक माध्यमातून लोकगीतांचा संग्रह प्रसिध्द केला. यामध्ये वि. का. राजवाडे व श्री मुंडले यांनी धनगरांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील धनगरांच्या दोन मौखिक ओव्यांचा अभ्यास प्रा. ॲन फेल्डहाउस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे. ह्या ओव्याचे ध्वनिमुद्रण प्रसिद्ध जर्मन अभ्यासक गुंथर सोन्थामायर यांनी सन १९७० मध्ये केले होते. ओवी धनगर लोकांच्या बिरोबा आणि

धुळोबा ह्या देवांबद्दल आहेत. या ओव्यांचा सखोल अभ्यास करून धनगर लोकांचे जीवन अनुभव, सामाजिक चालीरीती, मूल्यं, संकल्पना, भौतिक परिस्थिती व मानसिकतेबद्दल महत्त्वाची आंतरदृष्टी मिळते. धनगरांचा भौगोलिक प्रदेश, त्यांची अर्थव्यवस्था, जात आधारित श्रम-विभागणी आणि त्यांचे राजकीय जीवन याचे संदर्भ कळतात. मौखिक साधनांचा अभ्यास करून प्रा. ॲन फेल्डहाउस यांनी धनगर समूहाचे जग आणि जीवन वाचकासमोर प्रकट केले आहे.

ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्रातील मुसलमान स्त्रियांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेमध्ये वासुदेव गीते, गोसावी गीते, इत्यादी संकलन केलेले आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेवर अथवा प्रसंगावर व व्यक्तिवर आधारीत भारतातील विविध प्रांतिक भाषेतील मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते आजही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या लोकगीतातून तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, रुढी, परंपरा इत्यादी संबंधी माहिती मिळण्यास मदत होते. लोकगीतामधून प्रतिविधीत झालेला इतिहास खरा असेलच असे ठाम सांगता येत नाही यामध्ये काही प्रमाणात विपर्यस्त माहिती येण्याची शक्यता असते.

**ड) मौखिक परंपरेचे धोके :**

युरोपमधील बऱ्याच पत्रकारांनी आणि इतिहासकारांनी समकालीन इतिहासलेखनात साहित्य म्हणून अशी अनेक पुस्तके दिली आहेत ज्यामुळे आपल्याला इतिहास पुन्हा समजण्यास भाग पाडले आहे. इतिहासाची मौखिक परंपरा दीर्घकाळ टिकणारी आहे, परंतु ती कधीतरी नोंदविली जाणे देखील आवश्यक आहे. अशा स्रोतांचा धोका देखील कमी नाही, कारण बऱ्याच वेळा लोक आपल्या समुदायाचा अभिमान बाळगण्यास अतिशयोक्तीही करतात. पण त्यात सत्याचा काही अंश नक्कीच असतो. हा तुकड्याची चाळण करून तो समोर आणण्याची जबाबदारी इतिहासकारांची आहे.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

१) ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे ............ इतिहास होय.

२) ............ इतिहास हे एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विधानांची, अनुभवांची आणि आठवणींची एक पद्धतशीर संकलन आहे.

३) .......... मध्ये डॅलन नेवील व पॉल थॉमसन यांनी मौखिक इतिहासाचा वापर सुरू केला.

४) 'द वॉइस ऑफ द पास्ट-ओरल हिस्ट्री' हे पुस्तक ............ यांनी लिहिले आहे.

५) पोल थॉम्पसनने यांनी ............ च्या माध्यमातून मौखिक इतिहासाला प्रोत्साहन देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

६) 'रेकॉर्डिंग ओरल हिस्ट्री' हा ग्रंथ ............ यांनी लिहिला आहे.

७) ओल्ड डेक्कन डेज हे पुस्तक ............ यांनी लिहिले आहे.

८) पेशव्यांच्या काळात ............ हे प्रसिद्ध शाहीर होते.

९) ............ यांनी १८७२ मध्ये मराठी प्रचारातील म्हणीचा एक संग्रह प्रकाशित केला.

१०) लीजंडस् ऑफ कोकण हे पुस्तक ............ यांनी लिहिले आहे.

## १.२.३ स्थानिक इतिहासाची साधने (सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली) :

प्रस्तुत उपघटकामध्ये आपण स्थानिक इतिहासलेखनासाठी सहाय्याभूत असलेल्यात सर्वेक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली या पद्धतीची तोंड ओळख करून घेणार आहोत. या तिन्ही पद्धती मधून साधन अथवा पुरावा कसा जमा करतात याची चर्चा केलेली आहे. याशिवाय त्याची उपयुक्तता आणि मर्यादा काय आहे हे जाणून घेणार आहोत.

**अ) सर्वेक्षण पद्धत :**

**१) सर्वेक्षण पद्धतीची संकल्पना :**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखनाचे महत्वाचे माध्यम म्हणून सर्वेक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वेक्षण म्हणजेच चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण, अथवा एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधीची चिकित्सक पाहणी करणे व तत्संबंधी सर्व त-हेची विस्तृत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण अशी सर्वसाधारण व्याख्या केली जाते. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जावू शकतो. उदा. प्राचीन, मध्ययुगीन शिल्पस्थापत्य, शिलालेख, पुरातत्वीय स्थळे, मंदिरे इत्यादीसंबंधीच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरावी लागते. सर्वेक्षण पद्धतीनुसार प्राप्त अवशेषांची सविस्तर माहिती नोंदवून त्या अवशेषांची व्याप्ती, भौगोलिक विस्तार, सीमा लक्षात घ्यावी लागते. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी स्थानिक किंवा समकालीन इतिहास लेखनासाठी सर्वेक्षण पद्धती उपयोगी ठरते. सर्वेक्षण पद्धतीला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणून देखील ओळखली जाते. एका विशिष्ट भू-भागावर अथवा भौगोलिक ठिकाणी राहणाऱ्या विशिष्ट व्यक्तीसमूह अथवा जाती, धर्म, पंथ समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची विस्तृत माहिती सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातून प्राप्त करू शकतो. सामाजिक सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते. सर्वेक्षणातून माहिती संकलित करून विश्लेषण केल्यानंतर विशिष्ट निवडलेली समस्या अथवा प्रश्नासंबंधी निश्चित स्वरूपाची मांडणी करता येते.

**२) सर्वेक्षण पद्धतीची पार्श्वभूमी :**

सर्वेक्षण पद्धती प्राचीन कालखंडापासून वापरत असल्याच्या नोंदी मिळतात. इ. स. पू. ३०० मध्ये हिरोडोटसने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता. ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये काही सामाजिक प्रश्नांसाठी पाहणी हाती घेतल्याची नोंद आहे. सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व

वेल्समध्ये जॉन हॉवर्ड यांनी तुरुंगाची पाहणी करून केली. कैद्यांची स्थिती व त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ते स्वतः तुरुंगात कैद्यांसमवेत राहिले होते. अमेरिकेमधील जेकोब राईस यांने सन १८९० मध्ये झोपडपट्टीमधील लोकांचे आर्थिक जीवनमान पाहण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते. त्यानंतर सन १९०९ मध्ये पॉल केलांगने सर्वेक्षण केले, आधुनिक समाजावरील आधुनिकीकरणाचे व नागरीकरणाचे परिणाम हा त्यांचा अभ्यासविषय होता.

भारतामध्ये सामाजिक सर्वेक्षणाची सुरुवात प्राचीन कालापासून झाली असल्याचे विविध उल्लेख सापडतात. कौटिल्याकृत अर्थशास्त्र आणि अकबराच्या 'ऐन-ई-अकबरी' मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजीने आर्थिक धोरण पाहणीवरून ठरविले होते. शेरशहाने जमिनी विषयक पाहणी करून आपले करविषयक धोरण निश्चित केलेले होते असे दिसते. मात्र, भारतासारखा प्रचंड आकाराचा देश, सर्वेक्षणासाठी होणारा प्रचंड खर्च, लोकांमध्ये संशोधनासंबंधीची उदासीनता, बहुसंख्यांचे खेड्यातील वास्तव्य आणि भाषेची विविधता यामुळे अपेक्षित यश मिळू शकलेले नाही.

### ३) सर्वेक्षणाची व्याप्ती :

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गाव, शहर, कुटुंब, कुल, जात, जमात, वर्ग, समूह अशा कोणत्याही घटकासंबंधी अथवा लोकांची अगर संशोधन संबंधी प्रश्नाशी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करण्याचे सर्वेक्षण हे महत्वाचे माध्यम आहे. लोकांची सामाजिक परिस्थिती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यापुढील प्रश्न, त्यांच्यातील होत असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, दिशा व गती इत्यादी बाबींची तपशीलवार आणि विस्तृत माहिती सर्वेक्षणाने घेता येते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी विषयाशी निगडीत संशोधन स्थानिक किंवा समकालीन परिप्रेक्षातून करता येते. कोणत्याही भागातील समाजाच्या जीवनासंबंधी सविस्तर माहिती मिळतेच पण त्या समाजापुढचे प्रश्न समजतात व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी उपाय-योजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणाने शक्य होते.

### ४) सर्वेक्षणाचे प्रकार :

सर्वेक्षणाची उद्दिष्टे ज्याप्रकारे वेगवेगळी असतात त्याप्रमाणे माहिती प्राप्त करण्याचे मार्ग आणि पद्धती व तंत्रे यामध्येही विविधता आढळते. यावरून सर्वेक्षणाचे प्रकार पाडता येतात. सर्वसामान्य व विशिष्ट सर्वेक्षण, नियमित व नैमित्तिक सर्वेक्षण, प्रारंभिक व अंतिम सर्वेक्षण, वैश्विक व नमूना सर्वेक्षण इत्यादीचा यामध्ये समावेश होतो.

### ५) सर्वेक्षण आणि प्रश्नावली :

सर्वेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला जातो. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाला हवी असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करता येते. वृत्तपत्रामधील बातम्या, सरकारकडून जाहीर केली जाणारी माहिती, शासकीय योजना, राजकीय नेत्यांच्या मुलाखती इ. माहिती सर्वेक्षणातून ताडून पाहता येते. एखाद्या घटनेबद्दल जनसामान्यांचे मत समजावून घ्यावयाचे असेल तर ही सर्वात चांगली पद्धत आहे. सर्वेक्षणासाठी वापरली जाणारी प्रश्नावली साधी सोपी व सुटसुटीत असावी. अशा

प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध नसावेत व प्रश्नावली परिपूर्ण असावी. त्यामुळे मिळणारी माहिती परिपूर्ण व उपयुक्त मिळते.

**६) सर्वेक्षण करताना कोणती खबरदारी घ्यावी :**

सर्वेक्षण करताना काही मूलभूत स्वरूपाची खबरदारी संशोधकाने घेणे जरूरी असते. सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली जास्तीत जास्त अचूक आणि परिपूर्ण असावी. संशोधकास जी माहिती हवी आहे त्याची मांडणी स्पष्ट शब्दात केलेली असावी, संदिग्ध प्रश्न विचारू नयेत. सर्वेक्षणामधील मुद्दे सोपे, स्पष्ट आणि सुटसुटीत असावेत. सर्वेक्षणातून प्राप्त माहिती हा पूरावा असल्याने त्याच्या नोंदी घाईगडबडीने न करता त्या अचूक व निर्दोष करव्यात. सर्वेक्षणामधून प्राप्त महितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे गरजेचे असते. चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा दुसरा टप्पा असून प्राप्त माहिती विश्वासार्ह आहे का? नवीन माहिती मिळते का? अथवा नव्या पैलूवर प्रकाश पडतो का? या दृष्टीकोनातून विचार करणे गजेचे असते. बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे असणे गजचे आहे.

**७) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा :**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे सर्वेक्षण हे प्रभावी साधन असले तरी त्याच्या काही मर्यादा अथवा उणिवा आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे. सरकारी, निम सरकारी, व्यावसायिक आणि वैयक्तीक पातळीवर केले जाते. संशोधकाने संशोधनासाठी इतरांनी सर्वेक्षण करून गोळा केलेल्या माहितीवर आधारीत स्वत:चे निष्कर्ष काढावयाचे असतील तर, कोणाचे सर्वेक्षण निश्चित करायचे आणि त्याचे निष्कर्ष कसे घ्यायचे हे जिकरीचे आहे. संशोधक ज्या तंत्र पद्धतीचा उपयोग करीत आहे याचा संशोधकाने विचार केला पाहिजे. मुळात सर्वेक्षण ही खर्चीक बाब आहे. याला वेळ आणि पैसा अधिक लागतो. सर्वेक्षणातून मिळालेली तथ्ये एकसारखी असतीलच असे नाही. मिळालेल्या तथ्य संकलनाची विश्वसनीयता सांगता येत नाही. विशिष्ठ लोकसमुदायचा एका विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास करणे कठीण असते, कारण यासाठी निवडलेले नमुने एकसारखे, समान आणि खात्रीशीर माहिती प्रदान करतील याची शक्यता नसते.

**ब) मुलाखत पद्धत :**

स्थानिक व समकालन इतिहासलेखन लेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून मुलाखत पद्धत वापरली जाते. मुलाखत पद्धतीत इतिहासकार एक अथवा अनेक व्यक्तींची मुलाखत घेवू शकतो. प्राप्त मुलाखतींचा उपयोग इतिहास संशोधक अथवा इतिहासकार साधन म्हणून करतो. मुलाखत घेण्यापूर्वी संशोधक संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्यांची मुलाखत घ्यायची आहे त्या व्यक्तींची विविध निकषांवर मुलाखतीसाठी निवड करतो. यासाठी मुलाखतीच्या उद्दिष्टांचे स्वरूप व व्याप्तीची कल्पना संशोधकास असणे गरजेचे असते. प्रस्तुत उपघटकात आपण फक्त स्थानिक इतिहासलेखनात मुलाखतीचा उपयोग कशा प्रकारे केला जातो, त्याचे फायदे आणि मर्यादा काय आहेत याची चर्चा करणार आहोत. मुलाखत तंत्रा बाबत या प्रकरणातील शेवटच्या

उपघटकात चर्चा करुयात.

**१) स्थानिक इतिहासलेखन आणि मुलाखत :**

स्थानिक इतिहासलेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून मुलाखत पद्धतीचा वापर केला जातो. व्यक्तीगत अथवा सामूहिक पद्धतीने मुलाखत घेवून इतिहासकार त्याचा उपयोग समकालीन इतिहास लेखनासाठी देखील करू शकतो. स्वातंत्र्योत्तर भारतात एकाच काळात नागरी क्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, धवलक्रांती, लोकशाही सशक्तीकरण, राजकीय स्थरीकरण आणि अभिसरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. मात्र ह्या मूलभूत स्थित्यंतरांचा राष्ट्र, प्रदेश, जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक दृष्टीकोणातून इतिहास व विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून लिखाण करणे हे महत्त्वाचे आहे. स्वतंत्र भारतातील जातिव्यवस्थेवर साहित्यिक अथवा राजकीय उद्देशाने लिहीलेले शेकडो ग्रंथ पहावयास मिळतात, मात्र काही अपवाद वगळता स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील जातीव्यवस्थेचे विश्लेषण करणारा अथवा उत्क्रांती अभ्यासणारा इतिहास लिहीला गेला नाही. त्यासाठी समकालीन इतिहास लेखन गरजेचे आहे, आणि ते मौखिक (मुलाखत) साधनाच्या माध्यमातून सहज शक्य आहे.

स्थानिक इतिहास संशोधकाला पारंपारिक साधनांच्याबरोबर अपारंपारिक संदर्भ साधनाचा मोठ्या प्रमाणावर आपल्या लेखनासाठी वापर करून घेवू शकतो. विशेषत: मौखिक इतिहास, कारण स्थानिक इतिहासल लेखकाला फक्त लिखित पुराव्यावर भिस्त ठेवून चालत नाही, त्यासाठी मौखिक हा पर्याय राहतो. ज्या घटनांच्या, व्यक्तीच्या, समूहाचा इतिहास लिखित स्वरूपात मागे राहिलेला नाही किंवा जे घटक समूह शांतच राहिले. त्यांच्या इतिहासाची पुर्नप्राप्ती करण्याचे मौखिक साधन हे उत्तम आहे. मात्र मौखिक इतिहासाच्या मर्यादा व धोके लक्षात घेऊन त्याचा सावध उपयोग करणे गरजेचे ठरते. या संबंधी बॅलार्ड यांनी आपल्या 'न्यू मुमेंट्स इन द स्टडी अँड टिचिंग ऑफ हिस्ट्री' या ग्रंथात 'मौखिक इतिहास लेखनपद्धतीत मुलाखत अधिक तथ्यात्मक आणि विश्लेषणात्मक असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे एखाद्या घटनेचा किंवा परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. खरं तर त्यांच्या मुलाखतींचा उपयोग युद्ध, व्यवसाय, शेती, पत्रकारिता, लोकसमूहांचे स्थलांतर, कामगार, महिला, क्रीडा, संगीत, परोपकार, मानवाधिकार चळवळी, विज्ञान, साहित्य, नृत्य आणि परदेशी संबंध इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी केला जाऊ शकतो. भूतकाळातील मौल्यवान माहिती मौखिक साधनांच्या माध्यमातून पुन्हा जमा केली जावू शकते.

मौखिक अर्थात मुलाखत पद्धतीचा वापर स्थानिक इतिहासाचे संशोधन करण्याऱ्या संशोधकाने खुबीने आणि आंतरविद्याशाखीय दुवा वापरून करणे गरजेचे आहे. नूतन इतिहासाचे विषय उदाहरणार्थ सबाल्टर्न (वंचित) अथवा स्त्रीवादी इतिहासलेखनासाठी ऐतिहासिक साधने प्राप्त होणे अवघड आहे. इतिहासकार कोणतीही 'आवाज नसलेल्या' (Voiceless) तळागाळातील लोकांच्या किंवा सामान्य स्त्रियांचा इतिहास लिहू शकत नाही. अशा परिस्थितीत स्थानिक अथवा समकालीन इतिहासकारांनी ह्या लोकांच्या मौखिक इतिहासाच्या शास्त्रानुसार मुलाखती घेऊन त्या टंकलिखित करून त्यांचे एक साधन म्हणून वापर करणे व साधन तयार करणे

क्रमप्राप्त होते, असे केल्यास भविष्यकाळातील इतिहासकारांना एक मौलिक ऐतिहासिक साधन मिळण्याची शक्यता निर्माण होते. काही प्रातिनिधिक स्वरुपात घटनेत प्रत्यक्ष सहभागी, स्वत:च्या डोळ्यांनी एखादी घटना पहिली असल्यास, प्रवर्तक आणि वैचारिक मांडणी केलेल्या व्यक्तींची निवड महत्वाची असते. मात्र अशा व्यक्तींच्या अनुपस्थितीत, परंपरा, वारसा किंवा प्रथा कायम ठेवणाऱ्या समुदायाच्या स्मृतीची निश्चित मदत घेतली जावू शकते.

**२) स्थानिक इतिहासलेखनात मुलाखतीचे महत्व :**

नजीकच्या भूतकाळाचे अथवा समकालीन इतिहासाच्या संशोधनासाठी मुलाखत पद्धती उपयुक्त साधन आहे. बौद्धिक कसब व कौशल्य असलेला संशोधक मुलाखत दात्याकडून जास्तीत जास्त माहिती प्राप्त करू शकतो. प्राप्त माहिती कोणत्याही लिखित साधनातून मिळणे फारच दुर्मिळ असते. मुलाखतीच्या वेळी मिळालेली माहिती टिपणाच्या रुपात अथवा ध्वनीचित्र मुद्रणाद्वारे स्वरूपात जतन करून त्याचा उपयोग योग्य त्या ठिकाणी एक अथवा अनेक वेळा इतिहासाचा पुरावा म्हणून करू शकतो. मुलाखत पद्धतीमध्ये बरीच माहिती नव्याने मिळत असली हे जारी खरे असले तरी ही पद्धत केवळ नजीकच्या भूतकाळाच्या अथवा समकालीन इतिहासाच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरते. म्हणजे एका ठराविक काळापर्यन्त याचा उपयोग करता येतो. त्यापेक्षा मागील भूतकाळाच्या संशोधनासाठी या पद्धतीचा वापर करता येत नाही. मुलाखत दाता त्याच्या स्मृतीवर आधारित माहिती देत असल्याने प्राप्त माहिती सर्वथा अचूक किंवा चुकीची अथवा विश्वसनीय मानता येत नाही. कारण मुलाखत दात्याचे पूर्वग्रह असल्यास त्याने दिलेल्या माहितीतून ते व्यक्त होतात, प्राप्त माहितीची पडताळणी करणे आवश्यक ठरते. मुलाखत दात्याच्या पूर्वग्रहांची, निष्ठा, वैरभाव, वैचारिक व राजकीय भूमिका याची माहिती घेऊन त्या पृष्ठभूमीवर संशोधकाने प्राप्त माहितीची चिकित्सात्मक पद्धतीने अन्वयार्थ लावला पाहिजे. इतिहासाच्या संशोधनासाठी मुलाखत पद्धत ही अत्यंत उपयुक्त असली तरी त्याच्या काही अंगभूत मर्यादा आहेत. मात्र एक कुशल इतिहास संशोधक आपल्या चिकित्सात्मक विश्लेषणाने मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचा उपयोग योग्य पद्धतीने करू शकतो.

**ड) प्रश्नावली पद्धत :**

स्थानिक अथवा समकालीन संशोधनासाठी विशिष्ट समूह, वर्ग, गट अथवा विशिष्ट भौगोलिक मर्यादेमध्ये प्रश्नावलीचा उपयोग करून माहिती प्राप्त करता येते. संशोधन कामी माहिती संकलित करण्याची प्रश्नावली ही अप्रत्यक्ष पद्धत आहे. विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्या समस्येबाबत माहिती मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात. अथवा सर्वेक्षणाचा अर्थ कोणत्याही वस्तूंचे वा घटनांचे सूक्ष्म निरीक्षण व परीक्षण होय. कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करुन घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी सर्वेक्षणाचा आधार घ्यावा लागतो. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी निगडीत संशोधनाकामी प्रश्नावली पद्धत वापरुन माहितीचे संकलन केले जाते. स्थानिक आणि समकालीन इतिहासलेखनासाठी या पद्धतीचा प्रभावीपणे वापर

केला जातो. स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखन करीत असताना संशोधक विशिष्ट अभ्यास समूहाचे उत्तम निरीक्षण करू शकतो, मात्र केवळ निरीक्षणाने त्यांच्या वर्तमाना मागील प्रेरणा, भावना, श्रद्धा अथवा विचार, मते काय? व कोणत्या असतात? हे कळत नाही. व्यक्तीचे वर्तन पाहून संशोधक वस्तुस्थिती रेखाटू शकतो. मात्र त्याचीपण वैयक्तिक मते, त्यामागील प्रेरणा अभ्यासण्यासाठी प्रत्यक्ष व्यक्तीशी संपर्क साधून, त्याला प्रश्न विचारूनच ती ही माहिती प्राप्त होवू शकते.

**१) लिखित प्रश्न व लिखित उत्तर :**

संशोधनविषयाची विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक लिखित प्रश्नांची यादी तयार करतो. प्रश्नांची स्वरूप, आखणी आणि क्रमवारी पद्धतशीरपणे केलेली असते. संशोधक अभ्यास विषयाशी संबंधित असणाऱ्या निवेदकांना लिखित प्रश्न संशोधक प्रत्यक्षपणे विचारू शकतो, किंवा जे निवेदक दूर असतात त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली पोस्टाद्वारे पाठवली जाते आणि त्यांच्याकडून लिखित प्रश्नांची लिखित उत्तरे प्राप्त केली जातात.

**२) प्रश्नावलीचे प्रकार :**

संशोधन विषयाच्या हेतुनुसार प्रश्नावलीचे अनेक प्रकार पाडतात. संशोधन विषयाचे स्वरूप, प्रश्नांचे स्वरूप, रचना इत्यादी घटकावर आधारित प्रश्नावलीचे अनेक प्रकार येतात मात्र प्रामुख्याने पुढील दोन प्रमुख प्रकारांचा समावेश होतो. अ) संरचित प्रश्नावली: (Structured Questionnaire), ब) असंरचित प्रश्नावली: (Unstructured Questionnaire).

**अ) संरचित प्रश्नावली :**

संशोधक या प्रकारात आपला विषय, हेतू, व्याप्ती आणि संशोधनाची खोली विचारात घेवून प्रश्न व प्रश्नांचा क्रम निश्चित करतो. सर्वसामान्यपणे प्रश्नावलीतील प्रश्न आणि त्याचा क्रम निश्चित झाल्यानंतर संशोधक पर्यायी उत्तरेही देतो व उत्तरदात्यास आपल्या पसंतीचे उत्तर निवडण्यास सांगतो. अशा प्रकारची प्रश्नावली छापून पोष्टाने किंवा मुलाखतकारा बरोबर पाठवितो याला बंदिस्त प्रश्नावली असे म्हणतात. ज्या प्रश्नांची पर्यायी उत्तरे दिलेली नसल्यास उत्तरदात्याकडून त्याच्या शब्दामध्ये उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते. त्याला मुक्त प्रश्नावली असे म्हणतात.

**ब) असंरचित प्रश्नावली :**

संशोधकाने संशोधनविषय निश्चित केलेला असला तरी संशोधनविषयाची संपूर्ण माहिती संशोधकाला असेलच असे नाही. यावेळी नेमके कोणते प्रश्न विचारावयाचे व त्यांची पर्यायी उत्तरे कोणती यासंबंधी संशोधकाच्या मनात शंका असते. साहजिकच संशोधन विषयासंबंधी काही स्थूल प्रश्न उभे करून लोकांची मते, प्रतिक्रिया, नवे दृष्टिकोण समजून घेण्यासाठी असंरचित प्रश्नावलीचा वापर केला जातो. या प्रश्नावलीमध्ये ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी असंरचित प्रश्नालीचा उपयोग केला जातो.

### ३) प्रश्नावली पद्धतीचे स्वरूप :

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रश्नांचा क्रम, लांबी, पर्यायी उत्तरे याबाबत स्पष्टता असणे गरजेचे असते. प्रश्नावलीचे स्वरूप संशोधन विषयाशी निगडीत ठेवले पाहिजे. प्रश्न छोटे, सोपे व सुटसुटीत असावेत. प्रश्न अचूक व काटेकोर शब्दात विचारावेत. प्रश्नाच्या अर्थाबाबत संधिग्ता असता कामा नये. कोणती शंका राहू नये. मुक्त प्रश्न मोजके व आवश्यक तेवढेच असावेत. योग्य उत्तराला बरोबर खूण करण्यास सांगावे. प्रश्नातून उत्तर सूचित होतील असे प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्यास उत्तर देताना आकडेमोड करावी लाग् नये. प्रश्नावलीमध्ये खाजगी प्रश्न विचारताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. गृहितकावर आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

### ४) प्रश्नावली पद्धतीची उपयुक्तता :

स्थानिक अथवा समकालीन इतिहास लेखानामध्ये साधने प्राप्त करताना अनेक अडचणी येतात. स्थानिक व समकालीन संशोधन विषयावर विपुल प्रमाणात साधने उपलब्ध असतील असे नाही, अशा वेळी संशोधक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधनाला पूरक पुरावे जमा करू शकतो. प्रश्नावली पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. विचारलेल्या प्रश्नातून उत्तरात कमी विसंगती येते. प्राप्त उत्तरांची तुलना आणि विश्लेषण करणे सोपे जाते. प्रश्नावलीतून संशोधन विषयाचा एक दस्ताऐवज तयार होतो. की जो पुढे तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त असतो. संशोधन विषयाशी निगडीत ऐतिहासिक साधन तयार होते.

### ५) प्रश्नावली पद्धतीची मर्यादा :

प्रश्नावलीचे जसे फायदे आहेत तसेच काही उणिवादेखील आहेत, जसे की प्रश्नावली भरून देणाऱ्याच्या स्वतंत्र विचारला आळा बसलेला असतो. कारण एका ठराविक मर्यादेमध्ये राहून उत्तरे द्यावी लागतात. त्यातूनही दिलेले उत्तर खरे असेलच असे नाही. प्रश्नावलीमधील प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्याची कुवत प्रश्नावली भरून देणाऱ्याकडे असावी लागते. त्याला प्रश्नाची उकल व्यवस्थित न झाल्यास चुकीची अथवा संधिग्ध उत्तरे प्राप्त होवू शकतात. अथवा उत्तरात उणीव राहण्याची शक्यता असते. प्रश्नावली  भरून विशिष्ट जाती समूह, धर्म समूह, वर्ग समूह समाजामध्ये रहात असल्याने तो पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता असते, यामध्ये वस्तूनिष्ठतेला बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रश्नावलीमध्ये प्रश्नावली भरून देणाऱ्याच्या उत्तरावर विश्वास ठेवावा लागतो, दिलेल्या उत्तराची पडताळणी शक्यत नसते.

**● स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) इ. स. पू. ३०० मध्ये ............. ने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता.

२) सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व वेल्समध्ये ............. यांनी तुरुंगाची पाहणी करून केली.

३) अकबराच्या काळातील ............ मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते.

४) स्थानिक इतिहासलेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून ............ पद्धतीचा वापर केला जातो.

५) 'न्यू मुमेंट्स इन द स्टडी अँड टिचिंग ऑफ हिस्ट्री' हा ग्रंथ ............ यांनी लिहिला आहे.

६) मौखिक इतिहास लेखनपद्धतीत ............ अधिक तथ्यात्मक आणि विश्लेषणात्मक असणे आवश्यक आहे.

७) कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करुन घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी ............ चा आधार घ्यावा लागतो.

८) प्रश्नावलीचे ............ प्रकार आहेत.

९) ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी ............ प्रश्नावलीचा उपयोग केला जातो.

१०) ............ आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी लागते.

## १.२.४ मुलाखत तंत्र : (Interview Technique) :

### १) मुलाखत तंत्र :

मुलाखत ही तथ्य संकलनाची अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा (दाता) यात प्रत्यक्ष समोरासमोरचा संवाद प्रस्थापित होतो. मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते. स्थानिक व समकालीन इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून मुलाखतीला विशेष महत्त्व आहे. सामाजिकशास्त्र संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखत पद्धतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्तीचा विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधकाला कोणती माहिती प्राप्त करावयाची आहे, मुलाखत कोणाची घ्यावयाची आहे, मुलाखतीचे स्वरूप कोणते असावे, किती लोकांच्या मुलाखती घेणे अपेक्षित आहे, याचा संशोधकाने विचार करणे गरजेचे असते.

### २) मुलाखत तंत्राची व्याख्या :

एखाद्या प्रश्नाबाबत माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने सहकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. अशी सर्व साधारण व्याख्या केली जात असली तरी समाजशास्त्रीय संशोधनातील माहिती संकलनाचे एक महत्वपूर्ण तंत्र असलेल्या या पद्धतीची अनेक संशोधकांनी/विचारवंतांनी व्याख्या केली आहे.

त्यापैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१) पॉलिन यंग :**

''मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनाचा अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर करित असतो.

**२) हॅंडर आणि लिंडमन :**

''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो .

वरील व्याख्यांवरुन मुलाखत म्हणजे संशोधक स्वत: निवेदकांना भेटून संशोधन विषयाशी संबंधित प्रश्न विचारतो व माहिती संकलीत करतो. मुलाखत हे माहिती संकलनाचे सोपे तंत्र आहे.

**३) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये :**

ब्लॅक आणि चॅंपीयन यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१) संशोधक व निवेदक (मुलाखत दाता) यांच्यात प्रत्यक्ष संवाद असतो.

२) संशोधक प्रत्यक्ष प्रश्न निवेदकाला विचारुन माहिती घेतो यातून संवाद होतो.

३) संशोधक व निवेदकाचे संबंध तात्पुरते असतात.

४) संशोधकाने प्रत्यक्ष संवाद साधल्याने संशोधन विषयाची सखोल माहिती प्राप्त होते.

५) तथ्यांचे सुव्यवस्थित संकलन प्राप्त होते.

६) अनावश्यक माहिती टाळता येते.

७) मुलाखतीचा मुख्य हेतू विश्वसनीय माहितीचे संकलन करणे हा असतो.

**४) मुलाखत तंत्राचे वर्गीकरण :**

मुलाखत तंत्राचा व्यापक उपयोग आणि वापर लक्षात घेता सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये विविध समाजशास्त्रज्ञांनी मुलाखतीचे खालील प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

**अ) लुंडबर्ग :** लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे तीन प्रकार सांगितलेले आहे, यामध्ये १) वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे, २) अभिवृत्ती निर्धारण व मापन करणे आणि ३) सामाजिक संघटन व संस्थांची माहिती करुन घेणारी इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**ब) पी. व्ही. यंग :** पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे चार प्रकार सांगीतलेले आहेत, यामध्ये १) संस्था सर्व्हेक्षण, २) निरीक्षण, ३) मूल्यांकन आणि ४) दस्तऐवज इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**५) मुलाखत तंत्राचे प्रकार :**

**अ) संरचित किंवा आकारीक मुलाखत :**

संरचित मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जात असल्याने संशोधकाचे काम सोपे होते.

प्रश्नांची यादी अगोदरच तयार केल्याने मुलाखतदात्याला प्रश्नांच्या बाहेर जाता येत नाही, म्हणून मुलाखतीला संरचित किंवा आकारीक मुलाखत असे म्हणतात. यामध्ये प्रश्नाबरोबर संभाव्य उत्तरेही त्यांना दिली जातात. प्रश्न व उत्तरांची यादी छापून घेतलेली असते. संशोधक मुलाखतदात्याला प्रश्न विचारून पर्यायी उत्तरापैकी कोणते उत्तर निवेदकास द्यावयाचे आहे ते विचारतो व उत्तरावर/उत्तरासमोर बरोबरची खूण करतो. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी संशोधक सहमत होत नसेल तर मुलाखतदात्याच्या उत्तराशी अधिकाधिक साम्य असणाऱ्या उत्तरासमोर तो वरील प्रमाणे खूण करतो. जर निवेदकास संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास ते उत्तर मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो.

**ब) असंरचित किंवा मुक्त मुलाखत :**

मुक्त मुलाखतीमध्ये संशोधक मुलाखतदात्यासमोर मुलाखतीचा विषय मांडतो. मुलाखतीमधील त्याचा हेतू स्पष्ट करून मुलाखतदात्याला मुक्तपणाने आपली मते मांडण्याची परवानगी देतो. संशोधकाने विषयाचा अभ्यास केला असल्याने कोणते प्रश्न विचारावयाचे याचा त्याने विचार केलेला असतो. संशोधक कोणताही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. प्रश्न व उत्तरे दोन्हीही पूर्वनियोजित नसल्यामुळे मुलाखतीचे स्वरूप अनिश्चित असते. मुलाखतदात्याला व काही प्रमाणात संशोधकाला मुक्त स्वातंत्र्य असते हे या मुलाखतीचे वैशिष्ट्य असते. मुलाखतीमध्ये मुलाखतदाता आणि संशोधक यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याने मुलाखतीमध्ये लवचिकता येते. मुलाखतदाता आपली मते स्पष्टपणे व स्वत:च्या शब्दात मांडू शकतो. संशोधकाकडे अधिक कौशल्य लागते.

**क) केंद्रित मुलाखत :**

केंद्रीत मुलाखत हा अनिर्देशित अथवा मुक्तमुलाखती प्रकार आहे. यामध्ये संशोधक मुलाखतदात्याच्या विशिष्ट अनुभवावर व त्याच्यावर झालेल्या परिणामावर आपले लक्ष केंद्रित करतो. अशा प्रकारच्या मुलाखती रेडिओ, टी. व्ही, चित्रपटामध्ये होतो.

**ड) पुनरावृत्ती किंवा फेरमुलाखत :**

एखाद्या घटनेबाबत व्यक्तीची मते कायमचीच राहतात असे नाही. त्या घटनेबाबतचा त्याचा दृष्टीकोनात अथवा विचार बदलत राहतात. अशा प्रकारच्या मुलाखती एखाद्या सामाजिक, मानसशास्त्रीय, आर्थिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत लोकांचे दृष्टीकोनात कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी होतो.

**इ) निदानोपचारात्मक मुलाखत :**

निदानोपचारात्मक मुलाखत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो. केंद्रित मुलाखतीप्रमाणेच यामध्ये विशिष्ट वर्तनाचा अथवा अनुभवाच्या प्रेरणा कोणत्या आहेत जाणून घेण्यासाठी होतो. मुलाखतीची पूर्व तयारी असते. मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे व कोणत्या क्रमाने हे संशोधक ठरवत असतो.

वरील मुलाखत प्रकाराशिवाय औपचारिक, अनौपचारिक, व्यक्तीगत, सामूहिक, गुणात्मक, परिणामात्मक, उपचारात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार मुलाखतीचे आहेत.

**६) मुलाखतीची पूर्व तयारी :**

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबवू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी मुलाखत देणाऱ्याला विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने मुलाखत देणाऱ्याच्या मनात स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखती दरम्यान अथवा नंतर मुलाखतीची टिपणे काढून ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो. मुलाखत घेणे हे एक तंत्र असून ते कौशल्याने हाताळावे लागते. मुलाखत घेताना जर चूक झाली तर मुलाखतीचा हेतू साध्य होत नाही. मुलाखतीमधून हवी असणारी माहिती प्राप्त न झाल्याने संशोधक निराश अथवा हताश होवू शकतो. मुलाखतीची पूर्वतयारी करणे आवश्यक असते. मुलाखतीची पूर्वतयारी करताना पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.

१. प्रथम मुलाखतदात्याची सर्व इत्यंभूत माहिती घेणे गरजेचे असते. यामध्ये नाव, टोपण नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक व राजकीय दर्जा, सांस्कृतिक पातळी इत्यादीचा समावेश होतो. वरील माहिती वरुन त्या व्यक्तीची माहिती पुरविण्याची बौद्धिक क्षमता याचा अंदाज येतो.

२. मुलाखत घेणारा व देणारा यांच्यामध्ये संवाद निर्माण झाला तरच मुलाखत यशस्वी होवू शकते, अन्यथा अपेक्षित माहिती प्राप्त होत नाही.

३. मुलाखतदात्याची मानसिकता, आवड-निवड, मते, विचार पद्धती याची माहिती जमा केल्यास संशोधकाला हवी ती माहिती प्राप्त करता येते, संवादामध्ये अडथळा येत नये.

५. संशोधकाने मुलाखतदात्याला स्वत:ची ओळख व मुलाखतीचा स्पष्ट हेतू सांगितला पाहिजे, त्यामुळे संशोधनाविषयी कोणतीही शंका न राहता संवाद मोकळेपणाने होतो.

**७) मुलाखत देणारी व्यक्ती :**

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, जवळच्या व्यक्ती, परिवारातील व्यक्ती, व्यवसायिक सहकारी आणि विरोधक इत्यादींच्या मुलाखती घेणे गरजेचे असते. संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तीशी थेट संबंध नसलेले, मात्र त्यांच्या संबंधीची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे

महत्वाचे ठरते. चरित्रनायकाचे सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

**८) मुलाखतीमधील प्रश्न :**

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. असे प्रश्न विचारल्यास मुलाखतदात्याचा गोंधळ उडत नाही. मुलाखतदात्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

**९) मुलाखतीमधील प्रश्नांचे स्वरूप :**

मुलाखतदात्याला आपला विषय कथन केल्यानंतर संबंधीत विषयावर बोलण्याची मुभा दिली जाते. संशोधकाला आवश्यकता वाटल्यास मुलाखतदात्याला काही प्रश्न विचारावे लागतात. योग्य उत्तरे प्राप्त करण्यासाठी खबरदारीने प्रश्न तयार करावे लागतात. प्रश्न सरळ, नि:संदिग्ध, मुद्देसुद व सुटसुटीत असल्यास उत्तरे देताना मुलाखतदात्याचा गोंधळ होणार नाही. प्रश्न मुद्देसूद असले की उत्तरेही मुद्देसूद मिळतात.

**१०) मुलाखतीचा उपयोग आणि मर्यादा :**

सामाजिक शास्त्र अथवा स्थानिक/समकालीन इतिहासलेखनामध्ये तथ्य संकलनाचे प्रभावी साधन म्हणून मुलाखत सर्वमान्य आहे. मुलाखत तंत्र हे मुलाखतदात्याकडून अभ्यासविषय अथवा समस्येविषयीची माहिती संकलित करण्याचे प्रत्यक्ष तंत्र आहे. आज सामाजिक संशोधनात मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, त्याची ज्या प्रकारे उपयुक्ततात आहे त्याप्रमाणे त्याच्या काही उणिवादेखील आहेत.

**अ) मुलाखत तंत्राच उपयोग :**

१) संशोधक व मुलाखतदाता यांच्यातील सुसंवाद हा पारंपारिक व प्रेरणात्मक स्वरुपाचा असल्याने मुलाखातीमधून मिळणारी माहिती यथार्थ व व्यापक स्वरुपाची असते.

२) मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद होत असल्याने सखोल संशोधनासंबंधी सखोल माहिती मिळते.

३) संशोधनासंबंधी असलेले प्रश्न ताठर स्वरुपाचे नसतात. त्यात लवचिकता असल्याने माहिती घेणे सोपे जाते.

४) समोरा समोर प्रश्न विचारत असताना मुलाखतदात्याच्या भावना जाणून घेता येतात.

५) माहितीची विश्वसनियता राहते.

६) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये औपचारिक संबंध असले तरी बोलण्याच्या ओघात

संशोधकाला इतर पूरक माहिती प्राप्त होते.

७) मुलाखतदात्या कडून प्राप्त माहिती संशोधक पडताळणी करू शकतो.

८) मुलाखतीमुळे पूर्वग्रह कमी होण्यास मदत होते.

**ब) मुलाखत तंत्राच्या मर्यादा :**

संशोधनासाठी मुलाखतीचे अनेक उपयोग असले तरी काही मर्यादासुद्धा आहेत, येतात त्या पुढीलप्रमाणे-

१) मुलाखत हे खर्चिक आणि वेळखावू स्वरुपाची पद्धती आहे.

२) पूर्वगृहयुक्त प्रतिक्रिया मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) मर्यादित क्षेत्रात तथ्य संकलन होते, संशोधकाला सहकार्य मिळवण्यात अडचणी येतात.

४) संशोधकाकडे प्रचंड सहनशीलता असणे आवश्यक असते.

५) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यातील आंतरक्रिया पूर्णपणे परस्पर विश्वासावर आवलंबून असते.

६) मुलाखत घेण्याचे वैयक्तीक कौशल्य सर्वांनीच आत्मसात केलेले असते असे नाही.

वरील मर्यादा गृहीत धरल्या तरी सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखत तंत्राचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. एक विश्वसनिय तंत्र म्हणून याकडे पाहिले जाते

**● स्वय अध्ययन प्रश्न क्र. ४ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) ............ शी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते.

२) ............ या संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो.

३) 'मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर करित असतो' ही व्याख्या ............ ची आहे.

४) ''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो ही व्याख्या ............ ची आहे.

५) ............ यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

६) मुलाखत तंत्रामध्ये संशोधक व निवेदकाचे संबंध ............ असतात.

७) लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे ............ प्रकार सांगितलेले आहे.

८) पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे ............ प्रकार सांगीतलेले आहेत.

९) ............ मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जातात.

१०) ............ मुलाखत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो.

## २.३ सारांश :

इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित आहे. मात्र इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोन आता मागे पडत आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहास लेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहाच्यामुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्या बरोबर इतिहासाची आंतरविद्याशाकीय मांडणी होवू पाहत आहे. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. त्याचबरोबर सध्यस्थितीत स्थानिक पातळीवरील दुर्लक्षित व वंचित घटकाचा सर्वांगीण अभ्यास होण्याची संधी नव संशोधकांना संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. स्थानिक इतिहासकारांनी मौखिक साधनांचा उपयोग लेखी साधनांनी देलेल्या माहितीची खात्री करण्यासाठी करावा आणि लेखी साधनांचा उपयोग मौखिक साधनांची विश्वासार्हता तपासण्यासाठी करावा. मौखिक साधनांचा वापर इतिहासकारांना लोकांच्या भावना आणि माणुसकी याबद्दलची जाणीव देतो. तत्कालीन लोकांच्या प्रेरणा, प्रवृत्ती, स्वप्ने समजून घ्यायची असतील तर आपल्याला त्यांच्या मुलाखती आणि मौखिक परंपरा समजून घेणे आवश्यक ठरते.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.

अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ ( सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)

सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे :

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ :**

१) ॲनाल्स परंपरा २) ॲनाल्स ३) प्रत्यक्षार्थ ४) स्थानीय इतिहास

५) इंग्लंड ६) मुंबईचे वर्णन ७) रोमिला थापर ८) डॉ. अवनिश सोवणी

९) मौखिक परंपरा १०) घोंगड्याचा

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ :**

१) मौखिक २) मौखिक ३) १९४८ ४) पॉल थॉमसन

५) ब्रिटीश ओरल हिस्ट्री सोसायटी ६) रीची डोनाल्ड ७) मेरी फ्रिअर

८) अनंत फंदी ९) गंगाधर गोविंद सापकर १०) आर्थर क्रॉफर्ड

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ :**

१) हिरोडोटस २) जॉन हॉवर्ड ३) ऐन-ई-अकबरी ४) मुलाखत

५) बॅलार्ड ६) मुलाखत ७) सर्वेक्षण ८) दोन

९) असंरचित १०) गृहितक

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. ४ :**

१) मुलाखतदात्या २) सामाजिकशास्त्र ३) पॉलिन यंग ४) हॅडर आणि लिंडमन

५) ब्लॅक आणि चॅंपीयन ६) तात्पुरते ७) तीन ८) चार

९) संरचित १०) निदानोपचारात्मक

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा:**

१) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना

२) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

३) मौखिक इतिहासाचे महत्व

४) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन

५) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

६) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.**

१) स्थानिक इतिहासलेखनाची सविस्तर चर्चा करा.

२) मौखिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धतीची चर्चा करा.

३) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधनांची माहिती द्या.

४) स्थानिक इतिहासलेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण पद्धतीची माहिती द्या.

५) स्थानिक इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्रश्नावली पद्धतीची माहिती द्या.

६) स्थानिक इतिहासलेखनाचे साधन म्हणून मुलाखत तंत्राची माहिती द्या.

## २.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके :


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५.

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे.

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) दिक्षित, राजा., इतिहास वाङःमय, संपादक जाधव, र. ग., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०

७) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२

८) ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

९) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

१०) पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

११) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.


❖❖❖

# घटक – ३

# संग्रहालयशास्त्र

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ वस्तूसंग्रहालयाची व्याख्या, स्वरूप व महत्त्व

३.२.२ वस्तूसंग्रहालयांचे प्रकार

३.२.३ वस्तूसंकलनाच्या पद्धती, जतन व संवर्धनाचे तंत्र

३.३ सारांश

३.४ पारिभाषिकशब्द – अर्थ

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीचे पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील घटकाची माहिती स्पष्ट करता येईल.

- संग्रहालयाची व्याख्या, स्वरूप आणि महत्त्व विशद करता येईल.
- संग्रहालयांचे विविध प्रकार सांगता येतील.
- वस्तूसंग्रहालयातील वस्तूंचे जतन व संवर्धन कशाप्रकारे केले जातेते सांगता येईल.
- ऐतिहासिक स्मारकांच्या जतनवसंवर्धनाच्या विविध पद्धती आणि कार्यप्रणाली समजून घेण्यास मदत होईल.
- चित्रकलाकृतीचे प्रकार व जतन-संवर्धनाच्या पद्धतीची कल्पना येईल.

## ३.१ प्रस्तावना :

मानवी जीवनामध्ये वस्तूसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनाच्या दृष्टीकोनातून अनन्य साधारण महत्त्व आहे. संग्रहालये ही दोन संस्कृतींना जोडून ठेवणारी व वर्तमानात दिशादर्शक म्हणून कार्यकरणारी संस्था आहे. संग्रहालये ही एकप्रकारची समाजाचा आरसा असतात. ज्यामध्ये मानवी जीवनसंस्कृतीच्या विविध अंगांचे प्रतिबिंब उमटलेले असते. मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने संग्रहालये ही भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी एक ज्योत आहे. इतिहास विषयक संकल्पना बदलून आधुनिक विज्ञान, माहिती, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घडला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न होत आहे. इतिहास लेखनासाठी इतर साह्यकारी ज्ञानशाखातील एक साह्यकारी ज्ञानशाखा म्हणून वस्तुसंग्रहालयांस ओळखले जाते. दुर्मिळ, मौल्यवान वस्तूंचा संग्रह, वस्तूंची नोंदणी, संरक्षण, संशोधन, प्रदर्शन व मनोरंजनातून लोकांची ज्ञान वृध्दी करणे इ. मुख्य कार्य वस्तूसंग्रहालय करत असल्यामुळे इतिहास विषयांच्या लेखनात त्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. २१ व्या शतकापासून वस्तूसंग्रहालय एक शास्त्र या स्वरूपात पुढे येत असून त्यास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. संग्रहालयातील दुर्मिळ, कलापूर्ण व मौल्यवान भौतिक वस्तू ह्या इतिहासलेखनाची अस्सल साधने पुरावे म्हणून महत्त्वपूर्ण मानली जातात. मानवाचे सामाजिक परिवर्तन होण्यास, सामाजिक ऐक्य वाढण्यास व राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी वस्तूसंग्रहालयांची मदत होत आली आहे. वस्तूसंग्रहालय ही संज्ञा व्यापक स्वरूपाची असून त्यामध्ये प्राचीन काळापासूनच्या सांस्कृतिक अवशेषांचे संग्रह, जतन, संवर्धन, संशोधन, प्रदर्शन, मनोरंजन, लोकशिक्षण देण्याचे कार्य अविरतपणे चालत असते.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ संग्रहालयाची व्याख्या, स्वरूप आणि महत्त्व :

#### अ) वस्तूसंग्रहालयाची व्याख्या :

दुर्मिळ, अमूल्य, कलापूर्ण, मौल्यवान, सांस्कृतिक मूल्य असणाऱ्या विविध वस्तूंचा संग्रह ज्याठिकाणी केलेला असतो त्या ठिकाणास सामान्यतः संग्रहालय असे संबोधले जाते. संग्रहालय हा दोन शब्दापासून बनला आहे. संग्रह + आलय = म्हणजेच संग्रह केलेल्या वस्तूंचे स्थान होय. मराठी शब्दकोशात 'प्राचीन दुर्मिळ वस्तूंचा संग्रह जेथे केला जातो, ते स्थान म्हणजे वस्तूसंग्रहालय होय' असा वस्तूसंग्रहालय शब्दाचा अर्थ दिला आहे, कौतुक भांडार, पुराण संग्रह, चिडियाघर, जादू घर इ. शब्दानी ओळखले जाणारे शब्द कालबाह्य झाले आहेत, वस्तूसंग्रहालय हा एक भारतीय देवनागरी शब्द असून विविध वस्तूचे संग्रह स्थळ म्हणून आधुनिक काळातील व्यवहारात वापरतात. वस्तूसंग्रहालयास इंग्रजी भाषेत 'म्युझियम' (Museum) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या म्युझियम (Museum) या शब्दाचे मूळ ग्रीक भाषेतील 'मोसियो' (Maseion) या शब्दामध्ये आढळून येते. ग्रीक मधील कला, साहित्य व विज्ञान विषयक मूसेस (Muses) एकत्रित रूपातील एकूण नऊ अधिष्ठात्री देव-देवतांचे प्रतिक म्हणून ओळखल्या जातात. कॅलियोप (Calliop) ही महाकाव्यांचे प्रतिक,

क्लियो (Clio) इतिहास, इयूर्टप (Euterp) काव्यसंगीत, थेलिया (Thalia), हास्य नाट्यवलोक गीत, मेल्योने (Melpomehe) दुःख, टर्पसिचाय, सामूहिक गायन व नृत्य, ईरटो – प्रेमगीत व आनंद हास्य, पोलिन्मिया – धार्मिक पवित्रता वस्तुतीगीत व युरेनिया ही अवकाश व ज्योतिष विद्याच्या प्रतिक म्हणून उपरोक्त नऊ अधिष्ठात्री देव–देवता होत्या. थोडक्यात उपरोक्त मुझेसच्या नऊ अधिष्टात्री देव–देवता ह्या विविध प्रकारांतील विविध लोककला, नृत्यकला, गायनकला, नाट्यकला, काव्य, संगीत, कलात्मक वस्तू, बुध्दिमत्ता व विज्ञान ज्ञान इत्यादी बाबींशी जोडण्यात येतो. थोडक्यात विविध विषयांचा विविध प्रकारातील कलात्मक, दुर्मिळ, मौल्यवान वस्तुंचा ज्या ठिकाणी एकत्रित ठेवल्या जातात त्या ठिकाणांस 'वस्तूसंग्रहालय' असे म्हटले जाते. वस्तूसंग्रहालयांच्या उगमस्थानाकडे पाहिले असता वस्तूसंग्रहालय हे शास्त्र आहे. यांची जाणीव वस्तूसंग्रहालयाच्या विषयक अनेक केलेल्या व्याख्या व त्याच्यामध्ये होत गेलेले बदलावरून दिसून येते, त्या पुढीलप्रमाणे :

**डॉ. जॉन्सन (इ. स. १८९०) :** 'मानवामध्ये ज्ञान व जिज्ञासा निर्माण करणाऱ्या वस्तूचे संग्रहस्थळ म्हणजे वस्तूसंग्रहालय होय.'

**बेईलीनाथन (इ. स. १८३७) :** 'वस्तूसंग्रहालय म्हणजे एक दृश्य अभ्यासाचे ग्रंथालय आहे.'

**सर आशुतोश मुखर्जी (इ. स. १९१४) :** वस्तूसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे की, 'जिच्यामध्ये वस्तूंचे संकलन करून सुरक्षित ठेवले जाते. ज्यांचा उपयोग जनसामान्यांना त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीविषयक ज्ञान, आनंद मिळवून देण्याच्या हेतूने केला जातो.'

**आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद (आयकॉम) (इ. स.१९५१) :** 'वस्तूसंग्रहालयांची संज्ञा अशा संस्थेस दिली जावू शकते, जिच्यामध्ये सांस्कृतिक व वैज्ञानिक कला वस्तूंचे संरक्षण करून मुख्यत: ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाच्या उद्देशाने वस्तूंचे प्रदर्शन केले जाते.' Any permanent institution which conservs and displays for study, Education and Enjoyment, collection of objects of cultures of scientific significance.

**एस.टी. सत्यमूर्ति (इ. स. १९६३) :** 'वस्तूसंग्रहालयांस आधुनिक युगामध्ये असे व्याख्यानित केले जावू शकते. ज्या निसर्गाचा आविष्कार व मानवी संरचनेची उत्तम पद्धतीने व्याख्या करते व ज्यांच्या उपयोग ज्ञान मिळविण्या बरोबरच मानवी सांस्कृतीच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी व सामान्य जनतेस संस्कारित करणाऱ्यांच्या हेतूने वस्तूचा संग्रह केला जावू शकतो.'

**ब) वस्तूसंग्रहालयाचे स्वरूप :**

वस्तूचा संग्रह करण्याची प्रवृत्ती अश्मयुगकाळापासून मानवात विकसीत झाली. अन्नाच्या शोधात असणारा मानव विविध प्राण्यांची शिकार करून अन्न मिळवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची दगडी हत्यारे जवळ बाळगत असे. मानवाची संग्रह करण्याची ही प्रथमावस्था होती. मानवास लाभलेली आंतरिक सौंदर्यात्मक नैसर्गिक मानसिक गुणांमुळे त्यास सुंदर, दुर्मिळ, मौल्यवान वस्तू व अवशेषाबद्दलच्या कुतूहलापोटी तो वस्तूंचा संग्रह करत आला आहे.

## १) प्राचीन कालखंड :

प्राचीन काळात इजिप्तमध्ये मंदिराच्या शेजारी आपल्या मनोरंजनासाठी पशुसंग्रहालये तयार केली. इ. स. पू. १४०० मध्ये इजिप्तची राजकन्या ह्यूने 'गार्डन ऑफ अक्लमेशन' नावाचे उद्यान तयार करून त्यामध्ये इजिप्तमध्ये न आढळणारे प्राणी आणून ठेवले. इ. स. पू. १२ व्या शतकात चीन मधील चौराज घराण्यातील चेन राजाने 'गार्डन ऑफ इंटेलिजन्स' नावाचे पशुसंग्रहालय निर्माण केले. इ. स. पू. तिसऱ्या शतकात ग्रीक मधील 'अथेन्स' या ठिकाणी प्राण्याच्या अध्ययन व संशोधनासाठी ॲरिस्टॉटल यांने प्राणीसंग्रहालय निर्माण केले. इ. स. पू. २८० मध्ये तत्कालीन शासनकर्ता टोलॉमीने 'अलेक्झाण्ड्रीया' याठिकाणा 'म्युसेस' (Muses) देवतेचे मंदिर बांधून म्युसेस देवताच्या प्रित्यर्थ एक विद्यापीठ व वस्तूसंग्रहालय स्थापन केले. या वस्तूसंग्रहालयात टोलॉमीने जगभरातील दुर्मिळ व मौल्यवान दुर्मिळ हस्तलिखिते, विलक्षण अखगोल, शल्ययंत्रे आणि जैविक वस्तू इत्यादी सुमारे चार लाख वस्तूसंग्रहीत करून त्यांचा अभ्यास संशोधनासाठी विविध विद्वानांना आमंत्रित केले.

## २) मध्ययुगीन कालखंड :

मध्ययुगीन (इ. स. ५ वे शतक ते इ. स. १५ व्या शतक) काळात युरोपमध्ये मानवी जीवनावरचे धर्माचे प्राबल्यवाढत गेले. धर्माच्या अनुषंगाने मंदिर बांधणी मोठ्या प्रमाणात वाढत गेली. राजे महाराजे ते सामान्य लोकांवरती असलेल्या धार्मिक प्राबल्यामुळे आपल्याकडील मौल्यवान व किंमती वस्तू मंदिरांना दान देऊ लागले. त्यामुळे युरोपखंडात धार्मिक मंदिरांनाच एकप्रकारे वस्तूसंग्रहालयाचे स्वरूप प्राप्त झाले. तत्कालीन राजकारण, सांस्कृतिक व धार्मिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या धर्मप्रमुख, धर्मप्रवर्तक, संत यांच्या मृत्युनंतर त्याच्या शवाचे (थडग्याचे) रूपांतर त्याचे कार्याचे स्मरण भावीकाळात कायमस्वरूपी रहावे म्हणून शव अवशेष संरक्षण स्थळास एकप्रकारे वस्तूसंग्रहालयाचे स्वरूप प्राप्त झाले. मध्ययुगातील राजे, सरदार, श्रीमंत व प्रतिष्ठित लोकांनी आपल्या स्वसंग्रही असणाऱ्या जुन्या मौल्यवान, दुर्मिळ, मौल्यवान कलापूर्ण वस्तूचा वापर आपली लोकप्रियता व महत्त्व वाढविण्यासाठी आपल्या संग्रहातील वस्तूचे प्रदर्शन भरवण्यास सुरूवात केली. मात्र हे प्रदर्शन समाजातील ठराविक लोकांनाच पाहण्यासाठी खुले असे. या कालखंडात वस्तूसंग्रहालये जरी अस्थित्वात आली नसली तरी ख्रिश्चन धर्मगुरूंनी कलाकृतींच्या द्वारा धार्मिक भावना जागृत होतात, त्यामुळे ज्ञान प्राप्त होते व प्रेरणा मिळते. त्यासाठी चर्चेसमध्ये विविध धार्मिक प्रसंगावरील, नीतीसंबंधीची चित्रे आणि कलाकुसर केलेली आढळते. त्याचबरोबर चर्चेस मधील भिंती, काचेच्या खिडक्या, तावदाने यावर धार्मिक कथांचे चित्रण केलेले दिसून येते. उदा. व्हेनिस येथील सेंट मार्क चर्चमध्ये तेथील भिंतीवर निति कथांचे चित्रण केलेले दिसून येते. त्यामुळे तत्कालीन काळात चर्चही केवळ प्रार्थनेची ठिकाणे न राहता ती धार्मिक व नितीमत्तेची शिक्षण देणारी ठिकाणे ठरली. तर काही चर्चमध्ये ख्रिस्ती धर्मगुरूंचे अवशेष, मृतांचे अवशेष अनेक पेट्यांच्यामधून प्रदर्शित केले आहेत.

१४, १५, १६ वे शतक हा विद्येच्या पुर्नरुजीवनाचा कालखंड होता. या कालखंडात इटलीमधील राजघराणी, सरदारवर्ग, श्रीमंत इत्यादीनी अनेक दुर्मिळ वस्तू आपल्या महालामधून, प्रासादामधून, दिवाणखान्यात

सर्वांना दिसतील अशा तऱ्हेने ठेवण्यास सुरूवात केली होती. आपापल्या घराण्यातील प्राचीन वस्तूंचा त्यांना अभिमान वाटत असे. यामध्ये प्रामुख्याने पुराण अवशेष, कलात्मक वस्तू, विविध भूसा भरलेले प्राणी, वनस्पतींचे नमुने इ. चा समावेश असे. अशा प्रकारचे प्रदर्शन करणारी इटली मधील फ्लॉरेन्स येथील Medical, माटुंगा येथील Gonzaga, फ्लोरा येथील Este, अर्बिनो येथील Mount इ. कुटुंबे आहेत. पुढील काळात वरील सर्व ठिकाणी वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. याच कालखंडामध्ये आपणास वॉशिंग्टन येथील नॅशनल गॅलरी तसेच न्यूयॉर्क शहरातील मेट्रालिटन म्युझियम ऑफ आर्ट उभारलेली दिसून येतात. ऑस्ट्रीया, रोम, फ्रान्स, कोपेन हेगेन, इंग्लंड, व्हीएन्ना इ. ठिकाणीही दुर्मिळ वस्तूंचे संग्रह उभारण्यात आले. नंतरच्या कालखंडात कलादालनाचा (आर्ट गॅलरी) चा उगम झालेला दिसून येतो. इटलीमध्ये अशा आर्ट गॅलरीमधून नक्षी कामाच्या कलात्मक वस्तू, पदके, ब्राँझ धातूच्या मूर्ती, कलावस्तू, चित्रे, नग्नमूर्ती, व्यक्तीचित्रे इ. चा समावेश असे. समकालीन अनेक राज्यकर्त्यांनी आपापल्या राजवाड्यामधून मोठमोठ्या भिंतीवर चित्रकारांच्याकडून चित्रे काढून ती रंगवून घेतली होती. येथूनच आर्ट गॅलरी ही संकल्पना उदयास आली. त्यामुळे अगोदरचे Museo Art Gallery ही सध्या वस्तूसंग्रहालयांची दोन पूर्वज म्हणता येईल.

**३) आधुनिक कालखंड :**

इ.स. १५ व्या शतकाच्या सुरुवातीस युरोपखंडात पुर्नरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली. त्यामुळे मानवी जीवनावरती असणारे धार्मिक प्राबल्य कमी होऊन विज्ञानवादी, बुध्दी प्रामाण्यवाद यांचे प्राबल्य वाढवण्यास सुरूवात झाली. या कालखंडापासून सांस्कृतिक व वैज्ञानमूल्य असणाऱ्या वस्तूप्रदर्शनासाठी संग्रह करण्यात वाढ होत जाऊन अनेक संस्थांचा विकास झाला. या कालखंडाबाबत क्लार्क स्क्रीनर यांनी असे म्हटले आहे की, या कालखंडात अशी परिस्थिती निर्माण झाली की, वाढते वैज्ञानिक ज्ञान व उत्कृष्ट कलात्मकता दर्शविणाऱ्या वस्तूबद्दल पुर्ननिर्माण प्रक्रिया सुरू होऊन प्राकृतिक कुतुहलजन्य वस्तूंच्या संग्रहासाठी नवीन संस्थांचा उगम झाला. इ. स. १६८२ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात स्कूल ऑफ नॅचरलहिस्ट्री आणि अद्भुत बहुमूल्य व आनंद देणाऱ्या कलाकृतीतून जगातील पहिले आधुनिक 'अश्मोलियनम्युझियम' या वस्तूसंग्रहालयाची निर्मिती झाली. सन १७२७ मध्ये C. F. Neickelius या लेखकाने म्युझिओग्राफिक (Museographic) हा ग्रंथ लिहीला. प्रदर्शन कसे मांडावित विषयावरील पहीली हस्तपुस्तिका म्हणून ओळखले जाते. ही पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक व्यक्तींचे लक्ष या विषयाकडे वळले. या दरम्यान इंग्लंड येथील हेन्स लोन यांनी स्वतःचा ब्लूम्सबरी येथील संग्रह राष्ट्राला अर्पण केला. इ. स. १७४१ मध्ये उप्लस विद्यापीठामध्ये खाणकाम, औद्योगिक उद्योगधंदे यासंबंधित वस्तू व वनस्पतीमधील रासायनिक प्रक्रिया संबंधित एक विभाग एकत्रित करून अप्लस बहुउद्देशीय संग्रहालय स्थापन झाले. इ. स. १७५३ मध्ये इंग्लंड मध्ये पहिले राष्ट्रीय संग्रहालय निर्माण केले गेले. सरकारने इ. स. १७५९ मध्ये कायदा करून हा संग्रह लोकांच्या अभ्यासासाठी खुला केला. त्यामुळे तो संग्रह ब्रिटिश म्युझियमचा पायाभूत संग्रह म्हणून ओळखला जातो. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर (१७८९) वस्तूसंग्रहालयाचे स्वरूप फारच बदलले.

अमेरिकेमध्ये इ. स. १७७३ मध्ये पहिले जनसंग्रहालय स्थापन झाले. फ्रान्समधील 'लावरेराज प्रसाद' यांस

इ. स. १७९३ मध्ये गणतंत्रिक संग्रहालय (Museum of Re-public) म्हणून घोषित केले गेले. इ. स. १८३० मध्ये बर्लिनमध्ये लोकसंग्रहालयाच्या संकल्पनेतून, सांस्कृतिक, कला, इतिहास व तंत्रज्ञान या दालनाच्या माध्यमातून 'एंटलस संग्रहालय' स्थापन झाले. इ.स. १८७७ च्या काळापर्यंत युरोपमध्ये वेगवेगळ्या स्वरूपाची सुमारे २०० वस्तूसंग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये उल्लेखनीय वस्तूसंग्रहालय म्हणून इंग्लंडमधील इ.स. १८५१ मध्ये स्थापन झालेले 'व्हिक्टोरियो अल्बर्टम्युझियम', अमेरिकेतील इ. स. १८७२ मध्ये स्थापन झालेले 'मेट्रोपालिंग्टन आर्टम्युझियम' व जपानमधील टोकियो येथे इ. स.१८७२ स्थापन झालेले 'नॅशनलम्युझियम' यांचा उल्लेख केला जातो. २० व्या शतकात सांस्कृतिक नवजागरण व ज्ञानप्राप्तीची मानवी इच्छामुळे वस्तूसंग्रहालय स्वरूपात बदल होऊन त्यांच्या संख्येत वाढ झाली. दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेत त्यांची संख्या २२०० पर्यंत गेली. इ. स. १९३० जर्मनमध्ये १५०० इतकी संख्या वस्तूसंग्रहालयांची झाली तर १९६२ पर्यंत इंग्लंडमध्ये त्यांची संख्या १००० पर्यंत पोहचली होती.

● **भारतातील वस्तूसंग्रहालयांचे स्वरूप :**

**१) प्राचीन कालखंड :**

भारतामध्ये प्राचीनकाळात संग्रहालय सदृश्य अशा काही संस्थाचे अस्तित्व असल्याचे दिसते. प्राचीन भारतीय वाङ्यामध्ये 'चित्रशाळा' विषयक उल्लेख मिळतात. याविषयी भवभूतीची उत्तर रामचरित, वाग्भट्ट अष्टांग संग्रह, श्रीहर्ष यांचे नैषंध चरित इ. ग्रंथात चित्रशाळा विषयक माहिती मिळते. गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या पवित्ररक्षा अस्थिवरती बुध्दगगया, अमरावती, भारहूत, सांची इत्यादी ठिकाणी स्तूपाची निर्मिती केली गेली. यांच स्तूपावरती अनेक मूर्ती, शिलालेख कोरले गेले. हिंदू बौध्द, जैनधर्मियांच्या मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्माविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. अशाप्रकारची प्राचीन काळातील वस्तूसंग्रहालय सदृश्य चित्रशाला, स्तूप, मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्मविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. इ. स. पू. ९ वे शतकातील तक्षशिला, इ. स. ५ वे शतकातील नालंदा, इ. स. ६ व्याशतकातील विक्रमशीला इ. विद्यापीठात धर्मगंज परिसर विकसित करून त्यामध्ये रत्नसागर, रत्नरंजित व रत्नोद्धती प्रकारातील भव्य स्वरूपाची ग्रंथालये निर्माण केली गेली होती.

**२) मध्ययुग कालखंड :**

सरदार, उमराव, श्रीमंत लोक, राजेरजवाडे यांना दुर्मिळ व शोभिवंत मौल्यवान, किंमती वस्तूंचा संग्रह करून त्यांचे प्रदर्शन भरवून स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी उपयोग करून घेतला. मुघल सम्राट अकबर, जहाँगीर तसेच सरदार मिर्झाराजे जयसिंह, सवाई प्रतापसिंह यांनी तत्कालीन उत्कृष्ट चित्रकाराकडून अनेक चित्रकृतीची निर्मिती करून घेतली. छत्रपती शाहूमहाराज यांनी सातारा येथे पशुपक्षीचा संग्रह केला. बाजीराव पेशवे, सवाई माधवराव पेशवे यांनी पुणे येथे विविध प्राण्यांचे संग्रहालय निर्माण केल्याचे उल्लेख प्राप्त होतात. अशाप्रकारची अवस्था ब्रिटिशाचे भारतात राज्य स्थापनेपूर्वीची वस्तूसंग्रहालयांची होती.

### ३) आधुनिक कालखंड :

ब्रिटिशांनी भारतामध्ये आपले साम्राज्य निर्माण करून राज्यकारभार करतानांच भारतातील कला वस्तूचा शोध घेवून त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली. सर विल्यम जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या पुढाकारातून संस्थासंग्रहातील भारतीय संस्कृती विषयक बहुमूल्य अशा कलापूर्ण, दुर्मिळ, वस्तूच्या माध्यमातून २ फेब्रुवारी १८१४ रोजी कलकत्ता येथे भारतातील पहिले 'भारतीय वस्तूसंग्रहालय' वस्तूसंग्रहालय स्थापन केले. या संग्रहालयाचा, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, कलासंस्कृती, उद्योग, शिल्पकला आदि विभागांचा विकास करून त्याचे बहुउद्देशीय स्वरूपाच्या संग्रहालयात रूपांतर केले. भारताचे व्हाईसरॉय जनरल लॉर्ड कॅनिंग यांच्या कारकिर्दीत इ. स. १८६१ साली भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था स्थापन झाली. यासंस्थेचे तत्कालीन संचालक सर अलेक्झांडर कनिंघहम यांनी भारतीय पुरातत्वीय स्थळांचा शोध व सर्वेक्षण करून अनेक ठिकाणी उत्खनन केले. या उत्खनानातून प्राप्त अवशेष वस्तूचे प्रदर्शन व स्तूसंग्रहालय स्थापन करून प्रदर्शित केल्या. यामध्ये मद्रास येथे व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्युट म्युझियम (१८८७), उदकमण्डल येथे शासकीय म्युझियम (१८८८), म्हैसूर येथे म्हैसूर राज्य संग्रहालय (१८६५), एर्नाकुलम येथे प्राणी विज्ञान व वनस्पतीशास्त्र संग्रहालय (१८४७), महना येथे घासीदास स्मारक संग्रहालय (१८७५), जयपूर येथे गर्व्हमेंट सेंट्रल म्युझियम (१८७६), कच्छ येथे कच्छ म्युझियम (१८८७) विल्वेस्टर म्युझियम (१८९०), बडोदा येथे बडोदा संग्रहालय (१८९४), कलादान, भावनगर येथे बरटन म्युझियम, (१८९८) जम्मू येथे श्री. प्रतापसिंह राजकीय संग्रहालय, (१८६३) लखनऊ येथे स्टेट म्युझियम (१८९८), मथुरा येथे मथुराम्युझियम (१८७४), नागपूर येथे स्टेट म्युझियम (१८७४), मुंबई येथे प्राकृतिक म्युझियम (१८६३), पुणे येथे लॉर्डरे इंडस्ट्रीयल म्युझियम (१८८८) इ. वस्तूसंग्रहालये भारतात स्थापन झाली.

लार्ड कर्झनची भारताच्या व्हायसरॉय पदावरती नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षणसंस्थेची पुर्नबांधणी करून सर जॉन मार्शल यांची संचालकपदी नियुक्ती केली. सर जॉन मार्शल यांनी संस्थेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी उत्खनन करून प्राप्त वस्तू अवशेषाचे विशेषतः अनेक ठिकाणी स्थळीय वस्तूसंग्रहालय भारतात निर्माण केली. उत्खनात सापडलेल्या वस्तूंच्या संरक्षणार्थ उत्खनाच्याच ठिकाणी स्थापन केली गेलेली अशी एकूण ११ स्थळीय संग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये जूनागढ (१९०१), सारनाथ (१९०४), चम्पा (१९०८), जोधपूर (१९०९), खजुराहो (१९१०), वाराणसी (१९१०), नालंदा (१९१७), सांची (१९१९), हडप्पा (१९२१), मोहनजोदडो (१९२२), ग्वालियर (१९२२) या स्थळीय संग्रहालयांचा समावेश होतो. लॉर्ड कर्झन यांनी प्राचीन ऐतिहासिक वास्तू व वस्तूं यांचे जतन, संरक्षण व संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून 'एन्शंट मोनुमेंटस्प्रिझरवेशन ॲक्ट' (Ancient Monuments Preservation Act) हाकायदा इ.स. १९०४ साली भारतात लागू केला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतामध्ये विविध संस्थाने विलीन केली गेली. या संस्थानांनी आपल्या संग्रही असलेल्या विविध कलापूर्ण, दुर्मिळ, मौल्यवान वस्तूचे आपल्या राजमहालात संग्रहालयाची निर्मिती केली.

इ. स. १९५६ साली भारत सरकारने भारतातील वस्तूसंग्रहालयांच्या विकासासाठी 'सेन्ट्रल एड्वायझरी बोर्ड ऑफ म्युझियम' कमिटीची स्थापना केली. इ. स. १९५९ मध्ये प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे हा कायदा भारत सरकारने पास केला. भारतातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी व त्याची तस्करी रोखण्यासाठी इ. स. १९७२ साली "The Antiquarian and An Treasures Act' हा कायदा पास केला. विविध कायद्याच्या माध्यमातून भारतसरकारने आपल्या प्राचीन काळापासून सांस्कृतिक वारसाचे जतन, संवर्धन, संरक्षण करून राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण केले. ब्रिटिश काळापासून ते इ. स. २००० सालापर्यंत भारतात विविध प्रकारातील सुमारे ६०० इतकी वस्तूसंग्रहालये निर्माण झाली आहेत.

**क) वस्तूसंग्रहालयाचे महत्त्व :**

मानवी जीवनात वस्तूसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक दृष्टिकोणातून अनन्यसाधारण महत्त्व असून आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात याचे महत्त्व वाढीस लागलेले आहे. वस्तूसंग्रहालय एक प्रकारचा आरसा आहे की, ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध अंगांचे प्रतिबिंब पडते आणि म्हणूनच बॅनर्जी एम्. आर. यांनी आपल्या 'द म्युझियम ॲण्ड द एज्युकेशन सिस्टीम' या लेखात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक भूमिकेच्या पलिकडे जाऊन एका आढळ स्फूर्ती केंद्राचा उल्लेख केला आहे. राष्ट्राच्या दृष्टीने संस्कृती फार महत्त्वाची असते. राजकीय व्यक्ती किंवा सामान्य व्यक्ती काळाच्या ओघात नष्ट होतात, परंतु सांस्कृतिक जडण-घडण चालूच असते. ही सांस्कृतिक जडण-घडण जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तूसंग्रहालये पार पाडतात. संग्रहालयाची भूमिका अधोरेखीत करताना बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड नमूद करतात की, कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला अजमावयाची असेल तर त्या देशातील ललित कलाकडे आपण लक्ष द्यावे. संगीत, शिल्पकला, चित्रकला आदि गोष्टी राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते आणि हे कार्य वस्तूसंग्रहालयांच्या माध्यमातून होते. वस्तूसंग्रहालये नसती तर प्रा. आर्थर मार्विक यांनी वर्णन केल्याप्रमाणे ज्या राष्ट्राला आपला इतिहास माहित नसतो अशा राष्ट्राची स्थिती स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखी होते.

वस्तूसंग्रहालयांच्या माध्यमातून मानवाच्या कष्ट साध्य प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने वस्तूसंग्रहालय हे भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी ज्योत आहे. श्री राजा केळकर वस्तूसंग्रहालयाचे महत्त्व विषद करताना म्हणतात, ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय राष्ट्राचे सांस्कृतिक धन आहे, गत जीवनाचा वैभवशाली वारसा आहे. अशा या अविस्मरणीय स्मृतिरेखा आणि मंगल चिन्हे जतन करून ठेवणे आपले पवित्र कर्तव्य आहे. याच दृष्टिकोणातून त्यांनी केळकर वस्तूसंग्रहालयाची निर्मिती केली. इतिहासलेखनात वस्तूसंग्रहालयास साधनात्मक महत्त्व आहे. इतिहासाचे पूर्वीच स्वरुप मर्यादित होते. परंपरागत इतिहासकार समाजाचा एकजिनसीपणा, एकसारखेपणा गृहीत धरून भूतकाळाच्या सहाय्याने वर्तमान काळापासून जाणून घेण्याचा प्रयत्न करत होता. मात्र २१ व्या शतकात इतिहासातील संकल्पनात बदल आल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घटला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे वस्तूसंग्रहालयाचे महत्त्व वाढले आहे.

इतिहास लेखन कागदपत्राशिवाय करता येत नाही हे जरी खरे असले तरी इतिहास लेखन करताना कागदपत्रांच्यामध्ये ज्या मोकळ्या जागा राहतात त्या भरून काढण्याचे काम भौतिक (पुरातत्वीय) व मौखिक साधने करतात. भौतिक साधनामध्ये भांडी, शिल्पाकृती, अलंकार, बांगड्या, पोषाख, खापराचे तुकडे व इतर अनेक पुरातत्वीय साधने तत्कालिन समाज व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत करतात. या सर्व वस्तू जतन व संवर्धन करण्याचे कार्य वस्तूसंग्रहालयातून होते, त्यासाठी वस्तूसंग्रहालये महत्त्व आहे. वि. का. राजवाडे यांच्या मते, कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या रित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टीने केला पाहिजे. धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषी, कलाकौशल्य, कायदेकानून, राजकारण व तत्सिद्यर्थ केलेल्या अंत:स्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा निर्गतीचा कालक्रमाने तथाकथित, बांधेसूद, पद्धतशीर व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुन्हा आत्मिक व भौतिकरित्या झाला म्हणजे राष्ट्राचे चरित्र समग्र कळले असे होते.

विश्वासाहर्त साधनाच्या शिवाय इतिहासलेखन अशक्य आहे. आणि यासंदर्भात अनेक महत्त्वाच्या साधनांचे संवर्धन व जोपासणा झाल्यामुळे इतिहास लेखनात एक साधन म्हणून महत्त्व आहे. अभ्यासात वस्तूसंग्रहालयाचे महत्त्व विषद करताना डॉ. श्री. व्यं, केतकर असे नमूद करतात की, आजच्या उपलब्ध ग्राह्य वस्तूचे व्यवस्थित संग्रहण व अभ्यास झाला पाहिजे. प्राकृतापासून संस्कृत व संस्कृतापासून प्राकृत, त्याचप्रमाणे ग्राम्य वस्तूपासून नागर वस्तू आणि नागर वस्तूपासून पुन्हा त्यांच्या ग्राम्य प्रतिकृती या क्रिया भांडी, उपकरणे, गृहरचना, वेश या सर्वामध्ये पाहावयास सापडतील. जे मूळ प्राकृत आहे त्याच्या संस्कृत रुपांतरावरून प्राकृत ग्रंथ पुन्हा तयार होण्याची प्रक्रिया झालेली आहे. संस्कृत व प्राकृत वाङ्मयाचा संयुक्त अभ्यास झाला पाहिजे. त्याचप्रमाणे नागर आणि चित्रकला यांचा अभ्यास होण्यासाठी वस्तूसंग्रहालयास महत्त्व आहे.

- **वस्तूसंग्रहालयाचे शैक्षणिक महत्त्व :**

मनुष्याला आपल्या अंगच्या कला, अभिरुची वाढविण्यासाठी व लेखक, कवी, कलाकार व शास्त्रज्ञ इ. व्यक्तीना आपल्या विषयाची आवड, व्याप्ती आणि संशोधन वृत्ती व्यापक करण्यासाठी वस्तूसंग्रहालये परिणामकारक साधन आहे. याशिवाय संग्रहालयातून कलेचा इतिहास कळतो. याच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दृकश्राव्य स्वरुपात शिक्षण मिळते. त्यामुळे संग्रहालय ही सरळ शिक्षण देणारी एक संस्थाच आहे. प्रदर्षित केलेल्या वस्तू आणि भेट देणाऱ्या व्यक्तीत एक प्रकारे संवाद साधण्याचे कार्य होते. यांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे/पर्यटकांचे मनोरंजन, विद्यार्थ्यांचे कुतुहल व जिज्ञासा वाढीस लागण्यास मदत होते. शिक्षण प्रभावी व परिणामकारक करण्यासाठी स्वाध्याय पद्धत ही सर्वात चांगली पद्धत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षकाला करावे लागते. त्यांच्या आशा-आकांक्षा विस्तारित करण्यासाठी नेहमीच्या पद्धतीपेक्षा वेगळा मार्ग, विविध पद्धतीतून शिक्षणाची प्रगती करावी लागते. यामध्ये वस्तूसंग्रहालये विशेष उपयोगी ठरत आहेत. संग्रहालयाच्या शैक्षणिक महत्त्वाविषयी तत्कालिन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री खेर यांनी नमूद केले आहे की, पूर्वी वस्तूसंग्रहालय म्हणजे प्राचीन अवशेष राखून ठेवणारी व ज्यामध्ये विद्वान शास्त्रज्ञांनाच रस आहे व त्या वास्तूची मांडणी शास्त्रीय पद्धतीने झाली आहे

अशी वास्तू होती. परंतु आधुनिक वस्तूसंग्रहालय म्हणजे शिक्षण देणारी एक संस्थाच आहे. वस्तूसंग्रहालय म्हणजे विद्यापीठच होय की, ज्याच्यामार्फत विद्यादानाचे कार्य केले जाते.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्रमांक १ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) 'म्युझियम' या शब्दाची उत्पत्ती ............. भाषेतून झाली आहे.

२) आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषदेची स्थापना ............. मध्ये झाली.

३) इंग्लंडमध्ये पहिले राष्ट्रीय संग्रहालय ............. मध्ये निर्माण केले.

४) एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल ह्या संस्थेची स्थापना ........... यांनी केली.

५) ........... ठिकाणी 'व्हिक्टोरिया म्युझियम'आहे.

६) ........... यांनी 'एन्शंट मोनुमेंटस ॲक्ट' कोणी केला.

७) मद्रासमध्ये ........... वर्षी वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यात आले.

८) व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तुसंग्रहालय............ ठिकाणी आहे.

९) भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था ........... यांनी स्थापन केली.

१०) भारत इतिहास संशोधन मंडळ ........... ठिकाणी आहे.

## ३.२.२ वस्तूसंग्रहालयांचे प्रकार :

भारतामध्ये १९ व्या शतकात ऐतिहासिक, कला आणि स्थळीय संग्रहालय असे प्रकार अस्तित्वात होते. २० व्या शतकापासून वस्तूसंग्रहालयांचे स्थापनेचे उद्दिष्ट व निकष इ. तत्त्वानुसार वर्गीकरण करण्यास सुरूवात झाली. यातून संग्रहालयांतील वस्तूंना प्राधान्य, विषय, निर्मिती व उद्देश इ. निकषांवरती वस्तूसंग्रहालयांकडे पाहिले जाऊ लागल्याने वस्तूसंग्रहाल यांचे विविध प्रकार अस्तित्वात आले, ते खालीलप्रमाणे :

### १) ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय :

ऐतिहासिक प्रकाराच्या संग्रहालयामध्ये दुर्मिळ व महत्त्वपूर्ण ऐतिहासिक अभिलेख, तैलचित्रे, छायाचित्रे, नाणी, शस्त्रास्त्रे, पत्रे, नकाशे, प्रतिकृती, निवासस्थाने इ. प्रकारच्या वस्तूच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण दालनाची मांडणी केलेली असते. तसेच पुरातत्त्वीय स्थळे, ऐतिहासिक स्मारके, युद्धभूमी आणि महत्वपूर्ण व्यक्ती यांच्या आठवणी म्हणूनही ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयांची उभारणी केलेली असते. उदा. नॅचरल हिस्ट्रीम्युझियम, दार्जिलिंग, पं. बंगाल (१९०३), व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तूसंग्रहालय, कलकत्ता, पं.बंगाल (१९०६), पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालय, लाल किल्ला, नवी दिल्ली (१९०९), नॅचरल हिस्ट्रीम्युझियम, त्रिवेंद्रम्, केरळ (१९३५), टिपूसुलतान वस्तूसंग्रहालय, श्रीरंगपट्टनम्, कर्नाटक (१९५९), फोर्टसेन्टजॉर्ज वस्तूसंग्रहालय, मद्रास,

तामिळनाडू (१९८४), नॅशनल हेरीटेज पिझवेशन सोसायटी म्युझियम, बुंदी, राजस्थान इत्यादी.

**२) पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालय :**

उत्खननात प्राप्त विविध पुरावशेषांचा पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालयात समावेश असतो. अश्मयुगी काळापासूनचे विविध पुराअवशेष, दगडी हत्यारे, मणी, नाणी, मातीची भांडी, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रावरील ग्रंथ, प्राचीन शिल्पकृती इ. उत्खननीय अवशेषांचा समावेश असतो. अशाप्रकारच्या संग्रहालयातील दालनात विषयांनुसार, काळानुसार प्रदर्शन केलेला असते. उत्खनन स्थळाच्या ठिकाणीच स्थापन केलेल्या स्थळीय वस्तूसंग्रहालयांना (Site Museum) पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालय म्हणून ओळखले जाते. हडप्पा, मोहेंजोदडो, तक्षशिला, नालंदा अशी काही स्थळीय संग्रहालय भारतात स्थापन केली आहे. उदा. आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा-उत्तर प्रदेश (१८७४), म्युझियम ऑफ ॲन्टिक्विरिज, भावनगर-गुजरात (१८८४), गर्व्हमेंट सेंट्रल म्युझियम, जयपूर-राजस्थान (१८८७), आर्किऑलॉजिकल म्युझियम, रेड फोर्ट-दिल्ली (१९०९), ऑर्किऑलॉजिकल म्युझियम, खजुराहो-मध्यप्रदेश (१९१०), आर्किऑलॉजिकल म्युझियम, विजापूर-कर्नाटक (१९१२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, अमरावती-आंध्रप्रदेश (१९५१), लोकल आर्किऑलॉजिकल म्युझियम, चित्रदुर्ग-कर्नाटक (१९५१), आर्किऑलॉजिकल म्युझियम, नागार्जुन कोंडा, आंध्रप्रदेश (१९५२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, बौध्दगया-बिहार (१९५६), आर्किऑलॉजिकल म्युझियम, हळ्ळेबिड-कर्नाटक (१९६१), हरियाणा प्रांतीय पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालय, गुरूकुल झांझर, हरियाणा (१९६१), आर्किऑलॉजिकल म्युझियम, अहर-राज्यस्थान (१९६२), आर्किऑलॉजिकल म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९६२) इत्यादी.

**३) कला वस्तूसंग्रहालय :**

मानवानी वेगवेगळ्या कालखंडात निर्माण केलेल्या विविध कलाकुसरीच्या हस्तकला इत्यादी प्रकारातील वस्तूसंग्रहालयात समावेश असतो. यामध्ये चित्रकला, मूर्तीकला, नक्षीकाम, भरतकाम, औद्योगिक कला, हस्तकला आदिवासी कला, पुरातत्त्वीय कला अवशेष, इ. प्रामुख्याने समावेश केला जातो.

**४) विज्ञानवतंत्रज्ञान वस्तूसंग्रहालय :**

मानवी जीवनाच्या विकासातील विविध टप्पे, गतकाळात मानवाने आपले जीवनमान सुसह्य करण्यासाठी लावलेले विविध शोध आणि विविध क्षेत्रातील ज्ञान, शोध, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात मानवाने केलेली प्रगती याविषयीची माहिती ही वस्तूरूपाने, मॉडेल रूपाने, यंत्र रूपाने, उपकरणे रूपाने, विषया नुसार विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संग्रहालयांच्या दालनात समाविष्ठ केली जातात. उदा. विजयवाडा विज्ञान केंद्र, विजयवाडा-आंध्रप्रदेश (१८८७), नॅचरलहिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग-हिमाचलप्रदेश (१९०३), हे रासइन्स्टिट्यूट ऑफ इंडियन हिस्ट्री ॲन्ड कल्चर, मुंबई-महाराष्ट्र (१९२६), म्युझियम ऑफ द सेंट्रलग्लास ॲन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्युट, कलकत्ता-पं. बंगाल (१९३०), हेल्थ म्युझियम, हैद्राबाद-आंध्रप्रदेश (१९४८), राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय, कलकत्ता- पं.बंगाल (१९५६), विश्वेश्वरैय्या इंडस्ट्रियल ॲन्ड टेक्नॉलॉजी म्युझियम, बंगलोर-कर्नाटक

(१९६५), ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, भुवनेश्वर-ओरिसा (१९७२), नेहरू विज्ञान केंद्र, पॉण्डेचरी (१९७७), रमनताराघर संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९९२), नेहरू विज्ञानकेंद्र, मुंबई-महाराष्ट्र (१९८५) इत्यादी.

**५) औद्योगिक वस्तूसंग्रहालय :**

मानवाने विज्ञान क्षेत्रामध्ये लावले शोध हे प्रत्यक्षात व्यवहारामध्ये कोणत्या उद्योगामध्ये कशा पध्दतीने उपयोग केला जातो. 'अॅप्लीकेशन ऑफ सायन्स' याचे दिग्दर्शन औद्योगिक प्रकारच्या वस्तूसंग्रहालयांच्या माध्यमातून समाजाच्या ज्ञानवृध्दीसाठी संग्रहालयांच्या दालनात मांडले जातात. उदा. महात्मा फुले औद्योगिक वस्तूसंग्रहालय (लॉर्डरेइंडस्ट्रीयल म्युझियम), पुणे (१८७४), गव्हर्मेंट इंडस्ट्रियल अॅन्ड कमर्शिअल म्युझियम, कलकत्ता-पं.बंगाल (१९३९), परमनंट इक्झिबिशन ऑफ बिल्डिंग मटेरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९४०), कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाईल, अहमदाबाद (१९४९), म्युझियम ऑफ सेंट्रल ग्लास अॅन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्यूट, पं.बंगाल (१९४९), हॉयवे म्युझियम, ट्रान्सपोर्ट भवन, नवी दिल्ली (१९६०), कॉन्टेल इंडस्ट्रीयल म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९८०), सेंट्रल इंडस्ट्रियल म्युझियम, मद्रास-तामिळनाडू (१९८०) इत्यादि.

**६) वैद्यकिय वस्तूसंग्रहालय :**

मानवी शरीररचना, शरीराचे कार्य, अवयव, मानवी आरोग्य, मानवी शरीरास उत्पन्न होणाऱ्या व्याधी. तसेच मानवी शरीर वैधिक शास्त्रज्ञ झालेली प्रगती, शोध, औधषे अशा विविधप्रकारच्या मानवी शरीर, अवयव विषयक दुष्य स्वरूपातील माहिती ही प्रतिकृती तक्ते. पोस्टर, इ. प्रदर्शन माध्यमातून वैद्यकिय प्रकारच्या संग्रहालयात वैद्यकियशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी, सामान्यजन यांच्या ज्ञानवाढीसाठी प्रदर्शित केलेले असते. उदा. ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई (१८४५), स्टॅन्ले मेडिकल कॉलेज (१९२५), सेठ गोवर्धनदास मेडिकल कॉलेज, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे (१९४६) त्यादी.

**७) बाल वस्तूसंग्रहालय :**

लहान मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यात ज्ञानवृध्दी, बौध्दिक आकलन, संस्कार, नैतिकता रुजवण्याचे एक मनोरंजनक व शैक्षणिक जडणघडणीचे माध्यम म्हणून बाल वस्तूसंग्रहालये स्थापन केली जातात. अशा संग्रहालयाच्या माध्यमातून थोर व्यक्तीचे जीवन चित्रण, वैज्ञानिक तत्त्वे, सृष्टी विज्ञान, गती, गुरुत्वाकर्षण, जीव-विकास व नाशनैसर्गिक, वैज्ञानिकतत्त्वे, कलावविधा, कलाकुसरीच्या वस्तू, हस्तकला, चित्रकला, इतिहास संस्कृती याविषयक परिणामकारक, मार्मिक व सोप्या पध्दतीने मुलांची शैक्षणिक जडणघडण होण्याच्या दृष्टीकोन पुढे ठेवून प्रतीकृती, तक्ते, पोस्टर, प्रदर्शनइ. दृष्य स्वरूपातून बाल संग्रहालयाच्या दालनाची मांडणी केली जाते. उदा. बाल संग्रहालय, अमरेली-गुजरात (१९५२), नॅशनल चिल्ड्रन म्युझियम, नवी दिल्ली (१९५६), बालसंग्रहालय, लखनौ-उत्तर प्रदेश (१९५७), मोतीलाल नेहरू बालसंग्रहालय, (१९६८), नेहरू बालसंग्रहालय, कलकत्ता-पं. बंगाल (१९७२) इत्यादी.

### ८) मंदिर वस्तूसंग्रहालय :

प्राचीनकाळापासून धार्मिक ठिकाणे, मंदिर ही त्या-त्या लोकांच्या श्रध्देची व धार्मिक गरजा पुरविणारी एक संस्था मानली जाते. धार्मिक मंदिरे, चर्च, मठ, आश्रम या ठिकाणांस लोक श्रध्देने विविध कलापूर्ण वस्तू अर्पण करत. त्यामुळे या ठिकाणी विविध प्रकारच्या कलापूर्ण, मौल्यवान वस्तूंचा संग्रह होत असतो. अशा मंदिराच्या अनुशंगाने संग्रहीत झालेल्या वस्तूच्या माध्यमातून भारतातील विविध मंदिर वस्तुसंग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये प्रामुख्याने बृहद्रीश्वर मंदिर, तंजावर (राजराजा संग्रहालय), श्रीरंगम मंदिरसंग्रहालय, मिनाक्षी-सुंदरेश्वर मंदिर संग्रहालय, मदुराई, फोर्ट जॉर्ज म्युझियम, मद्रास, सेंट्रल शिखम्युझियम, अमृतसर, बिर्लाटपल म्युझियम, भोपाळ, श्री वेंकटेश्वरा म्युझियम, तिरूपती, दिंगबर जैन म्युझियम, सोंगिर, आणि गणेशमूर्ती संग्रहालय सारसबाग, पुणे. इत्यादीचा समावेश होतो.

### ९) सृष्टीविज्ञान वस्तूसंग्रहालय :

प्राणी, वनस्पती, भूगर्भरचना, भूस्तर, भूकंप आदी नैसर्गिक हुबेहूब देखाव्यातून दर्शन घडवण्याच्या हेतूने उत्कृष्ठ आभासचित्राच्या माध्यमातून सृष्टी विज्ञान वस्तूसंग्रहालये स्थापन केली जातात. अशी सृष्टीविज्ञान विषयक स्वतंत्र अशी दालने तसेच स्वतंत्रपणे सृष्टीविज्ञान वस्तूसंग्रहालय स्थापन केली जातात. उदा. महाराजा महाविद्यालय, एर्नाकुलम, मद्रास ख्रिश्चन कॉलेज, मद्रास आणि प्रिन्स ऑफ वेल्सम्युझियम, मुंबई इत्यादी.

### १०) वन आणि कृषी वस्तूसंग्रहालय :

वन आणि कृषी वस्तूसंग्रहालयाच्या माध्यमातून जंगलातील दुर्मिळ बहुगुणी विविध वनस्पती, झाडांचे विविध प्रकार, वन्यजीव, पशुपक्षी व शेती उद्योगांशी निगडीत विविध उपकरणे, कृषी औजारे, कृषी बी-बियाणे, किटक प्रकार, विज्ञान तंत्रज्ञानाची जोड देवून शेती उद्योगांची प्रगती. कृषीमालांचे प्रदर्शन, विविध दालनाचे प्रदर्शन वन व कृषी प्रकाराच्या वस्तूसंग्रहालयांत प्रदर्शित केले जाते. भारतातील वन व कृषी प्रकारातील वस्तूसंग्रहालये पुढीलप्रमाणे, ग्रासफॉरेस्ट म्युझियम, कोईम्बतूर, तामिळनाडू (१९०२), फॉरेस्टरिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, डेहराडून (१९१४), फॉरेस्ट स्कूल म्युझियम, शिवपूर, म. प्रदेश (१९४६) आणि आसाम फॉरेस्ट म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९४८).

### ११) सैनिक व संरक्षण वस्तूसंग्रहालय :

जगातील प्रत्येक देशाच्या भूमीचे व संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येक देशाच्या सरकारबरोबरच नागरिकांचे आद्य कर्तव्य असते. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राचे बाह्य शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी भूदल, नौदल, हवाई दलइ. सैन्यदलाची उभारणी करून त्यांस विविध नवनवीन शस्त्रास्त्रे देशसंरक्षणासाठी निर्मिती केलेली विविध साधने प्रधान करते. अशा राष्ट्रसंरक्षणासाठी विकसित केलेले विविध शस्त्रास्त्रे, साधने यांच्यात झालेली प्रगती मुख्यतः सैनिक संरक्षण प्रकारच्या वस्तूसंग्रहालयाच्या माध्यमातून प्रदर्शित केली जात. अशा संग्रहालयामध्ये संरक्षण हत्याराचे विविध प्रकार, त्यात झालेला विकास व आधुनिकतंत्रज्ञानाची शस्त्रास्त्रे, विविध

युध्दपध्दती प्रकाराच्या प्रतिकृती, कालबाह्य झालेले विविध यंत्रे, शस्त्रास्त्रे इ. विविध घटकांचा समोवश केला जातो. उदा. नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी म्युझियम, खडकवासला-पुणे (१९५५), एअरफोर्स म्युझियम, पालम-नवी दिल्ली (१९६०), आणि सेंट्रल पोलिस म्युझियम, पुरम्-नवी दिल्ली (१९९१).

**१२) विद्यापीठ महाविद्यालय व शैक्षणिक वस्तूसंग्रहालय :**

भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये वंशाळांमधून विद्यार्थ्यांना विविध विषयांचे वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून शिक्षण दिले जाते. प्रयोग, प्रात्यक्षिक, दक-श्राव्य इ. साधनांचा वापर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना वस्तूसंग्रहालयाची आवश्यकता असते. म्हणून अनेक शाळा महाविद्यालये तसेच विद्यापीठांनी शैक्षणिक दृष्टिकोन पुढे ठेवून वस्तूसंग्रहालयांची निर्मिती केली. उदा. झूलॉजी ॲन्ड बॉटनी म्युझियम, महाराजा कॉलेज, इरना फुल-केरळ (१८७४), ॲर्थोपॉलॉजिकल म्युझियम, लखनऊ युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश (१९११), आंध्र मेडिकल कॉलेज म्युझियम, विशाखा पट्टणम-आंध्रप्रदेश (१९२३), मराठी हिस्ट्री म्युझियम, डेक्कन कॉलेज, पुणे-महाराष्ट्र (१९३९), जिऑलॉजी ॲन्ड जिऑग्राफी म्युझियम, पंजाब युनिर्व्हसिटी, चंदगड (१९४७), ॲंथ्रोपॉलॉजी म्युझियम, गुवाहाटी युनिव्हर्सिटी, आसाम (१९४८), आर्किऑलॉजिकल म्युझियम, हरीसिंहगौर युनिव्हर्सिटी सागर, मध्यप्रदेश (१९८५) आणि मंडनापल्ले कॉलेज म्युझियम, गुंठर-आंध्रप्रदेश (१९९८).

**१३) स्थापत्त्य वस्तूसंग्रहालय :**

स्थापत्त्य वस्तूसंग्रहालयामध्ये प्रामुख्याने इमारत उभारणीसाठी लागणाऱ्या वस्तू, इमारत बांधणी तंत्रे, बांधकाम तंत्रज्ञानातील प्रगती, इमारत प्रतिकृती, इमारत बांधणीसाठी वापरले जाणारे साहित्य यांचे नमुने इ. स्थापत्यशास्त्र विषयक माहिती प्रदर्शित केली जाते. भारतामध्ये राष्ट्रीय इमारती संघटन केंद्र, निर्माण भवन, नवी दिल्ली येथे स्थापत्त्य वस्तूसंग्रहालयांची निर्मिती करण्यात आली.

**१४) राष्ट्रीय वस्तूसंग्रहालय :**

राष्ट्रीय प्रकारचे वस्तूसंग्रहालय स्थापन करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य मानले जाते. भारतसरकारने दिल्ली येथे राष्ट्रीय वस्तूसंग्रहालय निर्माण केले. कलकत्ता येथील भारतीय वस्तूसंग्रहालय व हैद्राबाद येथील सालरजंग वस्तूसंग्रहालयांस राष्ट्रीय वस्तूसंग्रहालयांचा दर्जा दिला. राष्ट्रीय प्रकारातील वस्तूसंग्रहालये ही केंद्रशासनाच्या पुरातत्त्वीय विभागाच्या अधिपत्याखाली येत असल्यामुळे त्याचे कार्य केंद्रीय पुरातत्त्वीय विभागाच्या अधिपत्याखाली कार्य चालते. राष्ट्रीय वस्तूसंग्रहालयात प्रामुख्याने प्राचीनकाळापासूनच ते आधुनिक काळापर्यंतची राष्ट्रीय ओळख असलेल्या विविध विद्या, कलाविषयक प्रातिनिधीक वस्तूचे संरक्षण व प्रदर्शन शास्त्रीय पध्दतीने केलेले असते.

**१५) प्रादेशिक वस्तूसंग्रहालय :**

प्रादेशिक वस्तूसंग्रहालये प्रामुख्याने प्रादेशिक विभागातील स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीसंबंधी माहित व प्रादेशिक कला, संस्कृतीबाबत माहिती प्रदर्शित केली जाते. देखावे, हवामान, भूप्रदेश, वनस्पती, पशुपक्षी,

कृषीप्रेक्षणीय, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, संस्कृती इ. माहिती प्रादेशिक प्रकारच्याव स्तूसंग्रहालयातून प्रदर्शित केली जाते. उदा. कच्छम्युझियम, भूज, गुजरात (१८७७), एस, पी. एस. गव्हर्मेंट म्युझियम, श्रीनगर (१८९८), धारडिस्ट्रीक म्युझियम, धार-मध्यप्रदेश (१९०२), गव्हर्मेंट म्युझियम, अलवार-राजस्थान (१९०८), स्टेटम्युझियम, जमुनाबाग-मध्यप्रदेश (१९२२), सेंट्रल म्युझियम इदोर-मध्य प्रदेश (१९२९), स्टेटम्युझियम, भारतपूर-राजस्थान (१९३७), मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९४५), सेंट्रल म्युझियम, भोपाळ-मध्यप्रदेश (१९४९), गया म्युझियम, गयाबिहार (१९५२), ११) सेंट्रल म्युझियम, पिलानी-राजस्थान (१९५४), सेंट्रल म्युझियम, जयपूर राजस्थान (१९६०), महाराज जीवाजीराव म्युझियम, ग्वाल्हेर-मध्यप्रदेश (१९६४) आणि तुलसी संग्रहालय, सतना-मध्यप्रदेश (१९७७).

**१६) स्थानिक वस्तूसंग्रहालय :**

स्थानिक वस्तूसंग्रहालय ही त्या-त्या ठराविक भागातील पुरातन अवशेष, इतिहास, कला, शिल्प, मानववंशशास्त्र, निसर्ग इतिहास इ. प्रकारातील त्या स्थानिक प्रदेशातील वस्तूच्या माध्यमातून त्या राज्याच्या विशिष्टतेनुसार स्थानिक संस्कृतीच्या ऐतिहासिक कलावस्तूचे जतन, संवर्धन व प्रदर्शन करण्याचे कार्य स्थानिक प्रकारच्या वस्तूसंग्रहालयाच्या माध्यमातून केले जाते. अशाप्रकारची संग्रहालये स्थानिक व जिल्हापातळी वरती, नगरपालिका, महानगरपालिका व स्वायत्तसंस्था यांच्या माध्यमातून मुंबई, अलाहाबाद, पुणे, कोल्हापूर, कलकत्ता, बडोदा, अहमदाबाद, अहमदनगरइ. ठिकाणी स्थापन झाली आहेत.

**१७) मानववंशशास्त्रीय वस्तूसंग्रहालय :**

पृथ्वीवरती मानवप्राण्यांची वर्गवारी वेगवेगळ्या वंशगटामध्ये केली जाते. प्राचीन मानववंशाचा विकास कशा पध्दतीने झाला, यांच्या अध्ययनासाठी, अभ्यासासाठी व माहितीसाठी मानववंश शास्त्रीय प्रकारातील व स्तूसंग्रहालय स्थापन केली जातात. अशा संग्रहालयामध्ये प्रामुख्याने विविध मानवी वंशप्रकार, गट, जीवाच्या उत्पत्तीपासून आधुनिककाळातील मानववंशात होत आलेल्या उत्क्रांती वस्थित्यंतर विषयक पुरावे, त्याचे पोषाख, आहार, वस्त्र, अलंकार, दागदागिने, शस्त्रास्त्रे, राहणीमान इ. महत्त्वपूर्ण संग्रह प्रदर्शित केलेला असतो. भारतात अशाप्रकारातील वस्तूसंग्रहालये प्रामुख्याने मद्रास, मुंबई, नागपूर, पुणे, बडोदा इ. ठिकाणी निर्माण करण्यात आली.

**१८) वैयक्तिक स्मारक वस्तूसंग्रहालय :**

थोर व्यक्तींचेकार्य इतिहासाला, मानवी जीवनाला प्रेरणा देणारे ठरते. अशा व्यक्तींच्या जीवनाशी निगडीत घटना, कार्यस्थळ, जन्मस्थळ, वास्तव्य स्थळेही मानवी समाजाला सतत प्रेरणादायी ठरतात. थोर व्यक्तींच्या कार्याची आठवण भावी पिढीस सतत राहावी व थोरव्यक्तीच्या कार्याचा आदर्श हा भावीपिढीने घ्यावा. व्यक्तीकार्याचा सन्मान व्हावा आणि थोर व्यक्तींच्या जडण-घडणीतील विविध पैलूंचे दर्शन भावी पिढीस होत राहावे व्यक्तींची स्मारके बांधली व उभारली जातात. उदा. राणा प्रतापम्युझियम, उदयपूर-राजस्थान (१८८७), व्हिक्टोरिया ज्युबली म्युझियम, विजयवाड-आंध्रप्रदेश (१८८७), वॉटसन म्युझियम, राजकोट-गुजरात (१८८८),

सरदारव्ही. पटेल म्युझियम, सुरत-गुजरात (१८९०), भुरीसिंग म्युझियम, चम्भा-हिमाचल प्रदेश (१९०४), टिपूसुलतान म्युझियम, श्रीरंगपट्टणम् तामिळनाडू (१९०८), इंडियन वॉरमेमोरियन म्युझियम, नवी दिल्ली (१९१८), छोटूराम म्युझियम, संगरिया-राजस्थान (१९३७), महात्मा गांधी हिंदी संग्रहालय, काल्पी-उत्तरप्रदेश (१९५०), गांधी स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली (१९५०), प्रभासपटाण म्युझियम, पाटण-गुजरात (१९५१), गांधी स्मारकसंग्रहालय, साबरमती-गुजरात (१९५२), गंगागोल्डन ज्युबली म्युझियम, बिकानेर-राजस्थान (१९५४), नेताजी म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९५७), रविंद्र भारती म्युझियम, कलकत्ता-पं.बंगाल (१९६१), महाराजा फत्तेसिंहम्युझियम, बडोदा-गुजरात (१९६१), नेहरू मेमोरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९६४), गांधी स्मारक संग्रहालय, आगा खानमहल, पुणे-महाराष्ट्र (१९७२), महात्मा फुले स्मारक संग्रहालय, फुलेवाडा, पुणे-महाराष्ट्र (१९७२) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम ॲन्ड मेमोरियल, सिंबायोसीस सोसायटी, पुणे (१९९६) इत्यादीचा समावेश होतो.

**१९) महाराजा वस्तूसंग्रहालय :**

भारताला स्वातंत्र्य प्राप्ती झाल्यानंतर ५५३ पेक्षा अधिक संस्थानाचे विलीनीकरण केले. ब्रिटिशकाळात मिळणारे तनखे (पैसे) संस्थान विलीनीकरणनंतर बंद झाल्यामुळे संस्थानिकांना आर्थिक चणचण भासू लागली. आपली आर्थिक चणचण दूर करण्यासाठी काही संस्थानिकांनी आपल्या संपत्तीची व संग्रही असणाऱ्या दुर्मिळ कलाकृतींची विक्री केली. तर काही संस्थानिकांनी व त्यांच्या वारसदारानी, उत्तराधिकाऱ्यांनी आपल्या संग्रहीत असलेल्या दुर्मिळ कलाकृतीची विक्री न करता त्यावस्तूंचे संग्रहालये उभारली. अशाप्रकारच्या संग्रहालयांस 'महाराजा संग्रहालय' म्हणून ओळखली जाते. उदा. महाराज सवाई मानसिंह संग्रहालय, सिटी पॅलेस, जयपूर-राजस्थान (१९५१), महाराज फत्तेसिंग संग्रहालय, बडोदा-गुजरात (१९६१), महाराज जिवाजीराव शिंदीया संग्रहालय, ग्वाल्हेर-मध्य प्रदेश (१९६४), महाराजा बनारस विद्यामंदिर संग्रहालय, वाराणसी-उत्तर प्रदेश (१९६०) आणि श्रीभवानी चित्रवस्तूसंग्रहालय, औंध-महाराष्ट्र (१९६८).

**२०) विशेष वस्तूसंग्रहालय :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशेषव स्तूसंग्रहालये निर्माण केली गेली. अशा विशेष संग्रहालयामध्ये प्रामुख्याने, सी. बी. आय. संग्रहालय, हवाईदल संग्रहालय, राष्ट्रीय तिकीट संग्रहालये, कृषी संग्रहालय, परिवहन संग्रहालय इ. समावेश होतो. त्याच बरोबर राष्ट्रीय खेळ संग्रहालय, संरक्षण विषय संग्रहालय, व्यक्तीचित्रण संग्रहालय, ग्राम संग्रहालय, फिरते संग्रहालय अशा विविध संग्रहालयांचा समावेश विशेष प्रकारातील वस्तूसंग्रहालयात होतो.

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. २**

**रिकाम्या जागा भरा.**

१) कला वस्तुसंग्रहालय ........... प्रकारच्या वस्तू असतात.

२) हेरास इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन हिस्ट्री ॲन्ड कल्चर हे संग्रहालय ............. येथे आहे.

३) भारतात पहिले वैद्यकिय संग्रहालय ............ येथे स्थापन झाले.

४) मोतीलाल नेहरू बालसंग्रहालयची स्थापना .............. मध्ये झाली

५) बृहद्रीश्वर मंदिर तंजावर येथील संग्रहालय ............. नावाने देखील ओळखले जाते.

६) ग्रासफॉरेस्ट म्युझियम.............. राज्यात आहे.

७) सालरजंग वस्तूसंग्रहालयास ............... प्रकारच्या संग्रहालयांचा दर्जा दिला आहे.

८) ............... भेटीच्या स्मरणार्थ छ. शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय उभारण्यात आले.

९) जहाँगीर आर्ट गॅलरी ............... मध्ये स्थापन करण्यात आली.

१०) जवाहरलाल कलाकेंद्र ............ राज्यात आहे.

### ३.२.३ वस्तूसंकलनाच्या पद्धती, जतन व संवर्धनाचे तंत्र :

#### अ) वस्तू संकलांनाच्या पद्धती/वस्तू प्राप्त करण्याचे मार्ग:

वस्तू हे कोणत्याही संग्रहालयाचे सर्वस्व असते. वस्तूच्या संग्रहाशिवाय संग्रहालयाची उभारणी होवूच शकत नाही. माणसाला वस्तू जमविण्याची उपजत आवड असते. एखादीच वस्तू जमविण्याची आवड निर्माण झाल्यास त्याला आपण छंद म्हणतो. प्रौढ अवस्थेत जर हा छंद टिकला आणि त्यास आर्थिक व श्रमाचे पाठबळ मिळाले तर कला कौशल्याचा वस्तूंचा किंवा त्याला आवडणाऱ्या वस्तूचा संग्रह होतो व त्यातूनच संग्रहालयांची उभारणी होत असते. हैद्राबाद संस्थानच्या निजामांनी छंद म्हणून अनेक कला कौशल्याचा वस्तूंचा संग्रह केला, त्यातूनच सालारजंग संग्रहालयाची उभारणी झाली. औंध संस्थानचे राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधिनी संग्रहीत केलेला संग्रह म्हणजे आजचे भवाणी संग्रहालय, पुण्याचे राजा दिनकर केळकर संग्रहालय सुद्धा केळकरांच्या छंदातूनच निर्माण झालेले आहे. आधुनिक काळात संग्रहालयाची व्याप्ती केवळ पुरातत्वीय अथवा प्राचीन वस्तूंचा संग्रह आणि जतन एवढ्यापुरता मर्यादित नसून अनेक प्रकारच्या वस्तू, वारसा आणि संस्कृतीचे जतन करण्यापर्यंत झालेली आहे. वस्तूसंग्रहालयामध्ये वस्तू जमा करण्याच्या योग्य त्या पद्धती वापरल्या जात आहेत. परिणामी संग्रहालयाची भूमिका लोकाभिमूख झालेली आहे. वस्तू संग्रहीत करण्याचे अनेक मार्ग आहेत, वस्तू पूजेमुळेही अनेक वस्तूंचा संग्रह होतो. पूर्वीच्याकाळी वस्तूच्या जागी दैवत्व कल्पीले जाई, त्यामुळे विविध प्रकरचे मनी, माळा, विविध रंगाचे दगड, शस्त्राशस्त्रे, हत्यारे, भांडी, शिल्पाकृती, चित्रकलाकृती आदी वस्तूंचा संग्रह होत असे. याशिवाय वस्तू प्राप्त करण्याचे मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

#### १) वस्तूंची खरेदी :

वस्तूचा संग्रह करण्याचा राजमार्ग म्हणजे वस्तू खरेदी करणे. संग्रहालयातील बहुसंख्य वस्तू या प्रामुख्याने खरेदी करून आणलेल्या असतात. ऐतिहासिक वस्तूंचा व्यापार करणाऱ्या अनेक संस्था अथवा दुकाने आहेत,

अशा संस्थाकडून वस्तूंची खरेदी करताना पूर्ण तपासणी करून घेणे आवश्यक असते. मात्र संग्रहाल यांच्याकडे अशा वस्तू खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या पैशाचा तुटवडा असतो. अशावेळी त्यांना विविध संस्थांच्या माध्यमातून पैसा उपलब्ध करून दिला जातो. उदा. द नॅशनल आर्ट ट्रेजर्स फंड, केंद्र आणि राज्य सरकारांचे वस्तूसंग्रहालय खाते, कलाकृती खरेदी समिती, शास्त्रीय सर्वेक्षण समिती इत्यादी. यासाठी शासनाने विहित केलेली पद्धती स्वीकारावी लागते. त्याचबरोबर वस्तू खरेदी करताना अनेक बाबींची खबरदारी घ्यावी लागते. जसे की तस्करी किंवा अयोग्य मार्गाने येणाऱ्या वस्तू, नोंदणी न केलेल्या वस्तू, पूर्व इतिहास माहिती नसलेल्या वस्तूं, वस्तू अवैध मार्गांनी विक्रीसाठी आलेली आहे किंवा काय, मालकी हक्क इत्यादीची असणे आवश्यक असते.

**२) देणगी :**

आपल्या वंशजांच्या दुर्मिळ वस्तू अनेकांच्याकडे असतात. बऱ्याच प्रकरणात मागच्या पिढ्यांच्या वस्तू सांभाळायला अनेकजण असमर्थ असतात, अंर्तगत भांडणे असणे, अथवा वस्तू ठेवण्यासाठी जागेची अडचण असते. त्यामुळे त्यांना वस्तू कोणत्यातरी संस्था अथवा व्यक्तींना द्यायच्या असतात. अशावेळी योग्य पद्धतीने त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या कडून अशा वस्तू देणगी स्वरूपात प्राप्त करता येतात. देणगी ही कायमस्वरूपी असू शकते किंवा काही अटीवर मिळवता येतात. उदा. संबंधीत वस्तूंच्या दालनात त्या कुटुंबाचे अथवा व्यक्तीचे नाव द्यावे. जसे की छत्रपती शिवाजी संग्रहालयामध्ये रतन टाटा संग्रह आहे. भारत व जगभारतील अनेक संग्रहालयांची अशा प्रकारच्या वस्तूमुळे संग्रहालयांतील वस्तूंची संख्या वाढलेली दिसते.

**३) भेट :**

संग्रहालयांना भेट म्हणून वस्तू मिळत असतात किंवा त्या भेट प्राप्त करू शकतो. भेट म्हणून मिळणार्या वस्तू बहुधा व्यक्तीगत असतात. ज्यावेळी या वस्तू संबंधीत व्यक्तीला नकोशा होतात तेंव्हा त्या वस्तूसंग्रहाल यांना भेट म्हणून देतात. भेटी दाखल दिलेल्या वस्तूमागे दात्याच्या भावनाही दडलेल्या असतात. त्यामुळे वस्तू भेटदेण्यापूर्वी ते काही अटी घालून देतात. मात्र अशा अटी मान्य करणे अनेकवेळा संग्रहालयांना अडचण ठरू शकते. त्यामुळे अशा अटी शर्ती घालून दिलेल्या वस्तू स्वीकारणे टाळावे.

**४) जाहीरात अथवा प्रदर्शनातून वस्तू प्राप्त करणे :**

जाहीरातीद्वारे आवाहन करून आपल्याला हव्या असणाऱ्या वस्तूंची खरेदी करू शकतो अथवा त्या देणगी स्वरुपात प्राप्त करू शकतो. याशिवाय त्या वस्तू विविध प्रकारच्या प्रदर्शनातून वस्तूंची खरेदी अथवा भेट स्वरुपात प्राप्त करणे शक्य सोयीचे होवू शकते. प्रदर्शनाचे आयोजन केल्यास नवी-नवीन वस्तू उपलब्ध होतात. उदा. शेती, कला, चित्र, शिल्प, आदिवासी कलाकृती, अथवा अन्य प्रकारच्या प्रदर्शनातून वस्तू प्राप्त केल्या जावू शकतात.

**५) वस्तूंची अदलाबदल :**

काही व्यक्तिगत संग्रहांच्याकडे अथवा संग्रहालयाकडे एकाच प्रकारच्या अनेक वस्तू असू शकतात.

अशावेळी आपल्याकडील अतिरिक्त किंवा एकाच प्रकारच्या वस्तूपैकी काही वस्तूंची अदलाबदल करून संग्रहात वाढ करता येते. वस्तूंची ही अदलाबदल देशांर्गत अथवा परदेशी स्वरूपाची असू शकते. देशांर्गत अदलाबदल ही राज्य-राज्यात अथवा एखादे संग्रहालय दुसऱ्या संग्रहालयांबरोबर करू शकते. परदेशी वस्तूंची अदलाबदल ही त्या-त्या देशांच्या आंतरराष्ट्रीय राजनैतिक संबंधावर अवलंबून असते. वस्तूंची अदलाबदल प्रामुख्याने विविध सांस्कृतिक प्रतिके, मानके, नाणी, चिन्हे अशा स्वरूपाची असू शकते.

**६) वस्तू उसण्या घेणे :**

व्यक्ति अथवा संस्थांच्याकडून वस्तू उसण्या घेवू शकतो. काही संग्रहालयांच्या भांडारगृहात पडून असलेल्या वस्तू काही अटीवर व काही काळासाठी उसण्या घेवून संग्रहात वाढ करता येते. उदा. प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाकडून काही उसण्या वस्तू घेवून सातारा संग्रहालयाची उभारणी केलेली आहे.

**७) वस्तू कर्जाऊ घेणे :**

कर्जाऊ स्वरूपात वस्तू प्राप्त करणे ही सध्यकाळात संग्रहालयांमध्ये सरसकट पडलेली प्रथा आहे. मोठी संग्रहालये लहान संग्रहालयांना कर्जाऊ स्वरुपात वस्तू देतात यामध्ये कर्जाऊ वस्तूंच्या बदल्यात वस्तूंची आदलाबदल केली जाते. अशा कर्जात वस्तू दोन प्रकारे मिळवता येतात. कायमस्वरूपी कर्जाऊ वस्तू आणि मर्यादित कालावधीच्या कर्जाऊ वस्तू. पहिल्या प्रकारात पुरातत्व खात्यांकडून जे उत्खनन होते, त्यामध्ये प्राप्त वस्तू पुरातत्वे खाते राष्ट्रीय दर्जाच्या संग्रहालयांना कायमस्वरूपी देणगी म्हणून देतात. दुसऱ्या प्रकारामध्ये काही वेळा संग्रहालयातून काही विशिष्ट विषयांचे प्रदर्शन भरविण्यासाठी इतर संग्रहालयांतून त्या विषयाशी संबंधित वस्तू काही मर्यादित काळासाठी कर्जाऊ स्वरुपात आणल्या जातत नंतर त्या परत कराव्या लागतात.

**८) वस्तू तयार करून घेणे :**

एखादी अस्सल मूळ वस्तू प्राप्त होत नसेलतर त्याची प्रतिकृती/हुबेहुब नक्कल तयार करून घेणे सोयीचे ठरते. मात्र ही प्रतिकृती तयार करताना त्याचा दर्जा उत्कृष्ट ठेवणे आवश्यक असते.

**९) उत्खनन अथवा अन्वेषणा मधून प्राप्त वस्तू :**

उत्खनन अथवा अन्वेषणा मधून प्राप्त वस्तू झालेल्या वस्तू संग्रहालयास सहज प्राप्त होवू शकतात. जुन्या काळातील वस्तू आपल्या आसपास सापडतात अथवा पडलेल्या असतात त्या वस्तू नागरिकांनी गोळा करून त्यासंग्रहालयाकडे जमा कराव्यात हालिखित आहे. याशिवाय अन्वेषण करताना जो पुरातत्वशास्त्रज्ञ असतात त्यांच्या कडून अशा प्रकारच्या वस्तू मिळतात.

**१०) सरकारी वगैरे सरकारी संशोधन केंद्रातून वस्तू प्राप्त करणे :**

अनेक शासकीय संशोधन केंद्रात नवीन नवीन संशोधन चालू असते अशावेळी अनेक वस्तू उपलब्ध केल्या जातात. अशा संशोधन केंद्रातून अनेक वस्तू उपलब्ध होवू शकतात, यावस्तू विश्वसनीय असतात. शिवाय शास्त्रीय माहितीसह कमी खर्चात मिळतात. खालील संस्थांनच्या मधून वस्तू प्राप्त होवू शकतात. उदा. भारतीय

प्राणी विज्ञान सर्वेक्षण मंडळ कलकत्ता, भारतीय वनस्पती विज्ञान मंडळ कलकत्ता, केंद्रिय व राज्य सरकारचे कृषि विभाग, वनसंशोधन संस्था, भारतीय भूगर्भशास्त्र सर्वेक्षणशास्त्र मंडळ, कला महाविद्यालये आणि संस्था, लष्करी संस्था आणि महाविद्यालये, पुरातत्वविभाग, सांस्कृतिक विभाग इत्यादी. वरील संस्थानच्या माध्यमातून वस्तू प्राप्त केल्या जावू शकतात.

**११) गुप्त धन अथवा तस्करीतील वस्तू :**

बऱ्याच ठिकाणी खोदकाम करताना अचानकपणे काही वस्तू सापडतात. उदा. नाणी, भांडी, सोन्या चांदीच्या वस्तू, शिल्पाकृती इ. अशा प्राप्त वस्तू सरकारकडे जमा केल्या जातात. सरकार त्या वस्तूसंग्रहालयाकडे पाठवत असते. कायद्याच्या तरतूदीनूसार अनेक वस्तू ह्या देशाच्या दृष्टीने महत्वाच्या असतात, त्या वस्तू देशाची संपत्ती म्हणून ओळखल्या जातात. अशा वस्तूंची बऱ्याचवेळा तस्करी होत असते. मात्र तस्करीतील या वस्तू सापडतात तेंव्हा त्या वस्तू विविध कायद्याचा तरतूदीनुसार सरकार ताब्यात घेते आणि संबंधीत संग्रहालयांकडे सोपवल्या जातात. त्यामुळेही संग्रहात वाढ होवू शकते.

**ब) वस्तूसंग्रहालयातील वस्तूंचे जतन संवर्धन :**

संग्रहालयामधील वस्तूंचे अनेक प्रकारे संवर्धन केले जाते. विविध कलाकृतीं नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी अथवा खराब होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात. वस्तूंचे त्याच्या स्वरूपावरून जतन व संवर्धन केले जाते. सेंद्रिय व असेंद्रिय वस्तूंचे आयुष्यमान वाढविण्यासाठी त्यावर निवारणात्मक उपाय करणे गरजेचे असते.

**१) वस्तूंच्या जतन व संवर्धनाचा अर्थ व व्याख्या :**

प्राचीन काळापासून कागदपत्राचे जतन व संवर्धन करण्याचा थोड्याफार प्रमाणात पारंपारिक पद्धतीने प्रयत्न झालेला दिसतो. परंतू २० व्या शतकात जतन व संवर्धनात अनेक नवीन आधुनिक पद्धतींचा शोध लागल्याने, नवीन तांत्रिक चिकित्सापद्धती विकसित झालेल्या आहेत. पारंपारिक पद्धतीच्या ऐवजी वैज्ञानिक ज्ञानावर आधारीत जतन व संवर्धनाच्या नवीन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कागदपत्राच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून त्याचे प्रथम चिकित्सक पद्धतीने विश्लेषण केले जाते व नंतर त्याचे संवर्धन केले जाते. उदा. कागदाची प्राकृतिक रचना, निर्मिती, माध्यम, घटक व बनवण्याचे तंत्रज्ञान व त्यावर झालेल्या नैसर्गिक परिणामाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून त्यांचे भावी पिढीसाठी जतन केले जाते.

इतिहासलेखनामध्ये कागदपत्रांना व संदर्भ साधनांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. विना संदर्भ साधनांचे इतिहासलेखन इतिहासच मानले जात नाही. त्यामुळे गतकालीन ऐतिहासिक घटनांचा उलगडा होण्यासाठी जेवढी कागदपत्रे महत्त्वाची आहेत, तेवढेच त्यांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज बनलेली आहे. कारण तो आपला सांस्कृतिक वारसा तर आहेच शिवाय इतिहास लेखनाचे महत्त्वाचे संदर्भ साधन, त्यामुळे "Preservation of Cultural heritage is one of the primary function" असे म्हटले जाते. जतन व संवर्धनाचे महत्त्व सांगताना डॉ. आर. डी. बॅनर्जी असे म्हणतात की, Bearing in mind that all cultural

property forms a part of the cultural heritage of human kind...... every state has a responsibility to preserve it. कागदपत्रे, चित्रे किंवा ऐतिहासिक स्मारके यांच्या संरक्षण अथवा संवर्धनासाठी सर्वसाधारणपणे जतन (conservation) संवर्धन (preservation) व जीर्णोद्धार (Restoration) या संज्ञा वापरल्या जातात. परंतु या तिन्ही संज्ञामध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. डॉ. पॉलकॉरमेन्स यांनी या संज्ञातील फरक विशद करताना असे म्हटले आहे की, संवर्धनामध्ये एखाद्या वस्तूला दीर्घायुष्य प्रदान करण्याच्या उद्देशाने सर्वप्रकारच्या संवर्धनाचे, रोगनाशाचे उपाय केले जातात. तर जतन करताना एखाद्या वस्तूचे अथवा घटकाचे विशिष्ट नैसर्गिक स्वरूप जसेच्या तसे कायम अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामध्ये परिमार्जन, संक्षेपन व दृढीकरण या प्रक्रियांचा समावेश असतो. जीर्णोद्धार (Restoration) ही एक चिकित्सक क्रिया पद्धती आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने पूर्वी वापरण्यात आलेल्या सामुग्रीचे अथवा घटकाचे पृथःक्करण करून संपूर्ण अथवा आंशिक स्वरूपात पुर्ननिर्माण केले जाते.

डगलस ए. एलन यांनी जतन वसंवर्धनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, संवर्धन हे एक विज्ञान आहे. ज्या अंतर्गत वस्तूचे भौतिक व रासायनिक घटकांच्यापासून होणारे नुकसान अथवा कृमी, किटकांच्यापासून होणाऱ्या नाशापासून संरक्षण केले जाते. देशाच्या व मानवजातीचा सांस्कृतिक वारसा ठरेल अशा सर्वच वस्तूचे रक्षण करणे आवश्यक आहे. Sarah Stani Farth यांनी जतन व संवर्धनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे. की, वस्तूची योग्य सुरक्षितता ठेवण्यासाठी उपाय योजणे आणि त्या वस्तूची योग्य पुनर्रचना करणे अथवा पुनःप्रस्थापना करणे ह्याकडे लक्ष देणे म्हणजेच वस्तूचे रक्षण करणे हे होय.

**२) जतन व संवर्धन आणि पुनःस्थापना यातील फरक :**

संवर्धन व पुर्नःस्थापना (जीर्णोद्धार) हे शब्द वेगवेगळे आहेत. परंतु बऱ्याचवेळा एकाच अर्थाने वापरले जातात. संवर्धन (preservation) व पुर्नःस्थापना (Restoration) हे शब्द परस्परपूरक आहेत. पुर्नःस्थापनेपेक्षा संवर्धन हा शब्दप्रयोग साधारणतः अधिक वापरला जातो. पुर्नस्थापना म्हणजे एखाद्या वस्तूला जास्तीतजास्त तिच्या मूळ शारीरिक व सौंदर्यात्मक स्थितीत आणण्यासाठी केलेली कृती होय. यामध्ये वस्तूच्या अपकर्षाचे परिणाम दुरूस्त करण्याचा प्रयत्न असतो, परंतु याला मर्यादा असतात. याऊलट संवर्धनामध्ये क्षेत्र व व्याप्ती मोठी असून ती निरंतन चालणारी प्रक्रिया आहे. संवर्धनाची व्याख्या करताना स्टॅटयू ऑफ द इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ कन्झर्व्हेशन, लंडन यानी असे म्हटले आहे की, कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक संग्रहातील जिन्नसांचे स्वरूप व गुणधर्म जाणुन घेण्यासाठी वा त्यांची मांडणी : हाताळणी किंवा उपचारांसाठी, अपकर्षाची कारणे समजून घेण्यासाठी व नियंत्रण करण्यासाठी आणि अशा संग्रहाची स्थिती सुधारण्यासाठी केलेली कोणतीही कृती. त्यामुळे संवर्धन या संकल्पनेत जतन आणि पुर्नस्थापनेचाही अंतर्भाव होतो. तर जतन ही वस्तूची भौतिक व रासायनिक स्थिती मजबूत राखण्याच्या सुस्पष्ट प्रयत्न असतो. म्हणून ती एक न संपणारी क्रिया आहे. साधारणतः जतन व संवर्धनामध्ये प्रामुख्याने खालील तीन घटक महत्त्वाचे मानले जातात.

१. निवारण उपाय

२. आरोग्यकारक (मजबुतीकरण) उपाय

३. जीर्णोद्धार अथवा पुर्नःस्थापना उपाय

या तीन घटकांचा ज्यामध्ये अभ्यास केला जातो त्याला जतन व संवर्धनाचे विज्ञान असे म्हणतात. याशिवाय खालील घटक देखील महत्वाचे मानले जातात.

- **जतन व संवर्धनातील प्रमुख घटक (Elements ofConservation) :**

१) वस्तूचे बारकाईने परीक्षण व निरीक्षण करणे (Examination)

२) खबरदारीचे जतन (Preventive Conservation)

३) रोगनिवारण जतन (CurativeConservation)

४) गतवैभव प्राप्त करणे /पुर्नसंचयीत करणे (Restorative Conservation)

५) प्रतीकृती तयार करणे (Duplicative Conservation)

**३) भौतिक व पर्यावरणीय घटकापासून जतन व संवर्धन :**

ऐतिहासिक वस्तू कोणत्याही देशाचा सांस्कृतिक वारसा असतो. त्याचे जतन व संवर्धन करणे हे जसे त्या-त्या राष्ट्राचे कर्तव्य आहे तसेच प्रत्येक नागरिकाचे देखील आहे. अनेकविध कारणांनी या वस्तू खराब अथवा नष्ट होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे त्याचे जतन करण्यात अनेक अडचणीही आहेत. अशा वस्तूंचा नष्ट होण्यापासून वाचविणे आपले कर्तव्य आहे. संग्रहालयांच्या माध्यमातून हे कार्य प्रामुख्याने केले जाते. वस्तूंचा नाश हा सामान्यत: भौतिक आणि पर्यावरणीय कारणाच्या मुळे होत असतो.

**अ) भौतिक घटक :**

**१) वस्तूंची अयोग्य हाताळणी :**

संग्रहालयातील वस्तूंची झीज अथवा हानी प्रामुख्याने भौतिक आणि मानवी घटकांमुळे होते. वस्तूंची हाताळणी योग्य पद्धतीने झाली नाही तर त्याची हानी होवू शकते. वस्तू हाताळताना हातात सुती हातमोजे घालून किंवा सुती वस्त्राच्या सहाय्याने वस्तू हाताळणे गरजेचे असते. जेथे जरूरी असेल तेथे वस्तूंची हाताळणी चिमट्यांनी करणे हितकारक ठरते. वस्तूंची ने-आण करताना त्या हातातून नेण्याऐवजी तबकात ठेवून ने-आण फायद्याचे असते. वस्तूंची साफसफाई करताना अत्यंत मऊ ब्रशचा वापर करावा. वस्तूंची हाताळणी करताना घाई-गडबड अथवा धसमुसळेपणा करणे धोक्याचे ठरू शकते.

**२) वस्तूवेष्टन बंद करणे:**

वस्तूंची हाताळतानी अथवा वस्तूंचीने-आण करतेवेळी आणि वस्तूंचे नमुने साठवून ठेवताना वस्तूंना वेष्टन बंद करणे गरजेचे असते. वस्तूवेष्टन बंदकरताना वेष्टनासाठी जे साहित्य वापरले जाते ते मऊ स्वरूपाचे असावे जेणे करून वस्तूंची हानी होणार नाही. वस्तूंना वेष्टन बंद करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या लाकडी चौकटी/पेट्या, प्लॅस्टिक डबे, कापडी अथवा जुटच्या पिशव्यांचा वापर करणे उपयुक्त ठरते. वस्तूला डबाबंद करण्या अगोदर त्यावर मऊ गादीचे अस्तर संरक्षक म्हणून गुंडाळणे आवश्यक असते.

**३) वस्तूंची ने-आण :**

संग्रहालयातील वस्तूंची अनेक करणांच्यासाठी हलवा-हालव अथवा वस्तूंची ने-आण करावी लागते. या दरम्यान वस्तूंची हानी होण्याचा सर्वात जास्त धोका असतो. वस्तू छोटी असो अथवा मोठी ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करताना लोखंडी पट्टयांचे आवरण असलेल्या लाकडी पेट्यातून करणे आवश्यक असते. वस्तूच्या सभोती स्पंज अथवा जुटाच्या पिशव्यांचे आवरण करणे गरजेचे असते. वस्तूंची वाहतूक करताना वस्तूंच्या पेटीच्यावरती सुस्पष्ट नावात नोंदी आणि वस्तूच्या प्रकराची माहिती लिहिणे आवश्यक असते. ज्यामुळे त्या वस्तूंचे संरक्षण आणि काळजी चांगल्या पद्धतीने घेतली जाते.

**४) वस्तूंची साठवणूक :**

संग्रहालयाच्या भांडारगृहामध्ये वस्तूंची साठवणूक केली जाती, यासाठी योग्य आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे असते. वस्तूंची जर पद्धतशीरपणे साठवणूक केली नाही, तर वस्तू हाताळताना, वेष्टन बंद करताना, ने-आण करताना जी काळजी घेतली जाते ती सर्व व्यर्थ ठरण्याची शक्यता असते. भांडारगृहाची जागा कोरडी, हवा खेळती आणि स्वच्छ असणे गरजेचे असते. भांडारगृहातील आर्द्रता, तापमान आणि प्रकाशाचे योग्य नियोजन असणे गरजेचे असते, यामुळे वस्तूंचे आयुष्यमान वाढण्यास मदत होते आणि त्या अधिक काळ टिकून राहण्यास मदत होते.

**५) पर्यटकांच्या सवयी व प्रवृत्ती :**

संग्रहालयांना पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. वस्तूंचे पर्यटकांच्या बेजबाबदार वर्तनामुळेही नुकसान होते. काहीवेळा हे काम मुद्दाम केले जाते तर काहीवेळा अजाणतेपणे वितिकांच्यावर लिहिले, रेघा ओढणे, चित्रे विद्रूप करणे, नावे लिहिणे, शिल्पाकृतींना हाताने स्पर्श करणे, हत्यारे हातात घेण्याचा प्रयत्न करणे, वस्तूंच्या सोबत फोटो काढणे, त्यावर बसने, इ. अनेक कारणांच्यामुळे वस्तू खराब होतात.

**ब) पर्यावरणीय घटक :**

पर्यावरणीय घटकांच्यामध्ये हवामान, प्रकाश, तापमान, आर्द्रता, हवेतील प्रदूषण इत्यादीचा समावेश होतो, या घटकांच्यामुळे वस्तूंची झीज अथवा हानी होऊ शकते.

**१) बदलते हवामान :**

संग्रहालयांमधील वस्तूंच्यावर प्रामुख्याने पर्यावरणीय घटकांचा विपरीत परिणाम होत असतो. हवामानातील बदल हा प्रमुख कारक घटक यामध्ये आहे. हवामनातील तिन्ही ऋतु उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा यांचा वस्तूंच्या जीवनमानवर विपरीत परिणाम होत राहतो. त्यासाठी वस्तूंच्यावर हवामानाचा कोणताही परिणाम होऊ नये म्हणून अनेक प्रकारची काळजी घेतली जाते. उत्खनानंतर सापडलेल्या वस्तूंवर पर्यावरणातील घटकांच्या संपर्कातून रासायनिक प्रक्रिया होवून त्या हळूहळू नष्ट होवू लागतात, याला सूक्ष्म पर्यावरणीय परिणाम असे म्हणतात. पर्यावरण हे वस्तूंच्या संवर्धनामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत असते. ज्या वातावरणात फार

बदल होत नाही अशामध्ये जर वस्तू ठेवल्या तर त्यांचे सवर्धन हे चांगल्या पद्धतीने होऊ शकते.

**२) पाणी :**

पाणी हा घटक कागदपत्रांच्या बरोबर प्रथम क्रमांकाचा शत्रू मानला जातो. पावसाळ्यात अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव पाणी आणि वस्तूंचा संपर्क आल्यास ते धोकादायक ठरू शकते. पावसाळ्यात खिडक्या अथवा छताला असलेल्या छिद्रातून पाण्याचे ओसाडे आतमध्ये येतात. कागदपत्रे अथवा कार्बनी प्रकारच्या घटकाशी संबंध आला असता त्याच्या कायिक व रचनात्मक गुणधर्मावर परिणाम होतो. त्यामुळे तो एकतर लवचिक होतो अथवा ठिसूळ होऊन तुकडे पडतात.

**३) प्रकाश :**

नैसर्गिक व कृत्रिम प्रकाशाचा वस्तूंच्यावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होतो. परंतु प्रकाशापासून होणाऱ्या परिणामाची व्यापकता प्रकाशाचे उगमस्थान; त्याचे स्वरूप आणि तीव्रता यावर अवलंबून असते. प्रकाश हे विद्युत चुंबकीय उर्जेचे रूप आहे. ज्याच्यात दोन प्रकारचे किरण असतात. दृश्य आणि अदृश्य. परंतु याबाबतीत मानवी डोळा तितकासा संवेदनशील नसतो. त्यामुळे आपणास त्याची गंभीरता लक्षात येत नाही. प्रकाशवर्ण पटातील ४०० ते ७०० नॅनो मीटरच्या तरंग लांबी दरम्यान पसरलेला भागच पाहू शकतो. प्रकाशाच्या या पल्ल्याच्या अस्तित्वामुळेच वस्तू दृश्यमान होते. जे किरण ४०० नॅनो मीटरपेक्षा कमी तरंग लांबीचे असतात, जे जंबु पारकिरण आणि जे ७०० नॅनो मीटरपेक्षा अधिक लांबीचे असतात ते अवरक्त किरण. ही दोन्ही प्रकारची किरणे डोळ्यांना दिसत नाहीत. नैसर्गिक व कृत्रिम प्रकाश हा किरणोत्सर्गी असतो आणि त्यात संवेदनशील मानवी डोळ्यांना न जाणवणारे इतर अनेक प्रकारची किरणे त्यात सामावलेली असतात. ५०० नॅनो मीटरहून लघु तरंगलांबीतील उर्जा वस्तूंच्यावर विपरीत परिणाम करत असते.

संग्रहालयांमधील प्रदर्शित वस्तूंच्यावर थेट पडणाऱ्या प्रकाश किरणांचा परिणाम होतो. कागद अथवा कागदी वस्तू, कपडे आणि इतर सेंद्रिय वस्तूंच्यावर अत्यंत हानीकारक असतात. यासाठी प्रदर्शित केलेल्या वस्तूंच्यावर नैसर्गिक अथवा कृत्रिम प्रकाश योजना वस्तूंना हानीकारक ठरणार नाही अशा स्वरूपाची करणे गरजेची असते. प्रकाश थेट वस्तूंच्यावर न पडता छतावर पाढावा, छताला झिंक ऑक्साइडचे आवरण लावणे फायद्याचे ठरते. संग्रहालयातील वस्तूंच्या संरक्षणासाठी उष्णता किरण शोषून घेऊन प्रकाशकिरण परावर्तीत करणारी (Fluorescent) दिव्याची योजना केली जाते. याशिवाय पारदर्शक काचेच्या तावदानाचाही विचार होऊ शकतो. संग्रहालयामध्ये ज्यावेळी पर्यटक नसतील अथवा ते खुले नसेल तेंव्हा प्रकाश योजना बंद ठेवणे योग्य ठरते. प्रकाश वस्तूंना दोन प्रकारे हानी पोहोचू शकतो. एक म्हणजे, रंगीत वस्तू उदा. कापड, चित्र इत्यादींचे रंग फिक्कट होण्याची शक्यता असते आणि त्या वस्तूंची झीज होऊ शकते.

**४) तापमान :**

तापमानातील बदलांचा परिणाम वस्तूंवर होत असतो. तापमान जर सतत कमी-जास्त बदलत राहिले तर वस्तूंच्यावर विपरीत परिणाम होतो. जास्त तापमानामुळे वस्तूला तडे जावू शकतात तर कमी तापमानात त्या

सर्व बाजूंनी आंकुचन पावतात. यासाठी तापमान नियंत्रणात ठेवणे गरजेचे असते. तापमानाचा वस्तूंच्या आयुष्यमानावर परिणाम होते. प्रदर्शित वस्तूंच्या ठिकाणी तेथे सामान्यतः १८० ते २५० सेंटिग्रेडपर्यन्त तापमान मर्यादित ठेवणे योग्य ठरते.

**५) आर्द्रता :**

हवामानातील आर्द्रतेचा कागदपत्रे व इतर वस्तूंच्यावर अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही स्वरूपाचा परिणाम होतो. द्रव आणि बाष्परूपातील पाणी अपकर्षाच्या रासायनिक प्रक्रियेची गती वाढवत असते. उच्च आवृता कृमी व कवकासारख्या सूक्ष्म जंतूच्या जलद वाढीस अनुकूल असते. आर्द्रतेच्या माध्यमातून येणारा ओलावा कागद व कपडासारख्या तंतूमय रचना असणाऱ्या घटकावर होतो. कागद आर्द्रता शोषक असल्याने आर्द्रतेत वाढ होताच ते प्रसरण पावतात व ती कमी होताच आकुंचित पावतात. समुद्रकाठी असणाऱ्या शहरात हवेमध्ये आर्द्रता जास्त असते. त्यामुळे कागदपत्रे एकमेकांना चिकटण्याचा धोका निर्माण होतो. कागदपत्रे ठेवलेले ठिकाण भूमिगत अथवा तळमजल्यात असल्यास कागदावर आर्द्रतेचा परिणाम होऊन त्यावर बुरशी येते.

जैविक प्रकारातील वस्तूंच्यारमध्ये थोडातरी पाण्याचा अंश असतो. कोरड्या हवेत हा पाण्याचा अंश कमी होतो आणि आर्द्र हवेत तो वाढतो. हा ओलसरपणा बुरशी व जिवाणूंच्या वाढीसाठी कारणीभूत ठरतो. सापेक्ष आर्द्रतेवर ताबा मिळविणे हे वस्तूंच्या जतन व संवर्धनाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असते. सापेक्ष आर्द्रता पुढीलप्रमाणे मोजली जाते.

**हवेतील पाण्याचा अंश :**

सापेक्ष आर्द्रता = द. १००

त्या विशिष्ट तापमानात जास्तीत जास्त असू शकणारा पाण्याचा अंश.

भारतातील हवामान विषम स्वरूपाचे आहे. जैविक वस्तूंच्यावर याचा विपरित परिणाम होतो. उष्णतेमुळे यातील आवश्यक असणारे पाण्याचे प्रमाण कमी होते आणि कागद त्यापासून निर्मित वस्तू ठिसूळ बनतात व त्याचे तुकडे पडू शकतात. सापेक्ष आर्द्रता व तापमानाचा परस्पर संबंध आहे. एखाद्या बंदिस्त अवकाशातील तापमानाचे जर जतन झाले तर सापेक्ष आर्द्रता वाढते आणि तापमान चढले तर कमी होते. हा मुद्दा वातानुकूल यंत्रणेच्या बाबतीत विशेष महत्त्वाचा आहे. एखाद्या ठिकाणची सापेक्ष आर्द्रता नियंत्रित करायची असेल तर तापमानसुद्धा नियंत्रित केले पाहिजे. यासाठी कागदपत्राचे ज्याठिकाणी संग्रहन केलेले आहे त्याठिकाणची आर्द्रता व तापमानाची नोंद ठेवणे जरुरी असते. तापमान मोजण्यासाठी तापमापक (थर्मामीटर) चा उपयोग केला जातो. तर आर्द्रता मोजण्यासाठी आर्द्रता मापक (थर्मोहायग्रोग्राफ) म्हणजे ताप-आर्द्रता लेखन यंत्राचा वापर केला जातो. हवामानातील सापेक्ष आर्द्रता मोजण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आर्द्रता मापक या यंत्राचा वापर केला जातो. (इलेक्ट्रॉनिक हायग्रो मीटर)

**६) प्रदूषण आणि धूळ :**

वस्तूंची योग्य ती देखभाल न झाल्यास त्यावर सतत धूळ साचत जाते वही धूळ त्या वस्तूंच्या नाशाचे

कारण बनते. धुळी बरोबर ज्वलन क्रिया, स्वयंचलित गाड्यांमधून निघणारा धूर, कारखाने इत्यादींमुळे संग्रहालयातील वस्तूंच्यावर धुळीची पुटे चढू लागतात. त्यामुळे वस्तूंना हानी पोहोचू शकते व त्यांची झीज होऊ शकते. धुळीच्या माध्यमातून कीटक, बुरशी, वाळवी व पांढरी कसर यांची अधिक प्रमाणात वाढ होते. त्यासाठी सर्व वस्तूंची वारंवार साफ-सफाई करणे गरजेचे असते. वस्तू धूळ विरहित काचबंद अशा शोकेसमध्ये ठेवाव्यात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बाहेरील धूळ आत येणार नाही याचा बंदोबस्त करणे आवश्यक असते. प्रदूषण टाळण्यासाठी वातानुकुलीत यंत्राचा वापर करणे हा एक उत्तम उपाय आहे.

**७) जैविक घटक :**

प्राचीन काळापासून भूर्जपत्रे, चर्मपत्रे, ताडपत्रे व कागदाचा वापर लिखाणासाठी करण्यात येत आहे. ज्या काळात या पुराभिलेखांची निर्मिती होत होती तेव्हापासून ते आजतागायत यांचा विविध कारणांनी नाश झालेला आहे. यामध्ये विविध जैविक घटक महत्त्वाचे आहेत. प्रामुख्याने कीटक, कृमी व बुरशीजन्य वनस्पतीचा समावेश आहे. कागदासारख्या कार्बनी स्वरूपाच्या घटकांचे हे अत्यंत वाईट शत्रू आहेत. कीटकांच्यामध्ये पुस्तकी कीडे, पांढरी कसर व वाळवीचा समावेश होतो. आजतागायत या घटकांच्याकडून कागदपत्राचा अधिक गतीने नाश झालेला आहे. कृमीसारखे जीव उष्ण प्रदेशामध्ये अधिक धोकादायक असतात. कारण उच्च तापमानात आणि आर्द्रतेत यांची मोठ्या प्रमाणात वाढ होते. हे कीटक अथवा कृमी आर्थ्रोपोडा किंवा हेक्सापोडा या वर्गातील असतात.

**अ) वाळवी :**

वाळवीचे दोन प्रकार आहेत. सुक्या लाकडातील वाळवी व जमिनी खालील वाळवी जमिनीखालील वाळवी मातीशी संबंध ठेवून असते. सुक्या लाकडातील वाळवी ही लाकडात राहत असल्यामुळे ती मातीपासून बरीच दूर असते. वाळवीचा प्रादुर्भाव विशिष्ट हवामानात होतो. समुद्रकिनाऱ्याजवळ, भुसभुशीत जमिनीत वाळवी मोठ्या प्रमाणात वाढते. एका दिवसात एक वाळवी ३०,००० अंडी घालते. वाळवीची बिळे जमिनीत असल्याने ते सहज लक्षात येत नाही. वाळवी कागदपत्रे अथवा जैविक वस्तू मोठ्या वेगाने नष्ट करते. ८-१० दिवस जर त्याकडे दुर्लक्ष केले तर याकाळात त्याचा पूर्ण नाश करते. कपाटाचे लाकूड, ग्रंथाच्या बांधणीचे पुढे व कागद हे वाळवीचे प्रमुख खाद्य आहे. भारतात १५ प्रकारच्या वाळवी आढळतात.

वाळवीपासून वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी इमारतीच्या बांधकामापासून खबरदारी घेतली पाहिजे. संग्रहालय अथवा पुराभिलेखागारासारख्या इमारतीचे बांधकाम करताना २०% झिंकक्लोराईड किंवा २०% कॉपर सल्फेट (मोरचूद) पाण्यात मिसळून पायाच्या बांधकामात मिसळावे. म्हणजे भिंतीमध्ये वाळवी घर करू शकत नाही. वाळवीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्याठिकाणी पोकळी, छिद्रे अथवा भेगा असतील त्याठिकाणी सफेद सोमल (White -rsenic) अथवा डांबरी कोळसा किंवा मीठ टाकून ती पोकळी भरून घ्यावी. वारंवार वाळवीचा प्रादुर्भाव होत असेल तर ग्रंथाच्या अथवा कागदपत्राच्या पुठ्याच्या पृष्ठभागास पॅरॅफिन वॅक्स लावावे. याशिवाय कार्बनडाय सल्फाईड किंवा कार्बनटेट्रा क्लोराइडचा वापर करून ही वाळवी नष्ट करता येते.

**ब) पांढरी कसर (सिल्व्हरफिश) :**

पांढरी कसर हा लहान किटक आहे. १-५ सेमी. लांब, चपळ व पंखहीन असतो. त्याच्या शरीरातील खवल्यांना रुपेरी चमक असते म्हणून त्याला सिल्व्हर फिश असे म्हणतात. यालाच 'लेपिझासँकरिना' असेही म्हणतात. हा कीटक अंधेऱ्या जागेत राहतो व प्रकाश पडल्यास अतिशय जलदगतीने हालचाल करतो. एका आठवड्यात यांची पिल्ले अंड्यातून बाहेर येतात. हा कीटक कागदपत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतो. पुस्तकाच्या बांधणीसाठी वापरलेला खळ, डिंक किंवा गोंदवर तो आपली उपजिविका करतो. याचे जीवनचक्र २-३ वर्षाचे असते. ६००-८०० ओ फारेहाईट तापमान व ५५% आर्द्रतेत यांची वाढ अधिक गतीने वाढ होते. पांढरी कसर कागदपत्रांना लागूनये यासाठी फेमिगेशन मध्ये धुरी देणे गरजेचे असते.

**४) कीटक, कृमी व बुरशी :**

पुराभिलेखागार, ग्रंथालय व संग्रहालये अथवा ज्याठिकाणी कागदपत्रे अथवा वस्तूंचे संग्रहन केलेले असते अशा ठिकाणी विशिष्ट वातावरणीय बदल घडून आले म्हणजे विविध कीटक, कृमीची वाढवविकास अधिक गतीने होतो. त्यांच्या विकासास अथवा वाढीसाठी प्रामुख्याने आर्द्रत्ता, तापमान, खाद्यसामग्री, शीत अथवा उष्ण पर्यावरण इ. घटक कारणीभूत असतात. उदा. डेथवायबीटल्ज या कीटकाची ओल्या व वायुरक्षित ठिकाणी अधिक गतीने वाढ होते. लेक्टस्ब्रुनस व हाईकेटूपस बागुलस या कीटकाच्या वाढीस कोरडे वातावरण पोषक असते.

**अ) डेथवाच बीटल्ज :**

हा कीटक एनीबिडी वर्गातील आहे. याचा आकार ५ मी. मी. इतका लांब असतो. यांचे शिर प्रामुख्याने वरून झाकल्यासारखे दिसते. कागदपत्राच्या दृष्टिकोनातून हे अत्यंत हानिकारक असतात. यांची ४१० - ८२ ओ फॉरेन हाईट तापमानात अधिकगतीने वाढ होते. हे कीटक पांढऱ्या रंगाचे अंडे घालतात. या किटकाचे जीवनचक्र साधारण १-३ वर्षाचे असते.

**ब) तिलचट्टे :**

तिलचट्टे हा कीटक आथ्रोष्टेरा वर्गातील आहे. यांची अंधारात व उष्ण-दमट वातावरणात अधिकगतीने वाढ होते. कागदपत्रे व ग्रंथाचे या कीटकाच्या माध्यमातून अधिक नुकसान होते. या कीटकाचे वैशिष्ट्य म्हणजे हे आपल्या विष्टेद्वारा कागदपत्राचे नुकसान अधिक करतात. वातावरणात आर्द्रता निर्माण झाल्यास कागदपत्रावर हे विशिष्ट असे डाग निर्माण करतात. या किटकांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. एकावेळेस १६ अंडी देतात.

**क) बुरशी :**

बुरशी ही एकप्रकारची वनस्पतीच आहे. यामध्ये कवक, शैवाळे व जिवाणू शैवाळ इ. समावेश होतो. यांना आपल्या वाढीसाठी सामान्यतः द्रवयुक्त आर्द्रतेची आवश्यकता असते. ग्रंथ व कागदपत्रे जर ओली झालेली असतील अथवा तेथील वातावरण अत्यंत दमट असेल तर त्याठिकाणी बुरशीची वाढ होते. ग्रंथाची बांधणी

कातडी असेल तर बुरशीचा प्रादुर्भाव लवकर होतो. बुरशीमुळे कागद जीर्ण होतो. कागदासारख्या तंतूमय घटकात रासायनिक व यांत्रिकी गुणधर्मामध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता कवकामध्ये असते.

**७) धुरी देणे (Fumigation Method) :**

कागदपत्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी रासायनिक औषधाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ज्यांना जंतुनाशक असे म्हटले जाते अशी अनेक रसायने कृमीचा नाश करतात तर अन्य काही त्यांना नष्ट न करता पळवून लावतात त्याला 'प्रतिवारके' असे म्हणतात. कागदपत्रांचे संवर्धन करण्यासाठी धुरी देण्याचा एक चांगला पर्याय आहे. कोणत्याही कागदपत्रांच्या अथवा ग्रंथाच्या संग्रहास वाळवी, कसर यांच्यापासून धोका असतो. धूळ, पेस्ट अशा विविध प्रकारच्या घटकापासून कृमी-किटकांचा उगम होतो. अशा या घटकापासून कागदपत्राचे संरक्षण होण्यासाठी धुरी देण्याची उपाययोजना केली जाते. त्यासाठी दोन प्रकारच्या धुरी देण्याच्या पद्धतीचा वापर केला जातो. १) साधी धुरी, २) व्हॅक्यूमफ्युमिगेशन.

पूर्वी साधी धुरी देण्यासाठी उपायग्रस्त कागदपत्रे अथवा ग्रंथ एखाद्या लाकडी अथवा लोखंडी पेटीमध्ये ठेवून त्यामध्ये नॅप/लीनब्रीक्स वापरत असत. सध्या धुरी देण्यासाठी म्हणजे औषधी धुरी देण्यासाठी एखाद्या हवाबंद मोठ्या पेठीत पेठीच्यामध्ये जाळी बसवून त्यावर बुरशी अथवा कीड लागलेली कागदपत्रे व ग्रंथ ठेवून त्यांच्या खाली थायमोलच्या गरम वाफ देऊन कीटकनाशन केले जाते. व्हॅक्युम फ्युमिगेशनमध्ये हवाबंद खोली अथवा मोठ्या लोखंडी पेटीचा वापर केला जातो. हवाबंद खोलीत अथवा मोठ्या लोखंडी पेटीमध्ये डायक्लोरेबिम्झिनचे खडे ठेवून त्याच्यामध्ये विषारी गॅस सोडला जातो. याशिवाय वाळवी नष्ट करण्यासाठी गॅमेझिन पावडर, डी.डी.टी. पावडर यांचाही वापर केला जातो.

- **सेंद्रिय वस्तू :**

संग्रहालयातील सेंद्रिय वस्तूंच्या मध्ये लाकूड, बांबू, कागद, कापड, चांमडे, विविध प्राण्यांची हाडे व हाडांचे सापळे, हस्तिदंत, जनावरांची शिंगे, ग्रंथ, चित्रकला कृती, झाडांचे अवशेष, प्राण्यांचे अवशेष इत्यादी समावेश होतो. असेंद्रिय वस्तूपेक्षा सेंद्रिय वस्तूंची झीज आणि मोडतोड लवकर होत असते, त्याचे आयुष्यमान कमी असते.

- **लाकडी वस्तू :**

प्राचीन काळापासून मानवाने वस्तू बनविण्यासाठी लाकडाचा उपयोग केलेला आहे. संग्रहालयातील अनेक वस्तू लाकूड अथवा तत्सम घटकांच्यापासून बनविलेल्या असतात. त्यावर जीवशास्त्रीय किंवा रासायनिक प्रक्रिया झाली तर त्यां अधिकगतीने नष्ट होऊ शकतात. जीवशास्त्रीय घटकमधील बुरशीही लाकडी वस्तूंचा मोठा शत्रू आहे. याकडे सुरुवातीपासून लक्ष पुरवले नाही तर त्यांचे मोठे नुकसान होते. यापासून लाकडी वस्तूंचा बचाव करण्यासाठी हायड्रोसायनिक, कार्बनडायसल्फाईडची वाफ/धुरी व केरोसिन अथवा कुडक्रियोसोट द्रावणचा उपयोग केला जातो. हायड्रोसायनिक वायू हा विषारी असल्याने त्याचा वापर करणे उपयुक्त मानला जाते. लाकडी वस्तू ग्लिसरीन अथवा विनिलएसिटेट अथवा अल्कोहोलच्या सहाय्याने कोरड्या केल्या जातात, ही

प्रक्रिया सावकाश करणे गरजेचे असते. नंतर त्यावर ग्लिसरिनचा पातळसा हलका थर देऊन त्यावर १०% पॉलिव्हिनाइल ॲसिटेटचा किंवा अल्कोहोलमध्ये विरघळविलेल्या शेलॅकचा थर द्यावा. चांगल्या स्थितीत लाकडी वस्तूभोवती दोरा बांधून ती मजबूत करावी व क्षार विरहित पाण्यामध्ये ती ठेवावी. जेणे करून त्यातील क्षार निघून जाण्यास मदत होते. त्यानंतर ती वस्तू प्रयागशाळेत कृत्रिम भट्टीत वाळवावी व त्यानंतर त्यावर दहा टक्के व्हिनाइल ॲसिटेटचा संरक्षक थर द्यावा. विविध कृमी, कीटक, जंतूपासून बचाव करण्यासाठी लाकडी वस्तूंवर मेण गरम करून त्याचा थर देणेही पद्धत देखील अंमलात आणली जाते. ग्लू किंवा जिलेटिनचा वापर लाकडी वस्तूंमधील छिद्रे अथवा रंध्रे भरून काढण्यासाठी केला जातो.

- **कापडी वस्तू :**

नैसर्गिक धागे हे प्राणीजन्य व वनस्पतीजन्य अशा दोन स्वरूपामध्ये मिळतात. मुळात वस्त्रहा लवकरण जीर्ण होणरा घटक आहे. अतिशय नाजूक अवस्थेत या वस्तू प्राप्त झाल्यानंतर त्याची त्याची अत्यंत नाजूकपणे देखभाल करावी लागते. कारण त्यावर हवा, तापमान, आर्द्रता, धुळ इत्यादींचा परिणाम झालेला असतो. जसे बुरशी अथवा अन्य सूक्ष्मजंतूपासून याला धोका असतो. कापडी वस्तूंची या सर्व गोष्टींपासून बचाव करण्यासाठी पावसापासून मिळविलेले शुद्ध पाणी अथवा निर्जंतुक केलेल्या पाण्यात अशा कापडी वस्तू धुवून काढल्या जातात. कपडावर पडलेले तेल कटडाग काढण्यासाठी बेंझिन अथवा पेंट्रोलचा वापरा धुण्यासाठी केला जातो. मात्र काही विशिष्ट कापडी वस्तूंच्या साठी ड्रायक्लिन केले जाते. पाण्याचा वापर केला जात नाही. याशियाव काही विशिष्ट वस्तूं ड्रायक्लिन अथवा पाण्याने धुता येत नाहीत, तेंव्हा त्याची साफसफाई वाफेच्या माध्यमातून केली जाते. सुरकुतलेल्या अथवा घड्या पडलेल्या वस्तू काचेच्या अथवा पॉलिथिनच्या मोठमोठ्या तुकड्यावर पसरून ठेवल्या जातात जेणे करून फाटण्याचा धोका राहत नाही.

- **कागदपत्रे व कागदी वस्तू :**

संग्रहालयामध्ये अनेक वस्तू कागदापासून बनविलेल्या असतात. यामध्ये प्रामुख्याने विविध प्रकारच्या हस्तकला, रंगचित्रे इत्यादींचा समावेश होतो. कागद हा सेंद्रिय असल्याने तो नाशवंत आहे. झुरळे, किडे, मुंग्या, वाळवी, सिल्वर फिश, बुरशी इत्यादीपासून धोका असतो. कागदी वस्तूंचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी तापमान व सापेक्षा आर्द्रता योग्य प्रमाणात ठेवले पाहिजे. सापेक्ष आर्द्रतेचे ५० ते ६०% पर्यन्त राहीले पाहिजे. हवा गाळून घेतली घेणे गरजेचे असते, त्यासाठी एअर फिल्टरर्सचा वापर करता येतो. नियमितपणे धुरी देणे देवून मधून अधून जंतूनाशक फवारावे. याशिवाय पारंपरिक पद्धतीने तंबाखूची पाने, कापूर, डांबर गोळ्या इत्यादीचा वापर केला जातो.

**इ) हाडे, हस्तीदंत व शिपल्यांच्या वस्तू :**

प्राणीजन्य प्रकरतील या ठराविक कालावधीनंतर ठिसूळ होऊन त्यांचे तुकडे पडण्याची शक्यता असते. झीज कमी होण्यासाठी अथवा त्यांचे तुकडे होवू नये यासाठी तापमान, आर्द्रता आणि प्रकाश योग्य प्रमाणात ठेवणे महत्वाचे आहे. या प्रकारातील वस्तू उत्खननातून मोठ्या प्रमाणात प्राप्त होतात. या वस्तूंची मऊ साळूने त्याच्या सहाय्याने हलक्या हाताने साफ कराव्या लागतात. साफ करतना साबण आणि पाणी शक्यतो टाळला

जाते. या प्रकारातील वस्तूंची झीज होण्याची प्रक्रिया मंदावण्यासाठी मिथिलयुक्त मद्य किंवा शेलंक अथवा उल्कोहोलमध्ये काचेच्या कांड्या पाणी मिसळून सौम्य केलेल्या विनिल ॲसिटेटचा थर दिला जातो. उत्खननामध्ये मानवी किंवा प्राण्यांचे सांगाडे अथवा कवट्या प्राप्त होतात, त्यावेळी कवटीच्या आतील भागामध्ये क्रिओसोटच्या पातळ द्रावणाच्या १-२ थेंबात कापड बुडवून त्याची साफ सफाई केली जाते. हस्तीदंती अथवा इतर वस्तू भग्न अस्वस्थेत मिळाल्या तर त्या मेणाचा वापर करून जोडल्या जातात.

**क) चांमडी वस्तू :**

जंगली अथवा पाळीव प्राण्यांच्या कातडी अर्थात चांमडीपासून वस्तू तयार केलेल्या असतात. कातडी वस्तू अति नाशवंत असतात. कारण काही वेळा प्राण्यांच्या या चांमड्यावर प्रक्रिया न करता वस्तू तयार केल्या जातात याला 'क्युरिंग' असे म्हणतात. तर चांमड्यावर पूर्ण प्रक्रिया करून त्यापासून वस्तू तयार केल्या जातात याला 'प्रोसिसिंग; असे म्हणतात. कातडी वस्तू सांभाळून ठेवणे हे फार कठीण काम आहे. विशेषतः कातडीवस्तूंना सूक्ष्म जंतूपासून अत्यंत धोका असतो. विशेत: बुरशीचा धोका कमी करण्यासाठी वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण योग्य राखणे, बुरशी न होवू नये यासाठी कार्बन-डाय-सल्फाईड या बुरशीनाशकाचा वापर, ६०% एरंडेल तेल व ४०% अल्कोहोल मिश्रण २४ तास एकत्र ठेवून त्या मिश्रणाच्या द्रावणाचा थर देणे इत्यादी पद्धतींचा उपयोग केला जातो.

**अ) असेंद्रियस्वरुपाच्या वस्तू (Inorganic) :**

असेंद्रिय स्वरुपाच्या वस्तूमध्ये प्रामुख्याने दगडी वस्तू, विटा, सोने, तांबे, चांदी, कांस्य, शिसे, लोखंड, विटा, पोलाद इत्यादी धातूंच्या वस्तू, मातीच्या वस्तू, मडके, मातीची रंगवलेली खापरे इत्यादी वस्तू या असेंद्रिय स्वरुपाच्या असतात. ह्या वस्तूंची झीज मंदगतीने होते परंतु त्या वस्तू फुटण्यापासून त्यांचा बचाव करावा लागतो. याप्रकारच्या वस्तूंचे जतन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) सोन्याच्या वस्तू :**

जगामध्ये शेकडो वर्षापासून एक अमूल्य धातू म्हणून सोने वापरत आहे. संग्रहालयामध्ये अनेक अनेक प्रकारचे सोन्याचे अलंकार, नाणी, मुर्त्या, विविध वस्तू असतात. शुद्ध स्वरुपाच्या सोन्याला गंज लागत नाही. मात्र काहीवेळा त्यांवर काळे डाग पडतात. डाग साफ करण्याठी साबण अथवा गरम पाण्याच्या साहाय्याने धुतल्या जातात. नायट्रीक ॲसिडच्या सहाय्याने काळेडाग काढले जातात. ह्यासाठी ९० भाग पाणी व १० भाग अमोनिया असे मिश्र द्रावण तयार करून त्यामध्ये सोन्याची वस्तू धुतली जातात. डाग अधिक गडद स्वरूपाचे असतील तर ते हायड्रोक्लोरिक ॲसिडने साफ करावे लागतात.

**२) चांदीच्या वस्तू :**

सोन्याप्रमाणेच एक अमूल्य धातू म्हणून चांदी प्रसिद्ध आहे. हाधातू नरम स्वरूपाचा असून आहे. चांदीचे अनेक अलंकार, मुर्त्या, विविध वस्तू पाहावयास मिळतात. शुद्ध स्वरुपातील चांदी कालांतराने काळी पडते. त्यावरील काळपटपणा घालवण्यासाठी सौम्य अमोनिया अथवा सौम्य फॉर्मिक ॲसिडमध्ये ठेवून नंतर ती

स्वच्छपाण्याने धुवून त्यावर मेथिल मिथॉयुलेटवटोलयूईन एसिटोनाचे मिश्रण लावले जाते. याशिवाय एकपद्धती चांदीची वस्तू जस्ताच्या पाण्यात गुंडाळून ॲसेटिकॲसिडचे काही थेंब टाकलेल्या पाण्यात काही तास लोंबकळत ठेवली जाते. नाणी अथवा इतर वस्तूवरील काळे डाग काढण्यासाठी १०% सिल्व्हर नायट्रेट अथवा सलफ्युरिक ॲसिडचा वापर करतात.

**३) शिसे :**

शिसे हा देखील एक नरम स्वरुपाचा धातू आहे. शिशाची प्रामुख्याने नाणी आढळून येतात. महाराष्ट्रात सातवाहनांनी सर्वप्रथम शिशाची नाणी पाडली होती. नाणी साफ करण्यासाठी ॲसेटिक ॲसिडचे सौम्य द्रावण अथवा जस्त व कॉस्टिक सोडायांचे मिश्रण वापरले जाते. नाणेपूर्ण कोरडे करून त्यावर मेथिल मेथॉक्रिलोट अथवा क्लिनाईल ॲसिटेटचा पातळ लेप दिला जातो. साफ केलेल्या शिशाच्या वस्तूंचीही काळजी घ्यावी लागते ह्या वस्तू हवाबंद डब्यात अथवा काचेच्या बंद पेटीत ठेवाव्या लागतात.

**४) तांबे व कास्य :**

तांबे या धातूचा वापर ताम्रपाषाण युगापासून सुरू केला. त्यानंतर कांस्यचा वापर सुरू झाला. तांबे आणि कांस्य यापासून विविध वस्तू बनवण्याची कला प्राचीन काळापासून अवगत होती. पुढे तांब्यापासून नाणी पाडली जाऊ लागली. या वस्तू स्वच्छ करण्यासाठी व त्यावरील गंज नाहीसा करण्याठी ती १०% सोडियम कार्बोनेटच्या मिश्रणात १५ दिवस बुडवून ठेवावी. तांब्याच्या वस्तूवर क्षारचा थर बसलेला असेल तर१०% सोडियम मेटाफॉस्फेट मिश्रण वापरून दूर करता येतो. तांबे व तांबेयुक्त मिश्र धातूंच्या वस्तूवरील गंज दूर करण्यासाठी १ भाग टार्टरिक ॲसिड, कॉस्टिक सोडा १ भागवपाणी १० भाग असे मिश्रण करून त्या द्रावणात गंजसंपूर्ण निघेपर्यंत भिजत ठेवतात. त्यावरील क्लोराईडस निघून गेल्यानंतर त्यावर वस्तूवर १०% व्हिनाईल एसिटेटच्या द्रवला वातात. याशिवाय तांब्याची स्वच्छ करण्यासाठी ती वस्तू अगोदर सायट्रीक सिडने व नंतर सलफ्युरिक ॲसिडने धुतात. यावरील ॲसिडचा परिणाम नाहीसा व्हावा यासाठी अमोनिया किंवा कोणत्याही दुसऱ्या अल्कलीने त्यावर प्रक्रिया केली जाते. सर्व क्षार निघून गेल्यानंतर त्यावर पॉलिव्हिनाईल ॲसिटेटचा लेप द्यावा.

**५) लोखंड :**

प्राचीन काळापासून विविध कारणांच्यासाठी लोखंड या धातूचा वापर होतो आहे. अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे, हत्यारे, अवजारे, वस्तू संग्रहालयामध्ये अनेक येतात. वातावरणातील बदलामुळे त्याला लवकर गंज लागतो. लागलेला गंज अत्यंत काळजीपूर्वक काढावा लागतो. हे काम तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली करणे गरजेचे असते नाही तर त्याचे तुकडे पडण्याची शक्यता असते. अधिक प्रमाणात गंजलेल्या वस्तू साफ करण्यासाठी जस्त आणि कॉस्टिक सोडयाचे मिश्रण वापरतात. ह्यामुळे लोखंडी वस्तूतील घातक क्लोराईडस् नष्ट होतात. गंज कमी प्रमाणात असेल तर तो काढण्यातही पोटॅशियमबाय ऑक्झेलेटचे मिश्रण वापरतात. गंज गेल्यानंतर ती वस्तू क्षार विरहित पाण्याने स्वच्छ करून त्यावर १ % सोडियम बेंझिएटचे मिश्रण लवावे व व्हीनाइल ॲसिटेटचा लेप लावावा.

**६) दगडी वस्तू :**

मानवी संस्कृतीच्या प्रारंभापासून ते आजतागायत मानवाने आपल्या जीवनोपयोगी वस्तूच्या निर्मितीसाठी आणि आपल्या भावनात्मक प्रदर्शनासाठी दगडाचा आधार घेतलेला दिसतो. ज्याप्रकारे एखादा लेखक आपल्या उत्कट भावना कागदावर उतरवतो त्याप्रमाणे एखादा वास्तूविशारद अथवा कारागीराने छन्नी-हातोड्याने आपल्या भावना दगडावर व्यक्त केलेल्या आहेत. दगड हा बहुधा हस्तनिर्मित वस्तू, हत्यारे, विविध उपकरणे आणि नित्योपयोगी वस्तू बनविण्यासाठी सर्व प्रथम वापरल्या गेलेल्या वस्तूंपैकी एक आहे. मंदिरे, राजवाडे व अन्य क्लिष्ट कोरीव काम केलेल्या इमारती बांधण्याचे दगड हे लोकप्रिय साधन होते. त्यामुळे शिल्पशास्त्राचे दगडी नमुने मोठ्या प्रमाणात आढळतात. दगड हा अकार्बनिक प्रकारचाआहे. दगडाचे प्रमुख तीन प्रकार आहेत, अग्निजन्य अथवा ज्वालामुखीय रूपांतरीत व अवसादी (वालुकाश्म) इ. या तिन्ही प्रकारच्या दगडाचे स्वरूप व वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. या दगडाचे खालीलप्रकारे अपाय किंवा क्षरण घडून येते.

**१. रासायनिकरण :**

दगड व दगडी कलाकृतीवर खालीलप्रकारे अपाय घडून येतात.

अ) दगडी कलावस्तूच्यावर नैसर्गिक ऋतूचक्रांचा परिणाम घडून येतो. पावसाळ्यामध्ये आर्द्रता व उन्हाळ्यामध्ये उष्णतेचा या कला अवशेषांव रपरिणाम होतो. आर्द्रतेमुळे दगडात पाण्याचे प्रमाण शोषले जाते व त्यातून दगडात क्षाराचे लवण प्रमाण वाढते तर उन्हाळ्यात आर्द्रता उष्णतेने कमी-कमी होत जाते व दगडाच्या पृष्ठभागावर पापढ़े अथवा तुकडे पडण्यास सुरुवात होते.

ब) दगडी वास्तूच्या अथवा अवशेषावर परिणाम करणारे लवण एक प्रमुख कारण आहे. दगडामध्ये असणारे द्रवणशील लवण आता शोषून घेऊन हे लवण द्रावण तयार करते. जे दगड घडवणाऱ्या कणांच्या पोकळीत राहून जाते. बाष्पीकरणामुळे लवणयुक्त द्रावणाचे रूपांतर लवण स्फटिकात होते. जे नेहमी दगडाच्या पृष्ठभागावर पांढऱ्या कणीच्या स्वरूपात दिसते. लवणाचे सततचे पृथ्थकरण आणि स्फटिकीकरण दगडावर पुन्हा-पुन्हा ताण आणते व पृष्ठभागाचे तुकडे पडण्यास सुरुवात होते.

**२. जैविकक्षरण :**

बराचकाळ उघड्यावर राहिलेल्या दगडी वस्तूवर किंवा वास्तूवर हरिता अथवा शेवाळ्याचे थर दिसू लागतात. हे थर कुरुप असतात. वस्तूस ठिगळ अथवा हिरवट किंवा काळे स्वरूप देतात. एवढेच नाहीतर दगडाच्या पृष्ठभागावर खाचाही निर्माण करतात. ज्याच्यामुळे त्याची रचना कमजोर होते. अनेक प्रसंगी उघड्यावर दगडी प्रतिमा ठेवल्याने त्यावर पशू-पक्षी आपली विष्टा टाकतात. या विष्टेतून वनस्पतीच्या बिया येतात. या बिया रुजून त्याची वाढ होते. परिणामी त्याची मोठ्याप्रमाणात वाढ होऊन प्रतिमा खंडित होतात.

**३. भौतिक क्षरण :**

दगडी मूर्ती, स्तंभ किंवा इतर वस्तू हाताळत असताना त्याची योग्य ती काळजी व निगा राखली नाही

तर त्या एका जागेवरून दुसरीकडे हलवताना किंवा वेष्ठण बंद करताना हलगर्जीपणामुळे त्याला इजा पोहोचण्याचा अथवा भंग पावण्याची शक्यता असते. त्याठिकाणी त्यांची योग्य काळजी घेतली नाही तर धूळ, घाण व डाग यामुळे ती खराब होण्याची शक्यता असते.

**७) मातीच्या वस्तू :**

उत्खननात मोठ्या संख्येने मातीची भांडी (मृद्‌भांडी) प्राप्त होतात. कच्च्या मातीची व भाजलेल्या पक्क्यामातीची भांडी असे दोन प्रकार असतात. पुरातत्त्वीशास्त्रात या भांड्यांना 'पुरातत्त्वाची मुळाक्षरे' असे म्हणतात. मातीची भांडी क्षारविरहित पाण्याने धुली जातात. ठिसूळ अथवा दुर्मिळ वर्गातील खापरे साफ करून ती बैडॅक्रिल किंवा १०% सुल्युलॉईडच्या द्रावणाचा लेप देऊन टणक केली जातात. क्षारयुक्त पाण्याने खापरे अथवा मडकी धुवू नये, असे केल्यास क्षाराचा लेप खापरांवर बसून त्यावरील मूळचे रंगकाम अथवा रंगीत नक्षी नष्ट होण्याची भीती असते. ज्या जमिनीत ही मातीची भांडी बराच काळपर्यंत गाडून राहिलेली असतात, त्या जमिनीतही क्षार असू शकतात त्यामुळे अशा ठिकाणाची गाडलेली भांडी काढली तर भांड्यांवरील क्षारांचा थर हा कोणत्या प्रकारचा आहे हे रासायनिक प्रक्रियेच्या मदतीने ओळखता येते. साधारणत: खापरे साध्या पाण्याने स्वच्छ होऊ शकत नाहीत यासाठी टिपॉल हे द्रव पाण्यात घालून त्याचा वापर केला जातो. रंगीत खापरे हायड्रोक्लोरिक अथवा नायटिक ॲसिड सौम्य प्रमाणात मिसळून त्या पाण्यात बुचकळून काढावी. नाजूक व ठिसूळ अशी मातीची भांडी पूर्णपणे सावलीतच वाळवावी, उन्हात ठेवल्यास त्यातील आर्द्रता नष्ट होऊन त्यांचे तुकडे पडण्याची शक्यता असते. कच्च्या मातीच्या वस्तू मात्र कधी पाण्याने धुवू नयेत त्या सावलीत वाळवून मग त्यावर १०% व्हिनाईल ॲसिटेंटचा लेप लावावा. किंवा पेरे वितळून गरम व पातळ असतानाच लावावे. याशिवाय इतर अनेक पद्धती यासाठी वापरत आहेत.

**● चित्रकलाकृतीचे जतन व संवर्धन :**

रंगविलेल्या आकारातून साधलेली कलाकृती म्हणजे चित्र. अशी चित्राची सर्वसाधारण व्याख्या केली जाते. रंगविण्याच्या प्रक्रियेतच चित्र घडले जाते. लेखन आणि रंगलेपन या दोन्ही क्रिया यात अंगभूत असतात. इंग्रजीतील 'Painting' या शब्दाचा अर्थ रंगविण्याच्या क्रियेपुरताच मर्यादित आहे. परंतु चित्रकलेच्या क्षेत्रात लेपनाची क्रिया, रंग-कुंचला-फलकादी माध्यम साधनांची गुणवत्ता, कलावंताच्या भाव-जाणिवांचे चित्राकृतीतील प्रतिबिंब इत्यादी सर्व सर्जन प्रक्रियांचा अंतर्भाव 'Painting' या संज्ञेमध्ये केला जातो.

शिलाखंडावर रेघोट्या ओढणाऱ्या अश्मयुगीन मानवाने चित्रकलेचा पाया घातला. फ्रेंकोकॅटेब्रिअन संस्कृतीतील आदिमानवाने निर्माण केलेली अल्तामिरा येथील भित्तीचित्रे अनन्यसाधारण आहेत. मानवी बुद्धिशक्तींना दुर्गम अशा शक्तिसिद्धी या धातूविद्येतूनच मिळत असल्याने अशक्य ते शक्य' करणाऱ्या चित्रक्रियेबद्दल मानवाला आदिम काळापासून विस्मय वाटत आला आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून चित्रकलेचे पुरावे प्राप्त झालेले आहेत. मानवाने आदिम अवस्थेमध्ये गुहा, गुंफा मध्ये चित्रे काढण्यास प्रारंभ केला. भारतामध्ये प्राचीन ते मध्ययुगीन काळात विविध प्रादेशिक व स्थानिक चित्रशैलीचा उगम व विकास

झाला. यामध्ये अजिंठा चित्रशैली (इ. स. १ ते ६ वे शतक) जैन चित्रशैली (पोथी ग्रंथातील चित्रे इ.स. १३ ते १७ वे शतक) मुघल चित्रशैली (१३ ते इ. स. १८ वे शतक) रजपूत चित्रशैली (इ. स. १६ वे ते १९ वे शतक) पहाडी चित्रशैली (इ. स. १७ वे ते १९ वे शतक) कांगडा चित्रशैली (इ. स. १८ ते १९ वे शतक) इ. चित्रशैली भारतात आढळून येतात.

**अ) लघुचित्राचे जतन व संवर्धन :**

भारतात चित्रकलेमध्ये भित्तिचित्रे व लघुचित्रे असे दोन प्रकार प्रामुख्याने दिसून येतात. भारतातील भित्तीचित्रांचे अजिंठा येथील इ. स. पू. दुसऱ्या ते इ. स. पहिल्या शतकातील नमुने सर्वांत प्राचीन आहेत. मात्र लघुचित्राची निर्मिती इ. स. १० च्या शतकात सुरू झाली. हस्तलिखित पोथ्यांच्या माध्यमातून ही चित्रे प्रथमतः सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. पूर्व भारतातील पाल वंशाचा राजा महीपालच्या कारकिर्दीतील प्रज्ञा पाटमिता (इ. स. ९८४) या बौद्ध हस्तलिखिताच्या सजावटीत ही आद्य लघुचित्रे ताडपत्रावर प्रथम काढण्यात आली. यानंतर रजपूत व मुघलकाळात ताडपत्राच्या ऐवजी कागदाचा वापर करण्यास सुरुवात झाली. लहान आकाराच्या चौकटीतील चित्रांना 'लघुचित्र' ही संज्ञा वापरली जाते. प्राथमिक अवस्थेत धार्मिक आशय हाच याचा विषय होता. मुघल काळात लघुचित्रासाठी इराणमधून कागद आणला जात असे. ब्रिटिश काळात विविध प्रकारच्या कागदाचा वापर लघुचित्रासाठी वापरण्यास सुरुवात झाली. लघुचित्रे देशाची महत्त्वपूर्ण सांस्कृतिक संपत्ती आहे. परंतु भारतात यांच्या जतन व संवर्धनाच्या बाबतीत अगदी मोजक्याच संग्रहालयात याबाबतची तांत्रिक कार्यप्रणाली अस्तित्वात आहे. या लघुचित्राच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक रूढी-परंपरांचे उत्कृष्ट दर्शन होते..

**१. लघुचित्रासाठी अपायकारक घटक :**

हवामानातील बदलांचा लघुचित्रावर विपरीत परिणाम होतो. वातावरणातील आर्द्रता, प्रकाश, उष्णता व आम्लता इ. अनेक घटक लघुचित्रावर परिणाम घडवून आणतात. उच्च तापमान किंवा सापेक्षित आर्द्रतेच्या अभावाने चित्रामध्ये अधिक गतीने विकृती येण्यास सुरुवात होते. तापमान, प्रकाश यांच्या कमी-अधिक स्वरूपामुळे कागद नरम पडतो तर हवामानातील आर्द्रतेमुळे लघुचित्रावरील रंग प्रकाशाच्या प्रभावाने फिकट पडण्यास सुरुवात होते व कागदाचे तंत कमजोर बनतात. सल्फर डाय ऑक्साईड, हायड्रोजन सफ्लाईड आणि धुळीचे कण यासारखे वातावरणातील प्रदूषण चित्रासाठी विशेषतः कागदावरील चित्रासाठी हानिकारक ठरू शकते. हवेमध्ये अस्तित्वात असलेल्या आम्लतेमुळे कागदाच्या तंतूचे विघटन होण्यास प्रारंभ होतो.

दमट हवामानामुळे चित्रावर सूक्ष्म जंतूंची वाढ होण्याचा धोका असतो. लघुचित्रांना कीटक, कृमी व बुरशीपासून विशेष मोठा धोका असतो. यामध्ये प्रामुख्याने वाळवी, पांढरी कसर, झुरळ, मुंगळे इ. समावेश होतो. एखाद्या चित्रास किंवा चित्र समूहास वाळवी वगैरे लागली तर ती पुन्हा वापरण्यास किंवा जतन करण्याच्या योग्यतेची राहात नाही. लघु चित्रावर निर्माण होणाऱ्या अभिवृद्धिचा चित्रावर गंभीर परिणाम होतो. उच्च आर्द्रतेमध्ये याचा विकास अधिक गतीने होतो. कागद हा आर्द्रताशोषक असल्याने तो लवकर मुलायम व नरम होऊन त्यावर बुरशीची वाढ होण्याचा धोका असतो. बुरशी जर निर्माण झाली तर त्यावर काळे डाग

निर्माण होतात याला 'फॉक्सिंग' असे म्हतात. फॉक्सिंगच्या डागाचे प्रमाण वाढत जाते व चित्र प्रतिमा अस्पष्ट व अंधूक होत जातात. कवकासारख्या सूक्ष्म वनस्पतीची वाढ चित्रावर झाल्यास ते लवकर जीर्ण होण्याचा धोका असतो. लघुचित्रावर किंवा तत्सम चित्रकलाकृतीवर एस्परजिलस' व बेनीसीलियस' वर्गातील कवकाची वाढ होते, या कवकाचा प्रसार हवेच्या माध्यमातून होते.

**२. लघुचित्राच्या जतन व संवर्धनाचे विविध उपाय:**

लघुचित्राच्या जतन व संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक औषधाचा व विरंजकाचा वापर करण्यात येतो. याचा वापर करताना योग्य ती काळजी व सावधानता बाळगली पाहिजे. कारण चित्रकलाकृतीच्या नैसर्गिक व मूलभूत रचनेत कोणताही बदल किंवा त्यावर रासायनिक औषधाचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. लघुचित्राचे जतन व संवर्धन करताना प्राप्त चित्रांचे कोणत्या स्वरूपात नुकसान झालेले आहे. याच्या आधारावर त्याचे वर्गीकरण करून घ्यावे. जेणेकरून त्या चित्राला त्या-त्या प्रमाणात उपचार करणे सोपे जाते.

१. फॉक्स मार्क्स पडलेली चित्रे

२. पृथक्कृत डाग किंवा काळे डाग पडलेली चित्रे

३. मोठ्या व विस्तृत काळ्या डागांची चित्रे

चित्राचे वर्गीकरण झाल्यानंतर प्रथम व द्वितीय वर्गातील लघुचित्रांना दुरूस्त करण्याकरिता कार्बोक्सी मिथायल सेल्यूलोजच्या मिश्रणाच्या लेपाचा उपयोग केला जातो. डिस्टल वॉटर व क्लोरामीन टी चे मिश्रण सेल्युलोज पावडरमध्ये मिसळून ही लेई (लेप) तयार केली जाते. या विरंजक लेईचा वापर करण्यापूर्वी चित्राच्या ज्या भागावर वापर करावयाचा आहे त्या ठिकाणी टाल्वीन व एसीटोनमध्ये तयार केलेल्या पाली मिथायल एसीटेटच्या मिश्रणाचा लेप लावला जातो. याच्या वापरामुळे लेई काढते वेळी क्षीण झालेल्या रंगाच्या भागास संरक्षण मिळते म्हणजे तो रंग विखुरला जात नाही. विरंजक लेईचा उपयोग ज्या ठिकाणी काळे डाग पडलेले असतात त्या ठिकाणी केला जाऊ शकतो. १०-२० मिनिटे हा लेप लावून नंतर तो पातळ व टोकदार आकाराच्या चाकूच्या साहाय्याने बाजूला केला जातो. लेप बाजूला केल्यानंतर ओलसर झालेला भाग हेअर ड्रायरने सुकवून घेतला पाहिजे. जे जुनाट व काळे डाग असतात ते घालवण्यासाठी ही प्रक्रिया २-३ वेळा केली जाते.

तृतीय वर्गातील लघुचित्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी निरपेक्ष अल्कोहोल व सोडियम पॅराटॉल्वीन सल्फोन क्लोरामीनचा वापर केला जातो. डिस्टल वॉटर आणि क्लोरामीन टीचे मिश्रण अल्कोहोलमध्ये मिसळून ते फोटोग्राफीक ताम्रचिनी ट्रे मध्ये घेऊन त्यामध्ये चित्र बुडवले जाते. चित्र मिश्रणात व्यवस्थित बुडेल यासाठी त्यामध्ये निरपेक्ष अल्कोहोल अधिक प्रमाणात वापरले जाते. ५ तास चित्र त्यामध्ये बुडवून ठेवल्यानंतर रंगहीन अल्कोहोल मिश्रण पिवळ्या रंगात बदलून जाते. त्यानंतर ट्रेमधील पिवळ्या रंगाचे अल्कोलचे द्रावण पूर्णपणे सायफण पद्धतीने बाजूला काढून त्या चित्राला ६०% मिथाईल व अल्कोहोलने धुवून क्लोरामीन

टी पूर्णपणे निघून गेलेले आहे याची खात्री करून घ्यावी. चित्र पूर्णपणे सुकवल्यानंतर त्याला पूर्वीचे स्वरूप येते.

मऊ व जीर्ण झालेल्या चित्रावरील डाग काढून टाकण्यासाठी अल्कोहोल विरंजक मिश्रणात बुडवण्यापूर्वी त्यावर एक रक्षात्मक लेप (प्रलेप) लावला जातो. हा लेप पाली विनायल एसीटेट व एसीटोनमध्ये टाल्वीन मिसळून बनवला जातो. या प्रक्रियेमुळे माशाचे डाग, काळे डाग व फॉक्स मार्क्स निघून जातात.

**३. वाळवीपासून लघुचित्राचे संरक्षण व उपाय :**

पांढरी कसर व पुस्तकी कीड्यांपेक्षा वाळवीपासून लघुचित्रांना अधिक धोका असतो. यापासून बचाव करण्यासाठी पुढील उपाय केले जातात.

१. वाळवीच्या आक्रमणापासून लघुचित्राचे संरक्षण करण्यासाठी त्याला कार्बन डायसल्फाईडची धुरी द्यावी.

२. चित्राच्या मागील बाजूस लावलेले पुढे की ज्यांचा चित्राच्या भागास प्रत्यक्ष संपर्क आलेला आहे तो भाग अत्यंत काळजीपूर्वक वेगळा करून घ्यावा. चित्र वेगळे केल्यानंतर चित्रावर नेपाळी कागदाचे अस्तर लावले जाते व त्यानंतर कापडाच्या लगद्यापासून बनवलेल्या पुठ्यावर ते चिटकवले जाते.

३. चित्राला अस्तर लावून झाल्यानंतर चित्राच्या पृष्ठभागावर निर्माण झालेल्या विवरामध्ये आजुबाजूच्या रंगाच्या अनुरूप व प्रमाणात रंगीत मेन भरले जाते व त्यानंतर ९% पाली मिथायल मेथाकायलेट व टाल्वीनमध्ये बनविलेल्या मिश्रणाचा पातळ लेप लावला जातो.

**४. चित्रावरील रोगन (वार्निश)ची सफाई :**

चित्रावर विविध रोगनचा लेप दिलेला असतो. काळाच्या ओघात चित्रावरील वार्निशवर बिघाड किंवा विकृती निर्माण होते. चित्राच्या विकृत स्वरूपाची दुरूस्ती करण्यासाठी कार्बनिक द्रावणाचा वापर केला जातो. रासायनिक परिवर्तन व त्या-त्या काळातील विविध घटकांमुळे चित्रावरील रेसिन वार्निश तांबूस-पिवळे होते व मूळ चित्राचे स्वरूप बदलते. विकृत वार्निशला बाजूला करण्यासाठी येमॉल व बेन्जीन ३:१ या प्रमाणात घेऊन त्याचा वापर वार्निश बाजूला करण्यासाठी होतो. याशिवाय खराब वार्निश बाजूला करण्यासाठी इथायल अल्कोहोल किंवा निरपेक्ष अल्कोहोलचा वापर प्रतिकर्मकाच्या स्वरूपात केला जातो.

**५. कोल तारांच्या (Coaltar) डागांची सफाई :**

लघुचित्राच्या जतन व संवर्धनाच्या आज अनेक आधुनिक पद्धती अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर नव-नवीन यांत्रिक उपकरणेही अस्तित्वात आहेत. परंतु यांच्या अगोदर या चित्राचे जतन करण्यासाठी पारंपरिक पद्धतीचा वापर केला जात होता. लघुचित्रांना पांढरी कसर किंवा वाळवी लागू नये म्हणून पृष्ठभागावर विशिष्ट लेप दिला जात असे परंतु या पद्धतीत अनेक त्रुटी होत्या. परिणामी, चित्राचे नुकसान होत होते. या लेपातील विशिष्ट घटक कागद शोषन घेत असल्याने नंतरच्या काळात यावर 'कोलटार' प्रकारचे डाग निर्माण होत. यामुळे

चित्राचे रंग अस्पष्ट व फिकट होतात. यापासून चित्राचे जतन करण्यासाठी अशा प्रकारची चित्रे एका ट्रेमध्ये बेन्जीन व टाल्वीनचे द्रावण १:१ या प्रमाणात घेऊन त्यामध्ये चित्र बुडवून ठेवले जाते. ही प्रक्रिया चित्रावरील डाग निघून जाईपर्यंत केली जाते. याचा वापर करून तेल किंवा तत्सम पदार्थांचे डाग सुद्धा काढले जातात.

**६. चित्राचे तुकडे पडू नये म्हणून घ्यावयाची काळजी :**

लघुचित्रासाठी वापरण्यात आलेले रंग ठरावीक काळानंतर त्यामधील चिकटपणा नष्ट होऊन रंगाच्या छटा किंवा लेपन केलेले पदर वेगळे होऊन तुकडे पडतात. रंगाची जाडी जेवढी जास्त असते तेवढे तुकडे पडण्याचे प्रमाण जास्त असते. कारण काळाच्या ओघात रंगाची धारणक्षमता कमकुवत होते. अशा चित्राचे जतन व संवर्धन करण्यासाटी ०.८% पाली मिथायल व मेथाक्रायलेट एसीटोन आणि टाल्वीन १:२ या प्रमाणात घेऊन त्याचे मिश्रण तयार करून त्याद्वारे त्यावर उपचार केला जातो. ही प्रकिया ६-८ वेळा केली जाते. यामुळे मूळ चित्रातील केवळ रंगांनाच चमक येत नाही तर सैल किंवा ढिल्या पडलेल्या रंगाच्या पदरांना मजबुती मिळते व मूळ स्वरूपात राहण्यास मदत होते. या मिश्रणाचा लेप चित्रावर दिल्याने चित्राच्या पृष्ठभागावरील रंगाच्या छटा व पदराचे तुकडे व पापुद्रे बनवण्यापासून बचाव होतो.

**७. जीर्ण चित्राच्या संवर्धनाचे उपाय :**

चित्राचे ठरावीक काळात योग्य पद्धतीने जतन व संवर्धन झाले नाही तर ते काळाच्या ओघात जीर्ण होतात. हवामानातील बदलामुळे रासायनिक व जैविक प्रक्रिया चित्रांना हळूहळू जीर्ण बनवते. परिणामी, चित्रे फाटण्यास किंवा त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात होते. चित्रामध्ये असलेल्या आम्लतेवर योग्य उपचार झाला पाहिजे. यासाठी अशा चित्रांना अमोनियांच्या वाफेमध्ये एका हवाबंद पेटीमध्ये अथवा खोलीमध्ये ठेवले जाते. यानंतर या चित्राला मजबुती देण्यासाठी मोठा प्लास्टीक पुठ्ठा (झिल्लीचा) आधार देण्यासाठी चिटकवला जातो. जीर्ण होऊन तुकडे पडलेल्या चित्रांना मोठ्या आकाराच्या प्लास्टीक पुठ्यावर एकत्र करून ते एसीटोनने चिकटवले जाते. त्यावर थोडा दाब देऊन ते चित्र नंतर सुखवून घेतले जाते. सुखवलेल्या चित्रावर ०.७% पाली मिथायल मेथाक्रायलेट व टॉल्वीनच्या पासून बनवलेल्या मिश्रणाचे तीन लेप लावले जातात किंवा विनायल अथवा एकायलेट यांच्यापासून तयार करण्यात आलेल्या प्लास्टिक पुठ्यावर चिटकवले जाते. या पद्धतीचे खालील फायदे आहेत.

१. यामध्ये वापरलेले साहित्य आर्द्रता शोषक नसते. त्यामुळे ते मऊ पडत नाही.

२. पर्यावरणातील बदलांचा यावर सामान्यपणे कोणताही परिणाम होत नाही.

३. वातावरणातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या विकृतीचा दीर्घकाळ प्रतिरोध करण्याची क्षमता यामध्ये असते.

४. चित्रकलाकृतीत यामुळे दीर्घकालीन मजबुती मिळते.

५. आवश्यकता भासल्यास मूळ चित्राला कोणत्याही प्रकारची इजा केल्याशिवाय हे वेगळे केले जाऊ शकते.

### ८. संरक्षक लेपाचा वापर व फायदे :

लघुचित्राच्या संरक्षणासाठी योग्य त्या उपचार पद्धतीचा अवलंब केल्यानंतरही त्यावर संरक्षणात्मक लेप देणे आवश्यक असते. कारण जरी लघुचित्रासाठी विविध संरक्षणात्मक उपाय केलेले असले तरी विविध प्रकारच्या हानिकारक घटकापासून त्याला धोका हा असतोच. त्यासाठी विशेष प्रकारचा लेप देणे आवश्यक असते. हा लेप तयार करण्यासाठी ९.७% पाली मिथायल मेथा क्रायलेट घेऊन ते टॉल्वीनमध्ये मिसळून घेतले जाते. हा लेप अतिशय पातळ असला तरी वातावरणातील अपायकारक घटकापासून चित्राचे संरक्षण करण्याची ताकद यामध्ये असते.

या लेपाचे प्रामुख्याने खालील फायदे असतात.

१. बुरशी व कवकापासून चित्राचे संरक्षण होते.

२. हा लेप रंगहीन, पारदर्शक व मऊ असतो.

३. वातावरणातील प्रदूषणापासून हा लेप चित्राचे संरक्षण करतो.

४. चित्राच्या मूळ रचनेत कोणत्याही स्वरूपाचा बदल यामुळे होत नाही.

९. लघुचित्रे भांडारगृहात ठेवण्याची शास्त्रीय पद्धत:

कागद, कागदी पुढे किंवा तत्सम घटकावर चित्रित केलेल्या चित्रकलाकृती भांडारगृहात जतन करून ठेवतांना विशेष काळजी घेतली पाहिजे. भांडारगृहात ही चित्रे वाकण्याची, दुमडण्याची अथवा फाटण्याची शक्यता असते. कागदावरच्या छोट्या चित्राचे संरक्षण करण्यासाठी ऑल रॅग पुठ्याच्या चौकटीत बिजागरीयुक्त हात यामध्ये चित्र सुरक्षितरित्या हातात धरून पाहता येण्यासाठी वरच्या हातरीचा खिडकीसारखा तुकडा कापून त्यात ती बसवणे हा उत्तम मार्ग आहे. या पद्धतीमध्ये चित्राच्या पृष्ठभागावर खरचटणे अथवा ओरखडा पडू नये यासाठी उत्तम दर्जाचा पातळ टिश्यू कागद चित्राच्या पृष्ठभागावर दोन्ही हातऱ्यामध्ये ठेवावे. चौकटीत न बसवलेले चित्र नेहमी टिश्यू कागदाद्वारे अलग करावे आणि कोपऱ्याद्वारे उचलावे. त्यामुळे रंगवलेल्या भागास हातांचा स्पर्श होणार नाही. लघुचित्रे नियंत्रित वातावरणात संरक्षित करावयाची असतील ६३ओ + ५ फरेनहाइट तापमान व ५८ओ+५ % फरेनहाईट सापेक्षित आर्द्रता असणे आवश्यक आहे.

### ब) तैलचित्रकलाकृतीचे जतन व संवर्धन :

अळशीच्या तेलामध्ये विविध रंगाचे मिश्रण करून तैलरंग चित्र बनवले जाते. या पद्धतीचा शोध व्हान आयिक (१३९०-१४४१) व ह्यूबर्ट आयिक (१३६६-१४२६) या फ्लेमिश चित्रकारांनी लावला असे मानला जाते. मध्ययुगीन कालखंडात तैलचित्र काष्ठफलकावर चित्रित केली जात होती. यासाठी ओकच्या लाकडाचा वापर केला जात असे. त्यानंतर कापूस, ताग, लिनन, रेशीम इ. कापडापासून कॅनव्हास बनविला जाऊ लागला, कॅनव्हास लाकडी चौकटीवर ताणून चित्रफलक बनविण्याची पद्धत सुरू झाली. तैलचित्र ज्या फलकांवर रंगवयाचे असेल त्या फलकावर प्रथम सफेदीचे तीन थर द्यावे लागतात. त्या प्रक्रियेस 'प्रायमिंग' असे म्हणतात.

या पहिल्या हाताला 'गेसा' असे म्हणतात. त्यात गोंद, झिंक ऑक्साईड व प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा समावेश असतो. भारतात ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत या पद्धतीने चित्रे रंगविण्याची पद्धती अस्तित्वात नव्हती. राजा रविवर्मा (१८४८-१९०६) हा भारतातील पहिला तैलरंग चित्रकार मानला जातो.

तैलचित्र जतन व संवर्धनाच्या अनेक आधुनिक पद्धती आज अस्तित्वात आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कलाकारांनी साकारलेल्या विविध चित्रकलाकृतीचे प्रयोगशाळेत चिकित्सक व विश्लेषणात्मक अध्ययन करून त्यातील भौतिक व रासायनिक गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केला जातो. यामधील हानिकारक घटकांच्यावर कशा प्रकारे प्रतिबंधन घालता येईल याचा विचार करून त्याचा जीर्णोद्धार केला जातो. या उपचार पद्धतीमध्ये जी व्यक्ती त्यावर काम करत असते त्या व्यक्तीला इतिहासाचे खास करून चित्रकलेच्या क्षेत्रातील कितपत ज्ञान अवगत आहे त्यावर त्याची यशस्वीता अवलंबून असते.

**अ) तैलचित्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रामुख्याने खालील उपाय केले जातात :**

१. अपायकारक घटकाना दूर करणे, चित्रकलाकृती स्वच्छ करणे, चित्रकलाकृतीच्या मजबुतीकरणाचे उपाय व चित्रकलाकृतीचे संरक्षणात्मक उपाय.

२. चिकित्सक व विश्लेषणात्मक पद्धतीने वापरलेल्या विविध रंगाचे पृथक्करण, विलुप्त रंगाचा उपचार व क्षतिग्रस्त भागावरील रंगाचे पुर्नलेपण करणे इ.

वरील प्रकारच्या उपायांचा उद्देश केवळ विकृत किंवा खराब चित्रकलाकृतीची केवळ दुरूस्ती करणे नसून त्या चित्राचे मूळ स्वरूप पुन्हा प्राप्त करून देणे व त्यांचे आयुष्यमान वाढवणे हा आहे.

**ब) तैलचित्राचे संवर्धन व आधुनिकीकरणाचे उपाय :**

तैलचित्रकलाकृतीवरील रंग काळाच्या ओघात फिकट व अस्पष्ट होत जातात. चित्राचे आकुंचण पावणे, तुकडे पडणे इ. प्रकारचे भौतिक बदल वातावरणातील बदलामुळे घडून येतात. परंतु चित्र पिवळे पडणे, चित्राला भेगा पडणे, रंगहीन होणे, नष्ट होणे, जीर्ण होणे हे सर्व ऑक्सिडीकरणाचे परिणाम आहेत. अशा चित्राचे परिमार्जन अथवा त्यावर उपचार करण्यापूर्वी ज्या चित्रावर रासायनिक प्रक्रिया करावयाची आहे अशा चित्राचे रेकिंग लाईट, सूक्ष्मदर्शी, पॅराबैगनी, इन्फ्राटेड इ. च्या माध्यमातून वैज्ञानिक परीक्षण केले जाते. चित्रावर उपचार करण्यापूर्वी त्या चित्राची निर्मिती कोणत्या काळात, कशा प्रकारे केली व कोणकोणत्या घटकांचा वापर करण्यात आलेला आहे यांच्या नोंदी काळजीपूर्वक करणे गरजेचे असते. कारण त्यामध्ये कोणकोणत्या घटकांचा वापर करण्यात आलेला आहे त्या चित्राच्या संवर्धनाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा घटक असतो. विविध घटकाचे परीक्षण केल्यानंतर त्या चित्राच्या संवर्धनासाठी कोणती पद्धती वापरली पाहिजे याचा निर्णय घेणे सोपे जाते.

चित्राच्या पृष्ठभागावरील वार्निशचे पूर्णपणे पृथक्करण करणे शक्य नसते. शिवाय आपण ज्या रासायनिक संवर्धकांच्याद्वारे त्यावर उपचार करणार आहोत त्यासंबंधी जर योग्य आकलन झाले नाही तर त्या चित्राच्या रंगावर अथवा एकूणच चित्राचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असते. चित्राचे परिमार्जन करण्याच्या विधीमध्ये ज्या ठिकाणी चित्राची दुरूस्ती करायची आहे त्या ठिकाणी कापूस किंवा लोकरीच्या धाग्याचे लेपन केले जाते.

हे दोन्ही घटक खराब वार्निशला बाजूला करण्यास मदत करतात. शिवाय त्यांचा चित्राच्या पृष्ठभागावरील रंगावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

चित्रसंवर्धन करीत असताना चित्रात वापरलेल्या रंगाच्या थरावर करावयाची संवर्धकाची प्रक्रिया ही त्या प्रक्रियेचा कालावधी, तापक्रम, रंगाच्या थरांची जाडी व त्याचे आयुष्यमान यावर आधारीत असते. संवर्धकाच्या प्रयोगाने रंगाचा थर फुलून येतो व त्यावरील अनावश्यक घटक दूर होतात. त्यानंतर विरंजन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रंगांच्या मध्ये आकुंचन पावण्याची प्रक्रिया होत राहते. यामध्ये प्रसरण-आकुंचन पावण्याची क्रिया ध्यानात न घेता जर संवर्धकाचा अधिक वापर केला तर चित्रांना हानी पोहोचण्याची शक्यता असते. एकाच ठिकाणी संवर्धकाचा पुन्हा-पुन्हा लेप दिल्यास अथवा वापर केल्यास रंगाची जाडी इतकी जीर्ण होऊन जाते की त्यानंतर थोडीसी देखील यांत्रिक प्रक्रिया संपूर्ण चित्राला हानी पोहोचवू शकते किंवा धोकादायक ठरू शकते. त्यासाठी संवर्धकाचा वापर मोजून-तोलून केला पाहिजे. यासाठीचे संवर्धक अशा प्रकारचे असले पाहिजे की, ते रंगाच्या थरांना अधिक इजा न करता रोगनमध्ये सामावून जाऊ शकले पाहिजेत. स्प्रिट रोगन (वार्निश) चित्र संवर्धनामध्ये समस्या निर्माण करू शकते. याला दूर करण्यासाठी इथाइल अल्कोहोल, एसीटोन, हाइएसीटोन अल्कोहोल इ. ऑक्सिजनयुक्त संवर्धकाचा वापर केला जातो. डांबराप्रमाणे रोगन तेल चित्रांना विशेष करून प्रभावित करते. चित्रांच्या संवर्धनासाठी वापरण्यात येणाऱ्या संवर्धकाच्या प्रसरण व आकुंचन प्रक्रियेच्या गतीमध्ये परस्पर साम्य असणे आवश्यक आहे. काही वेळेला तीव्र गतीने चित्राला प्रभावीत करणारे व मंद गतीने प्रसरण पावणारे संवर्धक जसे मिथायल अल्कोहोल आणि काही तैल चित्रासाठी वापरले जाणारे सामान्य ब्यूटाइल अल्कोहोल जसे मंद गतीने चित्रावर प्रभाव करते किंवा अधिक प्रसरण पावणारे संवर्धक सुरक्षित सिद्ध झाले आहे. चित्राच्या संवर्धनासाठी आइसो ब्यूटाइल, एन एमायल, एन ब्यूटाइल, आइसो प्रोपायल, एथायल, आइसो ऑक्टोन व एन हेक्सेन-अल्कोहोल यांचा प्रयोग प्रतिबंधक म्हणून केला जातो.

**क) इन पेन्टिंग पद्धती :**

तैलचित्राच्या संवर्धनासाठी 'इन पेन्टिंग' पद्धतीचा उपयोग केला जातो. चित्रावर पडलेल्या डागांना नाहीसे करण्यासाठी व नवीन रंगाचे लेपन करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो. पाली मेथाक्रायलेटने चित्रावरील वेगळ्या केलेल्या रोगनच्या जागी इन पेन्टिंग केले जाते. यासाठी जाइलीनमध्ये मिश्रित केलेल्या ब्यूटाइल-मेथा क्रायलेट पालीमरमध्ये विविध रंगाचे चूर्ण घालून त्याचा वापर इन पेन्टिंगसाठी केला जातो. इन पेन्टींग संश्लेषित माध्यमाच्या आवश्यकतेनुसार वेगळे केले जाऊ शकते. हे या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. शिवाय हे कधीच पिवळे पडत नाही. इन पेन्टिंग सुखवल्यानंतर त्यावर पुन्हा रोगन लावले जाते त्यामुळे चित्राला पुन्हा चकाकी येते.

**ड) विकृत रंगथराची (स्तर) उपचार पद्धती :**

कोरड्या व शुष्क वातावरणामुळे चित्राच्या पृष्ठभागावरील रंग आकुंचन पावतात. कोरडे व कडक होऊन आकुंचन पावलेले रंग स्पर्श होताच किंवा चित्र मुडपले अथवा दुमडले गेले असता त्यावरील रंगाचे तुकडे पडतात किंवा त्यावर रेषा अथवा भेगा पडतात. बऱ्याचवेळा ते पृष्ठभागापासून वेगळे होतात. जीर्ण झालेल्या रंगाचे थर कॅन्व्हास किंवा काष्ठपृष्ठ वातावरणातली तापमान व आर्द्रतेच्या कमी-अधिक प्रमाणामुळे प्रसरण किंवा

आकुंचन पावतात. त्यामुळे त्यांच्या पृष्ठभागावरील रंग शिथिल पडतात. परिणामी, त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात होते. अशा अपायकारक चित्राच्या संरक्षणासाठी टाल्वीनमध्ये तयार केलेले पाली मिथायल मेथा-क्रायलेटचे मिश्रण तयार करून त्यावर फवारले जाते. त्याचा रंगावर कोणताही विपरित परिणाम होत नाही. चित्रावर फवारलेले मिश्रण चित्र व्यवस्थित शोषून घेते, त्यामुळे कडक व भेगा पडलेले रंगाचा पृष्ठभाग या मिश्रणाच्या फवारणीमुळे मऊ व नरम राहण्यास मदत होते. या पद्धतीला उपचार केल्यानंतर त्यावर पुन्हा त्याचे योग्य संरक्षण व्हावे म्हणून त्यावर रोगन लावले जाते की, ज्याच्यामुळे चित्रकलाकृतीला चकाकी येते.

**इ) चित्रावर पडलेल्या भेगांची उपचार पद्धती :**

तैलचित्र ज्या कॅनव्हासवरती चित्रीत केलेले आहे त्याला जर भेगा अथवा रेषा पडलेल्या असतील तर त्या चित्राच्या चारही बाजूच्या फाटलेल्या कडा कापून वेगळ्या कराव्यात व पृष्ठभागाच्या वरून अथवा भेगा पडलेला भाग धाग्याने शिवून घ्यावा. त्यावर सेलोटेप चिटकवून घ्यावा. त्यानंतर त्यावर पाली विनायल एसीटेट च्या मिश्रणामधील शिवलेल्या भागाच्या आकाराचा तुकडा लावला जातो (पैबंद) हे मिश्रण थंड असताना लावले जाते जेणेकरून त्याला टिकवण्यासाठी दबाव टाकण्याची आवश्यकता राहत नाही. जेव्हा-केव्ह गरज वाटेल तेव्हा हे चिटकवलेले मिश्रण आइसो प्रोपायल अल्कोहोल वापरून बाजूला केले जावू शकते.

**ई) छिद्रे पडलेल्या चित्रावरील उपचार पद्धती :**

तेलचित्रावर जर छिद्रे पडलेली असतील तर कॅनव्हासच्या धाग्यानेच छिद्र शिवून घेतले जाते किंवा कॅनव्हासचा तेवढ्याच आकाराचा तुकडा धाग्याने शिवून बसवला जातो. तयार केलेली चकती चिटकवण्यासाठी पाली विनायक एसीटेटच्या मिश्रणाचा उपयोग केला जातो. त्यानंतर चित्र उलटे करून एकत्रित केलेले एक्रायलिकचा भुसा चित्राच्या पृष्ठभागाच्या समतल होईपर्यंत भरून घेतला जातो.

**उ) जीर्ण तैलचित्रासाठी लेपन पद्धती :**

जीर्ण-शीर्ण तैलचित्रासाठी त्याचे वयोमान वाढविण्यासाठी विविध रासायनिक घटकांचा लेप दिला जातो. हा लेप टाल्वीनमध्ये पाली विनायल ब्यूटाइल आइसो प्रोपाईल अल्कोहोल आणि पाली मिथायल मेथाक्रायलेटचे मिश्रण तयार करून केला जातो, कॅनव्हास ज्या भागात जीर्ण झालेला आहे त्या भागाच्या पृष्ठभागावर याचा लेप दिला जातो. एक लेप देऊन तो सुकवून घेतला जातो. पहिला लेप सुकल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचा लेप दिला जातो. पृष्ठभागावरील लेप पुरोभागापर्यंत पोहोचतो व कॅनव्हासच्या धाग्यांना मजबुती प्रदान करतो.

**ऊ) तैलचित्र भांडारगृहात ठेवण्याची शास्त्रीय पद्धती :**

तैलचित्रे जर भांडारगृहात ठेवायची असतील तर ती शास्त्रीय पद्धतीने ठेवली पाहिजेत. तैलचित्र ज्या कॅनव्हासवरती चित्रीत केलेली असतात त्यावर हवामानातील आर्द्रता व उष्णतेचा परिणाम होतो. आर्द्रतेमुळे कॅनव्हास मऊ पडून रंग सुट्टे होण्याचा धोका असतो तर उष्णतेमुळे कॅनव्हास अधिक कडक व ताठर बनतो व पृष्ठभागावरील रंगाला तडे पडतात आणि त्यांचे चूर्ण होऊन ते निखळण्याचा धोका असतो. अशा प्रकारची चित्रे चौकटीवर ताण देऊन बसवल्याशिवाय ठेवू नयेत. चित्रफलक सतत ताठ राहण्यासाठी ताणण्याच्या चौकटीच्या

कोपऱ्यास पाचर अथवा चाकीची सोय करावी. छोट्या पट्ट्ये स्क्रू ने चौकटीला बसवून चौकटीत चित्रे अडकवावीत. परंतु त्यांना खिळे मात्र मारू नयेत.

कॅनव्हासवरील चित्राला जर जाड रंग दिला असेल तर अशा चित्राची गोल गुंडाळी करू नये. क्वचित प्रसंगी गुंडाळी करणे गरजेचे असेल तर रंग बाहेरील बाजूला राहील याची खबरदारी घ्यावी. भांडारगृहात चित्राची साठवणूक करताना चित्रे परस्परांना चिकटणार नाहीत अथवा अन्य कोणत्याही वस्तूच्या संपर्कात येणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. आधुनिक भांडारगृहात अशा प्रकारची चित्रे टांगून ठेवण्याची व्यवस्था केलेली असते.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१) वस्तूंचे जतन करताना .......... स्थिती मजबूत केली जाते.

२) संवर्धन या संकल्पनेमध्ये ............ चा समावेश होतो.

३) वस्तूला लागणारे हाताचे नैसर्गिक तेल ....... घटकाला आकर्षित करते.

४) कृमी व बुरशीच्या वाढीस .......... घटक कारणीभूत ठरतात.

५) प्रामुख्याने .......... कारणाने रंग निस्तेज होतो.

६) जैविक अपकर्ष घडवून आणणाऱ्या घटकांत ......... समावेश होत नाही.

७) आर्द्रता मोजण्यासाठी .......... मापकाचा उपयोग केला जातो.

८) पांढरी कसरने खराब झालेल्या पुस्तकाला .......... धुरी देतात.

९) तैलचित्र निर्मितीसाठी .......... तेलाचा वापर करतात.

१०) दगडाच्या क्षाराचे प्रमाणं मोजण्यासाठी .......... वापर करतात.

## ३.३ सारांश :

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या कागदपत्राच्या व वास्तूचे जतन व संवर्धन करण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला दिसतो. भारताला प्रदीर्घ असा ऐतिहासिक-सांस्कृकि वारसा लाभलेला आहे. या ऐतिहासिक-सांस्कृतिक वारस्याकडे मात्र गांभीर्यातने न पाहिल्याने त्याचा काळाच्या ओघात विनाश घडून गेलेला दिसतो. यासाठी नैसर्गिक व मानवनिर्मित घटक कारणीभूत आहेत. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर या घटकांच्या जतन व संवर्धनासाठी त्यांनी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न केले. यातून भारतात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' खात्याची निर्मिती झाली. यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपाय योजला राबविल्या गेलेल्या दिसतात. २० व्या शतकात जतन व संवर्धनाच्या अनेक

नवनवीन आधुनिक पद्धतीचा शोध लागल्याने नवीन तांत्रिक चिकित्सा पद्धती विकसित झालेल्या आहेत. पारंपरिक पद्धतीच्या ऐवजी वैज्ञानिक ज्ञानावर आधारीत जतन व संवर्धनाच्या नविन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून त्यांचे चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करून त्यावर जतन व संवर्धनाच्या प्रक्रिया केल्या जातात. ब्रिटिशांनी सुरुवात केलेल्या या प्रयत्नांच्या फलस्वरूप अनेक स्मारकांचे जतन व संवर्धन झालेले आहे तर जो ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध झालेला होता त्याचेही चांगल्या प्रकारे जतन झालेले दिसते.

## ३.४ पारिभाषिक शब्द :

आर्द्रकारक : ओलसर करणारा

निष्कास : निर्वात होणे

विघटीत : लहान रेणूत रूपांतरित होणे

दृढीकरण : दृढता आणण्याची क्रिया

ऑक्सिकरण: ऑक्सिजनचा इतर रेणूबरोबर होणारा संयोग

संसेचन : भरणे अथवा मुक्त करणे

विरंजक : रंग नाहीसा करणारा

लवण : क्षार

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**● स्वयं: अध्ययन प्रश्न–१ची उत्तरे**

१) ग्रीक, २) १९५१, ३) १९५३, ४) सर विल्यम जोन्स,
५) कलकत्ता, ६) ग. ज. कर्झन, ७) १८५१, ८) कलकत्ता,
९) लॉर्ड कॅनिंग, १०) पुणे

**● स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

१) हस्तकला, २) मुंबई , ३) मुंबई, ४) १९६८,
५) राजराजा संग्रहालय, ६) तामिळनाडू, ७) राष्ट्रीय, ८) प्रिन्स ऑफ वेल्स,
९) १९५२, १०) जयपूर

**● स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

१) भौतिक–रासायनिक, २) जतन व पुर्नस्थापना, ३) धुळ, ४) उच्च आर्द्रता,

५) प्रकाश,　　६) ऑर्किड,　　७) थर्मोहायग्रोग्राफ,　८) डायक्लोरेबिञ्झन,

९) आळशीतेल,　　१०) सिल्व्हर नायट्रेड

**३.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**(अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. वस्तूसंग्रहालयाची व्याख्या, स्वरूप स्पष्ट करा.

२. संग्रहालयाचे प्रकार विशद करा.

३. वस्तूसंकलनाच्या पद्धती सांगा.

४. वस्तूंच्या विनाशाचे भौतिक व पर्यावरणीय करणे सांगा.

५. लघुचित्रव तैलचित्रकलाकृतीच्या जतन व संवर्धनाचे उपाय सांगा.

७. सेंद्रिय घकांच्या जतन व संवर्धनाचे उपाय सांगा.

८. असेंद्रिय घकांच्या जतन व संवर्धनाचे उपाय सांगा.

**ब) टीपा लिहा.**

१. संग्रहालयाचे महत्व.

२) तापमान व आर्द्रता.

३) कागदपत्रांना धुरी देण्याची पद्धती.

४) इन पेन्टिंग पद्धती.

**३.७ संदर्भ ग्रंथ वधिक वाचनासाठीचे ग्रंथ :**


१. डॉ. धाटावकर भास्कर, महाराष्ट्रातील शासकीय पुरालेखागारांची निर्मिती आणि कार्य, चेतन प्रकाशन, मुंबई, २०१०.

२. खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दफ्तरखाने वर्णन व तंत्र, मुंबई.

३. डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

४. अगरवाल ओ. पी. (अनु. सुजला देव), कलावस्तू आणि ग्रंथालय साहित्याचे जतन, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

५. डॉ. शुक्ल जी. व डॉ. पांडे वि., संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसीराम, नवी दिल्ली.

६. Sarkar H., Museums and Protection of Monument and -ntiquities in India, New Delhi, 1980.

७. Bhomik S. K., Protection and Conservation of Museums and Fine -rts.

८. Agarwal O. P. Conservation of Manuserits and Pantings of South East -sia, london, 1984.

❖❖❖

## घटक – ४

# वारस पर्यटनाचा अर्थबोध

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय – विवेचन

४.२.१ वारसा पर्यटनाची संकल्पना, व्याप्ती व महत्त्व

४.२.२ पर्यटन म्हणजे काय? व ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.२.३ भारतातील जागतिक वारसा स्थळे

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तर

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४. उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- वारसा पर्यटनाची संकल्पना स्पष्ट करता येईल.
- पर्यटनाचे महत्त्व विषद करता येईल.
- पर्यटनाच्या व्याख्या स्पष्ट करता येतील.
- प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पर्यटनाचा विकास कसा होत गेला याचे ज्ञान होईल.
- भारतातील वारसा पर्यटन स्थळांचा आढावा घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून ‘प्रवास’ हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. याकाळामध्ये विविध कारणांनी प्रवास केला जात असे. यात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, नवीन व चमत्कारिक स्थळांचा शोध घेणे,

पर्यावरणातील नवीन बदल अनुभवणे, धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे, व्यापार इ. गोष्टींचा अंतर्भाव होता. प्रवासाची ही ध्येये नवीन नाहीत. सध्या ज्या मानवी व्यवसायाला 'पर्यटन' म्हणतात त्याचे मूळ प्राचीन प्रवासात आढळते. 'पर्यटन' [Tourism] ही संज्ञा 'प्रवास' [Tour] या शब्दाशी संबंधित आहे. मानवी संस्कृतीच्या विकासामुळे पर्यटनास व्यापक स्वरूप प्राप्त झाले. वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार, व्यापार व इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला चालना मिळाली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा हमानवाचा एक महत्वपूर्ण आर्थिक व्यवसाय बनलेला आहे. या व्यवसायाचे वैशिष्ट्ये म्हणजे जगातील विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांमध्ये त्याचा विकास होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पर्यटन विकासाला विशेष चालना मिळाली. कारण वाहतुकीच्या विविध साधनांचा विशेषतः हवाई वाहतुकीचा प्रसार या काळात झाला. कमीत कमी वेळेत जगाच्या कोणत्याही प्रदेशात पोहचणे यामुळे शक्य झाले. या शतकाच्या उत्तरार्धात वाढते नाकरीकरण, औद्योगिकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार व इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला चालना मिळाली. पर्यटनाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन जगातील विकसित व विकसनशील अशा दोन्ही राष्ट्रांमध्ये पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन दिले जात आहे. दळणवळणाच्या साधनांचा प्रसार, पर्यटनाला मिळणारी व्यापक प्रसिद्धी आणि मुख्यत्व लोकांमध्ये पर्यटनाबद्दलची वाढती आवड यामुळे पर्यटन हा जागतिक महत्वाचा व्यवसाय बनलेला आहे.

पर्यटनाच्या विकासासाठी अनेक घटक कारणीभूत असतात. यामध्ये ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक घटकांना पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वारसा पर्यटनाच्या ऐतिहासिक संकल्पना, व्याप्ती, महत्त्व तसेच पर्यटनाचा अर्थ, इतिहास आणि भारतातील ऐतिहासिक वारसा पर्यटन स्थळे या घटकांची मांडणी करण्यात आली आहे.

## ४.२ विषय विवेचन

वारसा पर्यटन म्हणजे काय? तर ज्या स्थळांना, वास्तूंना सांस्कृतिक, भौगोलिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्व आहे. त्यासम दुसरी वास्तू तयार करणे कठीण आहे अशा रचनांना व वास्तूंना अथवा घटकांना वारसा असे म्हणतात. आपल्या ऐतिहासिक वास्तू, प्राचीन परंपरा या आपल्या व्यक्तिमत्वाचा, आपल्या जीवनशैलीचा भाग असतात. एका अर्थाने वारसा म्हणजे ममत्वाचा मातृत्वाचा विषय ठरतो. वारसा स्थळे ही त्या विशिष्ट प्रांताच्या, देशाच्या, प्रदेशाच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्यामुळे हा वारसा त्या स्थानांचे महत्त्व तर दर्शवतोच परंतु याशिवाय तिथे राहणाऱ्या स्थानिक लोकांच्या जीवनमानाचा एक अविभाज्य भाग असतो. तिथे नांदणाऱ्या संस्कृती, परंपरा या वारसा रूपात त्यांच्या पाऊलखुणा स्पष्ट दाखवतात. या सांस्कृतिक वारश्यामध्ये स्मारके, इमारतींचे समूह, सांस्कृतिक घटक आणि जैवविविधता स्थळे येतात.

### ४.२.१ वारसा पर्यटनाची संकल्पना, व्याप्ती व महत्त्व :

मानवी जीवनामध्ये भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व पर्यावरणाला महत्व आहे. ऐतिहासिक वारसा स्थळे ही ऐतिहासिक, सांस्कृतिक, पर्यटन व रोजगार या दृष्टीने महेत्त्वाची आहेत. विकासाच्या नावाखाली

नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणामध्ये मानवाने केलेले बदल व हस्तक्षेप जैवविविधतेबरोबरच ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांनासुद्धा धोकादायक ठरत आहेत त्यांचे जतन व संवर्धन करणे व त्यांच्याबद्दल जागरूकता निर्माण करणे काळाची गरज आहे. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक सांस्कृतिक संस्था अथवा युनेस्को विविध जागतिक वारसा स्थळांचे जतन करण्याचे काम करत आहे. युनेस्को [United Nations Educational, Scientific and Cultural Organization] ही १६ नोव्हेंबर १९४५ रोजी स्थापन करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष संस्था आहे. शिक्षण, विज्ञान व संस्कृतीमधील आंतरराष्ट्रीय सहयोग वाढवून जगामध्ये शांतता व सुरक्षा कायम करण्याचे कार्य युनेस्को पार पाडते. युनेस्कोचे मुख्यालय पॅरिस येथे असून जगभर ५० पेक्षा अधिक कार्यालये आहेत. १९३९-४५ या काळात युरोपात उद्ध्वस्त झालेली विद्यालये, संग्रहालये, ग्रंथालये यांचे पुनरुज्जीवन करण्याचा उद्देश युनेस्कोचा होता. १६ नोव्हेंबर१९७२ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसार ऐतिहासिक, नैसर्गिक, सांस्कृतिक स्थळांचं जतन, संवर्धन करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार जगभर धोक्यात असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक स्मारके असलेल्या ठिकाणांना युनेस्कोची जागतिक वारसा संस्था विशेष दर्जा प्रदान करते. युनोस्कोने जगभरातील वारसा स्थळाची यादी तयार केली आहे. या वारसा स्थळांचे जतन, संवर्धन, देखभाली बरोबर त्यांचेकडून अनुदान दिले जाते. जगभरात ११२१ जागतिक वारसा स्थळे आहेत. त्यामध्ये नैसर्गिक (२१३), सांस्कृतिक (८६९) व मिश्र स्वरूपाची (३९) अशी आहेत. जगभरात लॅटिन अमेरिका व कॅरिबियन पट्टा (१४२), युरोप व उत्तर अमेरिका (५२९), आशिया व पॅसिफिक (२६८), अरब (८६), आफ्रिका (९६) इत्यादी भौगोलिक विभागात त्यांची विभागणी केली आहे. जगभरात सर्वात जास्त वारसा स्थळे इटली, चीन (५५) या दोन देशांमध्ये आहेत, त्यानंतर अनुक्रमे स्पेन (४८), जर्मनी (४६), फ्रान्स (४५) भारत (३८) या देशांचा नंबर लागतो.

**अ) वारसा मिशन :**

- नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी.
- जागतिक वारसा सूचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्या-त्या राष्ट्रीय प्रदेशातील स्थळांचे नामांकिन करणे.
- जागतिक वारसा स्थळांच्या संवर्धनाच्या स्थितीवर अहवाल प्रणालीची स्थापना करणे.
- तांत्रिक सहाय्य आणि व्यावसायिक प्रशिक्षण देऊन जागतिक वारसा स्थळांचे रक्षण करणे.
- तात्काळ धोक्यात असलेल्या जागतिक वारसा स्थळांसाठी आपत्कालीन सहाय्य प्रदान करणे.
- जागतिक वारसा संवर्धनासाठी बांधकाम उपक्रमांबाबत जनजागृती करणे.
- सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा जतन करण्यासाठी स्थानिक लोकसंख्येचा सहभाग घेणे.
- जगाच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाच्या संवर्धनात आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देणे.

एकंदरीत जगातील विविध विविध देशांमध्ये असंख्य नैसर्गिक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा स्थळे, घटक आहेत. निष्काळजीपणामुळे ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. हे मानवतेचे खजिने आहेत ज्यांचे जतन,

संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे, ते भावी पिढ्यांना दिले जावे. त्यामुळे संवर्धन हाती घेण्याची नितांत गरज होती. ही स्थळे कोणत्याही एका देशात नसल्यामुळे जगातील अनेक देशांमध्ये हे काम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता होती. युनायटेड नेशन्स एज्युकेशनल सायंटिफिक कल्चरल ऑर्गनायझेशनने भविष्यातील मानवजातीच्या वापरासाठी या अमूल्य संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली. युनायटेड नेशन्स एज्युकेशनल सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन जगभरातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक स्थळांची ओळख, संरक्षण आणि संरक्षणास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करते जे मानवतेसाठी त्याच्या मूल्यामध्ये उत्कृष्ट मानले जातात.

**ब) वारसा पर्यटनाची व्याप्ती :**

प्राचीन काळी प्रवासातून सुरू झालेले पर्यटनाची व्याप्ती काळानुरूप बदलत होत गेला. प्राचीन काळी देशाटन, तीर्थाटन, अर्थाटन यामध्ये प्रवास केला जात होता. मध्ययुगात धार्मिकतेकडून पर्यटन ज्ञानार्पन, शोधमोहिम, नवीन खंडाचा शोध लावणे अशा बाबींकडे वळले. आधुनिक कालखंडात पर्यटनाची व्याप्ती पूर्णपणे बदलली दिसते. मनोरंजनासाठी फिरायला जाणे, आनंद मिळविणे, मौज-मजा करणे अशा पद्धतीने पर्यटन केले जाते. सध्याच्या पर्यटनाला आधुनिकतेची आर्थिक विकासाची व सुबत्तेची जोड मिळाली आहे. पर्यटनाची व्याप्ती वाढल्याने पर्यटन स्थळांच्या विकासासाठी व संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर युनेस्को या संघटनेने लक्ष दिले. यातून वारसा पर्यटन स्थळांना महत्त्व प्राप्त झाले आहे. वारसा पर्यटनात सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक अशा सर्व घटकांचा समावेश होतो. राजवाडे, किल्ले, स्वातंत्र्य व सामाजिक चळवळीशी संबंधित वास्तू, स्मारके इत्यादींचे वारसा स्थळ म्हणून जतन केले जाते. अशा स्थळांना पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात त्यामुळे वारसा पर्यटन हा एक वाढणारा उद्योग आहे. वारसा पर्यटक पर्यटन स्थळी दीर्घकाळ राहतात व इतर प्रवाशांच्या तुलनेत अधिक पैसा खर्च करतात. वारसा स्थळांबद्दल त्यांच्या मनात आदर असतो त्यामुळे अशा पर्यटनामुळे वारसा संसाधनांवर नकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता तुलनेने कमी असते.

**१) सांस्कृतिक घटक :**

जगातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारची संस्कृती विकसित झालेली आढळते. या वेगळ्या प्रकारच्या संस्कृतीच्या वस्तू, कला, संगीत, साहित्य, लोकसाहित्य, नृत्य, चित्रकला, क्रीडा, वास्तू, स्मारके इत्यादींमध्ये काही प्रमाणात साम्य व विविधताही आढळते. संस्कृतीमधील साधर्म्य व विविधतेमुळे लोकांमध्ये विविध संस्कृतीबद्दल कुतूहल व जिज्ञासा निर्माण होते. संस्कृती बद्दलच्या आकर्षण व कुतूहलामुळे केल्या जाणाऱ्या पर्यटनास सांस्कृतिक पर्यटन असे म्हणतात. जगातील अनेक देशांच्या सांस्कृतिक स्थळांची नोंद जागतिक वारशामध्ये झालेली आहे. या संस्कृतीचे रक्षण करून पुढील पिढीला पोहचवणे याचा मुख्य उद्देश आहे. सांस्कृतिक पर्यटन हे अनेक कारणांसाठी महत्वाचे आहे. एकीकडे ते स्थानिक लोकांना त्यांच्या सांस्कृतिक वारशाचा आर्थिकदृष्ट्या लाभ घेण्याची संधी देते तसेच त्यांच्या कलेचे कौतुक आणि त्याद्वारे त्याचे जतन करते आणि दुसरीकडे, हे अभ्यागताला त्यांचे वैयक्तिक क्षितिज विस्तृत करण्याची संधी देते. म्हणून सांस्कृतिक पर्यटन ओळख मजबूत करण्यास, परस्पर सामंजस्य सुधारण्यास आणि एखाद्या प्रदेशाचा वारसा आणि संस्कृती जपण्यास

मदत करू शकते. साहजिकच पर्यटकांचे ते आकर्षण असते. उदा. मलेशियामधील पुत्रजया, इजिप्तमधील पिरॅमिड, व्हॅटिन मधील सेंट पीटर चर्च, भारतामधील लाल किल्ला, ताजमहाल, अजंठा-वेरूळ लेणी, खजुराहो येथील मंदिरे इत्यादी. याशिवाय देशा-देशातील, रूढी-परंपरा, खाण-पाण, सण-उत्सव, आहार-पोशाख, रितीरीवाज इत्यादीचा अभ्यास व अनुभव घेण्यासाठी आवर्जून भेट देतात.

**२) ऐतिहासिक घटक :**

पर्यटनाचा आत्मा म्हणून ऐतिहासिक स्थळांचा उल्लेख करता येईल. ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते. अशा स्थळांना भेटी देण्याची इच्छा व तेथील इतिहास जाणून घेण्याची इच्छा पर्यटकांना असते. यामुळे या स्थळांना पर्यटक भेटी देत असतात. जागतिक इतिहासाची साक्ष म्हणून आजही अनेक वास्तू व स्थापत्य त्या-त्या काळाचा जीवन इतिहास म्हणून उभ्या आहेत. या वास्तू एक तर ज्या ठिकाणी निर्माण केल्या तेथे अथवा विविध संग्रहालयात पहावयास मिळतात. इटलीची राजधानी रोम, फ्रान्सची राजधानी पॅरिस, इंग्लंडची राजधानी लंडन हे तेथील ऐतिहासिक वास्तू व स्थापत्यामुळे जगप्रसिद्ध आहे. भारतात ही अशी शेकडो स्थळे ऐतिहासिक वास्तू स्थापत्यासाठी प्रसिद्ध आहेत. आग्रा, फत्तेपूर, सिक्री, जयपूर, जोधपूर, औरंगाबाद, हैद्राबाद, हम्पी, बदामी, दिल्ली इ. ठिकाणी तेथील ऐतिहासिक वास्तूसाठी जगप्रसिद्ध आहेत. जगातील बहुतांश पर्यटक ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठीच बाहेर पडतात. यातून मानवाने निर्माण केलेल्या कलाकृतीचा वारसा पर्यटकांपर्यंत पोहचतो.

**३) नैसर्गिक घटक :**

पर्यटन वाढीचे मुख्य कारण आहे त्या त्या देशातील वैभवशाली इतिहास आणि स्थानिक संस्कृती त्याचबरोबर उंचसखल डोंगरदऱ्या, समृद्ध जंगले, शांतरम्य समुद्रकिनारे, वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता, जीवनदायीनी नद्या, फेसाळ धबधबे, वाळूची पुळण व खाड्या, कांदळवने, छोटी मोठी बेटे, गवतांचे गालिचे पसरलेली पठारे, पाण्याचे तलाव, अंधाऱ्या गुहा पर्यटकांसाठी पर्वणीच असतात. निसर्गाची हि सर्व रूपे पर्यटकांसाठी तर आकर्षणाचा बिंदू आहेतच, पण त्याही पुढे जाऊन त्या ठिकाणच्या स्थानिक जैवविविधतेसाठी अधिवास म्हणून त्यांचे महत्व खूपच जास्त आहे. अनेक प्राणी, पक्षी, छोटे कीटक, सरीसृप, अन्नसाखळीतील छोटे मोठे घटक यांचे जीवन या अधिवासांवर अवलंबून आहे. निसर्गाचे संतुलन कायम राखण्यामधे या घटकांचा वाटा फार मोठा आहे. त्यामुळेच पर्यटनाचा आनंद घेतानाच या अधिवासांची म्हणजेच तेथील पर्यावरणाची काळजी घेनही तेवढच अत्यावश्यक आहे. पण सद्यपरिस्थितीत चालू असलेल्या पर्यटनावर एक नजर फिरवली तर या अधिवासांची व पर्यायाने तेथील पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होताना दिसून येते आहे. अनियंत्रित पर्यटन व योग्य नियोजनाच्या अभावामुळे एकेकाळी सौंदर्यपूर्ण व निसर्गसंपन्न असलेली ही पर्यटनस्थळे आता बकाल होऊ लागली आहेत. यामुळे जगातील विविधतेणे संपन्न असलेल्या जैवविविधतेच्या वारश्याचे संरक्षण करण्यासाठी युनेस्को या संघटनेने पुढाकार घेतला आहे यातून नैसर्गिक वारसा पर्यटनाची संकल्पना पुढे आली.

**क) वारसा पर्यटनाचे महत्व :**

पर्यटन हा आर्थिक व्यवसाय असून प्रत्येक राष्ट्र आपल्या आर्थिक विकासासाठी पर्यटन व्यवसायात सहभागी होत आहे. पर्यटनामुळे आर्थिक विकास होतो असे नाही तर त्यातून साधनसंपत्तीचा वापर, स्थानिक लोकांना रोजगार, परदेशी चलनाची प्राप्ती, पर्यटन स्थळांचा विकास, राष्ट्रीय एकात्मतेत वाढ अशा अनेक गोष्टी साधल्या जातात. पर्यटनाचा विकास होत असताना केवळ पर्यटन केंद्राचा विकास होत नाही तर ही विकासाची प्रक्रिया संपूर्ण प्रदेश, देश, समाजावर परिणाम करत असते. वारसा पर्यटनाचे पुढील महत्व दिसून येते.

**१. परकीय चलन मिळते** :

आंर्तदेशीय पर्यटनामध्ये पर्यटक बाहेरच्या देशातून येताना त्यांचे चलन घेवून येतात. आपल्या देशात आल्यानंतर चलन बदल करून घेतात. उदा. अमेरिकेतील पर्यटक डॉलर घेऊन येतो व त्याचे रुपयामध्ये चलन बदल करून घेतो. या ठिकाणी आल्यानंतर विविध अप्प्यांवर तो चलन खर्च करतो. त्यामुळे साहजिक त्याच्या देशाच्या चलनातील पैसे आपल्या देशाला मिळतात. त्यामुळे परकीय चलनाची स्थिती सुधारण्यास मदत होते.

**२. जागतिक सामंजस्य निर्माण होण्यास मदत** :

दोन देशांमध्ये असणारे भांडण-तंटे यामुळे त्या देशातील संघर्ष निर्माण होतो. त्या देशांमधील व्यक्तीच्या मनात गैरसमज निर्माण होतात. परंतु या दोन्ही देशातील पर्यटक जर त्यांच्या देशात पर्यटनासाठी गेले तर सत्य परिस्थिती समजते. उदा. भारत व पाकिस्तानातले पर्यटक एकमेकांशी सौहार्दपूर्ण वातावरणात पर्यटनासाठी गेले तर सामंजस्य निर्माण होण्यास मदत होईल.

**३. देशाच्या अर्थव्यवस्थेला मदत :**

देशी व विदेशी पर्यटकांकडून मिळणारा पैसा हा कोणत्या-ना-कोणत्या स्वरूपात देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळत असतो. रोजगार निर्मिती, पर्यटन केंद्र, वाहतूक व्यवस्था, हॉटेल व निवास व्यवस्था या सर्व ठिकाणी पर्यटक पैसा खर्च करत असतो. या सर्व क्षेत्रातून कर स्वरूपात हा पैसा काही प्रमाणात देशाच्या तिजोरीत पडत असतो. यातूनच देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

**४. प्रादेशिक समतोल राखण्यास मदत :**

मोठ्या खंडप्राय देशात काही भाग विकसित तर काही प्रदेश अविकसित अशा पद्धतीचे स्वरूप पहावयास मिळते. यामध्ये असे दिसून येते की, अप्रगत प्रदेशात पर्यटनाच्या संधी जास्त असतात. उदा. भारतातील ईशान्य भारत पर्यटनासाठी अनुकूल आहे. त्याठिकाणी पर्यटन व्यवसायाचा विकास केल्यास ईशान्य भारत सुद्धा विकसीत झाल्यास जो प्रादेशिक असमतोल आहे तो कमी होईल.

**५. रोजगार निर्मिती :**

पर्यटकाला सेवा पुरविणाऱ्या सर्वच घटकांतील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या पर्यटनातून रोजगार मिळतो. वस्तू खरेदी-विक्री केंद्र, हॉटेल व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, पर्यटन व्यवस्था या ठिकाणी काम करणाऱ्या कुशल

व अकुशल व्यक्तींना रोजगार मिळतो. जगातील सात टक्के लोकांना पर्यटनातून रोजगार मिळत आहेत.

**६. बाजरपेठांची निर्मिती :**

पर्यटन स्थळाला भेट देवून झाल्यानंतर तेथील वस्तू खरेदी करणे, आठवण म्हणून घेणे, प्रसाद म्हणून घेणे किंवा आपल्या जवळच्या नातलगासाठी-मित्रांसाठी वस्तू खरेदी करणे हा पर्यटकाचा आवडता छंद असतो. त्यातूनच पर्यटन स्थहाच्या ठिकाणी खेळणी, कपडे, पूजा साहित्य, प्रसाद, ऐतिहासिक वस्तू, प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्ण वस्तू इ. खरेदी करण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. यातूनच तेथील बाजारपेठांचे विस्तारीकरण व विकास होतो.

**७. संस्कृतिचे जतन :**

पर्यटक पर्यटनासाठी ज्या प्रदेशात जातो तेथील संस्कृती ही त्याच्यासाठी भिन्न असते. त्यातील तो चांगल्या गोष्टी आत्मसात करतो. तसेच त्याची जी संसकृती आहे त्याचा ठसासुद्धा त्याची भाषा, वेश, आवड-निवड, भोजन यातून त्या प्रदेशातील लोकांना एकप्रकारे सांगत असतो. थोडक्यात भिन्न संस्कृतीच्या व्यक्ती पर्यटनासाठी वेगवेगळ्या ठिकाणी गेल्या तर संस्कृतीची देवाण-घेवाण होते. तसेच संस्कृतीचे जतनही होते.

**८. वारसा स्थळाचे जतन आणि संवर्धन :**

वारसा पर्यटनाच्या मुळे जगातील नष्ट होणाऱ्या वारसा स्थळाचे जतन आणि संवर्धन होण्यास मदत झाली आहे. युनेस्को मार्फत निवड झालेल्या वारसा स्थळांना जतन आणि संवर्धनासाठी निधी प्राप्त झाल्याने जगातील ऐतिहासिक आणि जैवविविधतने समृद्ध असलेल्या स्थळाचे रक्षण होण्यास मदत झाली आहे. यातून त्या भागातील पर्यटनाला चालना मिळालेली आहे.

● **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१) १६ नोव्हेंबर ........ रोजी स्थापन करण्यात आलेली संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष संस्था आहे.

२) ........ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसार ऐतिहासिक, नैसर्गिक, सांस्कृतिक स्थळांचे जतन, संवर्धन करण्याचे निश्चित करण्यात आले.

३) युनेस्कोचे मुख्यालय ........ मध्ये आहे.

४) प्राचीन काळी देशाटन, तीर्थाटन, अर्थाटन यामध्ये ........ केला जात होता.

५) पर्यटनाचा आत्मा म्हणून ........ स्थळांचा उल्लेख करता येईल.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पर्यटनाचे सर्वात जास्त महत्व कशाला दिले जाते?

२) भारतामध्ये २०१९ सालापर्यंत किती जागतिक वारसा पर्यटन स्थळे आहेत?

३) जगामध्ये मिश्र स्वरूपाची वारसा पर्यटन स्थळे किती आहेत?

४) कोणत्या पर्यटनाच्या माध्यमातून जगातील नष्ट होणाऱ्या वारसा स्थळाचे जतन आणि संवर्धन होण्यास मदत झाली आहे?

५) जगामध्ये सर्वात जास्त वारसा पर्यटन स्थळे कोठे आहेत?

### ४.२.२ पर्यटन म्हणजे काय? व ऐतिहासिक पार्श्वभूमी :

पर्यटन शब्द हा लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून आला आहे. Tournus या शब्दाचा अर्थ प्रवास किंवा भटकंती करणे असा होतो. Tour म्हणजे प्रवास त्यापासून Tourism म्हणजेच प्रवासासाठी बाहेर पडणे होय. प्रथम पर्यटनाचा अर्थ समजून घ्यावयाचा असेल तर त्याच्या विविध व्याख्याद्वारे अभ्यास करता येईल त्या पुढीलप्रमाणे

१. 'एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी कायमस्वरूपी वास्तव न करता एक वर्षाच्या आत उद्योग किंवा इतर कामासाठी सतत प्रवास करून पुन्हा परत येतो.' (जागतिक पर्यटन संघटना)

२. 'पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, ऐषआराम यासाठी केलेले असते.' (ब्रिटन पर्यटन संस्था, १९७३.)

३. 'एखाद्या अपरिचीत देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन, मुक्काम व आजूबाजूच्या स्थळांना भेटी देवून पुन्हा स्वगृही परत जाणे म्हणजे पर्यटन होय.' (हर्मन, १९२०.)

४. जागतिक पर्यटन संघटना : [Word Tourism Organisation WTO] या संघटनेने ४ मार्च १९९३ रोजी पर्यटनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, ''एखादी व्यक्ति आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी सलग १ वर्षापेक्षा अधिक काळ न राहता आराम, उद्योग किंवा इतर कामासाठी भ्रमंती किंवा प्रवास करतो त्या सर्वांचा समावेश पर्यटनात होतो.''

**अ) हेरिटेज पर्ययन म्हणजे काय ?**

हेरिटेज टुरिझम म्हणजे नक्की काय? ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यापेक्षा, वारसा पर्ययन म्हणजे परंपरा, इतिहास आणि संस्कृती यांचा वैयक्तिक सामना आहे. हेरिटेज टुरिझम या संकल्पनेवर आधारित आहे की प्रत्येक समुदायाला सांगण्यासाठी एक कथा आहे. हे एक झपाट्याने वाढणारे पर्यटन क्षेत्र आहे जे स्थानिक चालीरीती, परंपरा, कला, इतिहास, स्थळे आणि संस्कृतीचा अनुभव घेण्याच्या दिशेने निर्देशित आहे जे एखाद्या विशिष्ट ठिकाणाचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करतात.

नॅशनल ट्रस्टने हेरिटेज टुरिझमची व्याख्या करताना असे म्हटले आहे, ''भूतकाळातील आणि वर्तमान काळातील कथा आणि लोकांचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करणारी ठिकाणे, कलाकृती आणि क्रियाकलाप

अनुभवण्यासाठी प्रवास करणे'' अशी केली आहे. त्यात सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक संसाधने समाविष्ट आहेत.

हेरिटेज टुरिझमच्या दुसऱ्या एका व्याख्येनुसार ''दृश्य आणि परफॉर्मिंग आर्टस्, वारसा इमारती, परिसर, लँडस्केप्स आणि विशेष जीवनशैली, मूल्ये, परंपरा आणि घटनांचा अनुभव घेण्याशी संबंधितप्रवास'' अशी केली जाते. यामध्ये हस्तकला, भाषा, कला आणि संगीत, वास्तुकला, भावनांचा समावेश होतो.

वारसा म्हणजे पूर्वसुरींकडून मिळालेल्या गोष्टी. मग त्या वास्तू, वस्तू किंवा इतर स्थावर स्वरूपातील मूर्त गोष्टी असतील किंवा एखादी कला, संस्कार यांसारख्या अमूर्त असतील. त्या वास्तूचे राजकीय किंवा सामाजिक स्थान या गोष्टींचा विचार केला जातो. उदा. महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ ही जागतिक वारसा स्थळे आहे. ही स्थळे शिल्प आणि चित्रसमृद्ध आहेतच. त्याशिवाय ती त्या काळातील विचारशैलीचे, धार्मिक, सामाजिक अभिसरणाचे, समृद्धीचे विचार प्रवाहांचे प्रतिनिधित्व करतात. वेरूळमधील आधी कळस मग पाया अशा पद्धतीने डोंगरातून खोदले गेलेले कैलास मंदिर हा कलेचा, त्यांच्या ज्ञानाचा मोठा ठेवाच आहे. त्याची अनुभूती घेण्यासाठी आजही जगभरातून लाखो पर्यटक, अभ्यासक येथे आवर्जून येतात. नुकताच जागतिक वारसा स्थळ म्हणून दर्जा मिळालेले कांचनगंगा अभारण्य हे भारतातील पहिले मिश्र वारसा स्थळ आहे. मनुष्य अन् माणसाचा धर्म आणि निसर्ग, त्याचा स्वत:चा धर्म याची एकता येथे दिसते. ती संपूर्ण मनुष्यजातीच्या पुढील वाटचालीसाठी आदर्श आणि महत्त्वाची ठरते.

संपूर्ण मानवजातीला एक गौरवशाली इतिहास लाभलेला आहे. अगदी सुरूवातीच्या काळापासून पाहायला गेलो तर माकडाचा माणूस झाला ही खूप मोठी क्रांती आहे. त्यानंतर माणसाने आपल्या गरजेप्रमाणे शोध लावले. चाकाचा शोध, आग्नीचा शोध आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे शेतीचा शोध. हा सगळा इतिहास आपण आज ठामपणे सांगू शकतो. लिखित अथवा मौखिक वाङ्मयाच्या आधारावर ह इतिहास आपण वाचला, ऐकला आहे. हा इतिहास वारंवार सिद्धही होत आहे. जसजसा काळ पुढे गेला, तसतसं तंत्रज्ञानही पुढे गेलं. ज्या त्या काळातल्या तंत्रज्ञानाचा वापर करून माणसाला आपल्या उत्क्रांतीचा इतिहास आपल्या पुढच्या पिढीला सांगण्याची इच्छा होत होती आणि त्यामुळेच आज आपल्याला आपला इतिहास माहित आहे. किंबहूना आपण ठामपणे तो सांगू शकतो. आपल्या-आपल्यात त्याबद्दल दुमत नाही.

प्रत्येक देशाला नैसर्गिक गरजेनुसार जसा भूगोल आहे असाच इतिहासही आहे. त्या जोडीला धार्मिक अधिष्ठान असलेली संस्कृती आहे. त्या संस्कृतीच्या ज्या पाऊलखुणा उमटल्या आहेत. त्याच्या संवर्धनासाठी जो इतिहास घटला त्याच्या साक्षीदार ठरलेले जे मापदंड आजही अस्तित्वात आहेत तो म्हणजे त्या त्या राष्ट्राचा अनमोल ठेवा तथा ऐतिहासिक वारसा म्हणून मान्यता पावलाय. यामध्ये हजारो वर्षांची पुरातन मंदिर वास्तू, स्तंभ, पुतळे, मनोरे, कमानी, गडकिल्ले यांच्या बरोबरीने प्रसंगानुरूप उभारलेल्या अलौकिक वास्तूही आहेत. उपरोक्त घटकांपैकी काही म्हणजे राष्ट्रांची अस्मिताच झाली आहे. तर काहींना राष्ट्रगौरवाची शान आहे. प्राचीन इतिहासाच्या पार्श्वभूमीच्या आजही अस्तित्वात असलेल्या या चित्तकर्षक वारसावास्तूंच्या प्रगतीचा आलेखही तितकाच जुना आहे. अन्न, वस्त्र, निवाऱ्याची प्राथमिक गरज भागल्यावर, स्थैर्य प्राप्त झाल्यावर सुरक्षेचा प्रश्न

मानवासमोर होताच. सभोवतालच्या अफाट निसर्गाचे रहस्य ध्यानी येण्याची कुवत नसल्याने नैसर्गिक आपत्तीसमोर कोणत्या तरी अज्ञात शक्तीपुढे श्रद्धायुक्त माथा टेकण्याच्या उद्देशाने मंदिर वास्तूंची उभारणी झाली. "Faith Can Move The Mountains" हेच त्या मानवी समूहाला अभिप्रेत होते. प्रारंभीच्या उघड्या जागेवरील मंदिरांना कालांतराने घरसदृश्य बंदिस्त मंदिरात मूर्तीची स्थापना व्हायला लागली. आणि नंतरच्या काळात आपल्या अंगभूत, निसर्गदत्त कल्पनाशक्ती आधारे या मंदिर वास्तूंना कलात्मकतेचा साज चढवला गेला. प्रारंभी परिसरातील उपलब्ध साधनांच्या आधारे बांधकाम केले जायचे, तसेच पाऊसपाणी व इतर नैसर्गिक आपत्तींशी सामना करण्यासाठी वेगवेगळ्या बांधकाम साहित्याची उपयुक्तता जाणवल्याने टप्प्याटप्प्याने नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान विकसित होत गेले. पृथ्वीवर जशी काळानुसार नैसर्गिक स्थित्यंतर सतत घडत असतात तशी अनेक क्षेत्रात मानव निर्मित घटकातही परिवर्तन घडत गेले. हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माच्या आधारावर तत्त्वप्रणालीनुसार लेण्या-स्तुप मंदिर, चर्च, मशीदी, मनोरे, कमानी उभाल्या. आपल्या पूर्वसूरीनी उभा केलेल्या या वास्तू वारसा वास्तू म्हणून महत्त्व प्राप्त झाले. काळाच्या रूपाने या वास्तु नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या वास्तूंचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने वारसा संकल्पना पुढे आली. आज या वास्तूंना पर्यटनाच्या रूपाने महत्त्व प्राप्त झाले आहे.

थोडक्यात सांगायचे म्हटले तर आपणास परिचित नसलेल्या प्रदेशात भ्रमंती करणाऱ्या अपरिचित व्यक्तीसंबंधी तेथील अपूर्व घटनांचा समावेश होतो. पर्यटन ही एक आनंददायी घटना आहे, की ज्यामध्ये मनुष्य प्रवास, भेटी दिलेली निरनिराळी ठिकाणी पाहणे, निवास, भोजन इत्यादीवर स्वतःकमविलेले पैसे खर्च करतो.

### ब) पर्यटनाची ऐतिहासिक पाश्वभूमी :

पर्यटन हा जागतिक पातळीवरील उद्योग म्हणून समृद्ध झाला आहे. जगातील भरपूर ठिकाणे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत त्या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. त्यामुळेच पर्यटन हा आंतराष्ट्रीय उद्योग म्हणून उदयास आला आहे. पर्यटन ही संकल्पना प्राचीन काळापासून प्रवासातून अस्तित्वात आली आहे. प्राचीन काळात प्रवासी हे यात्रेकरू किंवा नवीन राष्ट्रांचा प्रदेशांचा शोध घेणारे खलासी किंवा अभ्यास करणारे संशोधक होते. मानवी संस्कृतीचा विकास झाल्यावर निरनिराळ्या प्रदेशांचा शोध घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रवासाची सुरूवात झाली. निसर्गसौंदर्याच्या आकर्षणामुळे मनुष्याला प्राचीन काळापासून प्रवासाविषयीचे आकर्षण आहे मात्र हा प्रवास केवळ आनंद घेण्यासाठी होत नसेल तर नवीन प्रदेशांचा शोध आणि व्यापार करणे हा हेतू असायचा. नंतर हळूहळू नवीन व्यापारी मार्ग अस्तित्वात आले आणि प्रवासाला गती प्राप्त झाली. ओडिसीच्या महाकाव्यात प्राचीन काळातील ग्रीकांच्या प्रवास विषयी माहिती मिळते. सुमोरियन हे खऱ्या अर्थाने आधुनिक प्रवासी समजले जातात यांनी आर्थिक क्रियेतून व्यापार करण्यासाठी देश-विदेशात प्रवास केला. सुरूवातीच्या काळात भारत व चीन मध्ये झालेले प्रवास स्थानिक व दूरच्या व्यापारावर आधारित होते. संपूर्ण जगातून पूर्वेकडे विशेषतः भारत व चीन कडे झालेल्या प्रवास दौरे हे व्यापाराच्या उद्देशाने झाली होती. पर्यटनाचा प्रमुख इतिहास पाश्चात्याशी निगडीत आहे पैसा आणि व्यापार या दोन सज्ञा जेव्हा उदय झाला त्यावेळी प्रवास करून त्याचा प्रसार करण्याची पद्धती सुरू झाली. प्रामुख्याने पर्यटन इतिहासाचे प्राचीन पर्यटन, मध्ययुगीन पर्यटन आणि आधुनिक पर्यटन असे तीन भाग

भागात विश्लेषण करता येते.

मानव आदिम काळापासून अन्न, पाणी व निवारा या मूलभूत गरजांसाठी भटकंती करू लागला व त्याच्या प्रवासाला प्रारंभ झाला. अग्नीचा शोध, हत्याराचा शोध व घर बांधण्याची संकल्पना यामुळे मानवी जीवन स्थिर होण्यास मदत झाली. शेतीच्या शोधाने कृषक संस्कृतीचा विकास झाला. इजिप्तमध्ये इ. स. पू. ४००० च्या दरम्यान जहाज बांधणीस सुरूवात झाली, यातून समुद्र प्रवासाला चालना मिळाली. पुढे मानवाला चाकाचा शोध लागला. जंगली प्राणंना पाळण्याची व त्याचा उपयोग वाहतूकीसाठी या संकल्पनेमुळे वाहतुकीच्या साधनामध्ये क्रांतीकारी बदल झाला. मानवी प्रवासाच्या कक्षा अधिक विस्तृत झाल्या. नवाश्मयुगात धार्मिक व सांस्कृतिक संकल्पनांचा विकास झाल्याने 'सण' उत्सवाची सुरूवात झाली. कृषक संस्कृतीचा विकास व इ. स. पू. ६ व्या शतकात लागलेला नाण्याचा शोध पर्यटनास चालना देणारा प्रमुख घटक ठरला. कृषक संस्कृतीमुळे अतिरिक्त उत्पादनात वाढ झाली व नाण्याच्या शोधाने व्यापाऱ्यास उत्तेजना मिळाली. याच काळात ग्रीक, इजिप्त व पुढे रोमन साम्राज्य काळात मोठ्या प्रमाणात नागरीकरण घडून आले. वाढत्या व्यापारामुळे समुद्र प्रवासाला चालना मिळाली. यातून रेशीम रस्त्याचा विकास झाला (भूमध्य समुद्र ते फॅसिफिक समुद्र) हा रेशीम रस्ता जगातल्या महत्वाच्या नागरी संस्कृती व व्यापारी केंद्रामधून जात होता. यामध्ये ग्रीस, रोम, इजिप्त, चीन व भारत इत्यादीच्या समावेश होता. व्यापराच्या माध्यमातून एका नवीन वर्गाचा उदय झाला. मेसोपोटेमिया संस्कृतीमुळे पर्यटनाला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. याठिकाणी घडून आलेले नागरीकरण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचले. ग्रीक संस्कृतीमध्ये विविध धार्मिक स्थळांचा विकास झाल्याने धार्मिक पर्यटनाचा विकास झाला. इ. स. पू. ७७६ मध्ये ग्रीकमध्ये ऑलिंपिक स्पर्धा आयोजनास सुरूवात झाली. यामध्ये सहभाग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक येवू लागले. रोमन कालखंडात मोठ्या प्रमाणात नवनवीन शोध लागले. आर्थिक व राजकीय क्षेत्रात झालेल्या बदलामुळे प्रवास व पर्यटन या संकल्पनेत बदल घडून आला. आर्थिक व राजकीय सुबत्तेमुळे एका नव्या गर्भश्रीमंत वर्गाचा उदय झाल्याने 'दुसरे घर' [Second Home] ही संकल्पना उदयास आली. नेपल्सच्या किनाऱ्यावर रिसॉर्ल्टची निर्मिती झाली व 'आनंद प्राप्तीसाठी पर्यटन' ही संकल्पना पुढे आली. मात्र रोमन साम्राज्याच्या पाडावानंतर पर्यटनाला संकुचित स्वरूप येवून त्याला धार्मिक कृत्याचे स्वरूप प्रापत झाले. हे धार्मिक पर्यटन मात्र उत्स्फूर्त स्वरूपाचे होते. भारतामध्ये सुद्धा सिंधू संसकृती पासून व्यापार पूरक प्रवासातून पर्यटनास चालना मिळाली. याचबरोबर येथे विविध राजवटी मध्ये हिंदू, बौद्ध आणि जैन धर्माला राजाश्रय मिळाल्याने धार्मिक स्थळांची निर्मिती झाली. यामुळे धार्मिक पर्यटनास चालना मिळाली. तसेच आयुर्वेद आणि शिक्षण यांचा अभ्यास करण्याच्या निमित्ताने जगातील विविध भागातून पर्यटन भारताला भेटी देत होते.

मध्यकालखंडच्या सुरूवातीला अस्थिर परिस्थितीमुळे जगामध्ये पर्यटनावर मर्यादा आल्या. परंतु पुनरुज्जीवन कालखंडात नवनवीन सुधारणा, रस्ते विकास, शहरीकरण यामुळे पर्यटनाला चालना मिळाली. १५ व्या खतकात युरोपमध्ये इटली व सामाजिक सांसकृतिक केंद्र बनलेले होते आणि याच काळात 'ग्रॅड टूर' ही संकल्पना अस्तित्वात आली. मात्र प्रारंभिक काळात या ग्रॅड टूरचे स्वरूप अभिजनवादी होते. ग्रँड टूर प्रमाणे या काळात 'समुद्र विहार' ही संकल्पनाही प्रसिद्ध झाली. समुद्र विहार पर्यटनामुळे समुद्र किनाऱ्यावरील विश्रामगृहाचा विकास

झाला. मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये मोगल, राजपूत, विजयनगर, तसेच मराठा राजवटीमध्ये सांसकृतिक कलाकृतीला राजाश्रय मिळाल्याने येथील पर्यटनाचा विकास झाला. या राजवटीमध्ये नवीन पर्यटन स्थळांची निर्मिती झाली. यामुळे येथील पर्यटन वाढीस लागले. १८ व्या शतकाच्या अखेरीसयुरोपात समुद्र विहार हे पर्यटकांच्या आकर्षणाचे क्रेद्र बनलेले दिसते. पुढे स्वच्छंदवादी [Romanticism] कालखंडाच्या उदयामुळे निसर्ग भूप्रदेश आणि सौंदर्यविषयक घटक यांच्याकउे पर्यटकांचे लक्ष वेधले गेले. या कालखंडात विविध लेखक कवी, कलाकार यांनी नैसर्गिक जगाच्या मूल्यांविषयी लिखाण केले, ते लिखाण पर्यटकांना आकर्षित करू लागले. 'लॉर्ड बायटन', 'विल्यम वर्डस्वर्थ' यांच्या लिखाणामुळे पर्यटनास चालना मिळाली. १८ व्या शतकात युरोपमध्ये वार्षिक सुट्टीची संकल्पना उदयास आली. सुट्टीमुळे लोक प्रवासाला निघू लागले, परिणामी १८ वे शतक हे प्रवासाचे शतक समजले जाते. इ. स. १५५२ मध्ये इंग्लंडचा राजा सहावा एडवर्ड याने उपवास व धार्मिक दिवस साजरे करण्याचा कायदा केला. या सुट्टीच्या परिणामस्वरूप लोक घराबाहेर पडू लागले. १९ व्या शतकात पर्यटन आनंदासाठी पर्यटनाचे स्वरूप प्राप्त झाले. इ. स. १८४० च्या दरम्यान साधारण १,००,००० लोक रेल्वेसारखा जलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध झालेला होता, सामाजिक संक्रमण खूप मोठ्या प्रमाणात होत होते व जनतेमध्ये पर्यटनाविषयी आकर्षण निर्माण झालेले होते. पर्यटन व्यवसायाचा विकास व व्यावसायिक कौशल्य यासंदर्भात थॉमस कुक याचे नाव प्राधान्याने घेतले जाते. १९ व्या शतकात पर्यटन ही संकल्पना कुकने जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. इ. स. १८४१ मध्ये थॉमस कुकने पहिली सफर ५७० पर्यटकांना घेवून लिसेस्टर ते लॉगबरो या दरम्यान केली. व्यावसायीक पर्यटकांची सुरूवात कुकने केली. १८५०-१९०० या कालखंडात खऱ्या अर्थाने पर्यटन हे जनसामान्यांसाठी व आनंदासाठी आहे याची खात्री कुकने पटवून दिली आणि आधुनिक अर्थ्ज्ञाने पर्यटन ही संकल्पना जगासमोर आली. भारतामध्ये पर्यटनास अधिक संयोजित रूप ब्रिटीश कालखंडात निर्माण झाले. देशात पर्यटनाला प्रात्साहन देऊन पर्यटन व्यवसायाचा विकास कसा करावा याचा विचार करून उपाययोजना सुचविण्यासाठी इ. स. १९४५ मध्ये ब्रिटीशंनी स जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. समितीने केलेल्या शिफारशीनुसार पर्यटनासंबंधी पायाभूत गोष्टी, देशात व परदेशात पर्ईटनासंबंधी जाहिराती, पर्यटन उद्योग हाताळण्यासाठी सर्व पातळ्यांवरील लोकांमध्ये परस्पर संबंध, इत्यादींवर भर देण्यात आला. त्यामुळे स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला भरताकडे पर्यटन उद्योगांचा संपूर्ण आराखडा उपलब्ध होता. यातून पुढीलकाळात भारतामधील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यास सुरवात झाली.

तंत्रज्ञान, राजकीय आणि सामाजिक चळवळीमुळे विसाव्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षाच्या कालखंडात पर्यटन जगभर विखुरले जाऊन पर्यटनाला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले. जरी दोन महायुद्धांच्या दरम्यान पर्यटनावर फारच मर्यादा आल्या तरी पर्यटनाची इच्छा ही दिवसेंदिवस वाढतच गेली. युद्धानंतर व्यक्ती प्रवासाला उत्साही होऊन त्याची युद्धादरम्यानची भीती आणि संबंधित बाबी बाजूला टाकण्याचा प्रयत्न करू लागला. दोन देशांतील संघर्ष संपल्यावर सर्वसाधारण परिस्थिती निर्माण होऊण दोन्ही देशात पुर्नसंबंध प्रस्थापित करताना पर्यटनाला चालना मिळाली. दोन महायुद्धामुळे अनेक तंत्रज्ञानात्मक फायदे पर्यटनाला झाले. युद्धादरम्यानच्या काही संशोधन व नवनिर्मितीमुळे पर्यटनाला चालना मिळाली. उदा. पहिल्या महायुद्धानंतर ज्या जादा जहाजांची संख्या होती तीचे रूपांतर सागरी पर्यटनासाठी करून जहाजाद्वारे जगभ्रंमतीस मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. सन १९२८ मध्ये

४,३७,००० अमेरिकन लोकांनी समुद्रपर्यनाने परदेशी गेल्याची नोंद आहे. या काळात अटलांटिक आणि पफसिफिक सुद्र ओलांडून जहाजांद्वारे पहिल्या व दुसऱ्या दर्जाने प्रवास करण्यास प्रसिद्धी मिळाली. जेव्हा दळणवळणविषयक अन्य सुविधा ज्यामध्ये मोटार व विमानांचा विकास झाला तेव्हा समुद्र मार्गे पर्यटनातील प्रमाण कमी आले. मोटार व विमान सेवा ही दोन्ही माध्यमे मध्यमवर्गांकडून मोठ्या प्रमाणात वापरात आणली गेली आणि अशाप्रकारे आधुनिक सर्वव्यापी पर्यटन हे उदयास आले.

- **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. पर्यटन हा शब्द ........ भाषेतून आला आहे.

२. 'पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी ........ केलेले स्थलांतर होय.

३. ........ महाकाव्यात प्राचीन काळातील ग्रीकांच्या प्रवास विषयी माहिती मिळते.

४. इ.स.पू. ७७६ मध्ये ........ मध्ये ऑलिंपिक स्पर्धा आयोजनास सुरूवात झाली.

५. ........ रस्ता जगातल्या महत्वाच्या नागरी संस्कृती व व्यापारी केंद्रामधून जात होता.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आधुनिक पर्यटन व्यवसायाचा जनक कोणाला संबोधले जाते?

२) कोणत्या शतकात ग्रँट टूरची संकल्पना पुढे आली?

३) १८ व्या शतकात युरोपमध्ये कोणती संकल्पना उदयास आली?

४) भारतामध्ये पर्यटनास अधिक संयोजित रूप कोणत्या कालखंडात निर्माण झाले?

५) सार्जंट समितीची स्थापना केव्हा झाली?

### ४.२.३ भारतामधील जागतिक वारसा स्थळे :

भारतासारख्या भौगोलिक विविधता आणि विविध ऋतूत बदलणारे हवामान असणाऱ्या देशात पर्यटन उद्योगाकडे वेगळ्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे आहे. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे देश अपवाद सोडले तर जगातल्या कुठल्याच देशात भारताइतकी विविधता पहायला मिळत नाही. आपल्याला बर्फाच्छादित हिमशिखरांपासून प्रवाळद्वीपांपर्यंत सर्व प्रकारची वैविध्यपूर्ण जैवविविधता तसेच भौगोलिक संपन्नता लाभली आहे. भारताला नैसर्गिक संपन्नतेबरोबर प्रदीर्घ अशी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. परंतु पारतंत्र्याच्या काळात म्हणजे ब्रिटिश काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विशेष विकास झाला नाही. त्यामुळे येथील शेकडो ऐतिहासिक स्थाने असून त्यातील काही अवशेषांच्या रूपात तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. कांही ऐतिहासिक स्थानांनी आजही

आपले महत्व टिकवून ठेवले आहे. काही स्थळांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. भारतीय पर्यटन उद्योगावर ऐतिहासिक घटकांचा मोठा प्रभाव आहे. भारतात येणाऱ्या एकूण पर्यटकांपैकी ५४ टक्के पर्यटकांना येथील ऐतिहासक स्थानांमध्ये विशेष रस असतो. भारतामध्ये प्राचीन वारसा सांगणारी शेकडो ऐतिहासिक पर्यटन स्थळे अवशेषश, स्मारके रूपात सर्वत्र विखुरलेली आहेत. भारताला ऐतिहासिक परंपरेबरोबर प्रदीर्घ धार्मिक परंपरा अशी ऐ वेगळी आणि सर्वसमावेशक संस्कृती निर्माण झाली आहे. यामुळे येथे विविध धार्मिक पर्यटनस्थळांचा विकास झालेला आहे. भारताच्या पर्यटनाच्या व्यापक विस्तारांमुळे जगातील प्रत्येक पर्यटकाला काही ना काही देण्याची क्षमता या देशात आले. यातूनच युनेस्को या जागतिक संघटनेने भारतातील ३८ स्थळांना जागतिक वारसा स्थळांचा दर्जा दिला आहे. या स्थळांची मांडणी सांसकृतिक, नैसर्गिक, मिश्र वारसा स्थळे यानुसार पुढीलप्रकारे मांडणी केली आहे.

**अ) ऐतिहासिक वारसा स्थळे :**

**१) अजिंठा लेणी :**

अजिंठा लेणी महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील वाधूर नदीच्या परिसराशेजारी इ. स. पूर्व २ रे शतक ते इ. स. ४ थे शतक अशा प्रदीर्घ कालखंडात निर्मिलेल्या २९ बौद्ध लेणी आहेत. बौद्ध धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पाश्वभूमी लाभलेली अजिंठा लेणी भारताची जागतिक आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी ठळक ओळख करून देणाऱ्या महत्वाच्या लेणी आहेत. अजिंठा लेणी ही जागतिक वारसा स्थान म्हणून युनेस्कोने इ. स. १९८३ साली घोषित केली आहेत. अजिंठा लेण्यांत गौतम बुद्धांच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेचा अद्वितीय अविष्कार पाहायला मिळतो. अशी ही अजिंठा लेणी देशी पर्यटकांसोबतच प्रामुख्याने विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक प्रसंतीचे पर्यटन स्थळ ठरले आहे. चित्र-शिल्पकलेचा नितांतसुंदर अनुभव देणाऱ्या या लेण्यांमधून त्या काळात वापरण्यात आलेल्या रंगछटा पर्यटकांना पाहावयास मिळतात.

**२) वेरूळची लेणी :**

औरंगाबाद शहरापासून ३० कि. मी. अंतरावरील वेरूळ गावातील जगप्रसिद्ध लेणी आहेत. ही सह्याद्रीच्या सातमाळा पर्यत रांगेतील डोंगरकड्यात साधारणतः पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरलेल्या एकूण ३४ लेणी आहेत. इ. स. १९५१ साली भारत सरकारने या लेण्याला 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून घोषित केले. तर युनेस्कोने इ. स. १९८३ मध्ये वेरूळ लेणीचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत केला. येथील कैलास मंदिर हे स्थापत्यशास्त्राचा अदभुत नमूना आहे. या मंदिराची निर्मिती प्रविडी शैलीचे करण्यात आली असून एकूणच २७६ फूट लांब, १५४ फूट रुंद, हे मंदिर केवळ एक खडक कापून बांधले आहे. या मंदिराच्या बांधकामाची सुरूवात खडकाच्या वरून करून खालीपर्यंत तयार करण्यात आले आहे. या मंदिराचे निर्माण राष्ट्रकूट राजवंश नरेश कृष्णा (प्रथम) (७५७-७८३) याच्या काळात झाले आहे.

### ३) घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी :

मुंबईपासून ६-७ मैल अंतरावर समुद्रातील घारापुरी या लहान बेटावर डोंगरात ही लेणी आहेत. ही लेणी भव्य आकाराच्या शिल्पासाठी प्रसिद्ध आहेत. पाषाणात खोदलेली ही लेणी इ. स.चे ९ वे शतक ते १३ वे शतक या कालखंडात निर्माण करण्यात आली. १९८७ साली या लेण्यांना युनेस्को जागतिक वारसा स्थानाचा दर्जा दिला गेला. घारापूरी लेण्यांच्या प्रवेशद्वाराजवळ हत्तीचे प्रचंड आकाराचे एक शिल्प होते, त्यावरूनच या लेण्यांना एलिफंटा लेणी असे नाव पडले. हे शिल्प सध्या मुंबईच्या राणीच्या बागेत आहे. ही लेणी मुंबई शहराच्या पूर्वेस समुद्रात किनाऱ्यापासून १० कि. मी. दूर आहेत.

### ४) आग्रा किल्ला :

भुईकोट किल्ला उत्तर प्रदेशातील आग्रा शहरात आहे. आग्रा हे उत्तर प्रदेश राज्यामधील एक मोठे शहर आहे. आग्रा किल्ल्यास जागतिक वारसा स्थळ म्हणून १९८३ मध्ये घोषित करण्यात आले. या किल्ल्याला इतिहासकार चार भिंतीनी घेरलेली प्रासाद महाल नगरी म्हणतात. इ. स. १५०६ मध्ये सुलतान सिकंदर लोधीने आपली राजधानी दिल्लीहून आग्र्याला हलवली. सिकंदर लोधीचा पुत्र इब्राहिम लोधी १५२६ साली पानिपतच्या पहिल्या लढाईमध्ये ठार झाला व मुघल सम्राट बाबरची आग्र्यावर सत्ता आली. मुघल साम्राज्काळ आग्र्यासाठी दैदिप्यमान ठरला व येथे अनेक मुघल इमारती व वास्तू उभारल्या गेल्या. बाबारनंतर हुमायून, अकबर, जहांगीर, शाहजहान ह्या मुघल साम्राज्याचे राजधानीचे शहर राहिले. १६८९ साली शाहजहानने राजधानी शाहजहानाबाद (जुनी दिल्ली) येथे हलवली. शाहजहानचा मुलगा औरंगजेब ह्याने वडीलाला कैदेत टाकून सत्ता बळकावली व मुघल साम्राज्याची राजधानी पुन्हा आग्र्याला आणली. आग्रा किल्ला हे आज भारतातील महत्वाचे पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जाते.

### ५) ताजमहाल :

आग्रा शहरात यमुना नदीकाठी असलेले ताजमहाल एक स्मारक असून हे जगातील सात आश्चर्यापैकी एक गणले जाते. ताजमहाल हा मुघल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याची स्थापत्यशैली पर्शियन, ओट्टोमन, भारतीय आणि इस्लामिक स्थापत्याची अनोखी संमिश्रता आहे. या वास्तूला इ. स. १९८३ मध्ये जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले. हे जागतिक वारसामध्ये प्राप्त झालेल्या सर्वोत्कृष्ट मानवी कार्यांपैकी एक म्हणून वर्णन केले गेले आहे. त्याचे पांढरे घुमट आणि संगमरवरीने आकारात झाकलेले आहेत. मध्यभागी बांधलेले मुमताज महल समाधी त्याच्या स्थापत्य श्रेष्ठतेमध्ये सौंदर्याचे संयोजन दर्शवते. मुघल बादशाह शहाजहान याने त्याच्या मुमताज महल या प्रिय पत्नीच्या मृत्युपश्चात तिच्या स्मृती प्रीत्यर्थ हे शुभ्र संगमरवरात स्मारक उभारले. ताजमहालाचे बांधकाम इ. स. १६५३ मध्ये पूर्ण झाले.

### ६) फत्तेपूर सिक्री :

फत्तेपूर सिक्री हे मुघल सम्राट अकबराने आग्रा शहराजवळ सिक्री या खेड्याजवळ नवीन राजधानी म्हणून १५६९-७० मध्ये वसविले. गुजरातवरील विजयानंतर त्याने त्यास फत्तेपूर सिक्री हे नाव दिले. मुघल शहरी स्थापत्याचे उदाहरण समजले जाते. सध्या या शहराचे अवशेष शिल्लक असून पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले

आहे. येथील बुलंद दरवाजा सर्वात भव्य आहे. अकबराने गुजरातच्या विजयाप्रित्यर्थ ही वास्तू दक्षिणाभिमुख बांधली होती. या दरवाजाची उंची ५४ मी. असून तो लाल दगडात बांधलेला आहे. दरवाजाच्या आत गेल्यावर सलीम चिस्तीची कबर आहे. त्या भोवतालच्या संगमरवरी भिंतीवर अतिशय सुंदर जाळीदार नक्षीकाम आहे. १८८६ मध्ये या स्थळाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले.

**७) लाल किल्ला :**

दिल्लीच्या ऐतिहासिक जुन्या दिल्ली भागात लाल किल्ला आहे. पाचवा मुघल शासक शाहजहांने आपली राजधानी म्हणून निवडला होता. या किल्ल्याच्या भिंती लाल वाळूचा खडकांनी बनलेला असल्यामुळे या किल्ल्याला ''लाल किल्ला'' असे संबोधले जाते. या ऐतिहासिक किल्ल्याची २००७ साली युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून निवड केली. भारताची राजधानी दिल्लीतील लाल किल्ला हा देशाच्या अभिमान आणि स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. भारतातील प्रमुख पर्यटनस्थळांपैकी एक आहे. जगातील कानाकोपऱ्यातून लोक लाल किल्ल्याचे सौंदर्य, भव्यता पहाण्यासाठी पर्ययक येत असतात.

**८) कुतूबमिनार :**

कुतूबमिनार ही विटांनी बांधलेली जगातील सर्वात उंच इमारत आहे. हा मिनार भारताच्या दक्षिण दिल्ली शहरातील मेहरोली भागात आहे. ही वास्तू १९९३ साली युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे. १३ व्या शतकात कुतूबमिनाराच्या बांधकामास सुरूवात झाली. हा भारतीय स्थापत्य कलेचा एक उत्तम नमुना आहे. कुतुबुद्दीन ऐबक याने मुहंम्मद घोरीवर मिळविलेल्या शानदार विजयाचे प्रतिक म्हणून कुतूबमिनार बांधला. कुतूबद्दीन ऐबकाच्या नावावरून त्याला कुतूबमिनार असे संबोधले जाते. कुतूबद्दीने आपल्या हयातीच्या काळात मिनारचे बांधकाम केले. पण तो कुतूबमिनारचा फक्त पाया पूर्ण करू शकला. त्याचा उत्तराधिकारी इल्तुतमिश याने मिनारचे पुढील बांधकाम पूर्ण केले. सर्वात शेवटचा मजला फिरोझशाह तुघलक याने सन १३८६ मध्ये पूर्ण केला. कुतूबमिनारवर चौ बाजुंनी कुराणातील वचने आणि अनेक इस्लामिक शिल्प कोरली आहेत.

**९) हुमायूनचा मकबरा :**

मुघल बादशहा हुमायून याचे हे थडगे (मकबरा) आहे. यावर इराणी वास्तूकलेची छाप आहे. १९९३ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात ह्या मकबऱ्याचा समावेश करण्यात आला. हुमायून हा बाबर नंतरचा दुसरा मुघल सम्राट होता. १५५६ साली त्याच्या मृत्यूनंतर दिल्लीच्या पुराना किल्यात हुमायूनला दफन केलं गेलं पण हेमू राजाने दिल्लीवर स्वारी करून किल्ला हस्तगत केला, त्यापूर्वी हुमायूनच्या पार्थिवाला कबरीतून बाहेर काढून पंजाब मधील कलानौर येथे पुन्हा दफन करण्यात आले. पुढे हुमायूनचा मुलगा अकबर याने सत्तेवर आल्यानंतर हुमायुनची पहिली पत्नी बेग बेगम हीने आपल्या पतीच्या स्मरणार्थ विशाल स्मारक बनवलं तोच हा हुमायून मकबरा. मिरक मिर्झा घियास ह्या स्थापत्य विशारदाच्या अधिपात्यात हा मकबरा बांधला गेला आहे.

**१०) बोधगया :**

बोधगया हे बिहार राज्यामधील एक ऐतिहासिक स्थळ आहे. बिहारच्या गया जिल्ह्यात गया शहरापासून १५

किमी अंतरावर असलेल्या बोधगया येथील महाबोधी मंदिरासाठी ते जगप्रसिद्ध आहे. येथील बोधी वृक्षाखाली बसून भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती असे मानण्यात येते. बोधगया, कुशीनगर, लुंबिनी व सारनाथ ही बौद्ध धर्मामधील चार सर्वात पवित्र स्थळे आहेत. २००२ साली महाबोधी मंदिराला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थाने ह्या यादीमध्ये स्थान मिळाले.

**११) नालंदा :**

बिहार राज्यातील सुप्रसिद्ध प्राचीन बौद्ध अवशेषांचे एक स्थळ. गंगा नदीच्या तीरावर पाटणा पासून तीरावर ७० किमी. अंतरावर वडगाव नामक खेड्याच्या परिसरात वसले होते. नालंदा हे प्राचीन विद्यापीठ म्हणून भारतात ख्यातनाम होते. प्राचीन वाङ्मयात नालंदाची नल, नालक, नालकग्राम, नालंद वगैरे भिन्न नामांतर आढळतात. नालंदा या नावाविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. भारतात प्रवासास आलेल्या फाहियान (४००-४११), ह्युएनत्संग (६३०-६४४) व इत्सिंग (६७३-६८५) या तीनही प्रसिद्ध चिनी प्रवाशांनी नालंदाच्या शैक्षणिक परंपरा व समृद्धी यासंबंधी सविस्तर माहिती आपल्या प्रवासवृत्तांमध्ये लिहून ठेवले आहे. प्राचीन वाङ्मयीन पुराव्यानुसार नालंदाची प्राचीनता मौर्यकाळातील अशोकाच्या साम्राज्यापर्यंत जाते  तथापि या स्थळाची भरभराट इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकांपासून पुढे झाली. आणि हर्षवर्धन व पाल राजे (आठवे ते बारावे शतक) यांचा उदार आश्रय येथील विद्यापीठास मिळाला. मुसलमानांचया आक्रमण काळात बख्तीयार खिलजीने येथील विहार जाळले. २०१६ साली युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ घोषित केले आहे.

**१२) सांचीचा स्तूप :**

मध्य प्रदेश राज्यातील रायसेन जिल्ह्यातील सांची गावातील एक बौद्ध स्तूप आहे. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात अशोक राजाने बांधलेले विटांचे बांधकाम असलेले हे स्थापत्य फारच सुंदर आहे. हा स्तूप म्हणजे एक स्मारक होय. गौतम बुद्धाच्या अस्थी किंवा त्याचे काही अवशेष एका पेटीमध्ये जपून ठेवले जात असत, आणि त्या पेटीवर स्मारक म्हणून भव्य अशा स्तूपाचे बांधकाम केले जाई. सांचीचा स्तूप हे याच प्रकारातील स्मारक आहे. या सांचीच्या स्तूपाच्या माथ्यावर छत्रावली आहे. इ. स. पूर्व पहिल्या शतकात सातवाहन साम्राज्याच्या कालखंडात या स्तूपाच्या बाजूने भव्य शिल्पांकित अशी तोरणे बांधली गेली आणि त्या स्तूपाभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी एक सुंदर प्रदक्षिणापथ तयार केला गेला. इथल्या तोरणांवर गौतम बुद्धांच्या आयुष्यातील विविध प्रसंग कोरलेले आहेत. सांची इथली ही तोरणे आणि त्यावर केलेले शिल्पकाम उत्तमप्रकारे केलेले आहे. १८८९ मध्ये या स्थळाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले.

**१३) भीमबेटका :**

भीमबेटका ही एक पुरातन जागा व जागतिक वारसा स्थळ असून ते मध्य प्रदेश मधील रायसेन जिल्ह्यात आहे. भोपाळ शहरापासून ४५ किमी अंतरावर आहे. २००३ मध्ये या स्थळाला जागतिक वारसा स्थळ यादी मध्ये समाविष्ट करण्यात आले. भारताच्या आदिम संस्कृतीचे अवशेष येथे पहावयास मिळतात. सुमारे एक लाख वर्षांपूर्वीची मानवाच्या राहण्याची ही जागा असावी असा अनेकांचा तर्क आहे. यांपैकी तेथील पाषाणयुगीन

गुहेतील चित्रकारी इ.स.पू. ३००० वर्षांपूर्वीची असल्याचे मानले जाते. ही भित्तिचित्रे भारतातली सर्वात प्राचीन भित्तिचित्रे समजली जातात. भीमबेटकाच्या सभोवताली अजून सुमारे पाचशे शैलगृहे आहेत, जिथे अशी प्रागतिहासिक भित्तिचित्रे आहे.

**१४) खजुराहो :**

मध्य प्रदेशामधील छतरपूर जिल्ह्यात हे ठिकाण आहे. येथे इ.स. ९५० ते १०५० या काळातील चांदेल राजवटी मधील शृंगारिक भावना शिल्प असलेली मंदिरे बांधण्यात आली आहेत. लहान मोठी अशी ८५ हिंदू आणि जैनधर्माचे प्रतिक असलेली मंदिरे बांधलेले आहेत. खजुराहोची सद्यःस्थितीतील २२ शिल्पमंदिरे तीन परिसरात विभागलेली आहेत. त्यातील पश्चिमेकडील शिल्पसमूह हा मोठा आहे. खजुराहो गावच्या पश्चिमेस असलेल्या या समूहात सध्या १२ शिल्पमंदिरे आहेत. या समूहात अग्रभागी लक्ष्मण मंदिर, पार्वती मंदिर व विश्वनाथ मंदिर ही मंदिरे आहेत. तर पाठीमागील रांगेत कंदारिया महादेव मंदिर, देवी जगदंबा मंदिर, चौसष्ठ योगिनी मंदिर व चित्रगुप्त मंदिर ही प्रमुख मंदिरे आहेत. मंदिरांवर विविध कामक्रीडा सुंदरपणे सुशोभित केल्या आहेत. प्रेमाच्या या अतुलनीय सौंदर्याचे प्रतीक म्हणून भारत व्यतिरिक्त जगभरातून अभ्यासक आणि पर्यटक सातत्याने येत असतात. १८८६ मध्ये या स्थळाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले.

**१५) चंपानेर पावागड पुरातत्व उद्यान :**

चंपानेर पावागड पुरातत्व उद्यान २००४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळामध्ये समाविष्ट असलेले एक सुंदर उद्यान आहे. हे पुरातत्व उद्यान गुजरात मधील पंचमहाल जिल्ह्यात आहे. चंपाणेर पावागढ उद्यान सुलतान महबूद बेगडा यांनी चंपानेर मुहम्मदाबाद शहराजवळ बांधले. चंपानेर पावागड उद्यान ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या आपली छाप सोडण्यात यशस्वी झाले आहे. येथे किल्ले, राजवाडे, धार्मिक इमारती, निवास संकुले, कृषी चिन्हे आणि पाणीपुरवठ्याचे बांधकाम ८ व्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत अनेक ठिकाणी आहेत.

**ब) मंदिरे, चर्च :**

**१) गोवा–चर्च आणि कॉन्व्हेंट्स :**

गोवा हे भारतातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात छोटे व लोकसंख्येच्या दृष्टीने चौथे छोटे राज्य आहे. १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी व्यापाराच्या निमित्ताने गोव्यात पाऊल ठेवले व लवकरच हा प्रदेश काबीज केला. १९६१ मध्ये भारताने गोवा मुक्त करेपर्यंत सुमारे ४५० वर्षांच्या दीर्घ कालावधीत गोव्यावर पोर्तुगीजांचा अंमल राहिला. पोर्तुगीजांच्या उपस्थितीया पहिल्या दोन शतकांमध्ये बहुतेक चर्च आणि मठ उभारले गेले. जे जुन्या गोवा शहरामध्ये वसलेले आहेत. जुन्या गोवा मधील सेंट कॅथेड्रल (गोव्याच्या आर्चबिशपचे आसन), असीसीच्या चर्च आणि कॉन्व्हेंटस ऑफ सेंट फ्रान्सिस, चैपल ऑफ अवर लेडी ऑफ द माउंट, चर्च ऑफ सेंट कॅटानो आणि विशेष म्हणजे बॅसिलिका यांचा समावेश आहे. बॉम जिझसचे, ज्यात सेंट फ्रान्सिस झेवियरचे अवशेष आहेत. ही स्मारके पोर्तुगीजांची सांस्कृतिक देवाणघेवाण आणि वारसा प्रतिबिंबित करतात. गोव्यातील पोर्तुगीज राजवटीचा अंत झाला असला तरी सांस्कृतिक प्रभाव आजही कायम आहे. १९८६ मध्ये युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून

घोषित गोव्याच्या धार्मिक स्मारकांमध्ये हे समाविष्ट केले आहे.

**२) ग्रेट लिव्हिंग चोल मंदिरे :**

चोला साम्राज्याच्या राजांनी बांधलेले ग्रेट लिव्हिंग चोल मंदिरे सर्व तामिळनाडूमध्ये विखूरलेली आहेत. चोल राजांच्या काळात कला साहित्य आणि धर्म ह्या क्षेत्रात प्रगतीचे शिखर गाठले होते. पल्वांच्या शासनकाळात सुरू झालेल्या भव्यदिव्य देवळांची निर्मिती तशीच चालू ठेवत चोळ राज्यकर्त्यांनी त्यात अधिक भर घालून द्राविडी वास्तूशिल्पकलेला नवसंजीवनी प्राप्त करून दिली. यामध्ये ११ व्या व १२ व्या शतकातील तीन महान मंदिरे आहेत. ती म्हणजे तंजावर येथील बृहदीश्वर मंदिर, गंगाकोंडाचोलिस्वरम येथील बृहदीश्वर मंदिर आणि दारासुराम येथील ऐरावतेश्वर मंदिर. ही मंदिरे वास्तूशास्त्र, शिल्पकला, चित्रकला कामामधील चोलांच्या चमकदार कामगिरीची साक्ष देतात. ही मंदिरे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये १९८७ मध्ये सांस्कृतिक वारसा स्थळ म्हणून कोरले गेले.

**३) महाबलीपुरम येथील मंदिरे :**

चेन्नईपासून अवघ्या ६० किमी असलेले महाबलीपुरम हे भव्य मंदिर, स्थापत्य व सुंदर सजावटीसाठी जगभरात प्रसिद्ध असलेले शहर आहे. बंगालखाडीच्या तटावर वसलेले हे शहर पूर्वी मामल्लापुरम नावाने ओळखले जात असे. सातव्या शतकातील हे शहर पल्लव राजांच्या राजधानीचे शहर होते. येथील द्रविड शैलीतील वास्तूकला मंदिरे जगभरात प्रसिद्ध असून १९८४ साली युनेस्कोचे जागतिक वारसा स्थान म्हणून नोंद केली आहे. २७ मीटर लांब व ९ मीटर रूंदीच्या भव्य खडकावर कोरले गेलेली नक्षी येथील एक प्रमुख आकर्षण आहे. अर्जुन पॅलेस नावाने हा खंड ओळखला जातो. या विशाल शिलाखंडावर ईश्वर, मानव, पशु–पक्षी अतिशय सुंदर कोरलेले आहेत. समुद्र किनाऱ्यावर प्राचीन मंदिर असून ते शेर टेंपल म्हणून ओळखले जाते. आठव्या शतकातील हे मंदिर द्रवीड वास्तूशैलीचा उत्तम नमुना आहे. हा तीन मंदिरांचा समूह असून मधले मंदिर विष्णुचे आहे तर त्याच्या बाजूने दोन शिवमंदिरे आहेत.

**४) हंपी :**

हंपी हे कर्नाटक राज्यातील बेल्लारी जिल्ह्यातील एक गाव आहे. हंपी हे विजयनगर साम्राज्याच्या राजधानीचे ठिकाण होते. तुंगभद्रा नदी काठावर वसलेले हे शहर आता फक्त अवशेष स्वरूपात आहे. १९८६ मध्ये युनेस्को च्या जागतिक वारसा स्थळामध्ये सहभागी करण्यात आले आहे. दरवर्षी हजारो पर्यटक आणि यात्रेकरू येथे येतात. हंपीचा विस्तार गोल खडकांच्या टेकड्यांवर पसरलेला आहे. दऱ्या आणि ढिगाऱ्यामध्ये पाचशेहून अधिक स्मारके आहेत. त्यापैकी मंदिर, राजवाडे, तळघर, पाण्याचे अवशेष, जुने बाजार, शाही मंडप, बुरूज, कोषागार इत्यादी असंख्य इमारती आहे. यातील श्री विरुपाक्ष मंदिर हे प्रसिद्ध आहे.

**५) पट्टडकल :**

पट्टडकल हे कर्नाटक मधील बागलकोट जिल्ह्यात असलेले एक खेडे आहे. युनेस्कोने इ. स. १९८७ मध्ये या ठिकाणी असलेल्या मंदिरांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला. इ. स. ८ आठव्या शतकात

बांधली गेलेली ही मंदिरे द्राविड आणि नागर या दोन्हीही स्थापत्यशैलीत आहेत. हे खेडे बदामीपासून २२ किलोमीटर व ऐहोळेपासून १० किलोमीटर अंतरावर आहे. दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीत चालुक्य नृत्य महोत्सव, नृत्य महोत्सव होतो. या महोत्सवाला लाखो पर्यटक भेट देतात.

**४) कोणार्क :**

कोणार्क हे ओरिसा राज्यातील एक शहर आहे. कोणार्क ओडिशाच्या पूर्व भागात बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर वसले आहे व ते राजधानी भुवनेश्वरच्या ६५ किमी पूर्वेस स्थित आहे. कोणार्क येथील १३ व्या शतकात बांधल्या गेलेल्या सूर्य मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. कोणार्क सूर्य मंदिरास १९८४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये स्थान मिळालेले असून ते एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. प्रचंड आकाराची बारा चाके असलेल्या सूर्यरथ आणि त्याला जोडलेले सात घोडे अशी या मंदिराच्या स्थापत्याची रचना आहे. येथे असलेली सूर्यरथाची रचना ही अन्य कोणत्या सूर्यमंदिरात दिसत नाही. गाभारा व जगमोहन मंदिर यांच्यापुढे नटमंदिर हा स्वतंत्र मंडप आहे. या सर्वच वास्तू शिल्पांनी सजलेल्या आहेत.

**क) सांस्कृतिक वारसा स्थळे :**

**१) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) :**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आधीचे नाव व्हिक्टोरिया टर्मिनस (व्हीटी) असे होते. बोरीबंदर हे मुंबई मधील ऐतिहासिक व सर्वात मोठे रेल्वे स्थानक आहे. या वास्तूचे वैभव लक्षात घेऊन २००४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात याचा समावेश करण्यात आला. या स्थानकाचे डिझाइन ब्रिटनमधील अनेक रेल्वे स्थानकाशी मिळते जुळते आहे. यावर व्हिक्टोरिया आणि मुघलकालीन स्थापत्यशास्त्राचा प्रभाव दिसतो. त्यासोबत यामध्ये मध्य रेल्वेचे मुख्यालय आहे. मुंबईच्या बोरीबंदर भागात असलेले हे स्थानक बोरीबंदर स्थानकाच्या जागेवर इ. स. १८८७ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या राज्याभिषेकाच्या सुवर्णजयंतीनिमित्त बांधण्यात आले होते.

**२) चर्चगेट आणि फोर्ट परिसरातील गॉथिक शैलीतील इमारती :**

बहरीनमधील मनामा येथे ३० जून २०१८ रोजी संपन्न झालेल्या ४२ व्या सत्रात मुंबईचा सांस्कृतिक वारसा म्हणून व्हिक्टोरिया गॉथिक आणि आर्ट डेको इमारतींना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. जवळजवळ ९४ इमारती आणि १५०० पृष्ठसंख्या असलेले तीन भागांमधील दस्ताऐवज या सत्रात सादर केले गेले. या इमारतींच्या स्थापत्य शैलींची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली आहे. व्हिक्टोरिया गॉथिक शैलीतील इमारतीमध्ये चर्चगेट आणि फोर्ट परिसरातील गॉथिक शैलीतील इमारतीचा समावेश करण्यात आला आहे. इ.स. १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या सुरूवातीला मुंबईमध्ये या व्हिक्टोरिया गॉथिक शैली इमारतींची उभारणी करण्यात आली.

**३) चंदीगड (आर्किटेक्चरल वर्क ऑफ ले कॉर्ब्युझियर) :**

चंदीगड ही पंजाब हरियाणा या दोन राज्यांची संयुक्त राजधानी व स्वतंत्र भारतात बांधले गेलेले पहिले पूर्व

नियोजित शहर आहे. चंदिगड येथील कॅपिटल कॉम्प्लेक्सचा २०१६ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळामध्ये समावेश करण्यात आला. हा भाग आर्किटेक्ट ले कॉर्बुझियर ने डिझाइन केलेले सरकारी स्थळामध्ये समावेश करण्यात आला. हा भाग सुमारे १०० एकर क्षेत्रामध्ये पसरलेला असून चंदीगडच्या वास्तुकलेचे एक प्रमुख आकर्षण आहे. यातील विधानसभा किंवा विधानसभेचा राजवाडा, सचिवालय इमारत आणि उच्च न्यायालय तसेच चार स्मारके (ओपन हँड स्मारक, भौमितिक हिल, टॉवर ऑफ सावली आणि शहीद स्मारक) आणि एक तलाव यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट करण्यात आला आहे.

४) **कालका–सिमला रेल्वे :**

कालका–सिमला रेल्वे ही भारतीय रेल्वेची एक विशेष सेवा आहे. नॅरो गेजवर धावणारी ही छोटी रेल्वे हिमाचलप्रदेशची राजधानी सिमलाला हरियाणामधील कालकासोबत जोडते. हिमालय पर्वत रांगेमधून वाट काढत ही रेल्वे कालका ते सिमला दरम्यानचे ९६ किमी अंतर सुमारे ५ तासांमध्ये पार करते. सिमला हे ब्रिटीश राजवटीचे उन्हाळी राजधानीचे शहर होते. १९०३ साली लॉर्ड कर्झनच्या हस्ते कालका–सिमला रेल्वेचे उद्घाटन करण्यात आले. २००८ साली युनेस्कोने दार्जिलिंग हिमालयन रेल्वेला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थानांच्या यादीमध्ये प्रवेश मिळाला.

**५) दार्जिलिंग हिमालयन रेल्वे :**

दार्जिलिंग हिमालयन रेल्वे ही भारताच्या पश्चिम बंगाल राज्यामधील न्यू जलपाईगुडी ते दार्जिलिंग ह्या स्थानकांदरम्यान धावणारी एक ऐतिहासिक रेल्वे आहे. ७८ किमी लांबीचा हा नॅरो–गेज रेल्वेमार्ग १८८१ साली बांधून पूर्ण करण्यात आला. १९९९ साली दार्जीलिंग हिमालयन रेल्वेला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थानांच्या यादीमध्ये प्रवेश मिळाला.

**६) निलगिरी माउंटन रेल्वे :**

तामिळनाडू राज्यातील निलगिरी माउंटन रेल्वे तीन भारतीय रेल्वेपैकी एक आहे. सन २००५ मध्ये युनेस्कोने 'हिल रेल्वेची उत्कृष्ट उदाहरणे' म्हणून मान्यता दिली आहे. निलगिरी रेल्वे कंपनीने १८८६ ते १८९९ पर्यंत ही रेल्वे बांधली. जानेवारी १९०३ मध्ये ती सरकारने खरेदी केली. सन १९०८ मध्ये कुन्नूर व उगममंडलम दरम्यान बांधकाम पूर्ण केले.

**ड) मिश्र वारसा स्थळे :**

**१) काझीरंगा राष्ट्रीय उद्यान :**

काझीरंगा राष्ट्रीय उद्यान हे आसाम राज्यातील गोलाघाट व नागांव जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान आहे. याचा १९८५ साली याचा समावेश जागतिक वारसा स्थानांत केलेला असून, जगात सापडणाऱ्या भारतीय एकशिंगी गेंड्यांपैकी दोन–तृतीयांश गेंडे या अभयारण्यात सापडतात. काझीरंगामध्ये अनेक वाघ असून २००६ मध्ये त्याला वाघांचे अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. या जंगलात अनेक हत्ती, पाणम्हशी तसेच हरणे आढळतात.

काझीरंगा अभयारण्यामध्ये अनेक दुर्मिळ पक्षाचा आदिवास आहे. काझीरंगा हे भारतातील सर्वात जास्त सुरक्षित अभयारण्य मानले जाते. काझीरंगामध्ये चार प्रमुख नद्या आहेत. यापैकी मुख्य म्हणजे ब्रह्मपुत्र नदी होय. तसेच अनेक छोटे-मोठे पाण्याचे तलावसुद्धा आढळतात.

**२) मानस राष्ट्रीय उद्यान :**

मानस राष्ट्रीय उद्यान हे आसाम राज्यातील भारत-भूतान सीमेवरील राष्ट्रीय उद्यान आहे. या उद्यानाचे प्रमुख आकर्षण आहे येथील सोनेरी वानर व ढगाळ बिबट्या ज्याला इंग्रजीत Clouded Leopard असे म्हणतात. येथील सोनेरी वानर जगात इतरत्र कुठेही आढळत नाही. त्याच बरोबर अनेक दुर्मिळ प्राणी व वनस्पतीसाठी हे माहेरघर आहे. या उद्यानाचे नाव येथील वाहणाऱ्या मानस नदीमुळे पडले आहे. मानस नदी ब्रम्हपुत्रा नदीची एक प्रमुख उपनदी आहे. या उद्यानाची सुरूवात १९२८ मध्ये झाली व याचे क्षेत्रफळ ३६० किमी वर्ग इतके आहे. याची १९७३ मध्ये याची व्याघ्रप्रकल्प म्हणून घोषणा झाली. १९८५ मध्ये युनेस्कोतर्फे या उद्यानाची जागतिक वारसा स्थान म्हणून निवड करण्यात आली, मुख्य कारण म्हणजे केवळ येथेच आढळणारे प्राणी व पक्षी, तसेच मांजर कुळातील अतिशय दुर्मिळ असे सोनेरी मांजर येथे आढळते. मानस राष्ट्रीय उद्यान हे भारताचा प्रमुख व्याघ्रप्रकल्प आहे.

**३) केवलादेव घाना नॅशनल पार्क :**

केवलादेव घाना नॅशनल पार्क हे जगातील सर्वोत्कृष्ट पक्षी उद्यानापैकी एक आहे तसेच जागतिक वारसा म्हणून ओळखले जाते. येथे देशी आणि स्थलांतरित अशा ३८० हून अधिक पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात. केवलादेव घाना राष्ट्रीय उद्यान राजस्थानमधील भरतपूर जिल्ह्यात आहे. हे आग्रा आणि जयपूर या दोन ऐतिहासिक शहरांच्या दरम्यान वसलेले आहे. १९८१ मध्ये, हे राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित केले गेले आणि १९८५ मध्ये जागतिक वारसा म्हणून घोषित केले. येथे क्रेन, स्टेंस, वैगेटेल पेलिकन, हॉक्स, शैंक्स, पेलिकन, गीज, डक, पिपिट्स, फ्लाईकैचर और व्हीटियर्स असे येथे विविध देशातील पक्षी येतात. ५००० किलोमिटर प्रवास करून येणारा सायबेरियन क्रेन पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. याचबरोबर येथे गोल्डन जॅकल, स्ट्रीप्ड हायना, जंगल कॅट, सांबर, ब्लॅकबक, फिशंग कॅट, नीलगाय आणि जंगली डुक्कर यासारख्या प्राण्यांना पाहण्यासाठी एक उत्कृष्ट ठिकाण आहे.

**४) नंदा देवी आणि व्हॅली ऑफ फ्लॉवर राष्ट्रीय उद्याने :**

उत्तराखंड राज्यातील या उद्यानाला येथील अत्यंत वैविध्यपूर्ण निसर्गामुळे १९८८ साली जागतिक वारसा स्थान म्हणून मान मिळालेला आहे. तर येथील व्हॅली ऑफ फ्लॉव्हर्सचा २००५ जागतिक वारसा स्थान यादीत समावेश केला. येथे फुलांच्या एकूण ५०० हून अधिक जाती येथे आढळतात. त्यातील कित्येक केवळ येथेच आढळणाऱ्या आहेत. फुलांमध्ये मुख्यत्वे ओर्चिड्स पॉपिस असे अनेक प्रकार येथे पहावयास मिळतात. हे उद्यान हिमालयीन जीवांच्या संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**५) ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान–हिमाचल प्रदेश :**

हिमाचल प्रदेशमधील कुल्लू भागातील ७५४.४ स्क्वेअर किलोमीटर जागेत ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान वसलेलं आहे. हे राष्ट्रीय उद्यान तिथल्या जैवविविधतेसाठी ओळखलं जातं. १९८४ मध्ये तयार झालेल्या या उद्यानाला १९९९ मध्ये राष्ट्रीय उद्यान घोषित करण्यात आले. २३ जून २०१४ रोजी युनेस्कोने त्याला 'जागतिक वारसा स्थळा'चा दर्जा देण्यात आला. येथे २५ पेक्षा जास्त प्रकारची जंगले, ८०० प्रकारच्या वनस्पती आणि १८० पेक्षा जास्त पक्ष्यांच्या प्रजातींचे घर आहे. या भागात तब्बल ३७५ जातीचे वन्यजीव आढळतात. यासोबतच जगात कुठेही आढळणार नाही अशा वनस्पतींनी हे उद्यान भरलेलं आहे. हिमालयाच्या अगदी कुशीत असलेलं हे ठिकाण मनाला भुरळ घालणारं आहे.

**६) कासचे पठार :**

कासचे पठार महाराष्ट्रातील साताऱ्याच्या पश्चिमेकडे साधारणपणे २२ किलोमीटर अंतरावर आहे. कास हा जैवविविधतेचा हॉटस्पॉट आहे. हे पठार त्यावर ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात फुलणाऱ्या विविध प्रकारच्या रानफुलांसाठी आणि फुलपाखरांसाठी प्रसिद्ध आहे. अनेक दुर्मीळ प्रजाती येथे सापडल्याने या पठाराचा २०२१ साली युनेस्को जागतिक वारसा स्थळांच्या संरक्षित यादीत समावेश केला गेला आहे. या पठारावर २८० फुलांच्या प्रजाती व वनस्पती वेली, झुडपे आणि इतर प्रजाती मिळून ८५० प्रजाती आढळतात. येथे आययूसीएनच्या प्रदेशनिष्ठ लाल यादीतील (International Union for Conservation of Nature and Natural Resources) यांनी नष्टप्राय होण्याचा धोका असलेल्या घोषित प्रादेशिक प्रजातींची यादी २८० पुष्प प्रजातींपैकी ३९ प्रजाती आढळतात. येथे सुमारे ५९ जातींचे सरिसृप (सरपटणरे प्राणी) आढळतात.

**७) पश्चिम घाट (सह्याद्री) –गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, तामिळनाडू :**

भारताच्या पश्चिमेकडील गुजरात पासून ते दक्षिणेत तामिळनाडू पर्यंत पसरलेल्या पश्चिम घाट अर्थात आपल्या सह्याद्री डोंगररांगेला २०१२ साली युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलं आहे. सह्याद्रीचा भाग त्याच्या जैवविविधतेसाठी ओळखला जातो. जगातील सर्वात जास्त जैवविविधता असणाऱ्या आठ जागांपैकी सह्याद्री एक आहे. 'वर्ल्ड हेरिटेज साइट्स'च्या यादीत समावेश झाल्यामुळे तब्बल पाच हजार प्रकारच्या सपुष्प वनस्पती, १३९ प्रकारचे सस्तन प्राणी, ५०८ पक्षांच्या प्रजाती, १७९ उभयचल प्राणी असे समृद्ध जैविक धन लाभलेल्या पश्चिम घाटाच्या संवर्धनाच्या प्रयत्नांना अधिक महत्व निर्माण झाले आहे.

**९) खांगचेंडझोंगा राष्ट्रीय उद्यानात :**

उत्तर भारतातील हिमालयीन रांगेच्या मध्यभागी स्थित (सिक्कीम राज्य) खांगचेंडझोंगा राष्ट्रीय उद्यान आहे. या उद्यानात मैदाने, दऱ्या, सरोवरे, हिमनद्या, बर्फाच्छादित पर्व यांचा समावेश आहे. पौराणिक कथा या पर्वताशी आणि मोठ्या संख्येने नैसर्गिक घटकांशी हे उद्यान (गुहा, नद्या, तलाव इ.) संबंधित आहे. खांगचेंडझोंगा उद्यानाचा परिसर प्राचीन कथांचा आणि पद्धतींचा पवित्र अर्थ बौद्ध श्रद्धांशी जोडला गेला आहे. याला सिक्कीमी अस्मितेचा आधार आहे. म्हणून जुलै २०१६ मध्ये युनेस्कोच्या संघटनेने ''मिश्र वारसा'' स्थळांच्या यादीत या ठिकाणची नोंद

घेण्यात आली, जी भारताची पहिली ''मिश्रित वारसा'' साइट बनली. हे युनेस्को मॅन अँड बायोस्फीअर प्रोग्राममध्ये समाविष्ट केले गेले.

**जुने अहमदाबाद :**

जुने अहमदाबाद गुजरात राज्यातील अहमदाबाद शहराचा एक भाग आहे. अहमदाबाद हे गुजरात मधील सगळ्यात मोठे शहर आहे. साबरमती नदीच्या किनारी वसलेल्या या शहराचे मूळ नाव कर्णावती आहे. ११ व्या शतकाच्या सुमारास अहमदाबादला आशावल म्हणून ओळखले जात होते. या शहराची स्थापना अहमदशाह पहिला याने १४११ मध्ये गुजरातची सल्तनत म्हणून केली. गुजरातचे एक महत्वाचे राजकीय आणि व्यापारी केंद्र आहे. दाट आणि गर्दीच्या असूनही हे आधुनिक अहमदाबाद शहराचे हृदय आहे. जुलै २०१७ मध्ये याला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ घोषित केले आहे.

**राणी–की–वाव :**

गुजरात मधील 'बावडी' किंवा 'वाव' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अनेक विहिरी आहेत. या विहिरींना पाण्यापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या असतात तसेच विश्रांतीसाठी मजले, छत आणि हे ठिकाण रमणीय व्हावे म्हणून कोरीव काम केले असते. गुजरातमधल अहमदाबाद पासून साधारण दीडशे किोमीटर अंतरावर असणारे पाटण या गावी असणारी अशी विहीर राणी–की–वाव या नावाने प्रसिद्ध आहे. २२ जून २०१४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत या स्थळाचा समावेश झाला. सोळंकी वंशाची ही राजधानी होती. सन १०६३ मध्ये राणा भीमदेव (प्रथम) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांची पत्नी राणी उदयमती हिने ही वाव बांधली. ६४ मीटर लांब आणि २० मीटर रुंद असणारी ही वाव साधारण २७ मीटर खोल आहे. सात स्तर असणाऱ्या या विहिरीत काही मजले आहेत, आजूबाजूच्या भिंतीवर अतिशय सुरेख शिल्पे बनवलेली आहेत. अजूनही विरीला पाणी आहे परंतु सुरक्षेच्या कारणाने चौथ्या स्तरापेक्षा खाली जाता येत नाही.

**जयपूर :**

जयपूर शहर राजस्थानची राजधानी आहे. जयपूरला 'गुलाबी शहर' म्हणूनही ओळखले जाते. जयपूर पूर्वीच्या संस्थानाचेही राजधानीचे ठिकाण होते. या शहराची स्थापना इ. स. १७२६ मध्ये दुसरा महाराजा जयसिंह यांनी केली. जयपूर हे समृद्ध इमारत–परंपरा, संस्कृती आणि ऐतिहासिक महत्त्व यासाठी प्रसिद्ध आहे. जयपूर शहराची ओळख राजवाड्यांमध्ये होते.जुन्या घरांमध्ये लावलेल्या गुलाबी धोलपुरी दगडांनी यांची बांधणी केली आहे, हे त्याच्या स्थापत्याशास्त्राचे वैशिष्ट्य आहे. १८७६ मध्ये तत्कालीन महाराज सवाई राम सिंह यांनी प्रिन्स अल्बर्ट ऑफ क्वीन एलिझाबेथ प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागतासाठी संपूर्ण शहर गुलाबी रंगाने सजवण्यात आले होते. तेव्हापासून या शहराला गुलाबी शहर असे नाव पडले. युनेस्कोने जुलै २०१९ मध्ये जयपूरला जागतिक वारसा शहराचा दर्जा दिला आहे.

**जंतर मंदर :**

राजस्थानची राजधानी असणाऱ्या जयपूर मधील जंतर मंतर हे ठिकाण म्हणजे एक खगोलशास्त्राची

वेधशाळा आहे. या वेधशाळेची निर्मिती १७२४ ते १७३४ या कालावधीदरम्यान सवाई राजा जयसिंहद्वारा करण्यात आली होती. २०१० साली युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत या जंतर मंतर वेधशाळेला स्थान देण्यात आलेले आहे. या वेधशाळेचा प्रमुख उद्देश खगोलशास्त्रीय तक्ते तयार करून सूर्य, चंद्र व इतर ग्रहांच्या गतचे निरीक्षण, गणित व भाकित करणे हा होता.

**राजस्थानचे डोंगरी किल्ले (दुर्ग) :**

राजस्थान मधील चित्तोडगड किल्ला, कुंभलगढ किल्ला, रंथांबोर किल्ला, आमेर दुर्ग, गागरीन दुर्ग आणि जैसलमेर दुर्ग इत्यादी गिरिदुर्गांचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा यादीत २०१३ साली करून घेतला आहे. हे डोंगरी किल्ले राजपूत शासनाच्या कालखंडाची साक्ष देत आजही सुस्थितीत उभे आहेत. या किल्ल्याचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची स्थापत्यकला. त्यांचा कालावधी अगदी ५ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत पसरला आहे.

## ४.३ सारांश :

एकंदरीत सर्व देशांमध्ये स्थानिक किंवा राष्ट्रीय हितसंबंधांच्या अनेक सांस्कृतिक आणि नैसर्गिक गोष्टी आहेत, ज्या राष्ट्रीय गौरवाच्या आहेत. अशी उत्कृष्ट सांस्कृतिक आणि नैसर्गिक स्थळे आंतरराष्ट्रीय समुदायाच्या पाठिंब्याशिवाय नष्ट किंवा गायब होतील, कारण त्यांना जतन करण्यासाठी निधीचा अभाव आहे. म्हणून हा वारसा जपण्यासाठी आंतरराष्ट्रीय चळवळ निर्माण करण्याच्या उद्देशाने हेरिटेज टुरिजम ही संकल्पना पुढे आली. पर्यटनाचा ऐतिहासिक विकास हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा तिन्ही कालखंडात टप्प्याटप्प्याने होत गेला आहे. पर्यटनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. परकीय चलन, अर्थव्यवस्था सुधारणे, बाजारपेठांचा विकास व आंतरराष्ट्रीय सामंजस्य या सर्व घटकांचा विकास पर्यटनातून होतो. वारसा पर्यटनाच्या माध्यमातून भारतातील नष्ट होणाऱ्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि जैवविविधतेणे नटलेल्या पर्यटन स्थळांचे जतन आणि संवर्धन होण्यास मदत झाली आहे. आणि येथील पर्यटन वाढीस लागलेले आहे. यातून भारताचा हा प्राचीन धोरोवर जगभर पोहचण्यास मदत झाली आहे.

- **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) ताजमहाल ........ नदीकाठी असलेले एक स्मारक आहे.

२) ........ ही पंजाब व हरियाणा या दोन राज्यांची संयुक्त राजधानी आहे.

३) ........ हे ठिकाण म्हणजे एक खगोलशास्त्राची वेधशाळा आहे.

४) ........ मंदिरावर विविध कामक्रीडा सुंदरपणे सुशोभित केल्या आहेत.

५) ........ मंदिराच्या बांधकामाची सुरूवात खडकाच्या वरून करून खालीपर्यंत तयार करण्यात आले.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) काझीरंगा अभयारण्य कोणत्या प्राण्यासाठी प्रसिद्ध आहे?

२) एलिफंटा लेणी कोणत्या शहराजवळ आहे?

३) फत्तेपूर सिक्री हे शहर कोणत्या बादशहाने निर्माण केले?

४) कोणत्या ठिकाणी भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली?

५) भारताची पहिली ''मिश्रित वारसा'' स्थळ कोणते आहे?

## ४.४ पारिभाषिक शब्द :

१. टूनिझम - पर्यटन.

२. हेरीटेज - वारसा.

३. युनेस्को - United Nations Educational, Scientific and Cultural Organization

४. मिश्र वारसा - मिश्र स्वरूपाचे वैशिष्टे असलेली स्थळे.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तर

- **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र.१ ची उत्तरे**

अ) १. १९४५ | २. १९७२ | ३. पॅरिस

४. प्रवास | ५. ऐतिहासिक

ब) १. परकीय चलन | २. ३८ | ३. ३९

४. वारसा पर्यटन | ५. इटली

- **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

अ) १. लॅटिन | २. अल्पकालीन | ३. ओडिसी

४. ग्रीक | ५. रेशीम

ब) १. थॉमस कुक | २. १५ व्या | ३. वार्षिक सुट्टीची

४. ब्रिटीश | ५. १९४५

- **स्वयं-अध्ययनासाठी-३ ची उत्तरे**

**अ)** १. यमुना | २. चंदिगड | ३. जंतर मंतर

४. खजुराहो | ५. कैलास

ब) १. आसाम २. मुंबई ३. अकबर

४. बोधगया ५. खांगचेंडझोंगा राष्ट्रीय उद्यान

**४.६ सरावासाठी स्वाध्याय**

**अ) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१. वारसा पर्यटन स्थळांची संकल्पना स्पष्ट करा?

२. आधुनिक व जनव्यापी पर्यटनाचा उदय कसा झाला ते स्पष्ट करा?

३. पर्यटन म्हणजे काय सांगून पर्यटनाची व्याख्या विशद करा?

४. भारतातील सांस्कृतिक वारसा पर्यटन स्थळांची माहिती सांगा?

५. भारतातील नैसर्गिक वारसा पर्यटन स्थळांची माहिती सांगा.

**ब) टिपा लिहा.**

१. जागतिक वारसा संघटना.

२. वारसा पर्यटनाचे फायदे.

३. मध्ययुगीन पर्यटनाचे स्वरूप.

४. महाराष्ट्रातील वारसा पर्यटन स्थळे.

५. वारसा पर्यटनाची व्याप्ती.

**४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :**


1. Bhatia A. K. [1995] : "International Tourism Fundeamental and Practices", Sterling Publishers, New Delhi.
2. Robinson H. [1978] : "Geography of Tourism", MacDonald Evans, London.
3. Roday S., Biwal A. and Joshi, V. [2014] : "Tourism-Operations and Management", Oxford Unviersity Press, New Delhi
4. Selvam M [1989] : "Tourism Industry in India", Himalaya Publising House, Bombay.
5. Seth, P. N., Bhat, S. S. [1993] : "An Introductaion to Travel and Tourism", Sterling Publication Pvt. Ltd., New Delhi.

6. Cultural and Heritage Tourism a Handbook for Community Champions, Libary and Archives Canada Cataloguing in Publication, e, Canada.

7. Lynn Speno, Heritage Tourism Handbook : A How-to-Guide for Georgia, Historic Preservation Division Georgia Department of Natural Resources, Georgia, 2010.

❖❖❖